# ''सातारा जिल्ह्यातील राजकीय घराण्यांचा अभ्यास १९९०–२०१५''

## टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

तात्विक व सामाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत राज्यशास्त्र
विषयातील विद्यावाचस्पती (पीएच. डी.) पदवीसाठी
सादर केलेला शोधप्रबंध


संशोधक

**श्री. अधिकराव हिंदुराव निकम**

पी.आर.एन : ०२११५००५६५०

मार्गदर्शक

**प्रा. डॉ. माणिक सोनावणे**
समन्वयक, विभागप्रमुख राज्यशास्त्र विभाग
नेसावि, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे


**राज्यशास्त्र विभाग**

**मे, २०२४**

# ‘‘सातारा जिल्ह्यातील राजकीय घराण्यांचा अभ्यास १९९०–२०१५’’

## टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

तात्विक व सामाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत राज्यशास्त्र
विषयातील विद्यावाचस्पती (पीएच. डी.) पदवीसाठी
सादर केलेला शोधप्रबंध


संशोधक

**श्री. अधिकराव हिंदुराव निकम**

पी.आर.एन : ०२११५००५६५०

मार्गदर्शक

**प्रा. डॉ. माणिक सोनावणे**
समन्वयक, विभागप्रमुख राज्यशास्त्र विभाग
नेसावि, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे


**राज्यशास्त्र विभाग**

**मे, २०२४**

# प्रतिज्ञापत्र

मी प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो की, ''सातारा जिल्ह्यातील राजकीय घराण्यांचा अभ्यास १९९०–२०१५'' हा शोधप्रबंध मी प्रा. डॉ. माणिक सोनावणे, यांच्या मार्गदर्शनाखाली टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे राज्यशास्त्र विभागामध्ये पीएच्. डी. पदवीसाठी हा शोधप्रबंध सादर केला आहे. हा शोधप्रबंध यापूर्वी इतर कोणत्याही विद्यापीठात कोणत्याही पदवीसाठी सादर केलेला नाही.

स्थळ : पुणे

दिनांक :     /०५/२०२४

संशोधक

**श्री. अधिकराव हिंदुराव निकम**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
श्री. विजयसिंह यादव महाविद्यालय,
पेठवडगाव, कोल्हापूर

# प्रमाणपत्र

मी असे प्रमाणित करतो की, श्री. अधिकराव हिंदुराव निकम यांनी ''सातारा जिल्ह्यातील राजकीय घराण्यांचा अभ्यास १९९०–२०१५'' हा प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणेच्या पीएच्. डी. पदवीसाठी सादर केलेला आहे.

प्रस्तुत प्रबंध हा श्री. अधिकराव हिंदुराव निकम यांचा स्वत:चा आहे. त्यासाठी त्यांनी अनेक अस्सल व विश्वसनीय साधनांचा वापर करून माझ्या मार्गदर्शनाखाली स्वतंत्ररित्या लिहिला आहे. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणेच्या पीएच्. डी. राज्यशास्त्र पदवीच्या पूर्ततेसाठी तो सादर करण्यात येत आहे.

स्थळ: पुणे

दिनांक :  /०५/२०२४

मार्गदर्शक

**प्रा. डॉ. माणिक सोनावणे**
समन्वयक, विभागप्रमुख राज्यशास्त्र विभाग
नेसावि, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

# ऋणनिर्देश

''सातारा जिल्ह्यातील राजकीय घराण्यांचा अभ्यास १९९०–२०१५'' या शिर्षकाचा शोधप्रबंध राज्यशास्त्र विषयातील पीएच्.डी. पदवीसाठी 'टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या' राज्यशास्त्र विभागामध्ये सादर करीत असताना या संशोधन कार्यासाठी ज्यांचे मार्गदर्शन, प्रोत्साहन व सहकार्य लाभले त्यांचा प्रती ऋण व्यक्त करणे, हे मी माझे कर्तव्य समजतो. हा प्रबंध पूर्णावस्थेस येण्याचे श्रेय माझे पीएच्.डी.चे मार्गदर्शक आदरणीय गुरूवर्य डॉ. माणिक सोनवणे यांचे आहे. त्यांनी माझा हा प्रबंध अधिक प्रगल्भ व्हावा म्हणून सातत्याने प्रयत्न केले. त्यांचा मी नेहमीच ऋणी राहीन.

हा शोधप्रबंध पूर्ण करण्यासाठी 'टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने' प्रशासकीय सहकार्य केल्यामुळेच हा प्रबंध पूर्णत्वास पोहचु शकला त्याबद्दल मी 'टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या' प्रशासकीय विभागाचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो. तसेच 'टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे' सुसज्ज ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठाचे बॅ. खर्डेकर ग्रंथालय, कोल्हापूर, लालबहाद्दुर शास्त्री महाविद्यालय, साताराचे ग्रंथालय, छ. शिवाजी कॉलेज साताराचे ग्रंथालय तसेच माझ्या कॉलेजचे श्री विजयसिंह यादव ग्रंथालय व या ग्रंथालयामधील ग्रंथपाल यांनी वेळोवेळी प्रबंधासंबंधी सर्व प्रकारचे संदर्भ ग्रंथ उपलब्ध करून दिले. मी या सर्व ग्रंथालयांचा व सर्व ग्रंथपालांचा मनापासून ऋणी आहे.

तसेच माझ्या या संशोधन कार्यासाठी माझ्या श्री. शाहू शिक्षण प्रसारक सेवा मंडळाचे बहुमोल सहकार्य लाभले. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै. श्रीमंत विजयसिंह यादव (साहेब) यांच्या आशीर्वादामुळेच हा प्रबंध पूर्ण झाला असे मी मानतो. संस्थेचे अध्यक्ष व माजी पोलिस आयुक्त पुणे श्री. गुलाबराव पोळ (साहेब) यांची प्रेरणा व मार्गदर्शन उपाध्यक्ष आदरणीय विजयादेवी यादव (आईसाहेब) यांचे आशीर्वाद, सचिव सौ. विद्याताई पोळ (ताईसाहेब) यांचे स्नेह ही या प्रबंधाच्या पूर्णत्वाचे प्रमुख कारण आहे. श्री. विजयसिंह महाविद्यालयातील माझ्या विभागाचे प्रा. प्रभुदास खाबडे व महाविद्यालयामधील

सर्वच माझे सहकारी प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी मित्रांचे सहकार्य व सदिच्छा ही या प्रबंधाचा पूर्णत्वाची प्रेरणा होय.

शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रवींद्र भणगे सर, डॉ. पणदुरकर, माजी भूगोल विभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, सौ. माई पणदुरकर, मा. श्री. चंद्रकांत जाधव, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष, सातारा, डॉ. संजय यादव, डॉ. सोनवणे, श्री. अविनाश देशमुख, श्री. भिलारे साहेब, बाळासाहेब देसाई कॉलेज पाटणचे प्राचार्य डॉ. शिरीष पवार सर, डॉ. सुनिल साठे–श्रीमती विजयादेवी देसाई कॉलेज, दौलतनगर पाटण, डॉ. वावरे, डॉ. धोंडे, डॉ. खळदकर, डॉ. संपकाळ, डॉ. सलीम पठाण, डॉ. करीम मुल्ला, डॉ. पंडित लावंड, डॉ. दादा करडे तसेच वडगावचे मित्र श्री. सुभाष पाटील, श्री. योगेश चव्हाण, श्री. सचिन पाटील, श्री. अमोल पाटील, अपशिंगे गावचे श्री. अंकुश निकम, श्री. राजेंद्र निकम, श्री. रवींद्र मोहिते, श्री. प्रकाश मोहिते, श्री. राजकुमार निकम, श्री. समाधान निकम यांचे सहकार्य लाभले.

शेवटी ज्यांचा आशिर्वादाशिवाय हे काम पूर्णच होऊ शकले नसते ते माझे वडील कै. हिंदुराव निकम, आई श्रीमती ताराबाई निकम, वडील बंधु श्री. प्रतापराव व अमृतराव, वहिनी मधुबाला, उन्नती, माझी पत्नी लतिका व मुलगी जान्हवी, मुलगा धैर्यशिल या सर्वांचा अत्यंत मोलाचा वाटा आहे.

सदर शोधप्रबंधाचे टंकलेखनाचे, झेरॉक्सचे व बायडिंगचे काम करणारे श्रीकांत कॉम्प्युटर्स यांचा मी अत्यंत ऋणी आहे. शेवटी हा शोधप्रबंध पूर्ण करण्यासाठी ज्या ज्ञात–अज्ञातांचे मला मार्गदर्शन व सहकार्य लाभले अशा सर्वांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो.

आपला,
संशोधक अभ्यासक

**(श्री. अधिकराव हिंदुराव निकम)**

# तक्ता सूची


| तक्ता क्र. | शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १.१ | भारतातील राजकीय घराणी | ४ |
| १.२ | महाराष्ट्रातील सहकारी संस्था दर्शविणारा तक्ता | ८ |
| १.३ | महाराष्ट्रातील साखर सम्राट व कारखाने दर्शविणारा तक्ता | ११ |
| ४.१ | १९९० ते २०१५ व आजपर्यंत सातारा जिल्हा लोकसभा निवडणूक | १२७ |
| ४.२ | १९९० ते २०१५ व आजपर्यंत सातारा जिल्हा विधानसभा निवडणूक | ३१ |
| ४.३ | १९९० ते २०१५ व आजपर्यंत सातारा जिल्हा–महाराष्ट्र मंत्रीमंडळ सहभाग | १३८ |
| ४.४ | स्थानिक स्वराज्य व सहकारी संस्थामधून राजकीय कारकिर्द आरंभ | १४१ |
| ४.५ | सातारा जिल्ह्यातील सहकारी संस्था | १४४ |
| ४.६ | सातारा जिल्ह्यातील सहकारी व खाजगी साखर कारखाने | १४७ |
| ४.७ | सातारा जिल्ह्यातील राजकीय घराणी व त्यांचे साखर कारखाने | १५० |
| ४.८ | सातारा जिल्ह्यातील राजकीय घराण्यांच्या प्रभावाचा गुण तक्ता | १६१ |
| ४.९ | यशवंतराव मोहिते यांनी स्थापन केलेल्या संस्था व कार्य | १८९ |
| ४.१० | चव्हाण घराण्याची राजकीय कारकीर्द | १९९ |
| ४.११ | देसाई घराण्यातील व्यक्तींचा लोकसभा व विधानसभा मधील सहभाग | २१२ |
| ४.१२ | पी. डी. पाटील यांचे कार्य व संस्थेतील सहभाग | २१६ |
| ४.१३ | राजकीय घराण्याने विविध सहकारी संस्था मार्फत रोजगार निर्मिती केली आहे काय? | २२२ |
| ४.१४ | राजकीय घराण्याचे, नेतृत्त्वाचे प्रभावक्षेत्र कोणते आहे? | २२३ |
| ४.१५ | सत्तेच्या विकेंद्रीकरणात या राजकीय घराण्याने सामान्य कार्यकर्त्याला इतर ठिकाणी नेतृत्त्वाची संधी दिली आहे काय? | २२४ |
| ४.१६ | राजकीय घराण्यातील महिला सदस्य राजकारणात सक्रीय आहेत काय? | २२५ |

| तक्ता क्र. | शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| ४.१७ | मतदार संघातील सर्वसामान्याचे प्रश्न, समस्या सोडविण्यासंदर्भात वर्तमान नेतृत्त्वाच्या भूमिकेबद्दल आपले मत काय? | २२६ |
| ४.१८ | राजकीय घराण्याचे नेतृत्त्व विविध सहकारी संस्था, संघटनांचे नेतृत्त्व करतात काय? | २२७ |
| ४.१९ | राजकीय घराण्याच्या कार्याने मतदार संघाचा विकास झाला आहे असे वाटते काय? | २२८ |
| ४.२० | राजकीय घराण्यातील नेतृत्त्वाने पक्ष बदल केल्यास आपणास मान्य आहे काय? | २२९ |
| ४.२१ | समकालीन राजकीय परिस्थितीत आपल्या मतदार संघातील घराणी नेतृत्त्व करण्यास प्रभावी आहे काय? | २३० |
| ४.२२ | राजकीय घराण्यांच्या प्रभावामुळे इतर नविन नेतृत्त्व विकसित होत नाही असे वाटते का? | २३१ |
| ४.२३ | राजकीय घराणेशाही लोकशाही व्यवस्थेसाठी अडसर ठरत आहे असे आपणास वाटते काय? | २३२ |
| ४.२४ | राजकीय घराण्यांच्या आर्थिक प्रभावामुळे त्यांच्या विरोधी सर्वसामान्य व्यक्ती निवडणूक लढवू शकत नाही असे आपणास वाटते काय? | २३४ |
| ४.२५ | राजकीय घराणेशाहीतील नेतृत्वाशिवाय राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या उच्चशिक्षित, कार्यक्षम नेतृत्त्वास आपण स्विकाराल काय? | २३६ |
| ४.२६ | राजकीय घराण्याच्या नविन पिढीच्या नेतृत्त्वाला आपली मान्यता आहे काय? | २३७ |
| ४.२७ | राजकीय घराण्यातील जुन्या पिढीतील नेतृत्त्वापेक्षा नविन नेतृत्त्वाबद्दल आपले मत काय? | २३८ |
| ४.२८ | राजकीय घराण्याचे नेतृत्त्व अधिक प्रभावी व्हावे असे वाटते काय? | २३९ |

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | प्रकरणाचे नांव | पृष्ठ क्र. |
| --- | --- | --- |
| | मुखपृष्ठ | I |
| | प्रतिज्ञापत्र | II |
| | प्रमाणपत्र | III |
| | ऋणनिर्देश | IV-V |
| | अनुक्रमणिका | VI |
| | तक्ता सूची | VII |
| प्रकरण : १ | प्रस्तावना | १–६५ |
| प्रकरण : २ | संदर्भ साहित्यांचा आढावा | ६६–१०१ |
| प्रकरण : ३ | संशोधन पद्धती | १०२–११५ |
| प्रकरण : ४ | सातारा जिल्ह्यातील राजकीय घराण्याचे विश्लेषण | ११६–२४९ |
| प्रकरण : ५ | सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी | २५०–२७६ |
| | संदर्भग्रंथ सुची | २७७–२८६ |
| | परिशिष्ट – प्रश्नावली | २८७–२८९ |

# प्रकरण पहिले
# प्रस्तावना

## १.१ प्रस्तावना

भारतीय समाजव्यवस्थेचे व राजकारणाचे 'घराणेशाही' हे एक महत्वाचे वैशिष्ट आहे. भारतीय राजकारणावर अनेक घराण्यांचे अनेक वर्षे सातत्याने प्रभाव व वर्चस्व राहिले आहे. भारतामध्ये विविध प्रांतातील अनेक जाती, धर्मातील घराण्यांचा आणि त्यामधून उदयास आलेल्या अभिजनांचा त्या–त्या राज्याच्या राजकारणावर प्रभाव पडल्याचे दिसून येतो. भारतीय समाज हा अनेक धर्म, पंथ, भाषा आणि जातीमध्ये विभागला गेला आहे. त्यामध्ये वरिष्ठ व कनिष्ठ अशी घराणी निर्माण झाली असून वरिष्ठ घराण्यांनी कनिष्ठ घराण्यावर व सर्वसामान्य जनतेवर आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केल्याचा दिसून येतो. परिणामी कनिष्ठ वर्गाचे सतत शोषण झाले आहे. हा वर्ग सत्तेपासून नेहमीच उपेक्षित, वंचित राहिला असण्याचे दिसून येते.

समाज कोणत्याही स्वरूपाचा असो ह्यात काही घराण्यांचे स्थान उच्च व श्रेष्ठ मानले जाते. तीच घराणी राजकीय व्यवस्थेवर आपले वर्चस्व प्रस्थापित करत असतात, कोणत्याही राजकीय व्यवस्थेत अर्थात लोकशाही किंवा हुकूमशाही व्यवस्थेत अशी घराणी संपत्ती, बुध्दीमत्ता, उत्पादनाची साधने व राजकीय पक्ष या माध्यमातून उदयास येतात. पूर्वी उत्पादनाची साधने अविकसित व मर्यादित होती. शेतीच्या माध्यमातून उत्पादन साधनांचा उदय झाला. ज्यांच्याजवळ जास्त शेती तो मालक, स्वामी जमीनदार, सरंजामदार म्हणून उदयास आला. पुढे त्याचेच रूपांतर सामंतशाही, भांडवलदारीमध्ये झाले आणि यातून जमीनदार व भांडवलदार घराणी निर्माण झाली. तीच घराणी आधुनिक राजकीय व्यवस्थेच्या शिरोभागी राहून राजकीय व्यवस्थेवर प्रभाव व नियंत्रण ठेवत असल्याचे दिसून येते.

सामाजिक इतिहासाची पुर्नमांडणी करताना विविध ऐतिहासिक राजकीय घराण्यांच्या कर्तबगारीची सामाजिक अंगाने नोंद घेतली असता, निरनिराळ्या कालखंडात समाजावर आर्थिक वा राजकीय प्रभूत्व प्रस्थापित केलेली अनेक घराणी आढळून येतात. समाजाला दिशा दाखविण्याचे व प्रसंगी दिशा बदलण्याचे सामर्थ्य या घराण्यातील अभिजनांमध्ये असलेले आढळते, प्रांता–प्रांतामध्ये समाजाचे नेतृत्त्व करणारे मग ते समाजिक, आर्थिक, राजकीय,

सांस्कृतिक या व अन्य कोणत्याही प्रकारचे असो त्यामध्ये या घराण्यांनी सत्तेचे नेतृत्त्व केलेले दिसून येते.

## १.२ घराणे म्हणजे काय?

कुटंबाचा विस्तार झाला की रक्ताच्या नात्याची एक वंशावळ बनते. समाजातील परंपरागत कुंटुबाच्या विस्तारातून अशा वंशावळी किंवा गोत्र निर्माण होते यालाच घराणे किवा त्या कुटूंबाचा वंश असे म्हणतात. म्हणजेच घराण्यातील रक्तासंबंधी नात्यामधील माणसं असा होतो.[१]

### अ) भारतातील ऐतिहासिक घराणी

इ. स. पूर्व २९८ ते ३२२ मध्ये भारतात विविध प्रांतात चंद्रगुप्त मौर्याच्या घराण्यापासून घराणेशाहीच्या परंपरेला सुरूवात झाली, असे म्हटले जाते.[२] त्यानंतर विविध प्रांतात पल्लव, सातवाहन, कारकोट, गुर्जर, पाल, राष्ट्रकूट, परतार,कलचूरी, चोल, जर गुलाम–तुघलक, खिलजी, लोदी, मोगल, सैय्यद, कोदी अशी अनेक मुस्लिम घराणी भारताच्या ऐतिहासिक कालखंडामध्ये उदयास आली.[३] आणि त्यांनी साम्राज्य विस्तार केला. भारतातील विविध प्रांतापैकीच महाराष्ट्र हा एक प्रांत आहे.

### ब) महाराष्ट्र निर्मीतीपूर्व घराणी

इतिहासकाळापासून महाराष्ट्रामध्ये अनेक कर्तबगार राजघराणी होऊन गेली. वेगवगळ्या कालखंडात वेगवेगळी राजकीय घराणी पुढे येत असतात. आजही हा क्रम तसाच चालू असलेला दिसून येतो. इ. स. १८ व १९ व्या शतकात महाराष्ट्रामध्ये ब्राम्हण व ब्राम्हणेत्तर घराणी उदयास आली. या प्रभावशाली घराण्यातील अनेक स्त्री–पुरुषांनी सामाजिक जडण–घडण व राजकारणामध्ये आपली महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. या घराण्यांच्या कार्यकर्तृत्त्वाचा आढावा घेतल्याशिवाय तत्कालीन महाराष्ट्राचा सामाजिक व राजकीय आलेख पूर्ण होऊ शकत नाही. १३ व्या शतकापुरता जरी महाराष्ट्राचा ओझरता आढावा घेतला तरी दाभाडे, घोरपडे, आंग्रे, शिंदे, होळकर, जाधव, पवार, रास्ते, पानसे, पेठे, चंद्रचूड, रायरीकर, फडके, गोखले, निबांळकर, पटवर्धन, बिचकर, भानुक, फडणवीस, श्रीवर्धन, भट, भोसले, नातू, पेशवे, घराणे[४] अशी अनेक घराणी महाराष्ट्रामध्ये उदयास आलेली दिसतात. या घराण्यांनी सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रामध्ये भरीव कामगीरी करून आपल्या कर्तृत्वाची स्वतंत्र

ओळख निर्माण केली. पुढे १९६० च्या दशकात संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा उदय होऊन १ मे १९६० रोजी महाराष्ट्र निर्माण झाला.

**क) भारतातील राजकीय घराणी**

आज राजकीय घराणेशाही ही भारतीय राजकीय व्येवस्थेचे महत्त्वाचे व प्रमुख वैशिष्ट्ये झालेले दिसून येते. भारताच्या स्वातंत्र्यानंतर विचार करता आजपर्यंत भारतातील बहुतांश सर्व राज्यांमध्ये विविध राजकीय घराणी उदयास आलेली दिसून येतात. राजकीय घराणी ही त्या त्या राज्यामध्ये काहीप्रमाणात पूर्वीच्या राजघराणी व सरंजामदार, जमीनदार घराण्यांतून तर काही घराणी स्वातंत्र्यलढ्यातील सहभागी व्यक्तींच्या वारश्यांतून उदयास आली. तर नव्याने उदयास आलेली बहुतांश घराणी ही स्वकर्तृत्वातून उदयास आलेली दिसून येतात. उदा. राष्ट्रीय पातळीवरचा विचार करता गांधी, नेहरू हे राजकीय घराणी स्वातंत्र्यचळवळीच्या वारश्यातून तर महाराष्ट्रात भोसले, निबांळकर, देशमुख, ही घराणी राजघराण्यांच्या वारश्यातून तर पवार, थोरात, चव्हाण, मोहिते, राणे, टोपे, ठाकरे, शिंद, विखे–पाटील आदी राजकीय घराणी स्वकर्तृत्वातून तर काही सहकाराच्या माध्यमातून उदयास आलेली दिसतात. एकंदरीत इतिहासाच्या काळापासून ते वर्तमानकाळापर्यंत स्वतंत्र भारतीय राजघराण्यांचा अभ्यास केला असता वेगवेगळ्या कालखंडात वेगवेगळी राजकीय घराणी उदयास आली. तर काही लयास गेली. स्वातंत्र्योत्तर काळात काही राजकीय पक्षाकडून व बिगरराजकीय संस्था, संघटनाकडून नव्याने राजकीय व्यवस्थेत घराणेशाहीविरहित कर्तृत्वावर आधारित स्पर्धात्मक सर्वसमावेशक सहभागी लोकशाही राजव्यवस्था असावी असा आग्रह धरताना दिसून येतात. विशेषतः भारतीय जनता पक्ष, मार्क्सवादी पक्ष, बिगर काँग्रेसववादी पक्ष, संघटना आदी घराणेशाही मुक्त राजकारणांचा पुरस्कार करताना दिसून येतात. भाजप व तत्सम पक्ष, संस्था, संघटना, राजकारणातील राजकीय पक्षातील घराणेशाहीवर टीका करत असल्याचे दिसून येतात. मात्र वर्तमान भारतीय राजकीय व्यवस्थेत कोणतीही राजकीय पक्ष संघटना, घराणेशाहीच्या प्रभावापासून दूर राहिलेली दिसून येत नाही. पुढील तक्त्यांद्वारे भारतातील विविध राज्यांच्या समाजकारण व राजकारणावर प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष प्रभाव पाडणाऱ्या राजकीय घराण्यांचा उल्लेख पुढे करण्यात आला आहे.[५]

## तक्ता क्र. १.१
## भारतातील राजकीय घराणी

| राज्य | व्यक्ती | पद | नाते | पक्ष |
|---|---|---|---|---|
| उत्तरप्रदेशमधील राजकीय घराणी | मोतीलाल नेहरू | – | वडील | काँग्रेस |
| | पंडीत नेहरू | पंतप्रधान | स्वतः | |
| | इंदिरा गांधी | पंतप्रधान | मुलगी | |
| | संजय गांधी | खासदार | नातू | |
| | राजीव गांधी | पंतप्रधान | नातू | |
| | सोनिया गांधी | काँग्रेस अध्यक्ष | नात सून | |
| | राहुल गांधी | काँग्रेस अध्यक्ष | पणतू | |
| | मेनका गांधी | मंत्री | नात सून | भाजप |
| | वरुण गांधी | खासदार | पणतू | |
| | मुलायमसिंग यादव | मुख्यमंत्री | स्वतः | समाजवादी पार्टी |
| | अखिलेश यादव | मुख्यमंत्री | मुलगा | |
| | डिपल यादव | खासदार | सून | |
| बिहारमधील राजकीय घराणी | लालूप्रसाद यादव | मुख्यमंत्री | स्वतः | राष्ट्रीय जनता दल [६] |
| | राबाडीदेवी यादव | मुख्यमंत्री | पत्नी | |
| | तेजस्वी यादव | उप मुख्यमंत्री | मुलगा | |
| | मिसा यादव | खासदार | मुलगी | |
| झारखंडमधील राजकीय घराणी | सिबु सोरेन | मुख्यमंत्री | स्वतः | झारखंड मुक्ती |
| | हेमंत सोरेन | मुख्यमंत्री | मुलगा | |
| ओडिसामधील राजकीय घराणी | बिजू पटनाईक | मुख्यमंत्री | स्वतः | काँग्रेस |
| | नविन पटनाईक | मुख्यमंत्री | मुलगा | बिजू जनता दल |
| मध्यप्रदेशमधील राजकीय घराणी | विजयाराजे शिंदे | खासदार | स्वतः | भाजप |
| | वसुंधराराजे | मुख्यमंत्री राजस्थान | मुलगी | |
| | माधवराव शिंदे | मंत्री | मुलगा | काँग्रेस |
| | जोतिरादित्य शिंदे | मंत्री | नातू | भाजप |
| आंध्रप्रदेशमधील राजकीय घराणी | एन. टी. रामाराव | मुख्यमंत्री | स्वतः | तेलगु देसम |
| | चंद्राबाबू नायडू | मुख्यमंत्री | जावई | |
| | वाय. एस. आर. रेड्डी | मुख्यमंत्री | स्वतः | काँग्रेस |
| | जगनमोहन रेड्डी | मुख्यमंत्री | मुलगा | वाय. एस. आर. काँग्रेस |
| तामिळनाडूमधील राजकीय घराणी | करुणानिधी | मुख्यमंत्री | स्वतः | द्रमूक |
| | स्टॉलिन | मुख्यमंत्री | मुलगा | |
| | कळीमोगी | मंत्री | मुलगी | |
| | उदयनिधी स्टॅलिन | मंत्री | नातू | |
| | एम. जी. रामचंद्रन | मुख्यमंत्री | स्वतः | अन्ना द्रमूक |
| | जयललिता | मुख्यमंत्री | पत्नी | |
| कर्नाटकमधील राजकीय घराणी | ए. डी. देवेगौडा | पंतप्रधान | स्वतः | जनता दल [७] |
| | कुमार स्वामी देवेगौडा | मुख्यमंत्री | मुलगा | |
| | रेवन्ना प्रज्वल्ल देवेगौडा | खासदार | नातू | |

## १.३ महाराष्ट्र राज्याची निर्मिती

महाराष्ट्राच्या निर्मितीच्या अगोदर मुंबई–प्रांत, म्हैसूर–प्रांत, मध्य–प्रांत, हैद्राबाद–प्रांत यामध्ये मराठी भाषिक विभागला होता. स्वातंत्र्यानंतर भाषिक तत्त्वावर राज्याच्या मागणीचा जोर वाढत गेला. ज्याप्रमाणे भारताला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी मोर्चा, आंदोलने, निदर्शने झाली. त्याचप्रमाणे महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी मराठी भाषिकांकडून मोर्चे, निदर्शने यांच्या माध्यमातून चळवळ उभी करून संयुक्त महाराष्ट्र समितीच्या माध्यमाने लोकचळवळ उभारून महाराष्ट्र निर्मितीचा लढा उभारला गेला. या लढ्यामध्ये काँग्रेस विरोधी सर्वपक्ष विविध संघटना विशेषतः मुंबईमधील गिरणीकामगार, शेतकरी, कामकरी, पत्रकार, शाहीर इत्यादींचे योगदान महत्त्वाचे आहे. मुंबई प्रांतातील मराठी भाषिक भाग, हैद्राबाद संस्थानामधील मराठवाडा व मध्यप्रांतातील विदर्भ मिळून १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली.[८] भाषावार प्रांत रचनेतून मुंबई व्दिभाषीक राज्याचे विभाजन होऊन गुजरात व महाराष्ट्र अशी दोन राज्ये निर्माण करण्यात आली. यामध्ये मुंबईला राजधानीचा दर्जा तर नागपूरला उपराजधानीचा दर्जा प्राप्त झाला. क्षेत्रफळाच्यादृष्टीने भारतातील राज्यांत महाराष्ट्राचा तिसरा क्रमांक लागतो. राजस्थान व मध्यप्रदेश हि राज्ये प्रथम व व्दितीय क्रमांकावर आहेत. ३,०६,६१० चौरस किलोमीटर इतके क्षेत्रफळ महाराष्ट्र राज्याचे आहे. भारताच्या एकदंर भूभागाच्या ते ९.३६% आहे. अक्षांश विस्तार १५°४४′ ते २२°.६′ अक्षांश. रेखांश विस्तार ७२°.६६′ पूर्व रेखांश ८०°.५४′अरबी समुद्र महाराष्ट्राच्या पश्चिमकडे असून ७२० किलोमीटरचा समुद्रकिनारा लाभला आहे. महाराष्ट्राच्या उत्तरेस – गुजरात, मध्यप्रदेश, पूर्वेस – तेलंगणा, छत्तीसगड, दक्षिणेस – कर्नाटक, गोवा राज्ये तर पश्चिमेस – समुद्रकिनारा आहे. सहा प्रशासकीय विभागात राज्याची विभागणी केलेली आहे. ३६ जिल्हे या विभागात आहेत तर ३२५ तालुके, ३३६ शहरे आहेत. महाराष्ट्रात शहराच्या तुलनेने खेड्यांची संख्या सर्वाधिक आहे. भारत हा जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश आहे. जगाच्या एक षष्ठांश लोकसंख्या भारतात राहते. संयुक्त राष्ट्रसंघाच्या अंदाजानुसार एप्रिल २०२३ अखेर भारताची लोकसंख्या १,४२,५७,७५,८५० एवढी झाली. असून लोकसंख्येच्याबाबत भारताने चीनला पाठिमागे टाकत जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा देश हा मान मिळविला आहे.

२०११ च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या १,२१,०८,५४,९७७ असून त्यामध्ये पुरुषांची संख्या ६,२३,७२,४४८ तर स्त्रियांची संख्या ५८,६४,६९,१७४ एवढी आहे. त्याच जनगणनेनुसार भारतातील साक्षरतेचे प्रमाण ७४.०४% एवढे आहे.[९]

महाराष्ट्राच्या लोकसंख्येबाबत विचार करता २०२१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या ११,२३,७४,३३३ एवढी असून त्यामध्ये पुरुष संख्या ५,८२,४३,०५६ तर स्त्रियांची संख्या ५,४१,३१,२७७ एवढी आहे. महाराष्ट्रात लिंगोत्तर ९२९ असून लोकसंख्येची घनता दर चौरस कि.मी.ला ३६५ असून भारतातील एकूण लोकसंख्येच्या ९.२८% लोकसंख्या महाराष्ट्रात राहते. २०११ च्या जनगनेनंतर भारतात जनगणना विभागामार्फत भारताच्या लोकसंख्येची जनगणना झालेली नाही.[१०]

### अ) महाराष्ट्राचे राजकारण आणि सहकार क्षेत्र

प्रगतशिल राजकारणी, राजकीय मुत्सद्दी, सामाजिक चळवळीकडे आस्थेवाईकपणे पाहणारा लोकनेता कै. यशवंतराव चव्हाण यांच्या रुपाने महाराष्ट्राला मुख्यमंत्री लाभला. मराठी जनतेच्या आशा–आकांक्षाचे ते प्रतिक बनले. आधुनिक महाराष्ट्राचा पाया घालताना समाजवादी भारतात समाजवादी महाराष्ट्र हे जरी पुरे अंमलात आले नसले तरी लोकशाही विकेंद्रीकरणाचा मोठा प्रयोग महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतरच्या १० ते १५ वर्षांमध्ये राबविला. राज्यकारभाराबरोबरच नेतृत्त्वाचे विकेंद्रीकरण केल्याशिवाय ग्रामीण भागातील लोकशाही बळकट होणार नाही, असे त्यांचे मत होते. सहकारातून समाजवादाकडे जाण्याचा दृष्टिकोन त्यांच्याकडे होता त्यामुळेच त्यांना आपल्या मताप्रमाणे राज्याची जडण–घडण करण्याची संधी मिळाली. कृषी, औद्योगिक, आर्थिक, सहकार, सामाजिक क्षेत्र, दलित, मागासवर्गीय यांच्या शिक्षणासाठी प्रयत्न, साहित्य, सांस्कृतीक क्षेत्र, महाराष्ट्र राज्य साहित्य, संस्कृती, नाट्य, चित्रपट, विश्वकोष निर्मिती, शासकीय मदत, लोककला पुरस्कार यासारखी दिर्घ परिणाम करणारी ध्येय–धोरणे सर्वच क्षेत्रात त्यांनी राबविली. तसेच जिल्हा परिषद कायदा करून जिल्हा परिषद, पंचायत समितीची स्थापना आणि यातून उचलले विकेंद्रीकरणाचे पाऊल, सहकार चळवळीस प्रोत्साहन, शासनाकडून भाग–भाडंवल पुरवठा या त्यांच्या धोरणामुळे तालुका पातळीवरून धाडसी व नवे नेतृत्त्व उदयास येण्यास मोठी मदत झाली.

भारतातील इतर राज्यापेक्षा महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील लोकशाही सशक्त करण्याचा हा प्रयोग वेगळाच मानावा लागेल. सहकारी संस्थामुळे शेतकऱ्यांच्या हातात पैसा आला. त्याच्या जीवनात अमुलाग्र बदल घडून येण्यास मदत झाली. त्याचे जीवनमान सुधारले तसेच सहकाराला महाराष्ट्रातील ग्रामीण अर्थव्यवस्थेसह शेतीसंबधी समाजघटकही कायमस्वरूपी जोडले गेले आणि नवीन नेतृत्त्वास सत्तेमध्ये सहभागी होण्याची संधी दिली. ग्रामीण विकास कार्यक्रम आणि सहकार यांना काँग्रेस पक्षाशी जोडले. यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणावरती त्याचा परिणाम झाला आणि यातूनच काँग्रेस पक्षाचे वर्चस्व महाराष्ट्रामध्ये निर्माण झाले. सहकार व विकेंद्रीकारणाच्या माध्यमातून उदयास आलेले हे नवे नेतृत्त्व तळागाळातील सामाजिक व राजकीय भान असणारे होते.[११]

काँग्रेसमध्ये निर्माण झालेल्या नव्या नेतृत्त्वाची राजकीय शैली आरंभीच्या काळात आजच्यापेक्षा वेगळी होती. तळागाळातून आलेले हे कार्यकर्ते सत्तेला विकासाचे साधन मानणारे होते. राजकारणाच्या मर्यादेचेही त्यांना भान होते. या नेत्यांनी उभारलेल्या संस्थांचा अभ्यास केल्यावर त्यांच्या कार्याची माहिती कळते. स्वातंत्र महाराष्ट्राच्या सुरवातीच्या कालखंडात जिल्हा परिषद अध्यक्ष हे आमदार, मंत्री यापेक्षाही महत्त्वाचे मानले जात होते. जिल्हा परिषद, पंचायत समिती, सहकारी संस्था यातून तावून–सुलाखून निघालेला कार्यकर्ता, कार्यकर्तृत्वाची ओळख असलेली घराणेशाहीची पार्श्वभूमी नसलेली सर्व जाती धर्मांना समान मानणाराअशा लोकांनाच आमदार व खासदारकीची उमेदवारी दिली जात होती. राजकीय सत्ता, कारखानदारी आणि भक्कम जनाधार असलेल्या कार्यकत्यांची फळी सुरवातीच्या काळात निर्माण झाली. दवाखाने, कृषीमालावर प्रक्रिया करणारे उद्योग, शिक्षणसंस्था, विकासकामे करणाऱ्या संस्था उभ्या राहिल्यामुळे ग्रामीण महाराष्ट्राचा चेहरा–मोहरा बदलून गेला. साखर कारखानदारांनी नवीन माध्यमिक, उच्चमाध्यमिक, शाळा महाविद्यालये सुरू केल्यामुळे गाव, वाडी–वस्तीपर्यंत शिक्षणाची ज्ञानगंगा पोहचली.[१२]

## ब) महाराष्ट्रातील सहकारी चळवळ

महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रावर सहकाराचा मोठा प्रभाव राहिला आहे. सहकार हे महाराष्ट्रातील राजकारणाचा प्रमुख आधार आहे. महाराष्ट्राच्या निर्मितीपासूनच जमीनदार असलेली ठराविक मराठा घराणी सत्तेचे केंद्र बनली. त्यामुळे सहकारी संस्थेचे

आजही नेतृत्त्व आपोआप मराठा समाजाकडे असलेले दिसते. या सर्वघटकांचा परस्परांवर आणि महाराष्ट्राच्या राजकारणावर प्रभाव पडलेला दिसतो.

१९७८ च्या जनतापक्ष सरकारचा अपवाद वगळता १९९५ पर्यंत महाराष्ट्रासह केंद्रात सतत काँग्रेसचे सरकार असल्याचे दिसून येते. त्यामुळेच सहकार क्षेत्रातील नेते, मंडळी काँग्रेसबरोबर असलेले दिसते. अर्थात काँग्रेस पक्षाला या सहकार क्षेत्राचा महाराष्ट्राच्या राजकारणात मोठ्या प्रमाणावर उपयोग झाल्याचे दिसते. सहकारी संस्थानी ग्रामीण भागात स्थान निर्माण केले. त्यामुळे मोठा समर्थक वर्ग निर्माण झाला. त्याची मदत काँग्रेसला आपले वर्चस्व टिकविण्यासाठी झाली. सहकारी सत्तेची सुत्रे ठराविक लोकांकडे असल्यामुळे याच लोकांच्या भोवती सत्तेचे राजकारण केंद्रीत झालेले दिसते.[१३] अशाप्रकारे महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यापासून विविध सहकारी संस्थांचे जाळे उभारले व ते विकसित होत गेले. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील सहकारी संस्था किती व कोणत्या आहेत ते पुढील तक्त्याच्या आधारे स्पष्ट करण्यात आले आहे.

**तक्ता क्र. १.२**
**महाराष्ट्रातील सहकारी संस्था दर्शविणारा तक्ता**

| अ. क्र. | प्रकार | संस्थाची संख्या |
|---|---|---|
| १ | प्राथमिक शेतकी सहकारी पतसंस्था/सोसायट्या | १९,२१५ |
| २ | नागरी सहकारी बँक | ५७९ |
| ३ | पगारदारांच्या सहकारी पतसंस्था | ६,८०३ |
| ४ | पणन सहकारी संस्था | १,०१५ |
| ५ | सहकारी साखर कारखाने | १६२ |
| ६ | सहकारी ग्राहक संस्था | ३,७३१ |
| ७ | सहकारी घरबांधणी संस्था | ४६,४२३ |
| ८ | सहकारी दुग्धव्यवसाय संस्था | २१.१०६ |
| ९ | सहकारी मच्छिमार संस्था | २.२५४ |
| १० | इतर | ३९.५७ |
| | एकूण | १.४०.८५८[१४] |

## क) महाराष्ट्रातील शुगल लॉबी

सहकारामध्ये महाराष्ट्र हे भारतात अग्रगण्य राज्य आहे. सहकारी संस्थांचा महाराष्ट्राच्या समाजकारण, राजकारण, अर्थकारणावर मोठा प्रभाव राहिलेला आहे. सहकारातून अनेक

राजकीय नेतृत्त्वही उदयास आलेली आहेत. महाराष्ट्राच्या राजकीय व आर्थिक प्रगतीमध्ये सहकाराचा मोठा वाटा आहे. १९६० मध्ये राज्यात १३ सहकारी साखर कारखाने होते. देशातील एकूण २५२ सहकारी साखर कारखान्यांपैकी महाराष्ट्रात १८८ सहकारी साखर कारखाने आहेत. भारतातील पहिला साखर कारखाना नगर जिल्ह्यातील प्रवरानगर येथे विठ्ठलराव विखे–पाटील यांनी स्थापन केला. महाराष्ट्रात साखर कारखान्यांचे १३ लाख सभासद असून त्यापैकी ऊस उत्पादकांची संख्या १२ लाख आहे. ११९ चालू साखर कारखान्यामध्ये अंदाजे ३,००० कोटीची गुंतवणूक आहे आणि त्यांची उलाढाल अंदाजे रूपये ५,००० कोटी आहे. सातारा, पुणे, अहमदनगर, औरंगाबाद, जालना, नाशिक, धुळे, जळगाव, सोलापूर, सांगली, कोल्हापूर या जिल्हामध्ये सहकारी व खाजगी साखर कारखाने केंद्रीत झालेले आहेत. १६००० सभासद सरासरी दर कारखान्यामागे आहेत. त्यापैकी ९३% लघू वा मोठे शेती क्षेत्र असणारे शेतकरी आहेत. सहकारी साखर कारखान्यात १०% शेतकऱ्यांचे भांडवल २५% राज्य सहकारचे व ६५% वित्तीय संस्थेचे भांडवल असते. देशातील १/३ साखर उत्पादन एकट्या महाराष्ट्रात होते. रोज २५०० टन क्षमता असणाऱ्या साखर कारखान्यात सुमारे ७०० व्यक्तींना रोजगार मिळतो. त्यातील निम्मे कायम स्वरूपी व निम्मे हंगामी स्वरूपाचे रोजगारी असतात.

केंद्र शासनाने खाजगी कारखान्यांनाही परवाने दिले त्यामुळे खाजगी व सहकारी कारखान्यामध्ये स्पर्धा सुरू आहे. खाजगी आजारी साखर कारखान्याचे सहकारीकरण करण्याचे धोरण शासनाने राबविले आहे. सहकारी संस्थानी एकत्र येऊन नव्या संस्था निर्माण करण्याचा संकल्पनाही आता रूजत आहेत. गेल्या १० वर्षात सहकारी कारखान्यांनी मोठ्या प्रमाणावर उत्पादने व कामाचे विविधीकरण केले आहे. साखर उत्पादनाबरोबर फळबागा लावणे, सुतगिरणी, गोबर गॅस, रस्ते व घर बांधणी, उपसा जलसिंचन योजना, औद्योगिक प्रकल्प, दुग्ध व्यवसाय, पशुखाद्य तयार करणे व वस्तू भांडार, कुकुटपालन, शैक्षणिक संस्था, दवाखाने आदी अशा अनेक मार्गांनी हे विविधीकरण दिसून येते.[१५]

अशाप्रकारे महाराष्ट्रामध्ये सहकारी साखर कारखान्याचे वर्चस्व वाढत गेले. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे कॉंग्रेस पक्ष व त्यांचे नेतृत्त्व अशा सहकारी संस्थाना व कारखान्यांना उत्तेजन देऊन प्रोत्साहित करत होता. त्यामुळे जितका सहकाराचा प्रचार प्रसार होत जातो तसाच प्रचार व प्रसार कॉंग्रेस पक्षाचाही वाढत गेला. शुगर लॉबी या दबाव गटाचा व कॉंग्रेस

पक्षाचा संबंध निकटचा असलेला दिसून येतो. सहकारातील विशिष्ट राजकीय घराण्यांचे सत्ता व वर्चस्व निर्माण झाल्यामुळे घराणेशाहीला बळ मिळाले. या सहकार चळवळीचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे या सर्व संस्था म्हणजे जिल्हा बँका, पतसंस्था, सहकारी साखर कारखाने, सुतगीरण्या, दुध डेअरी, दुध संघ इत्यादी संस्था या ग्रामीण भागातील सधन व बागायतदार वर्गाच्या ताब्यात आहेत आणि हे सर्व सधन व बागायतदार काँग्रेसचे नेते मंडळी होते. या चळवळीचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे या संस्थावर प्रामुख्याने मराठा समाजाचे वर्चस्व असल्याचे दिसते. हे बागायतदार बहुजन समाजातील, शोषीत, उपेक्षीत समाज घटकांना एकत्रीत करून त्यांचे सहकाराच्या माध्यमातून त्यांचे विविध प्रश्न सोडवताना दिसून येतात. त्यामुळे या सधन मराठा व्यक्तींच्या मागे बहुजन समाजाची एक मोठी ताकत निर्माण झाली. या व्यतिरिक्त धनगर, माळी, जैन, लिंगायत, दलित, ओबीसी, मुस्लिम इत्यादी अल्पसंख्याक समाजातील लोकांना हे जमीनदार नोकरी, रोजगार, कर्ज आदीच्या माध्यमातून त्यांना मदतीच्या आधारे त्यांची संघटनात्मक बांधणी करत आणि त्यांची वोट बँक म्हणून वापर करत होते. तसेच जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत, सभापती, सरपंच, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य अशा पदे देण्याचे आश्वासन देऊन त्यांना निवडून आणले जात असे. मात्र खरी सत्ता हेच बागायतदार उपभोगात असत. राजकारणातील सर्व निर्णय हेच प्रभावी व्यक्ती घेत असून निवडून आलेले अल्पसंख्यांक मागासवर्गीय सदस्य केवळ सहीचे मालक दिसतात. खरी सत्ता प्रभावी नेतृत्त्वाकडे राहिलेली असत. विविध प्रलोभनामुळे सर्वसामान्य व बहुजन वर्ग कारखानदारांकडे आकर्षीत होतो आणि त्यांच्या एकसंघ ताकतीचा उपयोग श्रीमंत मराठा वर्गाने लोकसभा व विधानसभा निवडणुकासाठी करून घेतल्याचा दिसून येतो. त्यांच्या मताच्या आधारावर हे लोक आमदार, खासदार झाले. निवडणुकांमध्ये निवडून येण्यासाठी सहकारी संस्थाचा एक प्रमुख आधार म्हणून जसा उपयोग केला जातो. तसाच या बहुजन समाजाच्या मताचाही एक आधार म्हणून उपयोग करून घेतला जातो. हे मराठा अभिजन सातत्याने बहुजन समाजाच्या मतावर अवलंबून असतात. हिच त्यांची खरी राजकीय ताकत असते. या ताकतीच्या जोरावर राजकीय पक्षास उमेदवारी देण्यास ते भाग पाडतात आणि पीढ्यान–पीढ्या ते आपल्याच घरातच व घराण्यातील इतर वंशजांना, नातेवाईकांना अध्यक्षपद, सभापती, संचालक देऊन सत्ता ते आपल्यास घरात ठेवतात. अशाच सहकारी संस्थांच्या

(साखर कारखाने, दूधसंघ, सुतगिरणी) माध्यमातून विधानसभा व लोकसभा मतदारसंघातून निवडून आलेले विविध मराठा घराणी जिल्हाप्रमाणे दर्शविणारा तक्ता पुढीलप्रमाणे.

**तक्ता क्र. १.३**

**महाराष्ट्रातील साखर सम्राट व कारखाने दर्शविणारा तक्ता**

| अ. नं. | जिल्हा | साखर कारखान्याची माहिती | साखर कारखान्याची संबंधीत असलेले आमदार, खासदार |
|---|---|---|---|
| १ | अहमदनगर | १३ | विखे–पाटील, काळे, कोल्हे, तनपुरे, पाटील, कदम, गडाख, पाचपुते, पवार, कर्डिले, जगताप, तांबे, थोरात |
| २ | धुळे | ४ | शिवाजी पाटील, पी.के.आण्णा पाटील, नाईक |
| ३ | जळगाव | ३ | बापूसाहेब पाटील, जी.टी. महाजन, बी.डी राठोड, जी. आर.सरोदे |
| ४ | नाशिक | ७ | व्यंकटराव हिरे, बी.डी. कावळे, काकासाहेब वाघ, श्रीमती पुष्पा हिरे, टि.एस.मोगल, एम. एस. दिघोळे, छगन भुजबळ |
| ५ | सातारा | ७ | यशवंतराव मोहिते, नाईक निबांळकर, लक्ष्मणराव पाटील, पी. डी. पाटील, अभयसिंहराजे भोसले, शंभूराजे देसाई, बाळासाहेब पाटील |
| ६ | सांगली | ७ | राजारामबापू पाटील, एफ. ए. नाईक, एन.आर. नाईकवडी, वसंतदादा पाटील, दिनकरराव पाटील, पतंगराव कदम |
| ७ | पुणे | ७ | थोपटे, संभाजीराव काकडे, शरद पवार, एस.एन. तावरे, ए.के. तापकीर, व्ही.बी.तुपे |
| ८ | कोल्हापूर | १३ | रत्नाप्पा कुंभार, कोरे, घोरपडे,पाटील, कलीकते, गायकवाड, देसाई, खानजिरे, आवाडे, मंडलिक, महाडिक, घाटगे |
| ९ | सोलापूर | ७ | मोहिते पाटील, महाडिक, जाधव, देवकाते, एस.एस.पाटील, परिचारक, एम. के. पाटील, बी. बी. चाकोते, आर.बी. पाटील |
| १० | औरंगाबाद | ५ | बाळासाहेब पवार, आर.जे. पाटील, एन. पी. कसाने, सी.एस.घोडके, एम. एस. पळोडकर शामराव कदम, शिवाजीराव देशमुख |
| ११ | जालना | २ | एस.ए.पडित–व्ही. वाय.अकत–ए.एस.चव्हाण |
| १२ | परभणी | ३ | एस.जी. नकाते, ए.डी. घाटगे |
| १३ | बीड | ४ | एस.पी. थोरवे, एस.ए. पंडित, बी. ए. धोंडे |

| अ. नं. | जिल्हा | साखर कारखान्याची माहिती | साखर कारखान्याची संबंधीत असलेले आमदार, खासदार |
|---|---|---|---|
| १४ | नांदेड | ३ | शंकरराव चव्हाण |
| १५ | उस्मानाबाद | २ | पद्मसिंह पाटील |
| १६ | लातूर | ३ | विलासराव देशमुख |
| १७ | बुलढाणा | १ | टी. टी. कायंडे |
| २१ | भंडारा | १ | एम. एस. शिवणकर |
| २३ | नागपूर | १ | आर. ए. देशमुख |

१६

अशा अनेक नेत्यांना सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून आमदार, खासदार होण्याची संधी मिळली सभासदांच्या पैशातून व कष्टातून उभ्या राहिलेल्या सहकारी संस्थाच्या माध्यमातून नेत्यांनी मोठ–मोठ्या शिक्षणसंस्था उभारल्या. भरमसाठ फी घेऊन प्रवेश देणाऱ्या वैद्यकिय, कॉम्युटर इंजिनिअरिंग, मॅनेजमेंट इत्यादी क्षेत्रातील महाविद्यालये निर्माण केली आणि असे लोक शिक्षणमहर्षी म्हणून ओळखले जाऊ लागले आहेत. या वेगवेगळ्या संस्थांच्या माध्यमातून करोडो रुपये या महर्षींनी गोळा केले आणि सहकारी संस्था, महाविद्यालये यामध्ये कार्यरत असणाऱ्या कामगारांचा, सभासदांचा, विद्यार्थ्यांचा, शिक्षक, प्राध्यापकांचा वोट बँक म्हणून वापर करून आमदारकी, खासदारकी, मंत्रीपदे, मिळवली आणि आपल्या मतदार संघामध्ये आपले वर्चस्व प्रस्थापीत केले. हे वर्चस्व प्रस्तापित करत असताना आपल्यापेक्षा दुसरा कोणी मतदार किंवा कार्यकर्ता मोठा होणार नाही याची मात्र त्यांनी पुरेपुर काळजी घेतलेली दिसते. विधानसभेत, लोकसभेत गेल्यानंतर आपल्या सहकारी संस्थेवर आपल्याच नात्यातील व्यक्तींना चेअरमनपदी बसवून घराणेशाही प्रस्थापीत केलेली दिसून येते.

## १.४ महाराष्ट्रातील राजकीय घराणी

सहकार चळवळींतून निर्माण झालेल्या विविध संस्थांतून महाराष्ट्रात नवीन राजकीय घराणी उदयास आली. आज महाराष्ट्राच्या राजकारणात जे राजकीय नेते सक्रीय आहेत ती बहुतांश सहकार क्षेत्रातून पुढे आलेले दिसून येतात. सहकारामुळे प्रत्येक जिल्हात आमदार, खासदार म्हणून वर्षानुवर्षे विशिष्ट घराण्यातील मंडळीच निवडून येताना दिसून येत आहेत. स्वातंत्र्यानंतर खालसा झालेल्या संस्थानानंतर राजकारणातील घराणेशाही उदयास आली. या

घराणेशाहीचा सहकार, राजकारण, शिक्षण क्षेत्रावर नेहमीच प्रभाव आणि वर्चस्व राहिले आहे. या संस्थामुळे कार्यकर्त्यांचे जाळे अधिक घट्ट व प्रभावीपणे विनले गेल्याचे दिसून येते.

सहकार क्षेत्रातील योगदानामुळे आज महाराष्ट्रामधील प्रत्येक जिल्ह्यातून घराणेशाही निर्माण झाली. या घराण्यातूनच लोकसभा व विधानसभेमधून आमदार, खासदार तर पंचायतराज संस्थामधून जिल्हा परिषद अध्यक्ष, पंचायत समिती सभापती, सरपंच इत्यादी पदावर कायम निवडून येत असल्याचे दिसते. वर्षांनुवर्षे सत्ता त्यांच्या ताब्यात असलेली दिसून येते. स्वातंत्र्यानंतर संस्थानिके खालसा झाली. परंतु राजकारणामधून लोकशाहीच्या गोंडस नावाखाली या घराण्यांनी सहकारी संस्था उभ्या करून सहकार, राजकारण, कृषी उद्योग, शिक्षण क्षेत्रावर आपला प्रभाव आणि वर्चस्व निर्माण केल्याचे दिसून येते. या माध्यमातून त्यांनी लोकांचे प्रश्न मार्गी लावत अनेक कार्यकर्त्यांचे जाळे अधिक घट्ट विणले गेल्याचे दिसते. त्यामुळे संबंधित घराण्यामधील जी व्यक्ती निवडणुकीला उभी राहते, ती निवडून येते. आज एका–एका घराण्यातील तिसरी, चौथी पिढी महाराष्ट्राच्या राजकारणात शैक्षणिक, सहकार, साखर कारखाने, औद्योगिक क्षेत्रात नेतृत्त्व करताना दिसते. एखाद्या घराण्यातील व्यक्ती खासदार असेल तर दुसरा भाऊ, मुलगा, सून किंवा पुतण्या आमदार, जि. प. अध्यक्ष, बँक किंवा साखर कारखान्याचा अध्यक्ष असतो. त्याशिवाय नात्यातील इतर व्यक्तींही त्या त्या मतदार संघामध्ये अनेक संस्थामध्ये कार्यरत असतात.[१७] या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील राजकीय घराणी कोणती, त्यांची सुरवात कोणत्या घराण्यापासून झाली याचा थोडक्यात आढावा घेण्यात आलेला आहे.

## १. विखे–पाटील घराणे

सहकारी साखर कारखानदारीचा आरंभ करणाऱ्या विखे–पाटील यांच्या घराण्यापासून महाराष्ट्रामध्ये, घराणेशाहीच्या राजकारणाला सुरुवात झाली असे म्हटले जाते. काँग्रेसच्या माध्यमातून १९७० च्या दशकामध्ये बाळासाहेब विखें–पाटलांचा राजकीय प्रवेश झाला तेंव्हापासून महाराष्ट्रामध्ये घराणेशाहीचा उदय झाला, असे मानले जाते. सहकाराची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या पद्मश्री विखेंच्या सहकाराच्या मॉडेलचा अंगीकार जितक्या तन्मयतेने महाराष्ट्राने केलेला दिसतो. तितकाच त्यांच्या कुटुंबातील वारसदारांनीही केलेला दिसतो. त्यामुळेच विखे–

पाटील घराणे सहकारापेक्षा घराणेशाहीचे मॉडेल ठरले आहे. असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

- **विठ्ठलराव विखे-पाटील**

इ. स. १८८७ च्या दशकामध्ये अहमदनगर जिल्ह्यातील लोणी गावात एका शेतकरी कुटुंबात विठ्ठलराव विखे-पाटलांचा जन्म झाला.[१८] देशातील पहिला सहकारी साखर कारखान्याची निर्मिती करणारे महाराष्ट्रातील कारखान्याचे निर्माते म्हणून महाराष्ट्रामध्ये त्यांची स्वतंत्र ओळख आहे. १९२३ च्या दशकामध्ये त्यांनी सहकाराची चळवळ अहमदनगर जिल्ह्यातील वाडी-वस्तीपर्यंत पोहचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. २३/१/१९२३ मध्ये त्यांनी लोणीबुद्रुक येथे सहकारी पतपेढी संस्थेची स्थापना करून गोणीमधील शेकडो शेतकऱ्यांचे प्रश्न मार्गी लावत अनेक सोसायट्यांची निर्मिती केली व आर्थिक प्रश्न सोडविले. आर्थिक मंदीतही त्यांनी स्वच्छ कारभार करून सोसायट्यांना 'अ' वर्ग मिळवून दिला. तर प्रवरा लेप्ट बँक कॅनॉल या कॅनॉलच्या माध्यमातून शेकडो एकर जमीनी ओलीताखाली आनत शेतकऱ्यांचे प्रश्न मार्गी लावले.[१९] परिणामी त्यांच्या प्रभावी कार्याची दखल घेवून अहमदनगर जिल्ह्यातील लोकल बोर्डाच्या निवडणुकीत अधिकृत उमेदवारी देवून त्यांना जनतेने निवडून आले ते या बोर्डाचे बरेच वर्षे उपाध्यक्षही होते. त्यांनी पुढे वैकुंठभाई मेहता व धनंजय गाडगीळ यांच्या सहकार्याने प्रवरानगर येथे सहकारी साखर कारखाना निर्माण केला. कामगारांना राहण्यासाठी कारखान्याच्या आवारातच त्यांनी घरांच्या चाळी उभ्या केल्या. कारखान्याच्या माध्यमातून त्यांनी दवाखाने, शाळा, महाविद्यालये, मेडिकल कॉलेज, बँका, उपहारगृहे, क्रिडांगण, पोस्ट, पिण्याच्या स्वच्छ पाण्याची सोय इत्यादी लोकहिताची सोय करून इ. स. १९५१ मध्ये जॉईंट फार्मिंग सोसायटीची स्थापना केली आणि प्रवरानगरमधील सर्वसामान्यांचे अनेक प्रश्न मार्गी लावले.[२०]

- **बाळासाहेब विखे-पाटील**

सहकाराची चळवळ गतीमान व विकसीत करून बाळासाहेब विखे-पाटील यांनी जिल्ह्यातील आरोग्य, शैक्षणिक व आर्थिक असे अनेक लोकांचे प्रश्न मार्गी लावले. परिणामी जिल्ह्यातील समस्त जनता त्यांच्या पाठिशी खंबीरपणे उभी राहिली. त्यांनी अशा सर्व लोकांना एकत्रित करून त्यांची संघटनात्मक बांधणी केली. या संधीचा फायदा घेत ते राजकारणात

सक्रीय झाले. त्यावेळी काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये वर्चस्व होते.[२१] काँग्रेस पक्षाने त्यांच्या प्रभावी कार्याची दखल मात्र कधीच घेतली नाही. सहकाराचा दांडगा अभ्यास व नगरच्या राजकारणावर प्रभाव असलेल्या बाळासाहेबांना केंद्रात कधीच मंत्रीपद मिळू शकले नाही. परंतु राज्यामध्ये एन.डी.ए.चे सरकारमध्ये शिवसेनेच्या माध्यमातून प्रथमच त्यांची मंत्रीमंडळामध्ये वर्णी लागली. मात्र सेनेत ते फार काळ रमले नाहीत पुन्हा ते काँग्रेसवासी झाले. राजीव गांधी यांनी १९९१ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये नगर दक्षिण या मतदार संघामधून त्यांची उमेदवारी नाकारली. मात्र त्यांनी बंडखोरी करत आपला उमदेवारी अर्ज दाखल केला आणि यशवंतराव गडाख या काँग्रेसच्या उमेदवाराने त्यांचा पराभव केला. त्यावेळी बाळासाहेब विखे–पाटील यांनी निवडणुकीतील भ्रष्टाचाराचा अवलंब गडाख यांनी केला हा मुद्दा उचलत गडाख यांच्या विरुद्ध न्यायालयात धाव घेतली. त्यांचीही राजकीय खेळी विखे पॅटर्न म्हणून ओळखली जाते.

१९६२ सालापासून विखे–पाटलांच्या घरात सत्ता आहे. १९६२ ते १९७१ ते १९९९ या दरम्यान बाळासाहेब हे कोपरगाव लोकसभा मतदार संघाचे खासदार म्हणून कार्यरत होते.[२२] पुढे १९९८–९९, २००४, २००९ या कालखंडामध्ये त्यांनी पुन्हा खासदार म्हणून नेतृत्व केले. तर २००२ मध्ये बाळासाहेब शिवसेना पक्षामधून केंदात अर्थराज्यमंत्री, अवजड उद्योगमंत्री म्हणून काम करण्याची संधीही त्यांना मिळाली. पूनर्रचनेत त्यांचा मतदारसंघ राखीव झाल्याने ते २००९ च्या निवडणुकीत उभे राहू शकले नाहीत.

- **राधाकृष्ण विखे–पाटील**

२००९ मध्ये बाळासाहेबांच्या निधनानंतर त्यांचा राजकीय वारसदार म्हणून त्यांचे पुत्र राधाकृष्ण विखे–पाटील पुढे राजकारणात सक्रीय झाले. १९९५ च्या विधानसभा निवडणुकीत ते निवडून आले. युती शासनाच्या मंत्रीमंडळामध्ये त्यांचा कृषी राज्यमंत्री म्हणून मंत्रीमंडळामध्ये समावेश झाला. पुढे २००४ काँग्रेसची सत्ता आल्यानंतर वडिलांप्रमाणे तेही पुन्हा काँग्रेसवासी झाले. नगर जिल्ह्याच्या राजकारणावर सातत्याने आपले वर्चस्व प्रस्तावित केलेल्या राधाकृष्ण विखे–पाटील यांना अशोकराव चव्हाण यांच्या मंत्रीमंडळामध्ये परिवहन, विधी ही खाती मिळाली तर पृथ्वीराज चव्हाण सरकारामध्ये कृषी व पणन त्यांच्याकडे सोपविण्यात आली होती. शिवाय साईबाबा संस्थानचे विश्वस्थपदही त्यांच्याकडेच होते. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीवेळी

देशासाह राज्यात मोदी लाट असताना सुद्धा ते शिर्डी या मतदार संघातून पुन्हा निवडून आले. या निवडणुकीत त्यांना १,२१,४५१ मते मिळाली तर शेळके यांना ४६,७९७ मते मिळाली. राज्यात सेना, भाजप युतीचे सरकार आले. तेव्हा विधानसभेच्या विरोधीपक्ष नेतेपदी काम करण्याची संधी काँग्रेस, राष्ट्रवादी पक्षाने त्यांना दिली. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर सत्तेवर आलेल्या काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना यापक्षामध्येही ते मंत्री होते. नंतर ते भारतीय जनता पक्षात प्रवेश करून २०२२ मध्ये एकनाथ शिंदे यांच्या मंत्रीमंडळात ते महसूल मंत्री म्हणून कार्यरत असलेले दिसून येतात. एकंदरीत पक्ष कोणताही असो, महाराष्ट्राच्या राजकारणात नगर जिल्ह्यातून एक प्रभावी घराणे म्हणून विखे–पाटील घराणे सतत सत्तेच्या राजकारणात असलेले दिसते.

- **शालीनीताई विखे–पाटील**

कोणत्याही परिस्थितीमध्ये सत्ता घरातच राहिली पाहिजे, म्हणून राधाकृष्ण विखे–पाटील यांनी आपली पत्नी शालीनीताई यांना राजकारणात सक्रीय केले. २०१७ मध्ये झालेल्या जिल्हा परिषद निवडणुकीमध्ये त्यांना उमेदवारी देऊन निवडून आणले आणि त्यांच्याकडे नगर जिल्हा परिषदेच्या उपाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविली. [२३]

- **सुजय विखे–पाटील**

सुजय विखे–पाटलांच्या रुपाने या घराण्यातील चौथी पिढी राजकारणात सक्रीय असलेली दिसते. वडिल विरोधी पक्षनेते असताना सुद्धा डॉ. सुजय यांनी नगर लोकसभा मतदार संघातून काँग्रेसपक्षाकडे उमदेवारीची मागणी केली. या मागणीला त्यांच्या वडिलांचाही छुपा पाठिंबा होता. परंतु काँग्रेसने त्यांची मागणी मान्य केली नाही. त्यांनी राष्ट्रवादीकडून लढावे असाही सूर त्यावेळी होता. परंतु त्यांना ना काँग्रेसने उमदेवारी दिली ना राष्ट्रवादीने, त्यामुळे डॉ. सुजय विखे–पाटलांनी भाजपमध्ये प्रवेश करून २०१९ मध्ये भारतीय जनता पक्षाकडून नगर लोकसभा मतदार संघातून निवडणूक लढविली व जिंकली. त्यानंतर त्यांचे वडील राधाकृष्ण विखे–पाटील भाजपमध्ये सहभागी झाले. त्यांनी काँग्रेस पक्षाचा आणि विरोधी पक्षनेतेपदाचा राजीनामा दिला.[२४]

## २. थोरात घराणे

- **भाऊसाहेब थोरात**

अहमदनगर जिल्ह्यातून सहकार क्षेत्राच्या माध्यमातून उदयास आलेले दुसरे घराणे म्हणजे थोरात घराणे होय. भाऊसाहेब थोरात हे या घराण्याचे मुळपुरुष त्यांनी संगमनेर भागात सहकारी साखर कारखान्याची निर्मिती करून त्या माध्यमातून त्यांनी आपल्या मतदारसंघामध्ये शिक्षण संस्था, दुग्ध संस्था, सहकारी संघ अशा अनेक संस्था उभ्या केल्या.[२५] त्यामुळे नगर जिल्ह्यातील हजारो तरुणांच्या शिक्षणाचा व रोजगाराचा प्रश्न मार्गी लागला. हजारो शेतकऱ्यांचे प्रश्न सुटण्यास मदत झाली. परिणामी नगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांसह सर्वसामान्य जनता संघटीत होऊन भाऊसाहेब थोरात यांच्या पाठिमागे राहिली. सहकार क्षेत्रासह शिक्षण क्षेत्रातील प्रभावी सकार्यामुळे थोरात घराण्याचे नगरसह राज्याच्या राजकारणातही मोठा प्रभाव निर्माण झाला. असे असले तरी भाऊसाहेब हे एक वेळ आमदार म्हणून निवडून आले. हा अपवाद वगळता नंतर त्यांनी राजकारणात फारसा रस दाखविला नाही. त्यांचे चिरंजिव बाळासाहेब थोरात यांनी मात्र या संघटीत शक्तीचा फायदा उठवत ते राजकारणात सक्रीय झाले.

- **बाळासाहेब थोरात**

बाळासाहेब थोरात हे सध्या भाऊसाहेबांचा राजकीय वारसा चालवत आहेत. १९८५ मध्ये विधानसभेची निवडूक जिंकून बाळासाहेबांनी आपल्या राजकीय प्रवासास सुरुवात केली तेव्हापासून ते २०१९ पर्यंत सातत्याने विधानसभेवर निवडून येत आहेत. त्यांच्या सहकार क्षेत्रातील साम्राज्यापुढे त्यांचे राजकीय विरोधक निष्क्रीय ठरले आहेत. केवळ संगमनेरच नव्हे तर शेजारील शिर्डी, अकोला या मतदार संघावरही त्यांचा प्रभाव आहे. या दोन मतदार संघामधून कोणाला आमदार करायचे व कोणाला पाडायचे हे ठरविण्याइतपत त्यांचा राजकीय दबदबा आहे. अशा या बाळासाहेब थोरात यांनी राज्याच्या मंत्री मंडळामध्ये अनेकवेळा महत्त्वाच्या खात्याची जबाबदारी समर्थपणे संभाळलेली आहे. अशोकराव चव्हाण यांच्या मंत्री मंडळामध्ये कृषी व शिक्षण तर पृथ्वीराज चव्हाण यांच्या मंत्री मंडळामध्ये कृषी व शिक्षण तर उद्धव ठाकरे यांच्या मंत्री मंडळामध्ये महसूल खाते यांची जबाबदारी त्यांच्यावर सोपविली होती.

■ **सुधीर तांबे** (भाऊसाहेब थोरातांचे जावई) : सुधीर तांबे भाऊसाहेबांचे जावई हे संगमनेरचे नगराध्यक्ष होते. शिवाय ते नाशिक पदवीधर मतदारसंघातून विधानपरिषदेवर निवडून आले.

■ **दुर्गा तांबे :** सुधीर तांबे यांच्या पत्नीही राजकारणात सक्रीय असून त्या संगमनेरच्या नगराध्यक्षा होत्या.

■ **सत्यजित तांबे :** सत्यजित तांबे दुर्गा तांबेचे चिरंजीव हे सुद्धा राजकारणामध्ये सक्रीय असून नगर जिल्हा परिषदेचे जि. प. सदस्य होते. राज्य युवक काँग्रेस अध्यक्षपदही त्यांना काम करण्याची संधी मिळाली. सध्या ते नाशिक पदवीधर मतदार संघातून आमदार म्हणून विधान परिषदेवर निवडून आले आहेत.

■ **टी–पी. कडू–पाटील** (भाऊसाहेबांचे व्याही) : टि. पी. कडू –पाटील हे राहूरीचे आमदार म्हणून निवडून आले होते.

■ **अरुण कडू–पाटील** (भाऊसाहेबांचे जावई) : हे नगर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष होते.

■ **आण्णासाहेब शिंदे** (भाऊसाहेबांचे मेहूणे) : आण्णासाहेब शिंदे यांनी दोन वेळा खासदारकी मिळविली असून त्यांनी केंद्रीय मंत्रीमंडळामध्ये कृषीराज्यमंत्री म्हणून काम केलेले आहे. देशाच्या हरितक्रांतीत त्यांचे फार मोठे योगदान आहे. तसेच ते राज्य नियोजन मंडळाचेही अध्यक्ष होते.[२६]

■ **गुलाबराव शेळके :** गुलाबराव हे भाऊसाहेबांचे नातेवाईक असून त्यांनी महानगर बँक मुंबई–पारनेर. व जिल्हा बँकेचे अध्यक्षपदही भूषविले होते. लोकसभेची निवडणूकही त्यांनी लढविली होती. नेवासाचे यशवंतराव गडाख हे त्यांचे नातेवाईक आहेत. त्यांचेही नगर जिल्ह्याच्या राजकारणावर वर्चस्व आहे.

■ **शंकरराव गडाख :** शंकरराव गडाख हे यशवंतराव गडाखांचे चिरंजीव हे राजकारणात सक्रीय होते. ते नेवासा मतदार संघातून आमदार म्हणून निवडून आले होते.

■ **आप्पासाहेब राजळे** (भाऊसाहेब थोरातांचे जावई) : आप्पासाहेब राजळे हे १९९०–१९९५ मध्ये पाथर्डी–शेगाव विधानसभा मतदार संघातून निवडून आले होते. परंतु १९८५ मध्ये बबनराव ढाकने यांनी त्यांचा विधानसभेला पराभव केला होता. युवक काँग्रेसच्या माध्यमतून

आप्पासाहेब राजळे यांनी आपला राजकीय प्रवास सुरू केला होता. त्यांनी नगर जिल्हा परिषदेत बांधकाम समितीचे सभापती म्हणूनही काम पाहिले होते. अदिवासी लोकांच्यासाठी त्यांनी चांगले काम केले होते. ते पशुधन वाढीसाठी सातत्याने प्रयत्न करीत होते. एकेकाळी तनपुरे सहकारी साखर कारखान्यात सहाय्यक अभियंता असलेल्या राजळे यांनी बृद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याची निर्मिती केली. स्थापनेपासूनच ते या कारभारावर वर्चस्व प्रस्तापित करून रहिले.

- **राजीव राजळे :** आप्पासाहेब राजळे यांचे राजीव राजळे हे चिरंजीव १९८५ मध्ये बबनराव ढाकणे यांनी त्यांच्या वडिलांचा पराभव केला होता ती सल मनामध्ये ठेवून २००४ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये राजीव यांनी बबनराव यांचा दारुण पराभव केला. त्यापूर्वी मात्र १९९९ मध्ये विधानसभा निवडणुकीत त्यांचा पराभव झाला होता.

- **मोनिका राजळे :** सन २००४ मध्ये झालेल्या नगर दक्षिण लोकसभा मतदार संघामध्ये राजीव राजळे यांचा भाजपच्या दिलीप गांधी यांनी पराभव केला होता. परंतु विधानसभा निवडणुकीमध्ये राजळे यांच्या पत्नी मोनिका राजळे या शेगाव विधानसभा मतदार संघामधून भाजपच्या तिकीटावर निवडून आल्या. काँग्रेस पक्षाचे बलाढ्य नेते चंद्रशेखर घुले यांचा त्यांनी पराभव केला. मोनिका यांना १,३४,६८५ मते मिळाली. तर धुळे यांना ८१,५०० इतकी मते मिळाली.

- **राहुल राजळे :** हे राजीव राजळे यांचे बंधू ते नगरच्याराजकारणामध्ये सक्रीय असून ते नगर जिल्हा परिषदेवर निवडून आले होते. [२७]

## ३. गडाख घराणे

- **यशवंतराव गडाख :** पंचायत समिती सदस्य पदापासून यशवंतराव गडाख यांनी आपला राजकीय प्रवास सुरू केला. नेवासा पंचायत समितीवर ते १९६७ मध्ये निवडून आले. पंचायत समितीचे सभापती म्हणून ही त्यांनी काम केले. पुढे १९७२ ते ७८ च्या कालखंडामध्ये ते नगर जिल्हा परिषदेचे उपाध्यक्षपदी होते तर १९८४ ते ८९, ८९ ते ९१, ९१ ते ९३ मध्ये ते नगर दक्षिणचे खासदार म्हणून निवडून आले होते. हे नेतृत्त्व त्यांनी काँग्रेस पक्षाच्या अधिकृत उमेदवारीवर केले होते. १९९१ ची लोकसभा चांगलीच चर्चेत राहिली. बाळासाहेब विखे–पाटील

यांना राजीव गांधींनी लोकसभेची उमेदवारी नाकारल्याने विखे–पाटील यांनी बंडखोरी केली. या निवडणूकीत गडाखांनी विखेंचा पराभव केला. परंतु निवडणूकीत भ्रष्ट मार्गाचा अवलंब केला म्हणून विखे उच्च न्यायालयात गेले. परिणामी गडाखांची निवड रद्द करून त्यांचा मताधिकार सुद्धा रद्द केला. पुढे १९९७ ते २००३, २००३ ते २००९ या कालखंडामध्ये ते विधान परिषदेचे सदस्य म्हणून कार्यरत होते.[२८] तसेच साहित्यिक म्हणूनही गडाखांची ओळख आहे. अर्धविराम हे त्यांचे पुस्तक लोकप्रिय व प्रसिद्ध आहे.

- **शंकरराव गडाख** (मुलगा) : शंकरराव गडाखांना राजकारणात सक्रीय करण्यासाठी त्यांच्या वडीलांनी यशवंतरावांनी २००९ च्या लोकसभा निवडणूकीच्या तोंडावर शंकररावांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करावयास भाग पाडले. काँग्रेसचे विश्वासू असलेल्या गडाख घराण्याने सत्तेसाठी राष्ट्रवादीशी घरोबा केला आणि २००९ च्या विधानसभा निवडणुकीतून निवडून येऊन शंकरराव आमदार झाले. त्यांनी भाजपच्या लंगे याचा पराभव केला. गडाख घराण्याची मुळा सहकारी साखर कारखाना व मुळा शिक्षण समुहांवर एक हाती सत्ता व वर्चस्व असून गडाख यांची शंकररावांच्या रूपाने दुसरी पिढी राजकारणात सक्रीय आहे.

## ४. काळे घराणे

- **शंकरराव काळे :** काळे–कोल्हे हे अहमदनगर जिल्ह्यातील तिसरे राजकीय घराणे म्हणून ओळखले जाते. या घराण्यातील शंकरराव काळे यांनी शेकाप पक्षामधून आपल्या राजकीय प्रवासाची सुरवात केली. १९५२ च्या विधानसभा निवडणुकीत काळे यांच्या प्रचाराची संपूर्ण जबाबदारी कोल्हे यांनी सांभाळली होती. काळे यांनी नगर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष म्हणूनही काम पाहिले, तसेच ते १९७२ मध्ये पारनेर विधानसभा मतदार संघातून आमदार म्हणून निवडून आले. काळे व कोल्हे हे दोघेही १९७२ ते १९८० या दरम्यान आमदार म्हणून निवडून आले होते. त्यानंतर म्हणजे १९८० पासून या दोघांमध्ये संघर्ष होऊन कोल्हे यांनी बाजी मारत, १९८९ मध्ये संभाजीराव काळे यांचा तर १९९९ मध्ये शंकररावांचे चिरंजीव अशोक काळे यांचा पराभव केला. शंकररावांना खासदार म्हणून व राज्यमंत्री मंडळामध्ये शिक्षण व सहकार खात्याचे मंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळाली.

## ५. कोल्हे घराणे

- **शंकरराव कोल्हे :** येसगावच्या सरपंच पदापासून त्यांनी आपला राजकीय प्रवास सुरू केला आणि पुढे १९७२ ते २००४ या कालखंडामध्ये त्यांना विधानसभेचे आमदार म्हणून नेतृत्त्व करण्याची संधी त्यांना मिळाली. एवढेच नव्हे तर राज्य मंत्रीमंडळामध्ये महसूल, परिवहन या खात्याचे मंत्री म्हणून त्यांची वर्णी लागली, तर सहकार क्षेत्रातील संजीवनी राज्य साखर संघाचे अध्यक्षपद त्यांच्याकडेच होते.

- **विपीन कोल्हे** (शंकररावाचे चिरंजीव) : विपीन कोल्हे शंकररावाचे चिरंजीव यांनी संजीवनी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन म्हणून आपल्या राजकीय प्रवासाची सुरवात केली. नगर जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष व जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष पदी काम करण्याची संधी त्यांना मिळाली. अशोक काळेकडून विपीन यांना २००४ व २००९ च्या विधानसभा निवडणूकीत पराभवाचा सामना करावा लागला.

- **वसंतराव पवार** (शंकरराव कोल्हे यांचे जावई) : विधानपरिषद सदस्य व नाशिकचे खासदार म्हणून वसंतराव पवार हे राजकारणात सक्रीय होते.

- **सुशिला शंकर काळे** (पत्नी) : शंकरराव काळे यांच्या पत्नी सुशिलाबाई या जिल्हा बँकेच्या तर स्नुषा पुष्पाताई या जिल्हा बँक व गौतम बँकेच्या संचालिका होत्या.

- **अशोक शंकर काळे :** शंकररावांचे राजकीय वारसदार म्हणून अशोकराव काळे हे राजकारणामध्ये सक्रीय होत आहेत. अशोकरावांनी २००४ व २००९ या दोन विधानसभा लढविल्या आणि जिंकल्या सुद्धा बिपीन कोल्हे यांना त्यांनी दोन वेळा पराभव केला. सहकार क्षेत्रातील सहमतीचे राजकारण करून आपआपली संस्थाने सुरक्षित ठेवणाऱ्या काळे–कोल्हे घराण्यातील राजकीय संघर्ष आज दुसऱ्या पिढीत ही तसाच कायम असलेला पहावयास मिळतो. विधानसभेत कट्टर विरोध आणि सहकार क्षेत्रात मात्र समझोत्याचे राजकारण हा त्यांच्यातील सत्तासंघर्ष भल्या–भल्यांना चक्रावून टाकणारा आहे.[२९]

## ६. घुले–पाटील घराणे

घुले–पाटील हे अहमदनगर जिल्ह्यातील चौथे राजकीय घराणे महाराष्ट्र राज्यामध्ये प्रसिद्ध आहे. राजकारणाचा अड्डा समजल्या जाणाऱ्या अहमदनगर जिल्ह्यातील विखे–पाटील

काळे–कोल्हे, गडाख, थोरात, तनपुरे याप्रमाणेच शेगावचे घुले–पाटील यांनीही राजकारणामध्ये आपली दुसरी पिढी उतरवून घराणेशाही चालू ठेवली आहे.

- **मारुतराव घुले–पाटील :** मारुतराव घुले–पाटील यांनी ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याची निर्मिती करून नेवासा, शेगाव परिसरातील तरुण कार्यकर्त्यांची एक मजबुत फळी उभी केली आहे. या माध्यमातून त्यांनी अनेक शेतकऱ्यांचे व सर्वसामान्य जनतेचे, तरुणांचे रोजगाराचे प्रश्न मार्गी लावत त्यांची संघटनात्मक बांधणी केली. या आधारावर ते १९६२ साली महाराष्ट्र विधानसभेवर आमदार म्हणून निवडून आले. नंतरच्या कालखंडामध्ये मात्र त्यांना अपयश आल्याचे दिसते. परंतु नगर जिल्हा मध्यवर्ती बँक व ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना या माध्यमातून त्यांनी मतदार संघावर सातत्याने वर्चस्व ठेवले आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांची ही मजबुत फळी न फुटता अधिक मजबुत करण्यात त्यांना यश आल्याचे दिसते. याचा फायदा त्यांना त्यांचे राजकीय वारसदार, त्यांचे पुत्र नरेंद्र घुले–पाटील यांना झाला.[३०]

- **नरेंद्र घुले–पाटील :** मारुतराव घुले–पाटील यांचे चिरंजीव हे उच्चशिक्षीत असून त्यांनी जिल्हा बँकेच्या माध्यमातून राजकारणात प्रवेश केला. सन १९९२ मध्ये झालेल्या जिल्हा परिषदेमधून ते नगर जिल्हा परिषदेवर निवडून आले होते. त्यांनी कृषी व पशुसंवर्धन समितीचे सभापती म्हणून चांगल्या प्रकारे काम केले. पुढे १९९९ च्या विधानसभा निवडणूक लढवून ते आमदार झाले. २००४ ची निवडणूक देखील त्यांनी जिंकली. राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटलांचे नरेंद्र हे मेव्हणे आहेत तर तनपुरे साडू आहेत.

- **चंद्रशेखर घुले–पाटील :** चंद्रशेखर हे मारुतरावांचे दुसरे चिरंजीव. त्यांचा राजकीय वारसदार म्हणून राजकारणात सक्रीय आहेत. साखर संघाचे व ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन म्हणून त्यांनी प्रतिनिधीत्व केले आहे. २००९ मध्ये झालेल्या पुर्नरचीत पाथर्डी मतदार संघामधून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अधिकृत उमेदवारीवर त्यांना विधानसभेचे प्रतिनिधित्त्व करण्याची संधी मिळाली. पुढे २०१४ च्या विधानसभेमध्ये भाजपच्या मोनिका राजळेंनी त्यांचा पराभव केला. राजळे यांना १,३४,६५८ मते मिळाली तर घुले–पाटील यांना ८१,५०० मते मिळाली.

## ७. तनपुरे घराणे

सहकाराच्या माध्यमातून मतदार संघावर वर्चस्व निर्माण करून दिर्घकाळ आमदारकी व कारखाना, विविध सहकारी संस्था यांच्या माध्यमातून अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यात तनपुरे हे प्रभावी घराणे निर्माण झाले.

- **बाबुराव तनपुरे :** राहुरी साखर कारखान्याच्या माध्यमातून व सहकारी विविध वितरण संस्था ही आशिया खंडातील एकमेव संस्था निर्माण करून विविध सहकारी संस्थांच्या स्थापनेच्या माध्यमातून व मुळा धरण, राहुरी कृषी विद्यापीठ स्थापनेत सिंहाचा वाटा असलेले बाबुराव तनपुरे हे एक प्रभावी व्यक्तीमत्व. ते नगर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष होते. १९६२ ते १९७२ पर्यंत राहुरी विधानसभा मतदार संघाचे आमदार म्हणूनही कार्यरत होते. त्यांचा राहुरी मतदार संघावर प्रभाव होता. त्यांच्या नंतर त्यांचे वारस म्हणून प्रसाद तनपुरे कार्य करू लागले.[३१]

- **प्रसाद तनपुरे :** बाबुराव तनपुरे या आपल्या वडिलांचा राजकिय वारसा प्रसाद तनपुरे यांनी पुढे चालविला. सहकारी संस्था, साखर कारखाना यांच्या माध्यमातून जनसामान्यात आपली वेगळी ओळख निर्माण केली. ते १९८० ते १९९५ पर्यंत चार वेळा राहुरी मतदार संघामधून विधानसभेवर आमदार म्हणून गेले. तर १९९८ च्या अल्पकाळ ठरलेल्या लोकसभेवर निवडून गेले होते. पुढे १९९९ च्या विधानसभा निवडणुकीत ते निवडून आले पण २००४ व २००९ च्या विधानसभेच्या निवडणूकीमध्ये त्यांना पराभवास सामोरे जावे जागले. [३२]

- **डॉ. उषा तनपुरे :** डॉ. उषा तनपुरे ह्या प्रसाद तनपुरेंच्या पत्नी असून पश्चिम महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्याचे भाग्यविधाते व स्वातंत्र्य चळवळीतील आणि महाराष्ट्राच्या राजकारणातील प्रभावी नेते राजारामबापू पाटील यांच्या कन्या असून सध्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या त्या भगिनी होत. त्या सहकारी संस्थेच्या माध्यमातून समाजकारण व राजकारणात सक्रिय असून त्यांनी राहुरी नगरपालिकेचे नगराध्यक्षपद ही भूषविले आहे.

- **प्राजक्त तनपुरे :** प्राजक्त तनपुरे ह्या बाबुराव तनपुरे यांच्या नातू असून ते राजकारण व समाजकारणात सक्रिय आहेत. त्यांनी खाजगी सहकारी साखर कारखाना उभारून तालुक्याच्या

विकासात एक वेगळे स्थान निर्माण केले आहे. वरील अभ्यासावरून असे दिसते की, नगर जिल्हा हा सहकाराचा केंद्रबिंदू असून खऱ्या अर्थाने सहकाराची मुहुर्तमेढ पद्मश्री विठ्ठलराव विखे–पाटील यांच्या प्रवरा सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून झालेली दिसते. विठ्ठलराव विखे–पाटलांच्या सहकारी संस्थांच्या निर्मितीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यामध्ये नेतृत्त्वाने सहकारी साखर कारखाने व विविध सहकारी संस्था निर्माण केल्या. नगर जिल्ह्याचा विचार करता विठ्ठलराव विखे–पाटील, भाऊसाहेब थोरात, यशवंतराव गडाख, शंकरराव कोल्हे, शंकरराव काळे, तनपुरे इत्यादींच्या नेतृत्त्वामुळे सहकार चळवळ गतिमान झालेली दिसते.[३३] सर्वसामान्य समाज, शेतकरी यांच्या विकासासाठी शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक संस्था निर्माण करण्याचे काम या नेतृत्वाने केले.

पहिल्या पिढीच्या नेतृत्वानंतर उदयास आलेल्या दुसऱ्या पिढीच्या नेतृत्वाने काळानुरूप बदल करत दूध संघ, सहकारी बँका, इंजिनियरींग कॉलेज, मेडिकल कॉलेज इत्यादी नवसंस्था निर्माण केल्या. याचा परिणाम मतदार संघातील सर्वसामान्य लोकांना रोजगार उपलब्ध झाला. आर्थिक उन्नती झाली त्याबरोबर ही जनता या नवनेतृत्वाच्या मागे प्रभावी पणे उभी राहिली. या संस्थांच्या निर्मितीने राजकिय वारसा स्थिर होत गेला. भाऊ, मुलगा, सून, नातू, जावई असे राजकिय वारस निर्माण झाले. अशाप्रकारे राजकिय घराणेशाही नगर जिल्ह्यामध्ये स्थिर होत गेली. महाराष्ट्राच्या राजकारणाचा विचार करता व पश्चिम महाराष्ट्राचे अवलोकन करता प्रत्येक जिल्ह्यामध्ये सहकारी संस्थांच्या माध्यमातून राजकिय घराणे उदयास येऊन या घराण्यांनी आपला प्रभाव मतदार संघावर निर्माण केलेला दिसतो.

## ८. पिचड घराणे

नगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील राजकारण्यांना शह देत मधुकर पिचड यांनी नगर जिल्ह्याच्या नव्हे तर महाराष्ट्र राज्याच्या राजकारणामध्ये देखील आपले राजकीय वर्चस्व प्रस्थापित केलेले आहे. नगर जिल्ह्यातील साखर सम्राटांचा जिल्ह्यामध्ये त्यांनी आपली स्वतंत्र राजकीय ओळख निर्माण केली. त्यांनी आपल्या राजकीय प्रवासाला जिल्हा परिषदेच्या सदस्य पदापासून सुरुवात केली. १९७७ मध्ये ते पंचायत समितीचे सभापती झाले. त्यानंतर १९८० मध्ये पहिल्यांदा ते विधानसभेवर निवडून गेले. १९८५ मध्ये कृषी रोजगार आदिवासी विकास दुग्ध विकास व पशुसंवर्धन या खात्याचे मंत्रीपद देखील त्यांनी संभाळलेले आहे. कॉंग्रेस व

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून त्यांनी दीर्घकाळ आदिवासी विकास मंत्रीपद संभाळले. २०१९ मध्ये त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. पण पुत्र वैभव पिचड यांना भाजपने तिकीट देऊनसुद्धा राष्ट्रवादी काँग्रेसच्या नवख्या उमेदवाराकडून त्यांचा पराभव झाला. पुढे साखर कारखान्यामध्ये सुद्धा त्यांचा पराभव झाला. पिचड हे आपल्या मतदारसंघापुरते सिमित राहून कार्य करताना दिसतात.

## ९. आदिक घराणे

अत्यंत गरीब कुटुंबामध्ये श्रीरामपूर तालुक्यातील उंदीरगाव या ठिकाणी जन्मलेल्या रामराव आदिक यांनी काँग्रेसच्या माध्यमातून राजकारणामध्ये प्रवेश केला. ते विधान परिषदेवर निवडून गेले आणि बरेच काळ प्रतिनिधित्व केले. रामराव आधिक हे अतिशय अभ्यासू व्यक्तिमत्व असल्यामुळे त्यांनी पाटबंधारे समाजकल्याण आदिवासी कल्याण यासारख्या खात्यांचे मंत्रीपद देखील सांभाळलेले आहे. राज्य मंत्रिमंडळामध्ये काही काळ त्यांनी अर्थमंत्रीपदी देखील काम केलेले आहे. त्यांनी आपल्या कार्याची छाप महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये सोडलेली दिसते. तसेच १९८३ ते १९८५ या कालखंडामध्ये ते महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री म्हणून देखील राहिले आहेत. [३४]

- **गोविंदराव आदिक :** गोविंदराव आदिक हे रामराव आदिक यांचेच बंधू होय. ते देखील राजकारणामध्ये सक्रिय आहेत. १९७२ मध्ये ते सर्वप्रथम विधानसभेवर निवडून आले. १९७८ मध्ये ते पुन्हा विधानसभेवर निवडून आले. तत्कालिन मुख्यमंत्री शरद पवार यांच्या नेतृत्त्वाखाली पुलोद सरकारमध्ये त्यांना कॅबिनेट मंत्री होण्याचा मान मिळाला. पाटबंधारे, विधी जनसंपर्क खात्यांचे मंत्रीपद देखील त्यांनी भूषविले. १९८०–८५ मध्ये ते चौथ्यांदा विधानसभेवर निवडून गेले. रामराव आदिक हे दिर्घकाळ काँग्रेसमध्ये मंत्रीपदी कार्यरत होते. तर गोविंदराव आदिक हे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या फुटीनंतर काँग्रेसचे अध्यक्षपद सांभाळले. नंतर ते राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सहभागी झाले व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून ते राज्यसभेवर निवडून गेले.

## १०. ठाकरे घराणे

साधारणः १९७० च्या दशकात राज्यात काँग्रेस विरोधी राजकारण प्रभावी होत गेले. या काँग्रेस विरोधी लाटेतून राज्याच्या राजकारणात. काही नवीन घराणी उदयायास येत गेली. यापैकी सर्वांत प्रभावशाली घराणे म्हणजे बाळासाहेब ठाकरे यांचे घराणे. बाळासाहेबांच्या नंतर

उद्धव व राज ठाकरे यांच्यारुपाने दुसरी पिढी तर आदित्य आणि अमित यांच्या रुपाने तसरी पुढीलराकारणात सक्रीय असलेली दिसते.

- **बाळासाहेब ठाकरे :** बाळ केशव ठाकरे ऊर्फ बाळासाहेब ठाकरे (२३ जानेवारी १९२६) हे महाराष्ट्रातील शिवसेना पक्षाचे संस्थापक होते. महाराष्ट्रातील राजकारणात दबदबा असणारे ठाकरे एक व्यंगचित्रकार होते. ठाकरे 'सामना' या मराठी दैनिकाचे मुख्य संस्थापक–संपादक होते. जानेवारी, १९२७ मध्ये प्रबोधनाची परंपरा असणाऱ्या घरात, पुणे येथे बाळासाहेब ठाकरे यांचा जन्म झाला. बाळासाहेब ठाकरे यांनी मुंबई येथे १९ जून १९६६ रोजी 'शिवसेना' या राजकीय पक्षाची स्थापना केली.[३५] २३ जानेवारी १९८९ रोजी मध्यरात्री शिवसेनेचे मुखपत्र 'सामना' दादर येथील स्वातंत्र्यवीर सावरकर स्मारकात सुरू झाले. मोठ्या थाटामाटात शिवसेनाप्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे यांच्या शुभहस्ते 'सामना'चे प्रकाशन केले गेले.

१९९२ च्या मुंबई दंगलीनंतर बाळासाहेब ठाकरे यांनी मुस्लिम विरोधी आणि हिंदुत्त्वावर आधारित भूमिका घेतली. शिवसेने पुढीलकाळात भारतीय जनता पक्षाशी युती केली. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब व भारतीय जनता पक्ष्याचे दिवंगत नेते प्रमोद महाजन यांच्या मुत्सद्दीपणातून शिवसेना – भा.ज.प.युती आकाराला आली. पुढे प्रामुख्याने शिवसेनाप्रमुखांच्या झंझावाती सभां, दौरे यामुळे १९९५ मध्ये शिवसेना – भारतीय जनता पार्टीचे सरकार महाराष्ट्रात स्थापन झाले आणि मनोहर जोशी हे शिवसेनेचे पहिले मुख्यमंत्री बनले.[३६] हे महाराष्ट्रातील खऱ्या अर्थाने पहिले काँग्रेसेत्त्तर सरकार होते. २८ जुलै १९९० रोजी बाळासाहेब ठाकरे यांना ११ डिसेंबर १९९९ ते १० डिसेंबर २००५ पर्यंत सहा वर्षांसाठी कोणत्याही निवडणुकीत मतदान करण्यास आणि लढवण्यास बंदी घालण्यात आली होती. हिंदुत्त्व या मुद्यांबाबतही बाळासाहेबांनी आपले विचार रोखठोकपणे मांडले. बॉबस्फोट, देशविघातक कृत्ये घडवणाऱ्या धर्मांधांना या देशात राहण्याचा अधिकार नाही. मतपेटीचे राजकारण करत अशा मुस्लिमांचे लांगुलचालन कोणी करू नये. भारताला आपला देश मानणाऱ्या राष्ट्रवादी मुस्लीम लोकांना आपला कोणत्याही प्रकारचा विरोध नाही.[३७] असे स्पष्ट विचार त्यांनी शिवसैनिकांसमोर व जनतेसमोर मांडले होते. या स्पष्ट व रोखठोक भूमिकेमुळेच हिंदुहृदयसम्राट ही त्यांना प्राप्त झालेली उपाधी सार्थ ठरते.

१७ नोव्हेंबर २०१२ रोजी त्यांचे निधन झाले.[३८] मुंबई शिवाजी पार्क येथे राजकीय सन्मानाने त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

- **उद्धव ठाकरे :** उद्धव यांचा जन्म २७ जुलै १९६० रोजी चांद्रसेनीय कायस्थ प्रभू कुटुंबात झाला होता. २००३ च्या महाबळेश्वर येथील पक्षाच्या कार्यकारिणी परिषदेमध्ये पक्षाने त्यांच्याकडे कार्याध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली.[३९] त्यानंतर २००४ मध्ये त्यांना शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी आपला उत्तराधिकारी म्हणून घोषित केले. गेल्या अनेक दशकांपासून मराठी माणूस, शेतकरी, कष्टकरी जनतेच्या कल्याणासाठी कार्यरत असलेल्या उद्धव ठाकरे यांना त्यांचे वडील शिवसेनेचे संस्थापक स्व. बाळासाहेब ठाकरे, आई स्व. मीनाताई आणि आजोबा प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे यांचा समृद्ध वारसा लाभला आहे. शिवसेना प्रमुख स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांनी पायाभरणी केलेल्या आणि शिवसेनेचे मुखपत्र असलेल्या दैनिक सामनाचे मुख्य संपादक व शिवसेना पक्षाचे अध्यक्षपदाची यशस्वीरित्या धुरा धुरा उद्धव ठाकरे सांभाळत आहेत.

२००७ च्या मुंबई महानगरपालिका निवडणुकीचे प्रचारप्रमुख म्हणून जबाबदारी आणि विजयाचे शिल्पकार. महाराष्ट्रात पक्षविस्तार केल्याने लोकसभा, विधानसभा निवडणुकांमध्ये शिवसेनेला यश. २०१४ ते २०१९ या पाच वर्षांत राज्यातील आणि केंद्रातील सरकारांमध्ये शिवसेना एक प्रमुख घटकपक्ष म्हणून सहभागी राहिलेला आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर शिवसेना व भाजप या पक्षामध्ये सत्तेच्या वाट्यावरून मतभेद होऊन २५ ते ३० वर्षांपासूनची दोन्ही पक्षाची युती संपूष्टात आली. मा. उद्धव ठाकरे यांनी शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस यांच्याशी युती करून महाविकास आघाडीच्या माध्यमातून महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद स्वीकारले. ते २०२२ पर्यंत यशस्वीरित्या सांभाळले. परंतु जून २०२२ मध्ये एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्त्वाखाली शिवसेनेचा गट महाविकास आघाडीमधून बाजूला जावून त्यांनी आपले परंपरागत मित्र भाजप या पक्षाशी युती करून मुख्यमंत्री पदी एकनाथ शिंदे तर उपमुख्यमंत्री पदी देवेंद्र फडणवीस यांची निवड होऊन महाराष्ट्रामध्ये नवीन सरकार सत्तेवर आले. पुढे २०२३ मध्ये यात भर पडून राष्ट्रवादी काँग्रसमध्ये फूट पडून अजित पवार यांचा गट शिंदे व फडणवीस सरकारमध्ये सामील झाला व अजित पवार यांना उपमुख्यमंत्री पद देण्यात आले. अशाप्रकारे शिवसेनेमधील फुटीनंतर राहिलेल्या आमदारांना व पक्षसंघटनेना घेऊन

आपल्या विश्वासू सहकाऱ्यांच्या आधारे उद्धव ठाकरे पुनश्चः एकदा महाराष्ट्राच्या राजकारणात शिवसेनेला पूर्वीचे स्थान मिळवून देण्याचा प्रयत्न करू लागले आहेत.

- **आदित्य ठाकरे :** आदित्य ठाकरे हे शिवसेना – संस्थापक बाळासाहेब ठाकरे यांचे नातू आणि शिवसेनेचे कार्यकारी अध्यक्ष व महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री मा.उद्धवजी ठाकरे यांचे पुत्र आहेत. २००९ च्या निवडणूक प्रचारात आदित्य प्रथम दिसून आले. पुढे २०१० साली ते युवासेनेचे अध्यक्ष म्हणून नियुक्त झाले. २०१९ साली सर्वप्रथम त्यांनी विधानसभा निवडणूक वरळी विधानसभा मतदार संघातून लढविली आणि जिंकून आले.[४०] ठाकरे परिवारातून निवडणूक लढवून जिंकणारे ते प्रथम ठाकरे सदस्य आहेत. त्यांनी NCP चे मातब्बर नेते सुरेश माने यांना ६७,४२७ मतांनी हरविले होते. आपले वडील मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या मंत्रीमंडळात आदित्य ठाकरे हे महाराष्ट्र सरकारच्या पर्यावरण, पर्यटन आणि प्रोटोकॉल खात्याचे कॅबिनेट मंत्री होते.

- **राज ठाकरे :** २००६ मध्ये राज ठाकरे शिवसेना पक्षातून बाहेर पडले. व त्यांनी महाराष्ट नवनिर्माण सेना हा पक्ष स्थापन केला. मराठी पाट्यांसाठीचं केलेलं मनसेचं आंदोलन खूप गाजलं. तसेच शिवसेनेकडून मराठीचा मुद्दा मनसेने हायजॅक केला आहे का? ही चर्चाही त्यावेळेस झाली. अबू आझमी यांनी आमदारकीची शपथ मराठीत घेतली नसल्याने मनसेचे आमदार राम कदम यांनी विधानसभेत राडा घातला होता. सुरूवातीच्याच काळात राज ठाकरे यांचा करिश्मा इतका वाढला होता की २००९ च्या विधानसभा निवडणुकीत १३ आमदार निवडून आले होते.[४१] मात्र नंतर राज ठाकरेंचा वाढलेला करिश्मा काहीसा कमी होताना दिसत आहे. त्यांना अद्याप म्हणावे तसे निवडणुकीच्या राजकारणात यश येताना दिसत नाही.

मात्र २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत मनसेचा केवळ एक आमदार निवडून आला. मनसे अध्यक्ष पक्षाला नवी उभारी देण्याच्या प्रयत्नात असतानाच २०१९ ला पुन्हा एकदा चर्चेत आले.[४२] कारण निवडणुका लागण्याच्या आधी अजित पवार, बाळासाहेब थोरात आणि राज ठाकरे यांनी संयुक्तपणे एक पत्रकार परिषद घेतली. राज ठाकरे यांनी काँग्रेस आणि राष्ट्रवादीसोबत पत्रकार परिषद घेतलेली पाहून अनेकांच्या भुवया उंचावल्या होत्या. त्यावेळी ज्या लोकसभा निवडणुका झाल्या त्यात राज ठाकरेंनी सभा घेऊन ‘लाव रे तो व्हीडिओ’ म्हणत मोदी आणि अमित शाह यांच्यावर यथेच्छ टीका केली. मात्र २०१९ मध्ये लोकसभा

निवडणुकीत भाजपला घवघवीत यश देशपातळीवर मिळालं. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर निर्माण झालेल्या शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस या महाविकास आघाडीलाही राज ठाकरे यांनी विरोध केला. आज राज ठाकरे भाजप व महाविकास आघाडी या दोन्ही आघाड्यांपासून अंतर राखून आपल्या पक्षाची वाटचाल करताना दिसतात.

## ११. देवरा घराणे

प्रसिद्ध व्यावसायिक मुरली देवरा यांनी राजकारणासह व्यावसायिक क्षेत्रांमध्ये देखील आपली वेगळीच ओळख निर्माण केलेली आहे. देवरा यांचा राजकीय प्रवास १९६८ पासून सुरू झाला. मुंबई महापालिकेचे सदस्य ते महापौर पदापर्यंत त्यांनी काम केलेले आहे. अशी त्यांच्या राजकीय प्रवासाची सुरुवात झाली. पुढे १९८२ मध्ये विधान परिषदेवर ते निवडून गेले व विविध समित्यांचे त्यांनी अध्यक्ष पद भूषविले. १९८५ मध्ये ते पहिल्यांदा लोकसभेवर निवडून गेले. २००४ च्या निवडणुकीमध्ये त्यांनी आपला राजकीय वारसदार म्हणून मिलिंद देवरा यांना पुढे आणले.

- **मिलिंद देवरा :** मिलिंद देवरा यांनी मध्य व दक्षिण मुंबई मतदार संघातून निवडणूक जिंकत राजकीय प्रवासाला सुरुवात केली. पुढे १९९०, २००४ मध्ये ते राज्यसभेवर निवडून गेले. अशा पद्धतीने ते राजकारणामध्ये सातत्याने कार्यरत राहिल्याचे दिसतात. २००६ मध्ये मनमोहनसिंगाच्या केंद्रीय मंत्रिमंडळामध्ये पेट्रोलियम खात्याचे मंत्रीपद सांभाळण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविली.

## १२. दत्त घराणे

- **सुनील दत्त :** सुप्रसिद्ध अभिनेते सुनील दत्त यांच्या पत्नी नरगीस यांच्या रूपाने दत्त घराण्याच्या राजकीय प्रवासाला सुरुवात झाली. १९८४, १९८९, १९९१, १९९९, २००४ हे मुंबई उत्तम-पश्चिम या लोकसभा मतदार संघातून पाच वेळा निवडून गेले. शांतीदूत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सुनील दत्त यांची मनमोहन सिंग मंत्रिमंडळामध्ये २००४ साली वर्णी लागली. [४३]

- **प्रिया दत्त :** सुनील दत्त यांनी आपला राजकीय वारसा म्हणून आपली कन्या प्रिया दत्त यांना राजकारणात पुढे केले. २००५ मध्ये सुनील दत्त यांच्या मृत्यूनंतर झालेल्या

पोटनिवडणुकीमध्ये काँग्रेसने प्रिया दत्त यांना उमेदवारी दिली व त्या मतदारसंघातून निवडून आल्या. पुढे २००९ च्या निवडणुकीमध्ये देखील त्या निवडून आल्या. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत त्यांचा पराभव झाला.

## १३. मुंबईचे गायकवाड घराणे

काँग्रेसचे एक निष्ठावंत कार्यकर्ते एकनाथ गायकवाड यांनी १९८५ मध्ये विधानसभा निवडणूक जिंकून आपल्या राजकीय प्रवासाला सुरुवात केली. १९९९ मध्येही ते पुन्हा निवडून आले व पुढे २००४ साली उत्तम मध्य मुंबई लोकसभा मतदार संघातून ते लोकसभेवर निवडून गेले ते लोकसभेवर निवडून गेल्यानंतर रिक्त झालेल्या विधानसभा मतदारसंघातून त्यांनी आपली मुलगी वर्षा गायकवाड यांना उमेदवारी दिली व निवडून आणले. मुंबई–दक्षिण मध्य मतदार संघातून लोकसभेवर निवडून गेले. वर्षा गायकवाड या उद्धव ठाकरे यांच्या मंत्रीमंडळात महिला व बालकल्याण मंत्री म्हणून कार्यरत होत्या. वर्षा गायकवाड यांच्या रूपाने गायकवाड घराण्याची दुसरी पिढी राजकारणामध्ये सक्रिय झाली. [४४]

## १४. भाई ठाकूर घराणे

- **भाई ठाकूर :** यांनी विरार महानगरपालिकेच्या निवडणुकीपासून आपल्या राजकीय प्रवासाला सुरुवात केली. हितेंद्र ठाकूर यांना त्यांनी १९९०, ९५, ९९ व २००४ मध्ये झालेल्या निवडणुकीमध्ये काँग्रेसच्या उमेदवारीवर निवडून आणले. तर २००९ मध्ये आपला राजकीय वारसदार म्हणून त्यांनी क्षितिज ठाकूर यांना पुढे आणले. २००४ च्या निवडणुकीमध्ये क्षितिज ठाकूर हे निवडून आले त्यांच्या रूपाने ठाकूर घराण्याची चौथी पिढी राजकारणामध्ये सक्रिय असल्याचे दिसते.

## १५. नाईक घराणे

- **गणेश नाईक** : नवी मुंबईच्या राजकारणावर जबरदस्त पकड असणारे राजकीय नेते म्हणून गणेश नाईक यांना ओळखले जाते. १९८५ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीपासून त्यांनी आपल्या राजकीय प्रवासास सुरुवात केली. १९८९ ते १९९५ मध्ये ते सलग निवडून गेले युतीच्या सरकारमध्ये त्यांना मंत्रीपदी काम करण्याची संधी देखील मिळाली.

- **संजीव नाईक :** गणेश नाईक यांचे पुत्र संजीव नाईक हे १९९५ मध्ये नवी मुंबईच्या महानगरपालिकेमध्ये निवडून आले व महापौर होण्याचा मान देखील त्यांना मिळाला.[४५] पुढे सलग तीन वेळा नवी मुंबई महानगरपालिकेचे महापौर राहिले. २००९ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये ते निवडून आले व नाईक घराण्याचा राजकीय लौकिक राखण्यात ते यशस्वी झाले. तसेच त्यांचे दुसरे पुत्र संदीप नाईक हे सुद्धा नगरसेवक व आमदार म्हणून कार्यरत आहेत.

## १६. रायगडचे पाटील घराणे

स्वातंत्र्यपूर्व काळापासून राजकारणामध्ये सक्रिय असलेल्या नारायण राघू पाटील यांच्या घराण्याची चौथी पिढी राजकारणामध्ये सक्रिय असल्याचे दिसते. १९२३ मध्ये लोकल बोर्ड, १९३० मध्ये मुंबई कौन्सिल निवडणुकीमध्ये बिनविरोध निवडून आले व सलग २५ वर्ष ते विधानसभेचे सदस्य राहिले. आज शेतकरी कामगार पक्षाची धुरा आमदार जयंत पाटील हे संभाळत आहेत. ते २००२ ते २०१४ कोकण पदवीधर मतदार संघाचे प्रतिनिधित्त्व करत होते.

## १७. डावखरे घराणे

ठाण्यातील एक नामांकित नेते म्हणून वसंतराव डावखरे हे प्रसिद्ध आहेत. काँग्रेसच्या माध्यमातून १९८६ मध्ये ठाणे पालिकेवर नगरसेवक म्हणून निवडून आले. तेथून त्यांनी आपल्या राजकीय प्रवासाला सुरुवात केली. १९७८ मध्ये ठाण्याचे महापौर होण्याची संधी त्यांना मिळाली. पुढे १९९२ मध्ये विधान परिषदेचे आमदार १९९८, २००४, २०१० च्या निवडणुकीच्या माध्यमातून त्यांनी राज्याच्या राजकारणामध्ये आपले वर्चस्व प्रस्थापित केल्याचे दिसते. १९९८ पासून त्यांनी विधान परिषदेचे उपाध्यक्षपद देखील भूषविले. त्यांचा हाच राजकीय वारसा त्यांचे पुत्र निरंजन डावखुरे पुढे चालवताना दिसतात. २०१२ मध्ये ते विधान परिषदेचे सदस्य होते.[४६]

## १८. भुजबळ घराणे

- **छगन भुजबळ :** छगन भुजबळ यांचा जन्म १५ ऑक्टोंबर, १९४७ रोजी नाशिकमध्ये झाला. शिवसेना पक्षाच्यातर्फे १९७३ साली मुंबई महापालिकेवर त्यांची निवड झाली. १९७३ ते

१९८४ या काळात महापालिकेत विरोधी पक्षनेता पद मिळाले. १९८५ मध्ये त्यांची मुंबईच्या महापौरपदी निवड झाली.[४७]

१९९० सालच्या विधानसभा निवडणुकीत पहिल्यांदाच शिवसेनेचे ५२ आमदार निवडून आले. शिवसेना सर्वांत मोठा विरोधी पक्ष होता. बाळासाहेबांनी मनोहर जोशींना विरोधी पक्षनेत्याचं पद दिलं.[४८] त्यावेळी भुजबळांना हे पद हवं होतं आणि ते न मिळाल्यामुळे ते दुखावले गेले. मनोहर जोशींशी सातत्यानं सुरू असलेल्या मतभेदांमुळे भुजबळांनी शिवसेना सोडण्याचा निर्णय घेतला. १९९१ मध्ये भुजबळांनी नागपूर अधिवेशनात नऊ आमदारांना घेऊन काँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यावेळी शरद पवार राज्यातले मोठे काँग्रेस नेते होते आणि भुजबळांना त्यांनीच काँग्रेसमध्ये आणलं, असं मानलं जातं. तेव्हा संतापलेल्या बाळासाहेबांनी त्यांचं 'लखोबा लोखंडे' असं नामकरण केलं. १९८५ व १९९० अशा दोन वेळा मुंबईतील माझगावमधून विधानसभेवर निवड झाली.[४९]

नोव्हेंबर १९९१ मध्ये महसूलमंत्री, गृहनिर्माण आणि झोपडपट्टी सुधारणा या खात्याचे १९९५ पर्यंत मंत्री, एप्रिल १९९६ मध्ये विधानपरिषदेत विरोधी पक्षनेते पद भूषविले. १९९९ साली शरद पवारांनी काँग्रेस सोडली आणि राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली. छगन भुजबळ राष्ट्रवादीत गेले. त्याच वर्षी काँग्रेस–राष्ट्रवादीचं आघाडीचं सरकार सत्तेत आलं आणि भुजबळ महाराष्ट्राचे गृहमंत्री झाले. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी छगन भुजबळांचा महाराष्ट्र राज्य विधानसभेची निवडणूक जिंकल्याबद्दल सत्कार करताना मुंबईत महाराष्ट्र राष्ट्रवादी विधीमंडळ पक्षाच्या नेत्याची घोषणा केली.

१८ ऑक्टोबर १९९९ रोजी त्यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. शिवाय गृह आणि पर्यटन ही दोन खाती सांभाळली. एप्रिल २००२ मध्ये विधान परिषदेवर बिनविरोध निवड झाली. एप्रिल २००२ ते २३ डिसेंबर २००३ या कालावधीत उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्रीपद त्यांनी सांभाळले. २००४ मध्ये येवला मतदारसंघातून विधानसभेवर निवड झाली. नोव्हेंबर २००४ ते ३ डिसेंबर २००८ या कालावधीत सार्वजनिक बांधकाममंत्री पद भूषविले. आठ डिसेंबर २००८ रोजी महाराष्ट्राचे तिसऱ्यांदा उपमुख्यमंत्री झाले.

२००९ मध्ये दुसऱ्यांदा तर २०१४ मध्ये तिसऱ्यांदा व २०१९ मध्ये सलग चौथ्यांदा येवला विधानसभा मतदारसंघातून विधानसभेवर त्यांची निवड झाली. १९९९ साली शरद पवार

यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली. भुजबळ हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या संस्थापक सदस्यांपैकी एक. या पक्षाचे महाराष्ट्राचे पहिले प्रदेशाध्यक्ष होण्याचा मान भुजबळ यांना मिळाला. महाविकास आघाडीच्या सरकारमध्ये दि. २८ नोव्हेंबर २०१९ पासून राज्याच्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री पदाची जबाबदारी सोपविली. त्यांनतर महाविकास आघाडीचे सरकार कोसळल्याने भुजबळांना राजीनामा द्यावा लागला. २०२३ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडून अजित पवार गट शिंदे–फडणवीस सरकारमध्ये सहभागी झाला. अजित पवारांच्या गटामध्ये बहुसंख्य आमदार सहभागी होऊन त्यामध्ये छगन भुजबळांचा महत्त्वाचा सहभाग असलेला दिसतो. या मंत्रिमंडळामध्ये अजित पवार यांची उपमुख्यमंत्री पदी नेमणूक होऊन छगन भुजबळ यांना अन्न व नागरी पुरवठा कॅबिनेट मंत्री म्हणून स्थान प्राप्त झाले. ज्येष्ठ नेते शरद पवार यांचे जुने सहकारी असून सुद्धा तात्त्विक मतभेदातून अजित पवार गटात भुजबळ सामिल झाले.[५०]

- **समीर भुजबळ :** समीर भुजबळ हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील नेते आहेत. ते छगन भुजबळ यांचे पुतणे आणि पंकज भुजबळ यांचे चुलतभाऊ आहेत. त्यांचा जन्म ९ ऑक्टोबर १९७३ रोजी नाशिकमध्ये झाला. मुंबईमधून त्यांनी शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश केला. २००९ मध्ये ते खासदार बनले. या कालखंडामध्ये त्यांनी लोकसभेमध्ये नाशिकचे प्रतिनिधित्व केले. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत शिवसेनेच्या हेमंत गोडसे यांच्याकडून त्यांना पराभव स्वीकारावा लागला. सध्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या मुंबई अध्यक्षपदी समीर भुजबळ यांची नियुक्ती केली आहे. सध्या ते राष्ट्रवादीच्या अजित पवार गटात आहेत.

- **पंकज भुजबळ :** पंकज भुजबळ हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते आहेत. जेष्ठ राजकारणी छगन भुजबळ यांचे ते सुपुत्र आहेत. अभियांत्रिकी शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी वडिलांच्या पावलावर पाऊल टाकत राजकारणामध्ये प्रवेश केला. २००९ मध्ये नाशिकच्या नांदगाव मतदारसंघातून विधानसभेची निवडणूक त्यांनी लढवली. या निवडणुकीमध्ये त्यांना यश मिळाले. पुढे २०१४ ची निवडणूकही त्यांनी जिंकली. दोनदा विधानसभेचे सदस्यत्व त्यांनी भूषवले. पंकज भुजबळ हे उच्च विद्याविभूषित आहेत.

## १९. राणे घराणे

- **नारायण राणे :** नारायण राणे यांचा जन्म २० एप्रिल १९५२ रोजी कोकणात झाला. राणे १९८५ साली मुंबई महानगरापालिकेच्या बेस्ट समितीचे अध्यक्ष झाले. त्यानंतर १९९० साली कणकवली–मालवण मतदारसंघातून ते पहिल्यांदा आमदार झाले.[५१] १९९५ मध्ये युतीची सत्ता आल्यावर त्यांच्याकडे दुग्धव्यवसाय विकास, पशु संवर्धन, मत्स्यव्यवसाय, खार जमिनी, विशेष सहाय्य व पुनर्वसन, उद्योग या खात्यांचा कारभार सोपवण्यात आला. १९९७ साली त्यांच्याकडे महसूल खाते सोपवण्यात आले. मनोहर जोशी यांना मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागल्यानंतर १९९८ ते ९९ या काळात त्यांनी या पदाची धुरा सांभाळली.[५२]

राणे हे भाजपचे राज्यसभा सदस्य असून सध्या ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या केंद्रीय मंत्रीमंडळात लघू व सुक्ष्म उद्योग कॅबिनेट मंत्री म्हणून कार्यरत आहेत.[५३] भारतीय जनता पक्ष नारायण राणे यांना पाठबळ देत असून शिवसेनेच्या विरोधी त्यांचा प्रभाव वापरताना दिसून येतो.

- **निलेश व नितेश राणे :** नारायण राणे यांचे सुपुत्र निलेश आणि नितेश राणे हे राणे घराण्याचा राजकीय वारसा चालवत आहे. सध्या नितेश राणे हे विधानसभेत आमदार असून निलेश राणे हे माजी खासदार आहेत. यांचे कणकवली परिसरात राजकीय वर्चस्व आहे.

## २०. नाईक घराणे

- **वसंतराव नाईक :** वसंतराव नाईक हे प्रगतीशील शेतकरी, कृषीशास्त्रज्ञ आणि राजकारणी होते. त्यांनी प्रदीर्घकाळ महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून काम केले. ते पुसद कृषी मंडळाचे अध्यक्ष (१९४३–४७) झाले. त्यांनी हरिजन वसतिगृह आणि राष्ट्रीय वसतिगृह (दिग्रस) चे अध्यक्ष म्हणूनही काम पाहिले. १९४६ मध्ये ते काँग्रेसचे सदस्य झाले.[५४] १९५१ ते १९५२ पर्यंत त्यांनी मध्य प्रदेशच्या केंद्रीय सहकारी बँकेचे संचालक म्हणून काम पाहिले. १९४६ ते १९५२ पर्यंत त्यांची पुसद नगरपालिकेचे प्रमुख म्हणून निवड झाली.[५५]

पहिल्या निवडणुकीत मध्यप्रदेश राज्यातील महसूल उपमंत्री म्हणून त्यांची निवड झाली. १९५६ मध्ये राज्याची पुनर्रचना झाल्यानंतर विदर्भ आणि मराठवाडा हे मुंबई द्विभाषिक राज्याचा भाग झाले. यशवंतरावांच्या मंत्रिमंडळात वसंतरावांना कृषी मंत्री म्हणून नियुक्त करण्यात आले.

१९६० मध्ये महाराष्ट्र स्वतंत्र राज्य झाल्यानंतर ते पहिले महसूल मंत्री झाले. १९६२ च्या निवडणुकीनंतर ते कन्नमवार यांच्या सरकारमध्ये महसूल मंत्री होते. कन्नमवार यांच्या मृत्यूनंतर त्यांची बहुमताने १९६३ साली महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी निवड झाली. १२ वर्षे ते या पदावर होते. या काळात त्यांनी महाराष्ट्रात अनेक सुधारणा राबवल्या. महाराष्ट्राला अन्नधान्यामध्ये स्वयंपूर्ण करण्यासाठी प्रथम त्यांनी शेतीतील अडचणी दूर करण्याचा प्रयत्न केला.[५६]

- **सुधाकरराव नाईक :** वसंतराव नाईक हे राज्याचं प्रभारीपद सांभाळत असताना त्यांच्या मतदारसंघातील सगळी काम हे त्यांचे थोरले बंधू बाबासाहेब पाहत. याचवेळी वसंतरावांचे पुतणे हे राजकारणात सक्रीय झाले होते. त्यांनी नाईक परिवाराच्या मूळ गावापासून गहुली येथून राजकारणाला सुरुवात केली. त्यानंतर वसंतराव नाईक १९६२ ते ७२ पर्यंत पुसद पंचायत समितीची धुरा सांभाळत होते.[५७] याचवेळी सुधाकरराव नाईक विदर्भात काँग्रेस वाढीसाठी विशेष प्रयत्न करत होते. या काळात त्यांना आपले काका म्हणजेच वसंतराव नाईक यांचे मार्गदर्शन मिळत होते. त्यांनी काँग्रेससाठी काम केल्याची पावती म्हणून त्यांना १९७७ मध्ये विधानपरिषदेवर पाठविण्यात आले.[५८] ते वसंतदादा पाटील यांच्या मंत्रिमंडळात राज्यमंत्री झाले. त्यानंतर एक–एक पायरी करत त्यांनी मुख्यमंत्री पद आणि त्यानंतर हिमाचल प्रदेशच्या राज्यपालपदी त्यांची नियुक्ती झाली.

- **मनोहर नाईक :** मनोहर नाईक यांना प्रशासनाचा कुठलाही अनुभव नसताना सुधाकरराव नाईक यांच्या जागेवर १९९५ मध्ये त्यांना काँग्रेसकडून विधानसभेचे तिकीट देण्यात आले.[५९]

मनोहर नाईक यांचे राजकारण नेहमी स्थानिक पातळीवरच राहिले. पुसद नगरपंचायत, जिल्हापरिषद यांच्या भोवतीच फिरत राहिले. त्यांनी कधीही राज्याचा राजकारणात स्थिर होण्यासाठी, मोठं होण्यासाठी कधीही प्रयत्न केले नाहीत. त्याचबरोबर मनोहर नाईक यांनी पक्ष वाढीसाठी प्रयत्न केले नाहीत. १९९५, २००१, २००४, २००९ आणि २०१४ अशा ५ वेळा मनोहर नाईक हे पुसद मतदारसंघातून निवडून आले.[६०] २०१४ च्या मोदी लाटेत तर विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसकडून विदर्भातून एकटे मनोहर नाईक निवडून आले होते.

## २१. नांदेडचे चव्हाण घराणे

■ **शंकरराव भाऊराव चव्हाण :** महाराष्ट्र राज्याचे चौथे मुख्यमंत्री अर्थात शंकरराव भाऊराव चव्हाण यांचा जन्म १४ जुलै १९२० ला महाराष्ट्रातील औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण या गावी एका शेतकरी कुटुंबात झाला.[६१] १९५६ मध्ये शंकरराव नांदेडचे नगराध्यक्ष म्हणून निवडून आले.[६२] त्यानंतर त्यांनी नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष, हैदराबाद राज्य सहकारी बँकेचे संचालक तसेच विविध पदावर आपल्या कार्याचा ठसा उमटवला.

१९५६ च्या सुमारास मराठवाडा महाराष्ट्रात सामील झाला. त्यावेळी शंकरराव यांना मंत्रिमंडळात उपमंत्रिपद मिळाले. १ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाल्यानंतर यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. यशवंतराव चव्हाण यांच्या मंत्रिमंडळात शंकरराव महाराष्ट्राचे पाटबंधारे व वीज खात्याचे मंत्री झाले.[६३] पाटबंधारे मंत्री म्हणून शंकररावांनी उत्तम कामगिरी केली. १९७२ ते १९७५ दरम्यान त्यांनी कृषीमंत्री म्हणूनही काम पाहिले. पुढे वसंतराव नाईक मुख्यमंत्री पदावरून पायउतार झाल्यानंतर २१ फेब्रुवारी १९७५ ला शंकरराव चव्हाण संयुक्त महाराष्ट्राचे चौथे मुख्यमंत्री म्हणून पदावर आरूढ झाले. त्यानंतर त्यांनी आपल्या मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळात महत्त्वाचे निर्णय घेतले.

राज्याच्या राजकारणात भरीव कामगिरी बजावल्यानंतर १९८० च्या दशकात शंकरराव चव्हाण दिल्लीत गेले. तेथेही त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटविला. १९८४ साली शंकरराव चव्हाण इंदिरा गांधीच्या मंत्रीमंडळात संरक्षण मंत्री झाले.[६४] आपल्या केंद्रीय मंत्रीपदाच्या काळात पंजाब व काश्मिरमधील अस्थिर व धगधगते वातावरण त्यांनी स्थिर केले. तेथे विधानसभेच्या निवडणुका घेऊन लोकप्रतिनिधीचे सरकार आणले. शंकरराव चव्हाण यांनी केंद्रात संरक्षणमंत्री, गृहमंत्री, अर्थमंत्री यासारखी अनेक महत्त्वाची खाती सांभाळली. त्यांनी केंद्रात इंदिरा गांधी, राजीव गांधी, पी. व्ही. नरसिंहराव यांच्या मंत्रिमंडळात आपल्या कार्याचा ठसा उमटविला.[६५]

■ **अशोक चव्हाण :** वडिलांनंतर अशोक चव्हाणही राज्याचे मुख्यमंत्री झाले. राज्याच्या इतिहासात मुख्यमंत्री बनणारी पिता–पुत्रांची ही पहिलीच जोडी आहे.

अशोक चव्हाण यांच्या राजकीय कारकिर्दीला १९८५ पासून सुरुवात झाली. १९८६–१९९५ या काळात ते महाराष्ट्र युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष होते. मात्र १९८७ ते १९८९ दरम्यान संसदीय राजकारणाचा अनुभव घेतल्यानंतर त्यांनी प्रत्यक्ष पक्ष कार्यातही भाग घेण्यास सुरुवात

केली. १९८७ मध्ये ते नांदेड लोकसभा मतदारसंघातून पहिल्यांदा विजयी झाले. वयाच्या ३० व्या वर्षीच ते खासदार बनले. भारिपचे नेते ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या विरोधात निवडणूक लढवून ते संसदेत पोहोचले होते. १९९२ मध्ये ते विधानपरिषदेचे सदस्य बनले. १९९३ मध्ये महाराष्ट्र सरकारमध्ये मंत्री बनले. १९९५ ते १९९९ पर्यंत ते महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे महासचिव होते. त्यानंतर २००३ मध्ये ते विलासराव देशमुख सरकारमध्ये मंत्री बनले.

२००८ मध्ये मुंबईवर दहशतवादी हल्ला झाला होता. त्यामुळे तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांना राजीनामा द्यावा लागला होता. त्यानंतर झालेल्या राजकीय घडामोडीत अशोक चव्हाण यांना मुख्यमंत्री बनण्याची संधी मिळाली. देशमुख गेल्यामुळे मराठवाड्यातूनच मुख्यमंत्री देण्याचा निर्णय झाल्याने चव्हाण यांच्याकडे मुख्यमंत्रीपदाची सूत्रे आली. विशेष म्हणजे त्यावेळी काँग्रेसमधील ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे हे देखील मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीत होते. तसेच शिवसेनेतून काँग्रेसमध्ये आलेले नारायण राणे हे देखील या पदाचे दावेदार होते. तरीही काँग्रेस हायकमांडने अशोकराव चव्हाण यांना मुख्यमंत्रीपद दिलं. त्यावरून त्यांचं दिल्ली दरबारी असलेलं वजन दिसून येतं.[६६]

- **अमिता चव्हाण :** माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या पत्नी चव्हाण या नांदेडच्या राजकारणात सक्रिय आहेत. सहकारी साखर कारखान्याच्या पदाधिकारी म्हणून त्यांनी आपल्या राजकीय प्रवासाला सुरुवात केली २०१४ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये भोकर विधानसभा मतदारसंघातून त्या विजयी झाल्या. या निवडणुकीमध्ये त्यांना एक लाख ७८ मते मिळाली. या निवडणुकीत त्यांनी माधवराव किन्हाळकर यांचा पराभव केला.[६७]

## २२. लातूरचे देशमुख घराणे

- **विलासराव देशमुख :** लातूरमधील मराठवाडा भागातील विलासराव देशमुख हे एक मातब्बर राजकीय नेतृत्त्व होते. त्यांनी दोनदा काँग्रेस राष्ट्रवादी सरकारमध्ये मुख्यमंत्री पद सांभाळले.

राजकीय प्रवासाची सुरुवात त्यांनी आपल्या गावाचे सरपंच म्हणून केली. नंतर ते काँग्रेसच्या युवा संघटनेचे सदस्य झाले. ते लातूर येथून १९८० मध्ये प्रथमच महाराष्ट्र विधानसभेवर निवडून आले व त्याच मतदारसंघातून १९८५ आणि १९९० मध्ये पुन्हा निवडून आले. ते लवकरच मराठवाडा भागातील काँग्रेसचे लोकप्रिय नेते झाले. १९९५ मध्ये जेव्हा

विधानसभा निवडणुकीत त्यांचा पराभव झाला. तेव्हा देशमुख यांना पक्षाने विधान परिषदेसाठी उमेदवारी नाकारण्यात आली. पुढे त्यांना पक्षातंर्गत संघर्षातून सहा वर्षांसाठी निलंबित करण्यात आले. तथापि, एका वर्षातच ते पुन्हा काँग्रेसमध्ये दाखल झाले.[६८]

१९९९ मध्ये देशमुख लातूरमधून पुन्हा आमदार म्हणून निवडून आले. दिल्लीच्या काँग्रेस नेतृत्त्वाने त्यांना मुख्यमंत्री म्हणून निवडले. २००४ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत पुन्हा एकदा लोकशाही आघाडी सत्तेवर आली. ते मुख्यमंत्री म्हणून निवडले गेले.[६९]

२०११ च्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या फेरबदलात ते अवजड उद्योग व सार्वजनिक उद्योगमंत्री झाले. तथापि त्यांची राजकीय कारकीर्द फार काळ टिकली नाही. २०११ मध्ये त्याला सिरोसिस या यकृत रोगाचे निदान झाले आणि ऑगस्ट २०१२ मध्येही यकृत आणि मूत्रपिंड निकामी झाल्याचे निदान झाले. यकृत प्रत्यारोपणाचे प्रयत्न अयशस्वी ठरले आणि देशमुख यांचे वयाच्या ६७ व्या वर्षी १४ ऑगस्ट २०१२ रोजी निधन झाले.

- **अमित देशमुख :** अमित देशमुख यांचा जन्म २१ मार्च १९७६ रोजी झाला. २००९ मध्ये अमित देशमुख यांनी पहिल्यांदा विधानसभेची निवडणूक लढवली. विलासराव देशमुखांचं लातूरमध्ये वर्चस्व असल्यामुळे ते लातूर शहर विधानसभा मतदारसंघातून सहज विजयी झाले. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीच्या काही महिने आधी मंत्रिपद दिलं. त्यांच्याकडे अन्न आणि औषध प्रशासन, राज्य उत्पादन शुल्क आणि पर्यटन खात्याच्या राज्यमंत्रीपदाची जबाबदारी देण्यात आली. त्यानंतर देवेंद्र फडणवीस यांचं सरकार आल्याने काँग्रेसला पाच वर्षे विरोधी बाकावर बसावं लागलं. त्यानंतर २०१९ मध्ये उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वात राज्यात महाविकास आघाडीचं सरकार आलं आणि देशमुख यांची कॅबिनेट मंत्रीपदी वर्णी लागली. त्यांना वैद्यकीय शिक्षण खात्याची जबाबदारी देण्यात आली होती.

- **धीरज देशमुख :** लातूर जिल्हा युवक काँग्रेस अध्यक्ष या नात्याने काम करत असताना. तरुणांचे मोठे संघटन उभे करून काँग्रेस पक्षाची ताकद वाढवण्याचे काम त्यांनी केले. त्यानंतर २०१७ साली लातूर जिल्हा परिषदेची निवडणूक एकुर्गा ता. जि. लातूर या मतदार संघातून त्यांनी जिंकली. त्यानंतर २०१९ साली महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत लातूर ग्रामीण मतदार संघातून एक लाख २१ हजार एवढ्या विक्रमी मताधिक्याने त्यांनी विजय मिळवला.

▪ **दिलीप देशमुख :** विलासराव हे केवळ जिल्ह्याचे नाही तर राज्याचे व देशाचे नेतृत्त्व करतील, हा अंदाज घेऊन जिल्ह्यांतील जिल्हा बँक, जिल्हा परिषद, बाजार समिती, साखर कारखाने या संस्था बळकट व्हायला हव्यात. त्यांचा पाया मजबूत व्हायला हवा. या उद्देशाने विलासरावांचे धाकटे बंधू दिलीपराव देशमुख यांनी त्यात लक्ष घातले. उस्मानाबाद जिल्हा विभाजनानंतर अडचणीतील लातूर जिल्हा बँक त्यांनी बाहेर काढली व राज्यातील अग्रणी बँकेच्या पंक्तीत तिला मानाचे स्थान मिळवून दिले. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष झाल्यानंतर अकरा महिन्यांत नियोजन करत जिल्हा परिषदेचा कारभारही राज्यातील पहिल्या क्रमांकावर त्यांनी नेऊन ठेवला. सन २००० ते २०१८ पर्यंत सलग तीन वेळा काँग्रेस पक्षाकडून विधानपरिषद उस्मानाबाद, बीड, लातूर, स्थानिक स्वराज्य मतदार संघाचे सदस्य म्हणून निवडून आले होते.

## २३. मुंडे घराणे

▪ **गोपीनाथ मुंडे :** गोपीनाथ मुंडे यांचा जन्म १२ डिसेंबर १९४९ रोजी बीड जिल्ह्यातील नाथरा येथे झाला. बीड हा त्यांचा लोकसभा मतदारसंघ होता. ते भारतीय जनता पक्षातील राज्यातील अतिशय महत्त्वाचे नेते होते.[७०]

गोपीनाथ मुंडे १९८०–१९८५ आणि १९९०–२००९ या काळात पाच वेळा महाराष्ट्र विधानसभेचे आमदार होते. मुंडे हे १९९२ ते १९९५ या काळात महाराष्ट्र विधानसभेचे विरोधी पक्षनेते होते. १९९५ ते १९९९ दरम्यान त्यांनी महाराष्ट्रात उपमुख्यमंत्री म्हणून भूमिका बजावल्या.[७१]

▪ **पंकजा मुंडे :** पंकजा मुंडे या गोपिनाथ मुंडे आणि प्रज्ञा मुंडे यांची ज्येष्ठ कन्या. २००९ ला परळी मतदारसंघातून त्या विधानसभेची निवडणूक लढल्या आणि आमदार म्हणून निवडून आल्या. सुरुवातील पंकजाताई मुंडे यांनी २०१२ मध्ये भारतीय जनता युवा मोर्चाच्या युवा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष म्हणून काम पाहिले. त्यांनी ३१ ऑक्टोबर २०१४ रोजी महाराष्ट्रातील कॅबिनेट मंत्री पदाची शपथ घेतली. तेव्हा त्यांना ग्रामविकास, महिला व बालकल्याण खाते दिले. पंकजाताई मुंडे यांनी बीड जिल्ह्यातील परळी येथे त्यांच्या वडिलांचे आणि भाजपाचे ज्येष्ठ लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या स्मरणार्थ स्मारक बांधले आहे. २०१९ च्या विधानसभा

निवडणुकीत त्यांचा भाऊ धनंजय मुंडे यांच्याकडून पराभव झाला. सध्या त्या भाजपच्या केंद्रीय पक्ष संघटनेत कार्यरत आहेत.

- **प्रीतम मुंडे :** २०१४ साली गोपीनाथ मुंडे यांच्या निधनानंतर बीड लोकसभा मतदारसंघात झालेल्या पोटनिवडणुकीत प्रीतम मुंडे यांनी काँग्रेस नेते अशोक पाटील यांचा तब्बल ७ लाख मतांनी पराभव करत लोकसभेत प्रवेश केला. तर २०१९ साली राष्ट्रवादी काँग्रेसच्या बजरंग सोनावणे यांचा पराभव करून खासदार झाल्या.

- **धनंजय मुंडे :** धनंजय मुंडे व पंकजा मुंडे या भावंडांमधील वाद महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये चर्चेचा विषय आहे. परिणामी धनंजय मुंडे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश केला. त्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने त्यांना विधान परिषदेवर संधी दिली व विरोधी पक्षनेते पद ही दिले. त्यामुळे धनंजय मुंडे यांची ताकद वाढली. धनंजय मुंडे हे सभागृहामध्ये व मतदारसंघात संधी मिळेल तिथे पंकजा मुंडेंवर टीकास्त्र करतात. बीड जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या राजकारणामध्ये देखील या दोन भावंडांमधील संघर्ष अनुभवायला मिळतो. या संघर्षामध्ये देखील धनंजय मुंडे यांनी बाजी मारलेली दिसते.[७२] २०१९ साली झालेल्या निवडणुकीमध्ये प्रचंड मताधिक्यांनी निवडून येऊन त्यांनी पंकजा मुंडे यांचा मोठ्या मताधिक्क्याच्या फरकाने पराभव केला.

## २४. बारामतीचे पवार घराणे

वसंतदादा पाटील यांच्यानंतर राज्याच्या राजकारणात शरद पवार यांनी आपला प्रभाव निर्माण केला. मागील जवळ–जवळ ५७ वर्षांपासून ते आजपर्यंत राज्याच्या राजकारणात केंद्रस्थानी आहेत. स्वतः पवार हे चार वेळा मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्रीमंडळात संरक्षण मंत्री, कृषी मंत्री त्यांच्या कन्या सुप्रिया सुळे बारामतीच्या दोन वेळा खासदार, तर पुतणे अजित पवार राज्याचे उपमुख्यमंत्री असून हे घराणे महाराष्ट्राच्या राजकारणात सक्रीय आहे. त्यांना वडिल गोविंदराव पवार यांच्याकडून त्यांना राजकिय वारसा प्राप्त झाला.

- **गोविंदराव पवार :** गोविंदराव पवार हे सर्वसामान्य व्यक्तिमत्त्व पण सहकारी चळवळीच्या माध्यमातून विकासाचे नवे पर्व निर्माण होत असताना त्याचा आदर्श समाजापुढे मांडण्याचे काम गोविंदराव पवार यांनी केलेले दिसते. शेती क्षेत्रातील असणारे हे व्यक्तिमत्त्व

आपल्या कुटुंबाला आधुनिक शेतीच्या दिशेने वाटचाल करण्यात त्यांचा मोलाचा सहभाग राहिला. गोविंदराव पवार हे प्रवरानगर साखर कारखाना उभारणीच्या बैठकीला हजर होते.

- **शरद पवार :** १९६७ च्या महाराष्ट्राच्या दुसऱ्या विधानसभा निवडणुकीत शरद पवार तरुण वयात २७ व्या वर्षी बारामती विधानसभा मतदार संघातून निवडून गेले.[७३] १९७२ मध्ये ते राज्यमंत्री तर १९७४ मध्ये वसंतराव नाईक यांच्या मंत्रीमंडळात कॅबिनेट मंत्री म्हणून कार्य केले. १९७५ ते १९८० हा केंद्र व राज्य काँग्रेससाठी कमालीचा संवेदनशील कालखंड होता. या कालखंडात काँग्रेस दोन गटात विभागली गेली. १९७८ ला पुरोगामी लोकशाही दल (पुलोद)च्या माध्यमातून वयाच्या ३८ व्या वर्षी महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद भूषविले. नंतर काँग्रेस एस. चे अध्यक्ष म्हणून महाराष्ट्रभर कार्यकत्यांचे जाळे उभे केले. १९८८ ला राजीव गांधींच्या नेतृत्त्वाखाली काँग्रेसमध्ये प्रवेश करून महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद भूषविले. १९९० मध्ये काँग्रेसला विधानसभेत बहुमत मिळवून देऊन ते १९९१ मध्ये नरसिंहराव सरकारमध्ये केंद्रात संरक्षण मंत्री झाले. बाबरी मशिदीच्या पाडावानंतर राज्यात झालेल्या जातीय दंगलीनंतर ते परत १९९३ ला राज्याचे मुख्यमंत्री म्हणून महाराष्ट्राच्या राजकारणात सक्रिय झाले. १९९६ ला ते लोकसभेवर निवडून गेले. १९९८ च्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रामधून मोठ्या प्रमाणात शरद पवार यांच्या नेतृत्त्वाखाली लोकसभेचे खासदार निवडून आले.[७४] व काँग्रेसमध्ये राष्ट्रीय स्तरावर एक प्रभावी नेतृत्त्व उदयास आले.

१९९९ मध्ये सोनिया गांधींचे काँग्रेस पक्षातील प्रभाव व महत्त्व वाढत गेले. शरद पवारांना संसदीय नेतेपद नाकारले गेले. यातून वैचारिक वाद वाढत जाऊन सोनिया गांधींच्या विदेशी मुद्यांवरून शरद पवार, तारीक अन्वर, पी. एन. संगमा यांनी १९९९ ला नवीन राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षाची स्थापना केली. १९९९ मध्ये लोकसभेवर चार खासदार तर विधानसभेत ५५ आमदार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे निवडून आले. काँग्रेसच्या मदतीने राष्ट्रवादी काँग्रेस सत्तेत सहभागी झाले. तर शरद पवार २००४ मध्ये मनमोहन सिंग यांच्या मंत्रिमंडळात कृषी खात्याचे कॅबिनेट मंत्री झाले. २००९ मध्ये शरद पवार नव्याने निर्माण झालेल्या माढा लोकसभा मतदारसंघातून निवडून आले. शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रभाव पश्चिम महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणावर आढळतो.[७५] शरद पवार यांनी राजकारणाबरोबर समाजकारण, क्रीडा, साहित्य, कृषी, सहकार इत्यादी क्षेत्रात एक आपला वेगळा ठसा उमठवलेला आहे.

▪ **अजित पवार :** शरद पवार यांचे पुतणे अजित पवार महाराष्ट्राच्या राजकारणात सक्रिय असलेले दिसतात. त्यांनी छत्रपती सहकारी साखर कारखाना व पुणे जिल्हा मध्यवर्ती बँक यांच्या माध्यमातून राजकिय प्रवासास सुरूवात केली. १९९१ मध्ये ते लोकसभेवर बारामती मतदार संघातून निवडून गेले. १९९५ पासून ते २०२४ पर्यंत बारामती विधानसभा मतदार संघाचे प्रतिनिधीत्व करत असलेले दिसतात.[७६] १९९९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेनंतर पक्षाचे प्रभावी नेते म्हणून पुढे आले. त्यांनी अर्थमंत्री, पाटबंधारे मंत्री, गृहमंत्री, महसूल मंत्री म्हणून कार्य केलेले दिसते. १९९९ पासून २०१४ पर्यंत ते सलग १५ वर्षे कॅबिनेट मंत्री म्हणून कार्यरत होते. २०१९ च्या निवडणुकीनंतर देवेंद्र फडणवीस यांच्याबरोबर एक दिवसाचे उपमुख्यमंत्री तर उध्दव ठाकरेंच्या मंत्रीमंडळात उपमुख्यमंत्री म्हणून कार्यरत होते. तर २०२३ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये फूट पाडून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्त्वातील शिवसेना (शिंदे गट), भाजप आघाडीत राष्ट्रवादी काँग्रेस सहभागी होऊन अजित पवार उपमुख्यमंत्रीपदी विराजमान झाले.

▪ **सुप्रिया सुळे :** शरद पवार यांच्या कन्या सुप्रिया सुळे राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या माध्यमातून राजकारणात व समाजकारणात सक्रिय झाल्या. त्या प्रथम राज्यसभेच्या खासदार झाल्या व २००९, २०१४, २०१९ मध्ये बारामती लोकसभा मतदार संघातून निवडून गेल्या. सध्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडलेली असल्याने शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची धुरा सुप्रिया सुळे सांभाळत आहेत.[७७]

▪ **पार्थ पवार :** अजित पवारांचे पुत्र व शरद पवारांचे नातू पार्थ पवार राजकारणात सक्रिय आहेत. सन २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत मावळ मतदार संघातून पार्थ पवार यांना उमेदवारी घोषित झाली. पण घराणेशाही विरोधी लाट व शिवसेनेचा प्रभावी उमेदवार श्रीरंग बारणे यांच्याकडून त्यांना पराभव स्वीकारावा लागला. ते सध्या राजकारणात सक्रिय होऊ लागले आहेत.

▪ **रोहित पवार :** रोहित पवार हे शरद पवारांचे नातू असून त्यांनी जिल्हा परिषदच्या माध्यमातून राजकारणाला सुरूवात केली. सामाजिक, शैक्षणिक संस्थेमध्ये सक्रिय आहेत. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत ते अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत विधानसभा मतदार संघामधून निवडून आले. त्यांनी भाजपचे प्रा. राम शिंदे यांचा पराभव केला.[७८] २०२३ मध्ये

राष्ट्रवादी काँग्रेसच्या फुटीनंतर ते शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसचे संघटन करताना दिसतात.

## २५. शिंदे घराणे

- **सुशीलकुमार शिंदे :** सोलापूर जिल्ह्यात ४ सप्टेंबरला १९४१ रोजी एका मागासवर्गीय कुटुंबात सुशीलकुमार शिंदे यांचा जन्म झाला. ६ नोव्हेंबर १९७१ ला त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला आणि ९ नोव्हेंबरपासून सोशॅलिस्ट फोरमचा निमंत्रक म्हणून काम करण्यास सुरुवात केली. १९७२ मध्ये सोलापूर (करमाळा तालुका) मतदार संघातून तिकीट मिळणार होते. मात्र, ते ऐनवेळी मिळाले नाही. पुढे या मतदारसंघाचे आमदार ताराप्पा सोनवणे यांचे आकस्मित निधन झाले. पोटनिवडणूक लागली. त्यांना काँग्रेसने उमेदवारी दिली. विजय संपादन करून ते २३ एप्रिल १९७३ रोजी प्रथमच आमदार झाले.[७९]

पुढे शरद पवारांच्या पुलोद मंत्रीमंडळात (१९७८) ते होते. याच कालावधीत जिनीव्हा येथील आंतरराष्ट्रीय मजूर व बालकामगार परिषदेत ते भारताचे प्रतिनिधी म्हणून गेले होते. त्यानंतर त्यांनी १९८३–९२ या काळात महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्रिपद भूषविले. तब्बल नऊ वेळा महाराष्ट्र राज्याचा अर्थसंकल्प त्यांनी विधानसभेत सादर केला. १९८५ मध्ये त्यांनी संयुक्त राष्ट्राच्या आमसभेत 'कांपुचिया प्रश्नावर भारताची भूमिका' अत्यंत प्रभावीपणे मांडली. त्यांची अखिल भारतीय काँग्रेसच्या कार्यकारिणीवर तसेच सरचिटणीस म्हणून नियुक्ती झाल्यावर (१९९२) त्यांनी आमदारकीचा राजीनामा दिला. त्याच वर्षी त्यांची राज्यसभेवर निवड झाली. पुढे १९९३ मध्ये चीनला गेलेल्या काँग्रेस पक्षाच्या शिष्टमंडळाचे नेतृत्त्व त्यांनी केले. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष म्हणून १९९०–९१ आणि १९९६–९७ अशी दोनदा त्यांची निवड झाली. राष्ट्रपती डॉ. शंकर दयाळ शर्मा व के. आर. नारायणन यांच्यासमवेत त्यांनी परराष्ट्र दौरे केले. बाराव्या लोकसभेवर प्रथमच सोलापूरच्या सर्वसाधारण मतदारसंघातून एक लाखांपेक्षा अधिक मतांनी ते निवडून आले. पुढील वर्षी लगेचच झालेल्या लोकसभेच्या निवडणुकांमध्ये त्याच मतदारसंघातून ते पुन्हा निवडून आले. संयुक्त राष्ट्रांत पाठविलेल्या भारताच्या २००२ मधील शिष्टमंडळात त्यांचा समावेश होता. १८ जानेवारी २००३ रोजी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून त्यांची निवड झाली व दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत २००३ साली ते ७९ हजार मताधिक्याने निवडून आले. २००४ च्या सार्वत्रिक

निवडणुकीत ते दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातून विधानसभेवर निवडून आले. तथापि त्यांची ४ नोव्हेंबर २००४ रोजी आंध्रप्रदेशच्या राज्यपालपदी नियुक्ती झाल्याने विधानसभा सदस्यत्त्वाचा त्यांनी राजीनामा दिला व राज्यपालपदाची सूत्रे स्वीकारली. पुढे २९ जानेवारी २००६ त्यांची केंद्रीय ऊर्जामंत्री म्हणून नियुक्ती केली. त्यांनी महाराष्ट्राचे अर्थमंत्री म्हणून सलग नऊ वेळा अर्थसंकल्प मांडला. सलग साडेसहा वर्षे केंद्रीय ऊर्जामंत्री पदावर राहणारे व लोकसभेच्या नेतेपदी निवड होणारे ते पहिले मराठी नेते होते

- **प्रणिती शिंदे :** प्रणिती शिंदे सुशीलकुमार शिंदे यांच्या कन्या या त्यांचा राजकीय वारसा पुढे चालवत आहेत. त्या सध्या महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये सक्रिय आहे. २००९ साली त्यांनी विधानसभा निवडणूक लढवली आणि सोलापूर मतदारसंघातून त्या विजयी झाल्या.[८०] त्यावेळी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे उमेदवार नरसय्या आडम यांचा त्यांनी पराभव करून विधानसभेवर निवडून गेल्या. २०१४ साली मोदी लाटेचा देशभर प्रभाव असताना देखील त्यांनी एम.आय.एम.चे उमेदवार तौफिक शेख यांचा पराभव करून विधानसभेवर निवडून आल्या. यावेळी प्रणिती यांना ४६,८०७ तर शेख यांना ३७,१३८ मते मिळाली. २०१९ साली झालेल्या निवडणुकीमध्ये देखील त्या विधानसभेवर निवडून आल्या व सध्या त्या आमदार म्हणून काम पाहत आहेत.

## २६. अकलूज मोहिते पाटील घराणे

- **शंकरराव मोहिते पाटील** : सोलापूर जिल्ह्यातील माळशिरळ तालुक्यातील एक प्रभावी व्यक्तिमत्त्व शंकरराव मोहिते पाटील यांच्याकडे पाहिले जाते. ७० च्या दशकात सोलापूर जिल्ह्यावर शंकरराव मोहिते पाटलांचा प्रभाव होता. सोलापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद व जिल्हा बँक यावर मोहिते पाटलांचे नियंत्रण होते. शंकरराव मोहिते पाटील यांची तिसरी पिढी महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये सक्रिय असल्याचे दिसते.

- **विजयसिंह मोहिते पाटील** : एकूणच ग्रामपंचायतपासून ते जिल्हा परिषद संसदेपर्यंत मोहिते–पाटील घराण्यातील मंडळी कार्यरत होते. माळशिरस तालुक्यातील सहकारी साखर कारखाने, जिल्हा बँक, विविध शिक्षण संस्थांवर ही मोहिते–पाटील यांचे वर्चस्व असल्याचे दिसते. मतदार संघ पुनर्रचनेमध्ये मोहिते–पाटील यांचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जाणारा

माळशिरस मतदारसंघ राखीव झाल्यामुळे विजयसिंह यांनी २००९ साली पंढरपूर मतदार संघातून निवडणूक लढवली. परंतु राष्ट्रवादी पक्षातील अंतर्गत बंडाळी व स्थानिक नेतृत्त्व भारत भालके यांच्या प्रभावामुळे त्यांना या निवडणुकीमध्ये अपयश आले. मोहिते–पाटील हे घराणे एकमेव असे घराणे आहे की, या घराण्यातील अनेक व्यक्ती राजकारणामध्ये सक्रिय असल्याचे दिसते. मोहिते–पाटील घराने पूर्वी काँग्रेस पक्षामध्ये सक्रीय होते. १९९९ च्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेनंतर त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.[८१] सन २०१४ मध्ये त्यांनी माढा मतदारसंघातून लोकसभेचे प्रतिनिधित्व केले. सध्या विजयसिंह मोहिते–पाटील भारतीय जनता पक्षाच्या प्रभावाखाली असून राष्ट्रवादी काँग्रेसपासून बाजूला झालेले दिसतात.

- **रणजितसिंह मोहिते पाटील** : विजयसिंह मोहिते–पाटील यांचे चिरंजीव रणजीतसिंह हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रदेशाध्यक्षपदी कार्यरत होते. त्यानंतर विधान परिषदेवर निवडून गेले. कालांतराने राज्य विधानसभेवर देखील त्यांची वर्णी लागली. सोलापूर जिल्हा बँकेचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले. त्याचबरोबर मोहिते–पाटील घराण्यातील मदनसिंह मोहिते–पाटील व जयसिंह मोहिते–पाटील, धवलसिंग मोहिते–पाटील हे देखील महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये सक्रिय असल्याचे दिसतात.[८२]

## २७. इस्लामपूर पाटील घराणे

- **राजारामबापू पाटील :** राजारामबापू पाटील हे महाराष्ट्राच्या राजकारणातील एक प्रभावी व्यक्तीमत्त्व. अनेक वर्षे राज्य मंत्रीमंडळात मंत्री म्हणून काम केले. १९५२ साली सांगली जिल्हा बोर्डचे अध्यक्ष झाल्यानंतर राजारामबापू यांनी समाजातील सर्व स्तरातील लोकांच्या विकासाच्यादृष्टीने प्रयत्न सुरू केले. सांगलीचा सर्वांगीण विकास व्हावा, यासाठी त्यांनी पुरोगामी आणि शास्त्रोक्त पद्धतीने कार्य सुरू ठेवले. त्यांच्या लोकप्रियतेमुळे १९६२ साली ते पहिल्यांदा वाळवा मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून आले आणि पुढील २२ वर्षे त्यांनी निर्विवाद आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला. त्यांनी सहकार क्षेत्राचे महत्व जाणले. विरोधाला न जुमानता त्यांनी अवघ्या १४ महिन्यांत वाळवा सहकारी साखर कारखान्याची निर्मिती केली. वसंतराव नाईक यांच्या मंत्रीमंडळात सन १९६५ मध्ये ते महसूल कॅबिनेटमंत्री म्हणून निवड झाली. तेव्हा त्यांनी शेतकऱ्यांना उपयुक्त अशी खातेपुस्तिका देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. ते १९६७ मध्ये दुसऱ्यांदा आमदार झाले तेव्हा त्यांना सहकार, उद्योग व वीज ही खाती

मिळाली. राजारामबापू पाटील यांनी १९७७ मध्ये काँग्रेस पक्षाचा त्याग केला व ते जनता पक्षाचे अध्यक्ष झाले. पुरोगामी लोकशाही आघाडीच्या मंत्रिमंडळात ते अर्थमंत्री म्हणून कार्यरत होते.[८३]

- **जयंत पाटील :** इस्लामपूर तालुक्यातील साखराळे हे जयंत पाटील यांचं गाव. त्यांचा जन्म १६ फेब्रुवारी १९६२ रोजी झाला. स्वर्गीय राजारामबापू पाटील यांचे चिरंजीव असलेल्या जयंत पाटील यांना घरातूनच राजकारणाचं बाळकडू मिळालं. राजारामबापू काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष होते. वडिलांकडूनच राजकारणाचे धडे मिळाले. सलग ९ वेळा अर्थसंकल्प मांडणारे मंत्री, अर्थमंत्री, गृहमंत्री म्हणून जयंत पाटील यांनी कामगिरी बजावली आहे.

राजारामबापू पाटील यांचे चिरंजीव जयंत पाटील यांनी १९८० ते १९९० या कालखंडात बापूंच्या निधनानंतर राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखान्याच्या प्रमुख पदापासून आपल्या राजकीय कार्यास सुरुवात केली. १९९० मध्ये प्रथम जयंत पाटील यांनी विधानसभा निवडणूक लढवली व ती जिंकली. त्यानंतर १९९५, ९९, २००४, २००९, २०१४, २०१९ ची निवडणूक देखील जयंत पाटील यांनी मताधिक्यांनी जिंकली. परिणामी वाळव्यापासून शिराळ्यापर्यंत त्यांचा राजकीय प्रभाव राहिला आहे.[८४] सन १९९९ च्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या स्थापनेपासून ते २०१४ पर्यंत राज्य मंत्रीमंडळात कॅबिनेट मंत्री होते. त्यांनी अर्थ, गृह, ग्रामविकास ही खाती सांभाळली. ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. २०२३ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडून शरद पवार गट व अजित पवार गट वेगळा झाला. अजित पवार गट शिंदे–फडणवीस सरकारमध्ये सहभागी झाला. पण जयंत पाटील परंपरागत शरद पवार गटात राहून राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्षपद सांभाळत पक्ष, संघटना बळकट करताना दिसतात. राजारामबापू पाटील यांनी निर्माण केलेल्या सहकारी संस्था, शिक्षण संस्था, बँका खर कारखान्याची दुसरी शाखा यशस्वीपणे त्यांनी चालवली आहे. तसेच इको व्हिलेज ही महत्त्वाकांशी योजना त्यांनी राबवून ग्रामीण भागाचा चेहरा मोहरा बदलला आहे.

## २८. कदम घराणे

- **पतंगराव कदम :** शिक्षण क्षेत्रामध्ये अद्वितीय काम करणारे एक उमदे व्यक्तीमत्त्व म्हणजे पतंगराव कदम. त्यांनी राज्याच्या राजकारणावर आपला वेगळाच ठसा उमटवलेला आहे. शैक्षणिक, सहकारी आणि सामाजिक कार्यात उल्लेखनीय कार्य केल्यामुळे पलूस–कडेगाव भिलवडी, वांगी मतदारसंघात त्यांनी आपले राजकीय प्रभुत्व निर्माण केल्याचे दिसते. राज्याच्या

मंत्रिमंडळामध्ये त्यांनी विविध मंत्री पदावर देखील काम केलेले आहे. परंतु मुख्यमंत्री पदाचा मान त्यांना कधीही मिळाला नाही. १९६२ मध्ये शिक्षकी पेशापासून कार्यास प्रारंभ करणाऱ्या डॉक्टर पतंगराव कदम यांनी १० मे १९६४ रोजी भारती विद्यापीठ या शैक्षणिक संस्थेची स्थापना केली. सध्या या रोपट्याचे मोठ्या वटवृक्षामध्ये रूपांतर झाल्याचे दिसते. सध्या भारती विद्यापीठच्या १३० शाखा देश–विदेशात कार्यरत असल्याच्या दिसतात. शैक्षणिक क्षेत्रात अलौकिक कार्य करणाऱ्या पतंगराव कदमच्या राजकीय प्रवासास १९६७ पासून सुरुवात झाली. १९६७–१९७२ पर्यंत ते एसटी महामंडळाचे सदस्य होते. १९८५ साली त्यांनी काँग्रेसमधून बंडखोरी करून भिलवडी वांगी मतदारसंघातून विधानसभेची निवडणूक लढवली व ती जिंकली. काहीकाळ त्यांनी शिक्षणमंत्रीपद देखील सांभाळलेले आहे. १९९९, २००४, २००९ या निवडणुकीमध्ये देखील त्यांना यश मिळाले. १९९९ पासून २०१४ पर्यंत ते महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये मंत्रीपदावर कार्यरत होते.[८५] शालेय शिक्षण, उद्योग, वन, महसूल इत्यादी खाती सांभाळली.

- **विश्वजीत कदम :** स्वर्गीय पतंगराव कदम यांनी आपला राजकीय वारसदार म्हणून विश्वजीत कदम यांना पुढे आणले. विश्वजीत कदम हे भारती विद्यापीठ चे कार्यवाहक म्हणून काम पाहत आहेत. तसेच क्रीडा क्षेत्रात फुटबॉलमध्ये कार्यरत आहेत. प्रदेश युवक काँग्रेस म्हणून देखील त्यांनी काही काळ काम पाहिले आहे. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत त्यांना पुणे मतदारसंघातून काँग्रेसची उमेदवारी प्राप्त झाली. पण भाजपच्या गिरीष बापट यांच्याकडून त्यांचा पराभव झाला. २०१८ मध्ये पतंगराव कदम यांच्या निधनानंतर विश्वजीत कदम यांची विधानसभेवर बिनविरोध आमदार म्हणून निवड झाली.[८६] २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत पलुस–कडेगाव मतदारसंघातून विजयी होऊन उद्धव ठाकरे यांच्या मंत्रीमंडळामध्ये राज्यमंत्री म्हणून त्यांनी कामकाज पाहिले.

- **मोहनराव कदम :** विश्वजीत कदम यांचे चुलते व पतंगराव कदम यांचे बंधू मोहनराव कदम व सुबराव कदम हे देखील राजकारणामध्ये सक्रिय आहेत. सुबराव कदम हे बरीच वर्ष पुणे महानगरपालिकेचे नगरसेवक होते तर मोहनराव कदम हे सांगली जिल्हा परिषदेचे सदस्य म्हणून काम पाहत होते. तसेच त्यांनी काही काळ सांगली जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष पद ही भूषवले. तसेच त्यांनी कडेगाव साखर कारखान्याचे अध्यक्ष पद भूषविले. सातारा–सांगली

स्थानिक स्वराज्य संस्थेमधून मोहनराव कदम विधान परिषदेचे सदस्य म्हणून निवडून गेले. ते सद्या जिल्ह्यातील काँग्रेस पक्ष व सहकारी संस्था यांच्या माध्यमातून आपला प्रभाव टिकवून ठेवण्यात यशस्वी झालेले दिसतात.

## २९. शेंडगे घराणे

- **शिवाजीराव शेंडगे :** शिवाजीराव शेंडगे हे धनगर समाजाचे लोकप्रिय नेते म्हणून ओळखले जातात. सन १९९०–१९९५ साली कवठेमहांकाळ विधानसभा मतदार संघातून निवडून आले होते. १९९२ च्या शरद पवार यांच्या मंत्रिमंडळामध्ये पशुसंवर्धन दुग्धविकास आणि परिवहन राज्यमंत्रीपदी काम करण्याची संधी शिवाजीराव शेंडगे यांना मिळाली. १९९५ साली अजित घोरपडे यांच्याकडून त्यांचा पराभव झाला.

- **प्रकाश शेंडगे :** प्रकाश शेंडगे हे शिवाजीराव शेंडगे यांचे पुत्र होय व ते सध्या शेडगे घराण्याचा राजकीय वारसा सांभाळत आहेत. त्यांनी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्याकाळात भाजपमध्ये प्रवेश केला. परिणामी त्यांना त्यावेळेस विधानपरिषदेचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली. त्यांचे दुसरे बंधू रमेश शेंडगे हे देखील राष्ट्रवादी काँग्रेसकडून विधान परिषदेवर निवडून गेले.

## ३०. सांगली पाटील घराणे

- **वसंतदादा पाटील :** राज्याच्या राजकारणातील सर्व प्रभावी घराणे म्हणून दादा घराण्याचा उल्लेख करावा लागेल. वसंतदादा पाटील यांचा संपूर्ण राज्याच्या राजकारणावर प्रभाव होता. राज्यात दादा गट म्हणून कार्यकर्त्यांची एक फळीच कार्यरत होती. स्वतः दादा यांनी चार वेळा राज्याचे मुख्यमंत्रीपदी भूषविलेले होते.[८७]

शंकरराव चव्हाण मुख्यमंत्री पदावरून पायउतार झाल्यानंतर वसंतदादांनी १७ एप्रिल १९७७ ला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून सूत्रे हाती घेतली. मुख्यमंत्रीपदी विराजमान झाल्यानंतर वसंतदादांनी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. सुमारे ४ वर्षे त्यांनी राज्याचे मुख्यमंत्रिपद सांभाळले ते काही काळ राजस्थानचे राज्यपालही होते.[८८] त्या आधी १९७२ मध्ये ते प्रथम मंत्री झाले होते. तसेच स्वतंत्र भारतातल्या पहिल्या निवडणुकीतच ते सांगलीतून आमदार म्हणून निवडून आले होते.[८९] पुढील काळात सुमारे २५ वर्षे त्यांनी सांगलीचेच प्रतिनिधित्व (विधानसभेत व

लोकसभेत) केले. सर्वप्रथम वसंतदादांनी 'पाणी आडवा, पाणी जिरवा' ही संकल्पना शेतकऱ्यांच्या मनात रुजवली. शेतकऱ्यांना कमी व्याज दराने कर्ज पुरवठा यांसारख्या महत्त्वाच्या योजना त्यांनी आपल्या कार्यकाळात राबविल्या. वसंतदादांनी आपल्या कार्यकाळात वैद्यकीय, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे व तंत्रनिकेतन विद्यालये विनाअनुदान तत्त्वावर स्थापना करण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या या निर्णयाने शैक्षणिक क्षेत्रात क्रांती घडवली. या निर्णयाने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या नवीन संधी उपलब्ध झाल्या.

- **प्रकाश पाटील :** सांगली जिल्ह्यातील मुत्सद्दी राजकारणी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वसंतदादा पाटील यांची दुसरी पिढी १९८४ मध्ये प्रकाश पाटील यांच्या रुपाने राजकारणामध्ये सक्रिय झाली. सलग पाच वेळा ते लोकसभेवर निवडून गेले. त्यांनी वीस ते पंचवीस वर्षे सांगली जिल्ह्याचे प्रतिनिधित्त्व केले. १९६० पासून २०१४ पर्यंत सांगली जिल्ह्याचे प्रतिनिधित्त्व या घराण्याने केले आहे.[१०]

- **प्रतीक पाटील :** २००६ मध्ये प्रकाश पाटील यांच्या निधनानंतर त्यांचे चिरंजीव प्रतीक पाटील हे राजकारणामध्ये सक्रिय झाले. २००९ मध्ये उमेदवारी मिळवून ते निवडून आले. तत्कालीन केंद्रीय मंत्रिमंडळामध्ये त्यांना राज्यमंत्रीपदी काम करण्याची संधी मिळाली. सांगली जिल्ह्यातील ते पहिले केंद्रीय मंत्री ठरले. २०१४ साली झालेल्या लोकसभा निवडणुकीत मोदी लाटेचा प्रभाव संपूर्ण भारतभर दिसत होता. याचा परिणाम म्हणून पाटील कुटुंबीयांचा बालेकिल्ला ढासळला. १९८० नंतर प्रथमच पाटील घराण्याचा लोकसभा निवडणुकीत पराभव झाला. काँग्रेसचे प्रतीक पाटील यांचा पराभव भाजपचे संजय पाटील यांनी केला. या निवडणुकीत प्रतीक पाटील यांना तीन लाख ७२ हजार २७१ मतांवर समाधान मानावे लागते. या पराभवामुळे पाटील घराण्याचे सांगली जिल्ह्यातील वर्चस्व कमी झाले. प्रतीक पाटील यांचे बंधू विशाल पाटील हे देखील स्थानिक राजकारणामध्ये सक्रिय असल्याचे दिसते ते शेतकरी सहकारी कारखान्याचे अध्यक्ष होते.

- **विष्णू अण्णा पाटील** (वसंतदादांचे पुतणे) : वसंत पाटील (दादा) यांचे पुतणे विष्णू अण्णा हे देखील राजकारणामध्ये सक्रिय होते. १९९२ मध्ये सातारा सांगली विधानपरिषदेचे सदस्य म्हणून त्यांची बिनविरोध निवड झाली. त्यांनी विविध राजकीय पदे भूषवलेली. राज्य सहकारी साखर संघाचे अध्यक्ष, राज्य बँकेचे अध्यक्ष, नॅशनल हेवी इंजीनियरिंगचे अध्यक्ष अशा

अनेक जबाबदाऱ्या त्यांनी पार पाडल्या. घराण्यातील अंतर्गत कलहामुळे त्यांना विधानसभा निवडणुकीत यश संपादन करता आले नाही. पण काही काळ त्यांनी विधान परिषदेवर आमदार म्हणून प्रतिनिधित्त्व केले.

- **मदन पाटील :** मदन पाटील हे विष्णू अण्णा पाटील यांचे चिरंजीव. ते देखील राजकारणामध्ये सक्रिय आहेत. सर्वप्रथम सन १९९८ मध्ये विधानपरिषदेवर निवडून गेले. त्यानंतर २००४ साली सांगली विधानसभा मतदारसंघातून विजय मिळवत पूर्वी झालेल्या पराभवाचा कलंक धुऊन काढला. राज्याच्या मंत्रिमंडळामध्ये काही काळ ते राज्यमंत्रीपदीही राहिले. सांगली महापालिका, बाजार समिती, शेतकरी बँकेवर त्यांनी आपले वर्चस्व प्रस्थापित केले. २००९ च्या विधानसभा निवडणुकीत दिनकर पाटील यांनी त्यांचा पराभव केला. २०१४ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीत देखील मोदी लाटेचा फटका मदन पाटील यांचा पराभव झाला. यावेळी त्यांना ६६ हजार ४० मते पडली व सुधीर गाडगीळ भाजपचे यांना ८०,४९७ मते मिळवून त्यांचा विजय झाला.[११] २००९ च्या लोकसभा निवडणुकीत वसंतदादांचे नातू प्रकाश पाटील यांचे पुत्र प्रतिक पाटील सांगली मतदार संघातून विजयी झाले व केंद्रामध्ये मनमोहनसिंग यांच्या मंत्रीमंडळामध्ये कोळसा व खणकाम राज्यमंत्री म्हणून काम करण्याची संधी प्राप्त झाली. पण या संधीचे सोने करता आले नाही. दिवसेंदिवस वसंतदादा पाटील घराण्याचा करिश्मा व काँग्रेसपक्षाचा प्रभाव कमी होत जाऊन भारतीय जनता पक्षाचा प्रभाव वाढताना दिसून येतो. वसंतदादा पाटील विरोधी गट भारतीय जनतापक्षामध्ये प्रभावी झाल्याने राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी विधानपरिषद सदस्य तासगावचे संजय पाटील हे भारतीय जनता पक्षात प्रवेश करून त्यांनी वसंतदादा पाटील यांचे नातू प्रतिक पाटील यांचा २०१४ व २०१९ मध्ये सांगली लोकसभा मतदार संघात पराभव केला. मदन पाटील यांच्या मृत्यूनंतर वसंतदादा पाटील घराण्याचा प्रभाव कमी होत जाऊन प्रतिक पाटील काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून आपला प्रभाव टिकविण्याचा प्रयत्न करू पाहताना दिसून येतात.

## ३१. शाहू महाराज घराणे

कोल्हापूरच्या भूमीत सामाजिक क्रांतीची बीजे छत्रपती शाहू महाराज यांनी रोवली. या राजघराण्याला जनतेने खूप मानसन्मान दिलेला आहे. परंतु प्रत्यक्ष सक्रिय राजकारणामध्ये मात्र या घराण्याकडे जनतेने पाठ फिरवलेली दिसते. सद्याचे शाहूमहाराजांचे संभाजीराजे व

मालोजीराजे हे दोन मुले असून ते राजकारणामध्ये सक्रीय आहेत. मालोजीराजे हे कोल्हापूर शहर विधानसभा मतदारसंघातून २००४ ला निवडून गेले व २००९ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांचा शिवसेनेच्या राजेश क्षीरसागर यांच्याकडून पराभव झाला. तर संभाजीराजे यांना २००९ च्या लोकसभा निवडणुकीत कोल्हापूर लोकसभा मतदार संघातून राष्ट्रवादी काँग्रेसची उमेदवारी प्राप्त झाली. पण अपक्ष उमेदवार स्व. सदाशिवराव मंडलिक यांच्याकडून त्यांचा पराभव झाला. छत्रपती संभाजीराजे शिवराज्यभिषेक दिनाच्या माध्यमातून रायगडच्या संवर्धनासाठी प्रयत्न करताना दिसतात. जून २०१६ ते २०२२ पर्यंत भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून राज्यसभेवर राष्ट्रपती नियुक्त खासदार म्हणून कार्यरत होते. सद्या ते मराठा आरक्षणाच्या माध्यमातून समाजाच्या विकासासाठी प्रयत्न करताना दिसून येतात व इतर राजकीय पक्षांच्यापासून अंतर ठेवून असलेले दिसतात. तथापि २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत ते महाविकास आघाडीतून काँग्रेस पक्षाकडून कोल्हापूर लोकसभा मतदार संघातून निवडणूक लढवित आहेत.

## ३२. गायकवाड घराणे

- **उदयसिंह गायकवाड :** गेल्या अर्ध शतकापासून कोल्हापूरच्या राजकारणामध्ये गायकवाड घराणे कार्यरत असल्याचे दिसून येते. शाहूवाडी तालुक्यातील सुपात्रे गावचे उदयसिंह यांनी अनेक वर्षे कोल्हापूर जिल्ह्याचे नेतृत्त्व सांभाळलेले दिसून येते. या घराण्याची तिसरी पिढी म्हणजे कर्णसिंग सध्या राजकारणामध्ये सक्रिय असल्याचे दिसतात. काँग्रेस पक्षाशी एकनिष्ठ असलेल्या उदयसिंह गायकवाड यांची राजकीय कारकीर्द मोठी आहे. त्यांनी सलग तीन वेळा आमदार व पाच वेळा खासदार होण्याचा बहुमान मिळविला. सुरुवातीला उदयसिंह यांनी जिल्हा लोकल बोर्ड उपाध्यक्ष पदाच्या माध्यमातून आपल्या राजकीय कारकिर्दीस सुरुवात केली. १९६२ मध्ये त्यांनी शाहूवाडी विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविली व ते या निवडणुकीमध्ये विजयी देखील झाले. १९७२ ते १९७८ मध्ये त्यांना पुन्हा निवडून येण्याची संधी मिळाली. काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून १९८० पासून कोल्हापूर लोकसभा मतदारसंघातून त्यांना पाच वेळा लोकसभेवर निवडून जाण्याचा मान मिळाला.[१२] संजयसिंह गायकवाड (पुतणे) उदयसिंह गायकवाड यांच्यानंतर त्यांचे पुतणे संजयसिंह गायकवाड राजकारणामध्ये सक्रिय असल्याचे दिसतात. १९८५, १९९५, १९९९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये ते

निवडून आले. २००० मध्ये संजयसिंह गायकवाड यांच्या निधनानंतर त्या जागेवर त्यांच्या पत्नी संजीवनीदेवी गायकवाड या विजयी झाल्या.

- **मानसिंगराव गायकवाड :** उदयसिंह गायकवाड यांचे पुत्र मानसिंगराव गायकवाड हे जिल्हा बँकेचे संचालक म्हणून अनेक वर्षापासून कार्यरत आहेत. शाहूवाडीतील सहकारी संस्थेत देखील त्यांचे वर्चस्व आहे. त्यांची पत्नी शैलाजादेवी या उदय सहकारी साखर कारखान्याच्या अध्यक्षा व जिल्हा परिषदेच्या सदस्या होत्या. सध्या मानसिंगराव गायकवाड यांचे पुत्र रणवीरसिंह हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये आहेत.

## ३३. इचलकरंजीचे आवाडे घराणे

- **कल्लापाण्णा आवाडे :** जवळपास ४० वर्षांपेक्षा जास्त कालावधीपासून आवडे घराण्याचे इचलकरंजीच्या राजकारणावर वर्चस्व आहे. या परिसरातील सहकार, शिक्षण, बँकिंग या क्षेत्रावर आवाडे घराण्याची मजबूत पकड आहे. या घराण्यातील कल्लाप्पाण्णा आवाडे, प्रकाश आवाडे, राहुल आवाडे राजकारणामध्ये सक्रिय आहेत. जवाहर सहकारी साखर कारखान्याचे सर्वेसर्वा असलेले कल्लाप्पाण्णा आवाडे हे सर्वप्रथम १९८० मध्ये विधानसभेवर निवडून गेले.[९३] १९८० ते ८५ या कालखंडामध्ये ते राज्याच्या मंत्रिमंडळामध्ये देखील होते. १९९६ ते ९८ च्या लोकसभा निवडणुकीत कल्लाप्पा आवाडे यांनी निवेदिता माने यांचा पराभव करून खासदारकी मिळविली. कल्लाप्पा आवाडे हे विविध सहकारी संस्थांवर देखील कार्यरत आहेत. त्यांचे राजकीय वारस म्हणून त्यांचा मुलगा प्रकाश आवाडे व सून किशोरी आवाडे यांचे पुत्र राहुल आवाडे हे चालवत आहेत.

- **प्रकाश आवाडे :** १९८५ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये निवडून येऊन पहिल्यांदा आमदार होण्याचा बहुमान त्यांना मिळाला. २००४ पर्यंतच्या विधानसभा निवडणुका त्यांनी जिंकल्या. महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळामध्ये देखील त्यांनी सहकार मंत्री, वस्त्रोद्योग मंत्री म्हणून काम पाहिले आहे. विविध सहकारी संस्थांमध्ये देखील त्यांनी महत्त्वाची पदे भूषवलेली आहेत. प्रकाश आवाडे यांच्या पत्नी किशोरी आवाडे यादेखील राजकारणामध्ये सक्रिय आहेत. त्या इचलकरंजी नगरपालिकेच्या नगरसेविका आहेत. कल्लाप्पाण्णा आवाडे यांच्या दुसऱ्या सुनबाई सपना आवाडे या इंदिरा महिला सूतगिरणीच्या अध्यक्षा आहेत. तर कल्लाप्पा आवाडे

यांचे चिरंजीव व सपना आवाडे यांचे पती उत्तम आवाडे हे जवाहर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष आहेत. अशा पद्धतीने आवडे घराण्याच्या तीन पिढ्या राजकारणामध्ये सक्रिय असल्याच्या दिसतात.

## ३४. माने घराणे

- **बाळासाहेब माने :** इचलकरंजीतील दुसरे महत्त्वाचे राजघराणे म्हणून माने घराण्याकडे पाहिले जाते. कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या राजकारणामध्ये बाळासाहेब माने यांचा मोठा दरारा आहे. कोणतीही संस्था पाठीशी नसताना देखील त्यांनी जिल्ह्यात अनेक कार्यकर्ते निर्माण केले. त्यांच्याकडील विलक्षण लोकसंग्रह या गुणामुळे त्यांनी १९७७, १९८०, १९८४, १९८९, १९९१ असे सलग पाच वेळा लोकसभेवर निवडून जाण्याचा मान मिळवला.[१४] त्यांनी स्वतः कधीही सहकारी संस्था स्थापन केल्या नाहीत, परंतु त्यांनी अशा सहकारी संस्था स्थापन करणारांना नेहमीच पाठिंबा दिला आहे. त्या जोरावर त्यांनी इचलकरंजीच्या राजकारणामध्ये आपले वेगळेस्थान निर्माण केलेले आहे. बाळासाहेब माने यांच्या निधनानंतर त्यांच्या सुनबाई निवेदिता माने व धैर्यशील माने हे राजकारणामध्ये सक्रिय झालेल्या दिसतात.
- **निवेदिता माने :** १९९६ साली निवेदिता माने यांनी अपक्ष म्हणून लोकसभेची निवडणूक लढवली. परंतु या निवडणुकीमध्ये त्यांना अपयश आले. १९९९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या बाजूने लोकसभेची निवडणूक लढवली त्यामध्ये त्या विजयी झाल्या. त्यानंतर २००४ मध्ये झालेल्या निवडणुकीमध्ये देखील त्या पुन्हा निवडून आल्या. २००९ च्या लोकसभा निवडणुकीत शेतकरी संघटनेचे राजू शेट्टी यांच्याकडून त्यांचा पराभव झाला.
- **धैर्यशील माने** (निवेदिताचे पुत्र) : धैर्यशील माने हे माने घराण्यातील तिसऱ्या पिढीचे वारसदार आहे. धैर्यशील माने हे कोल्हापूर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष म्हणून काही काळ राहिले. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत शिवसेनेकडून धैर्यशिल माने यांनी निवडणूक लढवून शेतकरी संघटनेचे राजू शेट्टी यांचा पराभव केला. २०२२ च्या शिवसेनेच्या फुटीमध्ये ते एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना गटात सामील झाले. ते सद्या सहकारी संस्था व शिक्षण संस्था यांच्या माध्यमातून कार्यरत असलेले दिसतात.

## ३५. कोरे घराणे

सहकार क्षेत्रात नावजलेले गाव म्हणजे वारणा होय सहकार महर्षी विश्वनाथ उर्फ तात्यासाहेब कोरे यांनी १९५५ मध्ये वारणा सहकारी साखर कारखान्याची उभारणी केली.[९५] पन्हाळा तालुक्यामधील जनतेमध्ये आर्थिक क्रांती वारणाने घडवून आणली. वारणा दूध, वारणा बँक, वारणा बाजार, कुक्कुटपालन संस्था, सहकारी पाणीपुरवठा संस्था व शिक्षण संस्था यामध्ये वारणाचे नाव उज्ज्वल करण्यात तात्यासाहेब कोरे यांचे योगदान महत्त्वाचे आहे. त्यांच्या निधनानंतर त्यांचे पुत्र विलासराव कोरे हे कारखान्याचे अध्यक्ष झाले. विलासरावानंतर त्यांची दोन मुले निपुणराव आणि विनय यांनी कोरे घराण्याची धुरा सांभाळली. विनय कोरे यांची आई शोभाताई कोरे या वारणा साखर कारखान्याच्या अध्यक्षा तर निपुणराव हे वारणा बँकेचे अध्यक्ष झाले.

- **विनय कोरे :** विनय कोरे राजकारणात युवक काँग्रेसच्या माध्यमातून सक्रीय झाले. १९९९ साली त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून विधानसभा निवडणूक लढवली व ते विजयी झाले. त्यानंतर २००४ मध्ये जनसुराज्य पार्टी स्थापन केली. जनसुराज्य पक्षाच्या माध्यमातून चार सदस्य विधानसभेवर निवडून गेले. सत्ता स्थापनेच्या वेळी त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला सहकार्य केल्यामुळे त्यावेळेस त्यांना फलोत्पादन मंत्री पद मिळाले. २००४ ते २००९ पर्यंत ते मंत्रीपदावर होते. २००९ च्या पुनर्रचित शाहूवाडी या मतदारसंघातून विधानसभा निवडणूक लढवली परंतु त्यांचा शिवसेनेचे सत्यजित पाटील यांच्याकडून पराभव झाला. सन २०१४ व २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत शाहूवाडी मतदार संघातून ते विजयी झाले. सहकार क्षेत्रात विनय कोरे यांनी चांगली कामगिरी केली. त्यामध्ये वारणा साखर कारखाना व दूध प्रकल्पास आधुनिकतेची जोड देत, उद्योगांचा नावलौकिक वाढवण्याचे कार्य त्यांनी केले. वारणा बाजार त्यांनी मोठ्या प्रमाणावर विस्तारित केला. तसेच वारणा एज्युकेशन सोसायटीमध्ये देखील त्यांनी महत्त्वपूर्ण असे कार्य केलेले आहे.

## ३६. डी. वाय. पाटील घराणे

डी. वाय. पाटील हे सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलेले त्यांनी स्वकर्तृत्वावर शैक्षणिक, राजकीय व सामाजिक क्षेत्रात वेगळा ठसा उमटवला आहे. त्यांचे घराणे कोल्हापूर जिल्ह्याच्या राजकारणात सक्रीय आहे. १९६२ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये

त्यांना काँग्रेस पक्षाकडून तिकीट नाकारण्यात आले. परंतु १९६७ मध्ये मात्र ते पन्हाळा विधानसभा मतदारसंघातून निवडून आले. पुढे वसंतदादा पाटील यांनी त्यांना विनाअनुदानित तत्त्वावर शिक्षण संस्था काढण्याची परवानगी दिली. त्यामुळे डी. वाय. पाटील यांच्या शिक्षण संस्थाचा वटवृक्ष निर्माण झाला. त्यांच्या अनेक संस्था अभिमात विद्यापीठ म्हणून नावारुपास आल्या आहेत. त्यांनी काही काळा त्रिपुरा व बिहारच्या राज्यपालपदी देखील काम केलेले आहे. डी.वाय.पाटील यांनी आपला मुलगा सतेज पाटील यांना आपला राजकीय वारस म्हणून पुढे आणले आहे.

- **सतेज पाटील :** सतेज पाटील यांचे शिक्षण क्षेत्रात भरीव योगदान आहे. डी.वाय.पाटील अभिमत विद्यापीठाचे कुलपती असताना त्यांनी राजकारणामध्ये प्रवेश केला. सन २००४ साली विधानसभा निवडणुकीमध्ये करवीर मतदारसंघांमधून कॅबीनेट आरोग्यमंत्री दिग्वीजय खानविलकर यांना पराभूत करून ते निवडून आले. सन २००९ मध्ये कोल्हापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघातून दुसऱ्यांदा निवडून आले. पण सन २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत महादेवराव महाडिक यांचे पुत्र अमल महाडिक यांच्याकडून त्यांना पराभव पत्करावा लागला. पुढे २०१५ मध्ये ते कोल्हापूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघातून विधानपरिषदेवर महादेवराव महाडिक यांचा पराभव करून निवडून आले व २०२१ मध्ये कोल्हापूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघातून ते बिनविरोध निवडून आले.[९६] पृथ्वीराज चव्हाण व उद्धव ठाकरे यांच्या मंत्रीमंडळात राज्यमंत्री म्हणून सतेज पाटील यांनी प्रभावपणे काम पाहिले. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत डी.वाय. पाटील यांचे नातू व सतेज पाटील यांचे पुतणे ऋतुराज पाटील यांनी कोल्हापूर दक्षिण विधानसभा मतदार संघातून काँग्रेस पक्षाकडून निवडणूक लढवून भाजपचे अमल महाडिक यांचा पराभव केला. सद्या सतेज पाटील विविध सहकारी संस्था व शिक्षण संस्था यांच्या माध्यमातून कार्यकरत आहेत. तसेच कोल्हापूर जिल्ह्यावर काँग्रेसच्या माध्यमातून आपला प्रभाव टिकवून आहेत.

## ३७. महाडिक घराणे

- **महादेवराव महाडिक :** एक प्रसिद्ध उद्योजकापासून राजकारणामध्ये प्रवेश केल्यानंतर महादेवराव महाडिक यांनी राजकारणाचे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकाच्या माध्यमातून प्रवेश केला. त्यांनी ताराराणी आघाडीच्या माध्यमातून निवडणुका लढविल्या व महापौर पदाची

संदी आपल्या कार्यकर्त्यांना मिळावी म्हणून त्यांनी तीन महिन्याचा महापौर, गोकुळ दूध संघाच्या निवडणुकीत मतदारांना सहलीला नेण्याचा पॅटर्न राबवत प्रस्थापित राजकारण्यांना दणका दिला. कोल्हापूर जिल्ह्यातील एक वजनदार राजकारणी म्हणून त्यांना ओळखले जाते. काँग्रेस पक्षाच्यामाध्यमातून ते सलग तीन वेळा विधान परिषदेवर निवडून गेले. जिल्ह्याच्या राजकारणावर महाडिक घराण्याचा दबदबा आहे. गोकुळ दूध संघावर त्यांची प्रदीर्घकाळ सत्ता राहिल्यामुळे कोल्हापूर जिल्ह्याच्या राजकारणावर महाडिक घराण्याचा प्रभाव असल्याचे दिसते.

- **धनंजय महाडिक :** कोल्हापूर जिल्ह्यातील एक नावाजलेले व ताकतवान घराणे म्हणून महाडिक घराण्याला ओळखले जाते. महादेवराव महाडिक यांचे पुतणे धनंजय महाडिक हे राष्ट्रवादी काँग्रेसचे २०१४ ते २०१९ या काळात कोल्हापूर जिल्ह्याचे खासदार होते. तर भाऊ अमल महाडिक हे २०१४ मध्ये भारतीय जनता पार्टीचे आमदार व अमल महाडिक यांच्या पत्नी शौमिका महाडिक या कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा होत्या.[१७] २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत शिवसेनेचे संजय मंडलिक यांनी त्यांचा पराभव केला. २०२२ मध्ये राज्यसभेवर भारतीय जनता पक्षाकडून धनंजय महाडिक निवडून आले.

## सारांश

अशाप्रकारे महाराष्ट्रामध्ये राजकीय घराणी निर्माण झाली असून यातील बहुतेक घराणी ही सहकार क्षेत्राच्या माध्यमातून उदयास आलेली आहेत, विशेषतः अहमदनगर जिल्ह्यामधून सहकार क्षेत्राची सुरूवात झाली. त्यानंतर प्रत्येक जिल्ह्यात सहकाराच्या माध्यमातूनराजकीय घराण्यांची निर्मिती झालेली दिसते. याशिवाय सहकार क्षेत्राचा आधार नसलेली काही घराणी राज्याच्या राजकारणामध्ये सक्रीय असलेली दिसतात. परंतु त्यांची संख्या अगदीच अल्प अशी आहे. या घराण्यातील अभिजनांनी सहकारी संस्थांच्या आधाराने प्रभावी कार्य करुन महाराष्ट्राच्या राजकारणात महत्वाची भूमिका बजावली आहे. सहकाराच्या माध्यमातून त्यांनी आपआपल्या मतदार संघामध्ये व जिल्ह्यामधील अनेक लोकांचे प्रश्न सोडविण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने शिक्षण, नोकरी, राजकीय पदे इत्यादी महत्त्वपूर्ण प्रश्न हाताळून आपल्या मतदार संघावर मजबूत पकड निर्माण केली आहे. त्या मतदार संघामध्ये त्यांच्याशिवाय दुसरा कोणीही निवडून येऊ शकत नाही किंवा येणार नाही, अशीच व्यवस्था या

अभिजनांनी केलेली आहे. परिणामी राज्याच्या मंत्रीमंडळामध्ये अनेक महत्त्वाच्या खात्यासह मुख्यमंत्रीपदी काम करण्याचा संधाही त्यांना दिली. उदा. बाळ ठाकरे यांनी नारायण राणे यांना मुख्यमंत्री केले. सहकाराचा कोणताही आधार नसतानाही अनेकांनी उदा. राजू शेट्टी, रघुनाथ पाटील, सदाभाऊ खोत आदींनी चळवळीच्या मार्गाने शेतकऱ्यांच्या, सर्वसामान्यांच्या विविध प्रश्नावर अनेक लढे दिले. या लढ्याच्या प्रेरणेतूनच राज्यातील तमाम शेतकरी वर्ग व सामान्य वर्ग राजकीयदृष्ट्या जागृत होऊन संघटीत होण्यास मदत झाली. हा सर्व वर्ग या अभिजनांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहिला. या सर्वांमध्ये ऐक्य निर्माण करुन त्यांची संघटनात्मक बांधणी करण्यात हा अभिजन वर्ग यशस्वी झाला. परिणामी सरपंच, पंचायत समिती, जिल्हा परिषद सभापती, सदस्य, नगरसेवक, महापौर, साखर कारखान्याचे चेअरमन, शिक्षण संस्थांचे अध्यक्ष, बँका, दूध संघ, आमदार, खासदार, मंत्री, मुख्यमंत्री अशा विविध सहकारी, स्थानिक स्वराज्य संस्था आपल्याच घराण्यात ठेवण्यात ही अभिजनांची घराणी यशस्वी झाली आहेत. ज्या कार्यकर्त्यांच्या जिवावर आपण मोठे झालो. प्रस्थापित झालो, याचा विसर या घराण्यांना पडलेला आहे. त्यामुळे सर्वसामान्य कुटुंबातून आलेले अनेक कार्यकर्ते सत्तेपासून, सत्तेच्या लाभापासून वंचित राहिल्याचे राजकीय चित्र संबंध महाराष्ट्रामध्ये दिसत आहे.

अशी अनेक राजकीय घराणी राज्याच्या राजकारणामध्ये सक्रीय असली तरी लोकशाहीच्या गोंडस नावाखाली काही मोजक्याच घराण्यांच्या हातामध्ये सत्तेच्या चाव्या असलेल्या दिसतात. लोकशाहीच्या आडून राज्यामध्ये संस्थाने व संरमजामी मानसिकता स्थिरावलेली आहे, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्यघटना निर्माण करुन आदर्श लोकशाही, भारतासाठी तयार केली. ही लोकशाही सर्व सामान्यांपर्यंत रुजविण्याचा प्रयत्न केला. स्वातंत्र्यपूर्व कालखंडामध्ये भारतात राजेशाही होती. त्यामुळे सर्वसामान्यांना सत्तेमध्ये सहभाग मिळत नव्हता. शासनाच्या चूकीच्या धोरणाविरुद्ध बंड करण्याचा अधिकार जनतेला नव्हता, बळी तो कानपिळी अशीच व्यवस्था होती म्हणून डॉ. आंबेडकरांनी संसदीय लोकशाहीचा स्वीकार केला. परिणामी तळागाळातील सर्व सामान्यांना व दलितवर्गाला देखील सत्तेमध्ये समान संधी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला. परंतु स्वातंत्र्योत्तर कालखंडामधील राजकारणामध्ये भांडवलदार, जमिनदारांचा शिरकाव झाला आणि त्यांनी आपल्या सोईनुसार सामान्य लोकांना वेगवेगळी अमिषे दाखवून निवडणूकीच्या माध्यमातून घराणेशाही रूजवली व

पूर्वीचीच राजेशाहीचे रुपांतर घराणेशाहीमध्ये करून लोकशाहीच्या माध्यमातून घराणेशाही पद्धतशिरपणे रूजीवली असल्याचे चित्र सर्वत्र पाहावयास मिळत आहे. एकाच घराण्यातल्या अनेकांच्या नावाने सत्ता घराण्यामध्ये स्थिरावत आहे. स्वकीयांना राजकारणामध्ये सक्रीय करूण सत्ता काबीज करण्यासाठी लोकशाहीचा उपयोग केला जात आहे.

या पद्धतीचा अवलंब सहकाराच्या माध्यमातून काँग्रेस पक्षाने सुरू केला व भारतीय राजकारणामध्ये घराणेशाहीची सुरुवात केली. आज देशातील सर्वच राजकीय पक्षामध्ये घराणेशाही घट्टपणे रुजली आहे. ज्या पक्षाने काँग्रेसवर, घराणेशाहीवर सातत्याने टिका केली. त्या भाजपनेही इनकमिंगच्या माध्यमातून घराणेशाहीचे उघडपणे समर्थन केल्याचे दिसते. भाजप हा पक्ष सध्या प्रति काँग्रेस म्हणून भारताच्या राजकारणामध्ये ओळखू लागलेला आहे. थोडक्यात पक्ष कोणताही असो, व्यवस्था कोणतीही असो, सत्ताही काही ठराविक घराण्यांच्या अभिजनांच्याच हातात एकवटलेली दिसते. या घराण्यांना सोबत घेतल्याशिवाय सत्ता स्थापन करता येत नाही. त्यांना डावलून तालुका, जिल्हा व राज्याचे राजकारण करताच येत नाही, हीच वस्तूस्थिती आहे. ज्यांनी आयुष्यभर पक्षाशी एकनिष्ठ राहून पक्ष वाढविला. नेत्यांशी एकनिष्ठ राहिले. संस्था प्रगतीत सहभाग नोंदविला. नेतृत्त्वाबरोबर रस्त्यावर उपरून आंदोलने केली तो सर्वसामान्य कार्यकर्ता या घराणेशाहीचा बळी ठरला आहे. तो सत्तेच्या राजकारणापासून लांब असून उपेक्षीत असताना दिसतो. तरी ही फार मोठी खंत घराणेशाहीचा अभ्यास करताना जाणवते. अशा सामान्य कार्यकर्त्यांचा कोठे तरी विचार व्हावा, फक्त कार्यकत्यांची घराणी तयार होताना भविष्यात दिसतात. राजेशाहीत हुजरेगिरी, राजकीय घराणेशाहीत कार्यकर्त्यांची लाळघोटेगिरी व अल्प फायद्यावर संतुष्ट होणे एवढेच काम कार्यकर्त्यांच्या नशिबी हेच सत्य आहे. पार्श्वभूमीवर प्रस्तुत शोधप्रबंधात सातारा जिल्ह्यातील राजकीय घराण्याचा सखोल व सविस्तर अभ्यास पुढील प्रकरणामध्ये करण्यात आला आहे.

## संदर्भ ग्रंथसूची

१. देवगावकर एस. जी., 'राजकीय मानववंशशास्त्र' श्री साईनाथ प्रकाशन, २००९ पृ. क्र. ५०

२. गायहानी रं. ना. व. ग. राहूरकर 'प्राचीन भारताचा सांस्कृतीक इतिहास' कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे पृ. क्र. १४३

३. उपरोक्त पृ. क्र. ९९

४. ओक प्रसाद, 'पेशवे धराण्याचा इतिहास' कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे तिसरी आवत्ती पृ. ७

५. कुलकर्णी हेरंब, पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा घराणेशाही अहवाल, पृ. २०

६. फडके, य. दी., राजकारणाचे बदलते स्वरूप, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८२, पृ. ४२

७. पळशीकर सुहास, बिस्मल नितीन, महाराष्ट्राचे राजकारण, (राजकीय प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ) प्रतिमा प्रकाशन, पुणे १९९३, पृ. ८२

८. सिरसीकर व.म. 'आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण,' कॉन्टिनेन्टल प्रकाशन विजयानगर, पुणे, व्दितीय आवृत्ती २००८ पृ. क्र. ३६

९. भारत जनगनणा अहवाल, २०२१, सातारा जिल्हा, पृ. १७.

१०. चोरमारे विजय, 'महाराष्ट्राचे राजकारण नवे संदर्भ,' नवत बुक वर्ल्ड मुंबई २०१४ पृ. क्र. २४

११. भोले भा. ल. बेडकिहाल किशोर, 'बदलता महाराष्ट्र' (साठोत्तर परिवर्तनाचा मागोवा) आंबेडकर अकादमी, सातारा, प्रकाशन क्र. ८ दुसरी आवृत्ती २००३, पृ. क्र. ८

१२. उपरोक्त पृ. क्र. ९

१३. कारेकर शोभा, डॉ. शरद घोडके 'महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण' पृ. क्र. २४७, २४८

१४. साधू अरूण, 'सहकार धुरीण, रोहन प्रकाशन, पुणे २०१४ पृ. क्र. ३१

१५. उपरोक्त, पृ. क्र. ७२

१६. मंगळवेढेकर राजा, (संपा), 'भूमिपुत्र–पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांचे चरित्र' प्रवरानगर, १९७७ पृ. क्र. ७२

१७. शेवाळे सीमा, दिगंबर, महाराष्ट्रातील ग्रामीण नेतृत्व आणि सहकार चळवळीतील आण्णासाहेब मगर विशेष अभ्यास १९९१ ते १९७९ अप्रकाशित पीएच.डी. शोधप्रबंध इतिहास विभाग, सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ, पुणे २०१५, पृ. क्र. ४०, ४१

१८. आवळे मनोज, महाराष्ट्रातील राजकीय घराणी, आदिश्रेय प्रकाशन, पुणे, पृ. ११९, १२
BBC News, मराठी https://www.bbc.com/marathi/india-48455459

१९. मंगळवेढेकर राजा, (संपा), 'भूमिपुत्र–पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांचे चरित्र' प्रवरानगर, १९७७ पृ. क्र. ३०

२०. B. S. Baviskar : The Politics of Development : Sugar Co-Operatives in Rural Maharashtra –Oxford University Press : Calcutta, 1980. Print. pp.60

२१. आवळे मनोज, महाराष्ट्रातील राजकाय घराण्यातील, आदिश्रय प्रकाशन, पुणे– पृ. क्र. ११९, १२२ २१.

२२. Richardson, Joy,The contract System in the Qrganization of Harvesting Labour by Sugar Factories in Maharashtra, 1978 (mimeo.) pp. 42

२३. उपरोक्त, पृ. क्र. १२३ ते १२७

२४. मंगळवेढेकर राजा, (संपा), 'भूमिपुत्र–पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांचे चरित्र' प्रवरानगर, १९७७ पृ. क्र. ८०

२५. अनुवाद : सतिश कामत – प्रवण रॉय दोश बआर सोपारीवाला, कौल लोकमताचा, भारतीय निवडणुकांची उकल, मनोविकास प्रकाशन, नारायण पेठ पुणे, २०१९ पान नं. ६९

२६. भारदे बाळासाहेब : काँग्रेस, काल आज उद्या : पृथ्वीराज प्रकाशन, पुणे, १९९४, पान नं. ८५

२७. मंगळवेढेकर राजा, (संपा), 'भूमिपुत्र–पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांचे चरित्र' प्रवरानगर, १९७७ पृ. क्र. ३०

२८. पागे वि. स. : महाराष्ट्र विधानरपरिषद सदस्यांनी आडनावानुक्रमे यादी (सन १९३७ ते २०१३), संसदीय प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र विधीमंडळ सचिवालय विधानभवन, मुंबई, नागपूर–२०१३. पान नं. ३५

२९. कुलकर्णी हेरंब, ‘पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा घराणेशाही’ अहवाल

३०. चोरमारे विजय, ’महाराष्ट्राचे राजकारण : नवे संदर्भ,’ नवता बुक व वर्ल्ड, मुंबई २०१४, पृ. क्र. ४०

३१. भावे मधुकर, पवार शरद, ’आष्टा व धानी अनप्रेडक्टेबल’ लोकसत्ता–दिवाळी अंक २०१० पृ. क्र. ६५

३२. उपरोक्त, पृ. क्र. ७०

३३. चोरमारे विजय, ’महाराष्ट्राचे राजकारण : नवे संदर्भ,’ नवता बुक व वर्ल्ड, मुंबई २०१४, पृ. क्र. ६७

३४. मोरे संग्राम : ग्रामीण विकासाचे राजकारण आणि काँग्रेस, अरुणा प्रकाशन, लातूर, ऑगस्ट २०१०, पान नं. ८२

३५. https://mr.wikipedia.org/wiki/%E0%-4%-C%E0%-4%BE%E0%-4%B3š%E0 %-4%-0%E0%-4%BE%E0%-4%95%E0%-4%B0%E0%-5%87

३६. रायकर राजाभाऊ, जोशी दिलीप : समर्थ शिवसेना, प्रकाशक, रायकर राजाभाऊ, पितृछाया, सदाशिव पेठ पुणे, प्रथम आवृत्ती, २००५, पान १३७

३७. आवळे मनोज, ’महाराष्ट्रातील राजकीय घराणी’, उपरोक्त पृ. क्र. २६, २७

३८. उपरोक्त पृ. क्र. २७, २८, २९ ६७

३९. डॉ. मेहेंदळे विश्वास, ’यशवंतराव ते विलासराव’, अनुबंध प्रकाशन पुणे, दुसरी आवृत्ती २००७ पृ. क्र. ३६, ३४.

४०. ठाकूर योगेंद्र, ‘शिवसेना समज–गैरसमज’, अमोद प्रकाशन, २०११, मुंबई, पृ. ६५

४१. पळशीकर सुहास, कुलकर्णी सुहास– ‘महाराष्ट्रातील सत्ता संघर्ष– राजकीय पक्षांची वाटचाल’, समकालीन प्रकाशन, पुणे, २०११, पृ. ४८.

४२. डॉ. मेहेंदळे विश्वास, 'यशवंतराव ते विलासराव', अनुबंध प्रकाशन पुणे, दुसरी आवृत्ती २००७ पृ. क्र. ४०

४३. भारदे बाळासाहेब : कॉंग्रेस, काल आज उद्या : पृथ्वीराज प्रकाशन, पुणे, १९९४, पानं. ६५

४४. पळशीकर सुहास, 'भारतातील प्रादेशिक पक्षाचे राजकारण', साधना प्रकाशन, पुणे, २००९, पृ. २४

४५. पळशीकर सुहास, 'देश–प्रदेश प्रादेशिक राजकारणाच्या बदलत्या दिशा', २०१४, साधना प्रकाशन, पुणे, २००९, पृ. २४

पृ. ३२

४६. आवळे मनोज, महाराष्ट्रातील राजकीय घराणी, आदिश्रेय प्रकाशन, पुणे, पृ.२५

४७. ठाकूर योगेंद्र, 'शिवसेना समज–गैरसमज', अमोद प्रकाशन, २०११, मुंबई, पृ. २०

४८. ढवळे अशोक : शिवसेना निमफॅसिझमचा आविष्कार, जनशक्ती प्रकाशन, मुंबई, २००१ पान नं. १३०

४९. आवळे मनोज, 'महाराष्ट्रातील राजकीय घराणी', उपरोक्त पृ. क्र. १४, १५

५०. फडके य. दि. : पक्षांतराचे राजकारण, अक्षय प्रकाशन, मुंबई, २००१, पृ. ३०

५१. फडके य. दि., 'भारतातील निवडणूका १९५२ ते १९९९', अक्षर प्रकाशन, मुंबई

५२. पळशीकर सुहास व कुलकर्णी सुहास, 'महाराष्ट्रातील सत्ता संघर्ष : राजकीय पक्षांची वाटचाल', समकालिन प्रकाशन, पुणे, २०११

५३. ठाकूर योगेंद्र, 'शिवसेना समज–गैरसमज', अमोद प्रकाशन, २०११, मुंबई, पृ. २५

५४. वर्दापूरकर प्रविण, सुधाकर नाईक मिश्कील आणि खंबीर, लोकसत्ता दिवाळी अंक २०१० पृ. क्र.९३

५५. https://mr.wikipedia.org/wiki/%E0%-4%B5%E0%-4%B8%E0%-4%82%E0 %-4%-4%E0%-4%B0%E0%-4%BE%E0%-4%B5š%E0%-4%-8%E0%-4%B
E%E0%-4%88%E0%-4%95

५६. वर्दापूरकर प्रविण, सुधाकर नाईक मिश्कील आणि खंबीर, लोकसत्ता दिवाळी अंक २०१० पृ. क्र.१००
५७. आवळे मनोज, महाराष्ट्रातील राजकीय घराणी, आदिश्रेय प्रकाशन, पुणे, पृ. ४०
५८. डॉ. मेहेंदळे विश्वास, 'यशवंतराव ते विलासराव', अनुबंध प्रकाशन पुणे, दुसरी आवृत्ती २००७ पृ. क्र. ४५
५९. चावरे दिलीप, 'पटले तेच रेटले', शंकराव चव्हाण, लोकसत्ता दिवाळी अंक पृ. क्र. २५
६०. चोरमारे विजय, 'महाराष्ट्राचे राजकारण नवे संदर्भ', नवता प्रकाशन २०१४ पृ. क्र. ४३
६१. सिरसीकर व.म. 'आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण,' कॉन्टिनेन्टल प्रकाशन विजयानगर, पुणे, व्दितीय आवृत्ती २००८ पृ. क्र.५५
६२. https://www.wikiwand.com/en/ShankarraošChavan
६३. खडसे समर, 'अशोक चव्हाण अजून तरी आहेत,' लोकसत्ता दिवाळी अंक पृ. क्र. १६
६४. आवळे मनोज, महाराष्ट्रातील राजकीय घराणी, आदिश्रेय प्रकाशन, पुणे, पृ. ५६
६५. मेहेंदळे विश्वास, 'यशवंतराव ते विलासराव', उपरोक्त पृ. क्र. ११७, ११८
६६. हसनीरा सुरेंद्र, 'वसंतदादा पाटील सर्वाचेच दादा' लोकसत्ता दिवाळी २०१२, पृ. क्र. ५४
६७. शिरशीकर व. म. 'आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण', उपरोक्त पृ. क्र. १८४
६८. डॉ. मेहेंदळे विश्वास, 'यशवंतराव ते विलासराव', अनुबंध प्रकाशन पुणे, दुसरी आवृत्ती २००७ पृ. क्र. ७०
६९. परदेशी, चव्हाण : महाराष्ट्राच्या राजकारणात मराठा, २००५ पान नं. ११०
७०. पळशीकर सुहास, 'जात व महाराष्ट्रातील सत्ताकारण', सुगावा प्रकाशन, पुणे १९९८, पृ. क्र. २५
७१. लेले जयवंत : भारत समाज आणि राजकारण, यशवंतराव यांचे प्रकट चिंतन, रोहन प्रकाशन, पुणे, २०२०, पान नं. ३८
७२. डॉ. मेहेंदळे विश्वास, 'यशवंतराव ते विलासराव', अनुबंध प्रकाशन पुणे, दुसरी आवृत्ती २००७ पृ. क्र.५०

७३. https://mr.wikipedia.org/wiki/%E0%-4%B6%E0%-4%B0%E0%-4%-6š%E0%-4%--%E0%-4%B5%E0%-4%BE%E0%-4%B0
७४. उपरोक्त, पृ. क्र. ७२
७५. आवळे मनोज, महाराष्ट्रातील राजकीय घराणी, आदिश्रेय प्रकाशन, पुणे, पृ. २८
७६. आवळे मनोज, महाराष्ट्रातील राजकीय घराणी, आदिश्रेय प्रकाशन, पुणे, पृ. ९२
७७. सिरसीकर व. मं., 'आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण' कॉन्टिनेंटल प्रकाशन पुणे दुसरी आवृत्ती, २००८ पृ. क्र. २०५ –२०६
७८. चोरमारे विजय, 'महाराष्ट्राचे राजकारण : नवे संदर्भ,' नवता बुक व वर्ल्ड, मुंबई २०१४, पृ. क्र. ६२
७९. खांडेकर राजीव, 'नाडले, सुशिलकुमार शिंदे', लोकसत्ता दिवाळी अंक २०१०, पृ. क्र. ११७
८०. आवळे मनोज, महाराष्ट्रातील राजकीय घराणी, आदिश्रेय प्रकाशन, पुणे, पृ.४३
८१. B. S. Baviskar : The Politics of Development : Sugar Co-Operatives in Rural Maharashtra –Oxford University Press : Calcutta, 1980. Print. pp82
८२. परदेशी, चव्हाण : महाराष्ट्राच्या राजकारणात मराठा, २००५ पान नं. ११२
८३. मोरे विठ्ठल, 'महाराष्ट्राच्या राजकारणातील आघाड्या व भवितव्य', अरुणा प्रकाशन, लातूर, २०१३, पृ. २३
८४. मोरे विठ्ठल, 'महाराष्ट्रातील आघाड्याचे राजकारण : पार्श्वभूमी आणि पुढील दिशा', अरुणा प्रकाशन, लातूर, २०१५, पृ. ३७
८५. आवळे मनोज, महाराष्ट्रातील राजकीय घराणी, आदिश्रेय प्रकाशन, पुणे, पृ.१२०
८६. मोरे संग्राम : ग्रामीण विकासाचे राजकारण आणि काँग्रेस, अरुणा प्रकाशन, लातूर, ऑगस्ट २०१० पान नं.७७
८७. पाटील रा. तु., 'सांगली–सातार्‍याचे राजकारण', अजय प्रेस, कराड, १९८६, पृ.१०
८८. https://mr.wikipedia.org/wiki/%E0%-4%B5%E0%-4%B8%E0%-4%82%E0 %-4%-4%E0%-4%B0%E0%-4%BE%E0%-4%B5š%E0%-

4%-6%E0%-4%B E%E0%-4%-6%E0%-4%BE%E0%-4%--%E0%-4%BE%E0%-4%9F%E0%- 5%80%E0%-4%B2

८९. चावळे सुनिल, 'निवांत विलासराव' लोकसत्ता दिवाळी अंक २०१० पृ. क्र. १०९

९०. पाटील रा. तु., 'सांगली–साताऱ्याचे राजकारण', अजय प्रेस, कराड, १९८६, पृ. २५

९१. पळशीकर सुहास, बिरमल नितीन, 'महाराष्ट्राचे राजकारण' (राजकीय प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ) प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००७.

९२. चोरमारे विजय, 'महाराष्ट्राचे राजकारण नवे संदर्भ' नवता प्रकाशन, २०१४, पृ. ४३, ४८

९३. Baviskar, B. S : Faction and Party Plitisl : General Elections in an Assembly constituency im Maharashtra, Sociological Bulletin, Vol. XX, no. 1 (March 1971), pp. 138

९४. पवार प्रकाश, 'महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना', प्रतिमा प्रकाशन पुणे, २००९, पृ. २५

९५. अनुवाद : सतिश कामत – प्रवण रॉय दोश बआर सोपारीवाला, कौल लोकमताचा, भारतीय निवडणुकांची उकल, मनोविकास प्रकाशन, नारायण पेठ पुणे, २०१९ पान नं. १८६

९६. परदेशी, चव्हाण : महाराष्ट्राच्या राजकारणात मराठा, २००५, पान नं. ३६८

९७. पळशीकर सुहास, 'समकालीन भारतीय राजकारण' (काँग्रेस वर्चस्व ते हिंदू जमातवाद), प्रतिमा प्रकाशन, २००४, पुणे, पृ. २५

# प्रकरण दुसरे
# संदर्भ साधनांचा आढावा

## प्रस्तावना

महाराष्ट्राच्या राजकीय प्रक्रियेत घराणेशाहीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर महाराष्ट्राच्या राजकारणाचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, राज्यातील काही ठराविक घराणीच राजकीय सत्तेमध्ये सहभागी झाली आहेत. यातील काही घराण्यातील मुळ पुरुषांनी सहकारी संस्था, सहकारी बँका, पतसंस्था, दुध संघ, साखर कारखाने, शिक्षण संस्था, वैद्यकीय शिक्षण देणाऱ्या संस्था पॉलिटेक्नीक, आय.टी.आय., कृषी संस्था, सुतगिरण्या यासारख्या अनेक सहकारी संस्था उभ्या केल्या. त्यामुळे रोजगार व शिक्षणाच्या अनेक संधी निर्माण झाल्या. यातूनच हजारो लोकांच्या हाताला रोजगार मिळाला. ग्रामीण भागातील अडाणी शेतकऱ्यांची मुलं उच्चशिक्षण घेऊ लागली आणि त्यांचा सर्वांगिण विकास होण्यास मोठी मदत झाली. परिणामी मतदार संघासह भागातील जनता संघटीत होऊन संबंधित घराण्याच्या पाठीशी उभी राहिली. या सर्व संघटित शक्तीचा या घराण्यांनी वोट बँक म्हणून वापर केला आणि त्यांनी त्याचा आधार घेऊन राजकीय श्रेष्ठजन यांनी आपला प्रभाव निर्माण केला. त्यांच्या या प्रभावी कार्याची दखल घेऊन महाराष्ट्रातील राजकीय पक्षांनी त्यांना लोकसभा व विधानसभा निवडणूकीची अधिकृत उमेदवारी देऊन त्यांना निवडून आणले. त्यांनी राज्याच्या राजकारणामध्ये अनेक वर्षे सातत्याने आपले निर्विवादपणे वर्चस्व प्रस्थापित केले. पुढे त्यांनी आपल्या राजकीय निवृत्तीनंतर तर काहींनी आपण सत्तेत असतानाच इतर कार्यकर्त्यांचा विचार न करता नातेवाईकाला आपला राजकीय वारस म्हणून पुढे आणले आणि घराणेशाहीची सुरवात केली.

सुरवातीला ही घराणेशाही काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून उदयास आली. काँग्रेस पक्षाने सहकाराची चळवळ गतीमान करून या चळवळीचा फायदा उठवत. काँग्रेस पक्ष संपूर्ण राज्यातील वाडी–वस्तीपर्यंत पोहचविला आणि देशात दिर्घकाळ सत्ता भोगली. नंतरच्या कालखंडामध्ये काँग्रेस पक्षामधून अंतर्गत कलह, मतभेद, नेतृत्त्व स्पर्धा यामुळे अनेक मोठे नेते बाहेर पडले आणि त्यांनी वेगवेगळ्या राज्यामध्ये प्रादेशिक अस्मिता जागृत करून प्रादेशिक पक्षांची निर्मिती केली. या पक्षांनी ही काँग्रेस पक्षाची री ओढत घराणेशाही अधिकच बळकट

केली. आज महाराष्ट्रातील राजकीय पक्षामध्ये घराणेशाही नाही. असा एकही राजकीय पक्ष नाही. परिणामी राज्यातील सर्वसामान्य, दलित, अल्पसंख्यांक व इतर मागास वर्गीयांचे सत्तेमध्ये सहभागी होण्याचे स्वप्न स्वप्नच राहिले. लोकशाही म्हणजे लोकांची सत्ता हे वाक्य केवळ नावापुरतेच राहिले. सत्तेचे व नेतृत्त्वाचे विकेंद्रीकरण करून समाजातील प्रत्येक समाज घटकाला सत्तेमध्ये सहभागी करून घेण्यासाठी सहकार चळवळ उभी केली. मात्र या चळवळीवर ठराविक लोकांनीच आपली मक्तेदारी प्रस्थापित केली आणि सत्ता आपल्याच घरात कशी राहील, याची काळजी घेतली. आज घराणेशाही विरुद्ध संपूर्ण महाराष्ट्रभर लोकं दबक्या आवाजात चर्चा करतात. मात्र प्रत्यक्षात त्यांच्या विरोधात जाण्याचे व बंड करण्याचे धाडस कोणीच करताना दिसत नाही. आणि कोणी असे धाडस केले व तो त्यांच्या विरुद्ध निवडणुकीत उभा राहिला तर तो निवडून येण्याची शक्यता नसते. हे आजचे राजकीय चित्र आहे. वारसा हक्काने पिढ्यान्– पिढ्या सत्तेला चिटकून बसलेल्या घराण्यांचा व त्यांच्या वारसांचा अभ्यास होणे आवश्यक व गरजेचे आहे. या अनुशंगाने काही निवडक राजकीय घराण्यांचा अभ्यास झाला आहे. परंतु त्यामध्ये १९९० ते २०१५ या कालखंडातील सातारा जिल्ह्यातील राजकीय घराण्यांचा सविस्तर संशोधनात्मक पद्धतीने अभ्यास झाल्याचे आढळत नाही. म्हणून प्रस्तुत अभ्यासाला पार्श्वभूमी निर्माण करून देण्यासाठी जे प्रस्तुत संशोधन पूर्व अभ्यास व साहित्य उपलब्ध आहे त्याचा सविस्तर आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामध्ये–

**१. कुलकर्णी हेरंब, 'पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा येथील घराणेशाहीचा अभ्यास' अहवाल.**[१] करून अहवाल प्रसिद्ध केला आहे. त्यामध्ये ते असे लिहितात की, घराणेशाहीने लोकशाहीत समान संधी व नेतृत्त्वाचे विकेंद्रीकरण होणे कुंठीत झाले आहे. लोकशाहीच्या नावाखाली या प्रदेशात संस्थानेच राज्य करीत आहेत त्यामुळे आजही सरंजामी मानसिकता टिकून आहे. लोकशाहीचा प्रवाह मोकळेपणाने प्रवाही होण्यासाठी घराणेशाहीचे राजकारण नष्ट होऊन नेतृत्त्वाची संधी सामान्य कार्यकर्त्याला मिळायला हवी. घराण्यांना विरोध नाही मात्र त्यामुळे लोकशाहीतील नेतृत्त्वाची संधी सर्वांना नाकारली जाते. हे वास्तव अधोरेखित करण्यासाठी विधानसभा निवडणूकीच्या वेळी घराणेशाहीचा बालेकिल्ला असलेल्या पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा येथील (२० लोकसभा मतदार संघ) व (विधानसभा निवडणूकीतील ११६ मतदार संघ) उमेदवारांचा अभ्यास केला. त्यांच्या घराणेशाही सोबतच या १४

जिल्ह्यातील जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची राजकीय पार्श्वभूमी व मुख्य म्हणजे या १४ जिल्ह्यांतील १९९ साखर कारखानदारांच्या घराणेशाहीची पार्श्वभूमी अभ्यासून लोकसभा, विधानसभा, जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत यामध्ये घराणेशाही कशी प्रभाव पाडते. याचा अभ्यास केला. पूर्वी घराणेशाही ही केवळ काँग्रेस राष्ट्रवादीची मक्तेदारी होती. त्यामुळे भाजपा–सेना त्यांना विरोध करीत असे व त्या विरोधाचा फायदा शिवसेनेचा विस्तार करण्यासाठी झाला. परंतु आज अनेक घराणेशाहीमधील नेते सत्तेसाठी भाजपा, सेनेकडे गेल्याने घराणेशाही सर्वपक्षीय वैशिष्ट्ये बनले आहे. त्यामुळे आज कोणताच राजकीय पक्ष त्याविरूद्ध बोलताना दिसत नाही.

या अहवालात घराणेशाहीचा निकष हा ज्यांच्या कुटुंबात मागच्या पिढीत कोणी आमदार, खासदार असेल अशा मोठ्या घराणेशाहीचा निकष वापरला आहे. कारखाना, जिल्हा परिषदेची कुटुंबाची पार्श्वभूमी असलेली संख्या लक्षात घेतली असता ती खूप मोठी होईल, म्हणून त्यांनी या अहवालात फक्त ज्या कुटुंबात आमदारकी व खासदारकी होती किंवा आहे तेच लोकसभा, विधानसभेचे उमेदवार जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्ष व चेअरमन इतकी मर्यादित करूनही घराणेशाहीची संख्या खूप मोठ्या प्रमाणात आहे असे लक्षात येते.

**२. आवाळे मनोज, महाराष्ट्रातील राजकीय घराणी, आदिश्रेय प्रकाशन पुणे, (२०१९)[२]:** आवाळे मनोज यांनी महाराष्ट्रातील राजकीय घराणी या ग्रंथामध्ये महाराष्ट्रातील काही ठराविक घराण्यातील नेत्यांनी राज्याच्या राजकारणामध्ये आपले दिर्घकाळ वर्चस्व प्रस्थापित केले असल्याचे तसेच त्यांच्या वारसांनी केलेल्या कार्याचा आढावा घेतला आहे. या घराण्यांचे जनमानसात असलेले स्थान, त्यांच्या ताब्यात असलेल्या सहकारी संस्था, शिक्षण संस्था, साखर कारखाने व त्या माध्यमातून त्यांनी केलेली विकास कामे हे कार्य सत्तेच्या राजकारणात निवडून येण्याची क्षमता कशी वाढविते. या जोरावर राज्याच्या राजकारणावर दिर्घकाळ ठसा उमटविणारी राजकीय घराणी व त्यांचे वारस याविषयी माहिती दिली आहे, त्यांनी या ग्रंथात पुढील घराण्यांचा अभ्यास केलेला आहे. सांगलीचे पाटील (वसंतदादा पाटील, शरद पवार, ठाकरे, महाजन मुंडे, नाईक घराणे, चव्हाण घराणे, निलंगेकर घराणे, नारायण राणे घराणे, देशमुख घराणे विलासराव देशमुख, शिंदे घराणे, कराडचे चव्हाण घराणे, मोहिते पाटील घराणे. या घराण्याबरोबरच भूजबळ घराणे (छगन भुजबळ, पंकज भुजबळ, समीर भुजबळ),

सातारचे भोसले घराणे (अभयसिंह महाराज, उदसिंहराजे व शिवेंद्र राजे भोसले) नाईक–निंबाळकर घराणे, प्रतापराव भोसले घराणे, पाटणचे बाळासाहेब देसाई घराणे, कराडचे पी.डी.पाटील, यशवंतराव मोहिते घराणे, लक्ष्मण पाटील, राजारामबापू पाटील सांगली घराणे, डॉ. पतंगराव कदम घराणे, कोल्हापूरचे शाहू महाराज घराणे, शिवाजीराव पाटील, शेंडगे घराणे, गायकवाड घराणे, कल्लाप्पा आवाडे, बाळासाहेब माने, वारणेचे तात्यासाहेब कोरे घराणे, डी.वाय.पाटील, महाडीक, विखे–पाटील, भाऊसाहेब थोरात, यशवंतराव गडाख, काळे, कोल्हे, शेवगावचे धुळे–पाटील, राहूरीचे तनपुरे, मधुकर पिचड, श्रीरामपुरचे रामराव आदिक, मुरली देवरा, सुनिल दत्त, एकनाथ गायकवाड, भाई ठाकूर, भांडुपचे पाटील, नवी मुंबईचे गणेश नाईक, रायगडचे पाटील, वसंत डावखरे, सुनिल तटकरे, एकनाथ शिंदे, डॉ. पद्‌मसिंह पाटील टोपे, सातवे, दानवे, सावे, माढाचे शिंदे वळसे पाटील, इंदापूरचे शंकरराव पाटील अशा अनेक राजकीय घराण्याचा महाराष्ट्राच्या व संबंधीत जिल्ह्याच्या राजकारणावर कशाप्रकारे प्रभाव पडला याचा सविस्तर अभ्यास मनोज आवळे यांनी केला आहे.[२]

**३. कुलकर्णी म. रा., महाराष्ट्रातील प्रसिद्ध सरदार घराणी शिवकालीन व पेशवे कालीन यांचा अभ्यास, दत्तात्रय ग. पाष्टे, डायमंड पब्लिकेशन्स, सदाशिव पेठ, पुणे. प्रथम आवृत्ती, २००९**

यांचा अभ्यास केला आहे.[३] महाराष्ट्रातील सरदार घराणी या पुस्तकामध्ये कुलकर्णी यांनी महाराष्ट्रातील अनेक शूर वीर घराण्यांचा व त्यांच्या कार्यकर्तृत्त्वाचा अभ्यास केला आहे. स्वराज्य उभारणीच्या कामी आणि त्यांच्या विस्ताराच्याकरिता ज्यांनी आपले वर्चस्व पणाला लावले. अशा घराण्यातील वीर क्रांतिकारकांच्या शौर्य गाथेची ओळख करून दिली. प्रत्यक्षात मराठी सरदार घराण्यांसह विविध जाती–धर्माच्या पोट जातीतील सरदारांची देखील या ग्रंथांमुळे ओळख झाली. अनेक कर्तृत्त्ववान घराण्यांची ही तोंड ओळख करून दिली. त्यामध्ये त्यांनी पुढील घराण्यांचा अभ्यास केला आहे.

**अ) शिवकालीन घराणी :** शिवकालीन घराण्यामध्ये परशुरामपंत प्रतिनिधी, मदारी मेहत्तर, मुरारबाजी देशपांडे, जावळीचे चंद्रराव मोरे, राधो बल्लाळ अत्रे, शंकरराजी नारायण सचिव, कावजी कोंडाळकर, खंडेराव दाभाडे, भोसले घराणे, शहाजी राजे, छ. शिवाजी महाराज, छ. संभाजी महाराज, छ. राजाराम महाराज, राणी ताराबाई भोसले, शिदनाक महार, मोरो तानदेव

होनप, कोंडाजी फर्जंद, कान्होजी आंग्रे, रामचंद्र निळकंठ अमात्य, तानाजी मालुसरे, कान्होजी जेधे, अंताजी शिवदेव मुतालीक (कऱ्हाडकर), अंबाजी विश्वनाथ प्रभू, आवजी हरि चित्रे मुजुमदार, दादोजी कोंडदेव–परिनरकर–मळठणकर कुलकर्णी, फलटणचे निंबाळकर घराणे, प्रतापराव गुजर, धनाजी जाधव, दत्तवाडकर घोरपडे, मुधोळकर घोरपडे, बाजीप्रभू देशपांडे, नेताजी पालकर, आण्णाजी दत्तो (मंत्री), संभाजी कावजी, फिरंगोजी नरसाळा, मोरोपंत पिंगळे, येसाजी कंक, नावजी बलकवडे, सिलींबकर, दौलत खान, मायनाक भंडारी, बर्हिजी नाईक, विश्वासराव दिघे.

**ब) पेशवेकालीन घराणी :** पेशवेकालीन घराण्यामध्ये दामाजी थोरात, कृष्णराव खटावकर देशस्थ ब्राह्मण, उदाजी चव्हाण, रंभाजी निंबाळकर, हैबतराव सिलींबकर देशमुख, चंद्रसेन जाधव, हीनाजी बळकवडे, हरिपंत फडके, ग्वाल्हेरचे शिंदे घराणे, दाणी राजेबहाद्दर–नारो शंकर, शिवभट साठे, पटवर्धन घराणे, हंबीरराव मोहिते (सेनापती), कृष्णाजी धुळप, कान्होजी भोसले, साळुंखे पाटणकर, प्रतापराव भोसले सातारकर, रघुनाथराव उर्फ राघोबा दादा पेशवा, थोरले माधवराव पेशवे, सवाई माधवराव पेशवा, सदाशिवराव भाऊ पेशवे, धारचे पवार घराणे, नागपूरचे भोसले, बाजी रेठरेकर, अंताजी रघुनाथ काथळे, इंदूरचे होळकर नाना फडणवीस, विठ्ठल बल्लाळ, दिवाकर घोरपडे, कापशीचे घोरपडे, गमाजी यमाजी मुतालीक, शितोळे, देशमुख इत्यादी शिवकालीन व पेशवेकालीन घराण्यांचा कुलकर्णी यांनी अभ्यास केला आहे.

४. **शिंदे य. ग. 'महाराष्ट्र विधानसभा निवडणुका' (१९७८, १९८०, १९८५, १९९०) एक दृष्टीकोन, चंदन प्रकाशन पार्वती, पुणे, १९९४ (प्रकाशित)**[४] उपरोक्त संदर्भ ग्रंथामध्ये लेखक य. ग. शिंदे यांनी दोन भागामध्ये अभ्यास केला आहे. पहिल्या भागामध्ये महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासाची विभागवार व जिल्हानिहाय थोडक्यात मांडणी केलेली आहे. १९७८, १९८०, १९८५, १९९० साली झालेल्या विधानसभा निवडणुकीतील मतदारसंघांची विभागानिहाय व जिल्हानिहाय निवडणूक आकडेवारी दिलेली आहे. १९९० साली झालेल्या महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीमध्ये काँग्रेस, जनता दल, शिवसेना, भारतीय जनता पार्टी, शेतकरी कामगार पक्ष इत्यादी राजकीय पक्षांचा व अपक्षांचा एक विश्लेषणात्मक आढावा घेतलेला आहे.

५. **संपा. भोसले प्रविण वसंत रा., 'मराठ्यांची धारातिर्थे' प्रकाशक, सौ. कुसुम भोसले, नरसिंग पब्लिकेशन्स, विश्रामबाग सांगली, २००६** मराठ्यांची धारातिर्थे या ग्रंथात भोसले यांनी मराठ्यांच्या इतिहासातील छ. शिवरायांचे आजोबा मालोजीराजे यांच्या कारकीर्दीपासून संपूर्ण भोसले घराण्यातून उदयास आलेल्या व इतिहास घडविलेल्या व्यक्तींची अंतिम विश्रांतीस्थाने म्हणजेच त्यांच्या समाध्या व कबरी यांची माहिती एकत्रीतपणे इतिहासप्रेमी अभ्यासकांना उपलब्ध करून दिली आहे. मराठ्यांच्या इतिहासातील व्यक्तींची समाधीस्थाने व कबरी, मृत्युपत्रे व जन्मस्थाने पुढीलप्रमाणे याचा त्यांनी अभ्यास केला आहे. त्यामध्ये मालोजीराजे भोसले, लखुजी जाधव, शहाजीराजे भोसले, संभाजीराजे (जिजाऊ पुत्र) छ. शिवराय, राजमाता जिजाऊ, संत तुकाराम, समर्थ रामदास, मौनीबाबा, कवी परमानंद व भूषण, दादोजी कोंडदेव व बाजी पासलकर, कान्होजी जेधे व जिवा महाला, शिवा काशीद, बाजी व फुलाजी प्रभु देशपांडे, मुरारबाजी देशपांडे, तानाजी मालुसरे, सेनापती प्रतापराव गुजर, बाबाजी निंबाळकर, मालोजीराजे व शहाजीराजे कालपट, छ. शिवराय कालपट, गुप्तहेर बर्हिजी नाईक, मायनाक भंडारी व येसाजी कंक, छ. एकोजी राजे (तंजावर), छ. संभाजीराजे, सेनापती हंबीरराव मोहिते, बाळाजी आवजी चिटणीस, छ. शाहू महाराज कालपट, कवी कलश व दुर्गादास, छ. राजाराम महाराज, सेनापती संताजी घोरपडे, सेनापती धनाजी जाधव, बर्हिजी घोरपडे, रामचंद्र पंत अमात्य, शंकराजी नारायण सचिव, परशुराम त्र्यंबक प्रतिनिधी, महाराणी ताराबाई, शहाजान औरंगजेब, आज्जम, अहमद निजामशहा व जॉर्ज ऑक्झेंडन मलिकबंर, बहादूर खान व फत्तेखान, सिद्दी, अब्दुल हसन तानाशहा, विजापूरचे आदिलशहा, अफजलखान, बाजी घोरपडे, बडी बेगम व रणदुल्लाखान, मोरे व सावंत, छ. शाहू महाराज, छ. संभाजी राजे दुसरे (कोल्हापूर), पेशवे बाळाजी विश्वनाथ, पेशवे बाजीराव पहिले, चिमाजी आप्पा, मस्तानी, पेशवे नानासाहेब, समशेर बहादूर, माधवराव पेशवे, बाजीराव पेशवे, जोत्याजी केसकर, नारो शंकर, राजे बहादूर, सेनापती त्र्यंबकराव दाबाडे, पिलाजी गायकवाड, यशवंतराव पवार (धार), मल्हारराव होळकर, आहिल्याबाई होळकर, रानोजी शिंदे, महादजी शिंदे, हैदर अली, टिपू सुलतान, हैद्राबादचे निजाम, नारायण पेशवे, रघुनाथ पेशवे, नाना फडणवीस, राणी लक्ष्मीबाई इत्यादी महत्त्वाच्या घराण्यातील व्यक्तींची समाधीस्थाने सदर व्यक्तींची मृत्युपत्रे,

जन्मस्थाने, राहण्याची ठिकाणे इत्यादी विषयीचा सविस्तर अभ्यास या ग्रंथात करण्यात आला आहे.

६. **महाजन विराज, सिंधुदुर्ग–रत्नागिरी, राणेंच्या वर्चस्वास धक्का, संपादक तुकाराम जाधव व इतर, महाराष्ट्राचे राजकारण नव्या वळणावर?, द युनिक ॲकॅडमी पुणे, ऑगस्ट २०१५, (प्रकाशित)**[६] प्रस्तुत संदर्भ ग्रंथामध्ये महाराष्ट्रातील २०१४ च्या विधानसभा निवडणुकीच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय अन्वयार्थांची विस्तुत स्वरूपात मांडणी केलेली आहे. यामध्ये विराज महाजन यांनी तळकोकणातील सिंधुदुर्ग व रत्नागिरी या दोन जिल्ह्यांतील विधानसभा मतदारसंघांचे स्वरूप, २०१४ विधानसभा निवडणूक निकाल, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील पक्षनिहाय स्थिती, तळकोकणात नारायण राणे विरुद्ध शिवसेना, राष्ट्रवादी व भाजपा यांच्यात निर्माण झालेली राजकीय स्पर्धा, या स्पर्धेतून नारायण राणेंच्या वर्चस्वास बसलेला धक्का आणि २०१४ च्या विधानसभा निवडणुकीतील फेरबदल या सर्व घटकांचे विस्तृत विवेचन केलेले आहे.

७. **ओक प्रसाद, 'पेशवे घराण्याचा इतिहास', कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, तिसरी आवृत्ती,** पेशवे घराण्याचा इतिहास या आपल्या ग्रंथामध्ये प्रसाद ओक यांनी प्रस्तुत ग्रंथामध्ये इ. स. १६ व्या शतकापासून इ. स. २० व्या शतकापर्यंत पेशवे घराण्यातील कर्तबगार स्त्री–पुरूष नेतृत्त्वाचा व त्यांच्या कार्यकर्तृत्त्वाचा आढावा घेतला आहे. त्यांच्या मते सामाजिक इतिहासाची मांडणी करताना विविध ऐतिहासिक घराण्यांच्या कामगिऱ्यांची, कर्तबगारीची सामाजिक अंगाने नोंद घेतली गेली पाहिजे. निरनिराळ्या कालखंडात समाजावर आर्थिक वा राजकीय प्रभुत्त्व प्रस्थापित केलेली अनेक घराणी आढळतात. समाजाला दिशा दाखविण्याचे, प्रसंगी दिशा बदलण्याचे सामर्थ्य या घराण्यामधील स्त्री–पुरुषांमध्ये असलेले आढळून येते. प्रांता–प्रांतामध्ये समाजाचे नेतृत्त्व मग ते सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय वा कोणत्याही प्रकारचे असलेली ही घराणी आहेत. घराण्यांचा इतिहास हा सामाजिक इतिहासाचा एक महत्त्वाचा पूरक भाग असतो. राजकीय घटनांना मिळालेली वळणं, चढ–उतार, यशापयश याची बीजे घराण्याच्या इतिहासात सापडू शकतात. घराण्याचा इतिहासाचा कॅनव्हास 'कृळवृत्तांत' पेक्षा मोठा असतो. कुल वृत्तांताला प्रामुख्याने पारिवारीक परिणाम अपेक्षित असते. घराण्याच्या इतिहासाला पारिवारिक परिणाम तर असतोच शिवाय सामाजिक, आर्थिक,

राजकीय अशी इतर ही बहुविध परिमाने असतात किंबहुना घराण्याविषयी सर्वांगिण माहिती अपेक्षित असते.

महाराष्ट्रात पूर्वीपासूनच अनेक कर्तबगार घराणी होऊन गेली आहेत. वेगवेगळ्या कालखंडात वेगवेगळी घराणी पुढे येत असतात. हा क्रम आज ही चालू असलेला दिसतो. महाराष्ट्राच्या इतिहासात अठराव्या आणि एकोणिसाव्या शतकात अनेक ब्राह्मण आणि ब्राह्मणेत्तर तसेच सी. के. पी. पाठारे, प्रभू, शेणबी, सारस्वत घराणी उदयास आली. त्यातील अनेक घराण्यातील स्त्री–पुरूषांनी राजकारणात सामाजिक जडण–घडणीत मोलाची कामगिरी बजावली. त्यांच्या कामगिरीचा आढावा घेतल्याशिवाय तत्कालीन महाराष्ट्राचा राजकीय व सामाजिक आलेख पूर्ण होत नाही. अठराव्या शतकापुरता महाराष्ट्राचा ओझरता आढावा घेतला तरी पवार, शिंदे, होळकर, निंबाळकर, जाधव, आंग्रे, दाभाडे, घोरपडे, पटवर्धन, पानसे, चंद्रचूड, रास्ते, पेठे, गोखले, फडके, विंचूरकर, फडणीस, रायरीकर, नातू अशी अनेक घराणी सहजपणे डोळ्यांसमोर येतात. या कर्तबगार घराण्यांपैकी राजघराण्याची प्रतिष्ठा उपभोगणारी महाराष्ट्रातील घराणी प्रामुख्याने दोन पहिले, छत्रपती शिवाजी महाराजांचे भोसले घराणे आणि दुसरे त्यांचे नातू सातारकर थोरले शाहू महाराज यांनी १७१३ साली आपल्या राज्याच्या पंतप्रधान पदावर विराजमान केलेले श्रीवर्धन (भट) पेशवा घराणे राजपुतण्यामध्ये शिसोदिया, दक्षिण भारतात वडियार, उत्तर भारतात मुघल, हैद्राबादचे निजाम या घराण्याप्रमाणेच महाराष्ट्राच्या इतिहासात भोसले आणि श्रीवर्धनकर पेशवे ही दोन घराणी कायमची जनसामान्यांच्या मनावर कोरली गेली आहेत.

प्रस्तुत ग्रंथामध्ये घराण्यातील पुरुष व्यक्तींप्रमाणेच पेशवे घराण्यातील लेकी–सुनांची चरित्रे, वैयक्तिक नोंदी, त्या अनुषंगाने धार्मिक सांस्कृतिक नोंदी त्यांचे सासर माहेर व अन्य कौटुंबिक तपशील कुलाचार, नाशिकच्या क्षेत्रोपाध्यायांकडे लिहून दिलेल्या समकालीन पारिवारीक नामावल्या, घराण्याचे सोयरे, पुरूषांच्या उपलब्ध जन्म कुंडल्या, मस्तानीच्या वंशजाची (बांदा संस्थान) उपलब्ध अद्ययावत माहिती, अद्ययावत वंशावळी, नव्याने उपलब्ध झालेली संशोधित माहिती हा सर्व तपशील दिला आहे. याशिवाय या ग्रंथामध्ये पेशव्यांच्या इतिहासाची रूपरेषा, घराण्याचे पेशव्यांच्या कुंडल्या, श्रीवर्धन भट, श्रीवर्धन पेशवे शाखा, पेशव्यांच्या मुद्रा, क्षेत्रो पाध्यायांकडील उतारे, पर्वतावरील मुर्ती, पेशवेकालीन तांडव गणपती,

कोपर गावातील पेशव्यांचे वाडे, दुसरे नानासाहेब पेशवे यांचे जनक घराणे, कौटुंबिक कालपट, घराण्याच्या सोयरिकी, राजवटीचे भौगोलिक नकाशे इत्यादीबाबींचा या ग्रंथामध्ये सविस्तर अभ्यास प्रसाद ओक यांनी केला आहे.

८. **भणगे रवींद्र, 'महाराष्ट्रातील शिवसेना : वाढ आणि तिचा महाराष्ट्रातील राजकारणावरील प्रभाव' (१९६६–१९९६)**[८] पीएच.डी. शोधप्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, डिसेंबर २००२ (अप्रकाशित)[८] सदर शोधप्रबंधामध्ये भारतातील राजकीय पक्षांचा विकास, प्रादेशिक पक्ष व शिवसेनेचा उदय, शिवसेनेचा पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा व कोकणात झालेला प्रसार, हिंदूत्ववादी आघाडी आणि तिचे निवडणुकीतील यश, १९८७–१९९१ शिवसेना–भाजप युतीचे यशापयश, विरोधी पक्षापासून ते सत्ताधारी पक्षापर्यंत शिवसेनेची झालेली वाटचाल, १९६६ ते १९९६ या काळात लोकसभा, विधानसभा व महानगरपालिका निवडणुकीतील शिवसेनेचे यशापयश व शिवसेनेचा महाराष्ट्राच्या राजकारणातील प्रभाव यांचे विस्तृत विवेचन प्रस्तुत शोधप्रबंधामध्ये संशोधकाने केलेले आहे.

९. **सिरसीकर व. म., आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण, कॉटिन्टिनेटल प्रकाशन, पुणे १ मे २००१** [९] आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण या ग्रंथामध्ये सिरसीकर यांनी महाराष्ट्रातील सामाजिक, आर्थिक घटक, महाराष्ट्राच्या राजकारणाचे स्वरूप, राजकीय सामाजिकीकरण आणि भरती, राजकीय अभिजन, राजकीय संस्था, राजकीय शक्ती, राजकीय सहभाग, महाराष्ट्रातील पंचायत राज्य, जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत, ग्रामसभा, राजकीय पक्ष तसेच महाराष्ट्रातील सहकारी संस्था, शिक्षण, साखर कारखाने व इतर संस्था याचा सविस्तर अभ्यास करून त्या माध्यमातून उदयास आलेली राजकीय घराणी, तसेच ती भक्कम व स्थिर होण्यासाठी कारणीभूत ठरणारे घटक याचा आढावा घेण्यात आलेला आहे. राजकीय क्षेत्राबरोबरच सामाजिक जीवनाच्या अनेक क्षेत्रात व अनेक स्तरांच्या काँग्रेसच्या मक्तेदारीचा प्रत्यय येतो. सहकारी क्षेत्रामध्ये तर प्राथमिक सोसायट्यांपासून ते राज्य स्तरावरील संघटनेपर्यंत काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसमधील काही घराण्यांनीच महाराष्ट्राच्या राजकारणावर आपले वर्चस्व निर्माण करून आपली पकड घट्ट केल्याचे दिसते. बहुसंख्य सहकारी साखर कारखाने जिल्हा सहकारी बँका, खरेदी–विक्री संघ, सहकारी सूतगिरण्या आणि अन्य सहकारी संस्था आज ही काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ताब्यात आहेत. शैक्षणिक संस्था स्थापन

करणे व त्या चालविणे, त्या माध्यमातून लोकांचे अनेक प्रश्न सोडवून त्यांना आपल्या पाठीशी राहण्यास भाग पाडणे व या संघटीत शक्तीचा वोट बँक म्हणून वापर करणे आणि आपल्यासह आपल्या इतर नातेवाईक सहकारी संस्था व राजकारणामध्ये सहभागी करून घराणेशाही निर्माण करणे हा अनेक घराण्यांचा व्यवसाय झाला आहे. कारण यातूनच पैसा व मोठ्या प्रमाणात पाठबळ मिळते.

भारतीय राजकारणात काही कुटुंबे ही राजघराणी मानली जातात. नेहरू घराणे हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. पंडित जवाहरलाल नेहरू कडून त्यांचा राजकीय वारसा कन्या इंदिरा गांधींकडे चालत आला. नेतृत्त्वाचा राजदंड पित्याकडून कन्येकडे आणि नंतर मातेकडून मुलाकडे राजीव गांधींकडे सुपुर्द करण्यात आला. आज ही राजीव गांधी नंतर पंतप्रधानपद सोनिया गांधी व त्यांच्या मुलांपैकी राहूल गांधी वा प्रियांका गांधी यांना द्यावे असा आग्रह धरणारे अनेक काँग्रेस नेते व कार्यकर्ते आहेत. घराणेशाही विरूद्ध घोषणा देत असतानाच नेहरू घराण्याचा राजसत्तेचा अधिकार मुकाट मान्य करण्यात येत असे. १९८९ मध्ये राजीव गांधींना लोकसभा निवडणूका जिंकता आल्या नाहीत व घराणेशाही परंपरा खंडीत झाली. नजीकच्या इतिहासात नेहरू घराण्याचा प्रभाव सर्वांच्या लक्षात आला. मोरारजी देसाई सारख्या जेष्ठ अनुभवी नेत्यांऐवजी नवख्या अनुभव नसणाऱ्या पण राजकीय कौटुंबिक वारसा असलेल्या इंदिरा गांधींची निवड काँग्रेस नेत्यांनी केली. इंदिरा गांधींच्या मृत्यूनंतर प्रणव मुखर्जींना डावलून राजकारणात अनभिज्ञ अशा राजीव गांधींना पंतप्रधानपद बहाल करण्यात आले.

केंद्राप्रमाणेच काही राज्यात देखील घराणेशाही काही प्रमाणात अस्तित्त्वात असल्याचे दिसून येते. उत्तर प्रदेशात कमलापती त्रीपाठी नंतर त्यांच्या मुलाकडे लोकपती त्रिपाठीकडे नेतृत्त्व द्यावे असा काही गटांचा प्रयत्न होता. मध्य प्रदेशात रविशंकर शुक्ला नंतर त्यांचे पुत्र शामा चरण मुख्यमंत्री झाले तर दुसरे केंद्रात मंत्रीपदावर होते. महाराष्ट्रात त्यामानाने घराणेशाही स्थापित झालेली नाही, पण वसंतराव नाईक यांचा वारसा त्यांच्या पुतण्याला सुधाकरराव नाईक यांना मिळाला. वसंतदादा पाटील यांनी राजकारणात अनभिज्ञ अशा आपल्या मुलाला (प्रकाश बापू पाटील) लोकसभेत पाठविले. (१९८४) शंकरराव चव्हाण यांनी आपल्या मुलाला अशोक चव्हाण यांना विधानसभेत पाठविले. अशोकराव चव्हाण हे नंतरच्या कालखंडामध्ये महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री होते. शरद पवार यांनी आपल्या पुतण्याला अजित पवार यांना

विधिमंडळात आणले. नंतर ते मंत्री उपमुख्यमंत्री झाले. मुलगी सुप्रिया सुळे यांना राजकीय वारसदार म्हणून आणले. अर्थात ही उदाहरणे अपवादात्मक आहेत असे म्हणावे लागेल. घराणेशाही केवळ काँग्रेस पक्षातच आहे असे म्हणता येणार नाही. काँग्रेसच्या घराणेशाहीवर सतत टिका करणारे बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेना पक्षात ही घराणेशाही आहे. बाळासाहेब ठाकरे यांचे चिरंजीव उद्धव ठाकरे, पुतणे राज ठाकरे तर नातू आदित्य ठाकरे हे सध्या महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये सक्रीय आहेत. भाजपनेही घराणेशाहीवर टीका करत आतापर्यंत राजकारण केले. मात्र सध्या तोही पक्ष काँग्रेसप्रमाणे घराणेशाहीने ग्रस्त होताना दिसत आहे.

**१०. पळशीकर सुहास, 'समकालिन भारतीय राजकारण' (काँग्रेस वर्चस्व ते हिंदू जमातवाद), प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००४, (प्रकाशित)**[१०] प्रस्तुत ग्रंथात भारताच्या राजकारणात काँग्रेस पक्ष एक महत्त्वाचा राजकीय पक्ष म्हणून कसा रहिला, नव्वदीच्या दशकानंतर भारताच्या राजकारणात काँग्रेसचा प्रभाव कसा कमी होत गेला. नव्वदीच्या दशकानंतर पक्षीय स्पर्धेचे स्वरूप बदलून कोणकोणत्या नवीन राजकीय शक्ती उदयास आल्या, याचे विस्तृत विवेचन केले आहे. जागतिकीकरणानंतर राजकारणाचे शुल्लकीकरण कशाप्रकारे होऊ लागले व त्याचे लोकशाही व्यवस्थेवर कशाप्रकारे परिणाम होऊ लागले याचा विस्तृत आढावा घेण्यात आलेला आहे. भारतीय राज्यघटनेचा विकास कसा होत गेला, भारतीय राजकारण हे काँग्रेस व्यवस्था ते जमातवाद यामध्ये कसे फिरते आहे आणि गेल्या अर्धशतकातील लोकशाहीच्या जनवादी अविष्काराचे क्षण कोणते आहेत याचे विस्तृत विवेचन केले आहे. प्रादेशिकता व जात या दोन घटकांभोवती असणाऱ्या भारतीय राजकारणाची कोणती वैशिष्ट्ये आहेत. समकालिन जातीव्यवस्था कशाप्रकारची आहे. तिचे स्वरूप कशाप्रकारचे आहे. नवीन आर्थिक धोरणामुळे जुनीच आव्हाने कशाप्रकारे नव्याने समोर आलेली आहेत. भांडवलशाही वर्ग व कामगार वर्ग यांच्यातील स्पर्धा कशाप्रकारची आहे. तसेच जमातवाद, धर्मनिरपेक्षता आणि लोकशाही पुढील आव्हाने कशाप्रकारची आहेत. बहुजन समाज आणि त्यांच्याभोवती फिरणारे राजकारण, भारतीय राजकारणाची नवी मध्यभूमी बहुसंख्यावाद, धार्मिकता आणि जमातवाद यावर कशी अवलंबून आहे, याबाबत विस्तृत विवेचन केलेले आहे.

**११. डॉ. कोलारकर, श. गो., ''प्राचीन भारताचा राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक इतिहास'' (प्रारंभापासून ते इ. स. १२०६)[११] श्री. मंगेश प्रकाशन नागपूर, २००३** या ग्रंथामध्ये डॉ. कोलार यांनी प्राचीन भारतातील भारताची विविध नावे भौगोलिक स्वरूप, प्राचीन भारताची साधने, अवशेष, आलेख, धातुलेख, पत्रे, लेणी, नाणी, पुराश्म युग (पाशान युग) सिंधू संस्कृती, वैशिष्ट्ये, नगररचना, वेशभूषा, केशभूषा, करमणुकीची साधने, सिंधू संस्कृतीची लिपी, शिल्पकला, धार्मिक कल्पना, राजकीय स्थिती, वैदिक संस्कृती, ब्राह्मणे, आरण्यके, उपनिषदे, राजकीय इतिहास, बौद्ध आणि जैन धर्म, जैन धर्माच्या ऱ्हासाची कारणे, जैन धर्माने भारतीय संस्कृतीला दिलेली देणगी, ग्रीक आक्रमणे इत्यादीविषयी सखोल व सविस्तर आपले मत मांडली आहेत. शिवाय प्रस्तुत ग्रंथामध्ये मौर्य घराणे, सम्राट अशोक, सातवाहन हर्षवर्धन घराणे इत्यादी घराण्यांचा व त्यांनी केलेल्या सामाजिक कार्याचा तत्कालीन समाजव्यवस्थेवर झालेला परिणाम याचा अभ्यास केला आहे.

भारतीय इतिहासातील मौर्य घराण्याच्या स्थानाविषयी कोलारकर लिहितात. मौर्य घराण्याला भारताच्या इतिहासामध्ये अत्यंत महत्त्वपूर्ण असे स्थान आहे. भारतात प्रथम परकीय आक्रमकांना भारतीय सीमेबाहेर हाकलून लावत. भारतामध्ये एक छत्री अंमल व साम्राज्य स्थापन केले. या घराण्याने भारताचा इतर देशाशी निकटचा संबंध प्रस्थापित करून आपआपसातील व्यापारी आणि सांस्कृतिक संबंध वाढविले. मौर्य घराण्याच्या पराक्रमाने सामान्य माणसाला व्यापारात कमालीची वाढ होऊन सर्वत्र शांतता आणि सुव्यवस्था प्रस्थापित झाली. व्यापारात कमालीची वाढ होऊन भारताची सुबत्ता वाढीला लागली. मौर्य घराण्याचे शासनाचे स्वरूप कल्याणकारी होते. म्हणजे राजाची सत्ता ही प्रजेच्या कल्याणाकरीता वापरली जात असे. आई–वडील जसे आपल्या मुलांची काळजी घेऊन त्यांचे चांगल्याप्रकारे संगोपन करतात तसेच हे घराणे राज्य करीत होते.

पुढे मौर्य सत्तेचा ऱ्हास झाल्यानंतर मगध देशात शुंग घराण्याची सत्ता स्थापना झाली. इ. स. १८७ ते इ. स. १५२ पर्यंत शुंग घराण्याने जवळ जवळ ११२ वर्षे राज्य केले. या घराण्यातील पुष्यमित्र शंग हा अतिशय पराक्रमी राजा होता. आपल्या कारकीर्दीत त्यांने विदर्भ जिंकून घेतला. आपल्या राज्याच्या विस्तार केला याशिवाय या ग्रंथामध्ये कोलारकर यांनी सातवाहन घराणे, वाखाटकांचे घराणे, हर्षवर्धन घराणे, दक्षिणीतील चोल, वाकाटक, पांड्याय

घराण्यांचा सविस्तर अभ्यास करून त्यांनी केलेल्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व राजकीय कार्याचा अभ्यास केला आहे.

**१२. दिवाण मोहन, देवधर जयंत, दिवाण विवेक, 'भारतातील राज्याचे राजकारण', विद्या प्रकाशन, नागपूर, २००४, (प्रकाशित)** [१२] सदर ग्रंथात भारतातील राज्याच्या राजकारणाचे स्वरूप व बदलते दृष्टिकोन, जात, धर्म, संस्कृती व दारिद्र्य या घटकांवर राज्याचे राजकारण कशाप्रकारे आधारलेले आहे. याचे विस्तृत विवेचन केले आहे. प्रादेशिक पक्षांचा वाढता प्रभाव, विकासाच्या प्रक्रियेवर त्याचा होणारा चांगला–वाईट परिणाम, प्रादेशिक अस्मितेचे राजकारण, राष्ट्रीय राजकारणाचा राज्यातील राजकारणावर होणारा परिणाम, प्रादेशिक असमतोल, सीमावाद, पूर्वोत्तर राज्यांचे राजकारण, पंचायतराज व्यवस्था, पंचायतराज व्यवस्थेचा राज्याच्या राजकारणावर झालेला परिणाम आणि ७३ व्या ७४ व्या घटनादुरुस्तीचा लोकशाहीच्या विकेंद्रीकरणाच्या प्रक्रियेवर झालेला परिणाम या सर्व घटकांचे विस्तृत विवेचन या ग्रंथांत केले आहे.

**१३. कुलकर्णी अ. रा., ग. ह. खरे (संपादक), 'मराठ्यांचा इतिहास' खंड पहिला, डायमंड पब्लिकेशन्स, सदाशिव पेठ, पुणे. प्रथम आवृत्ती, २००९** या ग्रंथाचे पाच खंड, पुणे विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळाने प्रसिद्ध केले असून अ. रा. कुलकर्णी व ग. ह. खरे यांनी हा ग्रंथ संपादित केला आहे. या पाच खंडापैकी त्यांनी तीन खंडाद्वारे मराठ्यांचा संपूर्ण इतिहास (१६०० ते १८४८) सादर केला आहे. इतिहासाच्या पाच खंडाची विभागणी साधारणपणे पुढीलप्रमाणे केली आहे. १) शिवाजी आणि शिवकाळ (१६०० ते १७०७) २) शाहू आणि शाहू काळ (१७०७ ते १७६१) ३) मराठी सत्तेचा उत्तरार्ध (१७६१ ते १८४८) ४) मराठ्यांच्या इतिहासाची साधने (१६०० ते १७०७) ५) मराठ्यांच्या इतिहासाची साधने (१७०७ ते १८४८) या संपादीत ग्रंथामध्ये १) महाराष्ट्र–लोक भाषा व संस्कृती–प्र. न. जोशी, २) मराठ्यांचा इतिहास–भौगोलिक पार्श्वभूमी रा. न. राजगुरू, ३) महाराष्ट्र महोदयाचा पूर्वरंग–ग. ह. खे, ४) महाराष्ट्रीय संतांची कामगिरी– ह. श्री. शेणोलीकर, ५) शहाजी– ग. ह. खरे, ६) शिवाजी महाराजांचा उदय आणि स्वराज्याची स्थापना– दि. के. देशपांडे, ७) शिवाजी महाराज आणि विजापूरची आदिलशाही–पु. म. जोशी, ८) शिवाजी महाराज आणि मुघल सत्ता–गो. त्र्यं. कुलकर्णी, ९) मराठे आणि परकीय सत्ता– वि. ग. हताळकर, १०) शिवराज्याभिषेक– रा. वि.

ओतुरकर, ११) शिवाजी महाराजांचा दक्षिण दिग्विजय आणि कुतबशाही–वा. सी. बेंद्रे, १२) शिवाजी महाराजांचे राज्य, सीमा प्रशासन– वि. त्र्य. गुणे, १३) शिवाजी महाराजांचे आरमार– भा. कृ. आपटे, १४) मराठ्यांचे किं. के.– प्र. न. देशपांडे, १५) शिवकालीन महाराष्ट्र–अ. रा. कुलकर्णी, १६) लोकनेता राजा शिवाजी– अ. रा. कुलकर्णी, १७) छ. संभाजी– कमल गोखले, १८) छत्रपती राजाराम–स्वातंत्र्य संग्राम (१६८९ ते १७००) पं. शं. जोशी, १९) महाराणी ताराबाई– स्वातंत्र्य संग्राम (१७०० ते १७०७)– जयसिंगराव पवार, २०) कर्नाटकातील संस्थानिक– ना. ह. कुलकर्णी.

अशाप्रकारे अ. रा. कुलकर्णी व ग. ह. खरे यांनी संपादित केलेल्या मराठ्यांचा इतिहास या ग्रंथामध्ये २० लेखकांच्या माध्यमातून महाराष्ट्रासह कर्नाटक राज्यातील मराठ्यांचा इतिहास त्यांनी केलेले कार्य, त्यांच्या वंशावळी त्यांनी केलेल्या समाजोपयोगी कार्याचा तत्कालीन समाजव्यवस्थेवर झालेल्या परिणामाचा सविस्तर अभ्यास केल्याचे दिसून येते. याबरोबरच महाराष्ट्रातील लोकभाषा, बोलीभाषा, महाराष्ट्राची संस्कृती, महाराष्ट्रातील मराठ्यांचा इतिहास, भौगोलिक व सामाजिक पार्श्वभूमी, मुघल, आदिलशाही यांचा इतिहास, छत्रपती शिवाजी महाराजांचा उदय व स्वराज्य स्थापना, शिवकालीन महाराष्ट्र इथपासून ते छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराजांचा, स्वातंत्र्य संग्राम लढा, महाराणी ताराबाई यांचा स्वातंत्र्यसंग्राम लढा इथपर्यंत लढ्याचे, मराठ्यांच्या संघर्षाचे इतिहास सविस्तरपणे मांडण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे.

**१४. भूजबळ चंद्रकांत, 'लोकप्रतिनिधी निवणूक मार्गदर्शक' (लोकसभा मतदार संघ पुर्नरचना), लोकमित्र प्रकाशन, पुणे, एप्रिल २०१३ (प्रकाशित)** [१४] प्रस्तुत संदर्भ ग्रंथांमध्ये चौथ्या परिसिमन आयोगानंतर महाराष्ट्रातील बदललेले मतदार संघ व बदललेल्या राजकारणाची विस्तृतपणे मांडणी केलेली आहे. महाराष्ट्रातील लोकसभा मतदार संघ पुनर्रचना, महाराष्ट्रातील २००९ च्या लोकसभा निवडणुकीचे विश्लेषण, महाराष्ट्रातील राखीव मतदार संघ, जातीय प्रभाव, राज्यातील महानगरपालिका व जिल्हा परिषदांच्या निवडणुकांचे निकाल आणि महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील राजकीय आरक्षणाची स्थिती यांचे विस्तृत विवेचन प्रस्तुत ग्रंथांत केले आहे.

**१५. पळशीकर सुहास, बिरमल नितीन, सं. संपादक-प्रकाश पवार महाराष्ट्राचे राजकारण-राजकीय प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ[१५] २००९ :** प्रस्तुत ग्रंथामध्ये सुहास पळशीकर, नितीन बिरमल व प्रकाश पवार यांनी महाराष्ट्रातील स्थानिक राजकारणाचा सविस्तर अभ्यास केला आहे. अभ्यास करताना त्यांनी १९९० पूर्वीचा कालखंड आणि १९९० नंतरचा कालखंड यांचा तुलनात्मक विचार व अभ्यास केला पाहिजे, या दृष्टीकोनातून त्यांनी या ग्रंथामध्ये एका वेगळ्यापद्धतीने महाराष्ट्राच्या राजकारणाची मांडणी केली आहे. राज्यपातळी, विभागीय पातळी आणि स्थानिक (जिल्हा) पातळी अशा तीन पातळ्यांवर नव्वदीच्या अखेरच्या महाराष्ट्राच्या राजकारणाचे विश्लेषण केले आहे. हे विश्लेषण करताना त्यांनी तीन संदर्भाचे भान ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. एक म्हणजे २००१-२००२ मध्ये झालेल्या स्थानिक शासनाच्या निवडणूकांचे तपशीलवार विवेचन केले आहे. महाराष्ट्रातील स्थानिक शासनाचे राजकारण तपासून पाहण्याचा हा पहिलाच प्रयत्न आहे. त्याला २००६-०७ च्या स्थानिक निवडणुकांच्या विश्लेषणाची जोड दिली आहे. दुसरे म्हणजे त्या-त्या जिल्ह्यात किंवा विभागात विशेषत: १९९५-९६ नंतर कोणते राजकीय प्रवाह आढळतात. कोणत्या स्थानिक शक्तींचा उदय होताना दिसतो याचे वर्णन केले आहे. त्यामुळे प्रत्येक विभागावरील लेख हा त्या विभागाचा नव्वदीच्या दशकाचा राजकीय आलेख बनला आहे. राजकीय अर्थव्यवस्थेचा सर्वच लेखामध्ये निव्वळ निवडणूकांचे राजकारण आणि सत्ता स्पर्धा यांच्या पलीकडे जाण्याचा प्रयत्न केला आहे. त्या-त्या विभागाचे किंवा जिल्ह्याचे राजकारण हे कोणत्या आर्थिक हित संबंधाच्या चौकटीत घडते. हे शोधण्यासाठी शहरीकरण, शेतीउद्योग यांचा आढावा घेऊन स्थानिक पातळीवरच्या आर्थिक हित संबंधाची साखळी स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

त्याचबरोबर लेखकांनी या ग्रंथामध्ये महाराष्ट्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, ती चळवळ गतीमान करून महाराष्ट्र राज्याची निर्मिती करणाऱ्या नेत्यांची त्यामध्ये जेधे, गाडगीळ, डॉ. आंबेडकर, यशवंतराव चव्हाण यांनी केलेल्या चळवळीचा आढावा घेऊन स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रातील जातीय राजकारण, मराठा वर्चस्वाचे राजकारण, बहूजन समाजाचे राजकारण व त्यांचा स्थानिक स्वराज्य संस्थेपासून ते विधानसभा लोकसभेवर झालेला परिणाम याचा सविस्तर आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**१६. पळशीकर सुहास, कुलकर्णी सुहास : 'महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष : राजकीय पक्षांची वाटचाल' समकालिन प्रकाशन, २००७ (प्रकाशित)**[१६] प्रस्तुत संदर्भ ग्रंथामध्ये महाराष्ट्रातील राजकीय पक्षांच्या वाटचालीचा ऊहापोह केलेला आहे. राजेश्वरी देशपांडे, नितीन बिरमल, सुहास पळशीकर, प्रकाश पवार, सुहास कुलकर्णी, विवेक घोटाळे, अभय दातार यांनी महाराष्ट्रातील राजकीय पक्षांचे विवेचन केलेले आहे. सदर संशोधनामध्ये स्थानिक राजकारणाचा राष्ट्रीय राजकारणावर कशाप्रकारे प्रभाव पडलेला आहे हे लोकसभा निवडणुकांच्या माध्यमातून स्पष्ट केलेले आहे. या संशोधनामध्ये महाराष्ट्रातील लोकसभा निवडणुका व राजकीय पक्षांची वाटचाल याचे विवेचन करण्यात आलेले आहे.

**१७. देशपांडे वसंत वासुदेव, ''महाराष्ट्राची सुवर्णगाथा,'' प्रकाशक, ग्रंथाली, इंडियन एज्युकेशन सोसायटी, महात्मा फुले कन्या शाळा, दादर, मुंबई. प्रथम आवृत्ती, २०११** महाराष्ट्रातील सुवर्णगाथा या ग्रंथामध्ये देशपांडे यांनी महाराष्ट्रातील राजकीय घडामोडींची नेमकी माहिती देण्याचा एक यशस्वी प्रयत्न केला आहे. १ मे १९६० या महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीपासून ते निर्मीतीचा इतिहास, महाराष्ट्र विधानसभेचे पहिले अधिवेशन, यशवंतराव चव्हाण यांनी केलेली भाषणे, सत्ताबदल, आपत्ती व्यवस्थापन आणि संकटाचा मुकाबला कसा करायचा या आणि अशा अनेक अंगांना स्पर्श करून त्यांनी अचुक संदर्भासह हा ग्रंथ सिद्ध केला आहे.

देशपांडे यांनी या ग्रंथामध्ये महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाणांपासून ते पृथ्वीराज चव्हाण यांच्यापर्यंत झालेल्या १६ मुख्यमंत्र्यांची राजकीय कारकीर्द त्या–त्या काळामध्ये त्या–त्या मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्र राज्याच्या विकासासाठी आखलेले धोरणात्मक निर्णय, अनेक लोकोपोयोगी निर्णय व त्याची अंमलबजावणी इत्यादी विषयी लिखाण केले आहे. यशवंतराव चव्हाण ते पृथ्वीराज चव्हाणापर्यंत झालेल्या मुख्यमंत्र्यांपैकी वसंतराव नाईक, मनोहर जोशी आणि विलासराव देशमुख या तिघांना एकाच कारकीर्दीत सलग ४ वर्षे कारभार करण्याची संधी मिळाली. राज्यात सर्वाधिक कालखंड वसंतराव नाईक यांना तर सर्वांत कमी कालखंड मिळालेले नारायण राणे यांना मिळाला. मराठवाड्याचे चार तर विदर्भाचे तीन नेते या यादीत समाविष्ट आहेत. राज्याच्या आठ मुख्यमंत्र्यांना विविध कारणामुळे अनपेक्षितरित्या पाय उतार व्हावे लागले. म्हणजेच केवळ वसंतराव नाईक एकदाच एक कार्यकाळ (५ वर्षे) पूर्ण करू

शकले. यशवंतराव चव्हाण, शंकरराव चव्हाण, ए. आर. अंतुले, शिवाजीराव निलंगेकर पाटील, सुधाकरराव नाईक, मनोहर जोशी आणि विलासराव देशमुख यांना महाराष्ट्राच्या एकाही विधानसभा निवडणुकीत पक्षाचे नेतृत्त्व करण्याची संधी मिळाली नाही. वसंतराव नाईक, वसंतदादा पाटील, शरद पवार, सुशिलकुमार शिंदे आणि अशोकराव चव्हाण यांच्या नेतृत्त्वाखाली निवडणूक झाली. इतर चौघे पुन्हा मुख्यमंत्री झाले. परंतु शिंदे यांनी २००४ ची विधानसभा निवडणूक जिंकून दिल्यानंतर ही काही काळ हैदराबादच्या राजभवनात राज्यपाल म्हणून त्यांना काढावा लागला. राणे निवडणुकीनंतर विरोधी पक्ष नेते झाले. तसे पवार ही १९९५ मध्ये विरोधी पक्ष नेते होते. परंतु विधान परिषदेत मुख्यमंत्री पदावरून दूर झाल्यानंतर विधानसभा निवडणूकीत पराभूत झालेले एकमेव मुख्यमंत्री म्हणजे निलंगेकर. आधी विरोधी पक्ष नेते पदी राहून त्यानंतर मुख्यमंत्री होणारे मनोहर जोशी या वर्गात एकटेच. कधीही निवडणूक न हारलेले नेते म्हणजे यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, वसंतदादा पाटील, शरद पवार, सुशिलकुमार शिंदे विविध समाज घटकांमध्ये ऐक्याची भावना रूजावी, वाढीस लागावी, त्यांच्यामधील परस्पराबद्दलची कटुता, संघर्ष दूर होऊन त्यांच्यामध्ये एकोपा निर्माण व्हावा, त्यांची सामाजिक, आर्थिक प्रगती व्हावी, यासाठी यशवंतराव चव्हाण यांनी जाणीवपूर्वक उपाययोजना केली. वसंतराव नाईक यांच्याकाळात महाराष्ट्रात सर्वाधिक सामाजिक, राजकीय सौहार्द नांदले अशाप्रकारे देशपांडे यांनी आपल्या या ग्रंथामध्ये महाराष्ट्रातील सामाजिक व राजकीय परिस्थितीचा तसेच आजपर्यंत होऊन गेलेल्या मुख्यमंत्र्यांच्या राजकीय व सामाजिक कार्याचा आढावा घेतला आहे.

१८. **पळशीकर सुहास, बिरमल नितिन, महाराष्ट्राचे राजकारण (राजकारण प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ),[१८] प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००७, (प्रकाशित)** प्रस्तुत संदर्भ ग्रंथामध्ये राज्यपातळी, विभागीय पातळी व स्थानिक पातळी अशा तीन स्तरावर १९९७ पूर्वीच्या महाराष्ट्राच्या राजकारणाचे विश्लेषण केले आहे. त्याचबरोबर १९९५–९६ नंतरचे नवीन राजकीय प्रवाह, २००१–२००२ मध्ये झालेल्या स्थानिक शासन संस्थांच्या निवडणुका, विभाग, जिल्हा व स्थानिक पातळीवरच्या आर्थिक हितसंबंधाची साखळी कशाप्रकारे आहे, याची मांडणी केलेली आहे. दोन्ही काँग्रेसमधील संघर्ष व महाराष्ट्राचे बदलते राजकारण यांचेही विस्तृत विवेचन केले आहे. कोकण, विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट अशा

सर्व राजकीय विभागातील निवडणुकांचे व निवडणुकांच्या राजकारणाची विस्तृत मांडणी प्रस्तुत ग्रथांत केलेली आहे.

**१९. संपादक : भोळे भा. ल., बेडकिहाळ, 'बदलता महाराष्ट्र', आंबेडकर अकादमी, सातारा, दुसरी आवृत्ती, २००३** बदलता महाराष्ट्र हा ग्रंथ भोळे व बेडकिहाळ यांनी संपादीत करून १९५० नंतरच्या महाराष्ट्रामध्ये महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये राजकारणाचा, सामाजिक चळवळीचा, शेतकरी आंदोलन, शैक्षणिक चळवळ व सहकारी चळवळी यामुळे महाराष्ट्र राज्य सामाजिकदृष्ट्या, सांस्कृतिकदृष्ट्या व राजकीयदृष्ट्या कशाप्रकारे बदलत गेले त्याचा सविस्तर आढावा या ग्रंथामध्ये घेण्यात आला आहे. या ग्रंथामध्ये अनेक लेखकांनी आपले अभ्यासपूर्ण लेख लिहून बदलत्या महाराष्ट्राचे चित्र लोकांसमोर मांडले. यामध्ये कला, साहित्य, शिक्षण, सहकार, सामाजिक, दलित, बहुजन, मराठी भाषा, महाराष्ट्रातील स्त्री–जीवन, महाराष्ट्रातील बदलती पत्रकारिता, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, महाराष्ट्रातील राजकीय पक्षांचे चढ–उतार, काँग्रेस पक्षाची जडण–घडण आणि पडझड इत्यादी विषयाची चिकित्सक पद्धतीने मांडणी करून महाराष्ट्रातील सर्वच क्षेत्रातील बदलाचा वेध घेण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे.

त्याचबरोबर महाराष्ट्रातील सहकार क्षेत्र, महाराष्ट्रातील पहिला सहकारी कारखाना निर्माण करणारे विखे–पाटील घराणे व त्या माध्यमातून उदयास आलेली अनेक राजकीय घराणी, त्यांनी विकसित केलेले सहकार क्षेत्र आणि त्या माध्यमातून त्यांनी केलेली विकास कामे त्या माध्यमातून बदललेले महाराष्ट्रातील विकासाचे चित्र याविषयी सविस्तर लेखन या ग्रंथामध्ये पहावयास मिळते. साधारणपणे १९६० ते १९८० या दशकामध्ये महाराष्ट्रामध्ये विकसित झालेली सहकारी चळवळ, त्या माध्यमातून केलेले धाडसी प्रयोग यामुळे राज्यात उदारीकरणाचे, खाजगीकरणाचे व जागतिकीकरणाचे वारे जोरात वाहू लागले. त्यामुळे सहकारी उद्योगांना नव्या आव्हानांना तोंड द्यावे लागले. त्यातून त्यांनी कशाप्रकारे मार्ग काढून सहकारी संस्था वाचविण्याचा व त्या पूर्ण ताकदीने चालविण्याचा त्यांचा प्रयत्न याचा अभ्यास प्रस्तुत ग्रंथामध्ये केला आहे. या ग्रंथामध्ये सहकारी चळवळीविषयी संपादकांनी व लेखकांनी पुढीलप्रमाणे आपले विचार मांडले आहेत.

सर्वसामान्य सभासदांच्या पैशातून उभारलेल्या या ट्रस्टच्या विद्यमान नेत्यांनी मोठमोठ्या शिक्षण संस्था उभारल्या, अशाप्रकारे आजवरचे सहकारमहर्षी आता शिक्षणमहर्षी

म्हणून मिरवू लागले आहेत. या मार्गाने या महर्षींनी कोट्यावधी रुपये गोळा केले आणि पैसा मिळविण्याचे साधन म्हणून त्यांनी या संस्थांचा उपयोग/वापर केला. यातून समाजकारण, अर्थकारण, राजकारणावर आपला प्रभाव पाडला आणि यातूनच घराणेशाहीची सुरूवात झाली. आपल्यानंतर आपलेच वारसदार सत्ता स्थानी बसविण्याची प्रक्रिया बऱ्याच सहकार महर्षींनी साध्य केली आहे. लोकशाही व्यवस्थापन हे खरे सहकाराचे खास वैशिष्ट्ये आहे; पण महाराष्ट्राच्या काही भागात सहकारी नेत्यांनी सत्तेची अशी काही मक्तेदारी निर्माण केली की, त्यामुळे सहकाराचे विकृत स्वरूप पुढे आले. बहुतेक सर्व जेष्ठ नेते घराणेशाहीच्या मोहाला बळी पडलेले दिसतात. त्यामध्ये भारतातील पहिला साखर कारखाना निर्माण करणारे विठ्ठलराव विखे–पाटील, सुजय विखे–पाटलाच्यारूपाने चौथी पिढी राजकारणात सक्रीय असलेली दिसते. वारणानगरमधील तात्यासाहेब कोरे यांच्यानंतर त्यांचा मुलगा व नातू त्यांच्या खुर्चीत बसून राजकारण करत आहेत. त्याचबरोबर वसंतदादा पाटील, शरद पवार, बाळासाहेब ठाकरे इत्यादी नेत्यांनी घराणेशाहीची री ओढली. तीच री इतर नेत्यांनीही व्यवस्थित अखंड चालू ठेवल्याचे चित्र सबंध महाराष्ट्र भर दिसून येते. अशाप्रकारे बदलता महाराष्ट्र या ग्रंथामध्ये घराणेशाहीवर अत्यंत चांगल्या प्रकारे विचार मांडून महाराष्ट्रातील घराणेशाहीवर प्रकाश टाकण्याचे काम या माध्यमातून होत असल्याचे दिसते.

**२०. पवार प्रकाश, 'महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना'[२०], प्रतिमा प्रकाशन, पुणे, मार्च २००९ (प्रकाशित)** प्रस्तुत प्रकाशित ग्रंथांमध्ये लेखकाने चौथ्या मतदारसंघ पुनर्रचनेनंतर महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना कोणत्या पद्धतीने झालेली आहे. याचे विस्तृत विवेचन केले आहे. तसेच महाराष्ट्रातील मुंबईसह कोकण, उत्तर महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्र या सर्व राजकीय विभागातील मतदार संघ पुनर्रचना, विधानसभेचे व लोकसभेचे बदलते राजकारण यांचे विश्लेषण केले आहे. विविध आर्थिक व शैक्षणिक संस्थांवरील असंतोष, जिल्हा नेतृत्त्वाची नव्याने पुनर्रचना, जात संघटनांचे पक्षनिहाय विभाजन, जात व धर्मनिहाय लोकसंख्या, राजकीय चळवळी ऐवजी जात व धर्म संघटनांची पक्ष व मतदार यांच्यातील मध्यस्थी, नवीन औद्योगिक धोरणाविरुद्ध शेतकऱ्यांचा उद्रेक इत्यादी राजकीय प्रक्रियेतील घटकांचे विवेचन केले आहे. तसेच परिसिमन आयोगाच्या कार्याची वैधानिक

चौकटीची मांडणी करत शहरी व ग्रामीण मतदारसंघांची पद्धतशीर मांडणी लेखकाने प्रस्तुत ग्रंथात केलेली आहे.

**२१. निकम अधिकराव हिंदूराव, 'ग्रामीण भागाच्या विकासासाठी सहकारी संस्थांचे योगदान' (सहकारी पाणीपुरवठा संस्था, सातारा तालुका)**[२१] (१९७१ ते १९९५ अखेर १० संस्थेचे व्यष्टी अध्ययन) शिवाजी विद्यापीठाच्या एम. फील. राज्यशास्त्र या पदवीकरीता सादर केलेला अप्रकाशित शोध निबंध–जून २००१) प्रस्तुत शोधप्रबंधामध्ये अधिकराव निकम यांनी सहकारी संस्थांच्या माध्यमातून महाराष्ट्रातील ग्रामीण भागाचा कशाप्रकारे विकास व बदल घडवून आणला याचा अभ्यास केला आहे. भारतातील बहुसंख्य जनता ही ग्रामीण भागामध्ये राहते. महात्मा गांधींनी म्हटल्याप्रमाणे खेड्यांचा विकास झाल्याशिवाय देशाचा विकास होणार नाही, त्यासाठी त्यांनी ग्रामीण विकासासाठी 'खेड्याकडे चला' असे म्हटले. स्वातंत्र्योत्तर भारताने संसदीय लोकशाहीचा स्वीकार केला आणि विकासाला महत्त्वाचे स्थान दिले. त्यामध्ये प्रामुख्याने देशाचा जलद गतीने आर्थिक विकास घडवून आणण्याच्या उद्देशाने पंचवार्षिक योजनेतून जलसंपत्तीचे संवर्धन आणि नियोजनासाठी मोठे पाठबंधारे प्रकल्प निर्माण करून लोकांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये कावेरी नदीवर बांधलेल्या कृष्णराज सागर, कृष्णा नदीवर बांधलेल्या नागार्जुन सागर, तुंगभद्रा नदीवर बांधलेल्या तुंगभद्रा, दामोदर नदीवर बांधलेल्या हिराकुड, कोयनेवर बांधलेल्या शिवसागर याचा समावेश आहे. अशाप्रकारे भारत सरकारने स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पंचवार्षिक योजनेतील सहकार प्रणालीच्या माध्यमातून देशाचा सामाजिक, आर्थिक व राजकीय अशा विविध क्षेत्रात विकास घडवून आणला.

प्रस्तुत अभ्यासात सातारा तालुक्यातील १९७१ ते १९९५ अखेरच्या दहा सहकारी पाणीपुरवठा संस्थांचा अभ्यास केला असून सहकारी पाणीपुरवठा संस्थांच्या माध्यमातून शेतकरी, सभासद व सहकारी पाणीपुरवठा संस्थामुळे ग्रामीण भागाचा विकास होण्यास मोठी मदत झाली. यातून निर्माण झालेल्या सहकारी संस्था व राजकीय घराणेशाहीतील नेतृत्त्व याविषयी मांडणी प्रस्तुत प्रबंधात केली आहे.

**२२. चव्हाण मनिषा शिवाजी, ''सातारा जिल्ह्यातील लोकसभा निवडणूका व राजकारणाचा अभ्यास''(२०१६)** [२२] **शिवाजी विद्यापीठाच्या पीएच.डी. पदवीकरिता सादर केलेला शोधप्रबंध.** प्रस्तुत शोधप्रबंधामध्ये मनिषा चव्हाण यांनी सातारा जिल्ह्यातील लोकसभा

निवडणूकांचा अभ्यास केला असून त्यामध्ये त्यांनी सातारा जिल्ह्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी, छ. शिवाजी महाराज, छ. संभाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज व प्रतापसिंह महाराज यांच्या इतिहासाबरोबरच स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये उदयास आलेल्या थोर क्रांतिकारकांच्या स्वातंत्र्यसंग्राम चळवळीचा ही अभ्यास केला असून स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये सातारा जिल्ह्यामधून उदयास आलेल्या क्रांतिसिंह नाना पाटील, बर्डे मास्तर, यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, शंकर साठे, गणपतराव तपासे इत्यादी राजकीय अभिजन वर्गाचे राजकीय नेतृत्त्व कार्याचा अभ्यास करून त्यांच्या राजकारणाचा जिल्ह्यासह महाराष्ट्राच्या राजकारणावर पडलेल्या प्रभावाचा सविस्तर अभ्यास केला आहे. त्याचबरोबर १९६२ ते २००४ या कालखंडामध्ये झालेल्या लोकसभा निवडणूका कराड व सातारा या दोन लोकसभा मतदार संघामधून निवडून आलेले खासदार, त्यांचे राजकीय कार्य, जिल्ह्यातील त्यांचा राजकीय सहभाग त्यांनी केलेली विकास कामे राज्यासह देशाच्या मंत्रीमंडळामधील त्यांचा सहभाग व वर्चस्वाचा अभ्यास केला आहे.

तसेच या लोकसभा निवडणूकीच्या माध्यमातून उदयास आलेली राजकीय घराणी आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून उदयास आलेल्या जावळीचे मोरे घराणे, फलटणचे नाईक–निंबाळकर घराणे, मलवडीचे घाटगे घराणे, जतचे डफळे घराणे, म्हसवडचे माने घराणे, कापसीचे घोरपडे घराणे या ऐतिहासिक घराण्यांचा व त्यांच्या कर्तबगारीचा अभ्यास प्रस्तुत शोधप्रबंधामध्ये केला आहे.

२३. **Economic & Political Weekely A Sameeksha Trust Publication[23] Vol. Xiii, Nos. 43 & 44. Nov. 2014** सदर संपादकीय अंकामध्ये सुहास पळशीकर यांनी लिहिलेल्या Maharashtra Assembly Elections Farewell to Maratha Politiccs ह्या लेखात महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुका व मराठा राजकारण कशापद्धतीने चालत आलेले आहे. याची मांडणी केलेली आहे. १९९५ पासून महाराष्ट्रातील राजकारणावरील काँग्रेसचे वर्चस्व कसे दुर्बल होत जाऊन २०१४ च्या निवडणुकीत नरेंद्र मोदीच्या नेतृत्त्वाखाली भारतीय जनता पार्टीने विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचे वर्चस्व संपवून विजय संपादन केला. यांचे विश्लेषण केले आहे. तसेच महाराष्ट्रातील मराठा वर्चस्वाच्या राजकारणाला भाजपने कसा पूर्णविराम दिला, काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसच्या पराभवापेक्षा दोन्ही काँग्रेस पक्षातील मराठा उमेदवारांचा पराभव

याविषयी विस्तृत विवेचन केलेले आहे. १९९५ नंतर काँग्रेसचा होत गेलेला ऱ्हास, काँग्रेसने आपले वर्चस्व टिकवण्यासाठी केलेल प्रयत्न, २०१४ च्या निवडणुकीत निर्माण झालेली नवी समिकरणे यांचे विश्लेषण करून २०१४ च्या विधानसभेच्या निवडणुकीत मराठ्यांच्या स्थितीबद्दल संक्षिप्त आढावा घेऊन महाराष्ट्रातील बदललेले राजकीय अर्थकारण आणि अंतर्गत संकटे नव्या प्रसंगाला अनुसरून राज्यातील राजकारणाशी तडजोड करीत नवे सत्ताधारी समिकरणाशी तडजोड करतील, असे मत लेखकाने मांडलेले आहे.

**२४. भोईटे दिलीप मारूती, 'पुणे जिल्ह्यातील जवाहर रोजगार योजनेच्या अंमलबजावणीचे मुल्यमापन'[२४] टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या पीएच्. डी. अर्थशास्त्र या पदवीकरीता सादर केलेला अप्रकाशित शोध प्रबंध, जुलै १९९५** प्रस्तुत शोधप्रबंधामध्ये दिलीप भोईटे यांनी पुणे जिल्ह्यामध्ये जवाहर रोजगार योजनेच्या माध्यमातून शासनाने बेरोजगार तरुणांना व सर्वसामान्य गरजू लोकांचे रोजगाराविषयीचे सुटलेले प्रश्न याचा सविस्तर आढावा घेतला आहे. प्रास्ताविक या पहिल्या प्रकरणामध्ये त्यांनी संशोधनाविषयीची सविस्तर व मुलभूत माहिती दिली आहे. प्रकरण दोन मध्ये शासनाच्या अत्यंत महत्त्वपूर्ण अशा जवाहर रोजगार योजनेचा इतिहास ती केव्हा व कशासाठी शासनाने अमलात आणली. त्या पाठीमागे शासनाचा जनकल्याणकारी योजनेचा उद्देश याचा सविस्तर अभ्यास करून त्याचा पुणे जिल्ह्यातील गरजुंना कितपत फायदा झाला. तसेच जिल्ह्याच्या एकूणच समाजकारण व राजकारणावर त्याचा काय परिणाम झाला याचा अभ्यास केला आहे. तिसऱ्या प्रकरणामध्ये त्यांनी जवाहर रोजगार योजनेची पुणे जिल्ह्यातील माहिती संकलीत केली आहे. या योजनेच्या अंमलबजावणीचे सविस्तर मुल्यमापन चौथ्या प्रकरणामध्ये केले असून पाचव्या प्रकरणामध्ये संशोधनाविषयीचे निष्कर्षाची मांडणी करून त्यावर उपाययोजना व शिफारशी सुचविल्या आहेत. त्यानंतर भोईटे यांनी संशोधनासाठी प्रश्नावली, निरीक्षणे व मुलाखती याचा वापर केला आहे. या योजनेबद्दल त्यांनी सकारात्मक मुद्दे मांडले आहेत.

**२५. चव्हाण जयश्री सदाशिव, 'सातारा जिल्ह्यातील शेती उत्पादकतेमध्ये ठिबक सिंचन पद्धतीचे योगदान'[२५], टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या (पुणे) पीएच्. डी. पदवीकरीता सादर केलेला अप्रकाशित शोधप्रबंध, जानेवारी २०१५** प्रस्तुत शोधप्रबंधामध्ये जयश्री चव्हाण यांनी सातारा जिल्ह्यामधील शेतकऱ्यांची परिस्थिती, शेतीविषयी व पाणी प्रश्नाविषयी असलेल्या

समस्या याचा सविस्तर अभ्यास केला आहे. ठिबक सिंचन पद्धतीचा अभ्यास करत असताना चव्हाण यांनी शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी ठिबक सिंचन योजनेच्या माध्यमातून कमी पाण्याची उपलब्धता असून देखील शेतकरी चांगले पीक घेऊ शकतो. तसेच ठिबक सिंचन योजनेमुळे पाण्याचा विसर्ग वाया न जाता उपलब्ध असणारे पाणी फक्त पिकालाच कशाप्रकारे पोहचते व त्याचा फायदा कशापद्धतीने पीकवाढीसाठी होतो याचा अभ्यास केला आहे. चव्हाण यांनी आपल्या या संशोधन प्रबंधात एकूण सहा प्रकरणात माहिती दिली असून प्रस्तावना या पहिल्या प्रकरणामध्ये संशोधन विषयाची ओळख करून दिली. प्रकरण दोनमध्ये संशोधन पद्धतीची माहिती देऊन संदर्भ साहित्याचा आढावा घेतला आहे तर सातारा जिल्ह्याचे औद्योगिक, सामाजिक समालोचन प्रकरण तीनमध्ये स्पष्ट केले आहे. चौथ्या प्रकरणामध्ये ठिबक सिंचनासंबधीच्या शासनाच्या धोरणाचा आढावा घेतला आहे. तथ्य संकल्पनाचे विश्लेषण आणि गृहितकांची पडताळणी पाचव्या प्रकरणामध्ये केली असून सहाव्या व शेवटच्या प्रकरणामध्ये संशोधनातून काढलेले निष्कर्ष व शिफारशी याची माहिती दिली आहे.

२६. **देशमुख विश्वासराव, मालोजीराजे, प्रकाशक श्रीमंत मालोजीराजे स्मृती प्रतिष्ठान फलटण,** [२६] **१४ मे २००४** या पुस्तकात फलटण संस्थांनाचे संस्थानापती श्रीमंत मालोजीराजे नाईक–निंबाळकर यांच्या जीवन कार्याविषयीची माहिती दिलेली आहे. त्यांची राजकीय कारकिर्द यामध्ये सविस्तर दिलेली आहे. यामध्ये शिवकाळापासून ते श्रीमंत मालोजीराजे नाईक–निबाळकर यांच्या काळापर्यंतचा या घराण्याने चालविलेला राजकीय वारसा याचीही माहिती यात दिलेली आहे. तसेच त्यांनी फलटण शहरात केलेल्या सुधारणांची माहिती दिलेली आहे.

२७. **शेंद्रे मनिषा शिवाजी, 'महाराष्ट्रातील पंचायत राजव्यवस्थेमध्ये महिलांचे स्थान–दौंड तालुक्यातील महिला सरपंच यांचा चिकित्सक अभ्यास'** [२७] **२००८** मनिषा शेंद्रे यांनी आपल्या महाराष्ट्रातील पंचायत राजव्यवस्थेमध्ये महिलांचे स्थान–दौंड तालुक्यातील महिला सरपंच यांचा चिकित्सक अभ्यास टिळक महाराष्ट्र विद्यापीठास (पुणे) सादर केलेल्या एम. फील. या शोध प्रबंधामध्ये दौंड तालुक्यातील पंचायत राजव्यवस्थेमधील महिला आरक्षण व त्या माध्यमातून महिलांना ग्रामपंचायतीमध्ये सरपंच या महिला आरक्षित पदावर काम करण्याची मिळालेली संधी व त्यामुळे महिलांच्या राजकीय सहभागाचा व राजकीय लाभाचा अभ्यास केला

आहे. या प्रबंधामध्ये त्यांना एकूण चार प्रकरणातून आपले संशोधन सादर केले आहे. प्रकरण एक प्रस्तावनामध्ये त्यांनी संशोधनाविषयीची सर्व माहिती दिली आहे. महाराष्ट्रातील पंचायत राजव्यवस्थेची सुरवात महिला आरक्षण इत्यादीविषयी प्रकरण दोनमध्ये माहिती दिली आहे. माहितीचे विश्लेषण तिसऱ्या प्रकरणामध्ये केले आहे तर चौथ्या आणि शेवटच्या प्रकरणामध्ये शेंद्रे यांनी निष्कर्ष व उपाययोजना सुचविल्या आहेत. शेंद्रे यांनी दौंड तालुक्यातील अनेक गावामधील महिला सरपंचाचा कार्यकाळ, त्यांनी घेतलेले गावाविषयी धोरणात्मक निर्णय गावाचा केलेला विकास हे काम करत असताना त्यांना आलेल्या अनेक अडचणी याचा सविस्तर अभ्यास केला आहे.

**२८. निंबाळकर पांडुरंग यशवंत, 'कोल्हापूर जिल्ह्याच्या निवडक तालुक्यातील कृषी विकासासाठी जिल्हा परिषदेने केलेल्या कार्याची अर्थशास्त्रीय चिकित्सा'[२८] टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या पीएच्. डी. पदवीकरीता सादर केलेला अप्रकाशित शोधप्रबंधामध्ये २०१०** पांडुरंग निंबाळकर यांनी कोल्हापूर जिल्ह्यातील निवडक तालुक्यातील कृषी विकासासाठी जिल्हा परिषदेने केलेल्या कार्याची चिकित्सकपणे अभ्यास केला आहे. या प्रबंधामध्ये त्यांनी एकूण सहा प्रकरणातून कोल्हापूर जिल्ह्यातील ठराविक तालुक्याचा कृषीविषयक सविस्तर अभ्यास केला असून प्रकरण एक या प्रस्तावना प्रकरणामध्ये संशोधन विषयीची ओळख करून दिली आहे. दुसऱ्या प्रकरणामध्ये महाराष्ट्रातील परिषदाच्या कार्य, अधिकार व संरचना याचा अभ्यास केला आहे. तिसऱ्या प्रकरणामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील अध्ययन क्षेत्राचा आणि अधिकाराचा रूपरेषेचा आढावा घेतला आहे. तर कोल्हापूर जिल्हा परिषद, कृषी विकास योजनेचा अभ्यास चौथ्या प्रकरणामध्ये केला आहे. तसेच कोल्हापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषदेचा कृषी विकास योजना व त्या योजनेचा मिळालेला लाभ व त्या लाभार्भी, शेतकऱ्यांचा सामाजिक व आर्थिक वर्गीकरण पाचव्या प्रकरणामध्ये केले आहे तर कोल्हापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद कृषी विकास योजनेबाबत लाभार्थ्यांचा व शेतकऱ्यांच्या मतांचा कौल याचा सविस्तर अभ्यास प्रकरण पाच मध्ये केला असून सातव्या प्रकरणामध्ये त्यांनी संशोधनाला अनुसरून निष्कर्ष व उपाययोजना सुचविल्या आहेत. गृहितकांची पडताळणी करून योग्य अशा सूचना केल्या आहेत.

**२९. बोधे अनिल आ. (संपा.) लक्ष मनाचा नेता खासदार श्री. लक्ष्मणराव पाटील (लोकप्रिय कणखर नेते प्रा. शिवाजीराव चव्हाण) प्रकाशक, श्री. रोकडेश्वर, सहकार समुह रहिमतपूर, २५ फेब्रुवारी २००६** राष्ट्रवादीचे झुंजार सेनानी, प्राचार्य रमणलाल शहा संपादित ग्रंथ मा. खासदार लक्ष्मणराव जाधव–पाटील यांच्या विषयीची माहिती देणारा गौरवग्रंथ आहे. या ग्रंथामध्ये अनेक लेखकांनी लक्ष्मणराव पाटील यांच्या जीवन कार्याविषयीची माहिती आपल्या छोट्या–मोठ्या लेखातून दिलेली आहे. यात लक्ष्मणराव जाधव–पाटील यांच्या घराण्याच्या कार्याची सुरुवात त्यांच्यापासून झाली. त्यांच्या घराण्याचा हा थोर वारसा आजही टिकून आहे. या विषयीची माहिती यात नमूद केलेली आहे. तसेच यामध्ये असलेल्या लेखातून लक्ष्मणराव पाटील यांचे जीवनकार्य समजण्यास मदत झालेली आहे.

**३०. जाधव पाटील लक्ष्मणराव, वाई, खंडाळा व महाबळेश्वरातील माझा मानस, जननायक मकरंद, प्रकाशक, प्रतापराव गोपाळराव पवार, उडतरे, दि. १५ ऑगस्ट २०१४**
या ग्रंथात जाधव पाटील घराण्यातील आमदार मकरंद लक्ष्मणराव जाधव–पाटील यांच्या कार्याची माहिती दिलेली आहे. यावरून असे दिसून येते की, मकरंद पाटील यांनी आपली राजकीय कारकिर्द कशाप्रकारे टिकवून ठेवली आहे. तसेच त्यांनी वाई–खंडाळा या आपल्या मतदारसंघात केलेल्या कार्याची माहिती या लेखातून दिलेली आहे.

**३१. वाबळे डी. सी., 'स्थानिक स्वराज्य संस्था मधील महिलांचे योगदान–पुणे जिल्हा परिषदेतील महिलांच्या सामाजिक व राजकीय सहभाग'[३१] २००२** वाबळे यांनी २००२ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थामधील महिलांचे योगदान पुणे जिल्हा परिषदेतील महिलांचा सामाजिक व राजकीय सहभाग या विषयावरील पीएच्.डी.चा शोधप्रबंध सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठास २००२ मध्ये सादर केला. त्यामध्ये त्यांनी महिला आरक्षणाविषयीची शासनाची भूमिका, महिला आरक्षण, महिला आरक्षणाची सुरवात याविषयी सविस्तर मांडणी केली असून पुणे जिल्हा परिषदेमधील कार्य क्षेत्रामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेमधील महिला आरक्षण व त्या माध्यमातून महिलांमध्ये झालेली सामाजिक व राजकीय जागृती, राजकीय सहभाग व आरक्षण धोरणाचा पुणे जिल्ह्यातील महिला वर्गावर झालेला परिणाम याचा सविस्तर अभ्यास केला आहे.

**३२. अनिल जगताप ,सातारा जिल्ह्यातील दलित चळवळीचा अभ्यास १९७२ ते २००२ टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे , पीएच.डी. राज्यशास्त्र या पदवीकरिता सादर केलेला**

**अप्रकाशित प्रबंध.** प्रस्तुत शोध निबंधामध्ये जातिव्यवस्थेमुळे भारताचे जगात असणारे वेगळेपण, दलित व अतिक्षुद्र यांच्या चळवळीची सुरुवात ते मानवमुक्तीपर्यंतचा प्रवास, जातीव्यवस्थेची निर्मित्ती, महात्मा फुलेंनी दलितांच्या मागासलेपणाची केलेली मीमांसा, त्यांनी मुलींसाठी व दलितांसाठी सुरु केलेल्या शाळा, छत्रपती शाहू महाराजांनी दलित व ब्राह्मणेत्तर लोकांसाठी केलेले कार्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन चरित्र, त्यांनी सुरु केलेल्या चळवळी, राज्यघटनेची निर्मिती, रिपब्लिकन पक्षाची स्थापना, त्या पक्षातील फुट, १९७२ ते २००२ या कालावधीतील दलितांच्या चळवळी, दलित पँथर, भारतीय रिपब्लिकन पक्ष, बहुजन महासंघ, बहुजन समाज पक्ष याची निर्मिती वाटचाल दलित विकासातील योगदान, सातारा जिल्ह्यातील दलितांच्या चळवळी याची अभ्यासपूर्ण मांडणी केलेली आहे.

**३३. रमेश इंगोले, भारिप – बहुजन महासंघाच्या राजकारणाचा विश्लेषणात्मक अभ्यास विशेष संदर्भ. अकोला, वाशीम, बुलढाणा जिल्हा, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, पीएच.डी. राज्यशास्त्र या पदवीकरिता सादर केलेला अप्रकाशित प्रबंध.** प्रस्तुत शोध प्रबंधात भारिप – बहुजन महासंघाच्या राजकारणाचा विश्लेषणात्मक अभ्यास करण्यात आला आहे. या शोध निबंधात भारिप – बहुजन महासंघाच्या निर्मितीचा इतिहास स्वातंत्र्यपूर्व काळात झालेले दलितांच्या उद्धारासाठीचे प्रयत्न, डॉ. बाबसाहेब आंबेडकरांचे सामाजिक, राजकीय कार्य, रिपब्लिकन पक्षाची स्थापना व वाटचाल, रिपब्लिकन पक्षाचे विघटन, रिपब्लिकन पक्षाचे ऐक्य व संघर्षाचे परिणाम, भारिप – बहुजन महासंघाचा उदय, परिवर्तनीय राजकारण, अँड. प्रकाश आंबेडकर यांचा राजकारणात प्रवेश, अकोला पँटर्न, भारिप–बहुजन महासंघाचा लोकसभा, विधानसभा आणि विधान परिषदे निवडणुकीतील सहभाग, नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीतील सहभाग, भारिप–बहुजन महासंघाची विविध क्षेत्रातील कार्य साखर कारखानाविरोधी माणगाव–पुणे लाँगमार्च, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, कृषी, महिला विकास इ., वारकरी आंदोलन स्वतंत्र विदर्भ आंदोलन, संविधान पुनर्विलोकनाबाबतची भूमिका इ.बाबतची अतिशय सविस्तर मांडणी केलेली आहे.

**34. B. S. Baviskar : The Politics of Development : Sugar Co-Operatives in Rural Maharashtra –Oxford University Press : Calcutta, 1980. Print.**

महाराष्ट्रमध्ये १९५० दशकात साखर कारखान्यांची झालेली वाढ हा ग्रामीण भागातील मोठा विकास मानला पाहिजे. महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांच्या उदयावर विद्यमान सामाजिक व राजकीय शक्तींचा प्रभाव होता. त्यामुळेच राजकारणांच्या रचना आणि शैलीत वेगवेगळ्या सुधारणा झाल्या. पहिली सहकारी संस्था १८४४ मध्ये इंग्लडमध्ये ग्राहक भांडारच्या रुपाने स्थापन झाली तर जर्मनीत मध्यस्थ आणि सावकार यांना दूर करण्यासाठी रायफिनेस सोसायटी विकसीत झाली. भारतामध्ये १९०४ च्या भारतीय सहकारी संस्था कायद्याने सहकारी चळवळ सुरू झाली. महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांचा विकास कृषी ग्रामीण सोसायट्यांची वाढ महाराष्ट्राला विकासाच्या पर्वावर नेऊन ठेवते. या सहकारी संस्थांच्या निर्मितीने शेती उत्पादनात वाढ होऊन आर्थिक दुर्बल घटकांच्या विकासात अमुलाग्र बदल झाला. कृषी क्षेत्रातील असमानता सामाजिक शोषण कमी झाले. सभासदांच्या निष्ठेवर सहकारी संस्था प्रगती करू लागल्या. या संस्था सहकारी नेतृत्त्वाच्या नियंत्रणात येऊ लागल्या. जागतिक बाजारीकरण, भांडवल पुरवठा यावर सहकारी साखर कारखानदारी विकसित होत गेली. अहमदनगर जिल्ह्यात प्रवरा सहकारी साखर कारखाना निर्माण होऊन खऱ्या अर्थाने सहकारी साखर कारखानदारी महाराष्ट्रामध्ये विकसित होत गेली. या पुस्तकामध्ये सहकारी साखर कारखानदारी आणि त्यातून नेतृत्त्वाचा विकास, आर्थिक दुर्बलांचा विकास याची महत्त्वपूर्ण मांडणी केली असून कारखानदारीतून वेगवेगळी घराणी कशी विकसित होत गेली याचे विश्लेषण करण्यात आलेले आहे.

**35. Dr. V. C. Patil : Bharatiya Janata Party in Maharashtra : A.B.S. Publication : Varanasi, 2013 Print.**

राजकीय व्यवस्थेला व घटनात्मक लोकशाहीला स्थैर्य देण्यासाठी राजकीय पक्षांचा खूप मोठा वाटा आहे. भाजप हा धर्म आणि राष्ट्रवाद याची सांगड घालतो. हेडगेवार, गोवळकर यांनी संबंधित केलेल्या विचारावर भाजप पक्षाची वाटचाल सुरू असलेली दिसून येते. हिंदुत्त्व विचारसरणी जनसंघ, शिवसेना अशा धार्मिक विचाराच्या युतीने भारतीय जनता पक्ष देशामध्ये वेगवेगळ्या राज्यात आपले वेगळे अस्तित्व निर्माण करू लागला आहे. सुरवातीच्या कालखंडात शेटजी–भटजींचा पक्ष अशी टीका केली जात होती. पण गोपिनाथ मुंडे, सुर्यभान वराडणे, ना.

स. फरांदे, अण्णा डांगे इ. नेतृत्त्वाच्या माध्यमातून माळी, धनगर, वंजारी यांच्यासारख्या इतर जातींना बरोबर घेऊन भारतीय जनता पक्ष शहरी भागातून ग्रामीण भागामध्ये विकसित होत गेला. रामजन्मभूमी, शाहबानू प्रकरण, समान नागरी कायदा, ३७० कलम इ. मुद्यांच्या आधारे भारतीय जनता पक्षाने संपूर्ण भारतात आपले वर्चस्व निर्माण करू लागला आहे. १९९५ मध्ये भाजप–शिवसेना युतीच्या माध्यमातून महाराष्ट्रामध्ये सरकार स्थापन केले आणि १९९८ मध्ये केंद्रात सरकार स्थापन करून भारतीय जनता पक्ष हा काँग्रेसला खंबीर पर्याय म्हणून पुढे येऊ लागला. भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून राजकीय घराणेशाहीला विरोध करून घराणेशाही विरोधात आवाज उठविण्याचा प्रयत्न केलेला आहे. प्रस्तुत प्रबंधाची मांडणी करत असताना या पुस्तकामधून राजकीय घराणेशाहीच्या विरोधी लोकमत जागृत करण्याचा प्रयत्न भारतीय जनता पार्टीने केलेला आहे असे दिसते.

**36. Lele Jayant : Elite Pluralism an Class Rule, Political Development in Maharashtra, Popular Prakashan, Bombay, 1982**

भारतामधील ग्रामीण भागातील सध्याच्या राजकीय वर्तचनाच्या अभ्यासानुसार भारतातील सध्याची लोकशाही आणि तिची वाटचाल याची माहिती विशद करून महाराष्ट्रातील राजकीय नेतृत्त्व ठराविक वर्गामध्ये निर्माण झालेले दिसते. उच्चभ्रु लोक सार्वजनिक क्षेत्रावर कशा प्रकारे प्रभाव निर्माण करून जनसामान्यांस वेठीस धरतात. स्थानिक पातळीवरून ते केंद्रीय पातळीपर्यंत ठराविक वर्गामध्येच सत्ता एकवटली असून यांच्यामध्येच सत्ता स्पर्धा निर्माण झालेली दिसते. काही ठिकाणी या वरिष्ठवर्गीय नेतृत्त्वाच्या विरोधात समाज एकवटलेला असून या नेतृत्त्वाकडून कशाप्रकारे विचाराची मांडणी केली जाते. त्याचबरोबर समाजामधील कनिष्ठ स्तर राजकारणापासून अलिप्त असून निवडणुकीपुरता जागृत असलेला दिसतो. या पुस्तकामधून समाजामधील वरिष्ठ, कनिष्ठ यांच्यातील दरीची जाणीव होताना दिसते. प्रबंधाची मांडणी करताना वरील अभ्यास महत्त्वाचा ठरतो.

**37. B. S. Baviskar : Understanding Indian Society Past and Present Orient Blackgwan Private Limited 2018**

वरील पुस्तक हे प्रख्यात विद्यवानांच्या लेखांचा संग्रह आहे. या पुस्तकाची विभागणी चार भागात करण्यात आलेली आहे. यात लिंग, धर्म, विकास, सामाजिक बदल यांची सखोल माहिती देण्यात आली आहे. यात भारतीय समाजाबद्दल नवीन दृष्टीकोनातून मांडणी करण्यात

आली आहे. कुटुंबाचे परिवर्तन, धर्माचे समाजशास्त्र, समाजामध्ये होणारा बदल या माध्यमातून समाजाच्या परिवर्तन आणि प्रगती याची मांडणी करण्यात आलेली आहे. या पुस्तकामधून सामाजिक परिवर्तन, धर्म, जाती यांची विचारसरणी समाजामध्ये असलेले आहे रे व नाही रे वर्ग विभागणी इ. पुस्तकामधून प्रस्तुत अभ्यास करताना उपयुक्त ठरू शकते.

**३८. अनुवाद : सतिश कामत – प्रवण रॉय दोश बआर सोपारीवाला, कौल लोकमताचा, भारतीय निवडणुकांची उकल, मनोविकास प्रकाशन, नारायण पेठ पुणे, २०१९**

भारतीय निवडणुकांचा अभ्यास करताना लेखकाने १९८३ पासून राजकीय व्यवस्थेची माहिती मांडली आहे. भारतीय राजकारणात काँग्रेस पक्षाचे वर्चस्व कमी होत जाऊन लहान लहान घटक पक्ष आपला राजकीय प्रभाव निर्माण करत असून समाज माध्यमाचे राजकारण, स्त्री मतदारांचा वाढता प्रभाव, तरुण वर्गाचा राजकारणातील सहभाग, कोणत्या राज्यात कोणते महत्त्वाचे मुद्दे प्रभावी ठरू शकतात व प्रादेशिक पक्ष व राष्ट्रीय पक्ष यांचे जाहीरनामे याची मांडणी अत्यंत चांगल्या पद्धतीने करण्यात आलेली आहे. निवडणुकीमध्ये अपक्ष उमेदवारांना प्राप्त होणारी टक्केवारी ग्रामीण शहरी मतदार यांच्यातील कळीचे मुद्दे व टक्केवारी, सत्ताधारी पक्षांच्यावर असलेली रोष भावना, उमदेवारांकडून देण्यात आलेली आश्वासने याची माहिती देण्यात आलेली आहे. या पुस्तकामध्ये राजकीय घराणेशाहीसंबंधी लिखान झालेले दिसत नाही. तरी तुलनात्मक मांडणी विश्लेषण अतिशय महत्त्वपूर्ण असून नवीन संशोधनासाठी ते आवश्यक आहे.

**३९. लेले जयवंत : भारत समाज आणि राजकारण, यशवंतराव यांचे प्रकट चिंतन, रोहन प्रकाशन, पुणे, २०२०**

आधुनिक महाराष्ट्राची पायाभरणी करून देशपातळीवर आपल्या कर्तृत्वाचा ठसा यशवंतराव चव्हाण यांनी निर्माण केला. त्यांनी राज्याच्या मुख्यमंत्री पदाबरोबर केंद्रामध्ये विविध महत्त्वाची मंत्रीपदे भूषविली. त्यांनी आपले कार्य आत्मचरित्राद्वारे मांडण्याचा संकल्प केला. त्यातीलच एक खंड प्रकाशित झाला. डॉ. जयंत लेले यांनी यशवंतरावांच्या मुलाखतीतून प्रस्तुत ग्रंथ प्रकाशित केला. हा ग्रंथ म्हणजे यशवंतराव चव्हाण यांचे आत्मचरित्रच म्हणावे लागेल. यशवंतराव चव्हाण यांचा राज्य व देशपातळीवरील अभ्यास सखोल असलेला दिसतो. समता, स्वातंत्र्य मुल्यांची जोपासणा करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केला आहे. यशवंतराव चव्हाण यांची

कारकिर्दी स्वातंत्र्यसंग्रामापासून ते महाराष्ट्र निर्मिती काळ व केंद्रामधील एक महत्त्वाचे नेतृत्त्व अशी चढती कमान दिसून येते. आज जो महाराष्ट्र देशपातळीवर एक प्रगतीचे राज्य म्हटले जाते त्याचे श्रेय यशवंतराव चव्हाण यांना द्यावे लागेल. कृषी औद्योगिक समाज रचना, स्थानिक स्वराज्य संस्था, सहकार चळवळ इत्यादींच्या माध्यमातून सर्व सामान्य वर्ग समोर ठेवून राजकीय व्यवस्थेच्या माध्यमातून अमुलाग्र बदल घडवून आणला. प्रस्तुत प्रबंध लिहित असताना यशवंतराव चव्हाण यांच्या कार्याचा अभ्यास अतिशय उपयोगी ठरलेला आहे.

**संशोधन प्रबंधांची आवश्यकता व कारणमिमांसा** :

सदर प्रबंधाची आवश्यकता फार गरजेची आहे. भारतात व त्यातही महाराष्ट्रात राजकीय घराणेशाहीने फार पूर्वीपासून आपला व्यापक पसारा वाढविला आहे. प्रकरण एक मध्ये विखे–पाटील घराणे ते महाडिक घराणे अशी महाराष्ट्रातील राजकीय घराण्यांची मांडणी केली आहे. यात सातारच्या राजकीय घराण्यांची कामगिरी विशेष दिसून येत नाही. मराठा इतिहासातील सातारची छत्रपतींची गादी व त्यांचे सध्याच्या राजकारणातील स्थान समाजात अबाधित आहे. सबब सातारा जिल्ह्यातील राजकीय घराण्यांचा अभ्यास हा अतिशय आवश्यक म्हणून निवडला आहे. या घराण्यांना राजकीय मंचावर उभे करून त्यांचे कार्य उजेडात आणणे. ही या प्रबंध मांडणीची प्रमुख गरज आवश्यकता होय.

मा. यशवंतराव चव्हाण व लोकनेते बाळासाहेब देसाई, यशवंतरव मोहिते, मालोजीराव नाईक–निंबाळकर यांनी सहकार क्षेत्रात आपला वेगळा प्रभाव निर्माण केला. त्याबरोबरच काही घराण्यांनी आप–आपल्या मतदारसंघापुरता प्रभाव निर्माण करून विकासाचे जाळे निर्माण केले. या सर्वांच्या कार्याचा विचार करता त्यांचे राजकीय घराणे उजेडात आणणे. हा प्रबंधाचा मुळ हेतू आहे. या प्रकरणात जो संदर्भ साहित्याचा आढावा घेतला आहे. तो एकांगी प्रकारचा आहे. महाराष्ट्रातील सत्ता संघर्ष, निवडणुकांचा अभ्यास, राजकीय पक्षांच्या वाटचालीपुरताच आहे. या प्रबंधात महाराष्ट्रातील प्रगत व सधन सातारा जिल्हा व त्यातील राजकीय घराणी व त्यांचे राज्याच्या राजकारणातील स्थान व प्रभाव यांच्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. हा प्रयत्न नवीन आहे. असे संशोधकाचे मत आहे.

राजकीयदृष्ट्या सतर्क व जागरुक असलेला सातारा जिल्हात लोकशाहीचे निकष जपले जातात का? हे जाणणे गरजेचे आहे. संविधानात जे लोकशाहीसाठी निकष अनुसरले आहेत.

त्याप्रमाणे आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक, विकास होत आहे का? संशोधनकर्त्यांनी १९९० ते २०१५ या अलिकडच्या २५ वर्षांच्या कालखंडाचा अभ्यास हाती घेतलेला आहे. हे आजपर्यंत केलेल्या संशोधनापेक्षा वेगळे संशोधन आहे. साधारणपणे राजकीय घराणी ही पारंपारिक व ऐतिहासिक घराणी असतात. त्यांना शतकांचा इतिहास असतो. तथापि या कालखंडात काही नवीन घराण्यांचा उदय झालेला दिसतो. ही जी नवीन राजकीय घराण्यांची फळी निर्माण झालेली दिसते तिचा उदय या दोन दशकांतील आहे काय तसा बदल झाला असल्यास हे नवीन परिवर्तन जिल्ह्यात सर्वत्र झाले काय? यांचा अभ्यास या प्रबंधात संशोधन कर्त्याने केला आहे. हे प्रस्तुत अभ्यासाचे नाविण्य म्हणता येईल. या पद्धतीने तुलनात्मक राजकीय बदल अभ्यासणे गरजेचे वाटते. म्हणून हा अभ्यास विषय व कालखंड निवडलेला आहे.

**समारोप**

पश्चिम महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्याचा सामाजिक व राजकीयदृष्ट्या प्रभावी जिल्हा म्हणून स्वतंत्र अशी ओळख आहे. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी जी चळवळ उभी राहिली ती चळवळ गतिमान करून त्यास व्यापक स्वरूप प्राप्त करून देण्यामध्ये सातारा जिल्ह्याचा भरीव सहभाग होता. सातारा जिल्ह्यास छ. शिवाजी महाराज, सरसेनापती हंबीरराव मोहिते, सरदार महादजी शिंदे, रामशास्त्री प्रभुणे व महाराणी ताराबाई अशाअनेक पराक्रमी स्त्री–पुरूषांचा आणि त्यांच्या घराण्यांचा क्रांतिकारी वारसा लाभलेला असून स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये यशवंतराव चव्हाण, आनंदराव चव्हाण, यशवंतराव मोहिते, पृथ्वीराज चव्हाण, अभयसिंहराजे भोसले, उदयनराजे भोसले इत्यादीसारखे प्रबळ व प्रगल्भ विचारसरणीचे नेतृत्त्व याच जिल्ह्यातून उदयास आले. यापैकी अनेक नेत्यांनी भारतासह महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये मुख्यमंत्री, संरक्षण मंत्री, उपपंतप्रधान, प्रधानमंत्री कार्यालयीन मंत्री अशाअनेक महत्त्वाच्या पदावर प्रभावी कार्य करून भारतीय राजकारणामध्ये आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. हे नेतृत्त्व महाराष्ट्रातील इतर नेत्यापेक्षा अत्यंत प्रभावी असून त्यांचे राजकीय स्थान शोधण्याचा समाधानकारक अभ्यास अद्याप झालेला नाही.

तसेच महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांतील राजकीय घराण्यातील अभिजनापेक्षा सातारा जिल्ह्यातील अभिजनांमध्ये राजकीय जाणीव जागृती अधिक प्रगल्भ होत गेल्या. परिणामी दुष्काळी भागातील माण, खटाव, कोरेगाव हे तालुके वगळता जिल्ह्यातील इतर तालुक्याचा सर्वांगिण विकास घडवून आणण्यास ही घराणी यशस्वी झाली असल्याचे दिसते. अशा या

घराण्यांचा सविस्तर अभ्यास करून महाराष्ट्राच्या राजकारणावर त्यांचा काय परिणाम झाला आहे. तसेच सातारा जिल्ह्यातील जनतेवर त्यांच्या कार्याचा व घराण्यांचा कशाप्रकारे परिणाम झाला आहे. एकूणच जिल्ह्याच्या विकासात व महाराष्ट्राच्या राजकारणात त्यांचे स्थान काय आहे याचा स्वतंत्र शोध घेण्यासाठी या विषयाची निवड करण्यात आलेली आहे.

आजपर्यंत घराणेशाहीवर झालेल्या अभ्यासातून असे दिसते की, भारताच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक व्यवस्थेवर पूर्वीपासूनच काही घराण्यांचे व त्यामधून उदयास आलेल्या अभिजनांचे वर्चस्व असलेले दिसते. पूर्वी व आज सुद्धा सामान्य लोकांना आपली स्वतंत्र राजकीय किंवा सामाजिक ओळख निर्माण करता आली नाही. काही लोक, कार्यकर्ते यामध्ये समाविष्ट झाले असले तरी त्यांना तशा प्रकारची संधी मिळाली असली तरी ती मर्यादित असल्याचे दिसते. एखादा सामान्य कार्यकर्त्याने या घराणेशाही विरूद्ध बंड करून निवडणूकीमध्ये उभे राहण्याचे धाडस केले तर त्याचा या घराण्यासमोर टिकाव लागत नाही. तो निवडून येण्याची शक्यता दिसत नाही. ही घराणी स्वातंत्र्यपूर्व कालखंडापासून आपआपल्या मतदार संघामध्ये प्रस्थापित झालेली पहावयास मिळतात. भारतासह महाराष्ट्रामधील घराणेशाहीवर बरेच लिखाण झाले आहे परंतु सातारा जिल्ह्यातील घराणेशाही व त्यांच्या कायकर्तृत्त्व दुर्लक्षित राहिले आहे. म्हणून त्यावर प्रकाश टाकण्याचे महत्त्वपूर्ण कार्य सातारा जिल्ह्यातील राजकीय घराण्यांचा अभ्यास १९९० ते २०१५ या शोधप्रबंधाच्या माध्यमातून करण्याचा प्रयत्न केला आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची**


१) कुलकर्णी हेरंब, 'पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा येथील घराणेशाहीचा अभ्यास' पीएच. डी. शोधप्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

२) आवाळे मनोज, महाराष्ट्रातील राजकीय घराणी, आदिश्रेय प्रकाशन पुणे, २०१९

३) कुलकर्णी म. रा., महाराष्ट्रातील प्रसिद्ध सरदार घराणी शिवकालीन व पेशवे कालीन यांचा अभ्यास, दत्तात्रय ग. पाष्टे, डायमंड पब्लिकेशन्स, सदाशिव पेठ, पुणे. प्रथम आवृत्ती, २००९

४) शिंदे य. ग. 'महाराष्ट्र विधानसभा निवडणुका' (१९७८, १९८०, १९८५, १९९०) एक दृष्टीकोन, चंदन प्रकाशन पार्वती, पुणे, १९९४ (प्रकाशित)

५) संपा. भोसले प्रविण वसंत रा., 'मराठ्यांची धारातिर्थे' प्रकाशक, सौ. कुसुम भोसले, नरसिंग पब्लिकेशन्स, विश्रामबाग सांगली, २००६

६) महाजन विराज, सिंधुदुर्ग–रत्नागिरी, राणेंच्या वर्चस्वास धक्का, संपादक तुकाराम जाधव व इतर, महाराष्ट्राचे राजकारण नव्या वळणावर?, द युनिक ॲकॅडमी पुणे, ऑगस्ट २०१५, (प्रकाशित)

७) ओक प्रसाद, 'पेशवे घराण्याचा इतिहास', कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, तिसरी आवृत्ती.

८) भणगे रवींद्र, 'महाराष्ट्रातील शिवसेना : वाढ आणि तिचा महाराष्ट्रातील राजकारणावरील प्रभाव' (१९६६–१९९६) पीएच.डी. शोधप्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, डिसेंबर २००२ (अप्रकाशित)

९) सिरसीकर व. म., आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण, कॉटिन्टिनेटल प्रकाशन, पुणे १ मे २००१

१०) पळशीकर सुहास, 'समकालिन भारतीय राजकारण' (काँग्रेस वर्चस्व ते हिंदू जमातवाद), प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००४, (प्रकाशित)

११) कोलारकर, श. गो., ''प्राचीन भारताचा राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक इतिहास'' (प्रारंभापासून ते इ. स. १२०६) श्री. मंगेश प्रकाशन नागपूर, २००३

१२) दिवाण मोहन, देवधर जयंत, दिवाण विवेक, 'भारतातील राज्याचे राजकारण', विद्या प्रकाशन, नागपूर, २००४, (प्रकाशित)

१३) कुलकर्णी अ. रा., ग. ह. खरे (संपादक), 'मराठ्यांचा इतिहास' खंड पहिला, डायमंड पब्लिकेशन्स, सदाशिव पेठ, पुणे. प्रथम आवृत्ती, २००९

१४) भूजबळ चंद्रकांत, 'लोकप्रतिनिधी निवणूक मार्गदर्शक' (लोकसभा मतदार संघ पुर्नरचना), लोकमित्र प्रकाशन, पुणे, एप्रिल २०१३ (प्रकाशित)

१५) संपादक–पळशीकर सुहास, विरमल नितीन, सं. संपादक– प्रकाश पवार महाराष्ट्राचे राजकारण– राजकीय प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ २००९

१६) पळशीकर सुहास, कुलकर्णी सुहास : 'महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष, राजकीय पक्षांची वाटचाल' समकालिन प्रकाशन, २००७ (प्रकाशित)

१७) देशपांडे वसंत वासुदेव, ''महाराष्ट्राची सुवर्णगाथा,'' प्रकाशक, ग्रंथाली, इंडियन एज्युकेशन सोसायटी, महात्मा फुले कन्या शाळा, दादर, मुंबई. प्रथम आवृत्ती, २०११

१८) पळशीकर सुहास, बिरमल नितिन, महाराष्ट्राचे राजकारण (राजकारण प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ), प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००७, (प्रकाशित)

१९) संपादक : भोळे भा. ल., बेडकिहाळ, 'बदलता महाराष्ट्र', आंबेडकर अकादमी, सातारा, दुसरी आवृत्ती, २००३

२०) पवार प्रकाश, 'महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना', प्रतिमा प्रकाशन, पुणे, मार्च २००९ (प्रकाशित)

२१) निकम अधिकराव हिंदूराव, ''ग्रामीण भागाच्या विकासासाठी सहकारी संस्थांचे योगदान (सहकारी पाणीपुरवठा संस्था, सातारा तालुका) (१९७१ ते १९९५ अखेर १० संस्थेचे व्यष्टी अध्ययन) शिवाजी विद्यापीठाच्या एम. फील. राज्यशास्त्र या पदवीकरीता सादर केलेला अप्रकाशित शोध निबंध–जून २००१)

२२) चव्हाण मनिषा शिवाजी, ''सातारा जिल्ह्यातील लोकसभा निवडणूका व राजकारणाचा अभ्यास'' शिवाजी विद्यापीठास राज्यशास्त्र सादर केलेला पीएच्. डी. अप्रकाशित शोधप्रबंध

२३) Economic & Political Weekely A Sameeksha Trust Publication Vol. Xiii, Nos. 43 & 44. Nov. 2014

२४) भोईटे दिलीप मारूती, ''पुणे जिल्ह्यातील जवाहर रोजगार योजनेच्या अंमलबजावणीचे मुल्यमापन'' टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या पीएच्. डी. अर्थशास्त्र या पदवीकरीता सादर केलेला अप्रकाशित शोध प्रबंध, जुलै १९९५

२५) चव्हाण जयश्री सदाशिव, ''सातारा जिल्ह्यातील शेती उत्पादकतेमध्ये ठिबक सिंचन पद्धतीचे योगदान'', टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या (पुणे) पीएच्. डी. पदवीकरीता सादर केलेला अप्रकाशित शोधप्रबंध, जानेवारी २०१५

२६) देशमुख विश्वासराव, मालोजीराजे, प्रकाशक श्रीमंत मालोजीराजे स्मृती प्रतिष्ठान फलटण, १४ मे २००४

२७) शेंद्रे मनिषा शिवाजी, 'महाराष्ट्रातील पंचायत राजव्यवस्थेमध्ये महिलांचे स्थान–दौंड तालुक्यातील महिला सरपंच यांचा चिकित्सक अभ्यास'–२००८

२८) निंबाळकर पांडुरंग यशवंत, ''कोल्हापूर जिल्ह्याच्या निवडक तालुक्यातील कृषी विकासासाठी जिल्हा परिषदेने केलेल्या कार्याची अर्थशास्त्रीय चिकित्सा'' टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या पीएच्. डी. पदवीकरीता सादर केलेला शोधप्रबंधामध्ये २०१०

२९) बोधे अनिल आ. (संपा.) लक्ष मनाचा नेता खासदार श्री. लक्ष्मणराव पाटील (लोकप्रिय कणखर नेते प्रा. शिवाजीराव चव्हाण) प्रकाशक, श्री. रोकडेश्वर, सहकार समुह रहिमतपूर, २५ फेब्रुवारी २००६

३०) जाधव पाटील लक्ष्मणराव, वाई, खंडाळा व महाबळेश्वरातील माझा मानस, जननायक मकरंद, प्रकाशक, प्रतापराव गोपाळराव पवार, उडतरे, दि. १५ ऑगस्ट २०१४

३१) वाबळे डी. सी., ''स्थानिक स्वराज्य संस्था मधील महिलांचे योगदान–पुणे जिल्हा परिषदेतील महिलांच्या सामाजिक व राजकीय सहभाग'' २००२

३२) अनिल जगताप ,सातारा जिल्ह्यातील दलित चळवळीचा अभ्यास १९७२ ते २००२ टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे , पीएच.डी. राज्यशास्त्र या पदवीकरिता सादर केलेला अप्रकाशित प्रबंध.

३३) रमेश इंगोले ,भारिप – बहुजन महासंघाच्या राजकारणाचा विश्लेषणात्मक अभ्यास विशेष संदर्भ. अकोला, वाशीम, बुलढाणा जिल्हा, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, पीएच.डी. राज्यशास्त्र या पदवीकरिता सादर केलेला अप्रकाशित प्रबंध.

34) B. S. Baviskar : The Politics of Development : Sugar Co-Operatives in Rural Maharashtra –Oxford University Press : Calcutta, 1980. Print.

35) Dr. V. C. Patil : Bharatiya Janata Party in Maharashtra : A.B.S. Publication : Varanasi, 2013 Print.

## प्रकरण तिसरे

# संशोधन पध्दती

**प्रस्तावना**

महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणावर सामाजिक व राजकीय चळवळी निर्माण झाल्या. यामध्ये भारतीय स्वातंत्र्य चळवळीपासून ते संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये सातारा जिल्ह्याचे योगदान उल्लेखनीय आहे. सातारा जिल्हा हा क्रांतीकारकांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. स्वातंत्र्य चळवळीतील सातारा जिल्ह्यातील भूषणे म्हणून जिल्ह्याचे नेतृत्त्व करायला क्रांतीसिंह नाना पाटील, श्री. किसन वीर, श्री. पांडू मास्तर, श्री. नागनाथ नायकवडी, यशवंतराव चव्हाण, श्री. बरडे मास्तर, श्री. वसंतदादा पाटील, श्री. दादा उंडाळकर यांच्यासारखे कणखर कार्यकर्ते चळवळीच्या पाठीशी उभे राहिले. स्वातंत्र्य चळवळी बरोबरच संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतही सातारा जिल्ह्याचा सिंहाचा वाटा आहे. त्यामुळे महाराष्ट्राचा इतिहास पाहता सातारा जिल्ह्याचा अग्रक्रमाने विचार करावा लागतो. महाराष्ट्रातील प्रमुख जिल्ह्यात सातारा जिल्ह्याचा समावेश आहे. सातारा जिल्हा नैसर्गिक साधन संपत्तीने संपन्न आहे. या जिल्ह्यात कृष्णा, कोयनासारख्या बारमाही वाहणाऱ्या नद्या आहेत. सह्याद्रीच्या भव्य डोंगर रांगा आहेत. तसेच या जिल्ह्याला ऐतिहासिक किल्ले आहेत. थोडक्यात, सातारा जिल्ह्यास प्राचीन इतिहास लाभलेला आहे. प्रामुख्याने सातारा जिल्हा व विजापूरची अदिलशाही यांचा संबंध जवळचा होता. कारण अदिलशाहीच्या उत्तर कालखंडामध्ये मराठ्यांच्या हालचाली प्रामुख्याने सातारा, पुणे पट्ट्यातच होत असल्याने साताऱ्यास इतिहासकाळापासून महत्त्व प्राप्त झाले आहे.

मुघलाप्रमाणेच आदिलशाहीचा प्रभाव जिल्ह्यावर अधिक होता. आदिलशाहीच्या काळात राज्याचे अनेक जिल्ह्यामध्ये विभाजन करण्यात आले. जिल्ह्याच्या अंतर्गत पुन्हा उपविभाग करण्यात आले होते. त्या उपविभागांना परगणा, प्रांत, देश, संमत, महाल, तालुका असे म्हणत. तत्कालीन स्थितीमध्ये राज्यातील डोंगराळ भागात हिंदूचे वर्चस्व होते. तर शहरी भागात मुस्लिमांचे वर्चस्व होते. या भागात महसूल गोळा करणे व परगण्यात शांतता सुव्यवस्था राखण्यासाठी 'अमिन' नावाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली होती. अशा पद्धतीने सातारा जिल्ह्याची एकंदरीत रचना होती.

सातारा जिल्ह्याचा इतिहास पाहताना या जिल्ह्यातील राजघराण्याचा इतिहास पाहणे आवश्यक आहे. औरंगजेबाच्या अखेरचा काळातील स्वराज्य संग्रामात सातारा जिल्हा हीच प्रमुख रणभुमी होती. त्यामुळे स्वातंत्र्य आणि सातारा जिल्हा यांचे नाते अतूट होते. सातारा जिल्हयामध्ये जावळीचे चंद्रराव मोरे, फलटणचे रावनाईक निंबाळकर, मलवडीचे झुंजारराव घाडगे, जतचे डफळे, म्हसवडचे माने, वाईचे पिसाळ, पाटणचे साळुंखे–पाटणकर इत्यादी राजघराणी कार्यरत होती. त्याच्या बळावरच विजापूरच्या आदिलशाहीने कोकण, पुणे, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर या भागातील सत्ता कायम केली होती.

अशाप्रकारे सातारा जिल्ह्यामध्ये राजकीय घराण्याचे स्वरूप राहिले आहे. सातारा जिल्ह्याची राजकीय पार्श्वभूमी पाहता असे दिसून येते की, या जिल्ह्यास ऐतिहासिक शिवाजी महाराजांच्या भोसले घराण्याचा वारसा लाभला आहे. म्हणून या जिल्ह्याचा विकासाच्या दृष्टीकोनातून अभ्यास होणे गरजेचे व आवश्यक आहे तसेच सातारा जिल्ह्याचा सामाजिक व राजकीय विकास झाला आहे का? सातारा जिल्ह्याच्या विकासात या राजकीय घराण्यांचा राजकीय पक्षाचा प्रभाव आहे का? एकूणच ऐतिहासिक राजकीय घराण्यांची सातारा जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासात काय भुमिका राहिली? त्या घराण्यांच्या कर्तबगारीचा जिल्ह्याच्या राजकारणावर, समाजकारणावर कशाप्रकारे परिणाम घडून आले या सर्व बाबींचा संशोधनात्मक अभ्यास होणे आवश्यक आहे. या अनुषंगाने सातारा जिल्ह्यातील राजकीय घराण्यांचा अभ्यास १९९० ते २०१५ या शोधप्रबंधामध्ये अभ्यास करण्यात येणार आहे.

**समस्या सुत्र**

भारतातील पारंपरिक, ऐतिहासिक व आधुनिक राजकीय घराणेशाही लक्षात घेण्यासारखी आहेत. ऐतिहासिक व पारंपरिक घराण्यातील मोठ्या समूहाने जमिनदारी, महसूल विभाग, उत्पादनाची विविध साधने स्वत:कडे ठेवून तत्कालीन समाजावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. पूर्वीपासूनच या घराण्यांनी विविध मार्गाने सत्ता आपल्या हातात ठेवली. परिणामी आधुनिक कालखंडामध्ये स्वातंत्र्यानंतर लोकशाहीमध्येदेखील त्याच राजकीय घराण्यांच्या वारसदारांनी राजकीय नेतृत्व, सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक क्षेत्राचा विकास घडवून महत्वाच्या पदावर आपल्याच नातेसंबंधातील लोकांना विकासाचे सर्वसमावेशक धोरण अवलंबिले असल्याचे दिसून येते. या माध्यमातून समाजाला व राजकारणाला एक नवी दिशा

देण्याचे काम या घराण्यांणी केल्याचे दिसून येते. याच अनुषंगाने सातारा जिल्ह्यातील घराण्यांनी जिल्ह्याच्या विकासाचे धोरण अवलंबून जिल्ह्याचा सर्वांगीण विकास करण्याचा प्रयत्न केला आहे. सातारा जिल्हा हा राजकीयदृष्ट्या जागृत असलेला दिसतो. मात्र घराणेशाहीच्या राजकारणामुळे लोकशाही विकासाच्या निकषांप्रमाणे व इतर जिल्ह्यांच्या विकासाप्रमाणे सातारा जिल्ह्याचा सामाजिक, आर्थिक, औद्योगिक, शैक्षणिक व राजकीय विकास झाला आहे का? पारंपारिक, ऐतिहासिक राजकीय घराण्यांपेक्षा इतर नवीन राजकीय घराणी उदयास आलेली आहेत का? याचा अभ्यास होणे आवश्यक आहे. कारण सातारा जिल्ह्यास ऐतिहासिक पार्श्वभूमी व घराण्यांचा वारसा लाभलेला आहे. तसेच स्वातंत्र्योत्तर काळात श्री. यशवंतराव चव्हाण, श्री. आनंदराव चव्हाण, मालोजीराजे नाईक-निंबाळकर, बाळासाहेब देसाई, पी. डी. पाटील, श्री. यशवंतराव मोहिते, श्री. प्रतापराव भोसले, श्री. पृथ्वीराज चव्हाण, श्री. अभयसिंहराजे भोसले, श्री. उदयनराजे भोसले, मदन पिसाळ, विक्रमसिंह पाटणकर अशा राजकीय घराण्यांचा कर्तृत्त्वान नेतृत्वाची फळी या जिल्ह्यास लाभलेली आहे. १९९० ते २०१५ या कालखंडात राजकीय घराण्यांचा सातारा जिल्ह्यातील लोकसभा, विधानसभा, स्थानिक स्वराज्य संस्था यावर काय परिणाम झाला तसेच सहकारी संस्थाचे राजकारण व त्यामाध्यमातून विकास या सर्व घटकांचा अभ्यास होणे महत्वाचे आहे. मात्र संशोधनात्मक अनुषंगाने सातारा जिल्ह्यातील राजकीय घराणी यांचा सखोल अभ्यास अद्याप झालेला नसल्यामुळे प्रस्तुत शोधप्रबंधामध्ये सातारा जिल्ह्यातील १९९० ते २०१५ या कालखंडातील राजकीय घराण्यांचा सखोल अभ्यास करण्यात येणार आहे.

**विषयांचे महत्व**

सातारा जिल्हयास ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे स्थान आहे. मराठा साम्राज्यातील अनेक कर्तृत्त्ववान घराणी याच जिल्ह्यातील आहेत. स्वराज्य स्थापनेच्या कार्यात त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण होते. स्वातंत्र्यलढ्यामध्ये या जिल्ह्याचे योगदान अनन्यसाधारण होते. जगप्रसिद्ध प्रतिसरकारची स्थापना करून ब्रिटिश सत्तेला आव्हान देण्याची हिंमत येथील जनतेने दाखविली होती. अशा जिल्ह्यात स्वातंत्र्योत्तर काळात राजकीय घराणेशाहीचा उदय, विकास होण्यापाठिमागे आणि घराणेशाही प्रस्थापित होण्यासाठी काही राजकीय, सामाजिक, महत्त्वपूर्ण ठरतात. यांचा अभ्यास राज्यशास्त्रीय दृष्टिकोनातून झालेला नव्हता. काही प्रमाणात

ढोबळमानाने घराणेशाही या घटकांवर लिहिले गेले. मात्र संशोधनात्मक दृष्टीने प्रस्तुत विषयावर सखोल अभ्यास झाला नसल्याचे दिसून येते. म्हणून महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर सातत्याने मध्यवर्ती भूमिका बजावणारा जिल्हा म्हणून सातारा जिल्ह्याची निवड प्रस्तुत अभ्यासासाठी केली आहे.

प्रस्तुत अभ्यास विषय सद्याच्या भारतीय राजकीय व्यवस्थेमधील अंत्यत महत्त्वाचा आहे. स्वातंत्र्योत्तर काळापासून राजकीय क्षेत्रात विशिष्ट घराण्यांचे सत्ता संबंध आणि वर्चस्व दिसून येते. गाव पातळीपासून ते केंद्रीय सत्तेपर्यंत विशिष्ट घराण्यांची सत्ता दिसून येते. राज्यशास्त्रामध्ये या विषयाचा अभ्यास काही प्रमाणात झालेला दिसून येतो. जिल्हा पातळीवरील घराणेशाहीचा अभ्यास विशेषतः सातारा जिल्ह्याचा अभ्यास राज्यशास्त्रीय दृष्टीकोनातून झालेला नाही. सातारा जिल्ह्यातील ऐतिहासिक व सामाजिक पार्श्वभूमी देशभरात इतर जिल्ह्यापेक्षा वेगळी आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा ऐतिहासिक वारसा स्वातंत्र्य आंदोलनातील जगप्रसिद्ध पत्रीसरकार, सहकाराचे मजबूत जाळे आणि सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील जिल्ह्याचे महत्त्वपूर्ण स्थान अशा या जिल्ह्याचे राजकीय घराणेशाही व सत्तासंबंध यांचा अभ्यास करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. सातारा जिल्ह्याने राज्यपातळीवर नव्हे तर देशपातळीवरही नेतृत्त्व देण्याचे कार्य केले आहे. यशवंतराव चव्हाण यांच्यासारखे नेते या जिल्ह्यातून निर्माण झाले. त्यामुळे या अभ्यास विषयाला एक वेगळे महत्त्व आहे. तसेच स्वातंत्र्यानंतर आधुनिक भारतीय राजकीय व्यवस्थेमध्ये स्वातंत्र्यचळवळीचा वारसा लाभलेले नेतृत्त्व विकसीत झाले. सामाजिक मागासलेपणा, शिक्षणाचा अभाव, दारिद्र्याच्या समस्या, व्यक्ती विभुती पूजा वाढविताना दिसते. राजकीय क्षेत्रातील घराणेशाही प्रबळ होण्यापाठिमागे वरील कारणे दिसतात. राजकीय घराणेशाही प्रस्थापित होण्यापाठिमागे कोणते कार्यकारण घटक आहेत. यांचा शोध घेऊन सामाजिक, आर्थिक, राजकीय त्यांचे परिणाम काय घडून येतात. याचा अभ्यास होणे महत्त्वाचे आहे.

सातारा जिल्हा महाराष्ट्राच्या राजकारणात प्रभावी असा जिल्हा आहे. ऐतिहासिक सामाजिक आणि भौगोलिक व राजकीयदृष्ट्या प्रभावी ओळख असलेल्या या जिल्ह्यातून अनेक कर्मवीर, क्रांतिवीर, राष्ट्रभक्त उदयास आले. क्रांतिवीर नाना पाटील (प्रति सरकार), बर्डे मास्तर, शंकरराव साठे, यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, गणपतराव तपासे, रघूअण्णा

लिमये, भाऊसाहेब सोमण, गणपतराव आळतेकर इत्यादी क्रांतिकारकांचा उदय झाला. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यात मोलाचा वाटा राहिला आहे. असा क्रांतिकारी वारसा लाभलेल्या या जिल्ह्यावर स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये आनंदराव चव्हाण, अभयसिंह भोसले, बाळासाहेब देसाई, हिंदूराव नाईक–निंबाळकर, श्रीनिवास पाटील, पृथ्वीराज चव्हाण, उदयनराजे भोसले यांचे वर्चस्व राहिले आहे. सातारा जिल्हा हा मुख्यमंत्री देणारा जिल्हा आहे. आत्तापर्यंत सर्वात जास्त मुख्यमंत्री हे महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यापेक्षा सातारा जिल्ह्यातून झाले आहेत. उदा. महाराष्ट्राचे प्रथम मुख्यमंत्री यशवंराव चव्हाण, बॅरिस्टर बाबासाहेब भोसले, पृथ्वीराव चव्हाण, एकनाथ शिंदे होय. बॅलिस्टर बाबासाहेब भोसले व एकनाथ शिंदे हे मुंबई, ठाणे विभागातून निवडून येत असले तरी त्यांची गावे सातारा जिल्ह्यामध्ये आहेत. त्याची माहिती पुढील प्रकरणात देण्यात आली आहे. सध्या काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या जिल्ह्यावर सध्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे वर्चस्व आहे. पक्षीय राजकारणातून जिल्ह्यामध्ये अनेक राजकीय घराणी निर्माण झाली आहेत. या राजकीय घराण्यांनी वेगवेगळ्या सहकारी संस्था निर्माण करून जिल्ह्याच्या विकासात भर घातली आहे. तथापि आपल्या वारसांना संधी देऊन पिढ्यानपिढ्या आपल्याच घरामध्ये सत्ता ठेवून घराणेशाही निर्माण झाली आहे. याचा अभ्यास प्रस्तुत शोधप्रबंधामध्ये करण्यात येणार आहे. त्यासाठी जिल्ह्यातील ऐतिहासिक, भौगोलिक, पार्श्वभूमी, प्राकृतिक रचना, क्षेत्रफळ, लोकसंख्या यासारख्याबाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

प्रस्तुत शोधप्रबंधामध्ये सातारा जिल्ह्यातील १९९० ते २०१५ या कालखंडातील राजकीय घराण्यांच्या कर्तबगारीचा, सत्तासमावेशाचा अभ्यास करण्यात आलेला आहे. सातारा जिल्हा हा ऐतिहासिक जिल्हा असून त्यास अनेक ऐतिहासिक व राजकीय घराण्यांचा वारसा लाभलेला आहे तसेच स्वातंत्र्योत्तरकाळात या जिल्ह्यामधून मोहिते, चव्हाण, भोसले अशा अनेक राजकीय घराण्यामधून अनेक कर्तृत्ववान नेतृत्वाची फळी उदयास आली. तसेच स्वातंत्र्य चळवळ, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, गोवामुक्ती लढा यामधेही सातारा जिल्हा सहभागी होता. या जिल्ह्यात पूर्वीपासून शेतकरी कामगार पक्ष, कम्युनिस्ट पक्ष, जनता दल, शिवसेना, भाजप इत्यादी पक्षांचा प्रभाव कमी राहिला तर स्वातंत्रपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात जिल्ह्यात काँग्रेस पक्षाला प्रभावी नेतृत्व मिळाले. या नेतृत्वाचा प्रभाव जनमाणसावर सातत्याने राहिला आहे.

सातारा हा जिल्हा औद्योगिक, शैक्षणिक व शेतीच्या दृष्टीकोनातून सधन आहे. सहकारी संस्थांचा चांगला फायदा या जिल्ह्याला मिळाला आहे. असे असले तरी सातारा जिल्ह्यामध्ये माण, खटाव, खंडाळा, कोरेगांव हे तालुके नेहमीच दुष्काळग्रस्त म्हणून राहिले आहेत. जिल्ह्यातील इतर तालुक्यांच्या तुलनेत या तालुक्यांचा विकास झालेला नाही. तसेच सातारा जिल्ह्यातील घराणेशाहीच्या माध्यमातून उदयास आलेले कौटुंबिक नातेसंबंध, त्यांचा राजकीय, सामाजिक, आर्थिक सत्तेतील सहभाग, सत्तेतील केंद्रीयकरणाची प्रवृत्ती, घराण्याच्या वर्चस्वासाठी सामाजिक, आर्थिक, संस्थाचा वापर ठराविक घराण्यांनीच केल्याचे दिसते. घराणेशाहीमुळे सत्तासंघर्ष, विचारधारा व पक्षनिष्ठा हे दुय्यम स्थानावर गेले असून व्यक्तीनिष्ठा, घराणेनिष्ठा वाढीस लागल्याचे दिसते. परिणामी सामान्य वर्ग या घराण्या विरुद्ध छुपे आव्हान देताना दिसत आहे. पारंपारिक राजकीय घराण्यांना सातारा जिल्ह्यात विशेषतः दुष्काळी पट्ट्यातील तालुक्यांत सामान्य लोकांचा असलेला छुपा विरोध तसेच स्वकर्तृत्त्वावर राजकीय घराणेशाही परंपरा नसलेले नवीन नेतृत्त्व, राजकीय घराण्यांचा सखोल संशोधनात्मक दृष्टीने अभ्यास होणे महत्त्वाचे व आवश्यक आहे. म्हणून सदर संशोधन प्रबंधामध्ये १९९० ते २०१५ या कालखंडातील सातारा जिल्ह्यातील राजकीय घराण्यांचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

**उद्दिष्टे**

१) सातारा जिल्ह्यातील राजकीय घराण्यांचा आढावा घेणे.

– इ. स. १९९० ते २०१५ या कालखंडातील सर्व राजकीय घराण्यांची पार्श्वभूमी विशद करणे. नवीन उदयास आलेली घराणी कोणत्या पार्श्वभूमीवर निर्माण झाली यांचा आढावा घेणे.

२) राजकीय घराण्यांच्या वर्चस्वास कारणीभूत असणाऱ्या राजकीय, आर्थिक, सामाजिक संस्थांचा अभ्यास करणे.

– सातारा जिल्ह्यातील राजकीय घराणी ही सहकार, शिक्षण, आर्थिक, सामाजिक विकास करून राजकीय घराणे म्हणून उदयास आली की नाही हे तपासण्यासाठी वरील कारणीभूत घटक तपासणे आवश्यक आहे.

३) राजकीय घराण्यातील कौटुंबिक नातेसंबंधाचा सत्तेतील सहभागाचा अभ्यास करणे.

– जुनी व नवीन राजकीय घराणी ही प्रामुख्याने कौटुंबिक नातेसंबंधामधून निर्माण होतात. आजोबा, वडील, मुलगा, नातू अशी नातेसंबंध तसेच विवाह संस्थांद्वारे निर्माण झालेली नवीन घराणी यांचा सत्तेतील सहभाग तपासणे आवश्यक आहे.

४) राजकीय घराणे व राजकीय पक्ष यांच्या संबंधांचा अभ्यास करणे.

– विशिष्ट राजकीय घराणी ही विशिष्ट पक्षांशी एकनिष्ठ राहतात काय? अथवा सत्तेत सहभागी होण्यासाठी पक्ष बदल केलेला आहे का? कोणत्या पक्षातून कोणत्या पक्षात गेलेत. ते तपासणे आवश्यक आहे.

५) राजकीय घराण्याच्या वर्चस्व–विरोधाचा अभ्यास करणे.

– राजकीय घराणी ही कायम सत्तेत राहतात काय? किंवा त्यांना विरोध होतो काय? पक्षाकडून व जनतेकडून याचा अभ्यास करणे.

**गृहितके**

१) सातारा जिल्ह्यातील राजकीय घराण्यांची त्यांच्यातील राजकीय नेतृत्त्वाच्या दूरदृष्टीमुळे जिल्ह्याचा सर्वांगिण विकास होण्यास मदत झाली.

२) सातारा जिल्ह्यामध्ये राजकीय घराण्यातील नेतृत्वाचा मतदार संघावरती प्रभाव राहिला आहे.

३) राजकीय सत्तासंघर्ष ठराविक घराण्यामध्ये दिसतो.

४) राजकीय घराण्यातील नेतृत्वामुळे सातारा जिल्ह्यातील लोकांची राजकीय जागृती व राजकीय सहभाग वाढला.

५) स्थानिक स्वराज्य संस्था व सहकारी संस्था यांच्यामुळे राजकीय घराण्यांचे नव नेतृत्त्व प्रस्थापित झाले.

६) सातारा जिल्ह्यातील राजकीय घराण्यांचा व नेतृत्त्वाचा राज्याच्या व देशाच्या राजकारणावर प्रभाव पडलेला आहे.

**संशोधन आराखडा** :

प्रस्तुत विषयाचा अभ्यास करत असताना ऐतिहासिक, तुलनात्मक, ग्रंथालयीन संशोधन पद्धती तसेच प्राथमिक व दुय्यम संशोधन पद्धतींचा अभ्यास करण्यात आला आहे. संशोधन पद्धती व सर्व्हेक्षण पद्धती यांचा वापर करण्यात आलेला आहे. अप्रकाशित व प्रकाशित दुय्यम

साधनांचे अंतर्गत व बहिर्गत परिक्षण करून त्याआधारे प्रकरणाची मांडणी करण्यात आली आहे. यामध्ये समकालीन कागदपत्रे, वृत्तपत्रे, विविध राजकीय पक्षांचे इतिवृत्तांत मासिके, साप्ताहिके, स्मरणिका अहवाल, मुलाखती, विधानसभा व लोकसभेचे इतिवृत्तांत इत्यादी संदर्भ साधनांचा वापर करण्यात आलेला आहे. मुंबई, पुणे, कोल्हापूर येथील पुराभिलेखागारातील साधनांचा वापर करण्यात आलेला आहे. सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे येथील जयकर ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील डॉ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय, मुंबई ग्रंथसंग्रहालय, भारत इतिहास संशोधक मंडळ पुणे येथील ग्रंथालय, छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा येथील शिवाजी ग्रंथालय, एस. जी. एम. कॉलेज कराड येथील ग्रंथालय, लोकमान्य ग्रंथसंग्रहालय, वाई, छत्रपती प्रतापसिंह महाराज नगरवाचनालय सातारा, दैनिक ऐक्य, दैनिक सकाळ, दैनिक लोकमत, दैनिक तरूण भारत तसेच अनेक सांकेतिक स्थळांचा वापर करण्यात आलेला आहे.

**१) प्राथमिक स्त्रोत** :

प्राथमिक स्त्रोतामध्ये निरीक्षण, संकलन, मुलाखत, प्रश्न, अनुसूची या पध्दतीचा वापर तथ्य संकलनासाठी करण्यात आलेला आहे. त्यानुसार सातारा जिल्ह्यातील ६ विधानसभा मतदार संघातून १० राजकीय घराणी निवड करण्यात आली. या सर्व अभिजनांच्या सामाजिक व राजकीय कार्याचा अभ्यास करून विश्लेषणात्मक मांडणी करण्यात आली आहे. सातारा जिल्ह्यातील राजकीय घराण्यांचा अभ्यास करण्यासाठी प्रश्न अनुसूची तयार करून प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात आल्या आहेत. त्यांच्याशी सविस्तर चर्चा करून निरीक्षणाच्या माध्यमातून नोंदी घेवून माहिती संकलीत केली.

संबंधित संशोधन कार्यात तथ्य संकलन (Data Collection) करण्यासाठी प्राथमिक नमुना निवड पध्दतीचा आधार घेण्यात आला आहे. प्रस्तुत संशोधनासाठी सातारा जिल्ह्यात असलेल्या आठ विधानसभा मतदार संघापैकी सहा विधानसभा मतदार संघातील एकूण ४६ जिल्हा परिषद गट व त्यामधील ९२ पंचायत समिती गण व आठ नगरपालिका यांचा नमूना निवडीसाठी आंतरभाव करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत संशोधनासाठी सहा विधानसभा मतदार संघातील एकूण गावाच्या संख्येच्या ५% गावे ही नमुना म्हणून कोटा नमुना निवड पद्धतीचा वापर करुन निवडण्यात आली. त्यानुसार निवडलेली गावे ही प्रत्येक जिल्हा परिषद मतदार संघातील व गणातील प्रतिनिधीत्त्व करतात.

सोबतच एकूण नमुना निवडणीच्या २०% नमुना हा नगरपालिका क्षेत्रातून निवडलेला आहे तर ८०% नमुना हा ग्रामीण भागातील कुटुंबातून निवडलेला आहे. निवडलेल्या प्रत्येक गावातून सहेतूक नमूना निवड पद्धतीनुसार १० कुटुंबाची निवड करण्यात आली.

प्राप्त माहितीचे सादरीकरण सारणीच्या माध्यमातून करण्यात आले. माहितीचे विश्लेषण करण्यासाठी शेकडेवारी या सांख्यिकीय पद्धतीचा वापर करण्यात आला. त्याच्या आधारे आलेख व आकृत्या काढून प्राप्त माहितीचे विश्लेषण करुन निष्कर्षांची मांडणी करण्यात आली.

**२) दुय्यम स्त्रोत** :

प्रस्तुत अभ्यासाला उपयुक्त ठरेल असे विविध संशोधन साहित्य, पाक्षिके, मासिके, वर्तमानपत्रे, निवडणुक आयोगाने जाहीर केलेले निकाल, नकाशे, इंटरनेट, एम.फिल., पीएच. डी.चे शोध प्रबंध आलेख, तज्ञांचे लेख यांचा आधार घेऊन संशोधनाची मांडणी केली आहे तसेच तथ्य संकलन केल्यानंतर संग्रहीत झालेल्या माहितीचे वर्गीकरण करून संशोधनाच्या गृहीतकांचे, माहितीचे विश्लेषण केले आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे येथील जयकर ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील डॉ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय मुंबई, मुंबई ग्रंथसंग्रहालय, मुंबई, भारत इतिहास संशोधक मंडळ पुणे येथील ग्रंथालय, छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा येथील शिवाजी ग्रंथालय, एस.जी.एम. कॉलेज कराड येथील ग्रंथालय, लोकमान्य दैनिक ग्रंथसंग्रहालय, वाई, छत्रपती प्रतापसिंह महाराज नगरवाचनालय सातारा, ऐक्य, दैनिक सकाळ, दैनिक लोकमत, दैनिक तरूण भारत तसेच अनेक सांकेतिक स्थळांचा वापर करण्यात आलेला आहे.

**अभ्यास क्षेत्र** :

प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी १९९० ते २०१५ या कालखंडातील सातारा जिल्हा अभ्यास क्षेत्र म्हणून निवडलेले आहे. त्यामध्ये लोकसभा व विधानसभा इत्यादी निवडणुका व राजकारण यांचा अभ्यास करण्यात येत आहे. स्वातंत्र्य चळवळीत सातारा जिल्ह्याचे मोठे योगदान होते. स्वातंत्र्यपूर्व काळात सातारा जिल्हा दक्षिणेकडील दक्षिणमांड नदीपासून ते उत्तरेकडील नीरा नदीपर्यंत पसरला होता. स्वातंत्र्यानंतर प्रशासकीय कामकाज आणि सोयीच्यादृष्टीने सातारा जिल्ह्याचे विभाजन होऊन दक्षिण सातारा व उत्तर सातारा अशी दोन

जिल्ह्याची निर्मिती झाली. पुढे दक्षिण सातारा जिल्ह्यातून सांगली जिल्हा निर्माण झाला. तर उत्तर सातारा जिल्ह्यातून सध्याच्या सातारा जिल्हा उदयास आला.

**अभ्यासाची व्याप्ती व मर्यादा**

वरील संशोधनाच्या उद्देशांना केंद्रबिंदू मानून सातारा जिल्ह्यातील राजकीय घराण्यांचा अभ्यास १९९० ते २०१५ प्रस्तुत संशोधन प्रबंधात महाराष्ट्रातील सातारा लोकसभा व विधानसभा मतदारसंघातील राजकीय घराण्यांचा अभ्यास केलेला आहे. १९९० ते २०१५ या कालखंडात सातारा जिल्ह्यामध्ये लोकशाहीच्या माध्यमातून उदयास आलेली राजकीय घराणी ही अभ्यासाची कमाल मर्यादा निश्चित केलेली आहे. प्रस्तुतचा अभ्यास हा सातारा जिल्ह्यापुरता मर्यादित असून त्यात ऐतिहासिक विषेशतः लोकसभा, विधानसभा, स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्था या माध्यमातून उदयास आलेल्या राजकीय घराण्याचा तसेच त्यांच्या राजकीय संघटन कौशल्याचा, सत्तेतील सहभागाचा, जिल्ह्यातील लोकांच्या राजकीय सहभागाचा अभ्यास करून जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासात त्यांची असलेली भूमिका याचे विश्लेषण करण्यात आलेले आहे.

सातारा जिल्हा हा क्रांतिकारकांचा जिल्हा आहे. राजकीयदृष्ट्या अत्यंत जागरूक जिल्हा आहे. प्रस्तुत अभ्यास राजकीय घराण्यांच्या मर्यादित करण्यात आला आहे. घराणेशाहीच्या व्यतिरिक्त सामान्य नेतृत्त्वाचा सहभाग विधानसभा व लोकसभा निवडणुकीच्या माध्यमातून अभ्यासता येऊ शकतो. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या राजकारणाचाही अभ्यास करण्यास वाव असलेला दिसून येतो.  तथापि यात काही मर्यादाही आहेत. राजकीय घराणी, कार्यकर्ते, मतदान प्रक्रिया, मतदानाचे मुलाखती, या एकांगी असू शकतात. राजकीय घराण्यांविरुद्ध बोलण्याची मतदारांची तयारी नसते. काही निष्कर्ष वस्तुस्थिती विसंगत असू शकतात. सर्वसामान्य मतदार राजकीय घराण्यांच्याविरोधात उघड आपले मत मांडण्याचे धारिष्ट करू शकत नाही, असे दिसते.

**प्रकरण नियोजन**

**प्रकरण : १ प्रास्ताविक**

भारतीय समाजाचे व राजकारणाचे 'घराणेशाही' हे एक महत्वाचे वैशिष्टे आहे. भारतीय राजकारणावर अनेक घराण्यांचे अनेक वर्षे सातत्याने वर्चस्व राहिले आहे. भारतामध्ये विविध

प्रांतातील अनेक जाती, धर्मातील घराण्यांचा आणि त्यामधून उदयास आलेलया अभिजनांचा त्या–त्या राज्याच्या राजकारणावर प्रभाव पडल्याचे दिसून येते. भारतीय समाज हा अनेक धर्म, पंत, भाषा आणि जातीमध्ये विभागला गेला आहे. त्यामध्ये वरिष्ठ व कनिष्ठ अशी घराणी निर्माण झाली असून वरिष्ठ घराण्यांनी कनिष्ठ घराण्यावर व सर्वसामान्य जनतेवर आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे. परिणामी कनिष्ठ वर्गाचे सतत शोषण झाले आहे. हा वर्ग सत्तेपासून नेहमीच उपेक्षित राहिला असण्याचे दिसून येते.

समाज कोणत्याही स्वरूपाचा असो ह्यात काही घराण्यांचे स्थान उच्च व श्रेष्ठ मानले जाते. तीच घराणी राजकीय व्यवस्थेवर आपले वर्चस्व प्रस्थापित करत असतात मग ती व्यवस्था लोकशाही असो किंवा हुकूमशाही अशी घराणी संपत्ती, बुध्दीमत्ता, उत्पादनाची साधने व राजकीय पक्ष या माध्यमातून उद्यास येतात. पूर्वी उत्पादनाची साधने अविकसित होती, शेतीच्या माध्यमातून उत्पादन साधनांचा विकास झाला. ज्याच्याजवळ जास्त शेती, उत्पादनाची साधने तो मालक म्हणून उदयास आला. पुढे त्याचेच रूपांतर सामंतशाही, भांडवलदारीमध्ये झाले आणि यातून जमीनदार व भांडवलदार घराणी निर्माण झाली. तीच घराणी आधुनिक राजकीय व्यवस्थेच्या शिरोभागी राहून राजकीय व्यवस्थेवर नियंत्रण ठेवत असल्याचे दिसून येते.

सामाजिक इतिहासाची पुर्नमांडणी करताना विविध ऐतिहासिक राजकीय घराण्यांच्या कर्तबगारीची सामाजिक अंगाने नोंद घेतली असता. निरनिराळ्या कालखंडात समाजावर आर्थिक वा राजकीय प्रभूत्व प्रस्थापित केलेली अनेक घराणी आढळून येतात. समाजाला दिशा दाखविण्याचे प्रसंगी दिशा बदलण्याचे सामर्थ्य या घराण्यातील अभिजनांमध्ये असलेले आढळते. प्रांता, प्रांतामध्ये समाजाचे नेतृत्त्व करणारे मग ते सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतीक अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे असो त्यामध्ये नेतृत्व केलेली हि घराणी आहेत.

त्याचबरोबर महाराष्ट्रातील राजकीय घराण्यांचा आढावा घेत असताना घराणेशाहीची कशाप्रकारे सुरुवात झाली. स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये महाराष्ट्रामध्ये यशवंतराव चव्हाणांनी सत्तेचे व नेतृत्त्वाचे विकेंद्रीकरण होऊन सर्वसामान्य कार्यकर्त्यांला सत्तेमध्ये सहभागी होता यावे तसेच लोकशाही मुल्यांचे जतन व्हावे, लोकशाहीचा प्रचार व प्रसार व्हावा, या प्रमुख भूमिकेतून त्यांनी सहकार चळवळ निर्माण करून ती गतीमान तर केलीच परंतु तिला व्यापक स्वरूप प्राप्त करून ती महाराष्ट्रातील वाडी–वस्तीपर्यंत पोहचवली. त्यामुळे महाराष्ट्रामधून तळागाळातील

नेतृत्त्व पुढे येण्यास मदत झाली. शिवाय सहकारी संस्थामुळे साखर कारखाने दूध संघ व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विस्तारामुळे सर्वसामान्यांचे कशाप्रकारे प्रश्न मार्गी लागण्यास मदत झाली. या वोट बँकेच्या माध्यमातून घराणेशाही कशाप्रकारे महाराष्ट्रामध्ये घट्ट होत गेली. या आणि अशा अनेक मुद्यांची सविस्तर माहती प्रकरण एक मध्ये करण्यात आली आहे.

**प्रकरण : २ संदर्भ साहित्याचा आढावा**

या प्रकरणामध्ये संशोधन विषयाशी संबंधित पूर्ण संशोधन संदर्भ साहित्याचा आढावा घेण्यात आलेला आहे. त्यामध्ये पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यातील घराणेशाहीचा अहवाल, मनोज आवाडे यांनी यांचा महाराष्ट्रातील घराणी हा संदर्भ ग्रंथ प्रा. कुलकर्णी यांचा महाराष्ट्रातील प्रसिद्ध सरदार घराणी, प्रविण भोसले यांचा मराठ्यांची धारातीर्थे, प्रसाद ओक यांचा पेशवे घराण्यांचा इतिहास अशा संदर्भ ग्रंथांचा विस्तृतपणे आढावा घेतला आहे. तर प्रा. अधिकराव निकम यांनी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर सादर केलेला. ग्रामीण भागाच्या विकासासाठी सहकारी संस्थांचे योगदान हा एम.फिलचा अप्रकाशित शोधप्रबंध, मनिषा चव्हाण यांनी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर सादर केलेला सातारा जिल्ह्यातील लोकसभा निवडणूकाचं राजकारण हा पीएच.डी. अप्रकाशित शोधप्रबंध अशी संदर्भ पुस्तके व एम.फिल, पीएच.डी.च्या प्रबंधांचा समावेश केला आहे.

**प्रकरण : ३ संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोध प्रबंधाच्या अभ्यासासाठी सर्वप्रथम संशोधनाचा उद्देश आणि प्रेरणा काय आहे हे समजावून घेणे क्रम प्राप्त ठरते. त्यानुसार या शोधप्रबंधात प्रस्तावना आणि संशोधन पद्धतीच्या प्रकरणाची मांडणी करण्यात आली आहे. या प्रकरणात समस्या सुत्र, संशोधनाचा उद्देश, गृहितके, संशोधन पद्धती, व्याप्ती, मर्यादा, तथ्य संकलनाचे स्त्रोत संदर्भ साहित्याचा आढावा याचे विश्लेषण केले आहे.

**प्रकरण : ४ सातारा जिल्ह्यातील राजकीय घराण्यांचे विश्लेषण**

प्रस्तुत प्रकरणामध्ये सातारा जिल्ह्यातील स्वातंत्र्यानंतर निर्माण झालेली राजकीय घराणी व १९९० ते २०१५ या कालखंडातील राजकीय घराणी यांचा अभ्यास करण्यात आला आहे. पूर्वीची ऐतिहासिक घराणी, त्यांच्याच हातात स्वातंत्र्योत्तर कालखंडात लोकशाहीच्या माध्यमातून आलेली राजकीय सत्तेची सूत्रे, याचा सविस्तर आढावा घेऊन लोकशाही समाजव्यवस्थेमध्ये व्यक्तीची क्षमता, कर्तृत्व व गुणवत्ता यांच्या सहाय्याने नवीन राजकीय

घराण्यांची होत असलेली निर्मिती त्यामुळे कोणत्याही जाती धर्माच्या लोकांना राजकीय सत्तेत प्रवेश मिळवण्याची निर्माण झालेली संधी या पार्श्वभूमीवर सातारा जिल्ह्यातील राजकीय घराण्यांचा उदय, त्यांना स्वतंत्र अस्तित्त्वाची व अस्मितेची झालेली जाणीव या जाणिवेतूनच त्यांनी निर्माण केलेल्या वेगवेगळ्या सहकारी संस्था, संघटना आणि त्या माध्यमातून केलेली संघटनात्मक बांधणी याचा सविस्तर अभ्यास प्रस्तुत प्रकरणात केलेला आहे तसेच लोकशाहीच्या माध्यमातून निर्माण झालेली घराणी, त्यांचा राजकीय पक्ष, पक्ष संबंध, त्यांनी मतदार संघामध्ये निर्माण केलेले संस्थात्मक आधार, तसेच सर्वसमावेशक धोरणांचा अवलंब करून सर्व जाती धर्माच्या लोकांना एकत्र करून त्यांची केलेली संघटनात्मक बांधणी, त्यांच्या त्या त्या मतदारावर निर्माण झालेले वर्चस्व, यातून जिल्ह्याच्या राजकारणावर पडलेला प्रभाव इत्यादीबाबींचा त्यांच्या प्रत्यक्ष मुलाखती, आत्मचरित्रे, चरित्रे आदींद्वारे माहिती संकलीत करुण त्यांचा सखोल अभ्यास केलेला आहे.

**प्रकरण : ५ : निष्कर्ष आणि शिफारशी**

प्रस्तुत प्रकरणामध्ये स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कालखंडातील घराणी यांच्या सामाजिक, राजकीय स्थितीमध्ये घडून आलेला बदल, राजकीय घराण्यातून नव्याने उदयास आलेल्या नेतृत्वाच्या समाजकार्याचा, त्यांनी स्थापन केलेल्या संस्था, संघटनांचा तसेच त्यामधून उदयास आलेल्या आणि लोकशाहीच्या माध्यमातून उदयास आलेल्या नेतृत्वाचा व त्यांच्या राजकारणाचा सविस्तर अभ्यास केला आहे. तसेच विषयाच्या अनुषंगाने केलेल्या अभ्यासातून निष्कर्ष नोंदविण्यात आलेले आहेत. त्याचबरोबर काही शिफारशी सुचविण्यात आल्या आहेत. तसेच गृहितकांची पडताळणी केलेली आहे.

अशाप्रकारे वरील संशोधनात्मक आराखड्याप्रमाणे प्रस्तुत अभ्यास विषयाची मांडणी करण्यात आलेली आहे.

**संदर्भ सूची :**


१. देशपांडे प्रकाश (१९९४) : संशोधन पद्धती, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक (प्रथम प्रकाशन).

२. बापट भा. गो. (१९८६) : शैक्षणिक संशोधन, नूतन प्रकाशन, पुणे (द्वितीय आवृत्ती).

३. जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, २०२२, सातारा जिल्हा.

४. बेहरे सुमन (२००४) : सामाजिक संशोधन पद्धती, विद्या प्रकाशन, नागपूर (प्रथम आवृत्ती).

५. मुळे रा. शं. आणि उमाठे वि. तु. (१९८७) : शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर (द्वितीय आवृत्ती).

६. सोहनी, शं.कृ. (१९९३). शैक्षणिक टीपाकोश, पुणेः हिंदुस्थानप्रकाशन.

७. जाधव मोहन, भोसले आरती आणि सरपोतदार, प्राची. (२००६). भारतीय शिक्षणाचा इतिहास. कोल्हापूर : फडके प्रकाशन.

८. बापट, भा. गो. (१९९८). शैक्षणिक संशोधन. पुणे : नूतन प्रकाशन.

९. भिंताडे, वि. रा. (१९९९). शैक्षणिक संशोधन पद्धती. पुणे : नूतन प्रकाशन.

१०. Best, J. W. (2002). Research in Education. New Delhi : Prentice Hall of India Pvt. Ltd.

११. Best, John W. and Kahn James V. (2004). Research in Education. New Delhi : Prentice Hall of India.

# प्रकरण चौथे

# सातारा जिल्ह्यातील राजकीय घराण्याचे विश्लेषण

## प्रस्तावना

सातारा जिल्हा हा महाराष्ट्राच्या राजकारणात प्रभावी असणारा जिल्हा आहे. महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांपेक्षा तो वेगळा असून त्याची ऐतिहासिक, भौगोलिक व राजकीयदृष्ट्या स्वतंत्र अशी ओळख आहे. छ. शिवाजी महाराजांच्या काळापासून या जिल्ह्यात घराणेशाही उदयास आली. या घराण्यांनी आपल्या कार्य कर्तृत्त्वानी तत्कालिन कालखंडामध्ये आपला ठसा उमटविला. प्रारंभी मुस्लिम सत्ता महाराष्ट्रावर राज्य करीत होत्या. या मुस्लिम शाहीच्या पदरी सातारा जिल्ह्यातील अनेक सरदार घराणी कार्यरत होती. त्यांनी आपली सरदारकी गाजवून आपल्या घराण्याची प्रतिष्ठा वाढविली. पुढे त्यांच्या वारसांनी आपल्या घराण्यांच्या राजकीय वारसा जपण्याचा व टिकविण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये अनेक घराणी यशस्वी झाली असल्याचे दिसते. विशेषतः छत्रपती शिवाजी महाराजांच्या सातारच्या भोसले घराण्याने आपल्या घराण्याचा नावलौकिक महाराष्ट्रासह संपूर्ण देशभर पसरविला. या घराण्यांचा उदय छ. शिवाजी महाराजांपासून झाला असला तरी त्यांच्या वारसांनी या घराण्यांना नावारूपास आणून त्यांचा नावलौकिक जसा होता तसाच टिकविण्याचा प्रयत्न केला. भोसले घराण्यांची सत्ता संपूर्ण महाराष्ट्र भर होती. त्यावेळी अनेक सरदार घराणी उदयास आली. त्यांनी आपल्या कर्तबगारीच्या जोरावर जिल्हा, महाराष्ट्रासह देशाच्या राजकारणावर आपली स्वतंत्र व दखलपात्र ओळख निर्माण केली. त्यामध्ये भोसले, निंबाळकर, जाधव, देसाई, पाटील, चव्हाण, मोहिते इत्यादी घराण्यांचा अग्रक्रमाने उल्लेख करावा लागेल. या घराण्यांनी आपला ऐतिहासिक वारसा जपत. स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये सातारा जिल्ह्याच्या राजकारणामध्ये आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली. केवळ ऐतिहासिक पार्श्वभूमीचा वापर न करता झपाट्याने होत असलेला सामाजिक व राजकीय बदल स्वीकारून त्यांनी जिल्ह्यातील दलित, मागासवर्गीय समाजासह बहुजन समाजाशी असणारी आपली नाळ पूर्वी सारखीच जोडून ठेवली. आणि आपली राजकीय वाटचाल यशस्वीरित्या सुरू ठेवली याचा अभ्यास प्रस्तुत

प्रकरणामध्ये करण्यात आला आहे. प्रथम सातारा जिल्ह्याची उत्पत्ती व निर्मिती कशी झाली याचा आढावा पुढीलप्रमाणे घेण्यात आला आहे.

**ऐतिहासिक पार्श्वभूमी**

**सातारा शब्दाची उत्पत्ती**

सातारा या शहराचे नाव पूर्वी सातारा हे नव्हते तर ते एका किल्ल्याचे नाव होते. याची अनेक नावे आहेत यामध्ये इसमत आरा, उकाबेन, सतारे, मंगलाई, सप्तर्षी, शाहगंड, अजीमतारा अशी आहेत. बहमनी व उकाबेन ही नावे आदिलशाही काळातील आहेत तर इसमत आरा हे किल्ल्याचे नाव निजामशहाच्या काळात पडले. इ. स. १७०० मध्ये औरंगजेबाने साताऱ्याचा किल्ला घेतला. त्यावेळी त्याचा मुलगा अजिमशहा यांच्या नावावरून अजिमतारा हे नाव पडले. त्याचबरोबर असाही संदर्भ आहे की, पन्हाळगडावर राज्य करणाऱ्या शिलाहार राजापैकी दुसऱ्या भोज राजा याने पंधरा किल्ले बांधले. त्यातीलच एक सातारा किल्ला होय. या किल्ल्याच्या भिंतीना १७ बुरूज आणि १७ दरवाजे होते. म्हणून या किल्ल्यास व किल्ल्या जवळील गावास 'सातारा' हे नाव पडले असो असा तर्क केला जातो.

सप्तसारा या शब्दापासूनच सातारा अशी व्युत्पत्ती दिली आहे. दुसऱ्या भोज राजाने ११९० मध्ये सातारचा किल्ला बांधला. भोज राजाची राजधानी पन्हाळगड होती. पन्हाळ्याच्या ईशान्येस असलेले गाव म्हणजे पूर्वीचे 'सातर' यावरून सातारा शब्द तयार झाला. सातारा या शब्दाची सांस्कृतिक पार्श्वभूमी मोठी आहे. त्यामुळे सातारा जिल्ह्यातील समाजाचा आत्मिक विकास होऊन बंधूभाव वाढीस लागलेला आहे. ऐतिहासिकदृष्ट्या डोंगरी किल्ले हे सातारा जिल्ह्याचे खास वैशिष्ट्ये आहे.[१]

**सातारा जिल्ह्याची निर्मिती**

ऐतिहासिक कालखंडामध्ये सातारा प्रांत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या जिल्ह्याचे १८४८ मध्ये ११ शासकीय विभाग होते. त्यामध्ये बदल करून १८५६ मध्ये १२ प्रांत निर्माण करण्यात आले. १८६२ मध्ये पुन्हा जिल्ह्याच्या सीमामध्ये फेरबदल करण्यात आला. १९४९ मध्ये उत्तर सातारा व दक्षिण सातारा असे जिल्ह्याचे दोन जिल्हे निर्माण होईपर्यंत सन १८६३, १८६४, १८६७, १८७५, १८८४, १९२७ आणि १९४७ अशा जिल्ह्याच्या सीमा रेषांची पुनर्रचना करण्यात आली. सन १९५६ राज्याच्या पुनर्रचनेनंतर वरील दोन्ही जिल्ह्यांचा

तत्कालीन मुंबई राज्यात अंतर्भाव करण्यात आला. त्यानंतर १ मे १९६० मध्ये अस्तित्त्वात आलेल्या संयुक्त महाराष्ट्र राज्यात उत्तर सातारा हा सातारा जिल्हा म्हणून तर दक्षिण सातारा हा नवनिर्मित सांगली जिल्हा म्हणून समाविष्ठ झाला.[२] अशी सातारा जिल्ह्याची निर्मिती झाली.

**सातारा जिल्हा प्रशासकिय नकाशा**




Source: https://www.google.com/search?q=satara+map

## भौगोलिक स्थान व विस्तार

सातारा जिल्हा महाराष्ट्राच्या पश्चिम भागात आहे. पुणे, रायगड, रत्नागिरी, सोलापूर हे शेजारील जिल्हे आहेत. सातारा जिल्हयाच्या उत्तरेस पुणे जिल्हा, पूर्वेस सोलापूर जिल्हा, दक्षिणेस व आग्नेयेस सांगली जिल्हा, पश्चिमेस रत्नागिरी जिल्हा, वायव्येस (उत्तर–पश्चिमेस) रायगड हा जिल्हा आहे. जिल्हयाचा अक्षवृत्तीय विस्तार १७.५ ते १८.११ उत्तर अक्षवृत्त रेखावृत्तीय विस्तार ७३.३३ ते ७४.५४ पूर्व रेखावृत्त असा आहे.

**प्राकृतिक रचना**

जिल्हयाच्या पश्चिम भागात सहयाद्री पर्वतरांगा आहेत. त्याच्या पूर्वेला बामणोलीचा डोंगर दक्षिणोत्तर दिशेस पसरलेला आहे. याशिवाय जिल्हयात महादेव डोंगर, सिताबाई, औंध, आगाशिवा इत्यादी डोंगर आहेत. या डोंगराच्या दरम्यान कृष्णा नदीचा सखल मैदानी भाग आहे. जिल्हयाची उत्तर सीमा निरा नदीने सिमीत केली आहे. जिल्हयामध्ये मांढरदेव व शिंगणापूर ही प्रसिद्ध शिखरे आहेत. तसेच महाबळेश्वर व पाचगणीचे पठारही याच जिल्हयात आहेत. महाबळेश्वर हे जिल्हयातील सर्वात उंच ठिकाण असून समुद्र सपाटीपासून सरासरी उंची १४३६ मीटर आहे.

**क्षेत्रफळ**

सातारा जिल्हयाचे एकूण क्षेत्रफळ १० हजार ४८४ चौ. कि. मी. आहे. राज्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्राच्या ३.४१ क्षेत्र या जिल्हयाच्या वाट्याला आले आहे. आकारमानाच्या दृष्टीने राज्यातील एकुण ३६ जिल्हयांमध्ये या जिल्हयाचा १२ वा क्रमांक लागतो.

**लोकसंख्या**

सन २०११ च्या जनगणनेनुसार सातारा जिल्हयाची एकूण लोकसंख्या ३०,०३, ७४१ इतकी आहे. यामध्ये स्त्रियांची संख्या १४,९२,८९९ (४९.७०%) तर पुरुषांची संख्या १५,१०,८४३ (५०.३०%) इतकी आहे. या जिल्हयातील साक्षरतेचे प्रमाण ८२%, लोकसंख्येची घनता २८७ चौ. कि. मी. आणि लिंग गुणोत्तर ९८८ इतके आहे. या जिल्हयातील अनुसूचित जातीची लोकसंख्या ३ लाख २३ हजार २३६ इतकी तर अनुसूचित जमातीची लोकसंख्या २९ हजार ६३५ इतकी आहे.

**राजकीय व प्रशासकीय रचना**

सातारा जिल्हयामध्ये एकूण ११ तालुके आहेत. ते पुढीलप्रमाणे: सातारा, कराड, महाबळेश्वर, वाई, पाटण, जावळी, फलटण, माण, खटाव, कोरेगाव, खंडाळा या तालुक्यामधील जावळी तालुक्याचे मुख्यालय मेढे हे आहे. माण तालुक्याचे मुख्य ठिकाण

दहिवडी हे आहे आणि खटाव तालुक्याचे मुख्य ठिकाण वडूज हे आहे. क्षेत्रफळाने सर्वात मोठा तालुका माण व क्षेत्रफळाने सर्वात लहान तालुका महाबळेश्वर हा आहे. सातारा जिल्हा पुणे प्रशासकीय विभागामध्ये येतो. या जिल्हयाचा प्राकृतिक विभाग पश्चिम महाराष्ट्र आहे. जिल्हयामध्ये १ हजार ७४५ गावे, १ हजार ५०२ ग्रामपंचायती, ११ तालुके, ११ पंचायत समित्या, ८ नगरपालिका, ८ नगरपंचायती, ७ महसूल उपविभाग आहेत. जिल्हयात सातारा व माढा हे २ लोकसभा मतदार संघ व ८ विधानसभा मतदार संघ आहेत.

**सातारा लोकसभा मतदार संघ**

२००९ ला झालेल्या मतदार संघ पुर्नरचनेने कराड मतदार संघ कमी होऊन सातारा व माढा मतदार संघ निर्माण झाला. सातारा लोकसभा मतदार संघात ६ विधानसभा मतदार संघ असून हे सर्व सातारा जिल्हयातील आहेत. ते पुढीलप्रमाणे: वाई, कोरेगाव, सातारा, पाटण, कराड उत्तर, कराड दक्षिण मिळून सातारा लोकसभा मतदार संघ झालेला आहे.

भारत लोकसभा मतदार संघ सातारा – २००९ नंतर




**माढा लोकसभा मतदार संघ**

२००९ ला माढा लोकसभा मतदार संघाची निर्मिती झाली. हा लोकसभा मतदार संघ सातारा व सोलापूर दोन जिल्हयातून करण्यात आला आहे. सातारा जिल्हयातील माण व फलटण दोन विधानसभा मतदार संघ तर सोलापूर जिल्हयातील माढा, माळशिरस, करमाळा, सांगोला चार विधानसभा मतदार संघ एकत्र करून माढा मतदार संघ निर्माण करण्यात आलेला आहे.

या जिल्ह्यातील घराणेशाहीचा अभ्यास करण्यासाठी स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील ऐतिहासिक घराणी व स्वातंत्र्योत्तर कालखंडातील लोकशाही व पक्षीय राजकारणातून उदयास आलेली राजकीय घराणी अशा दोन भागामध्ये घराणेशाहीचा अभ्यास करण्यात आला आहे. तो पुढीलप्रमाणे–

भारत लोकसभा मतदार संघ माढा – २००९ नंतर



## सातारा जिल्ह्यातील ऐतिहासिक घराणी

### १) मराठा घराणी

औरंगजेबाच्या शेवटच्या कालखंडात स्वातंत्र्य लढ्यात सातारा हा जिल्हा एक रणभूमी म्हणून ओळखला जात होता. त्यामुळे सातारा व स्वातंत्र्य यांचे नाते अतुट असे होते. छ. महाराजांचे व साताऱ्याचे संबंध अगदीच जवळचे होते. 'इंद्रसेन राणा' हा भोसल्यांचा वंशज म्हणून सातारा जिल्ह्यामध्ये त्याची ओळख होती. भोसले घराण्यातील शुभ कृष्णाच्या भीमसिंह नावाच्या नातवाला 'राजा घोरपडे बहादूर' हा किताब दिला होता. छत्रपती शिवाजी महाराजांचे आजोबा 'मालोजी भोसले' यांनी शिखर सिंगणापुरचे तळे बांधले. पुढे १६३६ मध्ये शहाजीराजे आदिलशहाच्या सेवेत दाखल झाले. त्यांना कराड परगण्यातील २२ गावांची देशमुखी देऊन 'राजा' या किताब याने सन्मानित केले. याशिवाय सातारा जिल्ह्यामध्ये जतचे डफळ, म्हसवडचे माने, कापसीचे घोरपडे, जावळीचे चंद्रराव मोरे, फलटणचे नाईक निंबाळकर, मलवडीचे झुंझारराव घाटगे इत्यादी मराठा घराणी वंशपरंपरेने आपल्या जहागिरीच्या ठिकाणी कार्यरत होती. या घराण्यांनी तत्कालीन कालखंडामध्ये आपल्या पराक्रमी कार्याने काळ गाजवला आणि आपल्या घराण्याचा दबदबा कायम राखला त्यापैकी काही घराणी पुढीलप्रमाणे सांगता येतील.

### २) जावळीचे मोरे घराणे

या घराण्याला जावळीच्या चंद्रराव मोरे या नावाने ओळखले जाते. हे घराणे भारताच्या इतिहासामध्ये प्रसिद्ध असे घराणे असून चंद्रराव हा किताब मोरेंना आदिलशाहीकडून मिळाला होता. जावळी हा साताऱ्याच्या वायव्येकडील ५६ कि. मी. वर आहे. सह्याद्रीचा अतिदुर्गम प्रदेश म्हणून त्याची स्वतंत्र ओळख आहे. हे घराणे मुळचे कर्नाटकचे असून १४९०–१५१० या कालखंडामध्ये युसुफ आदिलशहाने त्यांना स्वातंत्र्य लढ्यात आपल्याकडे घेतले. शिवरायांचा बीमोड झाल्याशिवाय निजामशाहीचा धोका टळणार नाही. हे ओळखून मोऱ्यांना १२,००० सैन्य व रसद पुरविली होती. परिणामी शिवरायांनी मोऱ्यांचा पराभव करून त्याचे या खोऱ्यातील वर्चस्व मोडीत काढले.

### ३) फलटणचे निंबाळकर घराणे

निंबाळकर घराणे हे फलटण साताऱ्याच्या ईशान्य दिशेस ५६ कि. मी. अंतरावर असून पवार हे त्यांचे मुळ नाव आहे. त्यांचे पूर्वज निंबाळकर निमळकला रहात होते त्यामुळे त्यांना निंबाळकर म्हणून ओळखले जात होते. निंबाळकर हे स्वतंत्र बाण्याचे सरदार होते. १७ व्या शतकाच्या पूर्वार्धात व्यंकोजी नाईक वेळप्रसंगी लुटमार करीत होते. व्यंकोजीची बहीण दिपाबाईचा विवाह शिवरायांचे आजोबा मालोजीराजे यांच्याबरोबर केला. व्यंकोजी हे व्यक्तीमत्त्व अत्यंत प्रभावी असल्यामुळे पुढे जिजाबाई व शहाजीराजे यांचा विवाह झाला. लखुजी जाधवांची इच्छा नसतानाही निजामशाहीतील व्यंकोजीच्या प्रभावामुळे हा विवाह झाला.

### ४) मलवडीचे घाटगे घराणे

साताऱ्याच्या पूर्वेस १७३ कि. मी. वर मलवडी आहे. घाटगे हे येथील कर्तबगार देशमुख होते. या देशमुख घराण्याचे संस्थापक पुरूष 'कामराजे' घाटगे हे होते. बहमनी कालखंडापासून फौज बाळगून होते. हे घराणे मुळचे खटावचे देशमुख होते. घाटगे व निंबाळकर यांच्यामध्ये महादेवाच्या डोंगररांगा असून ते खटावसह माण परगण्याचे सरदेशमुख होते. नागोजी घाटगे यांना १६२६ मध्ये इब्राहिम आदिलशहा दुसरा याने सरदेशमुख आणि झुंझारराव असे दोन सन्मानाचे किताब दिले होते.

### ५) म्हसवडचे माने घराणे

साताऱ्याच्या पूर्वेस ९६ कि. मी. वर म्हसवड हे मान्यांच्या देशमुखीचे गाव असून हे मुळचे शिलेदार आहेत. ते अतिशय तडफदार स्वभावाचे होते. शिलेदार आणि बारगीर हे सैन्याचे दोन प्रकार असत. शिलेदाराजवळ स्वत:चे घोडे असत तर बारगीरांना केंद्र सत्तेकडून घोडे व अन्य युद्ध साहित्य घ्यावे लागे. त्यामुळेच लष्करामध्ये मान्यांच्या घोडदलाचे खास महत्त्व होते. माने हे स्वाभीमानी व तापट स्वभावाचे होते.

### ६) जतचे डफळे घराणे

जतचे डफळे हे देशमुख होते. साताऱ्याच्या आग्नेयेस १४४ कि. मी. देशमुखीचे ठिकाण आहे. त्यांचे चव्हाण हे मुळ नाव असून डफळापूर गावचे ते वतनदार पाटील होते. त्यांचे डफळे नाव कसे प्राप्त झाले याबद्दल काही माहिती नसली तरी त्यांच्यावरून त्यांच्या गावाला

'डफळापूर' असे नाव प्राप्त झाले. आदिलशहाने त्यांना सैन्य बाळगण्याची परवानगी देऊन आपल्या सेवेत रूजू करून घेतले होते.

### ७) कापसीचे घोरपडे घराणे

कापसी हे कराडच्या दक्षिणेस वारणेकाठी ४८ कि. मी. वर आहे. कापसीचे वतनदार घोरपडे आहेत. मुळचे ते भोसले शहाजी राज्यांच्या भावकीतले. भोसले कुळातील एका तरूणांनी 'बहमनी' काळात घोरपडीच्या पाठीला दोर बांधून कोकणातील एक अतिशय अवघड असा किल्ला सर केला होता. तेव्हापासून त्यांना घोरपडे हे नाव प्राप्त झाले. घोरपड्यांची वारणा काठावरील कापसी आणि दुसरे कर्नाटकातील घटप्रभा अशी दोन कुटुंबे असून ते मुधोळ येथे वतनदार होते. त्यांना कापसीकर व मुधोळकर म्हणूनही ओळखले जाते. आरंभापासूनच कापसीकर घोरपड्यांनी आदिलशाहीला चांगल्या प्रकारे साथ दिल्याने त्यांच्यावर खूष होऊन कापसीकर घराण्यातील घोरपड्यांना अमीर–उल् उमरा ही पदवी बहाल केली होती. अमीर उल् उमरा म्हणजे उमरावांचा सरदारांचा प्रमुख अशा प्रकारची सन्माननीय पदवी मुस्लिमांनाच देण्याची प्रथा त्याकाळी होती. तरी सुद्धा कापसीकर घोरपड्यांनी शिवाजी महाराजांशी समेट घडवून आणला आणि स्वराज्य उभारणीच्या कार्यात हातभार लावला. या उलट मुधोळकर घोरपडे हे अखेरपर्यंत भोसल्यांशी वैर करत राहिले. शहाजीराजांना आदिलशाहीत झालेल्या कैदेत मुधोळच्या बाजी घोरपड्यांचा हात होता.[३]

अशाप्रकारे सातारा जिल्ह्यास ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभली असून छ. शिवाजी महाराजांच्या पद स्पर्शाने पावन झालेल्या या जिल्ह्यामध्ये अनेक मराठा सरदार घराणी उदयास आली. त्यामध्ये भोसले, घाटगे, माने, डफळे, घोरपडे, मोरे आणि निंबाळकर अशा प्रसिद्ध राजघराण्यांचा उदय झाला. त्यांनी वेगवेगळ्या कालखंडामध्ये आपल्या कार्य कर्तृत्त्वाचा ठसा उमटवून इतिहासामध्ये आपल्या घराण्यांचा नावलौकिक वाढविला. आणि आपल्या सामाजिक कार्यातून मराठा अस्मिता जपून अनेक सामाजिक प्रश्नांची सोडवणूक करून तत्कालीन समाजाचा सर्वांगिण विकास करण्याचा सातत्याने प्रयत्न केला. यातील बहुतांश घराणी आधुनिक कालखंडामध्ये देखील त्यांचे या ना–त्या कारणाने सामाजिक व राजकीय विकास प्रक्रियेमध्ये कार्यरत असल्याचे पहावयास मिळते. केवळ ऐतिहासिक पार्श्वभूमीचे जतन न करता ही घराणी सर्वसामान्यांचे प्रश्न, त्यांच्या अडचणी सोडविण्यात यशस्वी झाली आहेत.

ऐतिहासिक कालखंडापासून ते आधुनिक कालखंडापर्यंत या घराण्यांनी आपली समाजाशी असलेली बांधिलकी आणि सामाजिक नाळ सातत्याने जपली आहे. म्हणूनच आजही ही घराणी महाराष्ट्रासह सातारा जिल्ह्याच्या राजकारणात प्रभावीपणे कार्यरत असलेली दिसतात.

पुढे १९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली आणि महाराष्ट्रातील राजकीय सत्तेची सर्व सुत्रे यशवंतराव चव्हाण यांचेकडे आली. महाराष्ट्राचे प्रथम मुख्यमंत्री व पुढे केंद्रीय राजकारणात सहभाग असताना यशवंतराव चव्हाण यांच्या विचारातून कृषी औद्योगिक समाजरचनेचा पाया घालत, समाजवादी समाज रचनेचा आणि विकेंद्रीत लोकशाहीचा मोठा प्रयोग महाराष्ट्रात सुरू केला. सत्तेची चव सर्वसामान्य माणसांना चाखता आली पाहिजे, त्यांना आर्थिक बळ मिळाले पाहिजे. या प्रमुख भूमिकेतून त्यांनी सहकाराच्या माध्यमातून सत्तेसह नेतृत्त्वाचे ही विकेंद्रीकरण्यावर भर दिला. परिणामी महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यामध्ये सहकार चळवळ गतिमान झाली. सहकारी तत्त्वावर अनेक संस्था निर्माण झाल्या त्यामुळे सर्वसामान्य कुटुंबातून तरुण व धाडसी नेतृत्त्वाचा उदय झाला. आणि प्रत्येक जिल्ह्यातील जनता संघटीतरित्या आपला विकास घडवून आणण्याइतपत तयार झाली. हीच संघटीत शक्ती व सहकारी संस्था राजकारणाची नेत्यांची बलस्थाने म्हणून ओळखली जाऊ लागली. जिल्हा परिषद, पंचायत समिती, लोकसभा व विधानसभा निवडणूकीमध्ये या सहकारी संस्थांचा मोठा फायदा या राजकीय अभिजनांना झाला व होत असल्याचे दिसून येते. हे लोण महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांमध्ये पसरले आहे. त्यापैकीच सातारा हा एक जिल्हा आहे. १९९० ते २०१५ व आजअखेर लोकसभा व विधानसभा निवडणुकीत सातारा जिल्ह्यातील मतदार संघामध्ये निवडून आलेले उमेदवार व महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळात सातारा जिल्ह्यातील नेतृत्त्वाचा सहभाग स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी साखर कारखाने यांच्या माध्यमातून राजकीय घराणी कशी सत्तेत प्रभावी व स्थिर होत गेली. या पार्श्वभूमीवर सातारा जिल्ह्यातील सहकार चळवळ, स्थानिक स्वराज्य संस्था त्यामधून उदयास आलेले नेतृत्त्व व त्या नेतृत्त्वाने निर्माण केलेली घराणेशाही याचा विस्तृत आढावा व अभ्यास करण्याचा प्रयत्न प्रस्तुत प्रकरणात केला आहे तो पुढीलप्रमाणे–

**सातारा जिल्हा लोकसभा मतदार संघ** :

सातारा जिल्ह्यातील लोकसभा मतदारसंघाचा अभ्यास करत असताना सातारा जिल्ह्यामध्ये दोन  कराड व सातारा लोकसभा मतदार संघ निर्माण झालेले आहेत. त्यामधील एक मतदारसंघ हा सातारा जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघ मिळून सातारा लोकसभा मतदारसंघ झालेला आहे. यामध्ये सातारा जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदार संघ येतात. ते पुढीलप्रमाणे. सातारा, कोरेगाव, खटाव, वाई, माण, फलटण मिळून सातारा लोकसभा मतदार संघ झालेला आहे. तर दुसरा कराड लोकसभा मतदार संघामध्ये सातारा जिल्ह्यातील जावळी, पाटण, कराड उत्तर, कराड दक्षिण व सांगली जिल्ह्यातील दोन शिराळा व वाळवा विधानसभा मतदारसंघ मिळून कराड लोकसभा मतदार संघ तयार झालेला आहे.

२००९ मध्ये लोकसभा मतदार संघ पुनर्रचना होऊन नवीन पुनर्रचनेप्रमाणे निवडणुका घेण्यात आल्या.[४] सातारा जिल्ह्यातील लोकसभा मतदार संघाची पुनर्रचना होऊन सातारा व माढा दोन लोकसभा मतदार संघ निर्माण झाले व सातारा जिल्ह्यातील कराड लोकसभा मतदार संघ रद्द झाला. नवीन झालेल्या सातारा लोकसभा मतदारसंघामध्ये सातारा, पाटण, कराड–दक्षिण, कराड–उत्तर, कोरेगाव, वाई या सहा विधानसभा मतदारसंघाचा समावेश होतो. तर माढा लोकसभा मतदार संघ हा सातारा व सोलापूर जिल्ह्यातून निर्माण झालेला आहे. यामध्ये सातारा जिल्ह्यातील माण व फलटण हे दोन विधानसभा मतदार संघ तर सोलापूर जिल्ह्यातील माढा, करमाळा, माळशिरस आणि सांगोला हे चार विधानसभा मतदार संघ असे सहा विधानसभा मतदारसंघ मिळून माढा लोकसभा मतदार संघ निर्माण झालेला आहे. या जुन्या व नवीन निर्माण झालेल्या लोकसभा मतदारसंघाचा निवडणुक आढावा व राजकारण पुढील तक्त्याच्या आधारे मांडणी केलेली आहे.

## तक्ता क्र. ४.१

## १९९० ते २०१५ व आजपर्यंत सातारा जिल्हा लोकसभा निवडणूक

| सातारा व कराड लोकसभा मतदार संघ | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | सन | सातारा लोकसभा | | कराड लोकसभा | |
| | | विजयी उमेदवार | पक्ष | विजयी उमेदवार | पक्ष |
| १ | १९८९ | प्रतापराव भोसले | काँग्रेस | प्रेमलाताई चव्हाण | काँग्रेस |
| २ | १९९१ | प्रतापराव भोसले | काँग्रेस | पृथ्वीराज चव्हाण | काँग्रेस |
| ३ | १९९६ | हिंदूराव नाईक–निंबाळकर | शिवसेना | पृथ्वीराज चव्हाण | काँग्रेस |
| ४ | १९९८ | अभयसिंहराजे भोसले | काँग्रेस | पृथ्वीराज चव्हाण | काँग्रेस |
| ५ | १९९९ | लक्ष्मणराव पाटील | राष्ट्रवादी काँग्रेस | श्रीनिवास पाटील | राष्ट्रवादी काँग्रेस |
| ६ | २००४ | लक्ष्मणराव पाटील | राष्ट्रवादी काँग्रेस | श्रीनिवास पाटील | राष्ट्रवादी काँग्रेस |
| **सातारा व माढा लोकसभा मतदार संघ** | | | | | |
| | | सातारा लोकसभा | | माढा लोकसभा | |
| १ | २००९ | उदयनराजे भोसले | राष्ट्रवादी काँग्रेस | शरद पवार | राष्ट्रवादी काँग्रेस |
| २ | २०१४ | उदयनराजे भोसले | राष्ट्रवादी काँग्रेस | विजयसिंह मोहिते–पाटील | राष्ट्रवादी काँग्रेस |
| ३ | २०१९ | उदयनराजे भोसले | राष्ट्रवादी काँग्रेस | रणजिसिंह नाईक निंबाळकर | भाजपा |

सातारा लोकसभा मतदार संघातील निवडणूक पाहता १९८९ व १९९१ मध्ये काँग्रेस पक्षाचे प्रतापराव भोसले हे निवडून आले. पुढे १९९६ ला उदयनराजे भोसले यांची अपक्ष उमेदवारी व सैनिक संघटनेचे कर्नल आर. डी. निकम यांची उमेदवारी यामुळे काँग्रेस मताचे विभाजन होऊन प्रथमचः शिवसेनेचे उमेदवार हिंदूराव नाईक–निंबाळकर हे निवडून आले.[५] १९९८ ला शरद पवार यांनी सातारा मतदार संघ परत काँग्रेसच्या ताब्यात ठेवण्यासाठी साताऱ्च्या राजघराण्यातील अभयसिंह राजे भोसले यांना उमेवारी दिली व ते मोठ्या मताधिक्क्याने सातारा लोकसभा मतदारसंघातून निवडून आले. १९९९ ला अभयसिंह राजे भोसले यांनी लोकसभेवर जाण्यापेक्षा विधानसभेवर जाणे पसंद केले. या कालखंडात


काँग्रेसमध्ये फूट पडली व राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना झाली. त्यावेळेस लक्ष्मणराव पाटील यांना राष्ट्रवादी काँग्रेसने उमेदवारी दिली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या निर्मितीच्या सहानुभूती लाटेमध्ये सातारा लोकसभा मतदार संघातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे लक्ष्मणराव पाटील यांनी विजय संपादन केला. २००४ मध्येही काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या युतीमध्ये हा मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाट्याला आला. परत एकदा लक्ष्मणराव पाटील यांची लोकसभेवर निवड झाली. २००९ मध्ये मतदारसंघ पुनर्रचनेमुळे सातारा मतदारसंघ नव्याने निर्माण झाला. २००९ च्या लोकसभा निवडणुकीत सातारच्या राजघराण्याचे वारस छ. शिवाजी महाराजांचे वंशज उदयनराजे भोसले यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या माध्यमातून उमेदवारी प्राप्त करून विजय संपादन केला. २०१४ व २०१९ मध्ये उदयनराजे भोसले यांनी राष्ट्रवादी काँग्रेसकडून उमेदवारीवर विजय संपादन केला. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीनंतर सहा महिन्यांच्या आतच उदयनराजे भोसले यांनी लोकसभा सदस्य पदाचा राजीनामा दिला व भाजप पक्षात प्रवेश केला. नोव्हेंबर २०१९ च्या विधानसभा निवडणुकीबरोबर सातारा लोकसभेची पोटनिवडणुक झाली. यामध्ये उदयनराजे भोसले हे भारतीय जनता पार्टीचे उमदेवार होते तर राष्ट्रवादी काँग्रेसकडून माजी खासदार श्रीनिवास पाटील यांना उमदेवारी देण्यात आली. या निवडणुकीत उदयनराजे भोसले यांचा मोठ्या फरकाने पराभव झाला. १९८९ पासून आजपर्यंत सातारा लोकसभा मतदार संघ  अभ्यासता प्रतापराव भोसले, रामराजे निंबाळकर, अभयसिंह राजे भोसले, लक्ष्मणराव पाटील, उदयनराजे यांचाच प्रभाव जाणवतो. ह्या सातारा जिल्ह्यातील राजकीय घराण्यातील प्रभावी व्यक्ती असून त्यांनी वेगवेगळ्या पक्षात जावून आपल्याच कुटुंबाकडे सत्ता ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे.

कराड लोकसभा मतदार संघाचा अभ्यास करता १९५७ पासून ते २००४ अखेर चव्हाण घराण्यांचा प्रभाव असलेला दिसतो. १९५२ ते १९८९ मधील १९८० चा अपवाद वगळता आनंदराव चव्हाण व प्रेमलाताई चव्हाण यांनी या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले. १९९० ला प्रेमलाताई चव्हाण यांनी राजकीय निवृत्ती स्वीकारली. मुलगा पृथ्वीराज चव्हाण यांना १९९१ मध्ये कराड लोकसभा मतदारसंघातून काँग्रेस पक्षाकडून उमेदवारी जाहीर झाली. १९९१, १९९६, १९९८ सलग तीन वेळा पृथ्वीराज चव्हाण यांनी काँग्रेस पक्षाच्या प्रभावामुळे या मतदार संघातून विजय संपादन केला. पण पुढे १९९९ ला राष्ट्रवादी काँग्रेसच्या निर्मितीमुळे

१९९९ मध्ये त्यांना राष्ट्रवादी काँग्रेसचे श्रीनिवास पाटील यांच्याकडून काँग्रेस पक्षाचे उमेदवार पृथ्वीराज चव्हाण यांना पराभव स्वीकारावा लागला.[६] २००४ मध्ये हा मतदार संघ राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाट्याला आल्याने श्रीनिवास पाटील यांनी परत कराड लोकसभा मतदारसंघातून विजय मिळविला. २००९ च्या मतदारसंघ पुनर्रचनेमध्ये कराड मतदार संघ रद्द झाला. १९५२ पासून ते १९९९ पर्यंत कराड मतदारसंघावर चव्हाण घराण्यांचा प्रभाव पडलेला होता. आनंदराव चव्हाण, प्रेमलाताई चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण यांनी कराड लोकसभा मतदार संघाचे प्रतिनिधित्व केले व महाराष्ट्राच्या व देशाच्या राजकारणात आपला वेगळा ठसा निर्माण केला. पण कराड लोकसभा मतदारसंघ २००९ च्या मतदार संघ पूनर्रचनेत रद्द झाला.

२००९ च्या मतदार संघ पूनर्रचनेत माढा लोकसभा मतदारसंघ नव्याने निर्माण झाला. हा मतदारसंघ सातारा व सोलापूर जिल्ह्यामधून निर्माण झाला असून हा दुष्काळी मतदारसंघ म्हणून ओळखला जातो. २००९ च्या लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी निवडणुक लढविली. त्यांनी भाजपचे उमदेवार सोलापूरचे आमदार सुभाषराव देशमुख यांचा पराभव केला. तर २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसची उमेदवारी सोलापूर जिल्ह्यातील प्रभावी नेते श्री. विजयसिंह मोहिते पाटील यांना प्राप्त झाली. त्यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे धडाडीचे नेते सदाभाऊ खोत यांचा निसटत्या फरकाने पराभव केला. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या लाटेत भाजपची उमेदवारी फलटणचे रामराजे निंबाळकरांचे विरोधक रणजितसिंह मोहिते पाटील यांना प्राप्त झाली. तर राष्ट्रवादी काँग्रेसकडून माढा विधानसभेचे आमदार बबनराव शिंदे यांची बंधू संजय शिंदे यांना प्राप्त झाली. या निवडणुकीत भाजपचे रणजितसिंह मोहिते पाटील यांनी विजय संपादन केला. आतापर्यंत झालेल्या माढा मतदारसंघातील तीन निवडणुका पाहता दोन वेळा राष्ट्रवादी काँग्रेसला यश प्राप्त झाले. तर २०१९ मध्ये भाजपचा प्रभाव मतदारसंघावर निर्माण झालेला आहे. या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या अंतर्गत कलाहामुळे राष्ट्रवादी पक्षाला पराभवाला सामोरे जावे लागले.

# महाराष्ट्र विधानसभा मतदार संघ २००९ नंतर (सातारा जिल्हा)




सातारा जिल्ह्यामध्ये १९९० नंतर विचार करता १० विधानसभा मतदार संघ आहेत. सातारा, वाई, पाटण, जावळी, करा‍ड उत्तर, करा‍ड दक्षिण, कोरेगाव, खटाव, माण, फलटण मतदार संघ आहेत. २००९ मध्ये झालेल्या मतदारसंघ पुनर्रचनेमध्ये सातारा जिल्ह्यातील खटाव व जावळी हे दोन विधानसभा मतदार संघ रद्द झाले व अनूसूचित जातीसाठी आरक्षित असलेला माण मतदार संघ खुला होऊन फलटण मतदार संघ हा अनुसूचित जातीसाठी राखीव झाला.[७] २००९ च्या मतदारसंघ पूनर्रचनेमुळे फलटण विधानसभा मतदारसंघ राखीव झाल्याने निंबाळकर घराण्याचे राजकारण बदलले. २०१० मध्ये रामराजे निंबाळकर विधानपरिषदेवर निवडून गेले. २०१५ ते २०२२ या कालखंडात रामराजे विधानपरिषदेचे सभापती झाले.

फलटण मतदार संघ आरक्षित झाला तरी आपल्या मर्जीतील विश्वासू दिपक चव्हाण या राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यास २००९, २०१४, २०१९ पर्यंत निवडून आणताना दिसतात. आपल्या घराण्याच्या प्रभावावर रामराजे निंबाळकर राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या माध्यमातून राज्याच्या राजकारणात सक्रीय असलेले दिसतात. १९९० ते २०१९ पर्यंत झालेल्या विधानसभा निवडणूका आणि राजकीय पक्ष, प्रभावी नेतृत्त्व, राजकीय घराणेशाही, निवडून येणारी परंपरा यांची माहिती पुढील तक्त्याच्या आधारे स्पष्ट होते.

**तक्ता क्र. ४.२**


**१९९० ते २०१५ व आजपर्यंत सातारा जिल्हा विधानसभा निवडणूक**

| अ. क्र. | वर्ष | सातारा विधानसभा | | वाई विधानसभा | |
|---|---|---|---|---|---|
| | | विजयी उमेदवार | पक्ष | विजयी उमेदवार | पक्ष |
| १ | १९९० | अभयसिंहराजे भोसले | कॉंग्रेस | मदन पिसाळ | कॉंग्रेस |
| २ | १९९५ | अभयसिंहराजे भोसले | कॉंग्रेस | मदन पिसाळ | अपक्ष |
| ३ | १९९९ | अभयसिंहराजे भोसले | राष्ट्रवादी कॉंग्रेस | मदन पिसाळ | राष्ट्रवादी कॉंग्रेस |
| ४ | २००४ | शिवेंद्रराजे भोसले | राष्ट्रवादी कॉंग्रेस | मदन भोसले | अपक्ष |
| ५ | २००९ | शिवेंद्रराजे भोसले | राष्ट्रवादी कॉंग्रेस | मकरंद पाटील | अपक्ष |
| ६ | २०१४ | शिवेंद्रराजे भोसले | राष्ट्रवादी कॉंग्रेस | मकरंद पाटील | राष्ट्रवादी कॉंग्रेस |
| ७ | २०१९ | शिवेंद्रराजे भोसले | भाजप | मकरंद पाटील | राष्ट्रवादी कॉंग्रेस |


| अ. क्र. | वर्ष | फलटण विधानसभा | | पाटण विधानसभा | |
|---|---|---|---|---|---|
| | | विजयी उमेदवार | पक्ष | विजयी उमेदवार | पक्ष |
| १ | १९९० | चिमणराव कदम | कॉंग्रेस | विक्रमसिंह पाटणकर | कॉंग्रेस |
| २ | १९९५ | रामराजे नाईक-निंबाळकर | अपक्ष | विक्रमसिंह पाटणकर | कॉंग्रेस |
| ३ | १९९९ | रामराजे नाईक-निंबाळकर | राष्ट्रवादी कॉंग्रेस | विक्रमसिंह पाटणकर | राष्ट्रवादी कॉंग्रेस |
| ४ | २००४ | रामराजे नाईक-निंबाळकर | राष्ट्रवादी कॉंग्रेस | शंभुराज देसाई | शिवसेना |
| ५ | २००९ | दिपक चव्हाण | राष्ट्रवादी कॉंग्रेस | विक्रमसिंह पाटणकर | राष्ट्रवादी कॉंग्रेस |
| ६ | २०१४ | दिपक चव्हाण | राष्ट्रवादी कॉंग्रेस | शंभुराज देसाई | शिवसेना |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७ | २०१९ | दिपक चव्हाण | राष्ट्रवादी काँग्रेस | शंभुराज देसाई | शिवसेना |
| **अ. क्र.** | **वर्ष** | **कराड उत्तर विधानसभा** | | **कराड दक्षिण विधानसभा** | |
| | | विजयी उमेदवार | पक्ष | विजयी उमेदवार | पक्ष |
| १ | १९९० | शामराव आष्टेकर | काँग्रेस | विलासराव पाटील | काँग्रेस |
| २ | १९९५ | पी. डी. पाटील | अपक्ष | विलासराव पाटील | काँग्रेस |
| ३ | १९९९ | बाळासाहेब पाटील | राष्ट्रवादी काँग्रेस | विलासराव पाटील | काँग्रेस |
| ४ | २००४ | बाळासाहेब पाटील | राष्ट्रवादी काँग्रेस | विलासराव पाटील | काँग्रेस |
| ५ | २००९ | बाळासाहेब पाटील | राष्ट्रवादी काँग्रेस | विलासराव पाटील | काँग्रेस |
| ६ | २०१४ | बाळासाहेब पाटील | राष्ट्रवादी काँग्रेस | पृथ्वीराज चव्हाण | काँग्रेस |
| ७ | २०१९ | बाळासाहेब पाटील | राष्ट्रवादी काँग्रेस | पृथ्वीराज चव्हाण | काँग्रेस |
| **अ. क्र.** | **वर्ष** | **कोरेगाव विधानसभा** | | **माण विधानसभा** | |
| | | विजयी उमेदवार | पक्ष | विजयी उमेदवार | पक्ष |
| १ | १९९० | शंकरराव जगताप | काँग्रेस | धोंडीराम वाघमारे | अपक्ष |
| २ | १९९५ | शंकरराव जगताप | काँग्रेस | धोंडीराम वाघमारे | अपक्ष |
| ३ | १९९९ | शालीनीताई पाटील | राष्ट्रवादी काँग्रेस | तुकाराम तुपे | राष्ट्रवादी काँग्रेस |
| ४ | २००४ | शालीनीताई पाटील | राष्ट्रवादी काँग्रेस | संपतराव अवघडे | राष्ट्रवादी काँग्रेस |
| ५ | २००९ | शशिकांत शिंदे | राष्ट्रवादी काँग्रेस | जयकुमार गोरे | अपक्ष |
| ६ | २०१४ | शशिकांत शिंदे | राष्ट्रवादी काँग्रेस | जयकुमार गोरे | काँग्रेस |
| ७ | २०१९ | महेश शिंदे | शिवसेना | जयकुमार गोरे | भाजप |
| **अ. क्र.** | **वर्ष** | **जावळी विधानसभा** | | **खटाव विधानसभा** | |
| | | विजयी उमेदवार | पक्ष | विजयी उमेदवार | पक्ष |
| १ | १९९० | जी. जी. कदम | काँग्रेस | मोहनराव गुदगे | काँग्रेस |
| २ | १९९५ | सदाशिव सपकाळ | शिवसेना | मोहनराव गुदगे | अपक्ष |
| ३ | १९९९ | शशिकांत शिंदे | राष्ट्रवादी काँग्रेस | मोहनराव गुदगे | राष्ट्रवादी काँग्रेस |
| ४ | २००४ | शशिकांत शिंदे | राष्ट्रवादी काँग्रेस | दिलीप येळगावकर | भाजपा |

# १९९० ते २०१९ सातारा जिल्हा विधानसभा मतदार संघ निवडणूक



# १९९० ते २०१९ सातारा जिल्हा विधानसभा व लोकसभा मतदार संघ निवडणूक



सातारा जिल्ह्यातील १९९० नंतर झालेल्या विधानसभा निवडणूका अभ्यासताना सातारा विधानसभा मतदार संघाचे अभयसिंह राजे भोसले व त्यांचे पुत्र शिवेंद्रराजे भोसले सलग १९९० पासून २०१९ पर्यंत सातारा मतदारसंघाचे प्रतिनिधित्त्व करतात.[८] अशा प्रकारे सातारचे राजे भोसले घराणे जनता पक्ष, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस सध्या भाजप अशा विविध राजकीय पक्षाच्या उमेदवारीवर निवडून येत. सातारा विधानसभा मतदार संघ कायम आपल्या घराण्याकडे ठेवत राजकारणा करताना दिसतात. तर वाई मतदार संघाचा विचार करता मदन पिसाळ हे काँग्रेसकडून परत राष्ट्रवादी काँग्रेसकडून तर अपक्ष म्हणून वाई विधानसभा मतदारसंघातून निवडून आले. पण प्रतापराव भोसले काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष झाल्यावर त्यांनी आपल्या मुलगा मदन भोसले यांना २००४ मध्ये अपक्ष निवडणूक लढवून निवडून आणले. पण पुढे खासदार लक्ष्मणराव पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेस स्थापन झाल्यानंतर जिल्ह्यामध्ये पक्ष वाढवत २००९ मध्ये आपला मुलगा मकरंद पाटील यांना वाई विधानसभा मतदारसंघातून निवडून आणले. मकरंद पाटील २००९, २०१४, २०१९ या कालखंडातील वाई विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्त्व करताना दिसतात. एका बाजूला माजी खासदार प्रतापराव भोसले व त्यांचे चिरंजिव माजी आमदार मदन भोसले यांचा काँग्रेस गट तर माजी खासदार लक्ष्मणराव पाटील व त्यांचे चिरंजीव मकरंद पाटील यांचा राष्ट्रवादी काँग्रेस गट या दोन राजकीय घराण्यांमध्येच वाईचे राजकारण विभागले आहे. किसनवीर सहकारी साखर कारखाना मदन भोसले यांच्याकडून आमदार मकरंद पाटील यांनी आपल्या ताब्यात घेतला व विधानसभा, साखर कारखाना जिल्हा मध्यवर्ती बँक इत्यादी संस्थांवरती आज त्यांचे वर्चस्व निर्माण झालेले आहे. फलटण विधानसभा मतदार संघ १९९० नंतर विचार करता काँग्रेसचे चिमणराव कदम यांचे वर्चस्व होते. पण १९९५ नंतर रामराजे नाईक-निंबाळकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून मतदारसंघावर वर्चस्व निर्माण केले आहे.

पाटण विधानसभा मतदार संघ निवडणुका पाहता प्रथम बाळासाहेब देसाई यांचे चिरंजीव शिवाजीराव देसाई यांचा पराभव करत विक्रमसिंह पाटणकर यांनी २००४ पर्यंत

मतदार संघ आपल्या ताब्यात ठेवला. पुढे शंभूराजे देसाई यांनी शिवसेनेच्या उमेदवारीवर २०१४ व २०१९ मध्ये विजय संपादन केला. महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळात शंभूराजे देसाई यांचा सहभाग झाला. १९५२ पासून २०१९ पर्यंत पाटण विधानसभा मतदारसंघाचा विचार करता देसाई आणि पाटणकर या दोनच घराण्यांमध्ये निवडणूकीच्या लढती पहायला मिळतात. आजअखेर पाटण मतदारसंघामध्ये तिसरे घराणे उदययास आलेले नाही.

कराड–उत्तर विधानसभा मतदार संघ अभ्यासता १९९० ते १९९५ या कालखंडात काँग्रेसचे शामराव अष्टेकर यांचा कालखंड सोडला तर १९९५ पासून आजअखेर पी. डी. पाटील व बाळासाहेब पाटील या वडील, मुलगा यांचे वर्चस्व कराड–उत्तर विधानसभा मतदारसंघावर निर्माण झालेले आहे.[९] १९९९, २००४ मध्ये बाळासाहेब पाटील राष्ट्रवादी काँग्रेसच्या पक्षाकडून तर २००९ मध्ये अपक्ष म्हणून कराड–उत्तर विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्त्व केले. २०१४, २०१९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून बाळासाहेब पाटील कराड उत्तरमधून विधानसभेवर निवडून गेले. सह्याद्री सहकारी साखर कारखान्याच्या व कराड नगरपालिकेच्या माध्यमातून पाटील घराणे राजकारणात सक्रीय असलेले दिसते. कराड–दक्षिण विधानसभा मतदारसंघातून १९९० नंतर २०१४ पर्यंत विलासराव पाटील उंडाळकर हे काँग्रेसच्या माध्यमातून राजकारण करत मतदारसंघाचे प्रतिनिधित्त्व करताना दिसतात. पण २०१४ मध्ये मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांना काँग्रेसने उमेदवारी देऊन विलासराव पाटील उंडाळकर यांना डावलले व पृथ्वीराज चव्हाण हे काँग्रेसपक्षाचे या मतदारसंघाचे नेतृत्त्व करत असलेले दिसतात. या दोन घराण्यांव्यतिरिक्त तिसरे घराणे कराड–दक्षिण विधानसभा मतदारसंघातून निवडून आलेले नाही.

कोरेगाव मतदार संघामध्ये शंकरराव जगताप, शालिनीताई पाटील शशिकांत शिंदे व महेश शिंदे हे प्रतिनिधित्त्व करताना दिसतात. या मतदारसंघामध्ये दोन टर्म नंतर तिसरा वेळेस उमेदवार निवडून आलेला नाही. माण विधानसभा मतदार संघ हा १९९० ते २००४ पर्यंत राखीव मतदार संघ होता. त्याठिकाणी प्रत्येक वेळेस नवीन उमेदवार निवडला

जाताना दिसतो. २००९ नंतर सलग तीन वेळा जयकुमार गोरे यांनी या मतदार संघाचे प्रतिनिधित्त्व विविध पक्षांच्यामधून केले.  जावली विधानसभा मतदार संघ २००४ पर्यंत वेगवेगळ्या व्यक्तींनी प्रतिनिधीत्त्व केले. २००९ मध्ये हा मतदार संघ रद्द झाला. तर खटाव मतदार संघ मोहनराव गुदगे तीन वेळा निवडून आले. २००९ मध्ये खटाव विधानसभा मतदार संघ रद्द झाला.

जावली, माण, खटाव, कोरेगाव या मतदार संघामध्ये सलग एक व दोन वेळा उमेदवार निवडून आला तरी राजकीय घराणेशाही निर्माण झालेली दिसत नाही. पण सातारा, वाई, फलटण, कराड दक्षिण, कराड उत्तर विधानसभा मतदार संघाचा विचार करता १९९० नंतर ते आजपर्यंत सातारा मतदार संघात भोसले घराण्याचे वर्चस्व दिसते. तर फलटण मतदार संघ रामराजे निंबाळकर यांच्या घराण्याचे वर्चस्व असलेले दिसते. २००९ ला फलटण विधानसभा मतदार संघ राखीव झाला तरी निंबाळकर घराण्याच्या मर्जीतीलच उमेदवार विजयी होताना दिसतो. कराड दक्षिण मतदार संघामध्ये उंडाळकर व पृथ्वीराज चव्हाण यांच्या घराण्याचे वर्चस्व असलेले दिसते. कराड उत्तर विधानसभा मतदार संघ पाहता १९९५ पासून आजपर्यंत पी. डी. पाटील व त्यांचे पुत्र बाळासाहेब पाटील निवडून येताना दिसतात. वाई मतदारसंघावरती खासदार लक्ष्मणराव पाटील यांचे चिंरजीव मकरंद पाटील २००९ पासून आपल्याकडेच विजयी परंपरा राखताना दिसतात.[१०] वरील राजकीय घराणी आपले वर्चस्व ठेवण्यासाठी आपला वारस पुढे करत राजकीय घराणेशाही टिकवून ठेवलेली दिसतात. १९९० ते २०१९ चा कालखंड पाहता कोरेगाव मतदार संघामधून शालिनीताई पाटील या महिला दोन वेळा निवडून आलेल्या दिसतात. इतर मतदार संघामध्ये महिला प्रतिनिधी निवडून आलेला दिसत नाही.

**सातारा जिल्ह्यातील नेतृत्त्वाचा महाराष्ट्राच्या राजकारणावर पडलेला प्रभाव** :

स्वातंत्र्यानंतर मुंबई राज्याचे व नंतर द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांना संधी प्राप्त झाली. महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर प्रथम मुख्यमंत्री होण्याचा मान सातारा जिल्ह्यातील कराड विधानसभेचे प्रतिनिधित्त्व करणारे यशवंतराव

चव्हाण यांना प्राप्त झाला. १९६३ नंतर केंद्रीय राजकारणात यशवंतराव चव्हाण यांनी संरक्षण, गृह, अर्थ, परराष्ट्र, उपपंतप्रधान अशी खाती संभाळली. तर कराड लोकसभा मतदार संघाचे प्रतिनिधित्त्व करणारे आनंदराव चव्हाण यांनी केंद्रात राज्यमंत्री म्हणून काम पाहिले. तर राज्याच्या राजकारणात फलटणचे मालोजीराजे नाईक-निंबाळकर, कराडचे यशवंतराव मोहिते, पाटणचे बाळासाहेब देसाई[११] यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावत अर्थ, गृह, पाटबंधारे इत्यादी खाती संभाळली व त्या अनुषंगाने जिल्ह्याच्या विकासास हातभार लावला. १९९० नंतर सातारा जिल्ह्यातील प्रतिनिधिनीं आपला सहभाग मंत्रीमंडळात नोंदविला. ते प्रतिनिधी पाहता ठराविक राजकीय घराण्यांनाच महाराष्ट्र मंत्रीमंडळात सहभागी होण्याची संधी प्राप्त झालेली दिसते. हे पुढील तक्त्त्यावरून स्पष्ट होते.

**तक्ता क्र. ४.३**

**१९९० ते २०१५ व आजपर्यंत सातारा जिल्हा-महाराष्ट्र मंत्रीमंडळ सहभाग**

| अ. नं. | सन | व्यक्ती | खाते | मतदार संघ | मुख्यमंत्री | सरकार |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | १९९० ते १९९५ | विलासराव पाटील (उंडाळकर) | दुग्धविकास पशूसंवर्धन कॅबीनेट मंत्री | कराड दक्षिण | सुधाकरराव नाईक, शरद पवार | काँग्रेस |
| | | अभयसिंहराजे भोसले | सहकार कॅबिनेट मंत्री | सातारा | | |
| | | शामराव आष्टेकर | क्रीडाराज्य मंत्री | कराड उत्तर | | |
| २. | १९९५ ते १९९९ | उदयनराजे भोसले | महसूल राज्यमंत्री | सातारा | मनोहर जोशी, नारायण राणे | भाजप/शिवसेना |
| ३. | १९९९ ते २००४ | विलासराव पाटील (उंडाळकर) | सहकार व वस्त्रोद्योग, विधी व न्याय, माजी सैनिक कल्याण कॅबिनेट | कराड दक्षिण | विलासराव देशमुख, सुशिलकुमार शिंदे | काँगेस, राष्ट्रवादी काँग्रेस |
| | | विक्रमसिंह पाटणकर | सार्वजनिक बांधकाम कॅबिनेट मंत्री | पाटण | | |

| अ. नं. | सन | व्यक्ती | खाते | मतदार संघ | मुख्यमंत्री | सरकार |
|---|---|---|---|---|---|---|
| | | रामराजे नाईक–निंबाळकर | महसूल व पुनर्वसन राज्यमंत्री | फलटण | | |
| | | मदन पिसाळ | रोजगार हमी राज्यमंत्री | वाई | | |
| ४. | २००४ ते २००९ | रामराजे नाईक–निंबाळकर | जलसंपदा, पाटबंधारे, नगरविकास कॅबिनेट मंत्री | फलटण | विलासराव देशमुख, अशोक चव्हाण | काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस |
| ५. | २००९ ते २०१४ | पृथ्वीराज चव्हाण | मुख्यमंत्री | कराड दक्षिण | पृथ्वीराज चव्हाण | काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस |
| | | शशिकांत शिंदे | सार्वजनिक पाणीपुरवठा कॅबिनेट मंत्री | कोरेगाव | | |
| ६. | २०१४ ते २०१९ | – | – | – | देवेंद्र फडणवीस | भाजप, शिवसेना |
| ७. | २०१९ ते २०२४ | बाळासाहेब पाटील | सहकार, पणन कॅबिनेट मंत्री | कराड उत्तर | उद्धव ठाकरे | महाविकास आघाडी |
| | | शंभुराज देसाई | उत्पादन शुल्क कॅबिनेट मंत्री | पाटण | एकनाथ शिंदे | भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), शिवसेना (शिंदे गट) |

महाराष्ट्र राज्य स्थापनेपासून २०१४ ते २०१९ अपवाद वगळता प्रत्येक वेळेस सातारा जिल्ह्यास महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळात सहभागी होण्याची संधी प्राप्त झाली आहे. १९९० ते १९९५ या काळात विलासराव उंडाळकर, अभयसिंहराजे भोसले, शामराव आष्टेकर हे सातारा जिल्ह्यातून महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळात मंत्री होते. १९९५ मध्ये भाजप शिवसेना युतीच्या काळात जिल्ह्यामध्ये पाच अपक्ष उमेदवार निवडून आले होते.[१२] १९९७ च्या पोटनिवडणुकीत सातारा विधानसभा मतदार संघामधून उदयनराजे भोसले हे भारतीय जनता पक्षाच्या तिकीटावर निवडून आले त्यांना १९९८ ला अल्प काळासाठी महसूल राज्यमंत्री म्हणून मंत्रीमंडळात स्थान प्राप्त झाले. २०१४ ते २०१९ भाजप शिवसेना युतीच्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या काळात सातारा जिल्ह्यास पहिल्यांदाच मंत्रीमंडळात स्थान प्राप्त झाले नाही. वरील तक्त्यावरून

असे दिसते की, खटाव, माण हा दुष्काळी मतदार संघ तर जावली या डोंगरी मतदारसंघास आज अखेर मंत्रीमंडळात स्थान प्राप्त झाले नाही. माण व फलटण हे राखीव मतदार संघ असून दोन व तीन वेळा निवडून येऊन सुद्धा अनुसूचित जातीचा उमेदवार मंत्री झालेला दिसत नाही. कोरेगाव मतरदारसंघातून निवडून आलेले शंकरराव जगताप हे १९८५ ते १९९० विधानसभेचे सभापती झाले. त्याचबरोबर खटाव मतदारसंघातून ५ वेळा निवडून आलेले भाऊसाहेब गुदगे, माण राखीव मतदार संघातून दोन वेळा निवडून आलेले धोंडीराम वाघमारे या तीन बिगर मराठा उमेदवारांची वर्णी महाराष्ट्र मंत्रीमंडळात लागलेली दिसत नाही. कोरेगाव व वाई मतदार संघास अल्पकाळ मंत्रीपद प्राप्त झालेले दिसते. तर राष्ट्रवादी कॉंग्रेसची सत्ता असताना सुद्धा शालीनीताई पाटील या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या महिलेची निवड मंत्रीमंडळामध्ये झालेली दिसत नाही.

वरील तक्त्यावरून असे दिसते की, सातारा मतदार संघातील अभयसिंह राजे भोसले, कराड दक्षिण मतदार संघातील विलासराव पाटील–उंडाळकर, फलटण मतदार संघातील रामराजे निंबाळकर, कराड उत्तर मधील बाळासाहेब पाटील, तर पाटण मतदार संघातील पाटणकर व देसाई या राजकीय घराण्यांतील व्यक्तींना महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळात काम करण्याची संधी मिळालेली दिसते. वरील नेतृत्त्व हे आपआपल्या मतदार संघात सातत्याने निवडून येत असून त्यांची घराणेशाही त्या मतदार संघापुरती असलेली दिसते. या घराणेशाहीच्या प्रभावावर आपले राजकारण करताना दिसतात. कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस, भाजप–सेना, महाविकास आघाडी असे कोणतेही पक्ष आघाडी सत्तेवर आले तरी वरील मतदार संघातीलच राजकीय घराण्यातील व्यक्तींचीच वर्णी महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळामध्ये लागलेली दिसते.

### मुख्यमंत्री आणि सातारा जिल्हा

महाराष्ट्राचे प्रथम मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण हे सातारा जिल्ह्यातील कराड मतदार संघातून निवडून येत होते. ते राज्याच्या व देशाच्या राजकारणात कॉंग्रेस पक्षाचे नेते म्हणून कार्यरत होते. त्याचरबरोबर १९८२ ते १९८३ या काळात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पद भूषविलेले कॉंग्रेस पक्षाचे बॅ. बाबासाहेब भोसले हे मुंबईमीधल नेहरूनगर विधानसभा मतदार संघातून

निवडून येत असले तरी त्यांचे मुळ गाव सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यातील कलेढोण हे होय. तर पृथ्वीराज चव्हाण २०१० ते २०१४ या कालखंडात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. ते सातारा जिल्ह्यातील कराड दक्षिण विधानसभा मतदार संघातून निवडून येतात. शिवसेनेचे प्रभावी नेते एकनाथ शिंदे यांनी बंड करून २०२२ मध्ये महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली ते ठाणे शहरातील कोपरी–पाच पाखाडी या विधानसभा मतदार संघाचे प्रतिनिधित्त्व करत आहेत, असे असले तरी ते मुळचे सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर तालुक्यातील दरे गावचे रहिवाशी आहेत.[१३] सातारा जिल्ह्यातील या चार व्यक्तींनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पद भूषविले आहे. यशवंतराव चव्हाण व पृथ्वीराज चव्हाण सातारा जिल्ह्यातून निवडून जात. तर बॅ. बाबासाहेब भोसले व एकनाथ शिंदे मुंबई, ठाणे या शहरातून प्रतिनिधित्त्व करत आलेले दिसतात. काही जिल्ह्यांना एकदाही मुख्यमंत्री पद मिळण्याची संधी प्राप्त झालेली नाही. तर हे पद चार वेळा सातारा जिल्ह्यास प्राप्त झालेले आहे. हे वैशिष्ट्यपूर्ण म्हणावे लागेल.

**तक्ता क्र. ४.४**

**स्थानिक स्वराज्य व सहकारी संस्थामधून राजकीय कारकिर्द आरंभ**

| अ. क्र. | प्रतिनिधी | जिल्हा परिषद | नगरपालिका | सहकारी साखर कारखाना | मतदार संघ | कारकिर्द |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | विलासराव पाटील (उंडाळकर) | १९६७ ते १९७७ | – | – | कराड दक्षिण | १९८० ते २००९ आमदार |
| २. | लक्ष्मणराव पाटील | १९६७ ते १९७७ | – | १९९० ते २००० चेअरमन किसनवीर कारखाना वाई | सातारा लोकसभा | १९९९ ते २००४ खासदार |
| ३. | शंभूराज देसाई | १९९२ ते २००२ | – | १९९० ते २००५ संचालक/चेअरमन बाळासाहेब देसाई कारखाना | पाटण | २००४, २०१४, २०१९ आमदार |
| ४. | मकरंद पाटील | २००२ ते २००७ | – | – | वाई | २००९, २०१४, २०१९ आमदार |
| ५. | उदयनराजे भोसले | – | १९९० ते १९९५ नगरसेवक सातारा नगरपालिका | – | सातारा विधानसभा व लोकसभा | १९९७ आमदार २००९, २०१४, २०१९ खासदार |
| ६. | शिवेंद्रराजे भोसले | – | – | १९९० ते २००५ संचालक/चेअरमन अजिंक्यतारा कारखाना | सातारा | २००४, २००९, २०१४, २०१९ आमदार |
| ७. | बाळासाहेब पाटील | – | – | १९९० ते २००० संचालक/चेअरमन | कराड उत्तर | १९९९, २००४, २००९, २०१४, |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सह्याद्री कारखाना | | २०१९ आमदार |
| ८. | जयकुमार गोरे | २००७ ते २०१२ | – | – | माण | २००९, २०१४, २०१९ आमदार |
| ९. | मोहनराव गुदगे | १९६७ ते १९७९ | – | – | खटाव | १९९०, १९९५, १९९९ आमदार |
| १०. | जी. जी. कदम | १९६७ ते १९७९ | – | – | जावळी | १९९० आमदार |
| ११. | चिमणराव कदम | १९६७ ते १९७९ | – | – | फलटण | १९८५, १९९० आमदार |
| १२. | सदाशिव पोळ | १९६७ ते २००२ | – | – | विधानपरिषद | २००२ ते २००४ आमदार |

सातारा जिल्ह्यातील राजकीय घराणेशाहीचा १९९० ते २०१५ अखेर अभ्यास करत असता असे दिसून येते की, राजकीय घराण्यांचे नेतृत्त्व व वारस स्थानिक स्वराज्य संस्था व सहकारी संस्था यांच्या माध्यमातून आपल्या राजकीय कारकिर्दीला सुरुवात करून विधानसभा, लोकसभा सदस्य ते महाराष्ट्र मंत्री मंडळात प्रभावी मंत्री म्हणून कामकाज केलेले दिसते. लोकशाहीची पाठशाला म्हणून वरील संस्थांच्याकडे पाहता यामधून निर्माण झालेले नेतृत्त्व हे राज्य पातळीपर्यंत आपला प्रभाव पाडताना दिसते. वरील तक्त्यावरून असे दिसते की, जयकुमार गोरे, मोहनराव गुदगे, जी. जी. कदम, चिमणराव कदम, सदाशिवराव पोळ वरील नेतेमंडळी जिल्हा परिषद मधून राजकीय कारकिर्दीला सुरुवात करत विधानसभेपर्यंत पोहोचलेली दिसते.[१४] पण त्यांना आपला वारस राजकारणात स्थिर करता आलेला नाही. पण शंभूराजे देसाई, मकरंद पाटील, उदयनराजे भोसले, शिवेंद्रराजे भोसले, बाळासाहेब पाटील इत्यादी आमदार आपल्याला सहकारी साखर कारखाना, स्थानिक स्वराज्य संस्था इत्यादींच्या माध्यमातून राजकीय कारकिर्दीला प्रारंभ करत विधानसभेपर्यंत पोहोचलेली दिसतात व आपला राजकीय प्रभाव जिल्ह्याच्या राजकारणाबरोबर महाराष्ट्राच्या राजकारणावर निर्माण केलेला आहे. वरील नेतृत्त्वाच्या पाठिमागे त्यांचे पूर्वज बाळासाहेब देसाई, लक्ष्मणराव पाटील, अभयसिंह राजे भोसले, पी. डी. पाटील यांनी निर्माण केलेले सहकारी साखर कारखाने, मतदार संघावर असलेला प्रभाव यामुळे हे वारस राजकारणात स्थिर होत सक्रीय व प्रभावीपणे काम करताना दिसतात.

### सातारा जिल्ह्यातील सहकारी संस्थांचा उदय

स्वातंत्र्योत्तर भारतामध्ये देशाचा सामाजिक, आर्थिक व राजकीय विकास घडून यावा या उद्देशाने, ग्रामीण भागात विविध प्रकारच्या सहकारी संस्थांचे जाळे निर्माण करून ग्रामीण भागाचा विकास घडवून आणण्याचा प्रयत्न केला. परिणामी गाव, तालुका व जिल्हा यांचा सर्वांगिण विकास होण्यास मदत झाली. परिणामी महाराष्ट्रातील जिल्ह्याजिल्ह्यांमध्ये विकासाभिमुख, धाडसी तरूण नेतृत्त्व उदयास आले. त्यापैकीच सातारा हा एक जिल्हा आहे. सातारा जिल्ह्यातील सहकारी संस्थांचा अभ्यास करताना जिल्ह्यातील सहकारी चळवळीचा उदय व विकास कशाप्रकारे होत गेला याचा सखोल अभ्यास करणे आवश्यक व गरजेचा आहे.

सहकारी चळवळीच्या बाबतीत महाराष्ट्र जरी आघाडीवर असला तरी सहकार चळवळीचा उदय स्वातंत्र्य पूर्वी सातारा जिल्ह्यामध्ये झाला. जिल्ह्यामध्ये १९०७ साली पहिली कृषी पतसंस्था माण तालुक्यामध्ये बोधे येथे स्थापन झाली. त्यानंतर शेतकऱ्यांच्या मुलभूत गरजा भागवून त्यांचे ज्वलंत प्रश्न सोडवून त्यांचा सर्वांगिण विकास घडवून आणण्याच्या प्रमुख भूमिकेतून जिल्ह्यामध्ये वेगवेगळ्या भागात अनेक कृषी पतसंस्था स्थापन करण्यात आल्या. इ. स. १९२१ मध्ये वाईतालुका को.-ऑपरेटिव क्रेडिट सोसायटीची स्थापना खंडेराव वाकडे, चुनीलाल गांधी व कोंडो गणेश दामले यांनी केली. या पत संस्थेचे १९३१ मध्ये वाई अर्बन को-ऑपरेटीव बँक या नागरी सहकारी बँकेत रूपांतर झाले. सर्वसामान्य लोकांच्या अडचणी सोडविणे हाच मुख्य हेतू या सहकारी संस्थांचा होता. त्यानंतर मालोजीराजे नाईक निंबाळकर यांनी १९२६ मध्ये फलटणमध्ये फलटण सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेची स्थापना केली. सन १९४९ मध्ये साताऱ्याला मध्यवर्ती वित्त संस्थांचे प्रतिनिधित्त्व करणारी नॉर्थ सातारा सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेची स्थापना झाली. या सहकारी संस्था खेड्यातील शेतकऱ्यांना शेती साठीच आर्थिक पुरवठा करीत होत्या. त्यामुळे जिल्ह्यातील सामाजिक व आर्थिक गरजा भागविण्यासाठी वेगवेगळ्या घटकातून पतसंस्था निर्माण झाल्या. सन १९४०-४१ मध्ये जिल्ह्यात ३२९ सहकारी संस्था होत्या. मुंबई प्रांतातील इतर भागाप्रमाणे या जिल्ह्यात ही आर्थिक प्रश्न सहकारी तत्त्वावर सोडविण्यासाठी सहकार चळवळीने विविध क्षेत्रात पर्दापन केले. पुढे सहकारी खरेदी-विक्री संस्था अस्तित्त्वात आल्या. प्रतिकूल परिस्थितीत सहकारी संस्थांची वाढ होऊन १९६० मध्ये त्याची संख्या ५७६ तर सभासद संख्या ६५,७९० व खेळते

भांडवल रूपये १,०२,३९,९०१ होते. सहकारी संस्थांच्या १९४०–४१, १९६०–६१, १९८०–८१ व १९९०–९१ ची संस्थाची संख्या व सभासद आकडेवारी खाली दिली आहे.[१५]

| वर्ष | संख्या | सभासद | वर्ष | संख्या | सभासद |
|---|---|---|---|---|---|
| १९४०–४१ | ३२९ | १६,८८१ | १९८०–८१ | २,१४५ | ४.६९ |
| १९६०–६१ | ५७६ | ६५,७९० | १९९०–९१ | ३,९८६ | १०.२० |

या सहकारी संस्थांच्या माध्यमातून जिल्ह्यातील छोटे–मोठे उद्योग व्यवसाय करणाऱ्यांना आर्थिक पुरवठा करून त्यांचे अनेक प्रश्न मार्गी लावले. तसेच सामान्य शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणारे बी–बियाणे, किटकनाशके, पाणीपुरवठा, रासायनिक खते यासाठी अल्प मुदतीची कर्ज सहजासहजी मिळू लागले. त्याचबरोबर शेतीला पुरक असा जोडव्यवसाय म्हणून गायी, म्हैशी, शेळीपालन यासाठी मोठ्या प्रमाणावर या संस्थांनी सहकार्य व मदत केली. शेतीच्या पाण्यासाठी विद्युत मोटार यासह अनेक प्रश्नाची सोडवणूक करून जिल्ह्यातील सर्वसामान्याच्या व शेतकऱ्यांच्या सर्वांगिण विकासात या संस्थांनी मोठी भर घातली.[१६]

जिल्ह्यातील आर्थिक उलाढालीचे प्रमाण सरासरी ५० ते ६०% सहकारी संस्थांच्या माध्यमातून होते आणि ही उलाढाल केवळ शेती व्यवसायाशी निगडीत आहे. जिल्ह्यामध्ये पाणीपुरवठा, विकास सेवा, पतसंस्था, कृषी पतसंस्था, दूध संस्था अशा अनेक संस्थांच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा आर्थिक विकास झालेला दिसतो. सातारा जिल्ह्यामध्ये सध्या विणकर सोसायट्या, खरेदी विक्री संघ, कापड उत्पादक संस्था, कुक्कुटपालन, मासेमारी, गृहनिर्माण, पाणीपुरवठा, सहकारी साखर कारखाने अशा अनेक सहकारी संस्था कार्यरत आहेत हे पुढील तक्त्याच्या आधारे स्पष्ट केले आहे. [१७]

**तक्ता क्र. ४.५**

**सातारा जिल्ह्यातील सहकारी संस्था**

| अ. नं. | संस्थेचे नाव | संख्या |
|---|---|---|
| १. | जिल्हा मध्यवर्ती बँक | १ |
| २. | विविध कार्यकारी सहकारी संस्था | ८८९ |
| ३. | कृषक सेवा संस्था | ३ |

| अ. नं. | संस्थेचे नाव | संख्या |
|---|---|---|
| ४. | नागरी सहकारी बँक | ३३ |
| ५. | सहकारी पतसंस्था | ६३४ |
| ६. | नोकरदार सहकारी पतसंस्था | २०७ |
| ७. | खरेदी विक्री संघ | ११ |
| ८. | फळे, भाजीपाला खरेदी विक्री संस्था | ७ |
| ९. | साखर कारखाने | १२ |
| १०. | सहकारी जिनिंग व प्रेसिंग संस्था | ४ |
| ११. | शेतीमाल प्रक्रिया संस्था | १५ |
| १२. | मध्यवर्ती दुध पुरवठा संस्था | १० |
| १३. | प्राथमिक दुध पुरवठा संस्था | १५०६ |
| १४. | पशुधन उत्पादन संस्था | ४५ |
| १५. | सामुदायिक शेती संस्था | ९ |
| १६. | कुक्कुटपालन संस्था | ११५ |
| १७. | मच्छिमार संस्था | ४५ |
| १८. | हातमाग व यंत्रमाग संस्था | २० |
| १९. | औद्योगिक यंत्रमाग संस्था | १०६ |
| २०. | बलुतेदार सहकारी संस्था | ११ |
| २१. | सुत गिरणी सहकारी संस्था | ८ |
| २२. | औद्योगिक वसाहती संस्था | ५ |
| २३. | जंगल कामगार संस्था | २ |
| २४. | मध्यवर्ती ग्राहक भांडार | १५ |
| २५. | प्राथमिक ग्राहक भांडार | ९२ |
| २६. | मजुर सहकारी संस्था | २५३ |
| २७. | गृहनिर्माण संस्था | ६०६ |

| अ. नं. | संस्थेचे नाव | संख्या |
|---|---|---|
| २८. | वाहतुक संस्था | १४ |
| २९. | सर्वसाधारण सहकारी संस्था | १६ |
| ३०. | सहकारी पाणीपुरवठा संस्था | ४६७ |
| ३१. | जिल्हा सहकारी मंडळ | १ |
| ३२. | जिल्हा फेडरेशन मंडळ | ७ |
| ३३. | तालुका देखरेख संघ | ११ |
| | **एकूण** | **५२३३** |

१८

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून येते की, स्वातंत्र्यपूर्व कालखंडामध्ये सातारा जिल्ह्यामध्ये १९४०–४१ मध्ये ३२९ सहकारी संस्था निर्माण झाल्या होत्या. म्हणजेच सहकारी संस्थांच्या माध्यमातून जिल्ह्यातील सर्वसामान्य व शेतकऱ्यांना वेगवेगळ्या संस्थांच्या माध्यमातून आर्थिक पुरवठा करून शेती व शेती व्यवसायाला उत्तेजन दिले जात होते असे दिसून येते. सध्या सातारा जिल्ह्यामध्ये सहकारी संस्थांची वाढ होऊन तिची संख्या जवळपास ५,२३३ इतकी झाली असून त्यांनी ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या व शेत मजुरांच्या सर्वांगिण हितासाठी मोठ्या प्रमाणावर काम केले आहे. त्यामध्ये सहकारी पाणी पुरवठ्याचे जाळे सातारा जिल्ह्यात हळूहळू वाढत आहेत. शेतकऱ्यांच्या अनेक अडचणी सुटण्यास मदत झाली आहे. परिणामी जिल्ह्यातील शेतकरी वर्ग समाधानी आहे. शेती साठी पाणी पुरवठा संस्था व सहज उपलब्ध होणारे कर्ज देणाऱ्या सहकारी संस्थांची संख्या जिल्ह्यामध्ये झपाट्याने वाढताना दिसत आहे.

अशा अनेक सहकारी संस्थांची निर्मिती सातारा जिल्ह्यामध्ये झाली. या संस्थांच्या माध्यमातून जिल्ह्यातील शेतकरी, शेतमजुर, दलित, अल्पसंख्यांक व मागास वर्गीयांचे अनेक प्रश्न मार्गी लागण्यास मदत झाली. या संस्था निर्माण करण्यासाठी दूरदृष्टी असणाऱ्या अनेक नेत्यांनी मोठा संघर्ष करत याची निर्मिती केली आहे. त्यामध्ये यशवंतराव चव्हाण, किसन वीर, मालोजी निंबाळकर, बाबूराव घोरपडे, बाळासाहेब देसाई, यशवंतराव मोहिते इत्यादी नावाचा आग्रक्रमाने उल्लेख करावा लागेल. नंतरच्या कालखंडामध्ये प्रतापराव भोसले, चिमणराव

कदम, अभयसिंह राजेभोसले, विकासराव पाटील, शंकरराव जगताप, शंभूराजे देसाई, जयवंतराव भोसले, पी.डी. पाटील इत्यादी पुढाऱ्यांनी सहकाराची चळवळ पुढील कालखंडामध्ये अधिक गतिमान करत त्यास आधुनिकतेची जोड देत, त्यामध्ये वाढ व बदल करून त्या समर्थपणे चालविल्या व चालवत आहेत. या संस्थांच्या माध्यमातून हजारो लोकांच्या हाताला रोजगार मिळवू लागला. या सहकारी संस्थाचे मालक, संचालक यांचा सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रावर प्रभाव वाढला. परिणामी जिल्ह्यामध्ये या सहकारी संस्था राजकारणाचा एक प्रमुख आधार बनल्या. ज्यांच्याकडे जास्त संस्था त्याच्याकडेच आमदारकी, खासदारकी असे राजकीय समीकरणच सातारा जिल्ह्यामध्ये आज पाहावयास मिळते. सहकारी संस्थामध्ये सर्वांत महत्त्वाची संस्था म्हणजे सहकारी साखर कारखाने होत. अशा साखर कारखान्याची एकूण संख्या किती व ती कोणत्या राजकीय अभिजनांच्या ताब्यात आहे, हे दर्शविण्यासाठी पुढील तक्त्याचा आधार घेण्यात आला आहे.

**तक्ता क्र. ४.६**

**सातारा जिल्ह्यातील सहकारी व खाजगी साखर कारखाने**

| **अ. नं.** | **कारखान्याचे नाव** | **नेतृत्त्व** | **पक्ष/मतदार संघ** | **स्वत: आमदार खासदार होते का** | **कुटुंबातील सदस्य, आमदार, खासदार** |
|---|---|---|---|---|---|
| १. | यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखाना, रेठरे | सध्या सुरेश भोसले | भाजप | | यशवंतराव मोहिते यांचे पुतणे |
| २. | लोकनेते बाळासाहेब देसाई सहकारी साखर कारखाना पाटण | सध्या शंभूराज देसाई | शिवसेना | नातू आमदार | |
| ३. | किसनवीर भूईंज वाई | मदन भोसले | भाजपा | मा. आमदार | वडील प्रतापराव भोसले खासदार |
| ४. | प्रतापगड साखर उद्योग, सोनगाव | मदन भोसले | भाजपा | मा. आमदार | वडील प्रतापराव भोसले खासदार होते |
| ५. | सह्याद्री सहकारी साखर कारखाना कराड | बाळासाहेब पाटील | राष्ट्रवादी | आमदार, मंत्री होते | वडील पी. डी. पाटील नगर सेवक, आमदार होते |

| अ. नं. | कारखान्याचे नाव | नेतृत्त्व | पक्ष/मतदार संघ | स्वत: आमदार खासदार होते का | कुटुंबातील सदस्य, आमदार, खासदार |
|---|---|---|---|---|---|
| ६. | श्रीराम सहकारी साखर कारखाना फलटण | शरदचंद्र भोईटे सध्या रामराजे नाईक-निंबाळकर | अपक्ष<br>राष्ट्रवादी | | |
| ७. | रयत सहकारी साखर कारखाना कराड | उदयसिंह पाटील उंडाळकर | काँग्रेस | विलासराव पाटील उंडाळकर ३५ वर्षे आमदार मंत्री | |
| ८. | अजिंक्यतारा सहकारी साखर कारखाना | शिवेंद्रराजे भोसले | भाजप | आमदार | अभयसिंहराजे भोसले |
| ९. | जरंडेश्वर सहकारी साखर कारखाना | शालिनीताई पाटील | राष्ट्रवादी काँग्रेस | माजी आमदार | वसंतदादा पाटील यांच्या पत्नी |
| १०. | खंडाळा सहकारी साखर कारखाना | मकरंद पाटील | राष्ट्रवादी काँग्रेस | आमदार | खासदार लक्ष्मणराव पाटील वडील |
| **खाजगी साखर कारखाने** | | | | | |
| १. | स्वराज्य सहकारी साखर कारखाना फलटण | रणजित नाईक निंबाळकर | भाजपा | खासदार | खासदार हिंदूराव निंबाळकर वडील |
| २. | खटाव मान वर्धन ॲग्रो. | प्रभाकर घार्गे | राष्ट्रवादी | आमदार | माजी आमदार केशवराव पाटील यांचे जावई |
| ३. | जयवंत शुगर, धावडवाडी, उब्रंज. | अतुल भोसले | भाजप | - | यशवंतराव मोहिते यांचे नातू |
| ४. | खटाव-माण साखर कारखाना | मनोज घोरपडे | भाजप | - | - |

१९

सातारा जिल्ह्यातील सहकारी चळवळीचा व राजकारणाचा अभ्यास करता असे दिसते की, जिल्ह्यातील सहकारी संस्था विशेषत: साखर कारखाने राजकारणातील व प्रभावशाली महत्त्वाचे आधार आहेत. जिल्ह्याच्या निर्मितीपासूनच हे आधार मराठा समाजाच्या ताब्यात

आहेत. त्यामुळे जिल्ह्याचे राजकारण मराठा समाजाकडे केंद्रीत झाले आहे, असे असले तरी जिल्ह्यातील दलित, मागास वर्ग व अल्पसंख्यांक समाजाची लोकसंख्या ही लक्षणीय असून जिल्ह्यातील राजकारणाची राजकीय समीकरणे बदलण्या इतपत ती प्रभावी आहे. परंतु ती एकसंघ नाहीत. हा सर्व समाज मराठा अभिजनांच्या गटामध्ये व पक्षांमध्ये विभागला गेला असून त्यांच्या एक संघ ताकदीचे विभाजन झाले आहे. जिल्ह्यातील माण व फलटण या राखीव मतदार संघातून निवडून येण्याची संधी जरी या समाजाला मिळाली असली तरी त्यांना संख्यात्मक आधार व आपल्या जात बांधवांची संघटनात्मक बांधणी करता आली नाही. हे आमदार पूर्णतः मराठा समाजाच्या अभिजनांवर अवलंबून असलेले दिसतात. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून देशभर काँग्रेस पक्षाचे वर्चस्व राहिले आहे. परिणामी सातारा जिल्ह्यातील साखर सम्राट नेहमीच काँग्रेस पक्षासोबत राहिले. याचा काँग्रेसला पक्ष वाढीसाठी मोठा उपयोग झाला. महाराष्ट्रातील १८८ साखर कारखान्यापैकी जिल्ह्यामध्ये १० सहकारी व ४ खाजगी असे १४ साखर कारखाने आहेत. सहकारी साखर कारखान्यांच्या नेतृत्त्वामुळे विधानसभेला पराभूत झाले तरी परत विधानसभेवर निवडून आलेले दिसून येतात. या पाठिमागे विचार करता साखर कारखान्यांच्या माध्यमातून असलेला सभासद मतदार वर्ग हुकमी असल्याने सहकारी साखर कारखानदार आपले राजकीय अस्तित्त्व टिकवून ठेवण्यास यशस्वी झालेले दिसतात. हे सर्व कारखाने मराठा समाजाच्या ताब्यात असून त्याच्या मदतीने या समाजाने सातारा जिल्ह्यासह महाराष्ट्राच्या राजकारणावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे. सातारा जिल्ह्याच्या राजकारणाचे प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे या अभिजनांनी सहकाराशिवाय लोकशाहीच्या माध्यमातून ही राजकीय घराणी उदयास आलेली पहावयास मिळतात. यामध्ये बाळासाहेब देसाई, आनंदराव चव्हाण, विक्रमसिंह पाटणकर, विलासराव पाटील उंडाळकर, यशवंतराव मोहिते किंवा सर्वच साखर सम्राटांचा समावेश केला तरी फारसे वावगे ठरणार नाही. कारण हे साखर सम्राट लोकशाही मार्गाने जिल्हा परिषद, पंचायत समिती, विधानसभा, विधान परिषद व लोकसभा या निवडणुकीच्या माध्यमातून निवडून गेले आणि सत्ता हातात आल्यानंतर त्यांनी सहकारी संस्थांची निर्मिती केली. त्या माध्यमातून त्यांनी जिल्ह्यामध्ये अनेक विकास कामे करून हजारो लोकांचे मुलभूत प्रश्न सोडविले. यामधून अनेक जाती–धर्माच्या लोकांना आपला विकास करण्याची एक चांगली संधी मिळाली. त्यामुळे जिल्ह्यातील सर्वसामान्य जनता संघटीत

होऊन संबंधीत साखर सम्राटांच्या पाठीमागे खंबीरपणे उभी राहिली. यामुळेच हे मराठा अभिजन संबंधित मतदार संघामध्ये ३०, ४० वर्षापर्यंत निवडून येऊ शकले. आणि महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये टिकले. त्यांनी आपल्या कार्याचा एवढा प्रभाव निर्माण केला की, प्रत्येक राजकीय पक्षास आपल्या प्रभावी कार्याची दखल घेण्यास भाग पाडले.

हे करत असताना मात्र त्यांनी एक सावध भूमिका घेतली ती म्हणजे आपल्या मतदार संघामध्ये आपल्यापेक्षा दुसरा कोणीही कार्यकर्ता मोठा प्रभावी होऊ दिला नाही. त्यांच्यानंतर त्यांनी आपल्याच नातेवाईकांची वर्णी सहकारी संस्था, विधानसभा व लोकसभेमध्ये लावली व घराणेशाही पुढे सुरू ठेवली. हे करत असताना त्यांनी पक्षाचा विचार केला नाही. जिल्ह्यातील साखर सम्राटांचे नातेवाईक अनेक पक्षात सक्रीय झाल्याचे दिसतात. उदा. वडील कॉंग्रेसमध्ये असेल तर मुलगा किंवा भाऊ भाजप, सेना, राष्ट्रवादीत दिसतील. विलासराव उंडाळकर व आनंदराव चव्हाण घराण्याचा अपवाद सोडला तर जिल्ह्यातील अनेक घराणी वेगवेगळ्या पक्षात असल्याचे दिसते. म्हणजेच पक्ष कोणताही असो, सत्ता आपल्याच घराण्यात राहिली पाहिजे याची काळजी त्यांनी घेतलेली दिसते. हे चित्र सातारा जिल्ह्यासह महाराष्ट्रामध्ये पहावयास मिळते. सातारा जिल्ह्याच्या राजकारणातील घराणेशाही दर्शविणारा तक्ता पुढीलप्रमाणे:

**तक्ता क्र. ४.७**
**सातारा जिल्ह्यातील राजकीय घराणी व त्यांचे साखर कारखाने**

| अ. नं. | मतदार संघ | उमेदवार | पक्ष | कुटुंबातील आमदार खासदार | सहकारी साखर कारखाना |
|---|---|---|---|---|---|
| १. | वाई | मदन भोसले | भाजपा | वडील प्रतापराव भोसले ४ टर्म आमदार, तीन टर्म खासदार होते. | किसनवीर |
| २. | – | मकरंद पाटील | राष्ट्रवादी | वडील लक्ष्मणराव पाटील १० वर्षे खासदार व जिल्हा बँक चेअरमन | किसनवीर |
| ३. | कराड उत्तर | बाळासाहेब पाटील | राष्ट्रवादी | पी. डी. पाटील ३ टर्म आमदार व ४० वर्षे कराड नगरपरिषदेचे नगराध्यक्ष | सह्याद्री |
| ४. | कराड दक्षिण | अतुल भोसले | भाजपा | यशवंतराव मोहिते आजोबा २८ वर्षे आमदार १८ वर्षे मंत्री, कारखान्याचे चेअरमन | कृष्णा, जयवंत शुगर |
| ५. | कराड दक्षिण | पृथ्वीराज चव्हाण | कॉंग्रेस | वडील आनंदराव चव्हाण दोन टर्म व आई तीन टर्म खासदार | – |
| ६. | कराड दक्षिण | उदयसिंह पाटील | कॉंग्रेस | वडील विलासराव पाटील उंडाळकर ७ टर्म आमदार, मंत्री | रयत |
| ७. | पाटण | शंभूराज देसाई | शिवसेना | आजोबा बाळासाहेब देसाई ६ टर्म मंत्री | बाळासाहेब देसाई |

| अ. नं. | मतदार संघ | उमेदवार | पक्ष | कुटुंबातील आमदार खासदार | सहकारी साखर कारखाना |
|---|---|---|---|---|---|
| ८. | पाटण | सत्यजित पाटणकर | राष्ट्रवादी | वडील विक्रमसिंह पाटणकर पाच टर्म आमदार, मंत्री | – |
| ९. | सातारा | शिवेंद्र राजेभोसले | भाजपा | वडील अभयसिंगराजे ३ टर्म मंत्री भाऊ, उदयनराजे भोसले खासदार मंत्री | अजिंक्यतारा |

स्त्रोत– हेरंब कुलकर्णी, प. महाराष्ट्रातील घराणेशाही अहवाल [२०]

उपरोक्त तक्त्याचा अभ्यास करता असे दिसते की, ही सर्व घराणी काँग्रेस या पक्षाच्या माध्यमातून उदयास आली. त्यांनी संस्थात्मक आधार निर्माण करून काँग्रेसची विचारसरणी वाडी–वस्तीपर्यंत पोहचवून जिल्ह्यामध्ये काँग्रेस पक्षाचा प्रभाव निर्माण केला. परिणामी काँग्रेसने या उमेदवारांना अनेक वेळा अधिकृत उमेदवारी देऊन त्यांना आमदार, खासदार व मंत्रीपदी काम करण्याची संधी दिली. परंतु नंतरच्या कालखंडामध्ये मात्र त्यांच्या राजकीय वारसदारांनी याची जाणीव न ठेवता भाजप, सेना, राष्ट्रवादी या पक्षाबरोबर हात मिळवणी करून सत्ता घराण्यात ठेवण्यास यश मिळविले. उदा. यशवंतराव मोहिते हे शेकाप व काँग्रेस पक्षातून आमदार, खासदार मंत्री झाले. आपल्या मतदारसंघाचा विकास घडवून आणला. परंतु त्यांचे बंधू जयवंतराव भोसले व नातू अतुल भोसले हे मात्र भाजप–सेना या पक्षाबरोबर गेले. तेच चित्र सातारा, कराड व पाटण विधानसभा मतदार संघाचे दिसते. पाटण विधानसभा मतदार संघाचे आमदार शंभूराज देसाई शिवसेना पक्षात असून ते आज एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना गटात असून महाराष्ट्राच्या मंत्रीमंत्री मंडळात कॅबिनेट मंत्री म्हणून कार्यरत आहेत. तर सातारा मतदार संघातील शिवेंद्रराजे भोसले हे २०१९ ला भाजपच्या तिकीटावर निवडणूक लढवून निवडून आलेले आहेत. याला अपवाद म्हणजे कराडचे विलासराव पाटील–उंडाळकर व पृथ्वीराज चव्हाण यांचे घराणे आहे. कारण ही दोन घराणी आजपर्यंत काँग्रेसमध्ये राहिली आहेत. पृथ्वीराज चव्हाणांची तर तिसरी पिढी आज काँग्रेस सोबत असलेली दिसते. वरील राजकीय घराण्यांचा अभ्यास करता पाटणकर व पृथ्वीराज चव्हाण यांनी कोणत्याही सहकारी साखर कारखान्याची स्थापना केलेली नाही तर इतर सर्व वरील प्रतिनिधी हे प्रत्येक सहकारी साखर कारखान्याचे नेतृत्त्व करताना दिसतात. सहकारी साखर कारखाना नेतृत्त्वामुळे राजकीय घराण्यांना आपली सत्ता मतदार संघावर प्रभावी ठेवण्यास मदत झालेली दिसते. या पार्श्वभूमीवर सातारा जिल्ह्यातील राजकीय घराण्याचा घेतलेला आढावा पुढीलप्रमाणे–

## १९९० ते २०१९ निवडणूक सातारा जिल्ह्यातील राजकीय घराण्यांचा प्रभाव

| अ. न. | मतदार संघ | घराणे | व्यक्ती | कालखंड (१९९०-२०१९) | मुख्यमंत्री (५०) | मंत्री | | खासदार | | आमदार | | साखर कारखाना | | जिल्हा बँक | | जिल्हा परिषद/ नगरपालिका | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | कॅबिनेट (३०) | राज्य (२५) | राज्यसभा (२५) | लोकसभा (२५) | विधानसभा (२०) | विधानपरिषद (२०) | चेअरमन (१५) | सदस्य (१०) | चेअरमन (१५) | सदस्य (१०) | अध्यक्ष (१५) | सदस्य (१०) | |
| १. | सातारा | भोसले | अभयसिंहराजे भोसले | ९०-९५ | | ✓ | | | | ✓ | | | ✓ | | ✓ | | | |
| | | | | ९५-९९ | | | | | ✓ | | | | ✓ | | ✓ | | | |
| | | | | ९९-०४ | | | | | | ✓ | | | ✓ | | ✓ | | | |
| | | | | ०४-०९ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ०९-१४ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | १४-१९ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | १९-२४ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | एकूण | | ३० | | | २५ | ४० | | | ३० | | ३० | | | १५५ |
| | | | शिवेंदसिंह राजे भोसले | ९०-९५ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ९५-९९ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ९९-०४ | | | | | | | | ✓ | | | | | | |
| | | | | ०४-०९ | | | | | | ✓ | | ✓ | | | ✓ | | | |
| | | | | ०९-१४ | | | | | | ✓ | | - | ✓ | | ✓ | | | |
| | | | | १४-१९ | | | | | | ✓ | | - | ✓ | ✓ | | | | |
| | | | | १९-२४ | | | | | | ✓ | | - | ✓ | - | ✓ | | | |
| | | | | एकूण | | | | | | ८० | | ३० | ३० | १५ | ३० | | | १८५ |
| | | | उदयनराजे भोसले | ९०-९५ | | | | | | - | | | | | | | ✓ | |
| | | | | ९५-९९ | | | ✓ | | | ✓ | | | | | | | | |
| | | | | ९९-०४ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ०४-०९ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ०९-१४ | | | | | ✓ | | | | | | | | | |
| | | | | १४-१९ | | | | | ✓ | | | | | | ✓ | | | |
| | | | | १९-२४ | | | | | ✓ | | | | | | ✓ | | | |
| | | | | एकूण | | | २५ | | ७५ | २० | | | | | २० | | १० | १५० |
| २. | पाटण | पाटणकर | विक्रमसिंह पाटणकर | ९०-९५ | | | | | ✓ | | | | | | | | | |
| | | | | ९५-९९ | | | | | ✓ | | | | | | | | | |
| | | | | ९९-०४ | | ✓ | | | ✓ | | | | | | ✓ | | | |
| | | | | ०४-०९ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ०९-१४ | | | | | ✓ | | | | | | | | | |
| | | | | १४-१९ | | | | | | | | | | | ✓ | | | |
| | | | | १९-२४ | | | | | | | | | | | ✓ | | | |
| | | | | एकूण | | ३० | | | ८० | | | | | | ३० | | | १४० |

| अ. न. | मतदार संघ | घराणे | व्यक्ती | कालखंड (१९९०–२०१९) | मुख्यमंत्री (५०) | मंत्री | | खासदार | | आमदार | | साखर कारखाना | | जिल्हा बँक | | जिल्हा परिषद/ नगरपालिका | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | कॅबिनेट (३०) | राज्य (२५) | राज्यसभा (२५) | लोकसभा (२५) | विधानसभा (२०) | विधानपरिषद (२०) | चेअरमन (१५) | सदस्य (१०) | चेअरमन (१५) | सदस्य (१०) | अध्यक्ष (१५) | सदस्य (१०) | |
| | पाटण | देसाई | शंभुराजे देसाई | ९०–९५ | | | | | | | | ✓ | | | | | ✓ | |
| | | | | ९५–९९ | | | | | | | | ✓ | | | | | ✓ | |
| | | | | ९९–०४ | | | | | | | | | ✓ | | | | | |
| | | | | ०४–०९ | | | | | | ✓ | | | ✓ | | | | | |
| | | | | ०९–१४ | | | | | | | | | ✓ | | | | | |
| | | | | १४–१९ | | | | | | ✓ | | | ✓ | | | | | |
| | | | | १९–२४ | | ✓ | | | | ✓ | | ✓ | ✓ | | | | | |
| | | | | एकूण | | ३० | | | | ६० | | ४५ | ५० | | | | २० | २०५ |
| | कराड – दक्षिण | चव्हाण | प्रेमलाताई चव्हाण | ९०–९५ | | | | | ✓ | | | | | | | | | |
| | | | | ९५–९९ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ९९–०४ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ०४–०९ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ०९–१४ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | १४–१९ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | १९–२४ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | एकूण | | | | | २५ | | | | | | | | | २५ |
| | | | पृथ्वराज चव्हाण | ९०–९५ | | | | | ✓ | | | | | | | | | |
| | | | | ९५–९९ | | | | | ✓ | | | | | | | | | |
| | | | | ९९–०४ | | | ✓ | ✓ | | | | | | | | | | |
| | | | | ०४–०९ | | | ✓ | ✓ | | | | | | | | | | |
| | | | | ०९–१४ | ✓ | | | | | | ✓ | | | | | | | |
| | | | | १४–१९ | | | | | | ✓ | | | | | | | | |
| | | | | १९–२४ | | | | | | ✓ | | | | | | | | |
| | | | | एकूण | ५० | | ५० | ५० | ५० | ४० | २० | | | | | | | २६० |
| | | पाटील | विलासराव पाटील | ९०–९५ | | ✓ | | | | ✓ | | | | | ✓ | | | |
| | | | | ९५–९९ | | – | | | | ✓ | | | ✓ | | ✓ | | | |
| | | | | ९९–०४ | | ✓ | | | | ✓ | | | ✓ | | ✓ | | | |
| | | | | ०४–०९ | | | | | | ✓ | | | ✓ | | ✓ | | | |
| | | | | ०९–१४ | | | | | | ✓ | | | ✓ | | ✓✓ | | | |
| | | | | १४–१९ | | | | | | – | | | | | ✓✓ | | | |
| | | | | १९–२४ | | | | | | – | | | | | – | | | |
| | | | | एकूण | | ६० | | | | १०० | | | ४० | | ८० | | | २८० |

| अ. न. | मतदार संघ | घराणे | व्यक्ती | कालखंड (१९९०-२०१९) | मुख्यमंत्री (५०) | मंत्री | | खासदार | | आमदार | | साखर कारखाना | | जिल्हा बँक | | जिल्हा परिषद/ नगरपालिका | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | कॅबिनेट (३०) | राज्य (२५) | राज्यसभा (२५) | लोकसभा (२५) | विधानसभा (२०) | विधानपरिषद (२०) | चेअरमन (१५) | सदस्य (१०) | चेअरमन (१५) | सदस्य (१०) | अध्यक्ष (१५) | सदस्य (१०) | |
| | कराड = उत्तर | पाटील | पी. डी. पाटील | ९०-९५ | | | | | | | | ✓ | | | | ✓ | | |
| | | | | ९५-९९ | | | | | | ✓ | | ✓ | | | | | | |
| | | | | ९९-०४ | | | | | | | | | ✓ | | | | | |
| | | | | ०४-०९ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ०९-१४ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | १४-१९ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | १९-२४ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | एकूण | | | | | | २० | | ३० | १० | | | १५ | | ७५ |
| | | | बाळासाहेब पाटील | ९०-९५ | | | | | | | | | ✓ | | | | ✓ | |
| | | | | ९५-९९ | | | | | | | | | ✓ | | | | ✓ | |
| | | | | ९९-०४ | | | | | | ✓ | | ✓ | | | | | ✓ | |
| | | | | ०४-०९ | | | | | | ✓ | | ✓ | | | | | ✓ | |
| | | | | ०९-१४ | | | | | | ✓ | | | ✓ | | | | ✓ | |
| | | | | १४-१९ | | | | | | ✓ | | | ✓ | | ✓ | | ✓ | |
| | | | | १९-२४ | | ✓ | | | | ✓ | | | ✓ | | ✓ | | ✓ | |
| | | | | एकूण | | ३० | | | | १०० | | ३० | ५० | | २० | | ७० | ३०० |
| | | आष्टेकर | शामराव आष्टेकर | ९०-९५ | | | ✓ | | | ✓ | | | | | | | | |
| | | | | ९५-९९ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ९९-०४ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ०४-०९ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ०९-१४ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | १४-१९ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | १९-२४ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | एकूण | | | २५ | | | २० | | | | | | | | ४५ |
| | | पाटील | श्रीनिवास पाटील | ९०-९५ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ९५-९९ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ९९-०४ | | | | | ✓ | | | | | | | | | |
| | | | | ०४-०९ | | | | | ✓ | | | | | | | | | |
| | | | | ०९-१४ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | १४-१९ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | १९-२४ | | | | | ✓ | | | | | | | | | |
| | | | | एकूण | | | | | ७५ | | | | | | | | | ७५ |

| अ. न. | मतदार संघ | घराणे | व्यक्ती | कालखंड (१९९०–२०१९) | मुख्यमंत्री (५०) | मंत्री | | खासदार | | आमदार | | साखर कारखाना | | जिल्हा बँक | | जिल्हा परिषद/ नगरपालिका | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | कॅबिनेट (३०) | राज्य (२५) | राज्यसभा (२५) | लोकसभा (२५) | विधानसभा (२०) | विधानपरिषद (२०) | चेअरमन (१५) | सदस्य (१०) | चेअरमन (१५) | सदस्य (१०) | अध्यक्ष (१५) | सदस्य (१०) | |
| | फलटण | कदम | चिमणराव कदम | ९०–९५ | | | | | | ✓ | | | | | ✓ | | ✓ | |
| | | | | ९५–९९ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ९९–०४ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ०४–०९ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ०९–१४ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | १४–१९ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | १९–२४ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | एकूण | | | | | | २० | | | | | १० | | १० | ४० |
| | | निंबाळकर | रामराजे निंबाळकर | ९०–९५ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ९५–९९ | | | ✓ | | | ✓ | | | | | | | | |
| | | | | ९९–०४ | | ✓ | | | | ✓ | | | | | ✓ | | ✓ | |
| | | | | ०४–०९ | | ✓ | | | | ✓ | | | | | ✓ | | ✓✓ | |
| | | | | ०९–१४ | | ✓ | | | | | ✓ | | | | ✓ | | ✓✓ | |
| | | | | १४–१९ | | ✓ | | | | | ✓ | | | | ✓ | ✓ | ✓✓ | |
| | | | | १९–२४ | | ✓ | | | | | ✓ | | | | ✓ | | ✓✓ | |
| | | | | एकूण | | १५० | २५ | | | ६० | ६० | | | | ५० | १५ | ९० | ४५० |
| | | चव्हाण | दीपक चव्हाण | ९०–९५ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ९५–९९ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ९९–०४ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ०४–०९ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ०९–१४ | | | | | | ✓ | | | | | | | | |
| | | | | १४–१९ | | | | | | ✓ | | | | | | | | |
| | | | | १९–२४ | | | | | | ✓ | | | | | | | | |
| | | | | एकूण | | | | | | ६० | | | | | | | | ६० |

## १९९० ते २०१९ सातारा जिल्ह्यातील राजकीय घराण्यांचा प्रभाव

| अ. न. | मतदार संघ | घराणे | व्यक्ती | कालखंड (१९९०-२०१९) | मुख्यमंत्री (५०) | मंत्री | | खासदार | | आमदार | | साखर कारखाना | | जिल्हा बँक | | जिल्हा परिषद/ नगरपालिका | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | कॅबिनेट (३०) | राज्य (२५) | राज्यसभा (२५) | लोकसभा (२५) | विधानसभा (२०) | विधानपरिषद (२०) | चेअरमन (१५) | सदस्य (१०) | चेअरमन (१५) | सदस्य (१०) | अध्यक्ष (१५) | सदस्य (१०) | |
| | वाई | पिसाळ | मदन पिसाळ | ९०-९५ | | | | | | ✓ | | | | | | | | |
| | | | | ९५-९९ | | | | | | ✓ | | | | | | | | |
| | | | | ९९-०४ | | | ✓ | | | ✓ | | | | | | | ✓ | |
| | | | | ०४-०९ | | | | | | | | | | | | | ✓ | |
| | | | | ०९-१४ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | १४-१९ | | | | | | | | | | | | ✓ | | |
| | | | | १९-२४ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | एकूण | | | २५ | | | ६० | | | | | | १५ | २० | १२० |
| | | भोसले | प्रतापराव भोसले | ९०-९५ | | | | | ✓ | | | | | | | | | |
| | | | | ९५-९९ | | | | | ✓ | | | | | | | | | |
| | | | | ९९-०४ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ०४-०९ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ०९-१४ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | १४-१९ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | १९-२४ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | एकूण | | | | | ५० | | | | | | | | | ५० |
| | | | मदन भोसले | ९०-९५ | | | | | | | | | ✓ | | | | | |
| | | | | ९५-९९ | | | | | | | | | ✓ | | | | | |
| | | | | ९९-०४ | | | | | | | | ✓ | ✓ | | | | | |
| | | | | ०४-०९ | | | | | | ✓ | | | ✓ | | | | | |
| | | | | ०९-१४ | | | | | | | | ✓ | | | | | | |
| | | | | १४-१९ | | | | | | | | ✓ | | | | | | |
| | | | | १९-२४ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | एकूण | | | | | | २० | | ४५ | ४० | | | | | १०५ |
| | | पाटील | लक्ष्मणराव पाटील | ९०-९५ | | | | | | | | | | | | ✓ | | |
| | | | | ९५-९९ | | | | | | | | ✓ | | | ✓ | | | |
| | | | | ९९-०४ | | | | | ✓ | | | ✓ | | | ✓ | | | |
| | | | | ०४-०९ | | | | | ✓ | | | | | ✓ | | | | |
| | | | | ०९-१४ | | | | | | | | | | ✓ | | | | |
| | | | | १४-१९ | | | | | | | | | | | ✓ | | | |
| | | | | १९-२४ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | एकूण | | | | | ५० | | | ३० | | ३० | ३० | १५ | | १५५ |

| अ. न. | मतदार संघ | घराणे | व्यक्ती | कालखंड (१९९०-२०१९) | मुख्यमंत्री (५०) | मंत्री | | खासदार | | आमदार | | साखर कारखाना | | जिल्हा बँक | | जिल्हा परिषद/ नगरपालिका | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | कॅबिनेट (३०) | राज्य (२५) | राज्यसभा (२५) | लोकसभा (२५) | विधानसभा (२०) | विधानपरिषद (२०) | चेअरमन (१५) | सदस्य (१०) | चेअरमन (१५) | सदस्य (१०) | अध्यक्ष (१५) | सदस्य (१०) | |
| | वाई | | मकरंद पाटील | ९०-९५ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ९५-९९ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ९९-०४ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ०४-०९ | | | | | | | | | | | | | ✓ | |
| | | | | ०९-१४ | | | | | | ✓ | | | | | ✓ | | | |
| | | | | १४-१९ | | | | | | ✓ | | | | | ✓✓ | | | |
| | | | | १९-२४ | | | | | | ✓ | | ✓ | ✓ | | ✓✓ | | | |
| | | | | एकूण | | | | | | ६० | | १५ | १० | | ५० | | १० | १४५ |
| | कोरेगाव | शिंदे | शशिकांत शिंदे | ९०-९५ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ९५-९९ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ९९-०४ | | | | | | ✓ | | | | | | | | |
| | | | | ०४-०९ | | | | | | ✓ | | | | | | | | |
| | | | | ०९-१४ | | | | | | ✓ | | | | | ✓ | | | |
| | | | | १४-१९ | | ✓ | | | | ✓ | | | | | ✓ | | | |
| | | | | १९-२४ | | | | | | | ✓ | | | | | | | |
| | | | | एकूण | | ३० | | | | ८० | २० | | | | २० | | | १४० |
| | | जगताप | शंकरराव जगताप | ९०-९५ | | | | | | ✓ | | | | | | | | |
| | | | | ९५-९९ | | | | | | ✓ | | | | | | | | |
| | | | | ९९-०४ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ०४-०९ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ०९-१४ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | १४-१९ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | १९-२४ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | एकूण | | | | | | ४० | | | | | | | | ४० |
| | | पाटील | शालिनीताई पाटील | ९०-९५ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ९५-९९ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ९९-०४ | | | | | | ✓ | | | | | ✓ | | | |
| | | | | ०४-०९ | | | | | | ✓ | | | | | | | | |
| | | | | ०९-१४ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | १४-१९ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | १९-२४ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | एकूण | | | | | | ४० | | | | | १० | | | ५० |

| अ. न. | मतदार संघ | घराणे | व्यक्ती | कालखंड (१९९०-२०१९) | मुख्यमंत्री (५०) | मंत्री | | खासदार | | आमदार | | साखर कारखाना | | जिल्हा बँक | | जिल्हा परिषद/ नगरपालिका | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | कॅबिनेट (३०) | राज्य (२५) | राज्यसभा (२५) | लोकसभा (२५) | विधानसभा (२०) | विधानपरिषद (२०) | चेअरमन (१५) | सदस्य (१०) | चेअरमन (१५) | सदस्य (१०) | अध्यक्ष (१५) | सदस्य (१०) | |
| | कोरेगाव | शिंदे | महेश शिंदे | ९०-९५ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ९५-९९ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ९९-०४ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ०४-०९ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ०९-१४ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | १४-१९ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | १९-२४ | | | | | | ✓ | | | | | | | | |
| | | | | एकूण | | | | | | २० | | | | | | | | २० |
| | माण | वाघमारे | धोंडीराम वाघमारे | ९०-९५ | | | | | | ✓ | | | | | | | | |
| | | | | ९५-९९ | | | | | | ✓ | | | | | | | | |
| | | | | ९९-०४ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ०४-०९ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ०९-१४ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | १४-१९ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | १९-२४ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | एकूण | | | | | | ४० | | | | | | | | ४० |
| | | तुपे | दिलीप तुपे | ९०-९५ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ९५-९९ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ९९-०४ | | | | | | ✓ | | | | | | | | |
| | | | | ०४-०९ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ०९-१४ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | १४-१९ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | १९-२४ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | एकूण | | | | | | २० | | | | | | | | २० |
| | | | संपदा अवघडे | ९०-९५ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ९५-९९ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ९९-०४ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ०४-०९ | | | | | | ✓ | | | | | | | | |
| | | | | ०९-१४ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | १४-१९ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | १९-२४ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | एकूण | | | | | | २० | | | | | | | | २० |

| अ. न. | मतदार संघ | घराणे | व्यक्ती | कालखंड (१९९०-२०१९) | मुख्यमंत्री (५०) | मंत्री | | खासदार | | आमदार | | साखर कारखाना | | जिल्हा बँक | | जिल्हा परिषद/ नगरपालिका | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | कॅबिनेट (३०) | राज्य (२५) | राज्यसभा (२५) | लोकसभा (२५) | विधानसभा (२०) | विधानपरिषद (२०) | चेअरमन (१५) | सदस्य (१०) | चेअरमन (१५) | सदस्य (१०) | अध्यक्ष (१५) | सदस्य (१०) | |
| | माण | गोरे | जयकुमार गोरे | ९०-९५ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ९५-९९ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ९९-०४ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ०४-०९ | | | | | | | | | | | | | ✓ | |
| | | | | ०९-१४ | | | | | | ✓ | | | | | | | | |
| | | | | १४-१९ | | | | | | ✓ | | | | | ✓ | | | |
| | | | | १९-२४ | | | | | | ✓ | | | | | ✓ | | | |
| | | | | एकूण | | | | | | ६० | | | | | २० | | १० | ९० |
| | जावळी | कदम | जी. जी. कदम | ९०-९५ | | | | | | ✓ | | | | | | | | |
| | | | | ९५-९९ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ९९-०४ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ०४-०९ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ०९-१४ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | १४-१९ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | १९-२४ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | एकूण | | | | | | २० | | | | | | | | २० |
| | | | सदाशिव सपकाळ | ९०-९५ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ९५-९९ | | | | | | ✓ | | | | | | | | |
| | | | | ९९-०४ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ०४-०९ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ०९-१४ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | १४-१९ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | १९-२४ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | एकूण | | | | | | २० | | | | | | | | २० |
| | खटाव | गुदगे | भाऊसाहेब गुदगे | ९०-९५ | | | | | | ✓ | | | | | | | | |
| | | | | ९५-९९ | | | | | | ✓ | | | | | | | | |
| | | | | ९९-०४ | | | | | | ✓ | | | | | | | | |
| | | | | ०४-०९ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ०९-१४ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | १४-१९ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | १९-२४ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | एकूण | | | | | | ६० | | | | | | | | ६० |


| अ. न. | मतदार संघ | घराणे | व्यक्ती | कालखंड (१९९०-२०१९) | मुख्यमंत्री (५०) | मंत्री | | खासदार | | आमदार | | साखर कारखाना | | जिल्हा बँक | | जिल्हा परिषद/ नगरपालिका | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | कॅबिनेट (३०) | राज्य (२५) | राज्यसभा (२५) | लोकसभा (२५) | विधानसभा (२०) | विधानपरिषद (२०) | चेअरमन (१५) | सदस्य (१०) | चेअरमन (१५) | सदस्य (१०) | अध्यक्ष (१५) | सदस्य (१०) | |
| | खटाव | यळगावकर | दिलीप यळगावकर | ९०-९५ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ९५-९९ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ९९-०४ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | ०४-०९ | | | | | | ✓ | | | | | | | | |
| | | | | ०९-१४ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | १४-१९ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | १९-२४ | | | | | | | | | | | | | | |
| | | | | एकूण | | | | | | २० | | | | | | | | २० |

## तक्ता क्रमांक ४.८

## सातारा जिल्ह्यातील राजकीय घराण्यांच्या प्रभावाचा गुण तक्ता

| अ. नं. | मतदार संघ | राजकीय घराणी | नेतृत्त्व | प्राप्त गुण | एकत्रित गुण |
|---|---|---|---|---|---|
| १ | सातारा | भोसले | अभयसिंहराजे भोसले<br>शिवेंद्रसिंह राजे भोसले<br>उदयनराजे भोसले | १५५<br>१८५<br>१५० | ४९० |
| २ | फलटण | निंबाळकर | रामराजे निंबाळकर | ४५० | ४५० |
| ३ | कराड उत्तर | पाटील | पी. डी. पाटील<br>बाळासाहेब पाटील | ७५<br>३०० | ३७५ |
| ४ | वाई | पाटील | लक्ष्मणराव पाटील<br>मकरंद पाटील | १५५<br>१४५ | ३०० |
| ५ | कराड दक्षिण | चव्हाण | प्रेमलाताई चव्हाण<br>पृथ्वीराज चव्हाण | २५<br>२६० | २८५ |
| ६ | कराड दक्षिण | पाटील | विलासराव पाटील | २८० | २८० |
| ७ | पाटण | देसाई | शंभुराज देसाई | २०५ | २०५ |
| ८ | वाई | भोसले | प्रतापराव भोसले<br>मदन भोसले | ५०<br>१०५ | १५५ |
| ९ | पाटण | पाटणकर | विक्रमसिंह पाटणकर | १४० | १४० |
| १० | वाई | पिसाळ | मदन पिसाळ | १२० | १२० |

## सातारा जिल्ह्यातील सन १९९० ते २०२४ राजकीय घराण्यांच्या प्रभावाचा आलेख



**सातारा जिल्ह्यातील सन १९९० ते २०२४ राजकीय घराण्यांचा प्रभाव :**

सातारा जिल्हा स्वराज्य निर्मितीमधील कणा असल्याने याचीच पुढील आवृत्ती म्हणजे भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातसुद्धा या जिल्ह्याची महत्त्वाची भूमिका राहिली आहे. या माध्यमातून जिल्ह्यामध्ये गावपातळीपासून ते देशपातळीपर्यंत नेतृत्त्व निर्माण झाल्याचे आपल्याला पहावयास मिळते. याचाच एक भाग म्हणून आज अखेर जिल्ह्याच्या राजकारणात प्रभावावरील राजकीय घराणी निर्माण झाली. यापैकी काही घराणी राजकीय प्रवाहाबाहेर गेली तर काही घराण्यांनी आपला राजकीय प्रभाव आज अखेकर टिकवून ठेवलेला दिसून येतो. ज्या घराण्यांचा प्रभाव राहिला आहे. अशा घराण्यांनी त्यांच्यामध्ये परिस्थितीनुरूप बदल करून घेतलेला पहावयास मिळतो. स्थानिक स्वराज्य संस्था बरोबरच आर्थिक व शैक्षणिक संस्थांच्या निर्मितीच्या माध्यमाने घराण्याने आपली पकड जिल्ह्याच्या व राज्याच्या राजकारणावर निर्माण केलेली दिसते.

राजकीय घराण्यांच्या प्रभावाचा गुणात्मक आढावा घेत असताना जो तक्ता तयार करण्यात आला आहे त्यामध्ये लोकसभा व विधानसभा या कालखंडाचा उल्लेख दिसतो. पण जिल्हा मध्यवर्ती बँक, जिल्हा परिषद, नगरपालिका या ठिकाणी व्यक्तींची माहिती १९९० ते २०२४ या कालखंडात प्रतिनिधीत्त्व केले या आधारे मांडणी करण्यात आलेली आहे. यामध्ये त्यांच्या कुटुंबातील व्यक्तीनी केलेल प्रतिनिधीत्त्व यांचाही यामध्ये समावेश करण्यात आला आहे. अशाप्रकारे

सातारा जिल्ह्यात एकूण ११ तालुके असून विधानसभेचे एकूण ८ मतदारसंघ असून या ८ विधानसभा मतदार संघापैकी २ विधानसभा मतदार संघ राखीव असून उर्वरित ६ विधानसभा मतदार संघातून एकूण राजकीय घराणी निर्माण झालेली पहावयास मिळतात. माण मतदार संघ हा व २००९ पर्यंत राखीव मतदार संघ असल्याने त्याठिकाणी प्रभावावरील राजकीय घराणे निर्माण झाले नाहीत. कोरेगांव मतदार संघामध्ये राजकीय घराणे निर्माण झाले नाही. जिल्ह्याच्या राजकारणामधील प्रभावी राजकीय घराणी व त्यांचा स्थानिक व राज्य पातळीवरील प्रभावाचा अभ्यास करण्यासाठी संशोधकाने त्यांनी भूषवलेली विविध पदे विचारात घेवून त्यांना गुण ठरवले ही पदे जि. प. सदस्य,

साखरकारखाना चेअरमन, जिल्हा मध्यवर्ती बँक चेअरमन, आमदार, खासदार, राज्यमंत्री कॅबीनेट मंत्री, मुख्यमंत्री असे निकष विचारात घेवून त्यांना म्हणजेच विविध पदासाठी गुण निश्चित केले आहेत. सदरचे गुण हे १० ते ५० या दरम्यानचे असून ते पदावर आधारित आहेत.

घराण्याच्या प्रभावाचा अभ्यास करत असताना त्या घराण्यातील सर्व व्यक्तीने विविध पदासाठी मिळालेले गुण एकूण एकत्र करून त्या घराण्याचे एकूण गुण बनले आहेत. एकूण ८ विधानसभा मतदारसंघापैकी माण व कोरेगांव मतदार संघ वगळता उर्वरित ६ विधानसभा मतदार संघामधून सातारामधून भोसले घराणे, पाटणमधून पाटणकर व देसाई घराणे, कराड उत्तरमधून पाटील घराणे, कराड दक्षिण मधून पाटील व चव्हाण घराणे, वाई मधून पिसाळ पाटील व भोसले घराणे, फलटणमधून निंबाळकर घराणे असे जिल्ह्याच्या राजकारणात म्हणजेच ६ विधानसभा व २ लोकसभा मतदार संघातून एकूण १० राजकीय घराण्यांच्या प्रभाव दिसून येतो.

सातारा जिल्ह्यामधील सर्व प्रभावावरील घराण्यांना त्यांनी भूषविलेल्या विविध पदांना गुण दिले आहेत. कोरेगांव विधानसभा मतदार संघातील शशिकांत शिंदे यांचे १४० गुण असून राजकीय घराणे नसल्याने त्यांना वगळून  ज्या राजकीय घराण्यांना किमान १०० पेक्षा अधिक गुण मिळालेले आहेत. अशा राजकीय घराण्यांचा गुणानुक्रम लावून त्यांना मिळालेल्या गुणांच्या आधारे त्यांचा राजकारणातील प्रभाव मांडला आहे.

**साताराः भोसले घराणे**

वरील आलेखाच्या माध्यमातून असे दिसून येते की, सातारा विधानसभा क्षेत्रातून भोसले घराण्यांचीन एकूण ४९० गुण प्राप्त करून जिल्ह्याच्या राजकारणावर आपला सर्वाधिक प्रभाव असलेले सिद्ध केले आहे. या एकूण गुणामध्ये एकूण ३ व्यक्तींचा समावेश होत असून यामध्ये कै. अभयसिंहराजे भोसले, श्रीमंत उदयनराजे भोसले व श्रीमंत शिवेंद्रराजे भोसले यांचा समावेश होतो. या घराण्यांचा राजकारणामधील प्रवाभावाचा इतिहास  हा श्रीमंत छत्रपती छत्रपती शिवाजी महाराज यांच्यापासून क्षेत्र असलेलेच दिसून येते. श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज व श्रीमंत संभाजीपुत्र

शाहूम हाराजांनी सातारा गादीची स्थापना केली व त्यावेळपासून आजअखेर सातारा संस्थांना या घराण्यांच्या माध्यमातून जिल्ह्याच्या आर्थिक व सामाजिक क्षेत्रात विशेष कार्य झालेने येथील जनतेचे या घराण्यांचा कायमस्वरूपी सत्तेत ठेवलेचे दिसून येते. यामुळच जिल्हा परिषद, नगरपंचायत, साखर कारखाना, आमदार, खासदार, मंत्री अशी विविध पदे या घराण्यांनी भूषविता आली. म्हणून गुणानुक्रमे या घराण्यांच्या सातारा जिल्ह्याच्या राजकारणात सर्वांत प्रथम क्रमांक लागतो.

**निंबाळकर घराणे** :

फलटणचे निंबाळकर घराणे हे इतिहासकालिन संस्थानिक असून आज अखेकर या घराण्यांने आपला प्रभाव राखून ठेवलेला दिसतो. साधारणपणे ७०० वर्षे आणि निंबाळकरांच्या २७ पिढ्या या संस्थानामध्ये आपले वर्चस्व राखून आहेत. साधारणपणे ८४ गावचे हे संस्थांन असून या ठिकाणच्या वैभवाचे व विकासाचे शिल्पकार म्हणून या घराण्यांकडे पाहिले जाते.

इतिहासकालिन या परंपरेचा राजकीय लाभ या घराण्याला प्राप्त झाला आहे. आजही रामराजे नाईक निंबाळकर यांच्या रुपाने निंबाळकर घराणे आपले राजकीय वर्चस्व राखून आहे. या घराण्यांच्या शैक्षणिक संस्था, आर्थिक संस्था व इतिहासकालिन वैभव याद्वारे या घराण्याचे आपले राजकीय वर्चस्व व प्रभाव राखून ठेवला आहे. स्वतः रामराजे निंबाळकर सन १९९५ ते आजअखेर विधानसभा व विधान परिषदेवर कार्यरत आहेत. २००९ मध्ये मतदार संघ राखीव झाल्यानंतर त्यांचा त्या भागातील प्रभाव पाहून पक्षाने त्यांना विधानसभा व विधान परिषदेवर कार्यरत आहेत. २००९ मध्ये मतदार संघ राखीव झाल्यानंतर त्यांचा या भागातील प्रभाव पाहून पक्षाने त्यांना विधानसभा परिषदेची संधी दिली. व २०१५ ते २०२४ या कालखंडात त्या विधानपरिषदेचे सभापती पद भूषविले व आपल्या घराण्याचा प्रभाव विधानमंडळावर सुद्धा निर्माण केला.

त्यांचे साडू रघुनाथराजे हे फलटण नगरपालिका तर संजिवराजे हे ग्रामीण भागातून जिल्हा परिषदेवर सन १९९२ पासून आजअखेर सदस्य आहेत. अशाप्रकारे त्यांचे निंबाळकर घराणे या नावाने एकूण ४५० गुण प्राप्त करून जिल्ह्याच्या राजकारणात भोसले

घराण्यांच्यानंतर दोन नंबरचा आपला प्रभाव ठेवतात. एकूण त्यांच्या सातारा जिल्ह्याच्या राजकारणावरील प्रभावामध्ये त्यांच्या नावाचा इतिहासाचा व त्यांनी समकालिन परिस्थितीत जुळवून घेत निर्माण केलेल्या विविध संस्थांचा हातभार लागला आहे.

**कराड उत्तरः पाटील घराणे**

भारताच्या इतिहासात कराडचे नाव नेहमीच उंचावर राहिले आहे. कराडचे नाव उज्वल करणारी अनेक रत्ने कृष्णामाईच्या काठावर जन्मली त्यापैकीच एक पांडुरंग दादासाहेब पाटल ऊर्फ पी. डी. पाटील यांच्या आयुष्यात अनेक घटना प्रसंग व अनुभव याचे व त्यातून त्यांचे नेतृत्त्व उदयाला आले. १९८२ मध्ये यशवंतराव चव्हाण दिल्लीच्या राजकारणात सक्रीय झाल्यानंतर पी. डी. पाटील यांना या मतदार संघाचे नेतृत्त्व करण्याची संधी मिळाली. आपल्या विद्वत्ता व राजकीय प्रगल्भतेच्या माध्यमातून त्यांनी कराडच्या राजकारणावर आपला प्रभाव सोडला. कराड नगरपालिका व विधानसभा क्षेत्राबरोबरच जिल्हा परिषद, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, साखर कारखाना व आर्थिक विकास साधला आणि मतदार संघावरील आपली पकड अधिकच घट्ट करून जिल्ह्याच्या राजकारणात प्रभाव निर्माण केला. पी. डी. पाटील आणि बाळासाहेब पाटील या पाटील घराण्यांतील दोन व्यक्तींनी राजकारणातील विविध पदे भूषवितांना एकूण ३७५ गुण मिळावून जिल्ह्याच्या राजकारणात तिसरे प्रभावी घराणे म्हणून स्थान पटकवलेले दिसते.

**वाईचे पाटील घराणे** :

लक्ष्मणराव यांनी १९६० मध्ये बोपेगावचे सरपंच म्हणून आपली राजकीय कारकिर्द सुरू केली. त्यानंतर वाई पंचायत समितीचे सदस्य पंचायत समिती सभापती म्हणून कार्य केले. १९९० मध्ये त्यांनी सातारा जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद भूषविले. किसनवीर साखर कारखान्याचे संचालक म्हणून २६ वर्षे कार्य केले. त्यानंतर खासदार म्हणून ते निवडून आले. त्यांनी आपला हा राजकीय प्रवास केवळ स्वप्रयत्नातून केलेला दिसतो. आता वाई मतदार संघाचे नेतृत्त्व त्यांचा मुलगा मकरंद पाटील आहेत. विविध संस्थांच्या माध्यमातून साधलेला विकास ही त्यांची जमेची बाजू असून जिल्ह्याच्या राजकारणात त्यांनी आपले वर्चस्व निर्माण केलेले दिसते. राजकारणामध्ये मिळवलेली विविध पदे त्याद्वारे त्यांना एकूण

३०० गुण प्राप्त होतात. याद्वारे त्यांचा सातारा जिल्ह्याच्या राजकारणावरील प्रभावामध्ये ४ था क्रमांक लागतो.

**करा‍ड दक्षिण : चव्हाण घराणे**

आनंदराव चव्हाण यांनी पंडील नेहरू, लालबहादूर शास्त्री व इंदिरा गांधी यांच्या मंत्रालयामध्ये मंत्री म्हणून आपली ओळख निर्माण केली. पक्षनिष्ठा व प्रामाणिकपणा याद्वारे त्यांनी पक्षश्रेष्ठींचा विश्वास संपादन केला तो आजअखेर चव्हाण घराणे हे निष्ठावंत म्हणूनच ओळखले जाते. आनंदराव चव्हाण यांच्यानंतर कराड लोकसभेचे नेतृत्त्व त्यांच्या धर्मपत्नी श्रीमती प्रेमलाताई यांनी केले. १९९१ साली प्रेमलाबाई चव्हाणांच्या निधनानंतर कराड लोकसभेच्या नेतृत्व पृथ्वीराज चव्हाण यांनी केले. त्यांना केंद्रामध्ये पक्षश्रेष्ठींचे विश्वासू हुशार व प्रामाणिक या गुणांमुळे विविध खात्याचे मंत्री म्हणून कार्यभार संभाळता आला. अशोक चव्हाणांच्यानंतर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होण्याचा मान पृथ्वीराज चव्हाण यांना मिळाला तो केवळ पक्षनिष्ठा, स्वच्छ प्रतिमा, प्रामाणिकपणा व बुद्धीमान किंवा हुशार या गुणांमुळे कराड मतदारसंघांत त्यांची कोणतीही शैक्षणिक संस्था अथवा इतर संस्था नाहीत. साखर कारखाने नाहीत. अथवा जिल्हा मध्यवर्ती बँकेत कोणत्याही प्रकारचा प्रभाव नसताना देखील ते राज्याचे नेतृत्व करू शकले ते केवळ त्यांच्या स्वच्छ प्रतिमा व वैचारिक स्पष्टक्तेमुळे त्यांना मिळालेल्या राजकीय पदासाठी एकूण गुण २८५ होतात. या गुणाद्वारे ते सातारा जिल्ह्याच्या राजकारणात पाचवे प्रभावी घराणे म्हणून ओळखले जातात.

**कराड दक्षिण : पाटील घराणे**

विलासकाका पाटील उंडाळकर यांनी सलग ३५ वर्षे कराड दक्षिण विधानसभा मतदार संघाचे प्रतिनिधित्व केले होते. राजकीय कारकिर्दीत त्यांनी १२ विविध खात्याचे मंत्रीपद सांभाळून महाराष्ट्राच्या जडण–घडणीमध्ये मोठा हातभार लावलेला दिसून येतो. त्यांनी सहीाग क्षेत्रातही मोठे काम केले असून अनेक सहकारी संस्था उभारल्या. जिल्हा मध्यवर्ती बँकेचे सलग २५ वर्षे त्यांनी नेतृत्त्व केले. याबरोबरच साखर कारखान्यांची निर्मिती, कोयना दूध संघ या माध्यमातून त्यांनी जनमानसात मोठा संपर्क ठेवला होता.

त्यांचे चिरंजिव ॲड. उदयसिंह पाटील यांनी जिल्हा मध्यवर्तीचे बँकेचे संचालक म्हणून कार्य केले. तर कराड दक्षिण विधानसभा मतदार संघात २०१९ साली त्यांना पराभवाच्या सामना करावा लागला. विलासकाका पाटील व त्यांचे चिरंजीव उदयसिंह पाटील यांनी विविध संस्था व विधानसभा जिल्हा बँक यादवारे मिळवलेली अथवा भूषवविलेल्या पदाची एकूण बेरीज २८० एवढी होते. याद्वारे सातारा जिल्ह्याच्या राजकारणात त्यांचा प्रभाव किंवा त्यांच्या घराण्याचा प्रभाव ६ क्रमांचा ठरतो.

**पाटणचे देसाई घराणे** :

महाराष्ट्राचे माजी मंत्री, लोकनेते व पोलाची पुरुष म्हणून ज्यांचा उल्लेख होतो ते पाटणचे सुपूत्र बाळासाहेब देसाई अत्यांत प्रतिकूल परिस्थितीत जन्मलेले बाळासाहेब देसाई शिक्षणासाठी दवाखान्यातील झाडलोटीचे व इतर काम करतात. परंतु शिक्षणाची कास सोडत नाहीत. कुशाग्रबुद्धीमत्तेच्या या मुलाने इयत्ता ४ थीच्या वर्गात १५० विद्यार्थ्यांमध्ये प्रथम क्रमांक मिळविल्यानंतर त्यांना प्रिन्स शिवाजी वसतिगृहात प्रवेश मिळतो व ते त्या ठिकाणी राहून एल.एल.बी. चे शिक्षण पूर्ण करतात. वकिलीच्या व्यवससासोबतच सातारा जिल्हा लोकलबोर्डचे सदस्य म्हणून त्यांची राजकीय कारकिर्द सुरू होते. द्विभाषिक मुंबई राज्यात यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री व बाळासोब देसाई बांधकाम खात्याचे कॅबीनेट मंत्री झाले. महाराष्ट्र राज्याचे पहिले शिक्षणमंत्री होण्याचा मान त्यांना मिळाला. या काळात त्यांनी आर्थिकदृष्ट्या मागास पालकांच्या मुलांना मोफत शिक्षण देण्याची योजना त्यांनी सुरू केली. शिवाजी विद्यापीठाची कोल्हापूर कृषी महाविद्यालय, कोल्हापूर सारख्या शैक्षणिक संस्था निर्मितीमध्ये त्यांचे मोठे योगदान राहिले आहे. शेती सुधारणा कायदा, कुळ कायदा यासारखे कायदे प्रभावीपणे त्यांनी अंमलात आणले. याद्वारे यांची शिक्षणाविषयीची तळमळ गरिबांबद्दलची कणव दिसून येते.

बाळासाहेब देसाई यांनी त्यांच्या मतदारसंघामध्ये साखरकारखान्यांची निर्मिती, शैक्षणिक संस्थांची निर्मिती याद्वारे भागाचा शैक्षणिक व आर्थिक विकास साधला आहे. याद्वारे त्यांची जनमानसाशी नाळ जोडली होती. बाळासाहेब देसाई यांच्यानंतर त्यांचे पुत्र शिवाजीराव देसाई यांनी मतदार संघाचे नेतृत्त्व करण्याचा प्रयत्न केला. परंतु साखर

कारखाना व्यतिरिक्त ते आपली छाप राजकारणावर पाडू शकले नाहीत. याचदरम्यान विक्रमसिंह पाटणकर यांचे नेतृत्त्वपुढे आल्याने या घराण्याची राजकीय कारकिर्द मंदावलेली दिसून येते.

परंतु बाळासोब देसाई यांची तिसरी पिढी शंभुराज देसाई यांच्या रुपाने प्रभावी होत असलेली पहावयास मिळते. महाराष्ट्राच्या राजकारणातील प्रभावी नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. बाळासाहेब देसाई यांची चौथी पिढी जसराज देसाई यांच्यारुपाने साखर कारखान्याचे चेअरमनपदी आरुढ होवून देसाई घराण्याचा प्रभाव मतदार संघावर निर्माण करत असल्याचे दिसून येत आहे. देसाई घराण्यातील व्यक्ती राजकारणात मिळवलेली विविध पदे याद्वारे त्यांचे एकूण गुण २०५ होतात. याद्वारे ते सातारा जिल्ह्याच्या राजकारणातील ७ नंबरचे प्रभावी घराणे ठरते.

**वाईचे भोसले घराणे** :

यशवंतराव चव्हाण यांचे निष्ठावंत सहकारी प्रतापराव भोसले यांची राजकीय ओळख होय. या निष्ठेच्या माध्यमातून त्यांना ३ वेळा खासदारकी मिळाली. सोबतेच प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष पदाचा बहुमानही त्यांना उपलब्ध झाला. त्याच्या कारकिर्दीत त्यांनी साखर कारखाना व इतर आर्थिक व सामाजिक संस्थांच्या माध्यमातून मतदारापर्यंत संपर्क साधून मतदार संघाचा आर्थिक व सामाजिक विकास साधण्याचा प्रयत्न केला. त्यांनी निर्माण केलेल्या राजकीय पार्श्वभूमीचा फायदा त्यांचे पुत्र मदन भोसले यांनी विधानसभेचे प्रतिनिधीत्व केले. त्यांनी राजकारणाच्या माध्यमातून विविध पदे उपभोगली. या सर्व पदाचा गुणाच्या माध्यमातून मोजले असता एकूण गुणांची संख्या १५५ एवढी भरते. याद्वारे वाईच्या भोसले घराण्याचा सातारा जिल्ह्याच्या राजकारणावर ८ व्या क्रमांकावर प्रभाव आढळून येतो.

**पाटणचे पाटणकर घराणे** :

विक्रमसिंह पाटणकर यांची महाराष्ट्रातील राजकीय ओळख ही शरद पवारांचे निष्ठावंत अशी केली जाते. वास्तविक पाटणकरांनी पहिली विधानसभा निवडणूक अपक्ष म्हणून लढविली. अगदी त्यावेळेपासून त्यांनी शरद पवारांना आपला नेता मानलेले आहे.

पुलोद, एस काँग्रेस, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस या राजकीय प्रवासात पाटणकर कायम शरद पवारांसोबत राहिलेले दिसतात. या कालखंडामध्ये जिल्हा बँक व जिल्हा परिशद या ठिकाणी त्यांनी प्रभावी भूमिका बजावलेली दिसते. शिक्षण संस्था, कोयना दूध या माध्यमातून त्यांनी मतदार संघात आर्थिक व शैक्षणिक विकास साधला आहे. या आधारे त्यांचे पुत्र सत्यजित पाटणकर हे दोन वेळा विधानसभा लढले पण त्यात त्यांना यश आले नाही. पाटणकर घराण्यांमधील व्यक्तींनी मिळवलेल्या राजकीय पदांना गुणाच्या माध्यमातून मोजले असता त्यांचे एकूण गुण १४० होतात. याद्वारे त्यांचे घराणे सातारा जिल्ह्याच्या राजकारणावर प्रभाव टाकणारे ९ व्या क्रमांकाचे घराणे ठरते.

**वाईचे पिसाळ घराणे** :

मदन पिसाळ यांनी जिल्हा परिषदेच्या माध्यमातून १९६७ साली राजकीय कारकिर्द सुरू केली. १० वर्षे ते सातारा जिल्हा परिषदेचे सदस्य होते. प्रतापराव भोसले हे सातारा लोकसभा मतदार संघातून निवडून गेल्यानंतर त्यांच्या जागी १९८५ साली वाई विधानसभा मतदार संघातून मदन पिसाळ निवडून गेले. त्यांनी चार वेळा वाई विधानसभा मतदार संघाचे प्रतिनिधित्व केले. त्यांनी आपल्या कारकिर्दीत वाई विधानसभा मतदार संघाच्या विकासाबरोबर वाई सहकारी सुतगिरणीची स्थापना केली. त्यानंतर त्यांचे पुत्र शशिकांत पिसाळ हे १० वर्षे सातारा जिल्हा परिषदेचे सदस्य होते. तर शशिकांत पिसाळ त्यांच्या पत्नी सातारा जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा झाल्या. मदन पिसाळ त्यांचे वारस सहकारी संस्था व स्थानिक स्वराज्य संस्था या संस्थामध्ये नेतृत्त्व करताना दिसतात. पिसाळ घराण्यांतील व्यकतींनी मिळवलेल्या राजकीय पदांना गुणात्या माध्यमातून मोजले असता त्यांचे एकूण गुण १२० होतात. याद्वारे पिसाळ घराणे सातारा जिल्ह्याच्या राजकारणावर प्रभाव टाकणारे १० व्या क्रमांकाचे घराणे ठरते.

सातारा जिल्ह्यातील राजकीय घराण्यांच्या प्रभावाचा अभ्यास करताना त्यांना प्राप्त झालेल्या गुणावरून सातारा जिल्ह्यामध्ये ८ विधानसभा मतदार संघ व दोन लोकसभा मतदार संघ यांचे अवलोकन करता एकूण १० राजकीय घराणी सातारा जिल्ह्यामध्ये अस्तित्वात आहेत. या राजकीय घराण्यांबरोबर कराड दक्षिण मधिल यशवंतराव मोहिते

यांचे मोहिते –भोसले घराणे १९९० नंतर लोकसभा व विधानसभा निवडणुकीमध्ये विजयी झाले नाही तरी हे मोहिते –भोसले घराणे सहकारी साखर कारखाने, शिक्षण संस्था, इतर सामाजिक संस्थांच्या माध्यमातून कराड दक्षिण विधानसभा मतदार संघात सक्रिय असलेले दिसते. त्यामुळे वरील १० राजकीय घराण्यांच्याबरोबर कराड दक्षिण मधील मोहिते – भोसले घराण्यांच्या कार्याची माहिती विस्तृत स्वरूपात पुढे मांडण्यात आली आहे.

**फलटणचे नाईक–निंबाळकर घराणे**

महाराष्ट्रात जी ऐतिहासिक व राजकीय घराणी उदयास आली त्यामध्ये सातारा जिल्ह्यातील फलटणच्या नाईक–निंबाळकर घराण्याचा अग्रक्रमाने उल्लेख करावा लागेल. या घराण्यातून श्रीमंत पवार, जगदेव पवार, निंबराज नाईक निंबाळकर, वनंग भूपाल निंबाळकर, वनगोजीराव निंबाळकर, मालोजीराव निंबाळकर, बाजीसाहेब निंबाळकर, मधोजी निंबाळकर, जानोजीराव निंबाळकर इत्यादी राजकीय वारसदार उदयास आहे.[२१] त्यांनी आपल्या कार्य कर्तृत्त्वाने तत्कालीन समाजव्यवस्थेमध्ये अमुलाग्र बदल घडवून आणला. हे करत असताना समाजाशी आपली बांधिलकी कायम ठेवण्याचा सातत्याने प्रयत्न केला त्यामुळे स्वातंत्र्योत्तर भारतातील राजकारणामध्ये ही घराणी आजही कार्यरत असलेली दिसतात.

**१) मुधोजी निंबाळकर**

निंबाळकर हे घराणे ऐतिहासिक असून मुधोजी नाईक निंबाळकर यांची कन्या व बाबाजी नाईक निंबाळकर यांची बहीण सईबाई हिचा विवाह छ. शिवाजी महाराजांशी झाला होता. १६५९ मध्ये त्यांच्या पोटी छ. संभाजी महाराजांचा जन्म झाला. असे निंबाळकर घराण्याचे नाते संबंध भोसले घराण्याशी होते. पुढे मुधोजी नाईक यांनी या घराण्याचा नावलौकिक महाराष्ट्रासह संपूर्ण देशभर केला. त्यांनी आपल्या कारकीर्दीत दलित मागासवर्ग व स्त्रीयांच्या शिक्षणासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केले. त्यांनी आपल्या संस्थानामध्ये अनेक शाळा व हायस्कुलची उभारणी केली व सर्व जाती धर्माच्या लोकांना सक्तीच्या व मोफत शिक्षणाची संधी निर्माण करून दिली. फलटण संस्थानात त्यांनी शिक्षणासह भरतकाम, शिवणकाम असे व्यवसाय महिलांसाठी सुरू केले. शिक्षण प्रसारासाठी उत्तेजन मिळावे, यासाठी

त्यांनी शिष्यवृत्तीची घोषणा करून त्याची प्रभावी अंमलबजावणी केली आणि फलटणमध्ये आधुनिक शिक्षणाचा पाया घातला.

मुधोजींनी शेतीला चालना मिळावी, यासाठी जमीन महसूल जमाबंदी, अल्पदरात तगाई कर्जे, दुष्काळी कामे, दुष्काळामध्ये शेतकऱ्यांना आर्थिक मदत, त्यांना रोजगार निर्माण करून दिला व हजारो गोरगरीब लोकांच्या समस्या सोडविल्या. लोकांना रोजगाराची निर्मिती करण्यासाठी त्यांनी फलटण ते पंढरपूर रस्ता दुरूस्तीचे काम हाती घेतले. गंगा नदीवर बंधारा बांधून त्यांनी शेतीच्या व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविला. १८६८ मध्ये फलटण येथे म्युनिसिपालटीची स्थापना करून फलटण शहराचा विकास घडवून आणला. परिणामी त्यांच्या या प्रभावी कार्याची दखल घेऊन ब्रिटिश सरकारने त्यांना मुंबई लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे सदस्यत्व बहाल करून त्यांच्या कार्याचा सन्मान केला. त्यांच्या या उत्कृष्ट व उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन ब्रिटीश सरकारने त्यांना 'सी. एस. आय.' हा किताब बहाल केला.[२२]

**२) मालोजीराजे नाईक–निंबाळकर**

मालोजीराजे हे फलटण संस्थानचे २५ वे अधिपती होते. संस्थानाधिपती म्हणून त्यांनी ३१ वर्षे सातत्याने कारभार केला तर स्वातंत्र्यानंतर ३० वर्षे लोकप्रतिनिधी म्हणून समाजउपयोगी अनेक कार्य केली. त्यांच्या जीवनावर छत्रपती शाहू महाराजांच्या विचाराचा व कार्याचा मोठा प्रभाव होता. शाहूंनी आपल्या करवीर संस्थानामध्ये घेतलेले निर्णय, मागासवर्गीयांसाठी केलेले महत्त्वपूर्ण कार्य व अंमलबजावणी त्यांनी अगदी जवळून पाहिली होती. म्हणून सत्ता हातात येताच त्यांनी लोककल्याणकारी कार्ये हातात घेतली आणि स्त्रीयांना समाजामध्ये समान दर्जा मिळाला पाहिजे, यासाठी त्यांनी मोठे कार्य केले. समाजातील नवस, पशुबळी, मद्य इत्यादी अनिष्ट चालींविरूद्ध जोरदार आवाज उठवून त्याला विरोध केला. फलटण संस्थानातील मंदिरे दलित अस्पृश्यांसाठी खुली करून अस्पृश्यता नष्ट करण्याचे कार्य केले. सामाजिक कार्याबरोबर त्यांचे राजकीय कार्य देखील उल्लेखनीय असेच राहिले आहे. स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये त्यांनी स्वतंत्र भारताचे स्वप्ने पाहिले. आपण आज ना उद्या स्वतंत्र होणार आहोत, तेव्हा सर्व संस्थांनांनी लोकशाही मार्गाने कार्य करून आपली संस्थान लोकशाही राज्यातविलीन करावी, असे त्यांचे मत होते. ते नुसते बोलून थांबले नाहीत तर

त्यांनी देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर फलटण संस्थान विलीनीकरणास मोठ्या आनंदाने सहमती दिली.

मालोजीराजांनी केलेल्या या महान कार्याची दखल घेऊन मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांनी ते काँग्रेसचे सदस्य नसतानाही त्यांचा प्रांताच्या मंत्रीमंडळात समावेश करून घेतला. मंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर त्यांनी अनेक लोकोपयोगी निर्णय घेतले. सहकारी साखर कारखान्याबरोबरच कृषी व सहकारी संस्थांची निर्मिती करून शेकडो लोकांच्या हाताला रोजगार मिळवून दिला. पाटण तालुक्यातील कोयना धरण निर्मितीत ही त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका होती. त्याचबरोबर शेतीचे उत्पन्न वाढण्यासाठी बीजगुण केंद्राची निर्मिती, शाळा, महाविद्यालयाची निर्मिती, भूदान चळवळ असे अनेक प्रयोग त्यांनी यशस्वीरित्या पार पाडले. याशिवाय कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक कार्यास मदत म्हणून सातारा शहरातील आपला बंगला, साडे दहा एकर जमीन व पाच हजार रूपये देणगी दिली. आज याच जमिनीवर रयत शिक्षण संस्थेची तीन महाविद्यालये दिमाखात उभी आहेत.[२३] मुंबई प्रांताचे बांधकाम व पाटबंधारे मंत्री म्हणून कामगिरी करणारे मालोजीराजे १९५७ च्या विधानसभा निवडणुकीत हरीभाऊ निंबाळकर यांच्याकडून पराभूत झाले. १९६२ साली मालोजीराजे फलटण विधानसभा मतदारसंघातून निवडून आले. पुढे आपला मुलगा शिवाजीराजे यांना १९६७ मध्ये निवडणूकीस उभे केले. मात्र कृष्णकांत भोईटे यांच्याकडून त्यांचा पराभव झाला. त्यानंतर १९७८ मध्ये मात्र जनता पक्षाच्या उमेदवारीवर शिवाजीराजे निंबाळकर यांनी विधानसभा जिंकली.[२४] परंतु १९८० च्या विधानसभा निवडणुकीत चिमणराव कदम यांच्याकडून शिवाजीराव निंबाळकर यांचा पराभव झाला.

### ३) रामराजे नाईक-निंबाळकर (मालोजीराजेचे नातू)

१९८० ते १९९५ पर्यंत चिमणराव कदम यांचे वर्चस्व फलटण मतदार संघावर राहिले. परंतु १९९१ च्या फलटण नगरपालिका निवडणुकीच्या माध्यमातून मालोजीराजे यांचे नातू रामराजे नाईक निंबाळकर यांनी नगरपालिकेमधून पुन्हा जोरदार मुसंडी मारत नगराध्यक्षपद मिळविले आणि राजे गटाचे पुन्हा एकदा वर्चस्व निर्माण झाले. पुढे १९९५ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये ते आमदार म्हणून निवडून आले. १९५२ सालापासून राजकारणात सक्रीय असलेल्या या घराण्यातील नेत्यांना अनेकदा पराभवाचा सामना करावा लागला आहे. १९९५

पासून फलटण तालुक्यावर नाईक– निंबाळकर यांची निर्विवाद सत्ता निर्माण झाली. १९९९ ते २००९ पर्यंत रामराजे निंबाळकर यांनी महाराष्ट्राच्या मंत्री मंडळात राज्य व कॅबिनेट मंत्रीपद भूषविलेले आहे. २००९ साली मतदार संघ पुनर्रचनेमध्ये त्यांचा फलटण विधानसभा मतदार संघ अनुसूचित जातीसाठी राखीव झाल्याने राष्ट्रवादी काँग्रेसकडून त्यांना २०१० पासून ते २०२४ पर्यंत विधानपरिषदेचे सदस्य म्हणून नियुक्त केले. तर २०१५ ते २०२२ या कालखंडात रामराजे नाईक निंबाळकर महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती म्हणून कार्यरत होते. सातारा जिल्ह्याचे प्रमुख म्हणून ओळखले जाणारे रामराजे हे ज्येष्ठ नेते शरद पवारांचे निकटवर्ती म्हणून ओळखले जात होते.

रामराजे नाईक–निंबाळकर यांनी जलसंपदा मंत्री अजित पवार यांच्या सहकार्याने खंडाळा व फलटण तालुक्यातील मध्यम व लघू पाटबंधारे, धोम बलकवडी या प्रकल्पांला आवश्यक तो निधी उपलब्ध करून दिला. राज्याच्या मंत्रीमंडळामध्ये त्यांनी राज्यमंत्री व कॅबिनेट मंत्री पद, मुंबईचे पालकमंत्री, सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून काम करून आपल्या कार्य कर्तृत्त्वाचा एक वेगळाच ठसा उमटविला आहे. तसेच स्थानिक लोकांच्या हाताला रोजगार मिळवून देण्यासाठी त्यांनी शेती उद्योगाबरोबरच औद्योगिक विकास ही साधण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्यांनी आधुनिक टेक्नॉलॉजीचा फायदा करून घेतला. याशिवाय फलटण एज्युकेशन सोसायटी या शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदी विराजमान होऊन तालुक्यामध्ये शिक्षणाची ज्ञान गंगा पोहचविली. केंद्रशासन व महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून फलटण, खंडाळा या तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणावर विकासकामे केली. त्यामध्ये प्रामुख्याने पिण्याचे पाण्याची नळ योजना, सामाजिक सभागृहे, समाज मंदिरे, नवीन प्राथमिक शाळा, शाळांच्या खोल्या, डांबरी रस्ते, रस्ते दुरूस्ती, दलित वस्ती सुधार योजना, जवाहर विहिरी, इंदिरा आवास योजना, डोंगरी विकास कामे, महाराष्ट्र जीवन प्राधीकरण योजना, व्यायाम शाळा, स्वच्छता गृहे, यशवंत ग्राम समृद्धी योजना, जलसंधारणाची कामे, लघु पाटबंधारे, नाला संडिग, दुष्काळात पशुधन वाचविण्यासाठी उभारलेल्या छावण्या, रोजगार हमी योजनेचा गरजूंना लाभ, सूवर्ण जयंती, स्वयंरोजगार योजना, संजय गांधी निराधार योजना, इंदिरा गांधी भूमीहिन महिला योजना, श्रावण बाळ योजना, निर्मल ग्राम योजना, महात्मा गांधी तंटामुक्त योजना इत्यादी शासकीय योजना राबवून ग्रामीण व शहरी बेरोजगार व गरजू लोकांचा

सर्वांगिण विकास घडवून आणण्याचा प्रयत्न त्यांनी केला.[२५] रामराजे मंत्री असताना नर्मदा आंदोलन झाले. तो गुंतागुंतीचा प्रश्न सोडविण्याचा त्यांनी निश्चय केला आणि ते शासन आणि आंदोलक यामधील ते एक दुवा बनले. या आंदोलनातून लढा देणारे आदिवासी प्रतिनिधीवर शासकीय समितीच्या कार्य संदर्भात विश्वास ठेवणारे ते मंत्री होते. अडीच वर्षे टास्क फोर्सचा व्याप स्वत: त्रास न घेता त्यांनी हा प्रश्न सहज सोडविला परंतु मंत्रीपदाचा त्यांचा कालखंड संपल्यामुळे त्यांना काही करता आले नाही.[२६]

जिल्ह्याच्या राजकारणासह महाराष्ट्राच्या राजकारणात त्यांनी आपल्या कार्य कर्तृत्त्वाने एक वेगळाच ठसा उमटविला आहे. त्यांच्या नेतृत्त्वाखाली सन १९९१, १९९६, २००२ आणि २००७ मधील नगरपरिषदा निवडणूका त्याचप्रमाणे १९९५, १९९९, २००४ मधील विधानसभा निवडणूका त्यांनी मोठ्या मताधिक्याने जिंकल्या.[२७] त्यामुळे फलटण तालुक्यासह सातारा जिल्ह्याच्या राजकारणावर त्यांचे वर्चस्व प्रस्थापित झाले आहे.

पुढे सन २०१७ मध्ये झालेल्या जिल्हा परिषद निवडणुकीत रामराजे निंबाळकर यांनी निर्विवाद वर्चस्व मिळविले. सातारा जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदी त्यांचे बंधू संजीवराजे निंबाळकर यांची वर्णी लावली. त्यांच्या वहिनी शिवांजली राजे निंबाळकर, शिवरूप राजे निंबाळकर हे देखील जिल्हा परिषदेवर निवडून गेले आहेत.

### ४) संजीवराजे निंबाळकर

रामराजेंचे बंधू राजकारणात सक्रिय असून यांचे चूलत बंधू शिवाजीराजे यांचे पुत्र संजीव राजे हे १९९५ मध्ये फलटण पंचायत समितीचे सभापती झाले. २०१० मध्ये संजीव राजे व त्यांच्या पत्नी शिवांजली राजे जिल्हा परिषद सदस्य झाले. २०१७ च्या जिल्हा परिषद निवडणुकीत संजीवराजे निवडून येऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे सातारा जिल्हा परिषदेचे अध्यक्ष झाले. रामराजेंचा भाऊ पिट्टू दादा हे देखील फलटणचे नगराध्यक्ष झाले तर रामराजेंचे चिरंजीव अनिकेत राजे हे फलटणचे नगरसेवक म्हणून निवडून आले. त्यामुळे साताराचे पालकमंत्री पद भूषविणाऱ्या रामराजेंचे फलटणच्या राजकारणावर राजकीय वर्चस्व निर्माण झाले. त्यांनी आपल्या राजकीय कारकीर्दीत फलटणचा सर्वांगिण विकास घडवून आणण्यावर अधिक भर दिला. कमिन्स कंपनीच्या आगमनाने फलटण शहराचा चेहरामोहरा बदलून गेला.[२८] थोडक्यात स्वातंत्र्यपूर्व कालखंडापासून समाजकार्यात व राजकारणात सातत्याने कार्यरत

असणाऱ्या या नाईक–निंबाळकर घराण्याने आपल्या फलटण संस्थानामध्ये अनेक विकास कामे करून सर्वसामान्यांसह दलित, मागासवर्ग व अल्पसंख्यांक लोकांचे सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक प्रश्न सोडविण्याचा प्रामाणिक व्र यशस्वी प्रयत्न केल्याचे दिसते. केवळ ऐतिहासिक पार्श्वभूमीचा वारसा न सांगता त्यांनी शिवकालीन कालखंडापासून ते आधुनिक कालखंडापर्यंत समाजाशी असलेला आपली नाळ कायम ठेवली. सामाजिक बांधीलकीची जाणीव ठेवून आपल्या संस्थानामध्ये अनेक विकास कामे करून अमुलाग्र बदल घडवून आणल्याचे चित्र सबंध फलटण शहर मतदारसंघामध्ये पहावयास मिळते. परिणामी स्वातंत्र्यानंतर अनेक राजकीय पक्षांनी या घराण्यातील नेत्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना आपल्या पक्षाची अधिकृत उमेदवारी दिली आणि सत्तेमध्ये सहभागी होण्याची संधी दिली.

**सातारचे भोसले घराणे**

**१) अभयसिंह राजे भोसले**

स्वातंत्र्योत्तर भारतामधील संयुक्त महाराष्ट्रातील सातारा तालुक्याच्या राजकारणावर भोसले घराण्याचे नेहमीच वर्चस्व राहिले आहे. देशामध्ये आणिबाणीनंतर १९७८ ला झालेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीमध्ये अभयसिंहराजे भोसले यांनी जनसंघाकडून उमेदवारी प्राप्त करून सातारा विधानसभा मतदार संघातून ते विजयी झाले. सातारा राज घराण्यातील अभयसिंह राजे भोसले ही प्रथमच व्यक्ती विधीमंडळाची सदस्य झाली. पुढे १९८० मध्ये त्यांनी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश केला आणि बॅ. अ. र. अंतुले यांच्या मंत्रीमंडळात त्यांना राज्यमंत्रीपदी काम करण्याची संधी मिळाली. त्यानंतर कॅबिनेट पदी त्यांची वर्णी लागली. पुढे १९७८ पासून झालेल्या तालुक्यातील प्रत्येक निवडणूकीत त्यांना यश मिळाले. १९९० च्या विधानसभा निवडणुकीमध्ये आपल्या भावजया छ. उदयनराजे भोसले यांच्या मातोश्री कल्पनाराजे भोसले यांना शिवसेना पक्षाकडून उमेदवारी मिळाली. या दीर–भावजया यांच्या निवडणूक लढतीत छ. अभयसिंहराजे भोसले यांनी कल्पनाराजे भोसले यांचा पराभव केला. १९९५ पर्यंत सातत्याने ते राज्याच्या मंत्रीमंडळामध्ये कार्यरत होते.

१९९६ मध्ये सातारा लोकसभा मतदारसंघात प्रथमच काँग्रेस पक्षाचा पराभव होवून शिवसेनेचे उमेदवार हिंदूराव नाईक–निंबाळकर हे निवडून आले. पण १९९८ च्या लोकसभा निवडणुकीत सातारा लोकसभा मतदारसंघ आपल्या पक्षाकडे परत मिळविण्यासाठी काँग्रेस

पक्षाने सातारा लोकसभा मतदारसंघाची उमेदवारी सातारचे राजे घराण्याचे वारसदार आमदार अभयसिंहराजे भोसले यांना दिली. राजे भोसले घराण्यांच्या लोकप्रियतेच्या प्रभावामुळे व त्यांच्या व्यक्तीगत कार्यामुळे १९९८ मध्ये अभयसिंहराजे भोसले सातारा लोकसभा मतदारसंघातून काँग्रेस पक्षाच्या उमेदवारीवर निवडून आले. १९९८ मध्ये खासदारकीला निवडून आल्यामुळे त्यांना आमदारकीचा राजीनामा द्यावा लागला. परिणामी विधान सभेसाठी पोटनिवडणूक जाहीर झाली. या निवडणूकीमध्ये अभयसिंह राजे भोसले यांचे चिरंजीव शिवेंद्रराजे भोसले यांना काँग्रेसने उमदेवारी दिली. तर अभयसिंह राजेंचे पुतने उदयनराजे यांना भारतीय जनता पार्टीने उमेदवारी दिली. ही पोट निवडणूक महाराष्ट्रात गाजली गेली. या निवडणुकीत भाजपचे उमदेवार उदयनराजे भोसले हे निवडून आले. परिणामी अभयसिंह राजे यांच्या मुलाला पराभव पत्करावा लागला. पण १९९९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणूकीत अभयसिंह राजे भोसले यांनी लोकसभेवर न जाता सातारा विधानसभा मतदार संघामध्ये निवडणूक लढविली व आपले पुतने उदयनराजे भोसले यांचा पराभव केला व इथून पुढे भोसले घराण्यामध्ये राजकीय संघर्षाला सुरुवात झाली.

**२) उदयनराजे भोसले (पुतणे)**

उदयनराजे भोसले छत्रपतीचे थेट तेरावे वंशज यांनी १९९० मध्ये आपल्या राजकीय प्रवासाला सुरवात केली. सातारा नगरपालिकेच्या निवडणूकीमध्ये दोन वार्ड मधून ते उभे राहिले. एका वार्ड मधून ते निवडून आले तर एका वार्ड मध्ये त्यांचा पराभव झाला. १९९६ मध्ये उदयनराजे भोसले यांनी सातारा लोकसभा मतदारसंघाची अपक्ष म्हणून निवडणूक लढविली. काँग्रेसचे अधिकृत उमेदवार प्रतापराव भोसले यांना उदयनराजे भोसले यांच्या अपक्ष उमेदवारीमुळे पराभवाला सामोरे जावे लागले आणि शिवसेनेचे उमेदवार हिंदूराव नाईक–निंबाळकर हे या निवडणूकीमध्ये विजयी झाले. १९९७ च्या सातारा विधानसभा पोटनिवडणुकीत भाजपच्या उमेदवारीवर उदयनराजे भोसले यांनी चुलतबंधू शिवेंद्रराजे भोसले यांचा पराभव केला. १९९८ मध्ये उदयनराजे भोसले यांची महाराष्ट्र राज्य मंत्रीमंडळात महसूल राज्य मंत्री म्हणून निवड झाली. सातारा आणि भोसले घराणे हे आता राजकीय समीकरणच बनले आहे. उदयनराजेंचा साधा सरळ रांगडेपणा व कार्यकर्त्यांचा संच आणि त्यामुळे अधिकच लोकप्रिय असलेल्या उदयनराजे महाराजांना सन २००९ च्या लोकसभा निवडणुकीसाठी अनेक

नेत्यांचा विरोध असताना देखील पक्षाध्यक्ष शरद पवार यांनी राष्ट्रवादी पक्षाची उमेदवारी दिली. परिणामी या लोकसभा निवडणुकीमध्ये त्यांनी दणदणीत विजय संपादन केला आणि सातारची राष्ट्रवादी काँग्रेसची जागा कायम राखली उदयनराजे यांना ५,२२,५१३ मते मिळाली तर प्रतिस्पर्धी शिवसेनेच्या पुरूषोत्तम जाधव यांना १,५५,९३७ मते मिळाली.[२९] सातारा लोकसभा मतदार संघामध्ये अपक्ष उमेदवार म्हणून उदयनराजे उभे होते. त्यावेळी हा मतदार संघ राष्ट्रवादी काँग्रेसकडे होता. परंतु या मतदार संघावर उदयनमहाराजांचा प्रभाव होता. त्यामुळे तेच निवडून येणार राष्ट्रवादीचा कोणताही उमेदवार यांच्याशी लढू शकणार नाही. हे पवार साहेबांनी जानले होते म्हणून २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसने उदयनराजे भोसले यांना उमेदवारी दिली व ते परत मोठ्या मतदाधिक्याने सातारा मतदार संघातून लोकसभेवर निवडणून गेले. २०१९ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत तिसऱ्यांदा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने उदयनराजे भोसले यांना उमेदवारी दिली. यावेळेस जिल्ह्यातील बहुतांश आमदारांचा उदयनराजे भोसले यांना विरोध होता पण पक्ष आदेशामुळे त्यांना उदयनराजे भोसले यांचे कार्य करावे लागले. पण या निवडणुकीत उदयनराजे भोसले यांची मताची टक्केवारी कमी झाली. २०१९ ला लोकसभा निवडणुकीत विजय मिळविल्यानंतर ६ महिन्यातच त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या लोकसभा खासदारकीचा राजीनामा देऊन भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. नोव्हेंबर २०१९ ला झालेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणूक काळात सातारा लोकसभा मतदार संघाची निवडणूक घेण्यात आली. या निवडणुकीत उदयराजे भोसले भारतीय जनता पक्षाकडून लोकसभेसाठी उभे राहिले. तर राष्ट्रवादी काँग्रेसने १९९९, २००४ या कालखंडात कराड लोकसभा मतदार संघातून विजयी झालेल्या श्रीनिवास पाटील यांना उमेदवारी दिली. या पोटनिवडणुकीत श्रीनिवास पाटील यांच्याकडून उदयनराजे भोसले यांचा पराभव झाला. जनतेने त्यांना नाकारले. पण सातारा लोकसभा पोट निवडणुकीत पराभूत उदयनराजे भोसले यांना भारतीय जनता पार्टीने राज्यसभेवर २०२० मध्ये खासदार म्हणून निवडून दिले. वरील विवेचन पाहता सातारा जिल्ह्यातील राजशाहीतील भोसले घराण्याच्या प्रभावामुळे पराभूत होऊन सुद्धा उदयनराजे भोसले यांना राज्यसभेवर खासदार म्हणून काम करण्याची संधी प्राप्त झाली हे प्रभावी राजकीय घराणेशाहीचे यश म्हणावे लागेल.[३०]

### ३) शिवेंद्रराजे भोसले (अभयसिंहराजेंचे चिरंजीव)

२००४ मध्ये आमदार असताना अभयसिंहराजे यांचे निधन झाले. त्यामुळे झालेल्या विधानसभेच्या पोटनिवडणुकीत शिवेंद्रराजे आमदार म्हणून निवडून आले. पुढे २००६ मध्ये झालेल्या सातारा नगरपालिकेच्या निवडणुकीनंतर सत्ता स्थापनेसाठी एकत्र आलेल्या शिवेंद्रराजे व उदयनराजे भोसले यांच्या मनोमिलनाच्या चर्चेचे वारे वाहू लागले. २००९ च्या लोकसभा निवडणूकीत नाट्यमय घडामोडीनंतर उदयनराजे भोसले राष्ट्रवादीकडून सातारा लोकसभा मतदारसंघातून निवडून आले तर २००९ च्या विधानसभा निवडणुकीत सातारा विधानसभा मतदारसंघातून शिवेंद्रराजे भोसले चांगल्या मतांनी विजयी झाले, असे सातारा जिल्ह्यातील लोकसभा व विधानसभा व नगरपालिकावर भोसले घराण्याचे वर्चस्व राहिले आहे. आज उदयनराजे यांच्याकडे वंशपरंपरागत ऐतिहासिक व राजकीय वारसा आहे तर अजिंक्यतारा सहकारी साखर कारखाना, इतर सहकारी संस्था, शिक्षण संस्था यावर शिवेंद्रराजेंचे वर्चस्व आहे. विधानसभा निवडणूकीत शिवेंद्र राजे भोसले यांनी २०१४ मध्ये दिपक पवार यांचा पराभव केला. शिवेंद्र राजे यांना ९७,९६४ मते मिळाली तर दिपक पवार यांना ५०,१५१ मते मिळाली.

शिवेंद्रराजे व उदयनराजे यांचे झालेले मनोमिलन २०१७ मधील सातारा नगरपालिकेच्या निवडणुकीत तुटले त्यांनी वेगळेच नवीन स्वतंत्र पॅनल उभे केले. नगराध्यक्ष पदासाठी झालेल्या निवडणुकीमध्ये शिवेंद्र राजेंच्या पत्नी वेदान्तीका भोसले यांचा पराभव उदयनराजे गटाच्या माधवी कदम यांनी केला. तेव्हापासून या दोन्ही गटातील सत्ता संघर्ष अधिक तीव्र बनत गेला.[३१] सातारा जिल्ह्यातील भोसले घराणे हे अशाप्रकारे सातारा शहराच्या राजकारणावर आपला प्रभाव निर्माण करून राहिले आहे. अभयसिंहराजे भोसले यांनी अजिंक्यतारा सहकारी समुहाच्या माध्यमातून अजिंक्यतारा सहकारी साखर कारखाना, सहकारी सुतगिरणी, शिक्षण संस्था, सहकारी बँका इत्यादी संस्था निर्माण करत व त्या चांगल्याप्रकारे चालवत सातारा विधानसभा मतदारसंघातील जनतेला रोजगार उपलब्ध केला. जनतेचे अनेक प्रश्न मार्गी लावले. विविध पाणीपुरवठा संस्था स्थापन करून जिरायती क्षेत्र बागायती केले व सातारा तालुक्याचा सर्वांगिण विकास केला. याचाच फायदा पुढे त्यांचे राजकीय वारस पुत्र शिवेंद्रराजे भोसले यांना होऊन ते सातारा विधानसभा मतदार संघाचे २००४ पासून सातत्याने

प्रतिनिधित्व करत मतदारसंघावर वर्चस्व प्रस्थापित करताना दिसतात. तर दुसरीकडे त्यांचेच बंधू छ. उदयन महाराज यांचा रांगडेपणा, जनसंपर्क, लोकांच्या अडी–अडचणींना सामोरे जावून त्यांचे विविध प्रश्न मार्गी लावणे, सामान्य जनतेत मिळून मिसळून वागणे, आपल्याला मिळालेल्या ऐतिहासिक वारशाचा अभिमान न बाळगता जनतेशी सतत नाळ जोडून त्यांनी सातारा जिल्ह्यामध्ये आपली जनतेचा राजा म्हणून स्वतंत्र अशी ओळख निर्माण केली आहे. त्यांना मानणारा मोठा वर्ग संपूर्ण जिल्ह्यामध्ये पहावयास मिळतो. हीच त्यांची मोठी राजकीय ताकत असून त्यावरतीच ते सातत्याने जनमाणसातून मोठ्या मताधिक्याने निवडून येतात. शिवेंद्र राजे भोसले २०१९ ला सातारा विधानसभा मतदार संघातून भारतीय जनता पार्टीकडून निवडून आले. २०१९ मध्ये सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष झाले. अभयसिंह राजे भोसले यांच्यानंतर भोसले घराण्याचा राजकीय वारसा शिवेंद्र राजे भोसले समर्थपणे सांभाळताना दिसतात. सहकारी साखर कारखाना, स्थानिक स्वराज्य संस्था, सातारा नगरपालिका, बाजार समिती, खरेदी–विक्री संघ इत्यादी संस्थांवर व सातारा विधानसभा मतदारसंघावर प्रभाव ठेऊन आहेत. या विविध संस्था चांगल्या प्रकारे चालवून आज जनसामान्यांमध्ये आदराचे स्थान भूषविले आहे.

**प्रतापराव भोसले घराणे**

काँग्रेसचे जेष्ठ नेते प्रतापराव भोसले यांनी गावच्या सरपंच पदावर कार्यरत राहून आपल्या राजकीय प्रवासास सुरवात केली. १९५८ सालापासून भुईंज ग्रामपंचायतीचे सरपंच म्हणून जवळपास सलग १० वर्षे काम पाहिले. त्यानंतर १९६७ मध्ये त्यांनी वाई खंडाळा विधानसभा मतदार संघातून प्रथम निवडणूक लढविली. या मतदार संघात १९६७ ते १९८४ पर्यंत सलग १७ वर्षे प्रतिनिधीत्व केले. १९७८ मध्ये पुलोद मंत्रीमंडळात व १९८३ मध्ये त्यांनी ग्रामविकास पुनर्वसन या खात्याचे मंत्रीपद भूषविले. पुढे यशवंतराव चव्हाण यांच्या निधनानंतर १९८५ मध्ये ते सातारा लोकसभा पोटनिवडणुकीत विजयी होऊन मतदार संघाचे प्रतिनिधित्व केले. १९८५ ते १९९६ पर्यंत सलग तीन वेळा त्यांनी सातारा लोकसभा मतदार संघाचे प्रतिनिधित्व केले. १९९६ च्या लोकसभा निवडणूकीत मात्र त्यांना पराभवाचा सामना करावा लागला. पुढे शरद पवारांचे कट्टर विरोधक म्हणून त्यांचेकडे प्रदेश काँग्रेसच्या अध्यक्षपदाची सुत्रे सोपविण्यात आली. त्यांनी सहकार क्षेत्रात ही उल्लेखनीय असे कार्य केले असून किसनवीर

सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक संचालक म्हणूनही त्यांना ओळखले जाते. प्रतापराव भोसले यांनी वाई येथे जनता शिक्षण संस्थेची निर्मिती करून सर्वसामान्यांच्या मुलांना शिक्षण घेण्याची संधी दिली.

## २) मदन भोसले (मुलगा)

प्रतापराव भोसले यांचा राजकीय वारसा त्यांचे पुत्र मदन भोसले हे पुढे चालवित असून युवक काँग्रेसच्या माध्यमातून त्यांनी आपल्या राजकीय प्रवासाला सुरवात केली. १९९५ व ९९ ची विधानसभा निवडणूक लढविण्याची संधी त्यांना मिळाली परंतु त्यांना त्यामध्ये यश आले नाही ते पराभूत झाले. पुढे २००४ च्या निवडणुकीमध्ये काँग्रेस राष्ट्रवादीतील समझोत्यानुसार वाई खंडाळ्याची जागा राष्ट्रवादीकडे गेली. त्यामुळे २००१ ते २००४ या कालावधीत सातारा जिल्हा काँग्रेस अध्यक्षपद भूषविणाऱ्या मदन भोसले यांनी काँग्रेसचा राजीनामा देऊन २००४ मध्ये वाई विधानसभा मतदारसंघात अपक्ष निवडणूक लढविली. राष्ट्रवादीच्या मकरंद पाटील यांचा पराभव करून मदन भोसले आमदार झाले. पुढे मकरंद पाटील यांचेकडून २००९ च्या विधानसभा निवडणुकीत वाई मतदारसंघात पराभवाचा सामना करावा लागला. २००४ च्या निवडणूकीमध्ये ही मकरंद पाटील यांनी त्यांचा पराभव केला. मकरंद पाटील यांना या निवडणूकीत १,०१,२१८ मते मिळाली तर मदन भोसले यांना ६६,५१६ मते मिळाली. २०१४ व २०१९ च्या विधानसभेच्या निवडणुकीत वाई मतदारसंघातून मकरंद पाटील यांच्याकडून मदन भोसले यांचा पराभव झाला. भुईंजच्या किसनवीर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन म्हणून मदन भोसले कार्यरत आहेत. त्यांनी साखर कारखान्याच्या माध्यमातून शेकडो लोकांचे आर्थिक प्रश्न सोडवून मतदार संघाचा विकास घडवून आणण्याचा प्रयत्न केला. अनेक उपक्रम राबवून कारखाना समृद्ध केला. उसाला चांगला दर देऊन सभासदांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविले. २०२१ मध्ये किसनवीर सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीमध्ये पराभव होऊन हा साखर कारखाना राष्ट्रवादीचे आमदार मकरंद पाटील यांच्याकडे गेला. तसेच महालक्ष्मी शिक्षण संस्थेची स्थापना करून मतदारसंघामधील सामान्य लोकांच्या मुलांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत मदन भोसले यांनी भारतीय जनता पक्षाकडून निवडणुक लढविली व पराभूत झाले. आज ते काँग्रेस पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते ते भारतीय जनता पार्टीचे सदस्य अशी वाटचाल करताना दिसतात. सातारा

जिल्ह्यातील सुसंस्कृत राजकारणी चेहरा म्हणून मदन भोसले यांची जिल्ह्यामध्ये स्वतंत्र ओळख आहे.[३२]

**वाईचे–पाटील घराणे**

**१) लक्ष्मणराव पाटील**

वाई तालुक्यातील बोपेगाव येथे एका शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या लक्ष्मणराव पाटील यांची बोपेगावच्या सरपंच पदापासून राजकीय प्रवासाला सुरवात झाली. वयाच्या २२ व्या वर्षी बिनविरोध सरपंचपदी निवड झालेल्या तात्यांनी शासनाच्या वेगवेगळ्या योजना गावात प्रभावीपणे राबवून गावचा विकास साधण्याचा प्रयत्न केला. तसेच पाच वर्षे सोसायटीचे चेअरमन, १९७२ मध्ये वाई तालुक्याच्या सभापती पदी सलग १० वर्षे कार्यरत होते तर १९६७ ते १९७३ या दरम्यान वाई तालुक्याच्या खरेदी–विक्री संघावर चेअरमन म्हणून काम करत त्यांनी गावासह वाई तालुक्यातील अनेक गोरगरीब व सामान्य लोकांच्या अनेक प्रश्नांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. वयाच्या २२ वर्षांपासून ते सातत्याने जनसेवेचे व्रत घेऊन वाई तालुक्यामध्ये कार्यरत होते. त्यामुळे त्यांना १९७९ ने १९९२ पर्यंत सलग १३ वर्षे सातारा जिल्हा परिषदेवर अध्यक्षपदी काम करण्याची संधी मिळाली, त्यामुळे त्यांना जिल्हा पातळीवरील प्रश्नांची जाण झाली. अध्यक्ष पदावर काम करत असताना कुटुंब नियोजनासारखे धाडसी निर्णय राबवून तात्यांनी जिल्ह्याच्या राजकारणामध्ये आपली एक स्वतंत्र अशी ओळख निर्माण केली. १९८४ ते १९९४ या कालखंडामध्ये 'महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे' अध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली. या संधीचा फायदा उठवत ग्रंथालयीन चळवळ संपूर्ण जिल्हा भर पोहचविली. दि. २१ मार्च १९८२ रोजी सातारा येथील नगर वाचनालय जिल्हा ग्रंथालय संघाचे १२ वे वार्षिक अधिवेशन आणि १८ मार्च १९८४ मध्ये रहिमतपूर येथे झालेल्या १४ व्या हिंदी वाचनालयाच्या अधिवेशनाचे अध्यक्षस्थानी विराजमान होण्याची संधी त्यांना मिळाली. या संधीचा फायदा घेत तात्यांनी वाई तालुक्यातील ग्रामपंचायतमार्फत ३० नवीन वाचनालये सुरू केली. जिल्ह्यात सर्वाधिक वाचनालये सुरू करून वाचन संस्कृतीस चालना दिल्याबद्दल तात्यांनी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचा आदर्श जिल्हा ग्रंथालय संघ म्हणून जिल्ह्यास पुरस्कार मिळवून दिला तर ग्रंथालय संघाने सन २०००–२००१ चा महात्मा फुले आदर्श कार्यकर्ता पुरस्कार दिला.[३३]

वाई पंचायत समितीच्या सभापती पदी कार्यरत असताना वाई परिसरामध्ये रस्ते, शाळा, शाळांची दुरूस्ती, वाचनालये, शाळांच्या इमारती, पिण्याच्या स्वच्छ पाण्याची सोय, शेतीसाठी पाणीपुरवठा, शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी डिझेलवर चालणारी छोटी इंजिने इत्यादी सोई– सवलती व सुधारणा ग्रामीण भागापर्यंत पोहचविण्यात तात्या यशस्वी झाले. त्यांच्या कार्याने प्रभावित होऊन संपूर्ण वाई तालुक्यासह सातारा जिल्ह्यातील तरुण कार्यकर्ता एकत्रित येऊन संघटीत होण्यास मदत झाली. तात्यांचे जनमानसात मिसळणे, कार्यकर्त्यांची आपुलकीने चौकशी करणे, त्यांच्या सुख–दुःखात सहभागी होऊन कार्यकर्त्याला ताकद देणे, अशा कार्यावर तात्यांनी अधिक भर दिला.[३४] परिणामी लक्ष्मणराव पाटील यांनी सन १९९३ ते २००२ या कालखंडामध्ये भूईंजयेथील किसनवीर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन म्हणून काम करण्याची संधी मिळाली. यापदावर काम करताना त्यांनी अनेक महत्त्वपूर्ण योजना आखल्या. चेअरमन पदाच्या कार्यकाळात त्यांनी डिस्टलरी व प्रतिदिनी ४ हजार मेट्रीक टन वाढीव गाळप शक्ती प्रकल्प पूर्ण करून कारखान्याचा नावलौकिक केला. ७४०,८०११ यासारखे कमी रिकव्हरीचे ऊस गाळप करून साखर व गॅस, मळी यांना कमी दर असतानाही त्यांनी ऊसाला प्रतिटन ९०० रूपये उच्चांकी दर देऊन ऊस उत्पादकांना मोठा दिलासा दिला. दिवाळी बोनस म्हणून कामगारांना १५ दिवसाचा पगार देण्याची परंपरा सुरू करून पावसाळ्यात ही ऊसाचे गाळप सुरू ठेवले. कारखान्याची गाळप क्षमता ४,००० मे. टन केली प्रतिदिन ३०,००० हजार लिटर्स क्षमतेचा असवली प्रकल्प दुरदृष्टीने उभा केला. याचा शेतकऱ्यांना फार मोठा फायदा झाला.[३५] लक्ष्मण पाटील यांनी केलेल्या प्रभावी कार्याची दखल घेऊन शरद पवाराच्या नेतृत्त्वात १९९९ मध्ये स्थापन झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून सातारा लोकसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी त्यांना मिळाली.

**लोकसभेत काम करण्याची संधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना झाल्यानंतर लक्ष्मणराव पाटील यांनी या पक्षात प्रवेश केला. शरद पवारांनी १९९९ मध्ये त्यांना लोकसभा निवडणुकीत सातारा लोकसभा मतदार संघातून राष्ट्रवादी काँगेस पक्षाची अधिकृत उमेदवारी दिली आणि ते निवडून आले. पुढे २००४ ला सातारा लोकसभा मतदार संघात राष्ट्रवादीकडून परत दुसऱ्यांदा ते लोकसभेवर निवडून गेले.[३६] १९९९ ते २००१ या कालखंडामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष पदी कार्यरत

होते. २००१ ते २०१८ पर्यंत सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक म्हणून त्यांनी काम पाहिले. तर २०१२ ते २०१४ या कालखंडात लक्ष्मणराव पाटील सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष होते. आपल्या खासदारकीच्या कार्यकाळामध्ये त्यांनी ग्रामीण भागामध्ये अनेक समाज मंदिरे, शाळा, इमारती, वाडी–वस्तीपर्यंत रस्ते, व्यायामशाळा, प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतून आसरे ते आंबेदरा तसेच खावली घेराकेंजळ, ओहळी यांना जोडणारा रस्ता अशी अनेक विकास कामे करून जिल्ह्यातील ग्रामीण भागाचा विकास करण्याचा प्रयत्न केला. याशिवाय पश्चिम भागातील धरण काठावरील सर्व गावांना सरकारने पाणीपुरवठा करावा, अशी मागणी करत. धरणाच्याकडेने पक्के रस्ते करून परिसरात दळणवळणाची सोय केली. याशिवाय त्यांनी सातारा जिल्हा मध्यवर्तीची शाखा काढली.[३७]

### सहकारी संस्थातील कार्य व योगदान

लक्ष्मणराव पाटील यांनी वाई तालुका सुतगिरणी स्थापनेत सहभाग होता. सातारा सहकारी शेती औद्योगिक ऊस तोडणी वाहतुक सोसायटी, किसनवीर सहकारी साखर कारखाना संस्थापक व संचालक, वसंतदादा शुगर इन्स्टिटयूट गर्व्हनिंग कौन्सिलचे सदस्य, आबासाहेब वीर समाजन्नोती प्रतिष्ठान कवठे ता. वाई उपाध्यक्ष, तसेच डी. बी. कदम प्रतिष्ठान आरळे सातारा जनता शिक्षण संस्था वाई, अध्यक्ष, विश्वस्त कमंडळू शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष आसरे ता. वाई, सन १९८० ते १९९५, २००२ पासून जिल्हा मध्यवर्ती बँकेचे चेअरमन म्हणून उत्कृष्ट कार्य १९९८ मध्ये रोहिरेश्वर शिक्षण संस्था आसरे अध्यक्ष, अशा अनेक सहकारी संस्थेतील साखर कारखाने, जिल्हा बँक, सोसायट्या शिक्षण संस्थेमध्ये संचालक पदापासून ते अध्यक्ष, चेअरमन पदावर कार्य करून आपल्या जिल्ह्यातील सर्व लोकांचा सर्वांगिण विकास घडवून आणण्यावर त्यांनी भर दिला.[३८] यातील अनेक सहकारी संस्थांची निर्मिती करून हजारो लोकांचे प्रश्न मार्गी लावत त्या संस्था समर्थपणे सांभाळल्या.

### शैक्षणिक कार्य

१९८८ मध्ये रोहिरेश्वर शिक्षण संस्था आसरे ता. वाईचा अध्यक्ष पदावर काम करत असताना पाटील यांनी शहरातील व ग्रामीण भागातील गरीब विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे म्हणून स्वखर्चातून विद्यालयासाठी जमीन खरेदी केली. डेन्मार्कच्या संस्थेकडून २८ लाख रूपयाची देणगी मिळवून इमारत बांधली १९९३ मध्ये तिचा विस्तार केला. येथे एक नवीन माध्यमिक

शाळा सुरू केली आणि ग्रामीण भागातील मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न मार्गी लावला. शाळा शिकलेल्या मुला–मुलींना शिक्षकांच्या नोकऱ्या दिल्या. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या अध्यक्षतेखाली वाईच्या प्राज्ञ पाठशाळा मंडळाने १९६२ मध्ये मानव्य व वाणिज्य महाविद्यालय वाई स्थापन केले. १५ फेब्रुवारी १९७६ मध्ये किसनवीर यांच्या मृत्यूनंतर या महाविद्यालयाचे किसनवीर महाविद्यालय असे नामकरण केले. त्यानंतर किसनवीर, प्रतापराव भोसले यांच्यानंतर या महाविद्यालयाचे उपाध्यक्ष म्हणून लक्ष्मणराव पाटील यांनी चांगल्याप्रकारे कार्य केले. त्यांच्या नेतृत्त्वामध्ये १९९३ मध्ये या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची संख्या ५,००० इतकी होती. या महाविद्यालयाने १९८३ मध्ये विज्ञान शाखा सुरू केली.[३९] अशाप्रकारे लक्ष्मणराव पाटील यांनी शिक्षण क्षेत्रासारख्या पवित्र शाखेमध्ये महत्त्वपूर्ण कार्य करून तालुक्यातील ग्रामीण व शहरी भागातील हजारो गोरगरीब शोषित उपेक्षित विद्यार्थ्यांना शिक्षण व उच्च शिक्षणाची संधी निर्माण करून दिली.

### २) मकरंद पाटील (मुलगा)

लक्ष्मणराव पाटील यांचे चिरंजीव मकरंद पाटील बोपेगाव गटातून २००२ मध्ये सातारा जिल्हा परिषदेमध्ये निवडून आले व त्यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीला सुरुवात केली. तर यांना २००४ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये वाई मतदार संघातून राष्ट्रवादीचे तिकीट दिले. परंतु बंडखोर काँग्रेस अपक्ष उमेदवार मदन भोसले यांच्याकडून त्यांना पराभव पत्करावा लागला. परंतु २००९ मध्ये मदन भोसलेंचा पराभव करून मकरंद पाटील पुन्हा विजयी झाले आणि लक्ष्मणराव पाटलांची दुसरी पिढी राजकारणात सक्रीय झाली. पुढे २०१४ मधील विधानसभेची पुन्हा निवडणूक जिंकली. या निवडणुकीत मकरंद पाटील यांना १,०१,२१८ तर मदन भोसले यांना ६२,५१६ मते मिळाली.[४०] २०१९ मध्ये तिसऱ्यांदा मकदरंद पाटील वाई विधानसभा मतदार संघातून निवडून आले. २०१९ मध्ये ते सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक झाले. तर भाऊ नितीन पाटील २०२२ पासून सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष आहेत. वडील आणि दोन मुले जिल्हा मध्यवर्ती बँकेचे एकाचवेळी संचालक असणे ही दुर्मिळ बाब म्हणावी लागले. खऱ्या अर्थाने स्थानिक स्वराज्य संस्था व सहकारी संस्था यांच्या माध्यमातून आपल्या घराण्यातून राजकीय वारस पुढे आणून राजकीय स्थीर केलेला दिसून येतो. २०२२ मध्ये किसनवीर सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत

विजयी होऊन कारखाना आपल्या ताब्यामध्ये घेतला व सहकारी संस्थेच्या माध्यमातून मतदारसंघामध्ये प्रभाव निर्माण केला. आमदार झाल्यानंतर त्यांनी शेती, वीज, पाणी, औद्योगिक अशा शेतकरी हिताच्या योजना राबवून वाई, खंडाळा व महाबळेश्वर या शहरासाठी कोट्यावधीचा निधी आणला. खंडाळा व लोणंद परिसरामध्ये अनेक लहान मोठे उद्योग सुरू करून शेकडो तरुणांच्या हाताला रोजगार मिळवून दिला. खंडाळा व महाबळेश्वर या शहरांच्या निसर्गसौंदर्याचा पर्यटन म्हणून विकास घडवून आणला. त्याचबरोबर आपल्या मतदार संघामध्ये अनेक पुल, रस्ते, धोमबलकवडी, कवठे, केंजळ, नागेवाडी येथील जललक्ष्मी योजनेसाठी मकरंद पाटील यांनी करोडो रुपयाचा निधी खर्च केला. त्यातून शेती विकास होऊन शेतकऱ्याचे आर्थिक प्रश्न सुटण्यास मोठी मदत झाली. खंडाळा टप्पा नं. २ मध्ये विस्तारीत औद्योगिक विकास करून बेरोजगार तरुणांना रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध करून दिल्या.[४१]

नागेवाडी प्रकल्प, कवठे केंजळ उपसा सिंचन योजना, पश्चिम भागातील जललक्ष्मी योजना, खंडाळा तालुक्यातील धोम बळकडी प्रकल्प, नीरा देवधर प्रकल्प, गावडेवाडी, शेखमिर वाडी, वाघोशी या तीन नवीन उपसा सिंचन योजना, महाबळेश्वर तालुक्यातील पाणलोट विकास प्रकल्प इत्यादी प्रकल्प राबविले. त्याचबरोबर कांदा ही खोरे तापोळ्याशी जोडणाऱ्या कोट्राशी रेणोशी पुलासाठी २५ कोटी अंदाजपत्रकीय तरतुद, प्रतापगडाच्या डागडुजीसाठी साडे बारा कोटींची मंजुरी मिळविली. असे अनेक प्रकल्प व योजनांच्या माध्यमातून शासनाचा मोठा निधी मिळवून मकरंद पाटील यांनी आपल्या मतदारसंघामध्ये विकासकामे केली. त्याचबरोबर केसुर्डी, लोणेन येथे ४ ते ५ मोठे उद्योग व १२८ लहान उद्योग पाटील यांच्या काळात सुरू झाले.[४२] अशा अनेक योजना, प्रकल्प व शासनाचे मोठे निधी याच्या माध्यमातून मकरंद पाटील यांनी आपल्या मतदारसंघाचा विकास केला व आपल्या मतदारसंघावर वर्चस्व निर्माण केले. खासदार असलेले वडील लक्ष्मणराव पाटील यांच्या पावलावर पाऊल ठेवून त्यांचा राजकीय वारसदार म्हणून मकरंद पाटील यांनी आमदारकीच्या माध्यमातून विकासाची गंगा आपल्या मतदार संघातील वाडी–वस्तीपर्यंत पोहचविली. लक्ष्मणराव पाटील हे १० वर्षे सभापती १३ वर्षे जिल्हा परिषद अध्यक्ष, १० वर्षे खासदार, १० वर्षे साखर कारखान्याचे चेअरमन तर मुलगा मकरंद पाटील १५ वर्ष आमदार, कारखान्याचा चेअरमन तर दुसरा मुलगा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा अध्यक्ष असने हे राजकीय घराणे राजकारणात प्रभावी असल्याचे दिसते व

संपूर्ण वाई विधानसभा मतदारसंघ यांच्यावर वर्चस्व प्रस्थापित करून आपली घराणेशाही स्थिर करताना दिसते.

**मोहिते घराणे–कराड**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या व ऐतिहासिक वारसा लाभलेल्या सातारा जिल्ह्याने भारताच्या स्वातंत्र्य पूर्व व स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये महाराष्ट्राच्या जडण–घडणीत महत्त्वाची भूमिका बजावली असून अनेक कर्तृत्त्व संपन्न नेते दिले. यशवंतराव चव्हाण, रंगो बापू, आनंदराव चव्हाण, बाळासाहेब देसाई, दादा उंडाळकर, क्रांतिसिंह नाना पाटील, किसनवीर, वसंतदादा पाटील, पी. डी. पाटील असे अनेक मातब्बर नेते उदयास आले. त्यांनी आपले सर्वस्व अर्पण करून स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये आपल्या कार्य कर्तृत्त्वाने सातारा जिल्ह्याचा नावलौकिक वाढविण्याचा सातत्याने प्रयत्न केला. त्यामध्ये 'कृष्ण काठचा कर्मयोगी', 'महाराष्ट्राचा कार्ल मार्क्स', 'सहकार महर्षी' आणि 'महाराष्ट्राचे थोर विचारवंत' म्हणून त्यांचा उल्लेख सातारा जिल्ह्यासह, संपूर्ण राज्याच्या समाजकारणात व राजकारणात होऊन त्यांनी आपली एक स्वतंत्र ओळख निर्माण केली. अशा यशवंतराव मोहिते यांच्या नावाचा अग्रक्रमाने उल्लेख करावा लागेल.

**यशवंतराव मोहिते**

७ नोव्हेंबर १९२० रोजी कराड तालुक्यातील रेठरे बुद्रुक या छोट्याशा गावात एका शेतकरी कुटुंबात यशवंतराव मोहिते यांचा जन्म झाला. प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी कोल्हापूर येथे उच्चशिक्षण पूर्ण केले. याच काळात १९४२ चे 'चले जाव'चे आंदोलन सुरू होते. या स्वातंत्र्य लढ्याच्या चळवळीमध्ये यशवंतराव मोहिते यांनी वयाच्या २२ व्या वर्षी सक्रीय सहभाग घेतला. स्वातंत्र्य लढ्याच्या संघर्षातून तावून सुलाखून निघालेल्या यशवंतराव मोहिते भाऊ यांच्या राजकीय प्रवासाला सुरवात झाली. मोहिते यांच्या जीवनावरती महात्मा फुले यांच्या सत्यशोधक समाजाच्या विचाराचा व कार्ल मार्क्सच्या साम्यवादी विचाराचा प्रभाव पडला होता. १९५२ साली ते शेतकरी कामगार पक्षाच्या अधिकृत उमेदवारीवर कराड दक्षिण विधानसभा मतदार संघातून निवडून आले. पहिल्याच अधिवेशनात महाराष्ट्राची वरदायणी असलेल्या मात्र रखडलेल्या कोयना धरणाचे काम तातडीने सुरू करण्यात यावे, असा ठराव मांडून त्याचा पाठपुरावा केला.[४३] विधानसभेत निवडून गेल्यानंतर मोहिते यांनी अगदी वर्षा दीड

वर्षामध्येच १९५४ मध्ये कृष्णा सहकारी साखर कारखान्याची निर्मिती रेठरे शिवनगर येथे केली. १९५६ साली संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावरून त्यांनी आपल्या आमदारकीचा राजीनामा दिला. परंतु पोटनिवडणुकीमध्ये ते पुन्हा बिनविरोध निवडून आले. बहुदा महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये विधानसभेला बिनविरोध निवडून येणे ही पहिलीच घटना असावी. पुढे गोवा मुक्ती संग्रामात भाग घेत मोहिते यांनी 'मजदूर किसान पक्षाची' स्थापना करण्यात पुढाकार घेतला. १९५७ च्या विधानसभेत या पक्षाने जोरदार मुसंडी मारत विजय मिळविला. याचे सर्व श्रेय यशवंतराव मोहित्यांना जाते त्यानंतर १९६० मध्ये या पक्षाचे विसर्जन करून कराड येथे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या उपस्थितीत काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश केला. जिल्ह्यातील शेतकरी व सर्वसामान्य लोकांच्यासाठी शासनाचे अनेक अभिनव उपक्रम राबून त्यांचे विविध प्रश्न मार्गी लावले.[४४]

काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश केल्यानंतर काँग्रेस पक्षाचा प्रचार आणि प्रसार करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले. काँग्रेस पक्षाची विचारसरणी तळागाळात पोहचविण्यासाठी त्यांनी अनेक प्रकारचे साहित्य लिहिले. १५–२० ग्रंथ लिहून त्या माध्यमाद्वारे काँग्रेस पक्ष सातारा जिल्ह्याच्या वाडी–वस्ती पर्यंत पोहचविला. १९६२ मध्ये चीनने भारतावर आक्रमण केले त्यावेळी यशवंतराव यांनी महाराष्ट्र भर झंझावाती दौरे करून राज्यातील तरुणांना लष्करात भरती होण्याचे भावनिक व कर्तव्यनिष्ठ आवाहन केले. अनेक ठिकाणी सैनिकी प्रशिक्षण केंद्रे उभी केली, तर अंतर्गत सुरक्षिततेसाठी राज्यात सुमारे ७० हजार होमगार्डसना ट्रेनिंग दिले व राज्यांतर्गत सुरक्षिततेचा प्रश्न यशस्वीरित्या मार्गी लावला. १९६७ च्या विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये यशवंतराव मोहिते हे प्रचंड मताधिक्क्याने निवडून आले. पुढे त्यांची कॅबिनेट मंत्री म्हणून निवड होऊन गृहनिर्माण व परिवहन ही अत्यंत महत्त्वाची खाती देण्यात आली. या पदावर कार्यरत असताना त्यांनी घर दुरूस्ती व पुनर्बांधणी मंडळाची स्थापना केली. भाडेकरूंना वंशपरंपरेने घरे वापरण्याचा हक्क दिला. याशिवाय झोपडपट्टी सुधारणा मंडळ निर्माण करून हजारो बेघर लोकांचे प्रश्न मार्गी लावले. १९६७ मध्ये सहकारमंत्री असताना सहकार क्षेत्राचा सखोल अभ्यास करून सहकार श्वेतपत्रिका तयार करून या क्षेत्राला मार्गदर्शक ठरणाऱ्या साखर संचालनालयाची स्थापना केली.[४५] यशवंतराव मोहिते महाराष्ट्र राज्याच्या मंत्रीमंडळात असताना अनेक खात्याचा पदभार चांगल्या प्रकारे सांभाळला. महाराष्ट्र राज्याचे गृहराज्य मंत्री,

शेती उपमंत्री, गृहनिर्माण मंत्री, परिवहन मंत्री, अन्न व नागरी पुरवठा मंत्री, सहकार मंत्री, वित्त व नियोजन मंत्री इत्यादी खात्याची जबाबदारी सांभाळत असताना त्यांनी अनेक लोकोपयोगी निर्णय घेतले. त्यामध्ये होमगार्डची स्थापना, सैनिकी शाळा, कृषी विद्यापीठ, राहील त्याचे घर, रस्ता तेथे एसटी, ग्रह दुरूस्ती महामंडळ, साखर संचलनालय, कापूस एकाधिकार योजना इत्यादी निर्णय घेऊन जिल्ह्यासह संपूर्ण राज्यातील लोकांचा विकास घडवून आणण्याचा प्रयत्न केला.[४६] एवढेच नव्हे तर रेठरे गावामध्ये यशवंतराव मोहिते यांनी गावातील भूमिहीन शेत मजूरांची यादी करून आपल्या जमिनीतील प्रत्येकी अर्धा एकर जमीन भूमीहिनांना ७/१२ त्यांचे नावावर करून वाटली तर जमीन मिळाल्यानंतर ती कसण्यासाठी शेतकरी पैसा कोठून आणतील या विचारातून या लोकांना त्यांच्या खात्यावर प्रत्येकी ५,००० रूपयांची मदत देऊ केली.[४७] यशवंतराव मोहिते यांनी आपल्या राजकीय कारकीर्दीत स्थापन केलेल्या सहकारी संस्था व त्यामधील त्यांचे उल्लेखनीय कार्य दर्शविण्यासाठी पुढील तक्त्याचा आधार घेण्यात आला आहे.

**तक्ता क्र. ४.९**
**यशवंतराव मोहिते यांनी स्थापन केलेल्या संस्था व कार्य**

| अ. नं. | संस्थांचे नाव व कार्य |
|---|---|
| १. | द्रष्टा मासिकाचे संपादक. |
| २. | तालीम संघाची स्थापना, कोल्हापूर. |
| ३. | दास्य विमाचेन दलाची स्थापना. |
| ४. | चले जाव आंदोलनात सहभाग. |
| ५. | शेतकरी कामगार पक्षाचे आमदार म्हणून विधानसभेत कराड द. मतदार संघाचे प्रतिनिधित्व, दरम्यान कोयना धरणाच्या ठरावाला मंजुरी, कसेल त्याची जमीन व राहिल त्याचे घर या मुळ कायद्याचा आग्रह, संयुक्त महाराष्ट्र निर्मीतीचा ठराव व मांडणी. |
| ६. | कृष्णा कारखान्याची स्थापना व उभारणीस प्रारंभ. |
| ७. | पं. नेहरूंच्या उपस्थितीत काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश. |
| ८. | सैनिक भरती, सैनिक शाळा, मुंबई होमगार्डची स्थापना. |

| अ. नं. | **संस्थांचे नाव व कार्य** |
|---|---|
| ९. | कृषी विद्यापीठाचे विस्तारीकरण, आरे मिल्क दुध डेअरीचे विस्तारीकरण व मॅफकोची स्थापना. |
| १०. | गृह निर्माण मंत्री असताना घर दुरूस्ती कायदा, एम आय जी कॉलनी, गलिच्छ वस्ती सुधारणा कायद्याची निर्मिती. |
| ११. | परिवहन मंत्री असताना एस. टी. महामंडळाचे नियोजन व पुर्नरचना, गाव तेथे रस्ता, गाव तेथे एस. टी. ची अंमलबजावणी. |
| १२. | अन्न व नागरी मंत्री असताना दुष्काळावर मात करण्यासाठी पंजाब व इतर राज्यातून धान्य पुरवठा करण्याचे नियोजन. |
| १३. | सहकार मंत्री असताना साखर कारखानदारीला मोठ्या प्रमाणावर चालना देत संख्यात्मक वृद्धी केली. |
| १४. | श्वेतपत्रिका प्रसिद्ध करून आधुनिक व नियोजनबद्ध सहकाराची महाराष्ट्रभर पायाभरणी. |
| १५. | कापूस एकाधिकार योजना यशस्वी केली. |
| १६. | शहरी व शेती कमाल जमीन धारणा कायद्यामध्ये भूमिका. |
| १७. | शुगर केन इन महाराष्ट्र या रेफरन्स पुस्तकाचे लेखन. |
| १८. | करमाळा, कार्ला, महाबळेश्वर व पन्हाळा येथील शिबीरामध्ये परिवर्तनवादी पुरोगामी विचारांची मांडणी करून कॉँग्रेस पक्षाला समाजवादी लोकाभिमुख वळण देण्याचे कार्य. |
| १९. | भारती विद्यापीठाच्या स्थापनेपासून तह्यात अध्यक्षपद. |
| २०. | वित्त नियोजन मंत्री असताना राज्याचे पहिले दोन शिलकी अर्थसंकल्प सादर केले व मोठ्या प्रमाणात लिफ्ट इरिगेशन योजनांच्या निर्मितीसाठी आर्थिक तरतुद केली. |
| २१. | कराड लोकसभा मतदार संघातून प्रतिनिधित्त्व. |
| २२. | राजकीय निवृत्ती. |

| अ. नं. | संस्थांचे नाव व कार्य |
|---|---|
| २३. | यशवंतराव मोहिते सलग २८ वर्षे आमदार व १८ वर्षे मंत्रीमंडळात कार्यरत होते. |

४८

## यशवंतराव मोहिते यांचे लोकोपयोगी कार्य

यशवंतराव मोहिते यांनी शेती व्यवसायाला नवी दिशा देण्यासाठी 'शेती–दिशा, व्याप्ती आणि प्राप्ती' या नावाचे पुस्तक लिहिले. शेती मालाला योग्य भाव मिळावा व शेतकऱ्यांची व्यापाऱ्याकडून लूट होऊ नये, म्हणून त्यांनी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केले. हातमाग, यंत्रमाग याचा विकास होऊन ग्रामीण भागातील तरुणांच्या हाताला रोजगार मिळावा. या भूमिकेतून त्यांनी यंत्रमाग व हातमाग महामंडळाची स्थापना केली आणि महाराष्ट्रात पाच ठिकाणी यंत्रमागाचे मोठे प्रकल्प उभे केले. वस्त्रोद्योगाला चालना देण्यासाठी त्यांनी १५ हून अधिक सुत गिरण्यांची निर्मिती केली. कृषी उत्पन्न बाजार समितीची पुनर्रचना करून त्या शेतकऱ्यांना संरक्षण देणाऱ्या व्यापारी संस्था बनविण्याचा उपक्रम हाती घेतला.

## शैक्षणिक कार्य

यशवंतराव मोहिते यांनी सहकाराबरोबरच शैक्षणिक क्षेत्रात ही मोठे योगदान दिले आहे. राजकारणाबरोबरच शिक्षण क्षेत्रात ही आपल्या कार्याचा महाराष्ट्र भर ठसा उमटविला आहे. राजकारणात सक्रीय झाल्यानंतर त्यांनी 'शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाची' स्थापना केली. काही काळ ते या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ही होते. कृष्ण चॅरिटेबल ट्रस्ट स्थापनेत ही त्यांचा मोठा सहभाग होता. १९६४ मध्ये डॉ. पतंगराव कदम यांनी स्थापन केलेल्या भारती विद्यापीठाच्या स्थापनेत ही त्यांचा सहभाग होता. त्यावेळी ते या विद्यापीठाचे अध्यक्ष होते. पन्हाळा येथील आयोजित शिबीरामध्ये मोहिते यांनी शिक्षणविषयक विचार मांडून शिक्षण क्षेत्रामध्ये सुधारणा झाल्या पाहिजेत आणि त्यासाठी पाठपुरावा केला पाहिजे असे विचार मांडले. महाराष्ट्रामधील चार कृषी विद्यापीठ स्थापण्यात त्यांचा पुढाकार होता. तसेच आपल्या कराड दक्षिण मतदार संघामधील रेठरे, वाठार व शिवनगर कारखाना या ठिकाणी त्यांनी कृष्ण महाविद्यालय, कृष्णा फाउंडेशनच्या माध्यमातून इंग्रजी शाळा, तंत्र व्यवस्थापन शिक्षणाची विविध दालने, केंद्रीय विद्यालये, अभियांत्रिकी महाविद्यालये, छ. संभाजी विद्यालय व प्राथमिक

विभाग, सौ. ताराबाई माधवराव मोहिते विद्यालय, जयमाला जयवंतराव इंग्लिश स्कूल व इंग्रजी मराठी माध्यमांची शिशु विहार मंदिरे अशी अनेक महाविद्यालये, मराठी, इंग्रजी माध्यमाच्या शाळांची निर्मिती करून तालुक्यातीलच नव्हे तर राज्यातील गोरगरीब विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी रेठरेसारख्या एका ग्रामीण भागात निर्माण करून दिली. सन १९८० च्या दशकात त्यांनी कराड येथे कृष्णा कारखान्याच्या माध्यमातून जयवंतराव भोसले यांना सोबत घेऊन कृष्णा हॉस्पीटल चॅरिटेबल ट्रस्टची स्थापना केली याचे रूपांतर पुढे कृष्णा हॉस्पिटल, कृष्ण इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस हे मेडीकल कॉलेज काढले. सध्या ही संस्था अभिमत विद्यापीठ म्हणून नावारूपाला आली.[४१] या विद्यापीठात देश–विदेशातील हजारो तरुण डॉक्टर होऊ लागले आहेत.

## २) जयवंतराव भोसले

२२ डिसेंबर १९२४ रोजी कराड तालुक्यातील रेठरे बुद्रुकच्या या छोट्याशा गावात शेतकरी कुटुंबात जयवंतराव भोसले (आप्पा) यांचा जन्म झाला. त्यांनी आपल्या कर्तृत्त्वाने व बंधू यशवंतराव मोहिते यांच्या सहकार्याने कराड तालुक्यातील परिसराचा सर्वांगिण विकास घडवून आणला. कराड तालुक्यातील भकास व ओसाड जमिनीचा भूभाग सुविधा अभावी रूक्ष झाला होता. अशा वेळी जयवंतराव भोसले यांनी आपले बंधू यशवंतराव यांच्या सहकार्याने सहकाराच्या माध्यमातून औद्योगिक साम्राज्य उभे केले. महाराष्ट्राचे थोर विचारवंत यशवंतराव मोहिते यांनी मंत्रीपदाची जबाबदारी स्वीकारली. त्यामुळे या परिसराचा विकास करण्याची जबाबदारी जयवंतराव भोसले यांच्याकडे आली. असामान्य बुद्धीमत्ता, अचाट कर्तृत्त्व, दुरदृष्टी लाभलेल्या जयवंतरावांनी सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक, औद्योगिक सहकार क्षेत्रात नेत्रदिपक कार्य करून या भागातील शेकडो गरीब शेतकऱ्यांच्या, कामगारांच्या जीवनात समृद्धी निर्माण केली. कृष्णा सहकारी साखर कारखान्याची सुत्रे हातात आल्यानंतर त्यांनी तालुक्यासह जिल्ह्यातील हजारो लोकांचे सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक प्रश्न कारखान्याच्या माध्यमातून सोडविले. जयवंतराव भोसले राजकारणात यशस्वी झालेले दिसत नाहीत. त्यांनी १९९६ मध्ये शिवसेना पुरस्कृत कराड लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढविली. पण त्यांचा पराभव झाला. तरी त्यांनी विविध सहकारी संस्था निर्माण करून त्या यशस्वी चालवून कराडच्या विकासात मोलाचे योगदान दिले.

कृष्णा कारखाना सुरू होण्यापूर्वी येथील ग्रामीण भागातील शेतीची व शेतकऱ्यांची दयनीय अशी अवस्था होती. या भागातील अगदी थोडीच जमीन पाण्याखाली होती. त्यामुळे थोड्या प्रमाणावर ऊस, हळद व भाजीपाला पीक घेतले जात होते. ऊसाचे गुऱ्हाळासाठी गाळप होत होते. त्यातून शेतकऱ्याचा खर्च ही भागत नव्हता. अशावेळी जयवंतरावांनी १९६० मध्ये कारखान्याची सर्व जबाबदारी चेअरमन या नात्याने आपल्याकडे घेतली आणि सुरवातीस १२५० मे. टन गाळप क्षमता असलेला कृष्णा कारखाना ५००० मे. टन गाळप क्षमतेवर नेला आणि कृष्णा कारखान्याला महाराष्ट्रातच नव्हे तर आशिया खंडातील सर्वांत मोठा व आर्थिकदृष्ट्या सक्षम कारखाना अशी कारखान्याची ओळख निर्माण केली. परिणामी कारखाना परिसरातील सामान्य जनतेला उदरनिर्वाहाचा, आर्थिक प्रगतीचा एक मार्ग मिळाला. हजारो लोकांच्या हाताला काम मिळून हजारो संसार उभे राहण्यास मदत झाली. शेतकऱ्यांची जास्तीत जास्त जमीन ओलिताखाली येण्यासाठी १७ उपसा जलसिंचन योजना उभ्या केल्या. त्यामुळे कृष्णेच्या परिसरातील ७२,००० एकर जमिनी ओलीताखाली आल्या. या प्रकल्पासाठी त्यांनी शासनाचा एक रुपया ही अनुदान न घेता शेतकरी बँक व कारखाना असा त्रिपक्षीय करार करून सर्व योजना उभ्या केल्या. त्यामुळे कला, क्रिडा, काव्य, नाट्य, राजकारण, कारखानदारी, तत्त्वज्ञान व लोकसेवा, प्रशासन याबाबतीत कृष्णा काठ समृद्ध झाला आहे.

तत्कालीन कालखंडामध्ये ऊसाची ने–आण करण्यासाठी कृष्णा नदीवर पुल नव्हता अशावेळी त्यांनी गळीत हंगाम काळात नदीवर लाकडी पुलाची निर्मिती केली. याचा उपयोग जवळपास १६ वर्षे त्यांनी करून घेतला. १९८३ साली ग्रामीण विकास विश्वस्त संघाची (छापखाना) स्थापन केली. शेतकऱ्यांना जोड व्यवसाय करता यावा यासाठी त्यांनी १९६२ साली मयुर कुक्कुटपालन संस्थेची स्थापना केली. तसेच वराहपालन, संकरीत गोपालनास प्रोत्साहन दिले तर ऊस वाहतुक करण्यासाठी त्यांनी टायरच्या बैलगाडीची निर्मिती केली. हा प्रयोग महाराष्ट्रामध्ये पहिल्यांदा त्यांनी सुरू केला. शेतकऱ्यांना बँकींगची माहिती व्हावी म्हणून १९७१ मध्ये कृष्ण सहकारी बँका निर्माण केल्या. त्याचबरोबर १९७९ मध्ये पशुखाद्य निर्मिती, बचत गट, महिला औद्योगिक उत्पादन संस्था, कृष्णा नागरी पतसंस्था, मागासवर्गीय गारमेंटस्, मागासवर्गीय अॅटोलूम इत्यादी सहकारी संस्थांची निर्मिती करून लोकांचे अनेक प्रश्न मार्गी

लावण्याचा त्यांनी यशस्वी प्रयत्न केला.[५०] त्यांनी आपल्या कारकीर्दीमध्ये कारखान्याच्या माध्यमातून केलेल्या विकास कामाचा आढावा पुढील तक्त्याच्या आधारे स्पष्ट केला आहे.

| अ. नं. | साल | स्थापन केलेल्या संस्था व कार्य |
|---|---|---|
| १. | १९६० पासून | १२५० ते ५००० मे. टनापर्यंत गाळप क्षमता विस्तार. |
| २. | १९६७ पासून | १७ जलसिंचन योजना उभारून ७० एकर क्षेत्र ओलीताखाली आणले. |
| ३. | १९६९ पासून | महाराष्ट्रात प्रथम टायर बैलगाडीची निर्मिती व ऊस वाहतुक. |
| ४. | १९७१ पासून | डिस्टीलरीची स्थापना. |
| ५. | १९८० पासून | सभासदांना २ रूपये प्रति किलो प्रमाणे साखर वाटप. |
| ६. | | सलग २० वर्षे महाराष्ट्रातून उच्चांकी दर दिला. |
| ७. | १९८४ | ॲसीटोन प्रकल्प उभारणी. |
| ८. | | आशिया खंडातील सर्वांत मोठा व आर्थिकदृष्ट्या सक्षम कारखाना अशी कारखान्याची ओळख निर्माण केली. |
| ९. | १९८४ | कृष्णा वैद्यकीय महाविद्यालय |
| १०. | १९८५ | नर्सिंग कॉलेज |

### ३) सुरेश जयवंतराव भोसलेंचा मुलगा व यशवंतरावांचा पुतण्या

यशवंतराव मोहिते यांचा राजकीय वारस म्हणून जयवंतराव भोसले यांनी कारखान्याच्या माध्यमातून अनेक विकास कामे करून घराण्याचे नाव सतत चर्चेत ठेवले. त्यानंतर त्यांची तिसरी पीढी मोहिते घराण्याचा वारसा सुरेश भोसले चालवत आहेत. जयवंतराव भोसले यांच्यानंतर कारखान्याची व एकूणच कृष्णा उद्योग समुहाची जबाबदारी डॉ. सुरेश भोसले यांचेकडे आली. त्यांनी केलेली विकास कामे पुढील तक्त्याच्या आधारे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

| अ. नं. | साल | स्थापन केलेल्या संस्था व कार्य |
|---|---|---|
| १. | १९९९ | कोणत्याही कर्जाशिवाय ५००० वरून ७२,००० मे. टनापर्यंत गाळप क्षमता विस्तार. |
| २. | १९९९ | कंपोस्ट खत निर्मिती, एकरी १०० टन योजना यशस्वीपणे राबविली. |
| ३. | २००१ | डिस्टीकरी व कंट्री लिकर विस्तार, कृष्णा कृषी महाविद्यालय स्थापना–२००३. |
| ४. | २००२ | इथेनॉल निर्मितीस सुरवात–श्री. गणेश मंदिराची प्रतिष्ठापणा. |
| ५. | २००४ | सभासद शेतकऱ्यांना इरिगेशन कर्ज माफी. सर्व इरिगेशन योजना कर्जमुक्त करीत आणल्या. |
| ६. | २००६ | कामावरून कमी केलेल्या ५०० कर्मचाऱ्यांना पुन्हा सेवेत समाविष्ट करून घेतले. |

५१

यशवंतराव मोहिते यांची तिसरी पिढी, जयवंतराव भोसले, सुरेश भोसले व नातू अतुल भोसले याच्या रूपाने पुढे आली. त्यांनी सहकार क्षेत्रामध्ये अनेक आधुनिक बदल करून हजारो लोकांच्या हाताला रोजगार मिळवून दिला. साखर कारखान्याच्या माध्यमातून शाळा, महाविद्यालये, इंग्रजी शाळा, शेती शाळा निर्माण करून भागातील सर्वसामान्य माणसाचा आर्थिक सामाजिक प्रतिष्ठा उंचावण्याचे महत्त्वपूर्ण काम केले. जलसिंचनामुळे शेकडो एकर जमीनी पाण्याखाली आल्या. शेतकऱ्यांच्या हाताला काम व शेतमालाला योग्य भाव यामुळे शेतकऱ्याच्या खिशात पैसा येऊ लागला. एके काळी सायकलवरून फिरणारा व बैल गाडीने प्रवास करणारा ग्रामीण भागातील गरीब शेतकरी सायकल ऐवजी मोटारसायकलवरून फिरू लागला. बैलगाडीऐवजी त्याच्या दारात आज लाखो रूपयाच्या महागड्या फोर व्हिलर गाड्या उभ्या राहिल्या. पूर्वी शेतकरी गाडग्या मडवयात पैसा साठवायचा. आज यशवंतराव मोहित्यांच्या वारसदारांनी पतसंस्था, कृष्णा सारखी बँक निर्माण केल्यामुळे बँकींग व्यवहाराची सवय शेतकऱ्याला लागली. आजचा शेतकरी आपल्या कष्टाची रक्कम या बँकेत ठेवू लागला. तत्कालीन समाजामध्ये एखाद्याला गंभीर आजार झाला तर त्याला मृत्यूशिवाय दुसरा मार्ग

नव्हता. परंतु मोहिते यांच्या सहकार्याने जयवंतराव यांनी कृष्णा मेडीकल कॉलेज व हॉस्पीटलची निर्मिती केल्यामुळे राज्यातील लाखो लोकांचे जीव वाचण्यास फार मोठी मदत झाली. गावापासून थोड्या अंतरावर औषधोपचाराची सोय झाल्याने या भागातील जनता आरोग्याच्या बाबतीत निचिंतीत झाली आहे. असे अनेक विकास कामे करून मोहिते घराण्याने महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यामुळे या भागावर या घराण्याचे वर्चस्व निर्माण झाले आहे. असे असले तरी राजकारणामध्ये मात्र हे घराणे टिकू शकले नाही हे मात्र खरे आहे.

यशवंतरावांचे बंधू जयवंतराव भोसले हे १९९६ च्या निवडणुकीत शिवसेनेकडून कराड लोकसभामतदार संघातून उभे राहिले परंतु त्यांना पराभव स्वीकारावा लागला. त्यापूर्वी ते १९८० ते १९८२ या काळात विधानपरिषदेवर होते. यशवंतरावाचे पुत्र डॉ. इंद्रजीत मोहिते हे १९९५ व १९९९ मध्ये कराड दक्षिण विधानसभा मतदार संघातून विलासराव पाटील उंडाळकर यांच्याकडून पराभूत झाले. मोहिते व भोसले घराण्याची तिसरी पिढी पीढी अतुल भोसले हे नेतृत्त्व करत असून २००९ मध्ये विधानसभा निवडणुकीत कराड उत्तर मतदार संघातून राष्ट्रवादी काँग्रेसकडून निवडणूक लढविली. पण अपक्ष उमेदवार बाळासाहेब पाटील यांच्याकडून त्यांचा पराभव झाला. पुढे २०१४ ते २०१९ विधानसभा निवडणुकीत त्यांनी भारतीय भारतीय जनता पक्षाकडून कराड दक्षिण मतदारसंघातून निवडणूक लढविली. पण महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्याकडून अतुल भोसले यांचा पराभव झाला. ते सद्या भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून जिल्ह्याच्या व राज्याच्या राजकारणात सक्रीय आहेत. कृष्णा सहकारी साखर कारखान्याचे निवडणूक जिंकून त्यांनी आपली नेतृत्त्व सिद्ध केले आहे. सहकारी संस्था व स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या माध्यमातून विजय संपादन करत कराड दक्षिण विधानसभा मतदार संघाचे प्रभावी नेतृत्त्व म्हणून अतुल भोसले पुढे येत आहेत.[५२] असे मोहिते घराण्याचे राजकीय कारकीर्दीचे स्वरूप राहिले आहे. यशवंतराव मोहिते यांचासारखा विचारवंत त्यांनी व त्यांच्या घराण्यातील वारसदारांनी केलेल्या विकास कामांचा विचार करता या घराण्याला कराड दक्षिण विधानसभा मतदार संघाच्या मतदारांनी स्पष्ट नाकारल्याचे दिसते. या घराण्यासारखे विकास कामे तालुक्यातील कोणत्याही राजकीय पुढाऱ्यास करता आले नाही. हे जरी खरे असले तरी आज महाराष्ट्राच्या राजकारणामधून मोहिते घराणे बाजूला पडले

असल्याचे दिसते. अतुल भोसले यांच्या माध्यमातून मोहिते–भोसले घराणे काही प्रमाणात राजकारणात प्रभावी होण्याचा प्रयत्न करताना दिसते.

**कराडचे चव्हाण घराणे**

सातारा जिल्ह्यातील मोहिते घराणे, देसाई घराणे, पाटील घराणे यांच्यानंतर चव्हाण घराण्याने महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळापासून ते आज अखेरपर्यंत आपल्या स्वकर्तृत्त्वाने कराड लोकसभा मतदार संघाचे प्रतिनिधित्व करत महाराष्ट्राच्या व देशाच्या राजकारणात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली. त्या घराण्यामध्ये सर्वांत मोठे राजकीय घराणे म्हणून कुंभारगाव ता. पाटण येथील चव्हाण घराण्याला ओळखले जाते. या घराण्यातील आनंदराव चव्हाण, प्रेमलाताई व त्यांचे पुत्र महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांचा उल्लेख करावा लागेल. काँग्रेसच्या गांधी घराण्याचे निष्ठावान, स्थानिक राजकारणापेक्षा दिल्लीच्या राजकारणात अधिक रस असलेले घराणे म्हणून ही त्यांना ओळखले जाते. १९५६ पासून हे घराणे गांधी घराण्याशी एकनिष्ठ राहिले असून त्यांच्या राजकीय कारकीर्दीचा आढावा पुढीलप्रमाणे घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**१) आनंदराव चव्हाण**

१९४१ ते ५१ या कालखंडात आनंदराव चव्हाण यांनी जिल्हा लोकल बोर्डावर काम करत. शेतकरी कामगार पक्षातून आपल्या राजकीय प्रवासास सुरवात केली. आनंदराव चव्हाण १९५४ ते १९५५ मुंबई विधानपरिषदेचे सदस्य होते. १९५७ साली कराड लोकसभा मतदारसंघातून त्यांनी शेतकरी कामगार पक्षामधून निवडणूक लढविली व तासगावचे रामानंद भारती सांगली जिल्ह्याचे काँग्रेस अध्यक्ष याचा मोठ्या फरकाने पराभव केला. पुढे यशवंतराव चव्हाण आणि पंडित नेहरू यांच्या विनंतीला मान देऊन आनंदराव चव्हाण यांनी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश केला त्यामुळे त्यांना उपसंरक्षण मंत्रीपदी काम करण्याची संधी मिळाली. त्यानंतर त्यांनी केंद्रीय मंत्रीमंडळामध्ये पेट्रोलिअम राज्यमंत्री, कृषी राज्यमंत्री, कंपनी अफेअर या महत्त्वाच्या खात्याची जबाबदारी यशस्वीरित्या सांभाळली. १९५७, ६२, ६७, ७२ च्या लोकसभा निवडणुकीत आनंदराव चव्हाण कराड लोकसभा मतदारसंघातून निवडून गेले. पेट्रोलिअम मंत्री असताना १९७३ मध्ये त्यांचे निधन झाले.

### २) प्रेमलाताई चव्हाण–पत्नी

आनंदराव चव्हाण यांच्या निधनानंतर १९७३ ला कराड मतदारसंघातून पोटनिवडणुकीमध्ये त्यांच्या पत्नी प्रेमलाताई चव्हाण या लोकसभेला बिनविरोध निवडून आल्या. पुढे १९७७, १९८४ मध्ये त्या पुन्हा निवडून आल्या. पुढे १९७८–८० या कालखंडामध्ये महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्षपदी सक्रीय राहिल्या. १९७८ च्या निवडणूका त्यांच्या नेतृत्त्वाखाली होऊन काँग्रेसचे २२० आमदार निवडून आले. १९८० मध्ये प्रेमलाताई चव्हाण काँग्रेस पक्षाकडून राज्यसभेवर निवडून गेल्या. १९८४ व १९८९ च्या लोकसभा निवडणुकीत त्या मोठ्या मताधिक्क्याने कराड लोकसभा मतदारसंघातून निवडून गेल्या.

### ३) पृथ्वीराज चव्हाण–मुलगा

आनंदराव चव्हाण व प्रेमलाताई यांचे चिरंजीव पृथ्वीराज चव्हाण हे चव्हाण घराण्याची तिसरी पिढी राजकारणात सक्रीय आहे. त्यांनी आमदार, खासदार या पदासह केंद्रीय मंत्रीमंडळात व महाराष्ट्र राज्याचे स्वच्छ प्रतिमेचे मुख्यमंत्री म्हणूनही मोठी कामगिरी बजावली आहे. ते १९९१ मध्ये कराड लोकसभा मतदार संघातून ९१,००० इतक्या मताधिक्याने निवडून आले व आपल्या राजकीय प्रवासाची सुरवात केली. १९९६ व १९९८ ची लोकसभा सुद्धा त्यांनी जिंकली. १९९९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या स्थापनेनंतर झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये मात्र श्रीनिवास पाटील यांच्याकडून त्यांना पराभवाला सामोरे जावे लागले. परंतु गांधी घराच्या निष्ठेमुळे त्यांना काँग्रेस पक्षाचे प्रवक्ते पद मिळाले. २००२ ते २००८ पर्यंत ते राज्यसभेवर खासदार होते. पुढे २००४ ते २००९ मध्ये पंतप्रधान मनमोहन सिंग मंत्रीमंडळामध्ये ते प्रधानमंत्री कार्यालयाचे मंत्री होते. २००९ मध्ये पुन्हा केंद्रीय मंत्रीमंडळामध्ये संसदीय कार्य राज्यमंत्री म्हणून त्यांचा समावेश झाला. महाराष्ट्रात आदर्श सोसायटी घोटाळा प्रकरणावरून मोठे वादळ निर्माण झाले त्यावेळी पक्ष श्रेष्ठींनी काँग्रेसची डागाळलेली प्रतिमा सावरण्यासाठी निष्कलंक चारित्र्य असलेल्या पृथ्वीराज चव्हाण यांना महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री पदी काम करण्याची संधी दिली.[५३] या पार्श्वभूमीवर चव्हाण घराण्याने १९५४ ते आज अखेरपर्यंत गांधी घराण्याशी एकनिष्ठ राहून राजकारणामध्ये कसा दबदबा निर्माण केला त्याचा तक्त्याच्या रूपाने आढावा घेण्यात आला आहे.

**तक्ता क्र. ४.१०**

**आनंदराव चव्हाण कराड लोकसभा मतदारसंघ**

| अ. नं. | साल | उमेदवाराचे नाव | पक्ष | विजयी–पराभूत | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १. | १९५७ | श्री. आनंदराव चव्हाण<br>स्वामी दयानंद माळी | शे. का. प.<br>काँग्रेस | विजयी<br>पराभूत | – |
| २. | १९६२ | आनंदराव चव्हाण<br>पाटील आत्माराम नाना | भा. रा. काँग्रेस<br>शे. का. प. | विजयी<br>पराभूत | ६९.३८%<br>२७.९२% |
| ३. | १९६७ | आनंदराव चव्हाण<br>पाटील आत्माराम नाना | भा. रा. काँग्रेस<br>शे. का. प. | विजयी<br>पराभूत | ७२.२४%<br>२०.५१% |
| ४. | १९७२ | आनंदराव चव्हाण<br>विठ्ठल रामचंद्र बारवडे | भा. रा. काँग्रेस<br>अपक्ष | विजयी<br>पराभूत | ८३.७१%<br>०६.३२% |

५४

आनंदराव चव्हाण १९५४ ते १९७१ पर्यंत सलग पाच वेळा लोकसभेवर प्रचंड बहुमताने निवडून गेले ते सलग २५ वर्षे ते खासदार म्हणून कराड मतदार संघाचे नेतृत्त्व करत होते. १९७५ ते १९७७ या कालखंडामध्ये इंदिरा गांधी यांनी आणीबाणी जाहीर केली. त्यावेळी सबंध भारतभर काँग्रेस विरोधी लाट होती. तरी कराड तालुक्यासह संपूर्ण सातारा जिल्ह्यातील लोकमत काँग्रेसच्या बाजूने होते ते राखण्यात चव्हाण घराण्याचा सिंहाचा वाटा होता. आनंदराव चव्हाणांच्या मृत्यूनंतर ही हा काँग्रेसचा बालेकिल्ला त्यांच्या पत्नी श्रीमती प्रेमलाताई आनंदराव चव्हाण यांनी लोकसभेची निवडणूक बिनविरोध जिंकून व पुढे तसेच विजयी सातत्य ठेवून कराड लोकसभा मतदारसंघावर वर्चस्व ठेवले.

**पत्नी – प्रेमलाताई चव्हाण (कराड लोकसभा मतदारसंघ)**

| अ. नं. | साल | उमेदवाराचे नाव | पक्ष | विजयी–पराभूत | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १. | १९७३ | प्रेमलाताई चव्हाण | काँग्रेस | बिनविरोध | विजयी |
| १. | १९७७ | श्रीमती प्रेमलाताई चव्हाण<br>भाऊसाहेब देसाई | भा. रा. काँग्रेस<br>शे. का. प. | विजयी<br>पराभूत | ७४.०९%<br>२२.०८% |
| २. | १९८० | यशवंतराव मोहिते<br>विलासराव पाटील | भा. रा. काँग्रेस<br>काँग्रेस | विजयी<br>पराभूत | ५०.३१%<br>४४.९९% |
| ३. | १९८४ | प्रेमलाताई चव्हाण | काँग्रेस आय | विजयी | ८३.०९% |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | युनुस कच्छी | जनता पक्ष | पराभूत | १४.७०% |
| ४. | १९८९ | प्रेमलाताई चव्हाण<br>नागनाथ नायकवडी | काँग्रेस आय<br>अपक्ष | विजयी<br>पराभूत | ६०.१९%<br>२६.०६% |

५५

पुढे काँग्रेस पक्ष हा घराणेशाहीला पाठबळ देतो असे आरोप सबंध देशामधून व्हायला सुरवात झाली. हिच परिस्थिती सातारा जिल्ह्यामध्ये होती. परिणामी १९८० मध्ये प्रेमलाताई चव्हाण यांना काँग्रेसने उमेदवारी न देता कराडचे यशवंतराव मोहिते यांना काँग्रेस पक्षाने लोकसभेची उमेदवारी दिली.

१९८० मध्ये प्रेमलाताई यांची राज्यसभेवर खासदार म्हणून निवड झाली. पुन्हा १९८४ मध्ये काँग्रेस पक्षाने प्रेमलाताई चव्हाण यांना कराड लोकसभा मतदारसंघाची उमेदवारी दिली. त्यामध्ये त्या प्रचंड मताधिक्याने निवडून आल्याचे दिसते. पुढे १९८९ च्या लोकसभा निवडणुकीत त्या पुन्हा निवडून आल्या. त्यांनी पुढे राजकीय निवृत्ती स्वीकारली. १९९१ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाने प्रेमलाताई चव्हाण यांचे पुत्र पृथ्वीराज चव्हाण यांना कराड लोकसभा समतदारसंघाची उमेदवारी दिली व ते निवडूनही आले. १९९१, १९९६, १९९८ सलग तीन वेळा पृथ्वीराज चव्हाण यांनी कराड लोकसभा मतदार संघाचे प्रतिनिधित्व केले.

**मुलगा – पृथ्वीराज चव्हाण (कराड लोकसभा मतदारसंघ)**

| अ. नं. | साल | उमेदवाराचे नाव | पक्ष | विजयी–पराभूत | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १. | १९९१ | पृथ्वीराज चव्हाण<br>नागनाथ नायकवडी | भा. रा. काँग्रेस<br>अपक्ष | विजयी<br>पराभूत | ५३.७४%<br>३४.५८% |
| २. | १९९६ | पृथ्वीराज चव्हाण<br>नागनाथ नायकवडी | भा. रा. काँग्रेस<br>समाजवादी पार्टी | विजयी<br>पराभूत | ४९.३६%<br>१५.७५% |
| ३. | १९९८ | पृथ्वीराज चव्हाण<br>जयवंतराव कृष्णा भोसले | भा. रा. काँग्रेस<br>शिवसेना | विजयी<br>पराभूत | ६९.०१%<br>३४.५८% |
| ४. | १९९९ | पृथ्वीराज चव्हाण<br>श्रीनिवास दादासो पाटील | भा. रा. काँग्रेस<br>राष्ट्रवादी काँग्रेस | पराभूत<br>विजयी | ३१%<br>४७.७६% |

१९९९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना झाली आणि महाराष्ट्र अस्मिता जागृत होऊन संपूर्ण सातारा जिल्ह्यामध्ये शरद पवारांच्या विचाराची एक लाट निर्माण झाली. याचा

फटका काँग्रेस पक्षाला बसून पृथ्वीराज चव्हाण लोकसभा निवडणुकीमध्ये पराभूत झाले आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे श्रीनिवास पाटील हे कराड लोकसभा मतदारसंघातून निवडून आले. काँग्रेस पक्षाने पृथ्वीराज चव्हाणांना २००२ ते २००६ व २००८ ते २०१० या कालखंडामध्ये राज्यसभेवर घेतले तर २०१० ते २०१४ पर्यंत विधान परिषदेवर घेतले आणि २०१० मध्ये महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री म्हणून संधी दिली. नंतर २०१४ ते २०१९ मध्ये त्यांना कराड दक्षिण विधानसभा मतदार संघातून विधानसभेवर पाठविले. २०१४ ते २०१९ या कालखंडात भाजप–शिवसेना सरकारच्या विरोधात काँग्रेस पक्षाचे प्रभावी नेतृत्व पृथ्वीराज चव्हाण यांनी केले. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर स्थापन झालेल्या महाविकास आघाडी म्हणजे काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना यांच्या स्थापनेमध्ये पृथ्वीराज चव्हाण यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली व भारतीय जनता पक्षास सत्तेपासून दूर ठेवले. २०१९ मध्ये स्थापन झालेल्या मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचा महाविकास आघाडी मंत्रिमंडळात पृथ्वीराज चव्हाण सहभागी न होता मार्गदर्शकाच्या भूमिकेत राहणे पसंत केले. तसे पाहिले तर शिवाजीराव पाटील निलंगेकर, अशोक चव्हाण, नारायण राणे यांनी मुख्यमंत्री पद भुषवून नंतर मंत्रीपदावर राहणे पसंत केले पण पृथ्वीराज चव्हाण यांनी मुख्यमंत्री राहिल्यानंतर मंत्री होणे नाकारले. हे त्यांच्या राजकीय नितीमत्तेचे एक उदाहरण म्हणावे लागेल.

| **अ. नं.** | **साल** | **उमेदवाराचे नाव** | **पक्ष** | **विजयी–पराभूत** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|---|---|
| १. | २०१४ | पृथ्वीराज चव्हाण<br>विलासराव पाटील | काँग्रेस<br>अपक्ष | विजयी<br>पराभूत | – |
| २. | २०१९ | पृथ्वीराज चव्हाण<br>उदयसिंह पाटील | काँग्रेस<br>अपक्ष | विजयी<br>पराभूत | – |

५६

१९९९ ते २००२ याच कालखंडामध्ये चव्हाण घराण्याला विधानसभा किंवा लोकसभेचे प्रतिनिधित्त्व मिळाले नाही. हा अपवाद वगळता चव्हाण घराणे १९५४ ते २०२४ पर्यंत सातत्याने लोकसभा, राज्यसभा, विधानसभा, विधान परिषद मुख्यमंत्री अशा विविध पदावर राहिले असल्याचे दिसत. १९९९ ते २००२ या कालखंडाचा अपवाद वगळता आजअखेर पिता, पत्नी व पुत्र असे एकाच कुटुंबातील सदस्यांना सलग ७० वर्षे भारताच्या व राज्याच्या राजकारणामध्ये व सत्तेमध्ये सहभागी होण्याची संधी मिळणे आणि तेही सातारा जिल्ह्याला ही संधी मिळणे खरे

म्हणजे मोठे यश आहे. महाराष्ट्राच्या राजकीय घराण्यामध्ये हे वैशिष्टयपूर्ण राजकीय घराणे असावे असे म्हणावे लागेल.

स्वातंत्र्यपूर्व कालखंडापासुन देशाच्या राजकारणामध्ये सक्रीय असलेले हे चव्हाण घराणे कराड तालुक्याच्या राजकारणावर आपला प्रभाव कायम ठेवण्यात यशस्वी ठरले आहे. गांधी घराण्याशी त्यांचा असलेला संबध स्नेह व एकनिष्ठता या एकमेव कारणाने हे घराणे ७० वर्ष सातत्याने देशाच्या व राज्याच्या राजकारणामध्ये सक्रीय राहिले. सातारा जिल्ह्यातील इतर राजकीय घराण्याचा अभ्यास करता या घराण्यात प्रथम आमदार, खासदारकी (सत्तेमध्ये सहभागी झाले) मिळवली आणि आपली सत्ता कायम रहावी, यासाठी त्यांनी सहकार चळवळीचा व संस्थाचा आधार घेतला व तिचा वोट बँक म्हणून वापर केला त्यामुळे ही घराणी राजकारणामध्ये टिकाव धरू शकली. याला अपवाद चव्हाण घराणे आहे. या घराण्याची तिसरी पिढी सध्या राजकारणामध्ये असून आजपर्यंतच्या कालखंडामध्ये त्यांनी कसल्याही सहकारी संस्था उभ्या केल्या नाहीत. काँग्रेस पक्षाशी एकनिष्ट असल्याने चव्हाण घराण्याला त्यांच्या फायदा झाला. इंदिरा गांधी आणिबाणी कालखंड, राजीव गांधी बोफर्स प्रकरण, सोनिया गांधी कालखंड या काँग्रेस पक्षाच्या अडचणींच्या काळात काँग्रेस पक्ष टिकविणे व वाढविणे यासाठी चव्हाण घराण्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. पक्षनिष्ठा, शिस्त, संयम, भ्रष्टाचारापासून दूर अशी ओळख चव्हाण घराण्यांशी राजकारणात असलेली दिसते. जनेतशी व्यक्तिगत संपर्क मतदार संघात विकास कामे या व अशा माध्यमातून वैयक्तिक व सार्वजनिक कामावर लक्ष देऊन व शासनाच्या विविध योजनाची अंमलबजावणी करून जनतेशी सतत नाळ जोडून जनसंपर्काच्या आधारावर हे घराणे देशाच्या राजकारणावर आपली पकड निर्माण करून राहिल्याचे दिसते.

**कराडचे पाटील–उंडाळकर घराणे**

स्वातंत्र्य चळवळीचा वारसा लाभलेले हे घराणे स्वातंत्र्यपूर्व कालखंडापासून ते आज अखेरपर्यंत जिल्ह्यासह राज्याच्या राजकारणात सक्रीय आहे. स्वातंत्र्य लढ्यामध्ये अग्रेसर असलेल्या या घराण्यातील दादासाहेब उंडाळकर यांनी देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी मोठा संघर्ष केला. दादासाहेब उंडाळकर सन १९४२ च्या 'चले जाव' आंदोलनात सहभागी झाले होते. याच दरम्यान म्हणजे २४ ऑगस्ट १९४२ रोजी त्यांनी कराड तहसिलदार

कार्यालयावर जवळपास तीन हजार लोकांचा प्रचंड मोर्चा काढून ब्रिटिश सरकारला धारेवर धरले होते. देशसेवा, देशभक्ती, देशासाठी सर्वस्व अर्पण करण्याची भूमिका इत्यादी गोष्टीची शिकवण त्यांनी आपल्या कार्यातून कराड वासियांना करून दिली. परिणामी तालुक्यातील दलित, मागास वर्ग, अल्पसंख्यांक, शेतकरी, शेतमजुर असे समाजातील सर्व घटक एकत्र येण्यास मदत झाली. विशेष म्हणजे स्वातंत्र्य लढ्यातील कराड तालुक्यातील हा पहिलाच मोर्चा होता. अशा या घराण्याने कराड दक्षिण या विधानसभा मतदार संघामध्ये विलासराव पाटील उंडाळकर यांच्या रूपाने प्रभाव निर्माण केला आणि कराड तालुक्याच्या सर्वांगिण विकास करण्याचा प्रयत्न केला.

**विकासराव बाळकृष्ण पाटील–उंडाळकर**

आपल्या वडीलांकडून समाज कार्याचे बाळकडू मिळालेल्या विलासराव पाटील यांचा जन्म १५ जुलै १९३८ मध्ये उंडाळे या ग्रामीण भागातील एक शेतकरी कुटुंबात झाला. त्यांनी कायद्याची पदवी घेतली. सामान्य लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी त्यांनी आपल्या राजकीय प्रवासाला सुरूवात केली.

१९६७ मध्ये झालेल्या जिल्हा परिषदेच्या निवडणुकीमध्ये यशवंतराव चव्हाण यांनी विलासराव पाटलांना जिल्हा परिषदेची काँग्रेस पक्षाची अधिकृत उमेदवारी दिली. ही निवडणूक त्यांनी मोठ्या मताधिक्याने जिंकत महाराष्ट्रात प्रथम क्रमांक मिळविला. १९७२ मध्येही ते सातारा जिल्हा परिषदेवर निवडून गेले. त्याच वर्षी ते जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक म्हणून ही निवडून आले. ते या पदावर शेवटपर्यंत कार्यरत होते. त्यांनी या बँकेच्या अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाची जबाबदारी अत्यंत चांगल्या प्रकारे पार पाडली. बँकेची भव्य दिव्य इमारत त्यांच्याच कार्यकाळात झाली. नाबार्डसारख्या राष्ट्रीय संस्थेचा पुरस्कार ही बँकेस प्राप्त झाला. पुढे १९८० मध्ये ते कराड दक्षिण विधानसभा मतदार संघामधून आमदार म्हणून २०१४ पर्यंत सलग सहा वेळा निवडून आले. कराड दक्षिण विधानसभा मतदार संघावर ३५ वर्षे आमदार म्हणून आपले वर्चस्व प्रस्थापित केले. त्यांनी आपल्या कारकीर्दीत दुध उत्पादक संस्था, सहकारी खरेदी–विक्री संघ, कृषी उत्पन्न बाजार समिती अशा अनेक संस्था उभारणीत त्यांचा सिंहाचा वाटा होता. रयत सहकारी कारखाना शामराव पाटील पतसंस्था त्यांनी १९९८ मध्ये वाकुर्डे जलसिंचन योजना मंजूर करत. या भागातील २२ गावामधील सुमारे २२०० हेक्टर

जमिनीचे क्षेत्र ओलिताखाली आणून ओसाड जमीनी पिकावू बनविल्या. परिणामी शेतकरी बागायती पिके घेऊन आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यास मोठी मदत झाली. शेतकऱ्यांच्या जमीनी पिकावू व्हाव्या, एवढ्या पुरतेच त्यांचे स्वप्न नव्हते तर शेतकरी साक्षर व शिक्षित झाला पाहिजे, त्यांच्या मुलांना उच्च शिक्षण मिळाले पाहिजे. या भूमिकेतून त्यांनी शैक्षणिक संस्था निर्माण केल्या व उंडाळे भागात शिक्षणाचे जाळे निर्माण केले. दादासाहेब उंडाळकर, यशवंतराव चव्हाण यांच्या जयंत्या, पुण्यतिथ्यांचे आयोजन करून, वेगवेगळी संमेलने भरवून, प्रदर्शने भरवून महाराष्ट्रातील साहित्यिक, कवी, लेखक, पत्रकार, विचारवंत वैज्ञानिक यांना निमंत्रित करून आपल्या मतदारसंघातील जनतेमध्ये प्रबोधन घडवून आणले.

सत्तेमध्ये असताना विलासरावांनी रयत सहकारी कारखाना, कोयना सहकारी बँक, शामराव पाटील नागरी सहकारी पतसंस्था, कोयना दुध संघ उंडाळे येथील मध्यवर्ती रूरल हॉस्पिटल इत्यादी सहकारी व शासनमान्य संस्था उभ्या करून सामान्य लोकांचे प्रश्न मार्गी लावले. याशिवाय विलासरावांनी आमदार फंडातून समाज मंदिरे, स्मशानभूमी, सार्वजनिक व्यासपीठ रस्ते, व्यायामशाळा, ग्रंथालये, पिण्याच्या पाण्याच्या योजना इत्यादी सुविधा आपल्या मतदार संघामध्ये राबविल्या.[५७] परिणामी त्यांचे मतदार संघासह जिल्ह्याच्या राजकारणावर वर्चस्व निर्माण झाले. त्यांनी कराड दक्षिण या मतदार संघावर जवळपास ४० वर्षे राजकीय सत्ता आपल्या ताब्यात ठेवली त्यांनी आपल्या राजकीय कारकीर्दीत स्थापन केलेल्या सहकारी संस्था व त्यांचे कार्य पुढील तक्त्याद्वारे स्पष्ट केले आहे.

| अ. नं. | **सामाजिक व राजकीय कारकीर्द** |
|---|---|
| १. | जिल्हा परिषद सदस्य– १९६७ ते १९७२ |
| २. | शिवाजी विद्यापीठ सिनेट सदस्य |
| ३. | सातारा जिल्हा मध्यवर्ती बँक (१९६७ ते आज अखेर) |
| ४. | अध्यक्ष जिल्हा कॉंग्रेस कमिटी, सातारा |
| ५. | सहकार चळवळ अभ्यासासाठी अमेरिका, इंग्लंड, जर्मन, फ्रान्स, थायलंड दौरे |
| ६. | कराड दक्षिण मतदार संघाचे १९८० ते २०१४ पर्यंत सलग ३५ वेळा आमदार |
| | **महत्त्वाकांक्षी उपक्रम** |
| १. | १९७५ पासून उंडाळे येथे स्वातंत्र्य संग्राम सैनिक अधिवेशन |

| | |
|---|---|
| २. | समाज प्रबोधन मराठी साहित्य संमेलन |
| ३. | देशातील पहिला नदी जोड प्रकल्पाची निर्मिती |
| ४. | जलसिंचनाच्या माध्यमातून दक्षिण मांड सिंचन पॅटर्नची निर्मिती |
| ५. | राज्यात मतदार संघ विकासात अव्वल |
| ६. | डोंगरी विकास निधीचे शिल्पकार |
| **विकसित केलेल्या संस्था** | |
| १. | कोयना सहकारी दुध उत्पादक संघ लि. कराड |
| २. | कराड तालुका सहकारी खरेदी विक्री संघ लिमिटेड |
| ३. | शेती उत्पन्न बाजार समिती कराड |
| **स्थापन केलेल्या संस्था** | |
| १. | ग्रामीण विकास शिक्षण संस्था, उंडाळे |
| २. | स्वा. सै. शामराव पाटील नागरी सहकारी पतसंस्था मर्या, उंडाळे |
| ३. | कोयना सहकारी बँक लि. कराड |
| ४. | रयत सहकारी साखर कारखाना लि. शेवाळेवाडी |
| **परिषदा** | |
| १. | धर्मनिरपेक्ष परिषद, मौजे तांबवे ता. कराड |
| २. | शैक्षणिक चिंतन परिषद, कराड |
| ३. | विज्ञान परिषद, कराड |
| ४. | डोंगरी परिषद, काळगाव, ता. पाटण |
| ५. | घटना बचाव परिषद, कराड |

**निवडणूकीतील कार्यकाळ**

| मतदार संघ | साल | विजयी आणि पराभूत |
|---|---|---|
| जिल्हा परिषद सातारा –उंडाळे | १९६७ ते १९७२ | विजयी |
| सातारा जिल्हा बँक संचालक | १९८० ते २०१० | विजयी |
| लोकसभा – कराड | १९७९ | पराभूत |
| विधानसभा – कराड दक्षिण | १९८० | विजयी |

| | | |
|---|---|---|
| विधानसभा – कराड दक्षिण | १९८५ | विजयी |
| विधानसभा – कराड दक्षिण | १९९० | विजयी |
| विधानसभा – कराड दक्षिण | १९९५ | विजयी |
| विधानसभा – कराड दक्षिण | १९९९ | विजयी |
| विधानसभा – कराड दक्षिण | २००४ | विजयी |
| विधानसभा – कराड दक्षिण | २००९ | विजयी |
| विधानसभा –कराड दक्षिण | २०१४ | पराभूत |

**राज्य मंत्रीमंडळातील खाती दर्शविणारा तक्ता**

| साल | खाते |
|---|---|
| १९९२ ते १९९३ | दुग्धविकास पशुसंवर्धन मंत्री |
| १९९९ ते २००३ | विधी, न्याय व पुनर्वसन मंत्री |
| २००३ ते २००४ | सहकार व वस्त्रोद्योग मंत्री |
| २००८ | महाराष्ट्र शासनाचा चीन अभ्यास दौरा |

[५८]

अशाप्रकारे विकासराव पाटील–उंडाळकर यांच्या राजकीय कारकिर्दीचे स्वरूप राहिले असून १९६७ ते २०१४ पर्यंत सलग ४० वर्षे त्यांनी जिल्हा परिषद व कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे नेतृत्त्व केले. १९९० ते २००५ पर्यंत सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक व बँकेचे नेतृत्त्व विलासराव पाटील यांनी केले. २००० मध्ये आपला मुलगा उदयसिंह पाटील यांचीही निवड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर होवून राजकीय वारसा पुढे आणला. विलासराव पाटील यांच्या नेतृत्त्वाखाली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने राष्ट्रीय स्तरावरचे विविध पुरस्कार प्राप्त केले. त्यांनी सहकारी संस्था, दुध संस्था, शैक्षणिक संस्थाच्या माध्यमातून मतदार संघामध्ये अनेक विकास कामे केली. जलसिंचनाच्या माध्यमातून शेकडो एकर जमीन ओलिताखाली आणून शासनाच्या विविध योजना व आमदार फंडातून दलित, मागासवर्गीय लोकांचे अनेक जिव्हाळ्याचे प्रश्न सोडविल्याने मतदार संघावर त्यांची मजबुत पकड निर्माण झाली होती. १९९९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना झाली तेव्हा संपूर्ण सातारा जिल्हा राष्ट्रवादीत समाविष्ट झाला असताना, जिल्ह्यातील कराड दक्षिण या मतदारसंघातून

काँग्रेसच्या तिकीटावर निवडून येऊन त्यांनी सातारा जिल्ह्यामध्ये काँग्रेस राजकीयदृष्ट्या जिवंत ठेवली होती ही उंडाळकर यांची खरी ताकद होती. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे कराड दक्षिणमधून विलासराव पाटील यांना उमेदवारी न मिळता मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांना देण्यात आली व ३५ वर्षे मतदारसंघाची प्रतिनिधित्त्व करणारे विलासराव पाटील यांनी अपक्ष उमेदवारी घोषित करून पृथ्वीराज चव्हाण यांच्याविरोधात निवडणूक लढविली. पण त्यांचा या निवडणुकीत पराभव झाला. सामान्य जनता त्यांना कार्यदूत म्हणून मानते. परंतु या प्रभावी कार्याचा फायदा त्यांना त्यांच्या पुढील राजकीय वारसाला मिळाला नसल्याचे दिसते. कारण २०१९ विधानसभा निवडणूकीमध्ये त्यांचे चिरंजीव उदयसिंह पाटील यांना पराभवाचा सामना करावा लागला होता. ज्याप्रमाणे यशवंतराव मोहिते यांचे घराणे राजकारणात स्थिर होऊ शकले नाही. तीच स्थिती विलासराव पाटलांची झाली. दुर्दैवाने कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील जनतेने सद्या घराण्याला पूर्णपणे डावल्याचे चित्र आज दिसून येते.

**पाटणचे देसाई घराणे**

सातारा जिल्ह्यामध्ये अनेक ऐतिहासिक व राजकीय घराणी उदयास आली त्यांनी स्वकर्तृत्त्वाने जनतेशी नाळ जोडून सामाजिक बांधिलकीच्या जोरावर जिल्ह्याच्या राजकारणावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले, असे असले तरी सातारा जिल्ह्यातील पाटण या डोंगरी व ग्रामीण भागाचा जास्तीत–जास्त समावेश असलेल्या या तालुक्यामधून जी राजकीय घराणी उदयास आली, त्यांनी जिल्ह्यासह देशाच्या राजकारणावर दीर्घकालीन परिणाम करणारे कार्य केले. या तालुक्यातील आनंदराव चव्हाण या घराण्याने जवळपास ६७ वर्षे सातत्याने देशाच्या राजकारणामध्ये कार्यरत राहून आपली एक स्वतंत्र ओळख निर्माण केली. असेच या तालुक्यातील दुसरे महत्त्वाचे घराणे म्हणजे मरळीचे देसाई घराणे या घराण्याने १९५२ पासून ते आज अखेरपर्यंत राज्याच्या राजकारणावर आपला प्रभाव निर्माण केला आहे.

**बाळासाहेब देसाई**

महाराष्ट्राचे पोलादी पुरूष, लोकनेते म्हणून ओळखल्या गेलेल्या बाळासाहेब देसाई यांचा जन्म अतिशय गरीब शेतकरी कुंटुंबात झाला. सर्वसामान्य माणसाचा सर्वांगिण विकास डोळ्यांसमोर ठेवून धडाडीने निर्णय घेऊन सामान्य माणसाला न्याय देणाऱ्या बाळासाहेब देसाई

यांची तिसरी पिढी आज राजकारणामध्ये त्याच ताकदीने कार्यरत असलेली दिसते. बाळासाहेब देसाई यांनी तत्कालीन कालखंडामध्ये केलेली विकास कामे व घेतलेले जनहित निर्णय आज ही जिल्ह्यातील जनता विसरलेली नाही. अशा या बाळासाहेबांचा राजकीय प्रवास सातारा जिल्हा लोकल बोर्डातील कुपरशाहीची सत्ता मोडीत काढून जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्षपद मिळवून केली.[५९] बाळासाहेब देसाई १९४१ ते १९५२ पर्यंत सातारा लोकल बोर्डाचे अध्यक्ष होते. पुढे १९५२ मध्ये महाराष्ट्रात झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये ते पाटण मतदारसंघातून बिनविरोध निवडून गेले व आपल्या कणखर नेतृत्त्वाची ओळख संपूर्ण महाराष्ट्राला करून दिली. विधानसभेवर बिनविरोध निवडून जाणारी यशवंतराव मोहिते यांच्यानंतर ती दूसरी व्यक्ती होती. निवडून गेल्यानंतर कृषी मंत्री, बांधकाम मंत्री, गृहमंत्री, महसूल मंत्री अशा वेगवेगळ्या खात्याची मंत्रीपदे त्यांनी भूषविली. जनसेवा हे व्रत ठेवून आयुष्यभर त्यांनी पाटण तालुक्याच्या विकासात भर घातली. शिक्षणमंत्री असताना १२०० रुपये उत्पन्न असणाऱ्या पालकाच्या मुलांना ई. बी. सी. सारखी सवलत देऊन मोफत शिक्षण मिळावे, असा आग्रह त्यांनी धरला. ज्या तालुक्यात आपला जन्म झाला त्या तालुक्यातील गोरगरीब लोकांचा विकास घडवून आणायचा या भूमिकेतून त्यांनी कोयना धरण, साखर कारखाना, वीजनिर्मिती प्रकल्प, उपसा जलसिंचन योजना यासारखे मोठे प्रकल्प राबवून बाळासाहेबांनी पाटण तालुक्यातील शेकडो लोकांना रोजगाराची निर्मिती करून दिली त्यामुळे पाटण तालुक्याच्या राजकारणावर त्याचे कायम वर्चस्व राहिले. सन १९६७ साली दिनांक ११ सप्टेंबर रोजी पाटण तालुक्यांमध्ये मोठा भूकंप झाला त्यावेळी तालुक्यामधील सामाजिक घडी पूर्ण विस्कटलेली होती. ती पूर्ववत करण्यात त्यांनी मोठा पुढाकार घेतला होता.[६०]

बाळासाहेब देसाई बांधकाम मंत्री असताना तालुक्यामधील शहरी भागासह ग्रामीण भागामध्ये पक्के रस्ते बनविले. गृहखात्याचे मंत्री असताना त्यांनी पोलिस खात्याला आधुनिकीकरण व अधिक कार्यक्षम बनविले. तसेच त्यांनी आपल्या मतदारसंघामध्ये सहकार चळवळ मोठ्या प्रमाणावर रूजवत. मरळी या गावात त्यांनी सहकारी साखर कारखान्याची निर्मिती केली. शिवाय १९६२ मध्ये कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठाची स्थापना करून शिक्षण क्षेत्रात क्रांती केली. इकॉनॉमिकल बॅंक वर्ड क्लासचे (वार्षिक उत्पन्न ९००) अंतर्गत त्या काळात ७२% लोकसंख्या या कायद्याखाली येत होती. बाळासाहेबांनी ही मर्यादा रु. १२००

पर्यंत वाढवली. १२०० रुपये पेक्षा ज्यांचे वार्षिक उत्पन्न कमी आहे. अशा गरीब विद्यार्थ्यांना फी माफी दिली. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या माध्यमातून बाळासाहेबांनी महाराष्ट्रामध्ये एकंदर २ इंजिनिअरींग कॉलेजेस, १ पॉलिटेक्निकल आणि ७ इंडस्ट्रीयल, ६ इंजिनिअरींग, १८ पॉलिटेक्नीक आणि १९ इंडस्ट्रीयल स्कूलची निर्मिती केली आणि देशाच्या उत्पन्नात भर घातली.[६१]

इ. स. १९६२ मध्ये भारत चीन युद्धामुळे सैन्य दलामधील काही त्रुटीसमोर आल्या त्याला अनुसरून बाळासाहेब यांनी शाळा, महाविद्यालयामध्ये प्रत्येक विद्यार्थ्यांला सैनिकी शिक्षण मिळावे म्हणून एन.सी.सी.चे वर्ग सुरू करावे व त्यासाठी एक तास जादा द्यावा असा आदेश शासनाला केला. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने सातारा येथे १९६१ साली सैनिकी शाळा सुरू केली. ती देशातील ४ शाळांपैकी एक होती तसे २८ जानेवारी १९६१ रोजी सांगली जिल्हा परिषद व प्राथमिक शिक्षकांच्या मेळाव्याला संबोधित करताना त्यांनी शिक्षकांच्या विविध प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी त्यांची एखादी संघटना असावी असे आवाहन केले. त्यांनी आपल्या ४० वर्षाच्या राजकीय कालखंडामध्ये सातारा जिल्ह्यामध्ये पक्के रस्ते, पाणीपुरवठा, शाळा, क्रिडांगणे, शेती विषयक योजना, लहान मोठे बंधारे, पुल, साकव पुल, तालमीचे आखाडे, ग्रामपंचायती, सहकारी संस्था, कोयना धरण, शेतकी महाविद्यालये, बँका, सोसायट्या व पाटणचे महाविद्यालय[६२] अशा अनेक संस्था निर्माण करून शासनाचे विविध उपक्रम व योजना राबवून पाटण तालुक्यासह सातारा जिल्ह्याचा सर्वांगिण विकास साधण्याचा प्रयत्न केला.

१९५२ ते १९८३ पर्यंत जवळपास ३१ वर्षे त्यांनी पाटण मतदारसंघाचे नेतृत्त्व केले. राज्याच्या राजकारणामध्ये त्यांचा दबदबा होता. यशवंतराव चव्हाण यांच्यानंतर त्यांचाच महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये प्रभाव होता. पश्चिम महाराष्ट्रातील गटबाजीच्या राजकारणामुळे त्यांना मुख्यमंत्री होता आले नाही.

### २) शिवाजीराव देसाई (मुलगा)

लोकनेते बाळासाहेब देसाई यांचे चिरंजीव शिवाजीराव देसाई हे त्यांचे राजकीय वारसदार म्हणून त्यांचा वारसा काही काळ चालवला. लोकनेत्यांच्या निधनानंतर त्यांनी पाटण विधानसभा मतदारसंघामध्ये सतत जनसंपर्क साधून लोकनेत्यांचे कार्य पुढे नेण्याचा प्रयत्न

केला. आपल्या राजकीय कारकीर्दीत जिल्हा परिषद सदस्य, जिल्हा बँक संचालक, साखर कारखान्याचे चेअरमन अशी अनेक पदे भूषविली तर १९८३ मध्ये लोकनेत्यांच्या निधनाने झालेल्या पोटनिवडणुकीत त्यांनी या मतदारसंघाचे नेतृत्त्व केले परंतु त्यांना पराभवाचा सामना करावा लागला. पुढे १९८६ मध्ये त्यांचे निधन झाले. १९९० मध्ये झालेल्या विधानसभा निवडणूकीत त्यांच्या पत्नी श्रीमती विजयादेवी देसाईंना निवडणुकीत पराभव पत्करावा लागला.

३) **शंभूराजे देसाई** (नातू)

लोकनेते बाळासाहेब देसाई यांचे नातू आणि शिवाजीराव देसाई यांचे चिरंजीव शंभूराजे देसाई यांनी आपल्या राजकीय प्रवासाला वयाच्या १८ व्या वर्षीच सुरवात केली. वडील शिवाजीराव यांच्या अकाली निधनामुळे कुटुंबासह पाटणतालुक्याच्या राजकारणाची मोठी जबाबदारी त्यांच्यावर आली. अगदी लहान वयामध्ये त्यांनी बाळासाहेब देसाई सहकारी साखर कारखान्याचे चेअरमनपदी सलग १० वर्षे सदस्य म्हणून काम पाहिले तर जिल्हा परिषदेचे १९९२ ते २००२ या काळात १० वर्षे सातारा जिल्हा परिषदेचे सदस्य होते. १९९५ व १९९९ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये त्यांनी विक्रमसिंह पाटणकर यांना पाटण विधानसभा मतदार संघातून कडवी झुंज दिली. परंतु त्यांना त्यामध्ये यश मिळाले नाही. पूर्वीपासूनच काँग्रेसच्या विचारधारेला वाहून घेतलेल्या या देसाई घराण्याने पुढे नारायण राणे यांच्या पुढाकाराने शिवसेनेत प्रवेश केला. १९९५ मध्ये शिवसेना भाजप युतीच्या सरकारमध्ये राज्यमंत्री पदाचा दर्जा असलेल्या खात्यावर त्यांना काम करण्याची संधी मिळाली. पुढे २००४ च्या निवडणुकीमध्ये विक्रमसिंह पाटणकर यांचा पराभव करीत त्यांनी विधानसभा जिंकली आणि आमदारकीच्या माध्यमातून त्यांनी पाटण तालुक्यातील अनेक लोकांचे प्रश्न सोडवून तरुणांना आपल्यासोबत घेऊन एक मजबूत संघटन उभे केले. २००९ च्या विधानसभा निवडणुकीत पाटण मतदारसंघातून शंभूराजे देसाई यांचा पराभव झाला. पण परत २०१४ व २०१९ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये ते विजयी होऊन २०१९ च्या उद्धव ठाकरे यांच्या महाविकास आघाडी सरकारमध्ये गृहराज्यमंत्री तर पुढे २०२२ मध्ये शिवसेनेच्या फुटीनंतर स्थापन झालेल्या एकनाथ शिंदे यांच्या मंत्रीमंडळात उत्पादन शुल्क कॅबिनेट मंत्री म्हणून काम करण्याची संधी शंभुराजे देसाई यांना मिळाली.[६३] एकनाथ शिंदे यांच्या गटाचे एक प्रभावी नेते म्हणून शंभुराजे देसाई यांच्याकडे पाहिले जाते.

शंभूराज देसाई आमदार झाल्यानंतर पाटण तालुक्यातील भूकंपग्रस्तांना भूकंपग्रस्ताचा दाखला देण्यात पुढाकार घेतला. इयत्ता ८ वी च्या पुस्तकात बाळासाहेब देसाई यांच्या कार्याचा समावेश केला. पाटण पंचायत समितीच्या मुख्य इमारतीस बाळासाहेबांचे नाव दिले. कोयना धरणातून पूनर्वसित झालेल्या गावांना पक्के रस्ते करून दिले. त्यासाठी त्यांनी ५ कोटी ७२ लाखाचा निधी मंजूर करून दिला. तीर्थक्षेत्र विकास कामासाठी ४० लाखाचा निधी देऊन तीर्थक्षेत्राचा विकास केला. त्यामध्ये नाईकबा देवस्थान, येराड येथील येडोबा, जळव येथील जोतीबा या देवस्थानामध्ये भक्तांना राहण्यासाठी निवासाची सोय, अंतर्गत रस्त्याची कामे, सार्वजनिक शौचालय, विद्युतीकरण इत्यादी कामे केली. महापुरामध्ये संपर्क तुटणाऱ्या गावांना रस्ते व पुलाची निर्मिती यासाठी १ कोटी ८० लाखाचा भरीव निधी उपलब्ध करून दिला. तालुक्यातील अनेक गावे, वाडी, वस्त्या टँकर मुक्त केल्या. तसेच धरण प्रकल्पाचे भूसंपादन व धरण ग्रस्तांच्या पूनर्वसनासाठी ३१ कोटी ३२ लाख रूपयाचा निधी मंजूर करून तालुक्यामध्ये ६८६ अंगणवाड्यांना मंजूरी, बाळासाहेब देसाई साखर कारखान्यातील कामगारांना १५% पगारवाढ फरक, बोनस पाटण तालुक्यातील अतिवृष्टी काळात डोंगरी व पुर रेषेतील ६१ गावातील लोकांना प्रति माणुस तीन लिटर रॉकेलचे वाटप केले. तालुक्यातील क्रिडा संकुलाकरीता १ कोटी रूपयाचा निधी, नवीन महाबळेश्वर येथील प्रकल्पासाठी ५०० हेक्टर एवढी जमीन धरण प्रकल्पांतर्गत व अभय अरण्य बाधीत गावाच्या पुनर्वसनाकरिता देण्यासाठी पाठपुरावा केला. पाटण तालुक्यामध्ये मोरणा शिक्षण संस्थेची स्थापना करून अनेक हायस्कुलची निर्मिती केली व डोंगर दऱ्यामध्ये राहणाऱ्या गरीब मुलांच्या शिक्षणाचा मार्ग मोकळा केला तर दौलतनगर येथे आय. टी. आय. पॉलिटेक्नीक, सिनिअर, ज्युनिअर महाविद्यालयाची निर्मिती करून भागातील गरीब विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. धरणग्रस्तांना ५० मीटर वरून १०० मीटर पर्यंत पाणी उचलून देण्याकरीता प्रयत्न केला. राज्यातील ग्रामसेवकांना वेतनवाढ देण्यास शासनाला भाग पाडले. महिलांच्या आर्थिक उन्नतीसाठी जिजाऊ महिला विकास ट्रस्ट, स्वयंसाहयत्ता महिला बचत गट फेडरेशन या दोन संस्थांची स्थापना केली. विजय नगर व निसरे फाटा टोल नावच्या संदर्भात लक्षवेधी सुचना केली. पाटण तालुक्यातील जवळपास २३ गावांना १४२ विजेचे पोल उभारण्याकरीता २० लाखाचा निधी उपलब्ध करून दिला. तसेच मल्हार पेठ व पाटण पोलिस आऊट पोस्ट

अपग्रेडेशन करण्याचा निर्णय घेण्यास शासनाला भाग पाडले शिवाय कोयना धरणांतर्गत अभयारण्य बाधीत असणाऱ्या ५ गावांचे पुनर्वसन केले.[६४] पाटणच्या देसाई या राजकीय घराण्याचा कारकिर्दीचा आढावा घेता बाळासाहेब देसाई हे महाराष्ट्राचे एक प्रभावी नेते होवून गेले. त्यानंतर काही काळ त्यांचे पुत्र शिवाजीराव देसाई व सुनबाई यांचा पराभव झाला. पण ते घराणे साखर कारखान्याच्या माध्यमातून राजकारणात सक्रीय होते. शंभुराजे देसाई १९९२ व १९९७ या काळात सातारा जिल्हा परिषद सदस्य होते. पुढे पाटणकरांचा पराभव करून राज्याच्या राजकारणात सद्या सक्रीय असताना दिसतात. देसाईंची चौथी पिढी शंभुराजे देसाई यांचे चिरंजीव यशराज देसाई हे बाळासाहेब देसाई सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्षपद भूषवत असून शंभुराजे देसाई यांच्यानंतर राजकारणातील वारस म्हणून पुढे येताना दिसतात. तर शंभुराज देसाई यांचे भाऊ रवीराज देसाई मोरणा शिक्षण संस्थेचा कारभार संभाळत आहेत. अशाप्रकारे देसाई घराणे हे १९५२ पासून काही काळ अपवाद वगळता २०२४ पर्यंत पाटण मतदारसंघावर प्रभाव ठेवून जिल्ह्याच्या व राज्याच्या राजकारणात सक्रीय असलेले दिसतात. देसाई घराण्याची चौथी पिढी जसराज देसाई यांच्यामाध्यमातून राजकारणात सक्रीय झालेली दिसते. बाळासाहेब देसाई यांच्या नेतृत्त्वाा, कामाचा वारसा आज पुढची पिढी चालविताना दिसून येते. या राजकीय घराण्याला पाटणमधील जनतेने स्वीकारलेले दिसून येते.

**तक्ता क्र. ४.११**
**देसाई घराण्यातील व्यक्तींचा लोकसभा व विधानसभा मधील सहभाग**

| **बाळासाहेब देसाई** | | | |
|---|---|---|---|
| सन | व्यक्ती | पक्ष | मतदार संघ |
| १९५२ | दौलतराव देसाई ऊर्फ बाळासाहेब | काँग्रेस | पाटण |
| १९५७ | दौलतराव देसाई ऊर्फ बाळासाहेब | काँग्रेस | पाटण |
| १९६२ | दौलतराव देसाई ऊर्फ बाळासाहेब | काँग्रेस | पाटण |
| १९६७ | दौलतराव देसाई ऊर्फ बाळासाहेब | काँग्रेस | पाटण |
| १९७२ | दौलतराव देसाई ऊर्फ बाळासाहेब | काँग्रेस | पाटण |
| १९७८ | दौलतराव देसाई ऊर्फ बाळासाहेब | काँग्रेस | पाटण |
| १९८० | दौलतराव देसाई ऊर्फ बाळासाहेब | काँग्रेस | पाटण |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | [६५] |
| **शंभुराजे देसाई** | | | |
| २००४ | शंभुराजे देसाई | शिवसेना | पाटण |
| २०१४ | शंभुराजे देसाई | शिवसेना | पाटण |
| २०१९ | शंभुराजे देसाई | शिवसेना | पाटण |

[६६]

## कराडचे पाटील घराणे

कराड तालुक्यातील यशवंतराव मोहिते, आनंदराव चव्हाण व उंडाळचे विकासराव पाटील घराण्यानंतर सातारा जिल्ह्याच्या समाजकारणावर, अर्थकारणावर व राजकारणावर ज्या घराण्याचा सातत्याने ४० वर्षे प्रभाव राहिला ते घराणे म्हणजे पाटील घराणे होय. या घराण्यातील स्व. पी. डी. पाटील यांनी आपल्या कार्य कर्तृत्त्वाने कराड तालुक्यामध्ये साखर कारखान्यासह शैक्षणिक संस्था उभ्या करून तालुक्यातील गरीब अल्पभूधारक लोकांचे प्रश्न सोडविले. तसेच शिक्षण संस्थेच्या माध्यमातून तालुक्यातील हजारो लोकांना कला, विज्ञान व वाणिज्य विभागातून उच्च शिक्षण घेण्याची संधी निर्माण करून दिली. ते ४० वर्षे सातत्याने जिल्ह्याच्या राजकारणामध्ये सक्रीय होते.

### १) पी. डी. पाटील

संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या कार्यामुळे कराड तालुक्याला महाराष्ट्रामध्ये ओळखले जाते. त्यांनी स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये सहकाराच्या माध्यमातून सत्तेचे व नेतृत्त्वाचे विकेंद्रीकरण करून सर्वसामान्यांचे व शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न मार्गी लावले. हाच चव्हाणांचा वारसा पुढे स्व. पी. डी. पाटील यांनी पुढे नेण्याचा प्रयत्न केला. एका सामान्य गरीब शेतकरी कुटुंबात जन्म झालेल्या पी. डी. पाटील यांनी कराड नगरपरिषदेच्या निवडणुकीत १९५२ मध्ये नगरसेवक म्हणून राजकीय कारकिर्दीला सुरुवात केली. माध्यमातून आपल्या राजकीय कार्याला सुरवात केली. दि. २० डिसेंबर १९५३ ते दि. १६ डिसेंबर १९९६ अशी सलग ४३ वर्षे त्यांनी कराड नगरपरिषदेचे अध्यक्षपद भूषवून महाराष्ट्राच्या राजकारणात आपली एक स्वतंत्र ओळख निर्माण केली.[६७] कराड तालुक्यामध्ये यशवंतराव चव्हाण, यशवंतराव मोहिते, आनंदराव चव्हाणा सारखे दिग्गज नेते राजकारणामध्ये

सातत्याने सक्रीय असताना सुद्धा सलग ४३ वर्षे कराड नगरपरिषदेचे नेतृत्त्व करणे हे फार मोठे काम होते. १९५५ ते १९६० ते कराड शेतीउत्पन्न बाजार समितीचे चेअरमन झाले. तर १९६० ते १९६३ या काळात महाराष्ट्र विधानपरिषदेचे नामनिर्देश सदस्य म्हणून प्रतिनिधित्व केले. मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची १९६३ मध्ये केंद्र सरकारमध्ये संरक्षण मंत्रीपदी निवड झाल्यानंतर कराड उत्तर मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत पी. डी. पाटील यांना काँग्रेसने उमेदवारी दिली व ते विधानसभेवर निवडून गेले. १९८५ मध्ये दुसऱ्यांदा कराड उत्तर विधानसभा मतदार संघातून विधानसभेवर निवडून गेले. कराड शहरातील जनमानसाच्या मनावर त्यांची फार मोठी पकड होती. सततचा जनसंपर्क, लोकांच्या अडीअडचणी, प्रश्न सोडविणे यामुळे पी. डी. पाटील यांनी कराड तालुक्याच्या राजकारणावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले होते. १९९५ मध्ये ते पुन्हा अपक्ष म्हणून विधानसभेवर निवडून आले.[६८] त्यांनी आपल्या राजकीय कारकीर्दीत अनेक सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व सहकारी संस्था उभ्या केल्या. त्यांचा कारभार सचोटीने केल्याने या संस्थांनी कराड तालुक्यामध्ये एक आदर्श निर्माण केला आहे. सामाजिक भौगोलिक व सर्वांगिण विचार करून ज्या संस्थांची निर्मिती पी. डी. पाटील यांनी केली. त्या संस्थांच्या माध्यमातून हजारो लोकांचे प्रश्न सुटण्यास मदत झाली. या सर्व संस्थावर हुशार व अभ्यासू, तज्ञ लोकांची निवड करून त्या चांगल्या प्रकारे चालविण्याचा प्रयत्न केला. त्याचबरोबर होतकरू, नवोदित कार्यकर्त्यांना अशा संस्थेत जबाबदारीच्या पदावर काम करण्याची संधी मिळाल्यामुळे त्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळाला. त्यांना काम करण्याची नवी उमेद मिळाली त्यांनी स्थापन केलेल्या सर्व संस्था विकासाचे एक एक टप्पे अगदी यशस्वीरीत्या पार करून पुढे वाटचाल करत असताना दिसत आहेत. लोकांचा सर्वांगिण विकासाचे ध्येय समोर ठेवून स्थापन केलेल्या या संस्थामुळे संपूर्ण भागाचा कायापालट झाला आहे. सह्याद्री सहकारी साखर कारखाना स्थापन करून पी. डी. पाटील हे १९६९ ते १९९२ या काळात कारखान्याचे अध्यक्ष होते. सह्याद्री सहकारी साखर कारखाना हा राज्यातील नियोजन व शिस्तबद्ध कारखाना म्हणून ओळखला जातो. याचे श्रेय पी. डी. पाटील यांना जातो. सहकारी साखर कारखाना स्थापनेमुळे कराड उत्तम विधानसभा कार्य क्षेत्रालगतची शेकडो एकर ओसाड जमीन ओलिताखाली आणून पाटील यांनी सर्वसामान्य शेतकरी व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये मूलभूत परिवर्तन घडवून आणले. ऊस पिकामुळे

शेतकऱ्याच्या आर्थिक स्थितीत सुधारणा झाली. ऊस पिकामुळे शेतकऱ्याच्या खिशात पैसा येऊ लागला परिणामी त्यांचे विविध प्रश्न सुटण्यास मदत झाली.[६९]

समाजाचा सर्वांगिण विकास करत असताना त्यांनी कसले ही राजकारण विकास कामामध्ये आणले नाही. लोकहित हीच एक भावना ठेवून त्यांनी कराड शहराचा विकास घडवून आणला. शहरामध्ये भुयारी गटार योजना, रस्ता रूंदीकरण अशा कामाबरोबरच प्राथमिक शाळा इमारती, बांधकाम, पाणी पुरवठ्याची सोय, भाजी मंडई, मार्केट, स्वच्छ, सुंदर व सांस्कृतिक वारसा जपणारे शहर असून कराडची ओळख त्यांनी निर्माण केला. तसेच कराड शहरामध्ये यशवंतराव चव्हाण स्मृती सदन सौ. वेणुताई चव्हाण स्मारक, समृद्ध ग्रंथालय, क्रीडांगणे, क्रीडा भवन, यशवंतराव चव्हाण समाधी, उद्यान, टॉऊन हॉल, सह्याद्री उद्योग समुह, कारखान्यामार्फत राबविलेल्या उपसा जलसिंचन योजना, शिक्षण संस्था अशा भव्य दिव्य वास्तू उभारून नगर विकासाचा मानदंड देशात निर्माण केला.[७०] तसेच पी. डी. पाटील यांनी केवळ आपल्याच मतदार संघाचा विचार न करता दुसऱ्या मतदार संघामध्ये ही आपले विकास कार्य ठेवून सर्वसामान्य शेतकऱ्यांना मदतीचा हात दिला. कोरेगाव तालुक्यामध्ये पी. डी. पाटील यांनी तारगाव, किरोकी, रहिमतपूर या भागातील जमिनी जिरायती होत्या त्यामुळे शेतकरी वर्षातून एकच पीक घेत असे. हे त्यांच्या लक्षात आल्यानंतर १० ऑक्टोबर १९८७ मध्ये श्री. जोतिर्लींग सहकारी पाणी पुरवठा संस्था किरोळी, २२ सप्टेंबर १९७४ श्री. बोरवन सर्वोदय सहकारी पाणीपुरवठा संस्था दुर्गळवाडी, १५ ऑक्टोबर १९८६ मधील श्री. ममता सहकारी पाणीपुरवठा संस्था, रिकिबदारवाडी इत्यादी ठिकाणच्या शेतीला पाणीपुरवठा करणाऱ्या अनेक सहकारी संस्था निर्माण करून शेकडो एकर जमिनी ओलीताखाली आणल्या. तसेच या संस्था सह तारगाव परिसरातील पाच सहकारी पाणी पुरवठा संस्था यामध्ये गणेश सहकारी पाणीपुरवठा संस्था, तारगाव उमा महेश्वर सहकारी पाणीपुरवठा संस्था, मोहितेवाडा इ. संस्था कारखान्याने ताब्यात घेऊन शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी उपलब्ध करून दिले. या सर्व संस्था मुळे सुमारे १२०० एकर जमिनी ओलीताखाली आल्या.[७१] तसेच १८५७ मध्ये कराड शहरामधील चावडी चौकात सुरू झालेल्या नगर वाचनालयाची अवस्था अत्यंत वाईट होती. वाचनालयाची इमारत मोडकळीस आली होती. अशा वेळी पी. डी. पाटील यांनी हे वाचनानक १९८७ मध्ये यशवंतराव चव्हाण स्मृती सदनामधील भव्य दालनामध्ये स्थलांतरीत केले. आणि त्यास

सांस्कृतिक चळवळीचे अग्रमानांकन प्राप्त करून दिले. या ग्रंथालयाच्या पुस्तक विभाग १०६ फुट लांब आणि ५६ फुट रूंद आहे. येथे ग्रंथालय शास्त्रातील अद्ययावत फर्निचर असून सुमारे दोन लाखाच्यावर पुस्तके आहेत. या ग्रंथालयास जोडून मागील बाजूस २५ फुट लांब व १७ फुट रूंदीच्या ४ खोल्या आहेत. या प्रत्येक खोलीमध्ये दैनिक, नियतकालिके, महिला व बालकल्याण असे विभाग व त्याच्या मागील बाजूस प्रशस्त अशा दोन गेस्ट रूम आहेत. सन १९९९ मध्ये या वाचनालयात ग्रंथाची संख्या ४० हजार ६६४ इतकी होती. ही संख्या आता ५४,००० पर्यंत पोहचली आहे. यामध्ये मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू, कन्नड, गुजराती इ. भाषेतील ग्रंथ आहेत.

या सर्व ग्रंथाची एकूण किंमत तब्बल तीन कोटी रूपये इतकी आहे. या वाचनालयात २५ दैनिके, १३ साप्ताहिके, ४ पाक्षिके, ६७ मासिके, ६ त्रैमासिके वार्षिके येत असून ग्रंथालयाची वर्गणीदार सभासद संख्या २७११ आहे. या वाचनालयातील संदर्भ ग्रंथाचा १९०३ पासूनचे जुने अंक शंभर वर्षापूर्वीची जुनी पंचाग पहावयास दिली जातात. पी. डी. पाटील यांच्या ९० व्या वाढदिवसाचे औचित्य साधून रविवार दिनांक १ जुलै २००७ रोजी इंटरनेट सुविधा सुरू केली असून या सेवेचा लाभ एम. पी. एस. सी. व यु. पी. एस. सी. या स्पर्धा परीक्षेस बसलेल्या तालुक्यातील हजारो विद्यार्थ्यांना होत आहे.[७२]

**तक्ता क्र. ४.१२**
**पी. डी. पाटील यांचे कार्य व संस्थेतील सहभाग**

| अ. नं. | साल | कार्य व भूषविलेले पद, सहभाग |
|---|---|---|
| १. | १९५२ | कराड नगरपंचायत नगरसेवक म्हणून निवड. |
| २. | १९५३ ते १९९६ | सलग ४३ वर्षे नगरपरिषदेचे अध्यक्ष. |
| ३. | १९५५ ते १९६० | कराड तालुका शेती उत्पन्न बाजार समितीचे अध्यक्ष. |
| ४. | १९५८ ते २००८ | श्री. शिवाजी शिक्षण संस्था कराडचे चेअरमन. |
| ५. | १९५९ ते १९६१ | कराड तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष व सातारा जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष. |
| ६. | १९६० ते १९६३ | विधानपरिषद सदस्य. |
| ७. | १९६३ ते १९६७ | कराड–उत्तर विधानसभा मधून निवड. |
| ८. | १९८० ते १९८५ | कराड–उत्तर विधानसभा मधून निवड. |

| अ. नं. | साल | कार्य व भूषविलेले पद, सहभाग |
|---|---|---|
| ९. | १९९५ ते १९९९ | कराड–उत्तर विधानसभा मधून निवड. |
| १०. | १९६४ ते १९६६ | महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ मुंबई सदस्य. |
| ११. | १९६६ ते १९८३ | प्रतिसंगम स. पाणीपुरवठा मंडळ–चेअरमन. |
| १२. | १९६९ ते १९९२ | सह्याद्री स. साखर कारखाना संस्थापक चेअरमन. |
| १३. | १९९५ ते २००८ | सह्याद्री स. बँक संस्थापक चेअरमन. |

**स्थापन केलेल्या संस्था**

| | |
|---|---|
| २६ ऑगस्ट १९६९ | सह्याद्री सहकारी साखर कारखाना यशवंतनगर |
| २५ मार्च १९६६ | समृद्धी सहकारी पाणीपुरवठा संस्था सुपने |
| २५ मार्च १९६६ | गो. का. क. सहकारी पाणीपुरवठा संस्था कराड |
| २९ मार्च १९६६ | नवकोयना स. पाणी पुरवठा संस्था तांबवे |
| २९ मार्च १९६६ | श्री. भैरवनाथ स. पाणी पु. संस्था चचेगाव |
| ९ जुलै १९८६ | सह्याद्री स. पा. पु. संस्था शिरवडे |
| २८ ऑक्टोबर १९७२ | श्री. सागरेश्वर स. पा. पु. संस्था साजुर |
| २८ ऑक्टोबर १९७२ | श्री. उमेश्वर स. पा. पु. संस्था उंब्रज |
| २५ जानेवारी १९८४ | संगम स. पा. पु. संस्था मुंढे |
| १० ऑक्टोबर १९८६ | श्री. चंद्रसेन स. पा. पु. संस्था वसंतगड |
| १३ ऑक्टोबर १९८६ | श्री. जोतिर्लिंग स. पा. पु. संस्था चरेगाव |
| २५ नोव्हेंबर १९८६ | भैरवनाथ स. पा. पु. संस्था खराडे |
| १३ ऑक्टोबर १९८६ | श्री. भाग्यलक्ष्मी स. पा. पु. संस्था अरेवाडी |
| ३ ऑक्टोबर १९९४ | श्री. एकेश्वरी स. पा. पु. संस्था तांबवे |
| २८ नोव्हेंबर १९७५ | श्री. यशवंत कृष्णा सहकारी पा. पु. संस्था कवठे |
| ३० नोव्हेंबर १९७५ | जोतिर्लिंग स. पा. पु. संस्था साकुर्डी |
| २६ जून १९८९ | श्री. गणेश स. पा. पु. संस्था तासवडे |
| ४ फेब्रुवारी १९७७ | हनुमान स. पा. पु. संस्था तासवडे |
| २० ऑगस्ट १९७७ | शिवाजी शिक्षण संस्थेचे महाविद्यालयीन सेवकांची सहकारी पतसंस्था लि. विद्यानगर |

| | |
|---|---|
| १६ मार्च १९९५ | सह्याद्री सहकारी बँक लि. कराड |
| २६ ऑक्टोबर २००९ | आदरणीय यशवंतराव चव्हाण ग्रा. बिं. सहकारी पतसंस्था लि. मलकापूर |

**बाळासाहेब पाटील** :

पी. डी. पाटील यांचे पुत्र बाळासाहेब पाटील सद्या कराड उत्तर विधानसभा मतदार संघाचे प्रतिनिधित्व करत आहेत. १९९५ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये मा. पी. डी. पाटील यांनी विजय मिळविल्यानंतर १९९९ ला राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेच्या कालखंडात पी. डी. पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला व १९९९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत कराड उत्तर मध्ये आपले पुत्र बाळासाहेब पाटील यांना राष्ट्रवादी काँग्रेसच्या तिकीटावर निवडून आणून आपला वारस राजकारणामध्ये सक्रीय केला. बाळासाहेब पाटील हे १९९९, २००४, २००९, २०१४, २०१९ या [७३] कालखंडात ५ वेळा कराड उत्तर विधानसभा मतदार संघाचे प्रतिनिधित्त्व करत आहेत. २००९ मध्ये त्यांनी अपक्ष उमेदवारीवर विजय प्राप्त केला. तर २०१९ मध्ये उद्धव ठाकरे यांच्या मंत्रीमंडळात सहकार कॅबिनेट मंत्री म्हणून त्यांनी काम पाहिले. २०२३ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये झालेल्या फुटीत ते निष्ठावंत शरद पवार गटाबरोबर राहिलेले दिसून येतात. आज ते सह्याद्री सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून चेअरमनपदी कामकाज करताना संपूर्ण मतदार संघावर पकड ठेवून आहेत. त्यांचे एक भाऊ सुभाष पाटील कराड नगरपालिकेत नगरसेवक म्हणून काम पाहतात.[७४] तर एक भाऊ प्रकाश पाटील हे शिवाजी शिक्षण संस्थेचा कारभार पाहतात. तर एक भाऊ अशोक पाटील सह्याद्री सहकारी बँकेचा कारभार पाहतात. बाळासाहेब पाटील यांनी २०१९ मध्ये सह्याद्री सहकारी साखर कारखान्याची निवडणूक बिनविरोध करून त्यामध्ये आपला मुलगा जसराज पाटील यांना साखर कारखान्याचे संचालक करून भविष्यामध्ये राजकारणात आपला राजकीय वारसा पुढे आणण्याचा प्रयत्न केला आहे. वरील विवेचनावरून असे दिसून येते की, शिक्षण संस्था, सहकारी संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था यामध्ये आपले नातेवाईक आणि आप्त यांना सक्रीय केलेले दिसते. त्याचबरोबर मतदार संघांच्या विकासाकडे, प्रगतीकडेही जातीने लक्ष देऊन मतदार संघातील जनतेबरोबर संपर्क ठेवून राजकीय पकड कायम ठेवलेली दिसून येते.

**पाटणकर घराणे** :

पाटणकर घराणे हे ऐतिहासिक चालुक्यवंशीय घराणे होय. या घराण्याचा संबंध कोल्हापूरच्या छत्रपती घराण्याशी आहे. हे कोयणा खोऱ्यातील संस्थानिक घराणे होय. स्वातंत्र्यानंतर या घराण्यातील विक्रमसिंह पाटणकर यांनी १९८० मध्ये एस काँग्रेसच्या उमेदवारीवर निवडणूक लढविली. पण बाळासाहेब देसाई यांच्याकडून त्यांचा पराभव झाला. १९८५ च्या विधानसभा निवडणुकीत बाळासाहेब देसाई यांच्या मृत्यूनंतर त्यांचे पुत्र शिवाजीराव देसाई यांना काँग्रेसने उमेदवारी दिली. या निवडणुकीत विक्रमसिंह पाटणकर यांनी शिवाजीराव देसाई यांचा पराभव केला व ३५ वर्षांचे बाळासाहेब देसाई यांच्या घराण्याची पाटणघराण्यांवरील वर्चस्व मोडून काढले. १९९० मध्ये त्यांनी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश केला व विधानसभा निवडणुकीत विजयी झाले. १९९५ मध्ये त्यांनी काँग्रेसकडून निवडणूक लढवून विजय प्राप्त केला. १९९९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेनंतर पाटणकर यांनी काँग्रेसमधून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला व पाटण मतदार संघातून विजय प्राप्त केला. १९९९–२००४ या कालखंडात त्यांना महाराष्ट्र मंत्रीमंडळात सार्वजनिक बांधकाम कॅबिनेट मंत्री म्हणून काम करण्याची संधी प्राप्त झाली.[७५] पण २००४ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांचा शंभुराजे देसाई यांच्याकडून पराभव झाला. परत २००९ च्या विधानसभा निवडणुकीत पाटणकर यांनी विजय प्राप्त केला. पण २०१४ च्या निवडणुकीत त्यांचा परत शंभुराजे देसाई यांच्याकडून पराभव झाला. पाटण मतदारसंघ म्हटला की देसाई व पाटणकर या दोन परंपरागत घराण्यांमध्येच आज अखेर लढती झालेल्या आहेत. तिसरा कोणताही उमेदवार विजयी झालेला नाही. विक्रमसिंह पाटणकर यांनी विविध कामांच्या माध्यमातून मतदार संघावर पकड निर्माण केली होती. कोयना शिक्षण संस्थेच्या माध्यमातून महाविद्यालय, डी.एड्., बी.एड्. व इतर माध्यमिक संस्थांचे जाळे तालुक्याभर निर्माण केले. त्याचबरोबर कोयना सहकारी दूध उत्पादन संस्थेच्या माध्यमातून सकस दूध उत्पादने आपला वेगळा ब्रँड निर्माण केला आहे. कोयना नदीच्या दोन्ही बाजूचा भाग सोडला तर पाटण विधानसभा मतदारसंघ हा पूर्णपणे डोंगराळ व जंगलरहित मतदारसंघ म्हणून ओळखला जातो. या मतदारसंघामध्ये पाटणकर घराण्याचा प्रभाव निर्माण केला आहे.

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीत विक्रमसिंह पाटणकर यांनी आपले पुत्र सत्यजित पाटणकर यांना राष्ट्रवादी काँग्रेसकडून उभे केले पण त्यांना पराभव पत्करावा लागला. सत्यजित

पाटणकर यांचा पराभव झाला असला तरी जिल्हा मध्यवर्ती बँकेचे ते संचालक आहेत. तसेच जिल्हा परिषद व पंचायत समितीवर त्यांचे नियंत्रण आहे. शंभुराजे देसाई यांच्या विरोधी एक प्रबळ गट म्हणून पाटणकर घराण्यांचा प्रभाव पाटणमध्ये आजही असलेला दिसतो.

**मदन पिसाळ** :

वाई विधानसभा मतदारसंघामध्ये मदन पिसाळ यांनी आपली एक ओळख निर्माण केलेली आहे. त्यांनी आपल्या राजकीय जीवनाची सुरुवात १९६२ मध्ये बावधन जिल्हा परिषद गटातून विजयी होऊन केली. १९६७ मध्ये त्यांनी बावधन गटामध्ये विजय प्राप्त केला. १९८० मध्ये वाई विधानसभा मतदारसंघात त्यांचा काँग्रेस आयचे प्रतापराव भोसले यांच्याकडून पराभव झाला. १९८४ मध्ये यशवंतराव चव्हाण यांच्या मृत्यूनंतर सातारा लोकसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी वाई विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रतापराव भोसले यांना प्राप्त झाली. ते १९८४ मध्ये लोकसभेवर निवडून गेले. तर १९८५ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाची उमेदवारी मदन पिसाळ यांना प्राप्त झाली. १९८५ व १९९० या काळात त्यांनी काँग्रेस पक्षाकडून वाई विधानसभा मतदार संघातून विजय प्राप्त केला. १९९५ मध्ये वाई विधानसभा मतदार संघातून अपक्ष म्हणून विजयी झाले. तर १९९९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेवेळी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करून १९९९ ची विधानसभा विजयी झाले. त्यांना महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळात रोजगार हमी राज्यमंत्री म्हणून संधी प्राप्त झाली. पुढे ते विधानसभा निवडणुकीत उभे राहिले नाहीत. पण त्यांनी वाई विधानसभा मतदारसंघामध्ये जनसंपर्क व्यक्तीगत कामे व वाई सहकारी सूतगिरणी यांच्या माध्यमातून कार्यकर्त्यांचे जाळे तयार केले. त्यांचा मुलगा शशिकांत पिसाळ १९९२ ते १९९७ जिल्हा परिषद सदस्य तर २००७ ते २०१२ जिल्हा परिषद कृषी सभापती होते.[७६] त्यांच्या सून अरुणादेवी शशिकांत पिसाळ या २०१२ मध्ये सातारा जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा म्हणून कार्यरत होत्या. हे पिसाळ घराणे वाई विधानसभा मतदार संघापुरते आपला प्रभाव निर्माण करून राहिलेले दिसून येते.

**शशिकांत शिंदे** :

सातारा जिल्ह्यातील एक प्रभावी व उगवते नेतृत्त्व म्हणून शशिकांत शिंदे यांच्याकडे पाहिले जाते. त्यांना घराण्याचा राजकीय वारसा नाही. पण स्व कर्तृत्वाने जिल्ह्याच्या व राज्याच्या राजकारणात एक आपल्या कामाच्या आधारे वेगळा प्रभाव निर्माण करून आहेत.


त्यांची ओळख खऱ्या अर्थाने माथाडी कामगार संघटनेचे नेते म्हणून केली जाते. १९९९ ला राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेवेळी जावली विधानसभा मतदारसंघातून या मुंबईमध्ये काम करणाऱ्या माथाडी कामगार नेत्यास उमेदवारी देण्यात आली. त्यांनी शिवसेनेचे आमदार सदाशिव सपकाळ यांचा पराभव केला व खऱ्या अर्थाने जिल्ह्याच्या राजकारणात प्रवेश केला. २००४ मध्ये परत एकदा ते जावली विधानसभा मतदारसंघातून निवडून गेले.[७७] २००९ मध्ये मतदारसंघ पुर्नरचनेमध्ये जावली मतदारसंघ रद्द झाला. यावेळेस राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने त्यांचे पुर्नवर्सन करण्याच्या हेतूने शेजारी कोरेगावर संघामधून त्यांना विधानसभेची उमेदवारी दिली. दुसऱ्या मतदारसंघातील असताना सुद्धा त्यांनी आमदार शालिनीताई पाटील यांचा पराभव केला. २०१४ मध्येही ते कोरेगाव मतदारसंघामधून विजयी झाले. २०१८ मध्ये ते महाराष्ट्र मंत्रीमंडळात कृष्णा खोरे, पाटबंधारे जलसंपदा मंत्री म्हणून त्यांची निवड झाली. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत मात्र त्यांचा पराभव शिवसेनेचे महेश शिंदे यांच्याकडून झाला. पण राष्ट्रवादी काँग्रेसचे एक प्रभावी नेते म्हणून २०२० मध्ये त्यांची निवड विधानपरिषदेवर करण्यात आली. व्यक्तीगत जनसंपर्क, मेढा येथे महाविद्यालयाची स्थापना, माथाडी कामगारांचे नेते इत्यादींच्या माध्यमातून ते राजकारणात सक्रीय आहेत. त्यांना घराण्यांचा वारसा नसला तरी स्वकर्तृत्वाने त्यांनी आपला प्रभाव जिल्ह्याच्या व राज्याच्या राजकारणावर निर्माण केला आहे. आपल्या मुलाला ते राजकारणात सक्रीय करण्याचा प्रयत्न करत आहेत.

**प्रश्नावलीच्या माध्यमातून आलेल्या माहितीच्या आधारे करण्यात आलेले विश्लेषण व सादरीकरण:**

**तक्ता क्रमांक ४.१३**

**राजकीय घराण्याने विविध सहकारी संस्था मार्फत रोजगार निर्मिती केली आहे काय?**

| मतदार संघ | सातारा | पाटण | पाटण | कराड द. | कराड द. | कराड उ. | फलटण | वाई | वाई | वाई |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| घराणी | भोसले | देसाई | पाटणकर | चव्हाण | पाटील | पाटील | निंबाळकर | पाटील | भोसले | पिसाळ |
| होय | ७८ | ६४ | ३० | १० | ५२ | ७२ | ६४ | ६२ | ६२ | ७२ |
| नाही | १५ | १० | ४० | ७२ | २४ | ८ | ८ | ८ | १८ | १७ |
| सांगता येत नाही | ७ | २६ | ३० | १८ | २४ | २० | २८ | ३० | २० | ११ |





तक्ता क्रमांक ४.१३ व आलेखावरून असे दिसून येते की, सातारा जिल्ह्यातील राजकीय घराण्यांची सहकारी संस्थामार्फत जनतेला रोजगार निर्माण करण्यास मदत केलेली आहे. असे प्रश्नावलीच्या संकलनावरून लक्षात येते. या अभ्यासाठी निवडलेल्या १० राजकीय घराण्यांपैकी साताराचे भोसले, कराड उत्तरचे पाटील, वाईचे पिसाळ, पाटणचे देसाई घराण्यांचे योगदान अधिक आहे. परंतु कराडच्या चव्हाण व पाटणच्या पाटकर घराण्यांच्या सहभाग कमी आढळतो. १० घराण्यांपैकी ८ घराण्यांचे कार्य

उल्लेखनीय आहे. जनतेला सहकारी संस्थांमधून रोजगार देवून त्यांच्या कुटुंबियांना आर्थिकदृष्ट्या सबल व सक्षण बनविण्याचे काम या राजकीय घराण्यांनी केलेले आहे असे दिसते.

**तक्ता क्रमांक ४.१४**

**राजकीय घराण्याचे, नेतृत्त्वाचे प्रभावक्षेत्र कोणते आहे?**

| मतदार संघ | सातारा | पाटण | पाटण | कराड द. | कराड द. | कराड उ. | फलटण | वाई | वाई | वाई |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| घराणी | भोसले | देसाई | पाटणकर | चव्हाण | पाटील | पाटील | निंबाळकर | पाटील | भोसले | पिसाळ |
| तालुका | १२ | १२ | ४८ | ४ | १२ | १० | ५ | १२ | ७२ | ६२ |
| जिल्हा | ३६ | २४ | ३० | १० | ७६ | ६८ | १२ | ८२ | २२ | ३८ |
| राज्य | ४५ | ६४ | २२ | ४२ | १२ | २२ | ८३ | ६ | ६ | ० |
| राष्ट | ७ | ० | ० | ४४ | ० | ० | ० | ० | ० | ० |





तक्ता क्रमांक ४.१४ व आलेखावरून असे दिसून येते की, राजकीय घराण्यांचे, नेतृत्त्वाचे प्रभावक्षेत्र विचारकरता मुलाखत संकलनावरून असे लक्षात येते की, पाटणकर, वाईचे–पसाळ, भोसले यांचे तालुका स्तरीय नेतृत्त्व असल्याचे दिसते तर वाईचे पाटील, कराड उत्तरचे पाटील, कराड दक्षिण पाटील घराणे यांचे जिल्हा क्षेत्रात प्रभावी असलेले दिसतात. फलटणचे निंबाळकर, पाटण–देसाई, सातारा–भोसले हे राज्य स्तरीय नेतृत्व म्हणून पुढे आलेले आहे. कराड द. चव्हाण घराणे वगळता सातारच्या राजकीय घराण्यात

राष्ट्रीय पातळीवरील नेतृत्त्व दिसून येत नाही. उर्वरित राजकीय घराणी ही तालुका जिल्हा पातळीवरती प्रभावी असलेले दिसून येतात.

**तक्ता क्रमांक ४.१५**

**सत्तेच्या विकेंद्रीकरणात या राजकीय घराण्याने सामान्य कार्यकर्त्याला इतर ठिकाणी नेतृत्त्वाची संधी दिली आहे काय?**

| मतदार संघ | सातारा | पाटण | पाटण | कराड द. | कराड द. | कराड उ. | फलटण | वाई | वाई | वाई |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| घराणी | भोसले | देसाई | पाटणकर | चव्हाण | पाटील | पाटील | निंबाळकर | पाटील | भोसले | पिसाळ |
| होय | ७२ | ७६ | ५४ | ८४ | ६४ | ४५ | ४२ | ७१ | २५ | ३८ |
| नाही | १५ | १४ | २० | ६ | २० | १० | ३५ | ७ | ३८ | १८ |
| सांगता येत नाही | १३ | १० | २६ | १० | १६ | ४५ | २३ | २२ | ३७ | ४४ |





तक्ता क्रमांक ४.१५ व आलेखावरून असे दिसून येते की, सत्तेच्या विकेंद्रीकरणा प्रक्रियेत राजकीय घराण्यांच्या नेतृत्त्वाने इतरांना संधी दिलेली आहे काय हे प्रश्नावली संकलनाच्या माध्यमातून पाहता १० पैकी ८ राजकीय घराण्यांनी सामान्य कार्यकर्त्यांस इतर ठिकाणी नेतृत्त्वाची संधी दिलेली आहे. यामध्ये दक्षिण कराडचे चव्हाण घराण्याने सर्वाधिक पुढाकार घेतलेला असून सातारा भोसले, देसाई, वाई पाटील यांना अनुक्रमे पसंतीक्रम असलेला दिसतो. तर वाईचे भोसले, पिसाळ यांच्याबाबत संदिग्ध मत असलेले

दिसते. स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी साखर कारखाने, जिल्हा मध्यवर्ती बँक, दूध संघ इत्यादी ठिकाणी राजकीय घराण्यांनी आपल्या कार्यकर्त्यांना नेतृत्त्व करण्याची संधी दिलेली आहे, असे निरीक्षणावरून दिसून येते.

**तक्ता क्रमांक ४.१६**

**राजकीय घराण्यातील महिला सदस्य राजकारणात सक्रीय आहेत काय?**

| मतदार संघ | सातारा | पाटण | पाटण | कराड द. | कराड द. | कराड उ. | फलटण | वाई | वाई | वाई |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| घराणी | भोसले | देसाई | पाटणकर | चव्हाण | पाटील | पाटील | निंबाळकर | पाटील | भोसले | पिसाळ |
| होय | १० | ६ | १० | ० | ० | ६ | ६२ | ० | ६ | ६५ |
| नाही | ७८ | ६४ | ७४ | ७२ | ६४ | ६५ | १२ | ६८ | ६५ | ५ |
| सांगता येत नाही | १२ | ३० | १६ | २८ | ३६ | २९ | २६ | ३२ | २९ | ३० |





तक्ता क्रमांक ४.१६ व आलेखावरून असे दिसून येते की, सातारा जिल्ह्यातील राजकीय घराण्यांतील महिला राजकारणातील सहभागाबद्दल प्रश्नावलीचे संकलनातून अभ्यास करता फलटणचे निंबाळकर व वाईचे पिसाळ घराणे वगळता इतर कोणत्याही राजकीय घराण्यांने आपल्या कुटुंबातील महिलांना राजकारणात सक्रीय केलेले नाही, असे दिसते. कराडच्या चव्हाण घराण्यातील कै. प्रेमलाताई वगळता राजकीय वारस म्हणून

कुठेही महिला नेतृत्त्व पुढे आलेले नाही. यावरून असे दिसून येते की, बहुतांश राजकीय घराणी ही आपल्या राजकीय वारस मुलांच्या माध्यमातून पुढे आणताना दिसतो.

**तक्ता क्रमांक ४.१७**

**मतदार संघातील सर्वसामान्याचे प्रश्न, समस्या सोडविण्यासंदर्भात वर्तमान नेतृत्त्वाच्या भूमिकेबद्दल आपले मत काय?**

| मतदार संघ | सातारा | पाटण | पाटण | कराड द. | कराड द. | कराड उ. | फलटण | वाई | वाई | वाई |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| घराणी | भोसले | देसाई | पाटणकर | चव्हाण | पाटील | पाटील | निंबाळकर | पाटील | भोसले | पिसाळ |
| उत्कृष्ठ | १६ | ५६ | २४ | ४४ | १० | ३२ | ६७ | ६४ | २२ | ५ |
| चांगले | २८ | ३० | ६० | ३६ | ३० | ३६ | २२ | २२ | ३४ | १५ |
| सामान्य | ४२ | ६ | १० | १० | ३४ | ८ | ५ | ७ | २४ | २५ |
| सांगता येत नाही | १४ | ८ | ६ | १० | २६ | २४ | ६ | ७ | २० | ५५ |





तक्ता क्रमांक ४.१७ व आलेखावरून असे दिसून येते की, मतदार संघातील सर्व सामान्यांचे प्रश्न, समस्या सोडविण्याच्या भूमिकेबद्दल प्रश्नावलीच्या साह्याने संकलनाचे अवलोकन केले असता फलटणचे निंबाळकर, वाईचे पाटील, पाटण – देसाई या राजकीय घराण्यांच्या वरचा नंबर उत्कृष्ठ म्हणून लागतो. लोकांची पसंती या नेतृत्त्वाला असलेली दिसते. पाटणकर, चवहाण, कराड उत्तर पाटील यांचा नंबर त्यांच्यानंतर चांगला म्हणून लागतो. सामान्य म्हणून सातारा भोसले कराड द. पाटील यांना पसंती असलेली

दिसते. तर वाईचे – पिसाळ घराण्यांचे नेतृत्त्व हे विधानसभा, लोकसभा यांचे प्रतिनिधी नसून ते स्थानिक स्वराज्य संस्था पुरते मर्यादित असल्यामुळे त्यांच्याबद्दल सांगता येत नाही, अशी प्रतिक्रिया असलेली दिसते.

**तक्ता क्रमांक ४.१८**

**राजकीय घराण्याचे नेतृत्त्व विविध सहकारी संस्था, संघटनांचे नेतृत्त्व करतात काय?**

| मतदार संघ | सातारा | पाटण | पाटण | कराड द. | कराड द. | कराड उ. | फलटण | वाई | वाई | वाई |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| घराणी | भोसले | देसाई | पाटणकर | चव्हाण | पाटील | पाटील | निंबाळकर | पाटील | भोसले | पिसाळ |
| होय | ८७ | ६६ | ४४ | ८ | ६४ | ८४ | ७६ | ८२ | ५८ | ५५ |
| नाही | ५ | १० | ४० | ७२ | १२ | ५ | १२ | ६ | ८ | ६ |
| सांगता येत नाही | ८ | २४ | १६ | २० | २४ | ११ | १२ | १२ | ३४ | ३९ |





तक्ता क्रमांक ४.१८ व आलेखावरून असे दिसून येते की, राजकीय घराण्याचे नेतृत्त्व हे विविध सहकारी संस्था संघटनांचे नेतृत्त्व करतात काय यांचा अभ्यास प्रश्नावली संकलन माध्यमातून करता सातारचे भोसले घराणे हे विविध सहकारी संख्या त्या नेतृत्त्वाच्या बाबातीत आघाडीवर असलेले पहावयास मिळते. यानंतर कराड उत्तर पाटील, वाई –पाटील, निंबाळकर ही घराणी विविध संस्था, संघटनांचे नेतृत्त्व करताना दिसतात. यामध्ये फक्त कराडचे चव्हाण घराणे हे विविध संख्या, संघटनांचे नेतृत्त्व करताना दिसत

नाही. हे चव्हाण घराणे राष्ट्रीय राजकारणात सक्रिय असल्याने स्थानिक पातळीवरती संख्यात्मक नेतृत्त्व त्यांनी केलेले दिसत नाही, असे निरीक्षणामधून दिसून येते.

**तक्ता क्रमांक ४.१९**

**राजकीय घराण्याच्या कार्याने मतदार संघाचा विकास झाला आहे असे वाटते काय?**

| मतदार संघ | सातारा | पाटण | पाटण | कराड द. | कराड द. | कराड उ. | फलटण | वाई | वाई | वाई |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| घराणी | भोसले | देसाई | पाटणकर | चव्हाण | पाटील | पाटील | निंबाळकर | पाटील | भोसले | पिसाळ |
| होय | ५६ | ६४ | २२ | ७६ | ५० | ७२ | ६२ | ७२ | २८ | १५ |
| नाही | २२ | ६ | ३२ | ८ | २४ | १२ | २२ | १४ | ३९ | ३३ |
| सांगता येत नाही | २२ | ३० | ४६ | १६ | २६ | १६ | १६ | १४ | ३३ | ५२ |





तक्ता क्रमांक ४.१९ व आलेखावरून असे दिसून येते की, राजकीय घराण्यांच्या कार्याने मतदार संघाचा विकास झाला आहे काय? या बाबत प्रश्नावली संकलनाच्या माध्यमातून अभ्यास करता कराड दक्षिण चव्हाण, कराड उत्तर पाटील, वाई पाटील, फलटण, निंबाळकर यांचा क्रमांक वरचा लागतो. वाई, भोसले, घराण्याबद्दल जनतेची पसंती नसलेली दिसते तर पिसाळ घराणेबद्दल सांगता येत नाही. अशी प्रतिक्रीया आहे. यावरून असे दिसते की, वाई मतदार संघामध्ये पाटील घराणे प्रभावी घराणे असून भोसले हे दोन नंबरचे तर पिसाळ हे तृतीय क्रमांकाचे घराणे ठरत आहे. इतर ठिकाणी

प्रत्येक राजकीय घराणी ही आप आपल्या मतदार संघात विकासासाठी प्रयत्नशिल असलेली दिसतात.

**तक्ता क्रमांक ४.२०**

**राजकीय घराण्यातील नेतृत्त्वाने पक्ष बदल केल्यास आपणास मान्य आहे काय?**

| मतदार संघ | सातारा | पाटण | पाटण | कराड द. | कराड द. | कराड उ. | फलटण | वाई | वाई | वाई |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| घराणी | भोसले | देसाई | पाटणकर | चव्हाण | पाटील | पाटील | निंबाळकर | पाटील | भोसले | पिसाळ |
| होय | ६२ | ६८ | ३० | ४४ | ३६ | ६५ | ६५ | ६२ | ६२ | २२ |
| नाही | २४ | १० | ५० | ३२ | ४८ | २२ | २३ | २६ | १८ | ३६ |
| सांगता येत नाही | १४ | २२ | २० | २४ | १६ | १३ | १२ | १२ | २० | ४२ |





तक्ता क्रमांक ४.२० व आलेखावरून असे दिसून येते की, राजकीय घराण्यांतील नेतृत्त्वाने पक्ष बदल केल्यास त्या मतदार संघातील मतदारांच्या भूमिकेबद्दल प्रश्नावली द्वारे अभ्यास केला असता देसाई, निंबाळकर, कराड उत्तर पाटील, वाई–पाटील, भोसले, सातारा – भोसले इ. राजकीय घराण्यांचा पाठिशी त्या त्या मतदार संघातील मतदार नेतृत्त्वाने पक्ष बदल केल्यास नेतृत्वा बरोबर असल्याचे दिसते. यावरून असे दिसून येते की या राजकीय घराण्यांचे वर्चस्व त्या मतदार संघावर आहे. राजकीय पक्षापेक्षा व्यक्ती निष्ठा या मतदार संघामध्ये असलेली दिसते. पाटण–पाटणकर, कराड द. चव्हाण पाटील,

वाई–पिसाळ या घराण्यांच्याबद्दल त्या त्या पक्षाची एकनिष्ठा नेतृत्वाने रहावे, असे एकंदरीत दिसून येते.

**तक्ता क्रमांक ४.२१**

**समकालीन राजकीय परिस्थितीत आपल्या मतदार संघातील घराणी नेतृत्त्व करण्यास प्रभावी आहे काय?**

| मतदार संघ | सातारा | पाटण | पाटण | कराड द. | कराड द. | कराड उ. | फलटण | वाई | वाई | वाई |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| घराणी | भोसले | देसाई | पाटणकर | चव्हाण | पाटील | पाटील | निंबाळकर | पाटील | भोसले | पिसाळ |
| होय | ७३ | ७६ | ३४ | ७२ | २० | ६८ | ८२ | ७७ | २४ | १२ |
| नाही | ५ | ६ | ५४ | ६ | ५० | १० | ५ | १२ | ३८ | ६४ |
| सांगता येत नाही | २२ | १८ | १२ | २२ | ३० | २२ | १३ | ११ | ३८ | २४ |






तक्ता क्रमांक ४.२१ व आलेखावरून असे दिसून येते की, सद्यकालिन राजकीय स्थितीत मतदार संघातील राजकीय घराणे नेतृत्त्व करण्यास सक्षम आहे काय याचे प्रश्नावली संकलनाच्या माध्यमातून अवलोकन केले असता. निंबाळकर, वाई पाटील, भोसले, देसाई, कराड चव्हाण, कराड उत्तर पाटील ही राजकीय घराणी त्या त्या मतदार संघामध्ये सध्या प्रभावी सक्षमपणे नेतृत्त्व करतात यांना मतदार संघातील मतदारांची पसंती असलेली दिसते. तर वाई पिसाळ, पाटणकर, कराड दक्षिण पाटील या राजकीय घराण्यांतील नवनेतृत्त्व हे सद्यःकालिन परिस्थितीतील मतदार संघात प्रभावी नाही, असे दिसून येते.

### तक्ता क्रमांक ४.२२

### राजकीय घराण्यांच्या प्रभावामुळे इतर नविन नेतृत्त्व विकसित होत नाही असे वाटते का?

| मतदार संघ | सातारा | पाटण | पाटण | कराड द. | कराड द. | कराड उ. | फलटण | वाई | वाई | वाई |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| घराणी | भोसले | देसाई | पाटणकर | चव्हाण | पाटील | पाटील | निंबाळकर | पाटील | भोसले | पिसाळ |
| होय | ८३ | ४४ | ४४ | ३० | ४० | ६२ | ६५ | ५८ | २६ | १४ |
| नाही | ९ | ३० | १४ | ६० | १६ | ३२ | २५ | २२ | ५२ | ६२ |
| सांगता येत नाही | ८ | २६ | ४२ | १० | ४४ | ६ | १० | २० | २२ | २४ |




तक्ता क्रमांक ४.२२ व आलेखावरून असे दिसून येते की, राजकीय घराण्यांच्या प्रभावामुळे इतर नवीन नेतृत्त्व विकसित होत नाही, असे वाटते का? याचे प्रश्नावली संकलनाच्या माध्यमातून अभ्यास करता सातारा – भोसले, निंबाळकर, कराड उत्तर पाअील, वाई – पाटील इ. राजकीय घराण्यांबद्दल त्या त्या मतदार संघातील मतदार हे बहुमताने होकारअर्थी सहमती असलेली दिसते. याचाच अर्थ असा की, या राजकीय घराण्यांच्या मतदार संघात इतर नवीन नेतृत्त्व विकसित होत नाही. तर यात राकीय घराण्यांचा प्रभाव या मतदार संघावर असलेला दिसतो. तर कराड दक्षिण चव्हाण, वाई– भोसले, पिसाळ, या घराण्यांच्या बद्दल माहिती या मतदार संघातील मतदार नवीन नेतृत्त्व निर्माण होत आहे, असे मत मांडताना दिसतात.


तर संपूर्ण सातारा जिल्ह्यातील प्रश्नावली संकलनाच्या अभ्यास करता ४७ टक्के मतदारांच्या मते, राजकीय घराण्यांच्या मुळे इतर नव नेतृत्त्व विकसीत होत नाही. तर ३८ टक्के मतदारांच्या मते, नवनेतृत्त्व विकसित होऊ शकते. असा विश्वास वाटतो. २१ टक्के मतदार यांना दोन्हीही मत मान्य नाही, असे दिसते. यावरून असे दिसून येते की, राजकीय घराण्यांच्या प्रभावामुळे सातारा जिल्ह्यामध्ये राजकीय घराण्यांच्या व्यतिरिक्त इतर नेतृत्त्व विकसित हात नाही, यास बहुमताने सहमती असलेली दिसते.

**तक्ता क्रमांक ४.२३**

**राजकीय घराणेशाही लोकशाही व्यवस्थेसाठी अडसर ठरत आहे असे आपणास वाटते काय?**

| मतदार संघ | सातारा | पाटण | पाटण | कराड द. | कराड द. | कराड उ. | फलटण | वाई | वाई | वाई |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| घराणी | भोसले | देसाई | पाटणकर | चव्हाण | पाटील | पाटील | निंबाळकर | पाटील | भोसले | पिसाळ |
| होय | ३८ | ६२ | ६४ | ४४ | १६ | ४२ | ६२ | ६२ | ६५ | ७५ |
| नाही | ४५ | १४ | १० | ४० | ४४ | ४५ | १८ | २४ | १५ | ५ |
| सांगता येत नाही | १७ | २४ | २६ | १६ | ४० | १३ | २० | १४ | २० | २० |





तक्ता क्रमांक ४.२३ व आलेखावरून असे दिसून येते की, राजकीय घराणेशाही लोकशाही व्यवस्थेसाठी अडसर ठरत आहे काय असे प्रश्नावली संकलनावरून पाहिले असता ५३ टक्के लोकांना राजकीय घराणेशाही ही लोकशाही व्यवस्थेतील अडसर वाटत आहे. वाई–पिसाळ, पाटणकर, देसाई इत्यादी घराण्या संदर्भात लोकशाही ही घराणेशाही ही अडसर वाटत आहे. एकूण १० राजकीय घराण्यांपैकी ७ ठिकाणी राजकीय घराणेशाहीमुळे लोकशाही व्यवस्थेवर मर्यादा येत आहे, असे दिसते. तर सातारा भोसले, कराड उत्तर – पाटील, कराड दक्षिणचे पाटील या राजकीय घराणेशाही मध्ये लोकशाहीस


घराणे नाही अडसर ठरत नाही, असे मत मतदारांनी मांडलेले आहे. एकंदर पाहता संपूर्ण सातारा जिल्ह्यातील मतदारांनी राजकीय घराणेशाही ही लोकशाही व्यवस्थेला अडसर वाटत आहे, असे ५३ टक्के मत मांडलेले आहे. फक्त २५ टक्के लोकांच्या मध्ये राजकीय घराणेशाही लोकशाही व्यवस्थेला अडसर नाही असे वाटते. सातारा भोसले घराणे हे छत्रपती शिवाजी महाराजांचे वारस असल्यामुळे या मतदार संघातील जनतेची सहानभूती या घराण्याबद्दल असलेली दिसते. यावरून असे दिसते की, सातारा जिल्ह्यामध्ये राजकीय घराणेशाही ही प्रभावी असून जनतेच्या मनामध्ये या राजकीय घराणेशाहीबद्दल नाराजीचे वातावरण दिसून येत आहे.

**तक्ता क्रमांक ४.२४**

**राजकीय घराण्यांच्या आर्थिक प्रभावामुळे त्यांच्या विरोधी सर्वसामान्य व्यक्ती निवडणूक लढवू शकत नाही असे आपणास वाटते काय?**

| मतदार संघ | सातारा | पाटण | पाटण | कराड द. | कराड द. | कराड उ. | फलटण | वाई | वाई | वाई |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| घराणी | भोसले | देसाई | पाटणकर | चव्हाण | पाटील | पाटील | निंबाळकर | पाटील | भोसले | पिसाळ |
| होय | ८५ | ७२ | ६८ | ३६ | ३२ | ५२ | ६५ | ५६ | ७२ | ६२ |
| नाही | १० | १० | १२ | ३८ | ४० | २५ | २० | २३ | ८ | ८ |
| सांगता येत नाही | ५ | १८ | २० | २६ | २८ | २३ | १५ | २१ | २० | ३० |







तक्ता क्रमांक ४.२४ व आलेखावरून असे दिसून येते की, राजकीय घराण्यांच्या आर्थिक प्रभावामुळे त्यांच्या विरोधी सर्व सामान्य व्यक्ती निवडणूक लढवू शकत नाही, असे आपणाला वाटते काय, असे प्रश्नावली संकलनाच्या माध्यमातून अभ्यास केला असता ६० टक्के लोकांच्या मते सर्व सामान्य व्यक्ती निवडणूक लढवू शकत नाही. सातारा भोसले, वाई, भोसले, देसाई, पाटणकर, पिसाळ या राजकीय घरायाच्या ठिकाणी सर्व सामान्य व्यक्ती घराण्यांच्या आर्थिक प्रभावापुढे निवडणूक यशस्वी होऊ शकत नाही, असे दिसून येते. तर कराड द. चव्हाण व पाटील राजकीय घराण्यांच्याबद्दल सर्व सामान्य व्यक्ती निवडणूक लढवू शकेल, असे सकारात्मक मत दिसते. तरी एकंदर सातारा जिल्ह्यातील मतदारांचा विचार करता ६० टक्के मतदारांच्या मते या राजकीय घराण्यांच्या प्रभावामुळे सामान्य नेतृत्त्व निर्माण होऊ शकत नाही. तर २१ लोकांच्या मते सदरच प्रश्नांचे उत्तर सांता येत नाही. फक्त १९ टक्के लोकांच्या मते सर्व सामान्य व्यक्ती निवडणूक लढवू शकेल. वरील विश्लेषणावरून असे दिसून येते की, सातारा जिल्ह्यातील राजकीय घराणी ही आर्थिक संपन्न असून सर्व सामान्य मतदार व राजकीय घराणी असे आर्थिक विभाजन झालेले दिसून येते.

**तक्ता क्रमांक ४.२५**

**राजकीय घराणेशाहीतील नेतृत्वाशिवाय राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या उच्चशिक्षित, कार्यक्षम नेतृत्त्वास आपण स्विकाराल काय?**

| मतदार संघ | सातारा | पाटण | पाटण | कराड द. | कराड द. | कराड उ. | फलटण | वाई | वाई | वाई |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| घराणी | भोसले | देसाई | पाटणकर | चव्हाण | पाटील | पाटील | निंबाळकर | पाटील | भोसले | पिसाळ |
| होय | ४५ | ६८ | ६६ | ६४ | ४६ | ६२ | ४८ | ६५ | ४२ | ७२ |
| नाही | ९ | १२ | १२ | ६ | १२ | ६ | ७ | ६ | १२ | ७ |
| सांगता येत नाही | ४६ | २० | २२ | ३० | ४२ | ३२ | ४५ | २९ | ४६ | २१ |





तक्ता क्रमांक ४.२५ व आलेखावरून असे दिसून येते की, राजकीय घराणेशाही व्यतिरिक्त राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या, उच्चशिक्षित कार्यक्षम नेतृत्व स्वीकाराल काय असे प्रश्नावली संकलनाच्या माध्यमातून माहिती घेता. सर्व मतदार संघातील मतदारांनी होकारार्थी उत्तर दिलेले आहे. उच्चशिक्षित नेतृत्त्व स्वीकारणार नाही, असे मत अल्प मतदारांनी मांडले आहे. तर सांगता येत नाही, असे मत सातारा भोसले व वाई भोसले या ठिकाणी मतदारांच्यामधून येते. या पृथःकरणामधून असे दिसून येते की, बदलत्या काळासोबत राजकीय क्षेत्रात उच्च शिक्षणाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे, हे सदर प्रतिसादातून जाणवते.

**तक्ता क्रमांक ४.२६**

**राजकीय घराण्याच्या नविन पिढीच्या नेतृत्त्वाला आपली मान्यता आहे काय?**

| मतदार संघ | सातारा | पाटण | पाटण | कराड द. | कराड द. | कराड उ. | फलटण | वाई | वाई | वाई |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| घराणी | भोसले | देसाई | पाटणकर | चव्हाण | पाटील | पाटील | निंबाळकर | पाटील | भोसले | पिसाळ |
| होय | ७२ | ७२ | ३६ | ३६ | २० | ७५ | ६५ | ७६ | ५२ | २२ |
| नाही | १० | ८ | ३० | १२ | २४ | ३ | ८ | ८ | १२ | ३८ |
| सांगता येत नाही | १८ | २० | ३४ | ५२ | ५६ | २२ | २७ | १६ | ३६ | ४० |






तक्ता क्रमांक ४.२६ व आलेखावरून असे दिसून येते की, राजकीय घराण्यांच्या नवीन पिढीमध्ये नेतृत्त्वाला आपली मान्यता आहे काय, असे प्रश्नावली संकल्नाच्या माध्यमातून अभ्यासता कराड उत्तर पाटील, वाई–पाटील, सातारा भोसले, देसाई, निंबाळकर या घराण्यांच्या संदर्भात बहुमताने मतदार वर्गाने सहमती दिली आहे. या मतदार संघातील जनतेला या राजकीय घराण्यांचे नवनेतृत्त्व मान्य असून त्यांच्या या नेतृत्त्वावर विश्वास असलेला दिसतो. तर पिसाळ, पाटणकर, कराड द. पाटील या ठिकाणी मतदारांला या राजकीय घराण्यांच्या नेतृत्त्वावर विश्वास असलेला दिसून येत नाही. कराड द. चव्हाण व पाटील या राजकीय घराण्यांच्या नव नेतृत्त्वाबद्दल सांगता येत नाही, असे मत असणारे प्रतिसादर जास्त प्रमाणात आलेले दिसून आले.

**तक्ता क्रमांक ४.२७**

**राजकीय घराण्यातील जुन्या पिढीतील नेतृत्त्वापेक्षा नविन नेतृत्त्वाबद्दल आपले मत काय?**

| मतदार संघ | सातारा | पाटण | पाटण | कराड द. | कराड द. | कराड उ. | फलटण | वाई | वाई | वाई |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| घराणी | भोसले | देसाई | पाटणकर | चव्हाण | पाटील | पाटील | निंबाळकर | पाटील | भोसले | पिसाळ |
| उत्कृष्ठ | १५ | २० | २० | ४० | १० | ४२ | ६३ | ३५ | १६ | १२ |
| चांगले | ४५ | ५२ | ३० | ३६ | ३४ | ३० | २५ | ४२ | ३४ | २२ |
| सामान्य | २० | १० | २० | १० | १२ | ६ | ५ | १२ | ८ | ४५ |
| सांगता येत नाही | २० | १८ | ३० | १४ | ४४ | २२ | ७ | ११ | ४२ | २१ |




तक्ता क्रमांक ४.२७ व आलेखावरून असे दिसून येते की, राजकीय घराण्यांच्या जुन्या पिढीतील नेतृत्त्वापेक्षा नवीन नेतृत्त्वाबद्दल आपले मत काय, असे प्रश्नावली संकलनाच्या माध्यमातून अभ्यासता निंबाळकर, कराड उत्तर, पाटील, कराड द. चव्हाण या घराण्यांतील नवीन नेतृत्त्वाबद्दल उत्कृष्ट म्हणून नवनेतृत्त्व अशी प्रथम क्रमांकाची पसंती दिलेली आहे. तर देसाई, सातारा भोसले यांना दोन नंबरची चांगली म्हणून पसंती देण्यात आली आहे. वाई–पिसाळ यांना सामान्य पसंती देण्यात आली आहे तर कराड द. पाटील, वाई भोसले या राजकीय घराण्यांच्या नव नेतृत्त्वाबद्दल सांगत येत नाही, असे बहुमताने मत व्यक्त केले आहे.

एकंदरीत सातारा जिल्ह्यातील सर्व प्रश्नावलीच्या साह्यायाने घेतलेल्या सर्व मतदारांचा अभ्यास करता २७ टक्के मते नव नेतृत्त्वाचा उत्कृष्ट म्हणून मत मांडले आहे तर ३५ टक्के मत दोन नंबरचे चांगले म्हणून व्यक्त केले आहे. यावरून असे दिसून येते की, सातारा जिल्ह्यातील राजकीय घराणेशाहीतील जुन्या पिढीतील नेतृत्त्वाला अजूनही जनता विसलेली नाही, त्यांच्या कामाचा तसेच कर्तृत्वाला प्रभावी नवीन पिढी पेक्षा प्रभावी होता, असे म्हणावे लागेल. सदर प्रतिसादाबद्दल मतदारांच्यामध्ये उत्तरात संभ्रम दिसून येते. स्पष्टपणे मतदारांनी जुन्या व नव्या नेतृत्त्वाबाबत प्रतिसाद दिलेला दिसून येत नाही.

**तक्ता क्रमांक ४.२८**

**राजकीय घराण्याचे नेतृत्त्व अधिक प्रभावी व्हावे असे वाटते काय?**

| मतदार संघ | सातारा | पाटण | पाटण | कराड द. | कराड द. | कराड उ. | फलटण | वाई | वाई | वाई |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| घराणी | भोसले | देसाई | पाटणकर | चव्हाण | पाटील | पाटील | निंबाळकर | पाटील | भोसले | पिसाळ |
| होय | ७२ | ५२ | ४८ | ६६ | ४० | ५३ | ७२ | ६५ | ६५ | ६२ |
| नाही | ८ | १४ | १२ | १२ | १२ | १० | ८ | ६ | १० | ८ |
| सांगता येत नाही | २० | ३४ | ४० | २२ | ४८ | ३७ | २० | २९ | २५ | ३० |




तक्ता क्रमांक ४.२८ व आलेखावरून असे दिसून येते की, राजकीय घराण्यातील नेतृत्त्व अधिक प्रभावी व्हावे, असे वाटते काय असे मत प्रश्नावली संकलनाच्या माध्यमातून अभ्यासता कराड दक्षिण पाटील घराणे वगळता सर्व राजकीय घराण्याचे नेतृत्त्व अधिक प्रभावी व्हावे, असे मत व्यक्त करण्यात आले आहे. मतदार संघाचे नेतृत्त्व जेवढे प्रभावीपणे कार्य करेल त्यावर मतदार संघाचा विकास अवलंबून असतो. यामुळे मतदार संघातील मतदारांच्या अपेक्षा दिसून येतात की, आपल्या मतदार संघाचे नेतृत्त्व अधिक प्रभावीपणे कार्य करून मतदार संघाचा विकास घडवून आणावा.

उत्फुर्त प्रश्नावलीच्या माध्यमातून संकलनाद्वारे विविध माहिती उपलब्ध झाली. या १० राजकीय घराण्यांच्या प्रश्नावली एकत्रित करता काही समान प्रश्न, मागण्या मतदार संघातील मतदारांच्याकडून पुढे आल्या. भारत स्वातंत्र्यानंतर शासनाने विविध योजना राबवून विकास करण्याचा प्रयत्न केला तरी पाहिजे त्या प्रमाणात आपण यशस्वी झालेलो दिसत नाही. काही ठिकाणी विकासाचा असमतोल दिसून येतो. या मागण्या पहाता पिण्याच्या पाण्याची समस्या, दळणवळणासाठी योग्य रस्ते, डोंगरकपारीच्या गावासाठी प्राथमिक आरोग्याच्या सोई, जमीन ओलीताखाली आणण्यासाठी सिंचनाची मागणी,

शेतीसाठी आवश्यक विज पुरवठा, रोजगार निर्मिती इ. मागण्या समोर आल्या. या मागण्या प्रत्येक मतदार संघामध्ये वेगवेगळ्या असलेल्या दिसतात.

सहकारी संस्थानच्या मार्फत सातारा जिल्ह्यामध्ये काही प्रमाणात रोजगार निर्मिती झाली असली तरी अधिक रोजगार निर्माण होण्यासाठी औद्योगिक वसाहतीची मागणी प्रामुख्याने प्रत्येक मतदार संघातून असलेली दिसते. सातारा जिल्ह्यामध्ये औद्योगिक वसाहतीचा विचार करता शिरवळ ता. खंडाळा येथे नव्याने मोठ्या प्रमाणावर औद्योगिक वसाहत निर्माण होत आहे तर सातारा, कराड, वाई येथे लहान प्रमाणात औद्योगिक वसाहती आहेत. खऱ्या अर्थाने सातारा जिल्ह्यामध्ये शेती विकासाबरोबर प्रत्येक मतदार संघामध्ये लहान प्रमाणात औद्योगिक वसाहती निर्माण झाल्यास त्या त्या मतदार संघातील लोकांना रोजगार उपलब्ध होऊ शकेल. जिल्ह्यामध्ये कोयना, धोम, कन्हेर इ. लहान मोठी धरणे असून शेती सिंचनासाठी पाण्याचे अधिक सुक्ष्मपणे नियोजन होणे आवश्यक आहे. प्रत्येक विभागातून शेती व पिण्याच्या पाण्यासाठी मागणी असलेली दिसते. यावर योग्य त्या पद्धतीने तोडगा न काढल्यास भविष्यात पाण्यासाठी जिल्हा अंतर्गत संघर्ष होऊ शकतो असे दिसून येते. यासाठी जनतेच्या विकासाबद्दल अपेक्षा लोकप्रतिनिधी, नेतृत्त्वाकडे असलेल्या दिसतात. फक्त मतदार संघाचा विचार न करता सर्वांगिण विकास होणे आवश्यक आहे तर जिल्ह्याच्या विकासाला हातभार लागेल असे एकंरीत प्रश्नावलीच्या विश्लेषणावरुन दिसून येते.

**समारोप**

अशा प्रकारे सातारा जिल्ह्यातील राजकीय घराणेशाहीचे स्वरूप राहिले आहे. छ. शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या जिल्ह्याची ऐतिहासिक, भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकीयदृष्ट्या स्वतंत्र व वेगळी ओळख आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात सर्वांत जास्त प्रभाव असलेल्या या जिल्ह्यामध्ये शिवकालीन ऐतिहासिक घराण्यांचा उदय झाला. त्यामध्ये भोसले व फलटणचे नाईक–निंबाळकर घराण्यांचा अग्रक्रमाने उल्लेख करावा लागेल. या घराण्यांनी आपल्या घराण्याचा वारसा जपत त्याचे राजकीय भांडवल न करता समाजाशी असलेली आपली बांधिलकी कायम ठेवली. तोच वारसा पुढच्या

वारसदारांनीही कायम ठेवल्याचे दिसून येते. ही घराणी आज राजकारणाच्या माध्यमातून विविध प्रकारची समाजाभिमुख कार्य करून जनतेचे प्रश्न, समस्या सोडवित आहेत. याशिवाय जनतेच्या सुख–दु:खाच्याप्रसंगी सहभागी होऊन, जनसंपर्क ठेवून जनतेशी असलेली आपली बांधिलकी, जवळीक कायम ठेवण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत. जिल्ह्याचा सर्वांगिण विकास करताना सर्वसामान्य लोकांचा विचार करून विविध विकास योजना राबवताना दिसत आहेत. जनकल्याण हा हेतू ठेवून ते काम करताना दिसत आहेत. परिणामी जनता ही संसदीय राजकारणात या घराण्यातील व्यक्तीला लोकशाही मार्गाने निवडणूकीच्या माध्यमातून आपले राज्यकर्ते म्हणून निवडून देताना दिसत आहेत.

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लोकशाहीच्या मार्गाने जिल्ह्यामधून अनेक राजकीय घराण्यांचा उदय झाला. त्यामध्ये आनंदराव चव्हाण, बाळासाहेब देसाई, विक्रमसिंह पाटणकर (पाटण), यशवंतराव मोहिते, पी. डी. पाटील, विलासराव पाटील–उंडाळकर (कराड), लक्ष्मणराव पाटील (बोपेगाव वाई), नाईक निंबाळकर (फलटण) इत्यादी घराण्यांचा समावेश आहे. या घराण्यांचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे ही घराणी सहकार चळवळीच्या माध्यमातून उदयास आलेली नाहीत तर लोकसभा, विधानसभा निवडणुकीत निवडून आल्यानंतर त्यांनी आपआपल्या मतदारसंघामध्ये सहकारी संस्था उभ्या केल्या. त्या माध्यमातून त्यांनी हजारो लोकांना रोजगार मिळवून दिला. उच्चशिक्षणाची सोय केली आणि आपल्या मतदारसंघाचा विकास घडवून आणला. त्यामुळे मतदारसंघातील जनता त्यांच्या पाठीशी उभी राहिली, त्यामुळे या घराण्यांची एक मोठी ताकद निर्माण झाली. या ताकदीचा संसदीय निवडणूकांच्या राजकारणात वोट बँक म्हणून वापर केला आणि आपल्या असणाऱ्या सहकारी संस्था व स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांचा विचार न करता आपल्याच राजकीय वारसांना सहकारी संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या माध्यमातून चेअरमन, अध्यक्षपदावर नियुक्त करत राजकारणात आपल्याच कुटुंबाची मक्तेदारी निर्माण करून राजकीय वारसांना राजकारणात स्थिर करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

सातारा जिल्ह्यातील राजकीय घराण्याचे दुसरे वैशिष्ट्ये म्हणजे पाटणचे आनंदराव चव्हाण या घराण्याने आपल्या मतदार संघामध्ये एक ही सहकारी संस्था उभी न करता जवळपास १९५४ पासून आजपर्यंत महाराष्ट्रासह संपूर्ण देशाच्या राजकारणावर आपले वर्चस्व

प्रस्थापित केले आहे. आज ही या घराण्याची तिसरी पिढी मोठ्या ताकदीने राज्याच्या राजकारणामध्ये सक्रीय आहे. पाटण तालुक्यातील तिसरे व चौथे राजकीय घराणे म्हणजे देसाई व पाटणकर घराणे यापैकी बाळासाहेब देसाई यांनी १९५२ ते १९७८ पर्यंत, तर १९७८ ते २००४ विक्रमसिंह पाटणकर घराण्याने पाटण तालुक्याच्या राजकारणावर आपली सत्ता निर्विवादपणे अखंड चालू ठेवली आहे. २००४ पासून देसाई घराण्याने मध्यंतरी खंडीत झालेली सत्ता पुन्हा बाळासाहेब देसाई यांचे नातू श्री. शंभूराजे देसाई यांनी आपल्याकडे खेचून आणली. ते सध्या श्री. एकनाथ शिंदे यांच्या मंत्रीमंडळामध्ये कॅबिनेट मंत्री पदावर कार्यरत आहेत. पाटण विधानसभा मतदारसंघातील देसाई पाटणकर घराणे महाराष्ट्र स्थापनेपासून ते आज अखेर पाटण मतदार संघामध्ये सक्रीय असून त्या दोन घराण्यांच्या व्यतिरिक्त तिसऱ्या व्यक्तीचे नेतृत्त्व पाटणमतदार संघात निर्माण झालेले दिसत नाहीत. तर कराडचे पी. डी. पाटील यांनी ४० वर्षे राजकारणात सक्रीय राहून आपल्या मुलाला त्यांनी राजकारणामध्ये सक्रीय करून सहकारी साखर कारखाना, नगरपालिका, आमदारकी आपल्याच घरात ठेवून आपले राजकीय वारस स्थिर करण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. वाईचे लक्ष्मणराव पाटलांची मुले आमदार मकरंद पाटील व नितीन पाटील जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष व किसनवीर सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून राजकारणात सक्रीय आहेत.

सातारा जिल्ह्याच्या राजकारणाचे तिसरे वैशिष्ट्ये म्हणजे महाराष्ट्राचे थोर विचारवंत यशवंतराव मोहिते, विलासराव पाटील–उंडाळकर आणि विक्रमसिंह पाटणकर या घराण्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणावर दिर्घकाळ आपले वर्चस्व निर्माण केले. परंतु त्यांना त्यांच्या राजकीय वारसदारांना मात्र राजकारणामध्ये सक्रीय करता आले नाही.

सातारा जिल्ह्याचे चौथे वैशिष्ट्ये म्हणजे या जिल्ह्यामध्ये दलित, अल्पसंख्याकांची संख्या लक्षणीय असून सातारा जिल्ह्याची राजकीय समीकरणे बदलण्या इतपत ती प्रभावी आहे. किसनवीर, भाऊसाहेब गुदगे, शंकरराव जगताप, धोंडीराम वाघमारे इत्यादींचा प्रभाव त्या त्या मतदारसंघावर होता. परंतु त्यांनाही आपल्या राजकीय वारसांना पुढे करता आलेला नाही. पाचवे वैशिष्ट्ये म्हणजे या जिल्ह्यातून प्रेमीलाताई चव्हाणांचा अपवाद सोडला तर महिला वारसा पुढे आलेले दिसत नाही. जिल्ह्यामध्ये मराठा अभिजन नेतृत्त्वामुळे मागासवर्गीय अल्पसंख्याक व

मागास वर्गीय समाजातून जिल्ह्याच्या राजकारणावर प्रभाव पाडणारे नेतृत्त्व, अभिजन वर्ग निर्माण झाले नाहीत हे दिसून येते.

एकंदरीत सातारा जिल्ह्यातील राजकीय घराण्यांच्या अभ्यासावरून असे म्हणता येईल की, सातारा जिल्ह्याच्या समाजकारण, अर्थकारण व राजकारणावर इतिहासकाळातील राजघराण्यांपासून ते आधुनिक प्रातिनिधिक संसदीय लोकशाहीच्या वर्तमान काळापर्यंत मराठा समाजातील राजकीय घराणी, सरंजामदार, जहागिरदार घराण्यातून आलेल्या मराठा अभिजनांचा, नेतृत्त्वाचा, आधुनिक काळातील संसदीय राजकारणात पक्षीय राजकारणातून, सहकारी संस्थाच्या माध्यमातून स्वकर्तृत्त्वावर पुढे आलेल्या मराठा समाजातील घराण्यातूनच नवीन राजकीय अभिजन नेतृत्त्व उदयास आल्याचे चित्र आज सातारा जिल्ह्यात दिसून येत आहे तर दुसऱ्या बाजूने विचार करता सर्व जाती धर्मातील स्त्रियांतून, अल्पसंख्याक, मागास जाती धर्मातील समूहातून व जिल्ह्याच्या राज्याच्या, देशाच्या राजकारणावर प्रभाव पाडणारे प्रभावशाली नेतृत्त्व, राजकीय घराणे निर्माण झाले नाहीत असे खेदाने म्हणावे लागत आहे. जरी राजकीय आरक्षणाच्या माध्यमातून या समूहातील राजकीय नेतृत्त्व घराणे उदयास येण्याचा प्रयत्न करत असेल तर त्याला प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या प्रभावहिन करण्याचा प्रयत्न सर्वपक्षीय मराठा राजकीय घराणी करताना दिसतात. एकंदरीत मराठा समाजातील ठराविकच राजकीय घराण्याची वारसा रूपाने सातारा जिल्ह्याच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक क्षेत्रावर प्रभाव पाडताना आज दिसून येत आहेत. यामध्ये प्रमिलाताई वगळता महिला नेतृत्त्व वारसा दिसून येत नाही. अल्पसंख्याक, मागास वर्गातील नेतृत्त्व जिल्ह्यात प्रभावी नाही. सहकारी साखर कारखाने स्थानिक स्वराज्य संस्था यांच्यामधून राजकीय घराणेशाहीतील नवनेतृत्त्व जिल्ह्याच्या राजकारणात आपला प्रभाव निर्माण करताना दिसते.

**संदर्भ ग्रंथ सूची**


१. https://mr.wikipedia.org/wiki/%E0%-4%B8%E0%-4%BE%E0%-4%-4%E0%-4%BE% E0%-4%B0%E0%-4%BE

२. पाटील रा. तु., 'सांगली–साताऱ्याचे राजकारण', अजय प्रेस, कराड, १९८६, पृ. २०

३. उपरोक्त–सातारा जिल्हा गॅझेटिअर, २०१२ पृ. क्र. १२२, १२३, १२४.

४. चव्हाण मनिषा शिवाजी, सातारा जिल्ह्यातील लोकसभा निवडणूका व राजकारणाचा अभ्यास, १९६० ते २००९ शिवाजी विद्यापीठास राज्यशास्त्र पीएच्. डी. पदवीसाठी सादर केलेला अप्रकाशित शोध प्रबंध पृ. क्र. ४०

५. करडेकर अनिल, महराष्ट्र निवडणुका आणि निकाल, विद्या प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, २०१४, पृ. क्र. ६०

६. https://vishwakosh.marathi.gov.in/25493/

७. पागे वि. स. संसदिय प्रशिक्षण केंद्र महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, महाराष्ट्र विधानसभा, सदस्यांची आडनावानुक्रमे यादी, विद्याभवन, मुंबई, पृ. ४५

८. उपरोक्त, पृ. ४३

९. सेतू, आदरणीय पी. डी. पाटील, स्मृतिग्रंथ, संपा. रा. गो. प्रभुणे, २०१५, पृ. ७०

१०. वाई, खंडाळा व महाबळेश्वरातील माझा माणसा जननायक मकरंद लक्ष्मणराव जाधव–पाटील–प्रकाशक, गोपाळराव पवार उडतरे दि. १५ ऑगस्ट २०१४, पृ. क्र. ३०

११. देसाई रणजित (प्रस्तावना) लोकनायक बाळासाहेब देसाई, २०१० पृ. क्र. ४५

१२. करडेकर अनिल, महराष्ट्र निवडणुका आणि निकाल, विद्या प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, २०१४, पृ. क्र. ९०

१३. दैनिक पुढारी, १५ जून २०२२ (सातारा आवृत्ती)

१४. सातारा जिल्हा परिषद, पंचवार्षिक अहवाल १९९७, २००२, २००७, प्रकाशक मुख्यकार्यकारी अधिकारी, सातारा जिल्हा परिषद, सातारा.

१५. सातारा जिल्हा गॅझेटिअर, २०१२ पृ. क्र. ४७१–७२.

१६. पाठक अरूणचंद्र शं., महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर सातारा जिल्हा, प्रथम आवृत्ती, १९९९, महाराष्ट्र शासन, मुंबई, पृ. क्र. २२

१७. निकम, अधिकराव हि., ग्रामीण भागाच्या विकासासाठी सहकारी संस्थांचे योगदान १९७१ ते १९९५ अखेर, १० संस्थांचे व्यष्टी अध्ययन, शिवाजी विद्यापीठास एम. फील. पदवीसाठी सादर केलेला अप्रकाशित शोधनिबंध, २००१ पृ. ८३, ८४.

१८. निकम, अधिकराव हिंदूराव, उपरोक्त पृ. क्र. ८३, ८४.

१९. कुलकर्णी हेरंब, पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा घराणेशाही अहवाल, पृ. क्र. २५

२०. उपरोक्त, पृ. क्र. ३५

२१. देशमुख विश्वासराव मालोजीराजे श्रीमंत मालोजीराजे स्मृती प्रतिष्ठान फलटण, २००४ पृ. क्र. १०.

२२. https://thinkmaharashtra.com/dynasty-of-the-nimbalkars/

२३. श्रीमान योगी, लेख–श्रीमंत दादाराजे खर्डेकर, पृ. क्र. १३

२४. करडेकर अनिल, महराष्ट्र निवडणुका आणि निकाल, विद्या प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, २०१४, पृ. क्र. ६५

२५. कुलकर्णी हेरंब, पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा घराणेशाही अहवाल, पृ. क्र. २२

२६. विक्रमसिंह पाटणकर, जनसामान्यांचा नेता, पृ. क्र. ३०, ३१.

२७. आवाले मनोज, महाराष्ट्रातील राजकीय घराणी, आदिश्रेय प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती, २०१९, पृ. क्र. ७६.

२८. उपरोक्त पृ. क्र. ७३.

२९. पागे वि. स. संसदिय प्रशिक्षण केंद्र महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, महाराष्ट्र विधानसभा, सदस्यांची आडनावानुक्रमे यादी, विद्याभवन, मुंबई., पृ. क्र. ३५

३०. आवाले मनोज, महाराष्ट्रातील राजकीय घराणी, आदिश्रेय प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती, २०१९, पृ. क्र. ७६.

३१. अजिंक्यतारा सहकारी साखर कारखाना, वार्षिक अंक २०१८, प्रकाशक, चेअरमन अजिंक्यतारा सहकारी साखर कारखाना, पान नं. १०

३२. करडेकर अनिल, महराष्ट्र निवडणुका आणि निकाल, विद्या प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, २०१४, पृ. क्र. ३५

३३. बोधे अनिल आ. (संपा.) लक्ष मनाचा नेता खासदार श्री. लक्ष्मणराव पाटील (लोकप्रिय कणखर नेते प्रा. शिवाजीराव चव्हाण) प्रकाशक, श्री. रोकडेश्वर, सहकार समुह रहिमतपूर, २५ फेब्रुवारी २००६, पृ. क्र. ३९

३४. https://en.wikipedia.org/wiki/LaxmanraošPandurangšPatil

३५. आवाले मनोज, महाराष्ट्रातील राजकीय घराणी, आदिश्रेय प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती, २०१९, पृ. क्र. ८७

३६. सनस चंद्रकांत, माझे गुरूतुल्य, पितृत्युल्य तात्या, लक्ष पर्व. पृ. ३५

३७. उपरोक्त पृ. क्र. ४३

३८. बोधे अनिल आ. (संपा.) लक्ष मनाचा नेता खासदार श्री. लक्ष्मणराव पाटील (लोकप्रिय कणखर नेते प्रा. शिवाजीराव चव्हाण) प्रकाशक, श्री. रोकडेश्वर, सहकार समुह रहिमतपूर, २५ फेब्रुवारी २००६, पृ. क्र. ४८

३९. उपरोक्त पृ. क्र. ८८.

४०. करडेकर अनिल, महराष्ट्र निवडणुका आणि निकाल, विद्या प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, २०१४, पृ. क्र. ६५

४१. वाई, खंडाळा व महाबळेश्वरातील माझा माणसा जननायक मकरंद लक्ष्मणराव जाधव–पाटील–प्रकाशक, गोपाळराव पवार उडतरे दि. १५ ऑगस्ट २०१४, पृ. क्र. ४५

४२. उपरोक्त, पृ. ४८

४३. खर्डेकर दादाराजे, यशवंतराव मोहिते–विचाराचा दिपस्तंभ, स्मरणिका, मा. यशवंतराव व जिजाबा मोहिते जन्मशताब्दी कार्य गौरव–२०१९–२०५, ५४.

४४. https://www.postboxindia.com/karad-maharashtra-yashwantrao-mohite-birth-anniversary/

४५. ढोले मो. नि. (संपा.) श्री. यशवंतराव मोहिते गौरवग्रंथ, ७ नी. १९९५, पृ. १३.

४६. देशमुख वामनराव, मा. यशवंतराव भाऊ यांचे विचार व कार्य गौरव ग्रंथ मधील लेख, पृ. क्र. ११६.

४७. घणाघात, यशवंतराव मोहिते यांचा सडेतोड भाषण संग्रह, प्रकाशक, सौ. जाई यशवंत मोहिते, रेठरे बुद्रुक, प्रथम आवृत्ती २०१९, पृ. ३८

४८. उपरोक्त, पृ. २८

४९. दै. तरूण भारत, २३/०८/२००९ पृ. क्र. ४.

५०. करडेकर अनिल, महराष्ट्र निवडणुका आणि निकाल, विद्या प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, २०१४, पृ. क्र. ६५

५१. आवाले मनोज, महाराष्ट्रातील राजकीय घराणी, आदिश्रेय प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती, २०१९, पृ. क्र. ७६.

५२. उपरोक्त–पृ. क्र. ५९, ६०.

५३. डॉ. करडेकर अनिल, महाराष्ट्र निवडणूक आणि निकाल, विद्या प्रकाशन, नागपूर, पृ. ६५

५४. पागे वि. स. संसदिय प्रशिक्षण केंद्र महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, महाराष्ट्र विधानसभा, सदस्यांची आडनावानुक्रमे यादी, विद्याभवन, मुंबई, पृ. ६५

५५. चव्हाण मनिषा शिवाजी, सातारा जिल्ह्यातील लोकसभा निवडणूका व राजकारणाचा अभ्यास, अप्रकाशित शोधप्रबंध, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, पृ. ८०

५६. https://en.wikipedia.org/wiki/PrithvirajšChavan

५७. डॉ. मोरे सदानंद (संपा.) गणपतराव कणसे, समाजकारणातील भागीरथ, पृ. २५

५८. मुलाखत, कुलकर्णी प्रसाद (संपा.) प्रबोधन प्रकाशन इचलकरंजी, सुवर्ण महोत्सवी पृ. क्र. १५३, १९५, १७९.

५९. https://marathivishwakosh.org/33289/

६०. सूर्यवंशी कृ. गो., बहुजन हिताय, बहुजन सुखाय, बाळासाहेब देसाई यांची जीवनकथा, कारळे प्रकाशन १९७०, पृ. क्र. १६५, १९७.

६१. दै. सागर, कोयना धरण सुवर्णमहोत्सवी पुरवणी, २० जून २०१२ पान नं. ६

६२. दौलत, स्मरणीका, संकल्प श्री शंभूराज देसाई, मधुकर भावे, प्रकाशक, मनिषा प्रकाशन, मोदी स्ट्रीट मुंबई. पृ. ६५

६३. संसद पटू आमदार, प्रकाशक – शंभुराज शिवाजीराव देसाई, पृ. क्र. १३५, १४४.

६४. https://mr.wikipedia.org/wiki/%E0%-4%B6%E0%-4%82%E0%-4%-D%E0%- 5%81%E0%-4%B0%E0%-4%BE%E0%-4%9Cš%E0%-4%-6%E0%-5%87%E 0%-4%B8%E0%-4%BE%E0%-4%88

६५. डॉ. करडेकर अनिल, महाराष्ट्र निवडणूक आणि निकाल, विद्या प्रकाशन, नागपूर, पृ. ८२

६६. पागे वि. स. संसदिय प्रशिक्षण केंद्र महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, महाराष्ट्र विधानसभा, सदस्यांची आडनावानुक्रमे यादी, विद्याभवन, मुंबई.

६७. भोसले विकास मुगुटराव, सह्याद्रीचा पाठीराखा, पूर्वा प्रकाशन, २०१० कराड, पृ. क्र. ३८

६८. http://oldrol.lbp.world/Upload-rticle/109.pdf

६९. डॉ. करडेकर अनिल, महाराष्ट्र निवडणूक आणि निकाल, विद्या प्रकाशन, नागपूर, पृ. ८५

७०. सेतू, आदरणीय पी. डी. पाटील, स्मृतिग्रंथ, संपा. रा. गो. प्रभुणे, २०१५, पृ. १३२

७१. भोसले विकास मुगुटराव, सह्याद्रीचा पाठिराखा, पी. डी. पाटील यांच्याविषयीच्या आठवणी, संपा. विकास भोसले, पृ. ६५

७२. पागे वि. स. संसदिय प्रशिक्षण केंद्र महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, महाराष्ट्र विधानसभा, सदस्यांची आडनावानुक्रमे यादी, विद्याभवन, मुंबई. पृ. ८२

७३. डॉ. करडेकर अनिल, महाराष्ट्र निवडणूक आणि निकाल, विद्या प्रकाशन, नागपूर, पृ. १२०

७४. सह्याद्री, सह्याद्री सहकारी साखर कारखाना लि. यशवंतनगर, प्रकाशन चेअरमन यु.व्ही. प्रिंटर्स, कराड, सन २०२२, पृ. ३.

७५. पागे वि. स. संसदिय प्रशिक्षण केंद्र महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, महाराष्ट्र विधानसभा, सदस्यांची आडनावानुक्रमे यादी, विद्याभवन, मुंबई. पान नं. ६५

७६. सातारा जिल्हा परिषद, पंचवार्षिक अहवाल १९९७, २००२, २००७, प्रकाशक मुख्यकार्यकारी अधिकारी, सातारा जिल्हा परिषद, सातारा.

७७. डॉ. करडेकर अनिल, महाराष्ट्र निवडणूक आणि निकाल, विद्या प्रकाशन, नागपूर, पृ. ९२

# प्रकरण ५ वे

# निष्कर्ष आणि शिफारशी

**सारांश:**

राजकीय घराणेशाहीचा राजकीय वारसा भारताच्या राजकीय इतिहासाला, राजकीय व्यवस्थेला, शासनयंत्रनेला नेहमीच वळण देताना दिसून येतो. घराणेशाहीच्या उदयामुळे राजकीय सत्तांतराची समीकरणे नेहमीच बदलताना दिसून येतात. **देशाच्या, राज्याच्या राजकारणाला नवी दिशा व वळण देण्यामध्ये घराणेशाही प्रभावी ठरत असल्याचे दिसून येते.** राष्ट्राच्या गतिशीलतेला, परिवर्तनाला घराणेशाहीने नेहमीच प्रभावित केलेले आहे. जागतिक परिप्रेक्ष्यातून विचार करता विशेषतः प्रबोधनकाळात (Renesans Period) नंतर मोठ्या प्रमाणात उदारमतवादी, लोकशाही स्वातंत्र्य, समता व बंधुत्ववादी विचारांचा जगातील मागास व अतिमागास राष्ट्रावर प्रभाव जरी पडला असला तरी त्या–त्या राष्ट्राने त्या–त्या राष्ट्राच्या राज्यव्यवस्थेने अंतर्गत राजकीय परिवर्तनाचा विचार करण्याचे धोरण आखणे गरजेचे असते तशी वाटचाल करणे गरजेचे असते आणि हे बाहेरच्या विचाराने होत असले तरी त्या विचारांना कृतीत आणण्यासाठी राज्यव्यवस्थेच्या आंतरिक संरचनेमध्ये तो विचार अंतर्भूत असावा लागतो.

राज्यव्यवस्थेला आकार देणाऱ्या राजकीय घराण्यांमध्ये सर्वकष परिवर्तनाचा विचार अस्तित्वात असेल तर राष्ट्राच्या जडणघडणीत भर पडू शकते. देशाचा मान सन्मान वाढू शकतो. देशाची प्रगती होऊ शकते. अन्यथा जर घराणेशाही मध्ययुगीन मानसिक विचाराने ग्रस्त असेल तर राष्ट्राच्या राजकीयकरणाची व विकासाची चाके उलटी फिरू शकतात. त्यामुळे ग्रामपातळीपासून ते राष्ट्रीय पातळीपर्यंतच्या राजकीय, पक्षीय संरचनेचे अवलोकन करत असताना असे लक्षात येते की **राजकीय रचनेवर घराणेशाहीचा वसा आणि वारसा हा जितका प्रभावी आहे तितकाच तो प्राचीन ही आहे.**

भारताच्या राजकीय उदयाची पाश्वभूमी लक्षात घेतल्यानंतर असे लक्षात येते की ग्रामीण पातळीवर ज्या गटाचे, वर्गाचे आर्थिक सामर्थ त्याबरोबरच आंतरिक संघर्षामध्ये ज्याचे प्राबल्य व वर्चस्व आहे असाच वर्ग, गट, घराणे प्राचीन काळापासून राजकीयकरणाच्या स्पर्धेत नेहमीच

प्रभावी ठरताना दिसून येतात. मग जमीनदार, सरंजामदार असोत किंवा भांडवलदार काळाची पाऊले ओळखून या सत्ता समर्थक घराण्यांनी त्या त्या काळातील परिस्थितीनुसार राजकीय सत्तेशी जुळवून घेण्याचा, सत्ताधारी वर्ग होण्याचा चाणाक्षपणे प्रयत्न केल्याचे दिसून येते.

भारतात घराणेशाहीची सुरुवात मौर्याच्या राजकीय घराण्यापासून झाली. त्यानंतर वर्धन घराणे, सातवाहन, पाल, गुर्जर, परमार, राष्ट्रकूट, चोल इत्यादी घराणी तसेच मध्ययुगामध्ये गुलाम, खिलजी, सय्यद, लोदी, मोगल इत्यादी घराणी भारताच्या राजकीय इतिहासामध्ये उदयाला आली. या घराण्याच्या लष्करी, आर्थिक, राजकीय व्यवस्थेचा, प्रशासनाचा फायदा घेऊन अनेक प्रांतात छोटी मोठी घराणी उदयाला आली त्यांनी भारताच्या राष्ट्रीय, प्रांतीय पातळीवरील राजकीयकरणामध्ये स्वतःला आजमावण्याचा प्रयत्न केला. या राजकीय घराण्याचा सूक्ष्म अभ्यास केल्यानंतर आपल्याला असे दिसून येते की, असंख्य राजकीय घराण्यांनी राजकीय व्यवस्थेच्या विकासाला हातभार लावला. मग ती राजकीय यंत्रणा राजेशाही असो की राजकीय लोकशाही असो वा लष्करी व्यवस्था असो. सत्तेमध्ये येण्याच्या या घराणेशाहीच्या शर्यतीमध्ये अनेक घराणेशाहीनी आपले कर्तृत्व सिद्ध करून दाखवले तर अनेक घराणेशाहीना ही राजकारणाची शर्यत अर्ध्यावरच सोडून द्यावी लागली व काही घराणी तर राजकारणात येण्यापूर्वीच प्रभावहीन झाली असल्याचे दिसून येते.

महाराष्ट्राच्या राजकीय घराण्याचा प्रवास ही तितकाच सामर्थ्यशील आणि प्रभावी आहे या राजकीय घराण्यांची ऐतिहासिक पार्श्वभूमी पहाता इ. स. पूर्व २३० पैठणच्या सातवाहन घराण्यांपासून महाराष्ट्रात घराणेशाहीला सुरूवात झाली. सातवाहन हे महाराष्ट्राचे पहिले सामर्थ्यशील राजघराणे म्हणून महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारताच्या राजकीय इतिहासामध्ये परिचित आहे. तद्नंतर राष्ट्रकूट, कदंब, यादव आणि भोसले घराण्याने महाराष्ट्राच्या राजकीय, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक जीवनाला आकार देण्याचा प्रयत्न केला. आपापल्या कालखंडामध्ये या घराण्यांनी राजकारणावर आपला प्रभाव, वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न केला. **त्याचबरोबर आपल्या शासनव्यवस्थेमध्ये मूलभूत बदल करून इतिहासामध्ये स्वतः व स्वत:च्या घराण्याचा वारसा निर्माण केला, अशा अनेक कर्तबगार घराण्याची खूप मोठी शृंखला आपल्याकडे आहे.**

महाराष्ट्रामध्ये १८ व्या व १९ व्या शतकामध्ये अनेक ब्राम्हण, ब्राम्हणत्तेर, पाठारे, प्रभू, शेणवी, सारस्वत घराणी उदयाला आली. त्यांनी त्या–त्या काळामध्ये राजकारण समाजकारण व अर्थकारणामध्ये व मोलांची कामगिरी केली. उदाहरणार्थ, शिंदे, होळकर, पवार, जाधव, निंबाळकर, आंग्रे, घोरपडे, दाभाड़े, पटवर्धन ही प्रमुख सरदार घराणी महत्त्वाची होती. त्याशिवाय इतर घराण्याची यादी खूप मोठी आहे. वरील घराण्यांपैकी अगदी मोजक्याच घराण्यांना मोठा ऐतिहासिक वारसा लाभलेला दिसतो तर काही घराणी नुकतीच राजकीयकरणाच्या या प्रक्रियेमध्ये सामील होताना दिसून येतात. उदाहरणार्थ कोल्हापूरचे शाहू महाराज व सातारकर भोसले घराणे इत्यादी, मात्र **कोणत्याही प्रकारचा ऐतिहासिक राजकीय वारसा नसलेली पण जनाधार प्राप्त असलेली आधुनिक संसदीय लोकशाही शासन प्रक्रियेच्या माध्यमातून उदयास आलेली राजकीय घराण्यांनी आपली नोंद व्यवस्थेला घेण्यास भाग पाडले.**

**महाराष्ट्रातील काही राजकीय घराण्यांना ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. तर काही नवीन राजकीय घराणी आधुनिक संसदीय लोकशाहीतील निवडणूकांचा प्रक्रियेतून समकालीन राजकारणात सक्रिय असलेली दिसून येतात.** आधुनिक काळात ही ऐतिहासिक राजकीय वारसा, जनाधार कायम असणारी राजघराणी सातारा जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणावर अस्तित्त्वात आहेत. त्यापैकी एक महत्त्वपूर्ण व ऐतिहासिक वारसा असलेले घराणे म्हणजेच भोसले घराणे होय. यातील कर्तबगार पुरुषांमध्ये शहाजी भोसले, छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज, महाराणी ताराबाई यांनी मोठ्या प्रमाणात जनमानसांवर आपला प्रभाव पाडून आपल्या घराण्याचे राजकीयकरणाचे सातत्य कायम ठेवले. त्याबरोबरच परशुरामपंत प्रतिनिधी घराणे, देशपांडे घराणे, मोरे घराणे, अत्रे घराणे, सचिव घराणे, कोंढाळकर घराणे, दाभाडे घराणे, फर्जंद घराणे, आमत्य घराणे, मालुसरे घराणे, जेधे घराणे, पारनेरकर घराणे, निंबाळकर घराणे, पालकर घराणे, नरसाळा घराणे, पिंगळे घराणे, कंकघराणे नाईक घराणे, तर पेशवे कालखंडामध्ये थोरात घराणे, खटावकर–देशमुख घराणे, चव्हाण घराणे, रंभाजी निंबाळकर घराणे, देशमुख घराणे, ग्वाल्हेरचे शिंदे घराणे, शिवभट साठे घराणे, पटवर्धन घराणे, मोहिते घराणे, साळुंखे–पाटणकर घराणे, धारचे पवार घराणे, नागपूरकर भोसले घराणे, इंदूरचे होळकर घराणे इत्यादी. आधुनिक काळात संसदीय लोकशाही

प्रक्रियेतून काही घराण्यांना राजकीय वारश्यापोटी नवनेतृत्त्व मिळालेले दिसून येते. उदा. पवार घराणे, चव्हाण घराणे, ठाकरे घराणे, राणे घराणे त्यांचे वंशज मग त्यात मुले असतील किंवा मुली उदा. राणे, ठाकरे, किंवा पवार घराणे त्यातच आरक्षणाच्या माध्यमातून काही घराण्यांचा उदय झाला. उदा. भुजबळ घराणे, आंबेडकर घराणे भारतातील संसदीय लोकशाही व्यवस्था राजकीय घराण्यांच्या विळख्यात अडकलेली दिसून येते. आधुनिक प्रातिनिधिक संसदीय लोकशाहीच्या राजकीय प्रक्रियेत ही या राजकीय घराण्यांनी वारसा रूपाने घराणेशाही कायम ठेवण्याची भूमिका घेताना दिसून येत आहेत. **सत्तेचे ध्रुवीकरण करून राजकारणामध्ये आपला प्रभाव, वर्चस्व कायम ठेवण्याचा प्रयत्न सदर राजकीय घराणी सतत करताना दिसून येतात.**

महाराष्ट्रातील राजकीय घराणेशाहीचे अवलोकन केल्यानंतर असे लक्षात येते की, आधुनिक लोकशाही व्यवस्थेच्या राजकारणामध्ये घराणेशाही अपरिहार्य बनली असल्याचे चित्र दिसून येत आहे. परंपरेने राजकारणामध्ये राहिलेल्या घराण्याचा राज्याच्या राजकारणावर सातत्याने प्रभाव राहिला असल्याचे दिसून येते. उदा. भोसले घराणे–अभयसिंहराजे, उदयनराजे, शिवेंद्रराजे. नव्याने निर्माण झालेल्या विविध स्थानिक स्वराज्य संस्था, व सहकारी संस्थांमधून नवघराणे उदयाला आलेली दिसून येते. आज या घराणेंची कुठे चौथी तर कुठे पाचवी पिढी राजकारणात सक्रीय असलेली दिसून येते. उदा. पवार घराणे, मोहिते–पाटील घराणे, विखे–पाटील घराणे. एकदंर पाहता घराणेशाही हे भारताच्या, महाराष्ट्राच्या राजकारणाचे अपरिहार्य व महत्त्वाचे वैशिष्ट्ये बनले असल्याचे दिसून येते. महाराष्ट्राचे राजकारण हे प्रभावी असणाऱ्या १६५ राजकीय घराण्यांच्या पुरते मर्यादित असल्याचे दिसते. ही राजकीय घराणी सत्तेत आलटून पालटून आलेली दिसतात. महाराष्ट्राचे राजकारण काही विशिष्ट घराण्याभोवती फिरते अशी टीका सातत्याने भाजप व डावेपक्ष व प्रकाश आंबेडकर यांच्याकडून होत असते. महाराष्ट्रातील सहकार चळवळीचा अभ्यास करत असताना प्रा. डॉ. गिरीष कुलकर्णी यांनी सहकारी चळवळीचा अभ्यास करून सहकार चळवळीचा आणि घराणेशाहीची संबंध लावला. सहकार चळवळीच्या माध्यमातून राजकीय घराणी कशी आकार घेत आहे आणि ही घराणी सद्याच्या राजकारणामध्ये कोण–कोणत्या क्षेत्रावर, संस्थांवर प्रभाव पडला आहे. याची जाणीव आपल्याला यातून होत आहे. घराण्यांचा संस्थात्मक आधाराकडे जर कटक्षाने पाहिले तर जात हा संस्थात्मक आधार अगदी प्रभावी पद्धतीने काम करताना दिसून येतो. **कॉंग्रेस आणि**

**राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षाने या आधारावर घराणी प्रस्थापित करण्यात यश मिळविल्याचे दिसून येते.** काँग्रेस पक्षाने तळागाळापर्यंत पोहचण्यासाठी सहकारी संस्थांचा, राजकीय घराण्यांचा, प्रभावी वापर करून आपल्या राजकीयकरणाच्या प्रक्रियेत गतीशिलता निर्माण केली. यातून घराणेशाहीचा वारसा जपण्याचा सातत्याने प्रयत्न केला असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

राजकीयकरणाला पुरक प्रभावक्षेत्र निर्माण करण्याचे काम घराण्यांनी जात या प्रभावी संख्यात्मक घटकांच्या माध्यमातून केले व स्थानिक सत्ताकेद्रांचा विकास आणि संस्थांच्या मार्फत सत्तेला पूरक प्रभाव क्षेत्राची निर्मिती केली. कुटुंबाची राजकीय भरती करताना या घराण्यांनी ज्या पद्धतीने या देशातील पक्ष पद्धतीचा फायदा करून घेतला त्या प्रमाणेच विविध सहकारी संस्था उदा. साखर कारखाने, दुध संस्था, सूतगिरण्या, वि. का. सेवा सोसायटया, पतसंस्था, अर्बन बँका, मध्यवर्ती सहकारी बँका इत्यादी नेतृत्व बदल व विकास घडवत असताना स्वतःच्या कुटुंबाच्या राजकीय भरतीला उत्तम संधी मानून जम बसविला. डॉ. सुहास पळशीकर यांच्या मते महाराष्ट्राच्या राजकारणाचा दुसरा संस्थात्मक आधार म्हणजे सहकारी संस्था होत. त्यामुळेच काँग्रेस स्थानिक पातळीवर विस्ताराली. मात्र घराणेशाहीची कीड या पक्षाला मोठया प्रमाणात लागली. त्यामुळे सत्तेच्या राजकीयकरणाच्या व्यवहारामध्ये घराण्यांनी जम बसवला. नव नेतृत्वाने ज्यांना राजकीय घराणेशाहीच्या वारसा नाही अशा उमेदवारांनी उदा. गोपीनाथ मुंडे, प्रमोद महाजन, बाळासाहेब ठाकरे यांनी घराणेशाहीवर हल्ला चढवतच राजकारण केले आणि स्वतःच्या ही पिढया यात कधी उतरवल्या हे त्यांना देखील कळले नाही जे काँग्रेसचे ते राष्ट्रवादीचे व तेच भाजपचे एकंदरीत महाराष्ट्रातील घराणेशाहीच्या वारशाबद्दल विधान करत असताना एक मुद्दा लक्षात येतो की, **आज महाराष्ट्रातील सर्वच राजकीय पक्षामध्ये घराणेशाही निर्माण झालेली असून साताऱ्यातील घराणेशाहीची परंपरा याहून वेगळी नाही.** सातारा जिल्हयामध्ये ऐतिहासिक व आधुनिक काळातील राजकीय घराण्यांनी कौंटुबिक राजकीयकरणाचा घाट घालून जिल्हामध्ये प्रभाव राहिल, अशी व्यवस्था करून ठेवली आहे. उदा. ऐतिहासिक राजकीय वारसा असलेले भोसले घराणे, नाईक–निंबाळकर घराणे आधुनिक काळातले चव्हाण घराणे, पाटील घराणे, पाटणकर घराणे, देसाई घराणे इत्यादी.

छ. शिवाजी महाराजांच्या ऐतिहासिक वारश्याबरोबरच अन्य नव उदयास आलेली घराणे म्हणजे, निंबाळकर, डफळे, घाटगे, जगदाळे, माने, पिसाळ, पाटणकर इत्यादी ऐतिहासिक सरदार घराणीही या जिल्ह्यात उदयाला आली. या घराण्याचे अनेक वंशज आपापल्या पद्धतीने सातारा जिल्ह्याच्या राजकीय व्यवस्थेवर आपला प्रभाव टाकून आहेत. या घराण्याने जिल्ह्याच्याच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्र व भारताच्या राजकारणावर आपला प्रभाव, वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

पुढे १९४७ साली देशाला स्वातंत्र्य मिळाले आणि स्वतंत्र भारताच्या आधुनिक प्रातिनिधिक संसदीय राजकारणाला सुरुवात झाली. राजेशाही संपून लोकांनी निवडलेल्या लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून देशाचा राज्यकारभार होऊ लागला. देशाचा कारभार पाहणारे लोकप्रतिनिधी निवडण्याचे स्वातंत्र्य मतदानाच्या रूपाने भारतीय नागरिकांना मिळाले. परंतु या निवडणुकींमधून पूर्वाश्रमीचे ऐतिहासिक भांडवलदार व जमीनदार घराण्यातील लोकच लोकशाही मार्गाने निवडून येऊ लागले. या नवनिर्वाचीत लोकप्रतिनिधिंनी आपआपल्या मतदारसंघामध्ये सहकाराच्या माध्यमातून अनेक विकास कामे केली, रोजगाराच्या अनेक संधी निर्माण करून हजारो लोकांच्या हाताला रोजगार मिळवून देत जिल्ह्याच्या राजकारणावर आपली मजबूत पकड निर्माण केली. पुढे त्यांनी आपल्या नंतर आपल्याच नातेवाईकांना आपल्याच मुलाबाळांना संधी दिली. त्याच त्याच कुटुंबातील लोक दुधसंघ, सहकारी बँका, सूत गिरण्या, सहकारी साखर कारखाणे, आणि तत्सम सहकारी संस्थांच्या माध्यमातून निवडून येऊ लागले व त्याच कुटुंबात सत्ता टिकूण राहिली आशा प्रकारे राजकीय घराणी प्रबळ होत गेली असल्याचे दिसून येते.

सातारा जिल्हा हा राजकीय वारसा लाभलेला ऐतिहासिक व क्रांतिकारी असा जिल्हा असून महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासामध्ये या जिल्ह्याची स्वतःची एक वेगळी ओळख स्थान आहे. स्वातंत्र्यापासून राज्याच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय क्षेत्रात सातारा जिल्ह्याचे योगदान खूप मोलाचे आहे. उदा. क्रांतिसिंह नाना पाटील, यशवंतराव चव्हाण, किसनवीर, जी. डी. बापू लाड, बाळासाहेब देसाई, प्रतापराव भोसले, यशवंतराव मोहिते, आनंतराव चव्हाण इत्यादी यांनी आपल्या घराण्याचा वारसा घेऊन सातारा जिल्हाबरोबरच महाराष्ट्राचा राजकारणामध्ये आपली व आपल्या घराण्याची पुनश्च ओळख निर्माण केली. त्याबरोबरच **राजकीय वारसा नसलेली काही घराणी पण जिल्ह्याच्या राजकारणामध्ये सक्रिय आहेत**

**अशा घराण्यांनी देखील जनधाराच्या माध्यमातून सातारा जिल्हयातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात आपली एक राजकीय ओळख** (Political Identity) **निर्माण केली आहे.** उदा. कराड दक्षिण मतदार संघातून यशवंतराव मोहीते, विलासराव पाटील उंडाळकर तर कराड उत्तरेतून पी. डी. पाटील, बाळासाहेब पाटील, पाटणमधून पृथ्वीराज चव्हाण, शंभुराजे देसाई, विक्रमसिंग पाटणकर, वाईमधून लक्ष्मणराव पाटील, मदनराव पिसाळ, प्रतापराव भोसले या घराण्यानी राजकीय इतिहासामध्ये आपले नाव कायमचे कोरलेले आहे. या घराण्यांनी ग्रामपंचायतीपासून ते लोकसभेच्या खासदार, मुख्यमंत्री पदापर्यंत झेप घेवून आपली व आपल्या घराण्याची राजकीय ओळख निर्माण केली.

सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक संस्थावर या घराण्याचे वर्चस्व असल्यामुळे या घराण्याची राजकीय पिढी ही राजकारणात प्रभावीपणे नेतृत्त्व करताना दिसते. यात कसल्याच प्रकारचा वाद नाही. कारण वेगवेगळया पदावर काम करत असताना या घराण्यांनी बेरजेचे राजकारणही करण्याचा प्रयत्न केला. एकाच घराण्यातील लोकांनी राजकीय वारसा उपभोगणे हेच मुळात संसदीय शासन व्यवस्थेला मारक आहे. लोकशाही मूल्याची पायमल्ली करणारे आहे मात्र या घराण्याच्या राजकीय प्रभावाखाली सातारा जिल्हयाचीच नव्हेतर महाराष्ट्राची देखील जडण–घडण झालेली आपल्याला दिसून येते. प्रस्तुत प्रबंधाच्या दुसऱ्या प्रकरणांमध्ये राजकीय घराण्याचा आढावा घेत असताना विशेषतः भारतातील घराणेशाहीचा उदय विकास याविषयी चर्चा केली आहे. यामध्ये मुठभर घराण्यांनी राज्यव्यवस्था कशापद्धतीने स्वतःच्या दावणिला बांधलेली आहे. याचे सविस्तर, विश्लेषण केलेले आहे. विशेष म्हणजे पद्धतशिरित्या भारतीय राजकारणाचा अभ्यास करून या घराण्यांनी आपली राजकीय घराणेशाहीची कारकिर्द उत्तरोत्तर प्रभावीपणे कशी कार्यक्षम राहील याचीच दखल घेतल्याचे दिसून येते. कोणताही पक्ष सत्तेवर आला असला तरी सत्ता मात्र ठराविक राजकीय घराण्यामध्येच कायम राहते. यातूनच हे स्पष्ट होते की, **राजकारण हा सातारा जिल्ह्यातील पर्यायाने महाराष्ट्रातील घराण्यांचा परंपरागत व्यवसाय बनला आहे. त्याचबरोबर परस्पर संबंधी घराण्यांमध्ये पद्धतशीरपणे सत्तेचे वाटप करून घराणेशाही कशी स्थिर व कायम ठेवण्याचा प्रयत्न होत आहे हे दिसून येते.**

निंबाळकर घराणे – ७०० वर्षांचा प्राचीन वारसा लाभलेले हे फलटणचे निंबाळकर घराणे म्हणून ओळखले जाते. पूर्वाश्रमीचे हे पवार घराणे. आजच्या सातारा जिल्ह्यामध्ये

आपल्याला घराण्यांचा राजकीय वारसा जतन करण्याबरोबरच ते चालवणारे सक्षम कर्तबगार घराणे म्हणून निंबाळकर घराणे ओळखले जाते. या घराण्याने जिल्हयाच्या राजकारणामध्ये खूप मोठी प्रभावी भूमिका बजावलेली असून मुधोजीराजे, मालोजीराजे, रामराजे नाईक– निंबाळकर, शिवाजीराजे नाईक–निंबाळकर, संजीवराजे नाईक–निंबाळकर यांनी घराण्याचे राजकीयकरण केले. मात्र हे करत असताना बहुजन वंचित समाजाच्या विकासाचे पर्याय सुचविले. त्याबरोबरच फलटण तालुक्याच्या विकासाला चालना दिली. या निंबाळकर घराण्याने सन १९९१, १९९६, २००२ आणि २००७ मधील नगरपरीषदामध्ये व सन १९९५, १९९९ व २००४ मधील विधानसभा निवडणुका मताधिक्याने जिंकून आपली सत्ता जनाधारावरच आणि आपल्या कर्तत्वातून घराण्याचा वारसा व घराण्याच्या राजकीयकरणाला गतीमानता दिली. सत्तेत नसताना अनेक ज्येष्ठांच्या मदतीने सल्ल्याने कार्यकर्त्यांच्या मदतीने राजकारणामध्ये यश मिळविले आणि आजही आपल्या घराण्याच्या राजकीयकरणासोबतच जनतेच्या प्रश्नांनाही तितक्याच तत्परतेने सोडवण्याचा योग्य न्यायदेण्याचा प्रयत्न निंबाळकर घराण्यांकडून होताना दिसत आहे.

सातारा जिल्हयातील राजकारणामध्ये सक्रिय सहभाग असलेले एक महत्वपूर्ण घराणे म्हणजे बोपेगावचे जाधव–पाटील घराणे होय. या घराण्यातील लक्ष्मणराव पाटील यांनी राजकारणामध्ये आपल्या घराण्यांचा ठसा उमटविला. बोपेगावच्या ग्रामपंचायतीच्या संरपंच पदापासून ते लोकसभेपर्यंत आपला प्रवास या घराण्याने निरंतर ठेवल्याचे दिसून येते. ग्रामीण पातळीवरचे छोटे मोठे प्रश्न सोडवत सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, सांस्कृतिक विकासाला प्रोत्साहन देत, कामगार, शेतकरी व कष्टकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडत जनाधार संग्रहीत केला. अटीतटीच्या वेळी पदावरती लाथ मारून जनतेसाठी आपण समाजसेवा करत असल्याची जाणीव जनतेच्या मनामध्ये रूजविली. धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक क्षेत्रात अमुलाग्र बदल केले. पक्षाच्या संघटनाबरोबरच, आपल्या घराण्यालाही प्रतिष्ठा मिळवून दिली. वाई तालुक्यातील बोपेगावचे जाधव–पाटील घराणे हे खासदार लक्ष्मणराव पाटील यांच्या कारकीर्दीपासून आपला वारसा राजकारणात टिकवून आहे. या घराण्याने राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात आपला ठसा निर्माण करून आपले राजकरणातील स्थान पक्के केले त्यानंतर आजही मकरंद पाटील हे वाई खंडाळा, महाबळेश्वर या गटाचे आमदार

आहेत तर त्यांचे बंधू नितीन पाटील हे सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष आहेत. हे पाटील घराण्यांने सातारा जिल्ह्याच्या सत्तेच्या राजकारणात आपला वेगळा प्रभाव निर्माण केला आहे.

घराणेशाहीच्या क्रमवारीमध्ये कराडचे पाटील – उंडाळकर घराणे होय. या घराण्याचा वारसा स्वातंत्र्यपूर्व कालखंडापासून असून स्वांत्र्यवीर दादासाहेब पाटील उंडाळकर यांच्यापासून या घराण्याने देशाच्या राजकारणात सहभाग घेतला. स्वातंत्र्यानंतर दादासाहेब पाटील यांचे चिरंजीव विलासराव पाटील उंडाळकर यांनी वडीलांचा वारसा पुढे चालवण्याचा प्रयत्न केला. सलग ७ वेळा आमदार म्हणून निवडून येण्याचा मान विलसराव उंडाळकरांना जातो. मतदारसंघ हेच आपले घर व संसार माणनाऱ्या विलासराव पाटील उंडाळकरांनी समाजातील दलित, शोषित, वंचीत जनांची दुःखे ओळखून सृर्जनात्मक विकासाची रणणिती आखली. सहकार, शिक्षण, समाज, अर्थ, संस्कृती या बरोबरच विविधांगी क्षेत्रामध्ये विलासराव उंडाळकरांनी आदर्श निर्माण केला. आपल्या कृतीचा राजकारणामध्ये वसा आणि वारसा चालवणारी पिढी विलासराव उंडाळकरांनी निर्माण केली.

कराडचे मोहिते घराणे हे सातारा जिल्हयातील कराड दक्षिण विधानसभा मतदार संघात नावारूपास आलेले एक महत्वपूर्ण घराणे आहे. १९५२ मध्ये शेतकरी कामगार पक्षाच्या माध्यमातून  निवडूणक लढवली. त्यानंतर यशवंतराव मोहिते यांनी राजकारणात कधीही मागे वळून पाहिले नाही. अखंड जनाधार लाभलेले व जनेतेच्या कल्याणाचे व्रत घेतलेले असे मोहिते घराणे सामान्याच्या हिताला नेहमीच प्राधान्य देणारे होते. यशवंतराव मोहिते यांनी राजकारणामध्ये कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघात २८ वर्षे व कराड लोकसभा मतदारसंघाचे १९७८ ते १९८० प्रतिनिधीत्व केले. १९५२ ते १९७९ पर्यंत वेगवेगळया खात्याचे मंत्री म्हणून कार्य करत असताना, अनेक योजना कार्यान्वीत केल्या शिक्षण क्षेत्रातील मोहिते घराण्याचा वारसा खूप मोठा असल्यामुळे या घराण्याने आपल्या या शैक्षणिक संस्थाच्या माध्यमातून खूप मोठया प्रमाणात जनाधार उभा केल्याचे दिसून येते. शैक्षणिक संस्थांच्या उभारणीच्या माध्यमातून जनतेमध्ये आपले राजकीय वारसदार उभे केले जावू शकतात हे काही महाराष्ट्राला नवे नाही. मराठी, इंग्रजी, इंजिनिअरींग मेडीकल, कृषी या शैक्षणिक संस्थाच्या माध्यमातून घराण्यांच्या राजकीय करणाची प्रक्रिया प्रगल्भ होवू शकते हे त्यांनी दाखवून दिले.

सातारा जिल्हयाच्या राजकारणावर नेहमीच प्रभाव असलेले सातारा जिल्ह्यातील महत्वाचे राजकीय घराणे म्हणजेच पाटणचे देसाई घराणे होय. शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेबरोबर व इतर अतिशय समाजोपयोगी व कृतीशिल कार्यात्मक धोरणांची पेरणी व अंमलबजावणी श्री. बाळासाहेब देसाई यांनी केली. सातारा जिल्हयाच्या राजकारणांवर अतिशय कृतिशिल प्रभाव टाकणारे काम या देसाई घराण्याने केले. पाटणचे देसाई घराणे आणि त्यांनी निर्माण केलेली शैक्षणिक व राजकीय परंपरा ही घराणेशाहीच्या रूपाने आजही मोठया प्रमाणात सातारा जिल्हयामध्ये कार्यरत आहे. याचा प्रभाव सातारा जिल्हयातील राजकारणाबरोबरच, समाजकारण व इतर क्षेत्रात मोठया प्रमाणात होतांना दिसून येतो. सातारा जिल्ह्यातील राजकीय घराण्याचा प्रभाव हा सर्वागिणपणे झाल्याचे दिसून येते. लोकशाहीच्या गोंडस नावाखाली राजकीय व्यवस्थेच्या सूत्रे मोजक्याच घराण्याच्या ताब्यात जाणे हा भारतीय लोकशाही व्यवस्थेसमोर मोठी समस्या निर्माण झाली आहे. गांधी घराण्यापासूनच घराणेशाहीचा हा वारसा भारतातील लोकशाहीच्या राजकारणाला मिळाला आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. ही घराणेशाही व्यवस्था जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या भारतात सर्व राज्यात, जिल्ह्यात व गावांगावांत बघायला मिळते. महिला आरक्षणातून स्त्री ग्रामपंचायतीमध्ये सरपंच झाल्यास त्या घराण्यातील पुरुष व पुढे त्या त्या गावांमध्ये ते घराणेच ग्रामपंचायतीमध्ये सहभाग नोंदविते. यातूनच आपोआप घराणेशाहीची वृत्ती जोपासताना दिसून येते. अशी घराणी उत्तरोत्तर सत्ता स्थानांवर वर्चस्व गाजवण्याच्या वृत्तीतून घराणेशाहीची लोकशाहीमधील अपरिहार्यता उत्तरोत्तर वाढत जाताना दिसून येते. कदाचित घरणेशाही हे लोकशाहीचे एक व्यवच्छेदक लक्षणच बनले आहे असे म्हटले तरी वावगे ठरू नये. महाराष्ट्रातील राजकारणाचा पाया देखील घराणेशाहीतूनच आकाराला आल्याचे दिसून येते. घराणेशाहीने राजकीय पक्षाला सुद्धा वेळोवेळी प्रभावित केल्याचे आपल्याला दिसून येते. **घराणेशाहीचा राजकारणावर इतका प्रभाव आहे की राजकीय पक्षांना आता घराण्याची प्रतिमा पुसणे अवघडच नाही तर अशक्य झाल्याचे दिसून येते.**

घराणेशाहीमुळे घराण्याच्या दावणीला राजकीय पक्ष बांधल्याची असंख्य उदाहरणे आपल्याला भारतभर, महाराष्ट्रभर दिसून येतील त्यात सातारा जिल्हा काही वेगळा नाही. मात्र या जिल्हा क्रांतिकारकांचा जिल्हा म्हणून ओळखला जात असला तरी पक्षीय राजकारणाने व

घराणेशाहीच्या उदय व कर्तृत्वाने अगदी स्वातंत्र्यलढयामध्ये प्राणाची पर्वा न करता ब्रिटीशांचा विरोध करून स्वातंत्र्य मिळवलेल्या जी. डी. लाड, नागनाथ अण्णा नायकवाडी, किसनवीर इत्यादी स्वातंत्र्यसैनिकांना घराणेशाहीच्या पक्षीय राजकारणामुळे पराभवाला सामोरे जावे लागले यातूनच आपल्याला पक्षीय राजकारणावर घराणेशाहीच्या असलेल्या प्रभावाची कल्पना येऊ शकते. सातारा जिल्ह्यातील या घराण्यांनी राजकारणाला व लोकशाहीला प्रभावित केले यात तिळमात्र शंका नाही. मात्र या प्रभावाचे स्वरूप हे उत्तररोत्तर नवनवीन प्रश्न निर्माण करणारे आहे. सातारा लोकसभा मतदारसंघातून इ.स १९५७ यावर्षी क्रांतीसिंह नाना पाटील व इ.स १९९६ मध्ये शिवसेनेचे हिंदुराव नाईक निंबाळकर यांचा अपवाद वगळता सातत्याने राजकीय घराण्याचा वरचष्मा असल्याचे स्पष्ट दिसून येते. तर कराड लोकसभा मतदारसंघांमध्ये सातत्यपूर्ण रितीने चव्हाण घराणे प्रभावी असल्याचे दिसून येते. **एकदा फळे चाखल्यानंतर समाजातील इतरांना ती सहजासहजी मिळू नयेत यांची काळजी या घराण्यांनी घेतल्याचे दिसून येते. किंवा आपल्याच घराण्यात नवे राजकीय नेतृत्व उभे करण्याचे त्यांच्यातच नेतृत्वगुण असून ते इतरांमध्ये नाहीत याची जाणीव ही या घराणेशाही मध्ये अस्तित्वात असावी, अन्यथा सत्तेचे केंद्रीकरण घराणेशाहीला इतके पोषक कधीच झाले नसते.**

सत्तेसाठी पक्षनिष्ठा सुद्धा बदलण्याची नैतिकता घराण्यांच्या असण्याबरोबरच एखादा शासनव्यवस्थेबरोबरच प्रशासनातील संस्थांना वेठीस धरण्याचे कामेही घराण्यांनी मोठ्या प्रमाणात केल्याची असंख्य उदाहरणे आपल्याला भारतीय घराणेशाहीच्या इतिहासामध्ये सापडतात. सातारा जिल्ह्यातील घराण्यांचा प्रभाव जिल्ह्यातील राजकीय प्रक्रियेबरोबर अन्य घटकावर देखील पाडत असलेला दिसून येतो.

**राजकीय घराण्यामुळे प्रभावित झालेल्या घटनाः**

१. राजकारण हे जबाबदारीचे काम असल्यामुळे आणि राजकीय घराण्यांच्या वारसा पाठीशी असल्यामुळे घराणेशाहीतून पुढे येणाऱ्या नवनेतृत्वाकडे ही जबाबदारी वाढते.

२. घराणेशाहीच्या वारश्यामुळे घराण्यातील नवनेतृत्वाला राजकारणामध्ये उतरतांना जास्त परिश्रम करावे लागत नाही राजकीय प्रवेश सहजासहजी होतो. मात्र एखादया नवीन उमेदवाराला राजकारणामध्ये प्रवेश करताना अनेक प्रश्नांना तोंड द्यावे लागते. त्यामुळे नवीन नेतृत्त्वाची राजकीय वारसा व घराणेशाहीचा प्रभावामुळे वाट खडतर होते.

३. खालसा झालेल्या संस्थानिकांचा जो वारसा होता तो घराणेशाहीतून पुन्हा मूळ धरू लागलेला दिसतो.

४. इ.स १९५७ ला महाराष्ट्रामध्ये ग्रामपंचायत कायदा लागू झाला त्यानुसार इ.स १९६२ मध्ये जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांची निर्मिती करून विकेंद्रीकरणाची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आणि यांचा फायदा जितका पक्षाने घेतला तितकाच पारंपरिक फायदा घराणेशाहीने करून घेतला.

५. इ. स. १९९२ मधील ७३ व्या व ७४ व्या घटनादुरुस्त्यांनी स्थानिक संस्थांच्या जागा व पदासाठी दलित, ओबीसी, आदिवासी व स्त्रिया यांच्यासाठी आरक्षण लागू केले. परिणामी हजारो स्थानिक लोकप्रतिनिधी, वंचित वर्गामधून निवडून येऊ लागले. या सर्व वंचित वर्गामध्ये राजकीयीकरण होऊन त्यांना उमेदवारी मिळू लागली हा बदल पचविण्याची मानसिकता कोणत्याही पक्षात व पक्षातील घराणेशाहीमध्ये अद्यापही दिसून येत नाही.

६. भारतीय राजकारणामध्ये घराणेशाही लोकशाही मार्गानेच वृद्धिंगत झाली असून ही घराणेशाही समकालीन कालखंडामध्ये फोफावत असताना दिसून येते. भारतातील राजकीय पक्षांचा प्रवास घराणेशाहीकडून फॅमिली प्रॉपर्टीकडे झाला आहे. त्यामुळे सातारा जिल्हाच याला अपवाद नसून देशातील विविध राज्यातील राजकीय पक्षात राजकीय घराणेशाही असलेली दिसते.

७. काँग्रेसच्या घराणेशाही विरुद्ध टीका करणाऱ्या राजकीय पक्षांनी नकळतपणे आपल्या पाल्यांना आपल्या पक्षात प्रमुख नेतृत्वपदी बसविले असल्याचे दिसून येते.

८. कुटुंबाच्या घराणेशाहीच्या पुण्याईवर एक वेळ निवडणूक जिंकता येते परंतु राजकारणात टिकायचे असेल तर व्यक्तिगत कर्तृत्व सिद्ध करावे लागले. त्यामुळे घराणेशाहीचे वर्चस्वही कमी होत नाही. भारतातील बहुतांश राष्ट्रीय पक्ष व प्रादेशिक पक्ष यांचा विचार करता या पक्षांचे नेतृत्त्व एकाच कुटुंबाकडे असलेले दिसते. हीच कुंटुबे आपला प्रभाव राजकीय पक्षाच्या माध्यमातून पाडताना दिसतात.

९. घराण्यांचा प्रभाव इतका असतो की अशा मतदारसंघाचे प्रतिनिधित्त्व करण्याचे स्वप्न बघण्याचे साहस राजकीय घराण्याबाहेरील व्यक्ती करूच शकत नाही.

१०. घराणेकेंद्रित पक्षात सामूहिक जबाबदारीचे तत्व वगैरे गोष्टी शोभेच्याच असतात. ज्याच्या नेतृत्वाने पक्ष संघटनेवर वर्चस्व ठेवले आहे तो नेता व घराणेच विजयाचा अग्रदूत असते. संघटनाबांधणीपेक्षा कुटुंबप्रमुखाच्या करिश्म्यामुळे निवडणुका जिंकण्याची सवय लागलेले घराणे केंद्रित पक्ष एका टप्प्यावर त्या घराण्यातीलच निवडणुका विजयाची फॅक्टरी मानू लागतात आणि तिथूनच राजकीय केंद्रीकरणाला सुरुवात होताना दिसते.

११. घराणेशाहीमुळे पक्षाची विचारधारा गतिहीन होण्याबरोबरच त्यांच्या अवैचारिक धोरणामुळे त्या पक्षाबरोबरच शासनव्यवस्थेचेही मोठे नुकसान होते. प्रशासकीय वर्गाना देखील ही घराणेशाहीची मनमानी मारून मुटकून सहन करावी लागते. घराणेशाहीतल्या अशा नवनेत्याच्या नाराजीना आपण बळी पडू नये म्हणून संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा लगबग करताना दिसून येते.

१२. घराणे केंद्रित पक्षांनी भारतीय लोकशाहीला एका प्रकारे घेरूनच तिची प्रतिष्ठा कमी केलेली आहे. आधीच्या समानतेवर उभी असलेली सामाजिक न्यायाची भूमिका अशा पक्षांनी आपल्या व्यवहारातून सपशेल फेटाळली आहे. त्यामुळे घराणेशाहीचे राजकीयीकरण हे भारतीय लोकशाही समोरील आव्हान आहे. वकिलाचा मुलगा वकील, डॉक्टरांच्या मुलगा डॉक्टर होतांना वारसा चालवताना आपण पाहतो. त्यांना वडिलांचे कार्यालय आणि सदिच्छा मिळतात. अखेर त्यालाही स्वतःला सिद्ध करावेच लागते? राजकारणात वडिलांनी किंवा आप्तांनी उतरविले आणि कोटयावधी रूपये खर्चून ही अपयश पदरी पडल्याची असंख्य उदाहरणे ही आहेत.

त्याप्रमाणेच विरोधाला पचवून पाय रोवण्याचे सामर्थ्य असते तेच घराण्याच्या पाठिंब्यावर आणि पुण्याईवर पुढे जाऊ शकतात. काळाच्या आघोत अवघ्या दहा वीस वर्षामध्ये सुज्ञ मतदारांनी अनेक राजकीय घराण्याचे अस्तित्व मिटवून टाकले आहे. मात्र घराणेशाही भारतीय राजकारणाला शाप की वरदान हा नेहमीच चिंतेचा विषय राहिला असून जोपर्यंत लोकशाही आहे तोपर्यंत घराणेशाही नांदणार आहे आणि सातारा जिल्ह्यातील सर्वच पक्षात कमी अधिक प्रमाणात घराणेशाही उदयाला आलेली आपल्याला दिसून येते.

## निष्कर्ष

१. सातारा जिल्हा भौगोलिकदृष्ट्या महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांपेक्षा वेगळा आहे. या जिल्ह्यामधील कोयना नगर, नवजा, महाबळेश्वर, पाटण, जावळी हा भाग अतिपर्जन्य असलेला तर माण, दहिवडी, म्हसवड, फलटण हा भाग दुष्काळी भाग म्हणून ओळखला जातो. सातारा जिल्ह्यातील काही भाग डोंगराळ, जंगलाने व्यापलेला तर काही भाग सपाट व सुपीक असलेला दिसतो. हा भाग कोयना, कृष्णा नदीच्या पाण्यामुळे समृद्ध झालेला दिसून येतो.

२. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेला व ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेल्या सातारा जिल्ह्यामधून मोरे, डफळे, भोसले, निंबाळकर या घराण्यांचा उदय झाला. आजही भोसले, निंबाळकर या घराण्यांचे सातारा जिल्ह्याच्या राजकारणावर वर्चस्व असल्याचे दिसते.

३. सातारा जिल्ह्यातील ओलिताखाली असलेल्या जमिनीचे प्रमाण कृष्णा, कोयना नदीक्षेत्रात जास्त असल्याचे दिसून येते. या भागातील शेतकरी ऊस पिकाचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर करतो त्यामुळे महाराष्ट्रातील १८८ सहकारी साखर कारखान्यापैकी १० सहकारी व ४ खाजगी साखर कारखाने सातारा जिल्ह्यामध्ये असल्याचे दिसते.

४. सहकार चळवळीमध्ये आघाडीवर असलेल्या महाराष्ट्र राज्यामध्ये १९०७ साली स्थापन झालेल्या बोधे, माण तालुक्यामधील पहिल्या कृषी पतसंस्थेच्या माध्यमातून सहकाराची चळवळीचा उदय सातारा जिल्ह्यामधून प्रथम झाला. सन १९४०–४१ मध्ये सातारा जिल्ह्यामध्ये ३२९ सहकारी संस्था कार्यरत होत्या. सध्या सातारा जिल्ह्यामधील सहकारी संस्थांच्या संख्येत वाढ होऊन तिची संख्या ५२३३ इतकी झाली आहे.

५. सातारा जिल्ह्यातील सहकारी संस्था, साखर, कारखाने, दुध संस्था, शिक्षण संस्था, सुतगिरण्या इ. संस्था राजकारणातील महत्त्वाचे आधार बनले आहेत. या सर्व सहकारी संस्था बहुतांशी मराठा समाजाच्या ताब्यात आहेत.

६. सातारा जिल्ह्यातील दलित, मागास वर्ग व अल्पसंख्यांक समाजाची लोकसंख्या ही लक्षणीय असून सातारा जिल्ह्याच्या राजकारणाची समीकरणे बदलण्या इतपत ती प्रभावी आहे. परंतु त्यांच्या एक संघ ताकतीचे विभाजन अनेक पक्ष, संघटना व मराठा

घराण्यातील गटामध्ये झाले आहे. राखीव मतदार संघाच्या माध्यमातून कोल्हापूर जिल्ह्यातील वडगाव या मतदार संघातून ज्याप्रमाणे जयवंतराव आवळे यांना निवडून येण्यासाठी ज्या आधाराची आवश्यकता असते. असे आधार सहकाराच्या माध्यमातून जयवंतराव आवळे यांनी उभे केले व राजकीय घराणेशाही निर्माण केली तशा प्रकारे सातारा जिल्ह्यातील दलित समाजाला करता आले नाही. याचे महत्त्वाचे कारण सातारा जिल्ह्यामधील राखीव मतदार संघाचे सातत्य राहिले नाही. राखीव मतदार संघातून उदयास आलेले नेतृत्त्व दिशाहीन व निष्क्रीय राहिले. त्यामुळे दलित समाजाला सातारा जिल्ह्याच्या राजकारणावर वर्चस्व प्रस्तापित करता आले नाही.

७. सातारा जिल्ह्यातील प्रथम दोन प्रभावी राजकीय घराणी भोसले, निंबाळकर ही संस्थानिक व ऐतिहासिक घराणी आहेत.

८. सातारा जिल्ह्यातील राजकीय घराणी ही मराठा जातीची असलेली दिसून येतात.

९. सातारा – भोसले, फलटण–निंबाळक, कराड उत्तर–पाटील या राजकीय घराण्यांच्या विरोधी प्रभावी नेतृत्त्व निर्माण झालेले नाही.

१०. पाटणकर, विलासराव पाटील, वाई–भोसले या राजकीय घराण्यांचा वारस विधानसभा निवडणुकीत यशस्वी झाले नसले तरी मतदार संघात प्रतिस्पर्धी म्हणून आपले अस्तित्व ठेवून आहेत.

११. सातारा – भोसले, निंबाळकर, कराड उत्तर–पाटील, वाई–पाटील या राजकीय घराण्यांच्या प्रभाव जिल्ह्याच्या राजकारणावर निर्माण झालेला दिसतो.

१२. कोरेगाव मतदार संघातील शशिकांत शिंदे ह्यांना राजकीय वारसा नसून सुद्धा ते जिल्ह्याच्या राजकारणात आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण करताना दिसतात.

१३. राजकीय घराण्यांच्या कार्याने विविध सहकारी संस्थांच्या माध्यमातून जिल्ह्यामध्ये रोजगार निर्मिती झालेली दिसून येते .

१४. सातारा जिल्ह्यातील प्रभावी राजकीय घराण्यांनी नेतृत्त्वाने पक्ष बदल केल्यास त्यास मतदार संघातील जनतेचे समर्थन असलेले दिसते. यावरून असे दिसून येते की, मतदार संघात राजकीय पक्षापेक्षा, राजकीय घराण्यांना महत्त्व आहे.

१५. पृथ्वीराज चव्हाण हे राज्याच्या राजकारणात सक्रीय असले तरी त्यांनी राष्ट्रीय राजकारणात सक्रिय राहावे, असे मत मतदारांचे दिसून येते.

१६. जिल्ह्याच्या राजकारणावर राजकीय घराण्यांचा प्रभाव असला तरी ही राजकीय घराणी लोकशाही व्यवस्थेच्या विकासासाठी अडचणीची आहेत असे मत जिल्ह्यातील ५३ टक्के लोकांचे असलेले दिसते.

१७. सातारा जिल्ह्यातील राजकीय घराण्यांचा प्रभाव, आर्थिक संपन्नता यांचा नकारात्मक परिणाम म्हणून सर्वसामान्य नेतृत्त्वास लोकसभा व विधानसभेमध्ये प्रतिनिधित्व करण्याची संधी प्राप्त होताना दिसत नाही.

१८. राजकीय घराण्यांच्या नव्या पिढीतील नेतृत्त्वापेक्षा जुन्या पिढीतील नेतृत्त्वावर जास्त विश्वास होता असे दिसून येते.

१९. सातारा जिल्ह्यातील १९९० ते २०१५ या कालखंडातील राजकीय घराण्यांचा अभ्यास करता असे दिसून येते की, कराड–पाटण तालुक्यातील प्रेमलाताई चव्हाण यांचा अपवाद सोडला तर महिला नेतृत्त्व, वारसा पुढे आल्याचे दिसत नाही. घराण्यांच्या राजकीय वारसासाठी स्त्रियांच्यापेक्षा पुरुषांचा प्रभाव दिसतो.

२०. स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये काँग्रेस पक्षाने सहकार चळवळीच्या माध्यमातून सातारा जिल्ह्याच्या राजकारणावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. सातारा जिल्ह्यातील मराठा अभिजनांनी काँग्रेस वर्चस्वाचा फायदा उठवत. विधानसभा व लोकसभा निवडणूकीमधून निवडून येऊन आपआपल्या मतदार संघावर वर्चस्व निर्माण केले आणि सहकारी साखर कारखाने, शिक्षण संस्था, सुतगिरण्या, दूध संस्था अशा अनेक सहकारी संस्थांची निर्मिती केली. या संस्थावर त्यांनी आपल्याच जवळच्या नातेवाईकांना चेअरमन, अध्यक्ष म्हणून काम करण्याची संधी देवून घराणेशाही निर्माण केली.

२१. सातारा जिल्ह्यातील घराण्यांचे वैशिष्ट्ये म्हणजे ज्याप्रमाणे महाराष्ट्रामध्ये सहकार चळवळीच्या माध्यमातून राजकीय घराणी निर्माण झाली, त्याप्रमाणे सातारा जिल्ह्यामध्ये ही राजकीय घराणी उदयास आली आहेत ती लोकसभा व विधानसभा निवडणूकीच्या माध्यमातून निवडून आल्यानंतर त्यांनी सहकारी संस्थांचे जाळे आपआपल्या मतदार

संघामध्ये निर्माण करून घराणेशाही निर्माण केल्याचे चित्र संबंध सातारा जिल्ह्यामध्ये दिसते.

२२. सातारा जिल्ह्यातील लोकनेते बाळासाहेब देसाई, पी. डी. पाटील, अभयसिंहराजे भोसले, यशवंतराव मोहिते, निंबाळकर या मराठा अभिजनांनी विधानसभा व लोकसभा निवडणूकीत निवडून आल्यानंतर सहकारी साखर कारखान्यांची निर्मिती केली. त्या माध्यमातून त्यांनी कारखाना परिसरामध्ये शाळा, महाविद्यालये, इंजिनिअरींग, पॉलीटेकनिक, आय. टी. आय., वैद्यकीय शिक्षण देणारी महाविद्यालय अशा अनेक संस्था निर्माण केल्या व घराणी स्थिर करण्यासाठी पोषक वातावरण निर्माण केले.

२३. सातारा जिल्ह्यातील कराड दक्षिण व पाटण, वाई विधानसभा मतदार संघातील आमदार अनुक्रमे विलासराव पाटील उंडाळकर यांनी ३४ वर्षे व विक्रमसिंह पाटणकर यांनी ३० वर्षे महाराष्ट्र विधानसभेवर निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले. तर वाईचे मदन पिसाळ यांनी २० वर्षे विधानसभेचे नेतृत्त्व केले. परंतु त्यांना आपल्या मुलांना किंवा इतर नातेवाईकांना राजकारणामध्ये प्रस्थापित करून घराणेशाही निर्माण करण्यात सध्या तरी अपयश आल्याचे दिसते. त्यांचे वारस स्थानिक स्वराज्य संस्था व सहकारी संस्थापर्यंत नेतृत्त्व करताना दिसतात तर कराड दक्षिण या पूर्वीच्या लोकसभा व आताच्या विधानसभा मतदार संघातून जवळपास ३० वर्षे आमदार व पाच वर्षे खासदार म्हणून वर्चस्व प्रस्थापित करून आपल्या मतदार संघामध्ये कृष्णा सहकारी साखर कारखाना, कृष्णा चॅरिटेबल ट्रस्ट, मयुर पोल्ट्री पार्क इत्यादी सहकारी संस्था निर्माण करून देखील यशवंतराव मोहिते यांना देखील आपल्या मुलाला, भावाला किंवा पुतण्याला आपला राजकीय वारसदार म्हणून पुढे आणण्यात अपयश आल्याचे दिसते.

२४. सातारा जिल्ह्यामधील चव्हाण घराणे विशेषत: आनंदराव चव्हाण यांचे घराणे जन्मभूमी पाटण तर कर्मभूमी कराड असल्याचे दिसते. या घराण्याने निवडणूकीपूर्वी किंवा निवडून आल्यानंतर कराड–पाटण तालुक्यामध्ये एक ही सहकारी संस्था उभी न करता १९५४ सालापासून ते आज अखेरपर्यंत सलग ७० वर्षे महाराष्ट्रासह देशाच्या राजकारणावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे. त्यामध्ये आनंदराव चव्हाण यांच्या पत्नी प्रेमलाताई

चव्हाण खासदार, तर मुलगा पृथ्वीराज चव्हाण खासदार, केंद्रीय मंत्री व महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री म्हणून काम करण्याची संधी असे हे चव्हाण घराणे जिल्ह्याच्याच नव्हे तर राज्याच्या राजकारणामध्ये एकमेव घराणे आहे.

२५. सातारा जिल्ह्याच्या राजकारणामध्ये भांडवलशाही व साखर सम्राटांच्या शिरकावामुळे निवडणूका खर्चीक झाल्या, त्यामुळे जिल्ह्यातील सर्वसामान्य जनता नेतृत्त्वापासून वंचित राहत असल्याचे दिसून येते.

२६. सातारा जिल्ह्यातील राजकीय घराण्यातील अभिजनांनी सततचा जनसंपर्क, विकास कामे, वैयक्तिक कार्यावर भर यामुळे जिल्ह्याच्या राजकारणावर आपला प्रभाव, वर्चस्व प्रस्थापित केले असल्याचे दिसून येते. हेच प्रमुख कारण घराणेशाही स्थिरावण्यास कारणीभूत ठरल्याचे दिसून येते.

२७. सत्ता संघर्ष परंपरागत व ठराविक राजकीय घराण्यांमध्ये असलेला दिसतो.

२८. पक्षांतर केले तरी नेतृत्त्वावर, राजकीय घराण्यांवर मतदारांची निष्ठा असलेली दिसते. तर राजकीय पक्ष ही जिंकून येण्याची क्षमता हाच निकष लावताना दिसतात.

२९. मतदार संघाचा सहकारी संस्थांच्या माध्यमातून झालेला विकास, वैयक्तिक कामे यामुळे त्या–त्या मतदार संघातील मतदार संबंधित घराण्याच्या पाठीशी राहिल्याचे चित्र सातारा जिल्ह्यामध्ये दिसून येते.

३०. सातारा जिल्ह्यामध्ये फलटण, वाई, सातारा, कराड–उत्तर, पाटण विधानसभा मतदार संघ या ठराविक तालुक्यामध्ये व मतदार संघामध्ये घराणेशाही स्थिरावलेली दिसते. राजकारण हा या जिल्ह्यातील घराण्यांचा पारंपारिक व्यवसाय निर्माण झालेला आहे.

३१. घराणेशाहीमुळे काही ठिकाणी अकार्यक्षम नेतृत्त्व पुढे येऊन कार्यक्षम व निष्ठावंत कार्यकर्त्यांचे राजकीय खच्चीकरण झाल्याचे दिसून येते. राजकीय घराण्यांच्या सत्ता संघर्षात सामान्य नेतृत्त्व उदयास मर्यादा येताना दिसतात.

३२. सातारा जिल्ह्यातील ऐतिहासिक घराण्यांनी जिल्ह्यातील समस्त जनतेशी आपला सततचा जनसंपर्क वाढवून समाजाशी असलेली आपली नाळ व बांधिलकी जपल्यामुळे ही घराणी सातारा जिल्ह्याच्या राजकारणामध्ये स्थिरावली व यशस्वी झालेली दिसतात.

३३. सातारा जिल्ह्यातील राजकीय घराण्यांनी विकास कामे करून जिल्ह्याच्या राजकारणावर आपले वर्चस्व निर्माण केले आहे. त्यामुळे राजकीय पक्ष कोणताही असो तो याच घराण्यातील अभिजनांना निवडणूकीची उमेदवारी देतो. काही वेळेला तर अनेक पक्षाची उमेदवारी एकाच घराण्यात मिळालेली दिसते.

३४. घराणेशाहीमुळे सत्तेचे व नेतृत्त्वाचे विकेंद्रीकरण या तत्त्वाचे व लोकशाही मुल्यांचा ऱ्हास झालेला दिसतो.

३५. पाटण तालुक्यामध्ये देसाई घराण्यास हिंदूराव पाटील, कराड उत्तर बाळासाहेब पाटील यांच्या विरोधात मनोज घोरपडे तर कराड दक्षिण मधून विलासराव उंडाळकरांच्या विरोधात विलासराव वाठारकर यांनी अनेक वेळा निवडणूकीच्या माध्यमातून विरोध केला परंतु त्यांना यश आल्याचे दिसत नाही.

३६. जिल्ह्याच्या राजकारणावर स्वातंत्र्योत्तर कालखंडापासून १९९० ते २०१५ व आजपर्यंत काँग्रेस पक्षाचे वर्चस्व राहिले आहे. १९९९ नंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे वर्चस्व सातारा जिल्ह्यावर आहे. २०१४ नंतर भाजप, शिवसेना यांचा प्रवेश जिल्ह्याच्या राजकारणात झालेला दिसतो. राजकीय घराणी मोठ्या प्रमाणात काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात एकवटलेली दिसतात.

३७. सहकारी संस्थांमुळे जिल्ह्यातील अनेक बेरोजगार तरूणांना रोजगार मिळून त्यांचे अनेक प्रश्न मार्गी लागले आहेत. तसेच शिक्षण संस्था व वैद्यकीय महाविद्यालय, सहकारी बँका यांच्या निर्मितीमुळे जिल्ह्यातील गोरगरीब, अडाणी, शेतकऱ्यांच्या मुलांचा उच्च शिक्षणाचा प्रश्न मार्गी लागला असून त्यांच्या मुलांना वकील, डॉक्टर, इंजिनिअर प्राध्यापक म्हणून काम करण्याची संधी मिळाली असल्याचे दिसते.

३८. सातारा जिल्ह्यातील कराड उत्तर, पाटण, सातारा, वाई, फलटण या तालुक्यामधील राजकीय घराण्यातील दोन–दोन, तीन तीन पिढ्या राजकारणामध्ये सक्रीय आहेत. या

घराण्यांनी आपआपल्या मतदार संघामध्ये विकासाचे जाळे निर्माण केले त्यामुळे कार्यकर्ता आपल्यापेक्षा मोठा होऊ दिला नाही. दुष्काळी मतदारसंघापेक्षा सदन बागायती मतदारसंघात घराणेशाही प्रभावी असलेली दिसते.

३९. सातारा जिल्ह्यातील घराणेशाही स्थिर व बळकट राहण्याची कारणे म्हणजे त्या–त्या भागातील कार्यकर्ते जबाबदार आहेत.

४०. सातारा जिल्ह्यातील राजकीय घराण्यांच्याकडे सहकारी साखर कारखाना असल्याने निवडणुकीत पराभव होवूनही पुढील निवडणुकीत या घराण्यातील उमेदवार विजयी झालेले दिसतात. कारण साखर कारखान्यांच्या माध्यमातून असलेला हक्काचा कर्मचारी व सभासद मतदार वर्ग असलेला दिसतो.

४१. स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्था यांच्या माध्यमातून घराणेशाहीचे वारस राजकारणात प्रवेश करत पुढे विधानसभेचे नेतृत्त्व करताना दिसतात. स्थानिक स्वराज्य संस्था व सहकारी संस्थाचा वापर राजकीय वारसा स्थिर करण्यासाठी होताना दिसतो.

४२. १९९० ते २०१५ व आजपर्यंतच्या कालखंडाचा विचार करता महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळात जिल्ह्यातील ठरावीक घराण्यांचीच मक्तेदारी दिसते. उदा. अभयसिंहराजे भोसले, बाळासाहेब पाटील, शंभूराजे देसाई, राजराजे निंबाळकर या काळात इतर बिगर मराठा, महिला प्रतिनिधी यांना मंत्रीमंडळात प्रतिनिधित्व मिळालेले दिसत नाही.

४३. राजकीय घराणेशाहीचा प्रभाव भारतीय व बहुतांश घटक राज्यांच्या राजकारणावर पडलेला आहे. या राजकीय घराणेशाहीस सातारा जिल्हा ही अपवाद नसलेला दिसतो.

**गृहितकांची पडताळणी :**

**१) सातारा जिल्हयातील राजकीय घराण्यांचा फायदा संपूर्ण जिल्हयाला झाला.**

सातारा जिल्हयातील ग्रामीण व शहरी भागातील अनेक लोक विकास साधनाच्या व शिक्षणाच्या अभावामुळे अनेक क्षेत्रात मागास राहिले होते. त्यामुळे त्यांची दयनीय अवस्था झाली होती, त्यांच्या बेकारीत सतत वाढ होत होती. अशा वेळी सातारा जिल्हयातील घराण्यातून उदयास आलेल्या नेतृत्वाने आपापल्या मतदार संघामध्ये सहकारी व शैक्षणिक संस्थांची निर्मिती केली. परिणामी सातारा जिल्हयातील हजारो विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेऊन

वकील, डॉक्टर, इंजिनिअर, प्राध्यापक, संशोधक होण्याची व आपला सर्वांगीण विकास घडवून आणण्याची संधी मिळाली. त्यामुळे समाजातील विषमता, दरिद्रय व बेकारी कमी होण्यास मदत झाली. घरकुल योजना, भूमीहीनांना शेत जमिनीचे वाटप, शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य भाव अशा अनेक शासकीय योजना राबवून जिल्हयाचा सर्वांगीण विकास केला. अशा प्रकारे सातारा जिल्हयातील नेतृत्वाने जिल्हयामध्ये शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून अनेक लोकांचे वेगवेगळे प्रश्न मार्गी लावले म्हणून शोध प्रबंधासाठी गृहीत धरलेले सातारा जिल्हयातील राजकीय घराण्यांचा फायदा सातारा जिल्हयास झाला हे गृहीत सिध्द होते.

**२) सातारा जिल्हयातील राजकीय घराण्यातील नेतृत्वाचा फायदा जिल्हयातील मतदार संघाना झाला.**

भारतात १९५२ साली पहिली लोकसभा निवडणूक झाली. तर १९६२ मध्ये महाराष्ट्रामध्ये झालेल्या पहिल्या विधानसभा निवडणूकीपासून अनेक जातीधर्माच्या लोकांना निवडून येण्याची संधी प्राप्त झाली. त्यामध्ये ऐतिहासिक वारसा लाभलेल्या संस्थानिक घराण्यातील अभिजनांची संख्या लक्षणीय होती. सातारा जिल्हयातील कोरगांव, जावळी, सातारा, कराड उत्तर, कराड दक्षिण, पाटण, माण या विधानसभा मतदार संघात कमी कालावधीसाठी सामान्य लोकांना विधानसभेचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली असे असले तरी ऐतिहासिक वारसा लाभलेल्या अभिजनांचे सातारा जिल्हयाच्या राजकारणावर सतत वर्चस्व राहीले आहे. त्यामध्ये उदयनराजे भोसले, शिवेंद्रराजे भोसले, रामराजे नाईक निंबाळकर, पृथ्वीराज चव्हाण, बाळासाहेब पाटील, शंभुराज देसाई या राजकीय अभिजनांचा अग्रक्रमाने उल्लेख करावा लागेल. या अभिजनांनी आपापल्या मतदार संघातील अनेक जाती धर्माच्या लोकांना एकत्र करून त्यांच्यात ऐक्य निर्माण केले व त्यांचे अनेक प्रश्न मार्गी लावले. तसेच अनेक मोठे उद्योग व्यवसाय, सहकारी साखर कारखाने, शाळा, महाविद्यालये निर्माण करून मतदार संघाचा विकास केला. शेतीसाठी सिंचन योजना, छोट मोठे बंधारे, धरणे, कालवे अशा अनेक योजना राबवून मतदार संघातील हजारे एकर जमीन ओलीताखाली आणून शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविले. स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सोय, अत्याधुनिक दिवाबत्ती, पक्के रस्ते, गाव तेथे एस. टी. बस, नद्या, नाले (ओढे) यावरील पुलांची निर्मिती, हजारो अंगणवाडयाची आवश्यकतेनुसार निर्मिती अशा अनेक शासकीय योजना मतदार संघामध्ये राबवून मतदार

संघाचा सर्वांगिण विकास घडवून आणला. अशा प्रकारे सातारा जिल्हयातील राजकीय घराण्यातील नेतृत्वाचा फायदा जिल्हयातील मतदारसंघाना झाला म्हणून शोध प्रबंधासाठी गृहित धरलेले हे गृहितक सिध्द होते.

**३) सातारा जिल्हयामध्ये राजकीय घराण्यातील नेतृत्वाचा सक्रीय प्रभाव राहिला.**

राजकीय घराण्याच्या आधारावर निवडूण आलेल्या नेतृत्वाने लोकसहभाग व समाजकार्याचे सातत्य कायम ठेवत अनेक लोकांचे प्रश्न सोडविले त्यांनी मतदार संघातील सर्व जातीधर्माच्या लोकांना संघटीत करून राजकारणामध्ये सहभागी करून त्यांना राजकीयदृष्टया जागृत केले त्यांनी केलेल्या विकास कामामुळे लोकांचे मुलभूत प्रश्न मार्गी लागले. मतदार संघामध्ये या नेत्यांनी जाहीर सभा, कार्यकर्ता मिटींग, युवक व महिला मेळावे आयोजित करून शासनाच्या विविध योजनांची माहिती सामान्यांना करून दिली, त्यामुळे त्यांचा जनाधार वाढला व त्यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवणारा एक मोठा गट निर्माण झाला. परिणामी त्यांची आपल्या मतदारसंघावर मजबूत पकड निर्माण झाली त्यांनी केलेले प्रभावी कार्य जिल्हाअंतर्गत शांततेसाठी महत्वपूर्ण आहे, त्यामूळे हे गृहितक सिध्द झाले आहे.

**४) राजकीय सत्ता संघर्ष ठराविक घराण्यामध्ये दिसतो.**

सातारा जिल्हयातील राजकीय घराण्याचा अभ्यास करताना असे दिसते की, ठराविक घराण्यामध्येच सत्ता संघर्ष सुरू असल्याचे दिसते. स्वातंत्र्योत्तर भारतात पक्षीय राजकारणाची सुरूवात झाली त्यामुळे भारतासह महाराष्ट्रात अनेक राजकीय पक्षांची निर्मिती झाली. प्रत्येक राजकीय पक्ष बहुमतासाठी निवडून येण्याची क्षमता असलेल्या व्यक्तीलाच पक्षाची अधिकृत उमेदवारी देतो परिणामी ऐतिहासिक व राजकीय आधार प्राप्त अभिजनांचाच निवडणूकात उमेदवारी देताना पक्ष विचार करत असतो. उमेदवारी मिळविण्यासाठी अशी घराणी इच्छुक असतात. उमेदवारी एक व घराणी अनेक अशी अवस्था निर्माण होते. त्यामुळे उमेदवारी मिळविण्यासाठी या घराण्यामध्ये संघर्ष निर्माण होताना दिसतो म्हणून हे गृहितक सिध्द होते.

**५) राजकीय घराण्यातील नेतृत्वामुळे सातारा जिल्हयातील लोकांची राजकीय जागृती व राजकीय सहभाग वाढला.**

महाराष्ट्रात जी ऐतिहासिक घराणी निर्माण झाली. त्याच घराण्यातील अनेक अभिजन वेगवेगळया मतदार संघातून निवडून आले. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब

आंबेडकर, छत्रपती शाहू महाराज यांच्या समाज कार्याच्या प्रेरणेतून लोकांना राजकीयदृष्टया जागृत केले. यातूनच राजकीय पातळीवर काम करणाऱ्या अनेक संघटना निर्माण झाल्या. या माध्यमातून त्यांनी समाजाच्या प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी अनेक आंदोलने उभारून संसदबाहय राजकारणावर प्रभाव पाडला. परिणामी महाराष्ट्रातील अनेक राजकीय पक्षांनी या अभिजनांना लोकसभा व विधानसभेमध्ये प्रतिनिधीत्व करण्याची संधी दिली. तर काहींना घराण्यांच्या आधारावर उमेदवारी मिळाली. त्यामध्ये सातारा जिल्हयातील फलटणचे नाईक निंबाळकर घराणे, सातारचे भोसले घराणे, जावळीचे मोरे घराणे, पाटणचे पाटणकर घराणे इत्यादी घराण्यांचा व त्यामधून उदयास आलेल्या नेतृत्वांचा समावेश आहे. या अभिजनांनी सर्व समावेशक धोरणांना अनुसरून अनेक जातीधर्माच्या लोकांना एकत्रित करून त्यांची संघटनात्मक बांधणी केली. त्यामुळे त्यांची त्या त्या मतदार संघावर राजकीय पकड मजबूत झाली. परिणामी काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप, शिवसेना या पक्षांनी सातत्याने विधानसभा, विधान परिषद, लोकसभेचं नेतृत्व करण्याची संधी दिली. या संधीमुळे अनेक कार्यकर्त्यांना भारतीय राजकारणाची ओळख झाली. त्यांनी जिल्हयातील अनेक समाजामध्ये राजकीय जागृती घडवून आणली म्हणून हे गृहितक सिध्द होते.

**६) सातारा जिल्हयातील राजकीय घराण्यांचा जिल्हयाच्या राजकारणावर परिणाम झाला.**

सातारा जिल्हयातील राजकीय घराण्यांना ऐतिहासिक अशी पार्श्वभुमी लाभलेली आहे. या आधारावर त्यांची सातारा जिल्हयामध्ये स्वतंत्र अशी ओळख निर्माण झाली असून, याची दखल घेऊन महाराष्ट्रातील अनेक राजकीय पक्षांनी या घराण्यातील अनेक अभिजनांना विधानसभा ते लोकसभेमध्ये प्रतिनिधीत्व करण्याची संधी दिली. त्यामध्ये शिवाजी महाराजांचे थेट वंशज उदयनराजे भोसले, शिवेंद्रराजे भोसले, फलटण संस्थानचे मालोजीराजे, रामराजे, संजीवराजे नाईक निंबाळकर, पाटणचे शंभुराज देसाई, पृथ्वीराज चव्हाण या अभिजनांचा समावेश आहे. या अभिजनांनी मिळालेल्या संधीचा फायदा उठवत आपापल्या मतदार संघामध्ये अनेक प्रकारची विकास कामे करून आपली राजकीय ताकद वाढविली. तसेच अनेक सहकारी, शैक्षणिक, संस्थांची निर्मिती करून अनेक लोकांचे प्रश्न मार्गी लावले. परिणामी जिल्हयाच्या राजकारणामध्ये त्यांच्या शिवाय दुसऱ्या घराण्यांचा विचार होत नाही अशी मजबूत

पकड त्यांनी राजकारणात निर्माण केली. परिणामी उदयनराजे भोसले, रामराजे नाईक निंबाळकर, पृथ्वीराज चव्हाण, शंभूराज देसाई, बाळासाहेब पाटील या राजकीय अभिजनांना महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळामध्ये महत्वाच्या खात्यावर काम करण्याची अनेक वेळा संधी प्राप्त झाली. अशा प्रकारे या अभिजन वर्गाने केलेल्या कार्याचा जिल्हयासह संपूर्ण महाराष्ट्राच्या राजकारणावर प्रभावी परिणाम झाला म्हणून हे गृहितक सिध्द झाले.

**शिफारशी**

१) प्रत्येक राजकीय पक्षाने पक्ष विस्तारामध्ये योगदान देणाऱ्या निष्ठावंत कार्यकर्त्यालाच निवडणुकीत उमेदवारी द्यावी.

२) एकाच घराण्यातील दुसऱ्या व्यक्तीला दोन वेळ पेक्षा जादा संधी देऊ नये.

३) प्रत्येक पक्षाने सत्तेमध्ये बहुमताचा मॅजिक आकडा मिळविण्यासाठी प्रस्थापित घराण्यातील व्यक्तीला उमेदवारी न देता सर्व सामान्य कार्यकर्त्याला उमेदवारी देऊन आपली सर्व ताकत त्याच्या पाठीशी उभी करावी.

४) राजकीय घराण्यांना सरसकट विरोध न करता त्यांच्या कर्तृत्त्व, विकास इत्यादी कामाची दखल घेणे आवश्यक आहे.

५) निर्वाचन आयोगाने आपल्या नियमावलीत बदल करून प्रत्येक पक्षाने एकाच घराण्यात अनेक वेळा उमेदवारी न देण्यासाठीचा नियम करावा.

६) चळवळीतून पुढे आलेल्या संघर्षमय जीवन जगलेल्या नव नेतृत्त्वाला राजकीय पक्षांनी संधी द्यायला हवी.

७) भारतातील जवळपास सर्वच राजकीय पक्षामध्ये घराणेशाही रूजलेली आहे त्यामुळे घराणेशाही विरूद्ध कोणताच राजकीय पक्ष आपली भूमिका उघडपणे मांडणार नाही. त्यासाठी समाजातील सुशिक्षित तरूण मतदार तसेच सामाजिक संघटनांची भूमिका महत्त्वाची आहे.

८) प्रबोधनाच्या कार्यक्रमाच्या माध्यमातून राजकीय घराणेशाहीविरुद्ध जनजागृती होणे आवश्यक आहे. यासाठी समाज माध्यमांची भूमिका महत्त्वाची ठरते. जनजागृती करणे आवश्यक व गरजेचे आहे.

९) घराणेशाहीतील श्रीमंत उमेदवारासमोर सामान्य कार्यकर्ता निवडणूकीमध्ये तग धरू शकत नाही. अशा वेळी मतदार संघातील मतदारांनी कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता निस्वार्थीपणे अशा सामान्य उमेदवाराच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहून त्यास निवडून आणले पाहिजे.

१०) घराणेशाही नष्ट करण्यासाठी मतदारांनी सामान्य कार्यकर्त्याला आर्थिक मदत देऊन निवडून आणावे.

११) लोकशाही म्हणजे लोकांचे राज्य हे लोकशाही तत्त्व घराणेशाहीमुळे संपले आहे. म्हणून लोकांचे राज्य येण्यासाठी व समाजातील प्रत्येक भारतीय स्त्री–पुरूष मतदारांनी आपली लोकशाही बळकट करण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे व निस्वार्थी व निर्भिडपणे सामान्य उमेदवाराच्या निवडीसाठी प्रयत्न केले पाहिजेत.

१२) मतदारांनी घराणेशाहीस प्रोत्साहन देणाऱ्या राजकीय पक्षास विरोध करणे आवश्यक आहे.

१३) मतदारांनी निवडणूक काळामध्ये घराणेशाहीच्या दबावाला, अमिषाला बळी पडू नये.

१४) मतदारांनी कोणत्याही अमिषाला बळी न पडता प्रत्येक उमेदवाराचे शिक्षण, चारित्र्य, जनसंपर्क, कार्यपद्धती व समाजाशी असलेली बांधिलकी या सर्व गोष्टीचा विचार करून मतदान करावे.

१५) लोकशाही टिकवायची असल्यास समाजाप्रती आपले दायित्व असणाऱ्या, समाज विकासासाठी काम करणाऱ्या सामान्य उमेदवाराच्या पाठीमागे समाजाने खंबीरपणे उभे राहून आपला एक दबाव गट निर्माण करावा.

१६) प्रस्थापित राजकीय घराण्यांच्या माध्यमातून पुढे आलेले नेतृत्त्व त्यांनी केलेला मतदारसंघाचा विकास यासाठी त्यांना घराणेशाही म्हणून विरोध करणे योग्य होणार नाही.

१७) राजकीय पक्षांनी उमेदवारी देताना जातीचा, धर्माचा, घराणेशाहीचा विचार न करता कर्तृत्ववान उमेदवारास उमेदवारी द्यावी.

भारतात राजकीय क्षेत्रातील घराणेशाही हे भारतीय राजकीय व्यवस्थेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य असलेले दिसून येते. भारतीय मतदार याबाबतीत संवेदनशील तसेच विभुतीपूजा माननारा आहे. असे असले तरी घराण्यातील नेतृत्त्वाचा पराभव करण्याची क्षमताही भारतीय मतदारांची आहे. अर्थात अशा प्रकारची उदाहरणे कमी असल्याची दिसून येतात. उदा. विलासराव देशमुख, अशोक चव्हाण, पतंगराव कदम, विजयसिंह मोहिते–पाटील, शिवाजीराव पाटील–निलंगेकर, निवेदिता माने, प्रकाश आवाडे, प्रतिक पाटील (सांगली) या दिग्गज नेत्यांचा निवडणुकांमध्ये पराभव झाल्याचे दिसून येते. अर्थात लोकांना सक्षम पर्याय दिसून आला तर लोक घराणेशाहीच्या विरोधात कौल देताना दिसून येतात.

## पुढील संशोधनाच्या दिशा

मानव्यविद्याशाखेच्या संबंधित संशोधनाची प्रक्रिया अव्याहतपणे चालू असते. बदलत्या काळात संशोधकाच्या दृष्टिकोनातून बदलत जाते. त्यामुळे कोणतेही संशोधन हे परिपूर्ण ठरत नाही. मात्र एका संशोधूनातून नव्या संशोधनाला दिशा सापडतात. या अनुरोधाने प्रस्तुत संशोधनाच्या आधारे नवीन संशोधक, अभ्यास यांना पुढील संशोधनासाठीच्या काही दिशा सूचित करता येतात. त्या पुढीलप्रमाणे

१. सातारा जिल्हा विधानसभा निवडणुकीसंदर्भात अभ्यास केला जावा

२. सातारा जिल्ह्यातील सहकार चळवळ व नेतृत्त्व अभ्यास केला जाऊ शकतो.

३. सातारा जिल्ह्यातील नेतृत्त्वाला महाराष्ट्राच्या राजकारणावर पडलेला प्रभाव अभ्यास होऊ शकतो. सातारा जिल्ह्यातून महाराष्ट्र मुख्यमंत्रीपदी यशवंतराव चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण तर अनिवासी बाबासाहेब भोसले व एकनाथ शिंदे याची निवड झालेली आहे.

४. सातारा जिल्ह्यातील पक्षीय राजकारण अभ्यास होऊ शकतो. सातारा जिल्हा हा स्वातंत्र्यानंतर काँग्रेसचा बालेकिल्ला तर राष्ट्रवादी स्थापनेनंतर राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रभाव जिल्हामय निर्माण झालेला होत तर सध्या सर्व पक्ष प्रभावशाली प्रयत्न करताना दिसतात.

५. सातारा जिल्ह्याचे स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यात्तर राजकारण हा अभ्यास होऊ शकतो. स्वातंत्र्यपूर्व क्रांतिसह नाना पाटील तर स्वातंत्र्योत्तर यशवंतराव चव्हाण यांचे बोलते राजकारण यांची मांडणी होऊ शकते.

६. सातारा जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था व सहकारी संस्था राजकीय नेतृत्त्वांचा उदय हा अभ्यास विषय याचा देखील विचार होऊ शकतो.

# संदर्भ ग्रंथसूची


१. अनिल जगताप ,सातारा जिल्ह्यातील दलित चळवळीचा अभ्यास १९७२ ते २००२ टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे , पीएच.डी. राज्यशास्त्र या पदवीकरिता सादर केलेला अप्रकाशित प्रबंध.

२. अनुवाद : सतिश कामत – प्रवण रॉय दोश बआर सोपारीवाला, कौल लोकमताचा, भारतीय निवडणुकांची उकल, मनोविकास प्रकाशन, नारायण पेठ पुणे, २०१९

३. आवाले मनोज, महाराष्ट्रातील राजकीय घराणी, आदिश्रेय प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती, २०१९.

४. ओक प्रसाद, 'पेशवे धराण्याचा इतिहास' कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे तिसरी आवत्ती

५. करडेकर अनिल, महाराष्ट्र निवडणूक आणि निकाल, विद्या प्रकाशन, नागपूर

६. कुलकर्णी प्रसाद (संपा.) प्रबोधन प्रकाशन इचलकरंजी, सुवर्ण महोत्सवी

७. कुलकर्णी हेरंब, 'पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा घराणेशाही' अहवाल

८. कडू मोहिनी, भारतीय राजकारणातील स्त्रिया, विजय प्रकाशन, नागपूर, २००८.

९. कश्यप सुभाष, आपली संसद, नॅशनल बुक इस्ट इंडिया, २००६.

१०. काळे भगवान (संपा) : संयुक्त महाराष्ट्र काल आणि आज, संकेत प्रकाशन जालना, २३ जानेवारी १९९८

११. कुलकर्णी अतुल , अधून–मधून, स्पंदन प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, २०११.

१२. खडसे समर, 'अशोक चव्हाण अजून तरी आहेत,' लोकसत्ता दिवाळी अंक

१३. खर्डेकर दादाराजे, यशवंतराव मोहिते–विचाराचा दिपस्तंभ, स्मरणिका, मा. यशवंतराव व जिजाबा मोहिते जन्मशताब्दी कार्य गौरव–२०१९.

१४. खांडेकर राजीव, 'नाडले, नालढळे सुशिलकुमा शिंदे', लोकसत्ता दिवाळी अंक

१५. गायहानी रं. ना. व. ग. राहूरकर 'प्राचीन भारताचा सांस्कृतीक इतिहास' कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे

१६. गायकवाड विनोद कोंडीबाजी, महाराष्ट्राच्या राजकारणातील स्थित्यंतरे (२०१४ ते २०१७), अथर्व पब्लिकेशन, २०१७

१७. गायकवाड विनोद : भारतीय संविधान आणि राजकारणातील स्थित्यंतरे, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर

१८. गोरे संजय अर्जुनकर मधुकर, भारतीय लोकशाही, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०१२

१९. घोटोळ विवेक, मराठा वर्चस्वाचे बदलते आकृतीबंद आणि महाराष्ट्राचे राजकारण, समाज आणि अभिजनांचे पेच, युनिक ॲकॅडमी पब्लिकेशन्स् प्रा. लि., पुणे. प्रथम आवृत्ती २०२२.

२०. चव्हाण मनिषा शिवाजी, सातारा जिल्ह्यातील लोकसभा निवडणूका व राजकारणाचा अभ्यास, १९६० ते २००९ शिवाजी विद्यापीठास राज्यशास्त्र पीएच्. डी. पदवीसाठी सादर केलेला अप्रकाशित शोध प्रबंध

२१. चावरे दिलीप, 'पटले तेच रेटले', शंकराव चव्हाण, लोकसत्ता दिवाळी अंक

२२. चावळे सुनिल, 'निवांत विलासराव' लोकसत्ता दिवाळी अंक २०१०

२३. चोरमारे विजय, 'महाराष्ट्राचे राजकारण : नवे संदर्भ,' नवता बुक व वर्ल्ड, मुंबई २०१४

२४. चोरमारे विजय, कर्तृत्त्ववान मराठा स्त्रिया, विजिगीषा, २०२०.

२५. जाधव मकरंद लक्ष्मणराव –वाई, खंडाळा व महाबळेश्वरातील माझा माणसा जननायक पाटील–प्रकाशक, गोपाळराव पवार उडतरे दि. १५ ऑगस्ट २०१४

२६. जैन अशौक, राजधानीतून..., राजहंस प्रकाशन, १९ एप्रिल २००२

२७. टि. व्ही. ९– लोकसभा विश्केशन २०१९

२८. टि. व्ही. ९, मराठी न्यूज, २०१

२९. ठाकूर योगेंद्र, 'शिवसेना समज–गैरसमज', अमोद प्रकाशन, २०११, मुंबई

३०. ढवळे अशोक : शिवसेना निमर्फॅसिझमचा आविष्कार, जनशक्ती प्रकाशन, मुंबई, २००१

३१. ढोले मो. नि. (संपा.) श्री. यशवंतराव मोहिते गौरवग्रंथ, ७ नी. १९९५

३२. दिक्षित अनिल, भारतीय लोकशाही शाप की वरदान, नंदीनी पब्लिकेशन्स, २०१४.

३३. देवगावकर एस. जी., 'राजकीय मानववंशशास्त्र' श्री साईनाथ प्रकाशन, २००९
३४. देशमुख विश्वासराव मालोजीराजे श्रीमंत मालोजीराजे स्मृती प्रतिष्ठान फलटण, २००४
३५. देशमुख अलका, एकविसाव्या शतकातील बदलते समाजकारण आणि राजकारण, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०१०.
३६. देसाई रणजित (प्रस्तावना) लोकनायक बाळासाहेब देसाई, २०१०
३७. नवभारत (मासिक), काँग्रेस शताब्दी विशेषांक, भाग –१ व २, महाराष्ट्र राज्य विशेषांक, मे–जून, १९८४.
३८. नायकवाडे अशोक : आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार : मा. यशवंतराव चव्हाण, देवगिरी प्रकाशन, औरंगाबाद, २००९
३९. निकम, अधिकराव हि., ग्रामीण भागाच्या विकासासाठी सहकारी संस्थांचे योगदान १९७१ ते १९९५ अखेर, १० संस्थांचे व्यष्टी अध्ययन, शिवाजी विद्यापीठास एम. फील. पदवीसाठी सादर केलेला अप्रकाशित शोधनिबंध, २००१
४०. परदेशी, चव्हाण : महाराष्ट्राच्या राजकारणात मराठा, २००५
४१. पवार प्रकाश, 'महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना', प्रतिमा प्रकाशन पुणे, २००९
४२. पवार प्रकाश, समकालीन राज्यशास्त्र, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २०१२.
४३. पवार प्रकाश, कॉग्रेस पुढील आव्हाने आणि भाजपचा उदय, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २०१६.
४४. पवार प्रकाश : भारतीय राजकारण आणि नेतृत्त्वाची वाटचालः राजकीय धुरीणत्व–वर्चस्व, डायमंड पब्लिकेशन्स पुणे.
४५. पवार जयसिंगराव, आमच्या इति. शोध आणि बोध, मेहता पब्लिकेशन, २०१०
४६. पवार जयसिंगराव, मराठ्यांचे स्वातंत्र्य युद्ध, सुमेरू, १५ जुलै २००६
४७. पळशीकर सुहास व कुलकर्णी सुहास, 'महाराष्ट्रातील सत्ता संघर्ष : राजकीय पक्षांची वाटचाल', समकालिन प्रकाशन, पुणे, २०११

४८. पळशीकर सुहास, 'भारतातील प्रादेशिक पक्षाचे राजकारण', साधना प्रकाशन, पुणे, २००९

४९. पळशीकर सुहास, 'समकालीन भारतीय राजकारण' (काँग्रेस वर्चस्व ते हिंदू जमातवाद), प्रतिमा प्रकाशन, २००४, पुणे

५०. पळशीकर सुहास, 'जात व महाराष्ट्रातील सत्ताकारण', सुगावा प्रकाशन, पुणे १९९८

५१. पळशीकर सुहास, 'देश–प्रदेश प्रादेशिक राजकारणाच्या बदलत्या दिशा', २०१४

५२. पळशीकर सुहास, बिरमल नितीन, 'महाराष्ट्राचे राजकारण' (राजकीय प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ) प्रतिमा प्रकाशन, २००७, पुणे.

५३. पागे वि. स. संसदिय प्रशिक्षण केंद्र महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, महाराष्ट्र विधानसभा, सदस्यांची आडनावानुक्रमे यादी, विद्याभवन, मुंबई.

५४. पागे वि. स. : महाराष्ट्र विधानसभा सदस्यांनी आडनावानुक्रमे यादी (सन १९३७ ते २०१३), संसदीय प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र विधीमंडळ सचिवालय विधानभवन, मुंबई, नागपूर–२०१३

५५. पाठक अरूणचंद्र शं., महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर सातारा जिल्हा, प्रथम आवृत्ती, १९९९, महाराष्ट्र शासन, मुंबई.

५६. पाटील रा. तु., 'सांगली–साताऱ्याचे राजकारण', अजय प्रेस, कराड, १९८६

५७. पाटील महेंद्र, निवडणूक व्यवस्थापन, प्रशांत पब्लिकेशन्स, २०१९

५८. पेंडसे लालजी : महाराष्ट्राचे महामंथन, लोकवाङ्मय प्रकाशन, मुंबई, २०१०

५९. फडके य. दि., 'भारतातील निवडणूका १९५२ ते १९९९', अक्षर प्रकाशन, मुंबई

६०. फडके य. दि., राज्यपाल घटना आणि वास्तव, के. सागर पब्लिकेशन, २००६

६१. फडके य. दि. : पक्षांतराचे राजकारण, अक्षय प्रकाशन, मुंबई, २००१

६२. बोधे अनिल आ. (संपा.) लक्ष मनाचा नेता खासदार श्री. लक्ष्मणराव पाटील (लोकप्रिय कणखर नेते प्रा. शिवाजीराव चव्हाण) प्रकाशक, श्री. रोकडेश्वर, सहकार समुह रहिमतपूर, २५ फेब्रुवारी २००६

६३. ब्रम्हे सुलभा : सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्र, सुवर्ण कोणाच्या खिशात? जनशक्ती प्रकाशन, वरळी, मुंबई.

६४. बिरमल नितिन, प्रबळ जातींचा प्रादेशिक पक्ष – राष्ट्रवादी काँग्रेस, समाज प्रबोधन पत्रिका, पुणे, ऑक्टोबर–डिसेंबर २००४.

६५. बोठे पाटील बाळ, राजकारण आणि प्रसारमाध्यमे, विश्वकर्मा पब्लिकेन्स्, पुणे, २०१९.

६६. भावे मधुकर, पवार शरद, 'आष्टा व धानी अनप्रेप्रेडक्टेबल' लोकसत्ता–दिवाळी अंक २०१०

६७. भाटे भूपेंद्र, कामाचा माणूस, वाई.

६८. भारदे बाळासाहेब : काँग्रेस, काल आज उद्या : पृथ्वीराज प्रकाशन, पुणे, १९९४

६९. भोळे भा. ल., बेडकिहाल किशोर, 'बदलता महाराष्ट्र' (साठोत्तर परिवर्तनाचा मागोवा) आंबेडकर अकादमी, सातारा, प्रकाशन क्र. ८ दुसरी आवृत्ती २००३

७०. भोसले विकास मुगुटराव, सह्याद्रीचा पाठीराखा, पूर्वा प्रकाशन, २०१० कराड

७१. भोसले विकास मुगुटराव, सह्याद्रीचा पाठिराखा, पी. डी. पाटील यांच्याविषयीच्या आठवणी, संपा. विकास भोसले

७२. मेहेंदळे विश्वास, 'यशवंतराव ते विलासराव', अनुबंध प्रकाशन पुणे, दुसरी आवृत्ती २००७

७३. मोरे संग्राम : ग्रामीण विकासाचे राजकारण आणि काँग्रेस, अरुणा प्रकाशन, लातूर, ऑगस्ट २०१०

७४. मोरे विठ्ठल, 'महाराष्ट्रातील आघाड्याचे राजकारण : पार्श्वभूमी आणि पुढील दिशा', अरुणा प्रकाशन, लातूर, २०१५

७५. मोरे विठ्ठल, 'महाराष्ट्रातील राजकारणातील आघाड्या व भवितव्य', अरुणा प्रकाशन, लातूर, २०१३

७६. मोरे सदानंद (संपा.) गणपतराव कणसे, समाजकारणातील भागीरथ.

७७. मंगळवेढेकर राजा, (संपा), 'भूमिपुत्र–पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांचे चरित्र' प्रवरानगर, १९७७

७८. य.दि.फडके, नवव्या लोकसभेची निवडणूक, समाज प्रबोधन पत्रिका, पुणे, जानेवारी–मार्च, १९९०.

७९. रणसुभे विलास (संपा.) : संयुक्त महाराष्ट्राची पन्नास वर्षे, प्रथम आवृत्ती, श्रमिक प्रतिष्ठान, बिंदु चौक कोल्हापूर, २०१०

८०. रायकर राजाभाऊ, जोशी दिलीप : समर्थ शिवसेना, प्रथम आवृत्ती, सदाशिव पेठ पुणे.

८१. रॉय प्रणय, अनु. कामत सतिश : कौल लोकमताचा (भारतीय निवडणुकांची उकल), मनोविकास प्रकाशन, पुणे.

८२. लेले जयवंत : भारत समाज आणि राजकारण, यशवंतराव यांचे प्रकट चिंतन, रोहन प्रकाशन, पुणे, २०२०

८३. लोकसभा निवडणूक पूर्वपीठीका, जिल्हा माहिती कार्यालय, सातारा लोकसभा निवडणूक सिंहावलोकन.

८४. लोकसत्ता दिवाळी अंक

८५. लोकसत्ता २/७/२०२० महाराष्ट्रातील घराणेशाही

८६. वर्दापूरकर प्रविण, सुधाकर नाईक मिश्कील आणि खंबीर, लोकसत्ता दिवाळी अंक २०१०

८७. विक्रमसिंह पाटणकर, जनसामान्यांचा नेता

८८. शाहीर जगताप विजय रामचंद्र : संयुक्त महाराष्ट्र झालास पाहिजे, विजयश्री प्रकाशन, श्रीपादनगर इचलकरंजी.

८९. शाहू घनशाम, भारतातील सामाजिक चळवळी, २०१७

९०. शेवाळे सीमा, दिगंबर, महाराष्ट्रातील ग्रामीण नेतृत्व आणि सहकार चळवळीतील आण्णासाहेब मगर विशेष अभ्यास १९९१ ते १९७९ अप्रकाशित पीएच.डी. शोधप्रबंध इतिहास विभाग, सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ, पुणे २०१५

९१. शौरी अरुण, द पार्ल मेंटरी सिस्टिम, अनुवाद – अशोक पाथरकर, प्रकाशक – मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथम आवृत्ती, २०१०.

९२. श्रीमान योगी, लेख–श्रीमंत दादाराजे खर्डेकर

९३. सणस चंद्रकांत, माझे गुरूत्युल्य, पितृत्युल्य, तात्या, लक्ष पर्व.

९४. सरवटे दिलीप, डॉ. निरगुडकर उदय, निवडणूक जिंकण्यासाठी सर्व काही, राजहंस प्रकाशन, पुणे, २००९.

९५. सह्याद्री – सह्याद्री सहकारी साखार कारखाना लि. यशवंतनगर, प्रकाशन–चेअरमन, यु.व्ही. प्रिंटर्स, कराड, २०२२.

९६. सातारा जिल्हा गॅझेटिअर, पुरवणी २०१२

९७. साधू अरूण, 'सहकार धुरीण, रोहन प्रकाशन, पुणे २०१४

९८. साने रविकिरण, ... संयुक्त महाराष्ट्राचा, डायमंड पब्लिकेशन, २००९.

९९. सिरसीकर व म. 'आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण,' कॉन्टिनेन्टल प्रकाशन विजयानगर, पुणे, व्दितीय आवृत्ती २००८

१००. सुराना पन्नालाल, बेडकीहाळ : आजचा महाराष्ट्र, श्रीविद्या प्रकाशन पुणे, १९८८

१०१. सूर्यवंशी कृ. गो., बहुजन हिताय, बहुजन सुखाय, बाळासाहेब देसाई यांची जीवनकथा, कारळे प्रकाशन १९७०

१०२. सेतू, आदरणीय पी. डी. पाटील, स्मृतिग्रंथ, संपा. रा. गो. प्रभुणे, २०१५

१०३. स्पंदन २०१५–कृष्णा कृषी महाविद्यालय, रेठरे बु।।–मुखपृष्ठ.

१०४. हसनीरा सुरेंद्र, 'वसंतदादा पाटील सर्वांचेच दादा' लोकसत्ता दिवाळी

१०५. व्होरा राजेंद्र, पळशीकर सुहास, महाराष्ट्रातील सत्तांतर, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई,१९९६.

**English References:**

1. B. S. Baviskar : The Politics of Development : Sugar Co-Operatives in Rural Maharashtra –Oxford University Press : Calcutta, 1980. Print.
2. Dr. V. C. Patil : Bharatiya Janata Party in Maharashtra : A.B.S. Publication : Varanasi, 2013 Print.
3. B. S. Baviskar : Understanding Indian Society Past and Present Orient Blackgwan Private Limited 2018

4. Baviskar, B. S : co-opratives and cast im maharashtra : A case study, Sociological Bulletian, vol. XVIII, no. 2 (September 1969). PP.148-66
5. Baviskar, B. S : Faction and Party Plitisl : General Elections in an Assembly constituency im Maharashtra, Sociological Bulletin, Vol. XX, no. 1 (March 1971), pp. 54-77
6. Inamdar, N. R. : Government and Co-operative Sugar Factories, Popular Prakashan, Bombay, 1965
7. Mohite, Y. J. : The co-operative movement in Maharashtra State : A reappraisal, myrdal, Gunnar, Asian Drama : An Enquiry into the poverty of Nations, Vol. II, Pantheon New York, 1968
8. Asthana Pushpa : Party system in India, Critevion Publication , Delhi, 1988
9. Lele Jayant : Elite Pluralism an Class Rule, Political Development in Maharashtra, Popular Prakashan, Bombay, 1982
10. Omvedt Gail (Ed.) : Land, Caste and Politics in India Stutes Gaild Publicaon, Delhi, 1982

**Websites:**

1. https://www.bbc.com/marathi/india-48455459
2. https://mr.wikipedia.org/wiki/
3. https://mr.wikipedia.org/wiki/
4. https://mr.wikipedia.org/wiki/
5. https://www.wikiwand.com/en/ShankarraošChavan
6. https://mr.wikipedia.org/wiki/
7. https://thinkmaharashtra.com/dynasty-of-the-nimbalkars/
8. https://en.wikipedia.org/wiki/LaxmanraošPandurangšPatil
9. https://www.postboxindia.com/karad-maharashtra-yashwantrao-mohite-birth-anniversary/
10. https://en.wikipedia.org/wiki/
11. https://marathivishwakosh.org/33289/
12. https://mr.wikipedia.org/wiki/

13. http://oldrol.lbp.world/Upload-rticle/109.pdf

14. https://mr.wikipedia.org/wiki/

15. https://vishwakosh.marathi.gov.in/25493/

177. https://en.m.wikipedia.org/wiki/political_families_of_Maharashtra

## नियतकालिके

१. अर्थसंवाद

२. जर्नल ऑफ शिवाजी युनिव्हर्सिटी कोल्हापूर; हयुमॅनिटींग ॲड सोशल सायन्स, व्हॅल्युम

३. प्रबोधन प्रकाशन ज्योती

४. लोकराज्य

५. समाज प्रबोधन प्रत्रिका

६. सहकारी महाराष्ट्र

७. साधना

८. ज्ञानगंगोत्री

9. Economic and Political weekly

## स्मरणीका

१. अमृत कुंभ, अमृतमहोत्सवी वर्ष, सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. सातारा

२. घणाघात, यशवंतराव मोहिते, जन्मशताब्दी गौरव ग्रंथ.

३. जागृत सातारा, गोखले पु. पा. लोकसेवा संघ,

४. दौलत, बाळासाहेब देसाई, स्मरणीका

५. मालोजीराजे, स्मरणीका, प्राचार्य विश्वासराव देशमुख

६. लोकनायक बाळासाहेब देसाई, वसंत बहुलेकर

७. समाजकारणातील भगीरथ, कै. आमदार विलासराव पाटील, रयत संघटना

८. संसदपटू आमदार, शंभुराज शिवाजीराव देसाई

**दैनिक वृत्तपत्रे**

१. दैनिक तरुण भारत

२. दैनिक पुढारी

३. दैनिक महाराष्ट्र टाईम्स

४. दैनिक लोकमत

५. दैनिक लोकसत्ता

६. दैनिक सकाळ

७. लोकसत्ता, दिवाळी अंक, २०१०.

# ''सातारा जिल्ह्यातील राजकीय घराण्यांचा अभ्यास १९९० ते २०१५''

संशोधन मार्गदर्शक

**प्रा. डॉ. माणिक सोनावणे**
समन्वयक व विभाग प्रमुख
नेसावि, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ,
पुणे

संशोधक विद्यार्थी

**श्री. अधिकराव हिंदूराव निकम**
राज्यशास्त्र विभाग
विजयसिंह यादव महाविद्यालय,
पेठवडगाव, कोल्हापूर

---

मतदार संघ नाव – ____________________

राजकीय घराण्याचे नाव – ____________________

## मुलाखत प्रश्नावली

मुलाखत व्यक्तीचे नाव – ____________________

पत्ता – ____________________

व्यवसाय – __________ लिंग – __________ वय –

---

(योग्य उत्तराच्या ठिकाणी ☑ खूण करा.)

१) राजकीय घराण्याने विविध सहकारी संस्था मार्फत रोजगार निर्मिती केली आहे काय?

अ) होय ☐ ब) नाही ☐ क) सांगता येत नाही ☐

२) राजकीय घराण्याचे, नेतृत्वाचे प्रभावक्षेत्र कोणते आहे ?

अ) तालुका ☐ ब) जिल्हा ☐ क) राज्य ☐ ड) राष्ट्र

३) सत्तेच्या विकेंद्रीकरणात या राजकीय घराण्याने सामान्य कार्यकर्त्याला इतर ठिकाणी नेतृत्वाची संधी दिली आहे काय ?

अ) होय ☐ ब) नाही ☐ क) सांगता येत नाही ☐

४) राजकीय घराण्यातील महिला सदस्य राजकारणात सक्रीय आहेत काय ?

अ) होय ☐ ब) नाही ☐ क) सांगता येत नाही ☐

५) मतदार संघातील सर्वसामान्याचे प्रश्न, समस्या सोडवण्यासंदर्भात वर्तमान नेतृत्वाच्या भूमिकेबद्दल आपले मत

अ) उत्कृष्ट ☐ ब) चांगले ☐ क) सामान्य ☐ ड) सांगता येत नाही ☐

६) राजकीय घराण्याचे नेतृत्व विविध सहकारी संस्था, संघटना संघटनाचे नेतृत्व करतात काय ?

अ) होय ☐ ब) नाही ☐ क) सांगता येत नाही ☐

७) राजकीय घराण्याच्या कार्याने मतदार संघाचा विकास झाला आहे असे वाटते काय?

अ) होय ☐ ब) नाही ☐ क) सांगता येत नाही ☐

८) राजकीय घराण्यातील नेतृत्वाने पक्ष बदल केलेस आपणास मान्य आहे काय ?

अ) होय ☐ ब) नाही ☐ क) सांगता येत नाही ☐

९) समकालीन राजकीय परिस्थितीत आपल्या मतदार संघातील घराणे नेतृत्व करण्यास प्रभावशाली आहे काय ?

अ) होय ☐ ब) नाही ☐ क) सांगता येत नाही ☐

१०) राजकीय घराण्याच्या प्रभावामुळे इतर नवीन नेतृत्व विकसित होत नाही असे वाटते का?

अ) होय ☐ ब) नाही ☐ क) सांगता येत नाही ☐

११) राजकीय घराणेशाही लोकशाही व्यवस्थेसाठी अडसर ठरत आहे असे आपणास वाटे काय?

अ) होय ☐ ब) नाही ☐ क) सांगता येत नाही ☐

१२) राजकीय घराण्यांच्या आर्थिक प्रभावामुळे त्यांच्या विरोधी सर्वसामान्य व्यक्ती निवडणूक लढवू शकत नाही असे आपणास वाटते काय ?

अ) होय ☐ ब) नाही ☐ क) सांगता येत नाही ☐

१३) राजकीय घराण्यातील नेतृत्व शिवाय राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या इतर उच्य शिक्षित, कार्यक्षम नेतृत्वास आपण स्विकाराल काय ?

अ) होय ☐ ब) नाही ☐ क) सांगता येत नाही ☐

१४) राजकीय घराण्याच्या नवीन पिढीच्या नेतृत्वाला आपली मान्यता आहे काय ?

अ) होय ☐ ब) नाही ☐ क) सांगता येत नाही ☐

१५) राजकीय घराण्यातील जुण्या पिढीतील नेतृत्वापेक्षा नवीन नेतृत्वाबद्दल आपले मत काय?

अ) उत्कृष्ट ☐ अ) होय ☐ ब) चांगले ☐ क) सामान्य ☐

१६) राजकीय घराण्याचे नेतृत्व अधिक प्रभावी व्हावे असे वाटते काय?

अ) होय ☐ ब) नाही ☐ क) सांगता येत नाही ☐

१७) मतदार संघातील विकासासाठी राजकीय घराण्याचे कोणते उल्लेखनीय कार्य आपणास महत्वाचे वाटते?

-----------------------------------------

-----------------------------------------

-----------------------------------------

१८) आपण कोणत्या कारणात्सव घराण्याचे नेतृत्व मान्य करत आहेत?

-----------------------------------------

-----------------------------------------

-----------------------------------------

१९) आपल्या मतदार संघात कोणत्या राजकीय घराण्याचा आपल्याला सर्वाधिक प्रभाव वाटतो?

-----------------------------------------

-----------------------------------------

-----------------------------------------

२०) मतदार संघाच्या विकासासाठी या नेतृत्वाकडून आपणास काय अपेक्षा आहेत?

-----------------------------------------

-----------------------------------------

-----------------------------------------

***

# ''सातारा जिल्ह्यातील राजकीय घराण्यांचा अभ्यास १९९०–२०१५''

## टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

तात्विक व सामाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत राज्यशास्त्र
विषयातील विद्यावाचस्पती (पीएच. डी.) पदवीसाठी
सादर केलेला शोधप्रबंध

स्थापना १९२१


संशोधक

**श्री. अधिकराव हिंदुराव निकम**

पी.आर.एन : ०२११५००५६५०

मार्गदर्शक

**प्रा. डॉ. माणिक सोनावणे**
समन्वयक, विभागप्रमुख राज्यशास्त्र विभाग
नेसावि, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे


**राज्यशास्त्र विभाग**

**मे, २०२४**

# 80 Recommendation

## संशोधनासंबंधी शिफारशी, निष्कर्ष आणि

## पुढील संशोधनाची दिशा

**1. Suggestions (शिफारशी)**

१) प्रत्येक राजकीय पक्षाने पक्ष विस्तारामध्ये योगदान देणाऱ्या निष्ठावंत कार्यकर्त्यालाच निवडणुकीत उमेदवारी द्यावी.

२) एकाच घराण्यातील दुसऱ्या व्यक्तीला दोन वेळ पेक्षा जादा संधी देऊ नये.

३) प्रत्येक पक्षाने सत्तेमध्ये बहुमताचा मॅजिक आकडा मिळविण्यासाठी प्रस्थापित घराण्यातील व्यक्तीला उमेदवारी न देता सर्व सामान्य कार्यकर्त्याला उमेदवारी देऊन आपली सर्व ताकत त्याच्या पाठीशी उभी करावी.

४) राजकीय घराणेशाहीला सरसकट विरोध न करता त्यांच्या कर्तृत्त्व, विकास इत्यादी कामाची दखल घेणे आवश्यक आहे.

५) निर्वाचन आयोगाने आपल्या नियमावलीत बदल करून प्रत्येक पक्षाने एकाच घराण्यात अनेक वेळा उमेदवारी न देण्यासाठीचा नियम करावा.

६) चळवळीतून पुढे आलेल्या संघर्षमय जीवन जगलेल्या नव नेतृत्त्वाला राजकीय पक्षांनी संधी द्यायला हवी.

७) भारतातील जवळपास सर्वच राजकीय पक्षामध्ये घराणेशाही रूजलेली आहे त्यामुळे घराणेशाही विरूद्ध कोणताच राजकीय पक्ष आपली भूमिका उघडपणे मांडणार नाही. त्यासाठी समाजातील सुशिक्षित तरूण मतदार तसेच सामाजिक संघटनांची भूमिका महत्त्वाची आहे.

८) प्रबोधनाच्या कार्यक्रमाच्या माध्यमातून राजकीय घराणेशाहीविरुद्ध जनजागृती होणे आवश्यक आहे. यासाठी समाज माध्यमांची भूमिका महत्त्वाची ठरते. जनजागृती करणे आवश्यक व गरजेचे आहे.

९) घराणेशाहीतील श्रीमंत उमेदवारासमोर सामान्य कार्यकर्ता निवडणूकीमध्ये तग धरू शकत नाही. अशा वेळी मतदार संघातील मतदारांनी कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता निस्वार्थीपणे अशा सामान्य उमेदवाराच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहून त्यास निवडून आणले पाहिजे.

१०) घराणेशाही नष्ट करण्यासाठी मतदारांनी सामान्य कार्यकर्त्याला आर्थिक मदत देऊन निवडून आणावे.

११) लोकशाही म्हणजे लोकांचे राज्य हे लोकशाही तत्त्व घराणेशाहीमुळे संपले आहे. म्हणून लोकांचे राज्य येण्यासाठी व समाजातील प्रत्येक भारतीय स्त्री–पुरूष मतदारांनी आपली लोकशाही बळकट करण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे व निस्वार्थी व निर्भिडपणे सामान्य उमेदवाराच्या निवडीसाठी प्रयत्न केले पाहिजेत.

१२) मतदारांनी घराणेशाहीस प्रोत्साहन देणाऱ्या राजकीय पक्षास विरोध करणे आवश्यक आहे.

१३) मतदारांनी निवडणूक काळामध्ये घराणेशाहीच्या दबावाला, अमिषाला बळी पडू नये.

१४) मतदारांनी कोणत्याही अमिषाला बळी न पडता प्रत्येक उमेदवाराचे शिक्षण, चारित्र्य, जनसंपर्क, कार्यपद्धती व समाजाशी असलेली बांधिलकी या सर्व गोष्टीचा विचार करून मतदान करावे.

१५) लोकशाही टिकवायची असल्यास समाजाप्रती आपले दायित्व असणाऱ्या, समाज विकासासाठी काम करणाऱ्या सामान्य उमेदवाराच्या पाठीमागे समाजाने खंबीरपणे उभे राहून आपला एक दबाव गट निर्माण करावा.

## 2. Conclusion (निष्कर्ष)

१. सातारा जिल्ह्यातील प्रथम दोन प्रभावी राजकीय घराणी भोसले, निंबाळकर ही संस्थानिक व ऐतिहासिक घराणी आहेत.

२. सातारा जिल्ह्यातील राजकीय घराणी ही मराठा जातीची असलेली दिसून येतात.

३. सातारा – भोसले, फलटण–निंबाळक, कराड उत्तर–पाटील या राजकीय घराण्यांच्या विरोधी प्रभावी नेतृत्त्व निर्माण झालेले नाही.

४. पाटणकर, विलासराव पाटील, वाई–भोसले या राजकीय घराण्यांचा वारस विधानसभा निवडणुकीत यशस्वी झाले नसले तरी मतदार संघात प्रतिस्पर्धी म्हणून आपले अस्तित्व ठेवून आहेत.

५. सातारा – भोसले, निंबाळकर, कराड उत्तर–पाटील, वाई–पाटील या राजकीय घराण्यांच्या प्रभाव जिल्ह्याच्या राजकारणावर निर्माण झालेला दिसतो.

६. कोरेगाव मतदार संघातील शशिकांत शिंदे ह्यांना राजकीय वारसा नसून सुद्धा ते जिल्ह्याच्या राजकारणात आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण करताना दिसतात.

७. राजकीय घराण्यांच्या कार्याने विविध सहकारी संस्थांच्या माध्यमातून जिल्ह्यामध्ये रोजगार निर्मिती झालेली दिसून येते .

८. सातारा जिल्ह्यातील प्रभावी राजकीय घराण्यांनी नेतृत्त्वाने पक्ष बदल केल्यास त्यास मतदार संघातील जनतेचे समर्थन असलेले दिसते. यावरून असे दिसून येते की, मतदार संघात राजकीय पक्षापेक्षा, राजकीय घराण्यांना महत्त्व आहे.

९. पृथ्वीराज चव्हाण हे राज्याच्या राजकारणात सक्रीय असले तरी त्यांनी राष्ट्रीय राजकारणात सक्रिय राहावे, असे मत मतदारांचे दिसून येते.

१०. जिल्ह्याच्या राजकारणावर राजकीय घराण्यांचा प्रभाव असला तरी ही राजकीय घराणी लोकशाही व्यवस्थेच्या विकासासाठी अडचणीची आहेत असे मत जिल्ह्यातील ५३ टक्के लोकांचे असलेले दिसते.

११. सातारा जिल्ह्यातील राजकीय घराण्यांचा प्रभाव, आर्थिक संपन्नता यांचा नकारात्मक परिणाम म्हणून सर्वसामान्य नेतृत्त्वास लोकसभा व विधानसभेमध्ये प्रतिनिधित्व करण्याची संधी प्राप्त होताना दिसत नाही.

१२. राजकीय घराण्यांच्या नव्या पिढीतील नेतृत्त्चापेक्षा जुन्या पिढीतील नेतृत्त्वावर जास्त विश्वास होता असे दिसून येते.

१३. सातारा जिल्ह्यातील १९९० ते २०१५ या कालखंडातील राजकीय घराणेशाहीचा अभ्यास करता असे दिसून येते की, कराड–पाटण तालुक्यातील प्रेमलाताई चव्हाण यांचा अपवाद सोडला तर महिला नेतृत्त्व, वारसा पुढे आल्याचे दिसत नाही. घराण्यांच्या राजकीय वारसासाठी स्त्रियांच्यापेक्षा पुरुषांचा प्रभाव दिसतो.

१४. स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये काँग्रेस पक्षाने सहकार चळवळीच्या माध्यमातून सातारा जिल्ह्याच्या राजकारणावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. सातारा जिल्ह्यातील मराठा अभिजनांनी काँग्रेस वर्चस्वाचा फायदा उठवत. विधानसभा व लोकसभा निवडणूकीमधून निवडून येऊन आपआपल्या मतदार संघावर वर्चस्व निर्माण केले आणि सहकारी साखर कारखाने, शिक्षण संस्था, सुतगिरण्या, दूध संस्था अशा अनेक सहकारी संस्थांची निर्मिती केली. या संस्थावर त्यांनी आपल्याच जवळच्या नातेवाईकांना चेअरमन, अध्यक्ष म्हणून काम करण्याची संधी देवून घराणेशाही निर्माण केली.

१५. सातारा जिल्ह्यातील घराणेशाहीचे वैशिष्ट्ये म्हणजे ज्याप्रमाणे महाराष्ट्रामध्ये सहकार चळवळीच्या माध्यमातून राजकीय घराणी निर्माण झाली, त्याप्रमाणे सातारा जिल्ह्यामध्ये ही राजकीय घराणी उदयास आली आहेत ती लोकसभा व विधानसभा निवडणूकीच्या माध्यमातून निवडून आल्यानंतर त्यांनी सहकारी संस्थांचे जाळे आपआपल्या मतदार संघामध्ये निर्माण करून घराणेशाही निर्माण केल्याचे चित्र संबंध सातारा जिल्ह्यामध्ये दिसते.

### 3. Future Findings (पुढील संशोधनाच्या दिशा)

मानव्यविद्याशाखेच्या संबंधित संशोधनाची प्रक्रिया अव्याहतपणे चालू असते. बदलत्या काळात संशोधकाच्या दृष्टिकोनातून बदलत जाते. त्यामुळे कोणतेही संशोधन हे परिपूर्ण ठरत नाही. मात्र एका संशोधूनातून नव्या संशोधनाला दिशा सापडतात. या अनुरोधाने प्रस्तुत संशोधनाच्या आधारे नवीन संशोधक, अभ्यास यांना पुढील संशोधनासाठीच्या काही दिशा सूचित करता येतात. त्या पुढीलप्रमाणे

१. सातारा जिल्हा विधानसभा निवडणुकीसंदर्भात अभ्यास केला जावा

२. सातारा जिल्ह्यातील सहकार चळवळ व नेतृत्त्व अभ्यास केला जाऊ शकतो.

३. सातारा जिल्ह्यातील नेतृत्त्वाला महाराष्ट्राच्या राजकारणावर पडलेला प्रभाव अभ्यास होऊ शकतो. सातारा जिल्ह्यातून महाराष्ट्र मुख्यमंत्रीपदी यशवंतराव चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण तर अनिवासी बाबासाहेब भोसले व एकनाथ शिंदे याची निवड झालेली आहे.

४. सातारा जिल्ह्यातील पक्षीय राजकारण अभ्यास होऊ शकतो. सातारा जिल्हा हा स्वातंत्र्यानंतर कॉंग्रेसचा बालेकिल्ला तर राष्ट्रवादी स्थापनेनंतर राष्ट्रवादी कॉंग्रेसचा प्रभाव जिल्हामय निर्माण झालेला होत तर सध्या सर्व पक्ष प्रभावशाली प्रयत्न करताना दिसतात.

५. सातारा जिल्ह्याचे स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यात्तर राजकारण हा अभ्यास होऊ शकतो. स्वातंत्र्यपूर्व क्रांतिसह नाना पाटील तर स्वातंत्र्योत्तर यशवंतराव चव्हाण यांचे बोलते राजकारण यांची मांडणी होऊ शकते.

६. सातारा जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था व सहकारी संस्था राजकीय नेतृत्त्वांचा उदय हा अभ्यास विषय याचा देखील विचार होऊ शकतो.